गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय

# विचार-संग्रह
## अर्थात
# गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे निवडक लेख




संपादक
राजन गवस



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# विचार-संग्रह

अर्थात्

## गुरुवर्य कृ. अ. केळूसकर यांचे निवडक लेख

**भाग १ ला**

● संग्राहक ●

दत्ताराम पु. वेंगुर्लेकर

संपादक – राजन गवस

प्रस्तावना – प्रवीण बांदेकर

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

वाय ६५०-१

▸▸ **पुस्तकाचे नाव :** गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय विचार-संग्रह अर्थात गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे निवडक लेख

▸▸ **लेखक :** कृष्णराव अर्जुन केळूसकर

▸▸ **संपादक :** डॉ. राजन गवस

▸▸ **पुनर्मुद्रण :** २०१९

▸▸ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

▸▸ © **प्रकाशकाधीन :**

▸▸ **मुखपृष्ठ :** सरदार जाधव

▸▸ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

▸▸ **किंमत :** 169/-

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी




**गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर**

## अध्यक्षांचे मनोगत...

### विचार-संग्रह अर्थात गुरुवर्य केळूसकर यांचे निवडक लेख : भाग-१

गुरुवर्य कृष्णराव अर्जून केळूसकर हे गेल्या शतकातील एक महत्त्वाचे चरित्रकार आहेत. संत तुकाराम महाराज, गौतम बुद्ध आणि छत्रपती शिवाजी महाराज या युगपुरुषांचे ते मराठी भाषेतील पहिले चरित्रकार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात २० ऑगस्ट १८६० रोजी जन्मलेल्या केळूसकरांचे शिक्षण सावंतवाडी व नंतर मुंबईत झाले. विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिक झालेल्या कृष्णरावांनी पुढे या शाळेत अध्यापन करत असताना लेखन, वाचनाच्या गोडीतून मराठी-इंग्रजी भाषेवर प्रभुत्त्व मिळवून वेगवेगळ्या विषयात अभ्यास करून प्रगती केली.

सत्यशोधक समाज, कामगार, शेतकरी, मागासवर्ग आणि दलित यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्यांसोबत ते काम करू लागले. सामाजिक सुधारणाबद्दल निर्भिडपणे लिहू लागले, विचार मांडू लागले. त्यामुळे गेल्या शतकातील राजकीय ऋषी मामा परमानंद, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे या विचारवंतांनी त्यांच्या लेखणी व विचारांची प्रशंसा केली. मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी लेखन, सामाजिक कार्य आणि प्रबोधनाचे काम सुरू ठेवले. यातून शिक्षणशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, बालवाङ्मय या चौफेर क्षेत्रात लेखन-वाचन अभ्यास सुरू ठेवला. या साधनेतून गीता आणि बौद्ध धर्माचे भाष्यकार होत धर्मशास्त्रातही त्यांनी आपले वेगळेपण दाखवून दिले.

गुरुवर्य केळूसकर हे गहन विषयांवर लिहिणारे प्रकांड पंडित बनले; परंतु त्याकाळात सर्वच बहुजन समाजाच्या लेखकाच्या वाट्याला येणारी उपेक्षा आणि फरपट त्यांच्याही वाट्याला आली. महाराष्ट्राने या वाङ्मयमहर्षींकडे दुर्लक्षच केले. जनात जनार्दन पाहणारे ते ऋषितुल्य प्रज्ञावंत होते. महात्मा जोतीराव फुले यांची सत्यशोधक समाज चळवळ आणि मराठा ऐक्येच्छू सभेसाठी त्यांनी आयुष्यभर कार्यकर्ता म्हणून काम केले. त्यांच्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते समाजास मिळाले.

संत चरित्रे कशी लिहावीत, हे केळूसकरांनी तुकाराम बाबांचे चरित्र आणि गौतम बुद्धांचे चरित्र लिहून महाराष्ट्रास दाखविले. सत्यनिष्ठा, चिकित्सा व माहिती पडताळून पाहणे हे त्यांच्या चरित्र लेखन आणि एकूणच लेखनाची गुणवैशिष्टे आहेत. ते लिहिताना जितका भाग ऐतिहासिक व खरा भासायचा, तेवढाच ते घेत असत.

महाराजा सयाजीराव गायकवाड या दुरद्रष्टी राजाने देशभरातील नव्हेतर जगभरातील वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञ अभ्यासकांना ओळखून त्यांना बडोद्यात बोलावून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग रयतेसाठी करून घेतला. गुणवंताचे पारखी असलेल्या मामा परमानंदांनी गुरुवर्य केळूसकरांचे लेखन गुण लक्षात येताच त्यांची शिफारस महाराज सयाजीरावांकडे केली. महाराजांनी केळूसकरांना मुंबईत भेटीस बोलावले. त्यांना प्रश्न विचारून त्यांची चाचपणी केली. केळूसकरांची वाचन-विचारातील प्रगल्भता बघून त्यांना समाधान वाटले आणि त्यांनी केळूसकरांना फ्रान्सचा जुना इतिहास या ग्रंथाच्या भाषतरांचे काम सोपविले. बहुजनाच्या एका शूद्र माणसाला महाराजांनी लेखन काम सोपविले, ही गोष्ट बडोद्यातील विद्वानांना आवडली नाही; पण महाराज आपल्या निर्णयावर खंबीर रहात त्यांनी केळूसकरांना आणखी प्रोत्साहन दिले. महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरातील हुशारी ओळखून जशी चार वेळेस त्यांना शिक्षणासाठी शिष्यवर्ती देऊन मदत केली, तशीच मदत केळूसकरांनाही करत राहिले.

फ्रान्सचा जुना इतिहास (१८८३), तुकाराम बावांचे चरित्र (१८९६), सेनेका व एपिक्टेट्सची बोधवचने (१८९७), गौतम बुद्धांचे चरित्र (१८९८), सात उपनिषदांचे भाषांतर (१८९८) आणि श्रीमद्भगवतगीता हा ११०० पृष्ठांचा ग्रंथ (१९०२) या सारखे चौफेर लेखन गुरुवर्य केळूसकरांनी केले. या काळात त्यांचे बडोद्यात येणे-जाणे वाढले. बडोद्याचे दिवाण-महात्मा जोतीरावांचे स्नेही रामचंद्र विठोबा धामणसकर केळूसकरांचे चाहते मित्र होते. केळूसकर शिक्षकाची नोकरी, वेगवेगळ्या मासिकांचे संपादन, कौटुंबिक आर्थिक ओढाताण-त्यासाठी शिकवण्या घेणे आणि राहिलेल्या वेळात झंझावातासारखे लेखन करत होते. लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य लिहिण्याअगोदर गुरुवर्य केळूसकरांनी गीतेवर भाष्य करणारा ग्रंथ लिहिला. बावीस वर्षे तो प्रकाशकाविना पडून राहिला. गुरुवर्य केळूसकरांनी

लहान मोठी एकोणचाळीस पुस्तके लिहिली, असा उल्लेख आहे; परंतु पूर्ण यादी ते सर्व ग्रंथ उपलब्ध होऊ शकले नाहीत. संस्कृत धातुरूप कोश, इंग्रजी मराठी कोशाची नोंद आहे; पण तेही मिळू शकले नाहीत. केळूसकर गुरुजींच्या नातवांकडे-स्नेह्यांकडे या आणि अप्रकाशित लेखन शोधण्याचा मी प्रयत्न केला. ग्रंथालयात जे ग्रंथ उपलब्ध होऊ शकले त्यावरच समाधान मानावे लागत आहे.

गुरुवर्य कृ. अ. केळूसकरांनी चार तप मराठी वाङ्मयाची सेवा केली. या दीर्घकाळात एक जिज्ञासू विद्यार्थी अन् शिक्षकाच्या भूमिकेतून चौफेर लेखन केले. त्यांनी ओळखले होते, शिक्षक आणि लेखक हे समाजाचे दीपस्तंभ असतात. शिक्षक आपल्या वाणीतून आणि लेखक आपल्या शब्द सामर्थ्यातून समाजातील विद्यार्थी अन् अभ्यासकासाठी ज्ञानदान आणि प्रबोधनाचे काम करीत असतात. केळूसकर हे उत्तम शिक्षक आणि आजन्म नवे शिक्षणाची ऊर्मी असलेले एक विद्यार्थीही होते. त्यांचा हा पाऊणशे वर्षांचा दुहेरी प्रवास थक्क करून सोडणार आहे. या साधनेमुळेच आयुष्यभरात उभी राहिलेली संकटे, कौटुंबिक अडचणी, आर्थिक ओढाताण यावर सतत नवे वाचत राहून, आवडीच्या अध्ययनात झोकून देत, उर्वरित पूर्णवेळ त्यांनी लेखनकामात व्यस्त केला.

गुरुवर्यांच्या आयुष्यात शेवटच्या काळात त्यांचे अनेक लेख निरनिराळ्या वृत्तपत्र-मासिकांत प्रकाशित झाले होते; पण ते एकत्रित प्रकाशित न झाल्याने वाचकांसाठी उपलब्ध नव्हते. त्यांचे मित्र श्री. दत्तात्रय पु. वेंगुर्लेकर यांनी पुढाकार घेऊन गेल्या पन्नास वर्षांतील गुरुवर्यांचे लेख एकत्र करण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता ''गुरुवर्य केळूसकर गौरवमंडळ'' नावाची मित्रांच्या मदतीने स्थापन केली. उपलब्ध झालेल्या लेखांचा 'विचार-संग्रह' अर्थात गुरुवर्य कृ. अ. केळूसकर यांचे निवडक लेख, भाग-१ ला या ग्रंथ प्रकाशनाची तयारी केली. त्यांना ..... लेख फक्त मिळाले. गुरुवर्यांचे बरेचसे लेख मिळू शकले नाही. या काळात केळूसकर आजारी होते. आणि त्यांच्या आयुष्यातील एक मोठा सन्मान योगायोग घडून आला. मुंबई मराठी साहित्य संघाने पहिले साहित्य संमेलन भरविण्याची योजना आखली. आणि या साहित्य संघाच्या उभारणीत ज्या वयोवृद्ध, तपोवृद्ध अन् ज्ञानवृद्ध गुरुवर्यांचा सिंहाचा वाटा होता, त्यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली, पन्नास वर्षात सहा हजार पानांचे चौफेर विषयांवर लेखन केलेल्या ऋषितुल्य साहित्याचार्यांचा हा सन्मान होता.

आपल्या अध्यक्षीय भाषणात गुरुवर्यांनी खंत व्यक्त केली, ते म्हणाले, मराठी लेखकांची संख्या वाढत आहे; पण त्या कोणत्याही विषयांचा अभ्यास करून विषयाच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न होत नाही. लेखन करताना लेखकाने झोकून देऊन अभ्यास करणारे फार थोडे आहेत. नवोदित लेखकाने लक्षात ठेवावे. क्षणभंगुर  वाङ्मय निर्माण न करता अभ्यासयुक्त वाङ्मय निर्माण करा.

संमेलन संपले आणि अगोदरच बिघडलेली गुरुवर्यांची प्रकृती खालावत गेली. 'गुरुवर्य केळूसकर गौरव मंडळाने तयार केलेला विचार-संग्रह हा निवडक लेखांचा ग्रंथ मुद्रणालयात छपाई पूर्ण होत असतानाच १४ ऑक्टोबर १९३४ रोजी गुरुवर्य जग सोडून गेले. हा ग्रंथ ते बघू शकले नाही. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत श्री. माधव दामोदर अळतेकर यांनी लिहिल्याप्रमाणे, 'जुन्या पिढीतले, आगरकर-टिळकांच्या पिढीतले केळूसकर मराठीतले लेखक होऊन गेले. बहुजन समाजाचे गुरुवर्य हरपले आणि महाराष्ट्राचा वाङ्मयमहर्षी समाधिस्त झाला, अशी आदरांजली धनंजय कीर यांनी गुरुवर्य केळूसकरांच्या आत्मचरित्र व चरित्र या ग्रंथात वाहिली.

गुरुवर्य गेल्यानंतर 'विचार-संग्रह' भाग एक प्रकाशित झाला, त्याचे दुःख गुरुवर्य गौरव मंडळास होणे साहजिकच होते; घडणाऱ्या घटना-प्रसंगांना कोणीही थांबवू शकत नव्हते. या संग्रहात वेगवेगळ्या विषयांवरचे ३८ लेख एकत्रित केले आहेत. निरनिराळी वृत्तपत्रे, साप्ताहिक अन् मासिकांत लिहिलेले लेख, संपादके, टिपणे, भाषणे अन् निबंध या प्रकारातील हे लेखन आहे. काळापुढे दृष्टी असलेल्या गुरुवर्यांनी हिमतीने आणि समाजाचे ज्ञानात्म प्रबोधन करण्याच्या सत्यशोधकी भावनेने केलेले हे लेखन आहे. यातून शिक्षण, सामाजिक सुधारणा, नैतिक सामर्थ्य अन् चारित्र्य, जाती-धर्म, अंधश्रद्धा अन् त्यातून होणारा अन्याय, यातून सुटका होण्यासाठी शिक्षण प्रसार अन् विज्ञानाची कास धरण्याची गरज त्यांनी प्रतिपादली. त्याचबरोबर स्वदेश प्रेमासोबत आमच्यातील भाऊबंदकी अन् समाजातील दुही राष्ट्रोन्नतीस मारक होईल, हे सांगणे आज लागू पडत आहे. या देशाला जगाच्या बरोबरीने प्रगती करावयाची असेल तर जगभरातील आधुनिक विचार, शास्त्र, संशोधन अन् विज्ञानाची कास धरण्याशिवाय पर्याय नाही, हे गुरुजींनी सुचविलेले विचार या ग्रंथाचा गाभा आहे.

अशा चौफेर विषयांवर लेखन केलेल्या या वाङ्मयमहर्षीची ओळख महाराष्ट्राने आज करून घेण्याची गरज असल्याने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष होताच कार्यकारी मंडळाच्या पहिल्या बैठकीत समग्र कृ. अ. केळूसकरांचे प्रकाशन शासनाने करावे, असा निर्णय घेतला. या वाङ्मयीन जबाबदारीचे काम आमचे मित्र श्री. राजन गवस यांच्याकडे सोपविले. त्यांनी आणि त्यांना संपादन कार्यात मदत करणाऱ्या मित्रांनी हे काम पूर्ण केले, याचा मला खूप आनंद आहे. या कामी मदत करणाऱ्या सर्वांना धन्यवाद.

अध्यक्ष

दि. ४ जुलै, २०१८

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई.

## संपादकीय...

गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर हे लोकशिक्षक होते. शिक्षकी व्यवसाय करता करता समाजशिक्षणाचे व्रत त्यांनी अंगिकारले. आपला समाज बदलला पाहिजे, आधुनिक झाला पाहिजे, ही त्यांची सततची धडपड होती. स्वतःच्या वाट्याला आलेले आयुष्य इतरांच्या वाट्याला येऊ नये, यासाठी आयुष्यभर त्यांनी व्यासंगी लेखन केले. हे लेखन करण्यासाठी चरित्रे, इतिहास, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, अध्यात्म, इंग्रजी साहित्य, संस्कृत साहित्य यांचा आयुष्यभर व्यासंग केला. स्वतःला अद्ययावत ठेवत त्यांनी भोवताल तपासण्याचे काम अव्याहतपणे केले. कोणतीही तडजोड न करता आपल्याला हवे ते विषय निवडून आयुष्यभर लिहित राहिले. त्यातून त्यांची संशोधनात्मक वृत्ती, चिकित्सक प्रवृत्ती प्रत्ययास येते. सामान्य माणसांविषयीचा कळवळा त्याच्या शब्दाशब्दातून जाणवतो. या पाठीमागे त्यांच्या वाट्यास आलेले पूर्वायुष्य आहे. जगता जगता जे अनुभव आले, ज्या प्रकारची झुंज आपल्याला द्यावी लागली तशाप्रकारचा यातनामय प्रवास अन्य कोणाच्या वाट्यास येऊ नये, म्हणून त्यांनी आपली लेखणी सतत निष्ठेने पणास लावली. चांगला समाज निर्माण व्हावा यासाठीचा बंदोबस्त म्हणून ते आयुष्यभर अखंडपणे लिहित राहिले. त्यांनी अनेकवेळा टोपणनावानेही लेखन केले. हे त्यांचे लेखन अद्यापही ग्रंथरूपाने प्रकाशित झालेले नाही. गुरुवर्य केळूसकरांचे स्फूटलेखन ग्रंथरूपात प्रकाशित केल्यास अभ्यासकांची सोय होईल. असे वाटल्याने गुरुवर्य केळूसकरांविषयी आस्थाभाव बाळगणाऱ्या त्यांच्या चाहत्यांनी गुरुवर्य केळूसकर गौरवमंडळाची स्थापना केली व त्यांचे स्फूटलेख आणि वेगवेगळ्या ठिकाणी केलेली भाषणे प्रकाशित करण्याचा संकल्प सोडला. या योजनेनुसार गुरुवर्य केळूसकरांच्या निवडक लेखांचे ‘विचार-संग्रह भाग-१’ हे पुस्तक प्रकाशित करणेत आले. या योजनेअंतर्गत प्रकाशित होणारा विचारसंग्रहाचा दुसरा भाग मात्र प्रकाशित होऊ शकला नाही. या प्रकाशित झालेल्या भागात समाविष्ट करण्यात आलेल्या लेखांच्या विषयांची वैविध्यता पाहता गुरुवर्य केळूसकरांचा अफाट व्यासंग, अभ्यासू वृत्ती, संशोधन शिस्त, भाषिक प्रभुत्व आणि वर्तमान तपासण्याच्या शास्त्रशुद्ध पद्धती पाहून आजही आपल्याला त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेचा प्रत्यय येतो.

गुरुवर्य केळूसकरांचा जन्म दक्षिण कोकणातल्या तत्कालीन अखंड रत्नागिरी जिल्ह्यातील केळूस (ता. वेंगुर्ले) या गावचा. शेती आणि कष्टमय जगण्याची पार्श्वभूमी लाभलेल्या केळूसकरांची परिस्थितीमुळे शैक्षणिक परवड झाली. तत्कालीन शेतकऱ्याच्या घरात जन्मलेल्या व शिकू इच्छिणाऱ्या मुलाच्या वाट्याला जे यावे तेच त्यांच्या वाट्याला आले. शेती संस्कृतीत वाढलेल्या कोणत्याही शिकू इच्छिणाऱ्या मुलाकडे फारशा उत्साहवर्धक कौटुंबिक प्रोत्साहनाची वाणवाच असते. शिकणे, ज्ञान मिळवणे हे आपले काम नाही हीच प्रबळ धारणा असलेल्या समाजात शिकणाऱ्याच्या वाट्याला अनंत अडचणी उभ्या ठाकत असतात. त्याने शिकावे अशी इच्छा बाळगणारेही कमीच असतात. सुदैवाने गुरुवर्य केळूसकरांच्या वडिलांना शिक्षणाचे महत्त्व पटलेले असलेने, आपल्या मुलाने शिकावे यासाठी ते स्वतःच धडपडत होते. ही एक गोष्ट गुरुवर्य केळूसकरांच्या वाट्याला हितकारक होती असे म्हणता येईल. अशा परिस्थितीतून शिक्षणाचा प्रवास करत असताना गुरुवर्य केळूसकरांनी वाचनाची आवड, पुस्तकांच्या माध्यमातून जग समजावून घ्यायचा ध्यास आणि जनसामान्यांविषयीचा मानवतावादी दृष्टिकोण यामुळे शिक्षणात आलेल्या अडसरांवर मात करीत आपला वैचारिक व्यासंग जोपासला. विविध विषयांवर त्यांनी अभ्यासपूर्ण संशोधनात्मक लेखन केले. कोकणसारख्या गरीब, अंधश्रद्धाळू, अल्पसंतुष्ट, आत्मकेंद्री आणि गजालीप्रियवृत्तीच्या प्रदेशात जन्माला येऊनही त्यांनी केलेले हे वैचारिक लेखन, वाचन आणि संशोधन विलक्षण म्हणावे असेच आहे.

'विचार-संग्रह, भाग-१' हा गुरुवर्य केळूसकरांचा ग्रंथ आजच्या काळातही विशेष महत्त्वपूर्ण ठरावा असा आहे. या ग्रंथामध्ये विविध विषयावरील वेगवेगळ्या स्वरूपाचे एकूण ३८ लेख समाविष्ट करणेत आले आहेत. या लेखांमध्ये नियतकालिकासाठी लिहिलेली संपादके, विशेष स्फूट लेख, टिपणे, दीर्घलेख, भाषणे, परिचयपर लेख, निबंध अशा वेगवेगळ्या स्वरूपाच्या लेखनाचा समावेश आहे. या लेखनामागे सर्वसामान्य लोकांना विविध विषयांवरील शास्त्रीय ज्ञानाची माहिती देऊन त्यांना शहाणे करण्याचा, त्याद्वारा सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा हेतू स्पष्टपणे जाणवत राहतो. शेती, जातिव्यवस्थेचे तोटे, धर्मव्यवस्था, शिक्षणपद्धती, सामाजिक व नैतिक चारित्र्य, स्वदेशप्रेम यासारख्या समाजपयोगी विषयांच्या अनुषंगाने जगभरातील विशेषतः युरोपातील आधुनिक विचार, नवे संशोधन, नवे ज्ञान, विविध विषयांवरील शास्त्रीय ग्रंथ, नियतकालिक व अन्य स्वरूपातील लेखन यांचा परिचय करून देणारे हे लेख आहेत. यातील अनेक मते तत्कालीन रूढीप्रिय समाजाला मान्य होण्यासारखी नव्हती. तरीही केळूसकरांनी

ती ठोसपणे मांडली. यातून त्यांचे काळाच्या पुढे पाहण्याची निर्भय व चिकित्सकवृत्ती दिसून येते. गुरुवर्य केळूसकर सत्यशोधकीय विचारांच्या प्रभावात असल्यामुळे हे निर्भयपण अखंडपणे बाळगले. 'विचार-संग्रह, भाग-१'मध्ये समाविष्ट असलेल्या लेखांच्या विषयाचे वैविध्य या ग्रंथाच्या अनुक्रमणिकेवरूनच आपल्याला दिसून येते. शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारावाचून गती नाही, याचे भान गुरुवर्य केळूसकरांना असल्यामुळे 'आधुनिक समाजनिर्मितीसाठी विज्ञानाची आवश्यकता' सारखा लेख ते लिहितात. जात, धर्म इत्यादीविषयक अस्मितांमधून निर्माण होणारे सामाजिक अस्वास्थ्य याबाबत 'आमच्याच समाजातील दुहि' हा लेख नेमकेपणाने बोट ठेवतो. जातीधर्मातील रोटी-बेटी व्यवहारांतील निर्बंधामुळे होणारे सामाजिक नुकसान त्यांनी 'अन्नोदक व्यवहार निर्बंध' या लेखात दर्शविले आहे. समाजास धर्माची आवश्यकता आहे काय? असा प्रश्नही त्यांनी आपल्या लेखातून विचारलेला आहे. गुरुवर्य केळूसकरांच्या चतुरस्त्र व्यासंगाबरोबरच तत्कालीन समाजव्यवस्थेची जाणत्या नजरेतून केलेली परखड चिकित्सा व समाजव्यवस्था पोखरू पाहणाऱ्या गोष्टींवर सुचवलेले उपाय यामुळे या लेखांचे ऐतिहासिक महत्त्वही निश्चितच अधोरेखित होते.

'भारतातील शेती आणि शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति' हा केळूसकरांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असल्याचे अनेक लेखांवरून दिसून येते. त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय शेती असलेने शेतीविषयीचे समग्र भान त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच मुरले होते. भारतातील पारंपरिक शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्याला कायमस्वरूपी तोट्यातच शेती करावी लागते, याची नेमकी जाणीव केळूसकरांना होती. त्यामुळेच ते सरकारने आधुनिक खते व तंत्रज्ञान शेतकऱ्यांस पुरवले पाहिजे असा ते आग्रह धरतात. भारतीय शेतीमध्ये वैज्ञानिक पद्धतीचा स्वीकार केला गेला पाहिजे, असे वाटणाऱ्या गुरुवर्य केळूसकरांनी जनरल अँग्लो नामक एका युरोपियन गृहस्थाने बनवलेल्या आधुनिक पद्धतीच्या नांगराचा परिचयही ते करून देतात. पाण्याचे दुर्भिक्ष्य व दुष्काळावर मात करण्यासाठी, पाटाचे पाणी खेळवण्यासाठी सरकारची योजना हवी, असे गुरुवर्य केळूसकरांनी शंभर वर्षांपूर्वी सांगितले होते. आज सरकारमार्फत करण्यात येणारा शेततळ्याचा पुरस्कार शंभर वर्षांपूर्वी केळूसकरांनी सूचित केला होता. भारतीय शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्यामुळे कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी पाश्चिमात्य व अमेरिकेत झालेल्या संशोधनाची माहिती घेऊन त्यांनी विस्तृत विवेचन केले आहे. शंभर वर्षांपूर्वी कृत्रिम पाऊस हा विषय हाताळणारे गुरुवर्य केळूसकर किती दूरदर्शी विचाराचे होते याचा प्रत्यय येतो.

केळूसकरांच्या लेखांमधून पाश्चात्त्य देशातील अनेक संदर्भ येतात. यावरून त्यांनी स्वतःला किती अद्ययावत ठेवले होते, याचा प्रत्यय येतो. तत्कालीन ब्रिटीश सरकारने मीठावर जाचक कर बसवला त्याबद्दल महात्मा गांधींनी आंदोलन केले. जीवनावश्यक गोष्टींवर लादण्यात आलेल्या अन्यायग्रस्त व अवास्तव करांमुळे सर्वसामान्य माणसाची होणारी परवड केळूसकर नेमकेपणाने मांडतात.

प्रगत समाजाबाबत केळूसकरांची स्वतःची अशी एक निश्चित अशी भूमिका आहे. ज्ञानपूर्ण समाज हे त्यांचे स्वप्न असल्यामुळे शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराशिवाय चांगला आधुनिक समाज निर्माण होणार नाही, असे ते रोखठोकपणे आपल्या लेखातून मांडतात. ठाणें वक्तृत्वोत्तेजक सभेच्या १५ व्या समारंभात गुरुवर्य केळूसकरांनी केलेले भाषण म्हणजे या संग्रहातील 'सामाजिक सुधारणा' हा लेख होय. या लेखातून ते तत्कालीन समाजसुधारणाविषयक चळवळींविषयी मांडतात, 'कोणत्याही राष्ट्राची सुधारणा व्हावयाची ती सर्व अंगांनीं होणें इष्ट होय. राजकीय, सामाजिक, नैतिक, धार्मिक, औद्योगिक वगैरे जी सुधारणेची मुख्य अंगे, त्यापैकीं कांहीं अंगांचीं सुधारणां करण्याविषयीं आमच्या ह्या विस्तीर्ण देशामध्यें जोराची चळवळ चालली आहे. आतां ही चळवळ योग्यमार्गानें चाललेली असो, किंवा अयोग्य मार्गानें चाललेली असो; पण अगदीं स्वस्त बसण्यापेक्षा कांहींतरी उचल होत असणें हिताचे होय. अयोग्य मार्गानें चाललेल्या चळवळींस लवकरच अनुभवाच्या योगानें योग्य वळण मिळून योग्य मार्गाचें अवलंबन होणें सुकर होईल. अशा चळवळींपैकीं सामाजिक सुधारणेसंबंधाची चळवळ ही एक होय. ह्या चळवळीचें सध्याचें धोरण कित्येकांस मुळींच आवडत नाहीं. कित्येक तर असें आहेत कीं, त्यांना असलीं चळवळ बिलकूल पसंत नाहीं. कांहींकांस ती पसंत आहे, परंतु तीत आपलें अंग असणें त्यांस आवडत नाहीं; किंबहुना बाह्यात्कारी तिच्यासंबंधानें आपण उदासीन आहो, असें दर्शविण्याचा त्यांचा परिपाठ असतो. सुधारकांच्या वर्गात आपली गणना होणें त्यांस इष्ट नसतें. कित्येकांस तर असें वाटत असतें कीं, सामाजिक सुधारणेचा अजून काळच आला नाहीं. तर तो योग्य काळ आला म्हणजे या खटपटीस आपण लागावें. तूर्त लोकशिक्षण वाढवून लोकांचे समज सुधारीत असावें, हेंच हिताचे होय. अशा अनेकांच्या अनेक कल्पना आहेत. तरी याविषयाच्या संबंधानें आमच्या लोकांमध्ये जागृति होऊन थोडीबहुत कायिक, वाचिक व मानसिक चळवळ जिकडे तिकडे सुरू होऊन, लोकांस या प्रकरणीं थोडाबहुत विचार करणें प्राप्त होत आहे.'(सामाजिक सुधारणा) धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म, शिक्षण यांसारखे बहुविध विषय त्यांच्या लेखांतून सहजपणे येत जातात.

गुरुवर्य केळूसकरांच्या या लेखनावर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव असला तरी त्यांची दृष्टी आणि शैली स्वतंत्र होती. टिळक आणि आगरकरांच्या समकालीन असणाऱ्या केळूसकरांची समाजनिरीक्षणाची, आकलनाची आणि विचारमांडणीची पद्धत पूर्णपणे भिन्न आणि स्वयंभू आहे. एखाद्या विषयाचा पूर्वाभ्यास तपासून नवे विचार मांडताना नवे दाखले देत ते ज्या पद्धतशीरपणे आपला विचार मांडतात ते तत्कालीन विचारवंतांच्या तुलनेत अतिशय उल्लेखनीय आहे. याबरोबरच स्वातंत्र्यपूर्व कालखंडात कार्यरत असलेले राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद अशा संस्थांच्या राजकीय विचारांचा पुरस्कार यामधील काही लेखांतून गुरुवर्य केळूसकरांनी केलेला दिसतो. समाजपुरुषाच्या रूढीग्रस्त व परंपराप्रिय मानसिकतेमुळे शोषण होत असलेले शेतकरी, कष्टकरी वर्ग, स्त्रिया व दलित यांच्याविषयी केळूसकरांना असलेला कळवळा त्यांना सामाजिक रूढीविरोधात समाजवादी भूमिका घ्यायला प्रवृत्त करतो. ही सुधारणावादी भूमिका त्यांच्या अव्याहत व्यासंग चिंतनातून आलेली आहे. त्यांची ही वैचारिक स्पष्ट भूमिका नव्या समाजाचे स्वप्न पाहणारी व आधुनिक माणूस घडविणारी होती. मुळातच लोकशिक्षक असणाऱ्या गुरुवर्य केळूसकरांना अंतरीची तळमळ सततच व्यक्त व्हायला भाग पाडीत होती, असे दिसते.

'विचार-संग्रह, भाग-१' या ग्रंथातील लेख वाचल्यानंतर गुरुवर्य केळूसकर भोवतालचे वर्तमान किती डोळसपणे न्याहाळत होते याचा प्रत्यय येतो. लहानसहान वाटणाऱ्या गोष्टीतही समाजाबद्दलच्या खुणा शोधणारे गुरुवर्य केळूसकर वर्तमानाला निर्भीड प्रतिक्रिया देणारे आद्य लेखक होते, याचा प्रत्यय या लेखांतून वारंवार येतो. एखाद्या विवाद्य विषयाचा पाठपुरावा करत असतानाही कोणत्याही प्रकारे समाजामध्ये प्रक्षोभ निर्माण न करता परंपरापूजक समाजाचे वैचारिक प्रबोधन कसे करता येते, आपली सुधारणावादी मते पुराव्यानिशी कशी मांडता येतात व त्याद्वारे त्यांना विचारप्रवण करून त्यांचे कशाप्रकारे मतपरिवर्तन करता येऊ शकते याची उदाहरणे 'विचार-संग्रहा'मधील अनेक लेखांमध्ये सहजपणे सापडतात. उदाहरणार्थ, केवळ आपल्या हिंदुस्थानातील आपापल्या धर्मातील रीतीरिवाज जगात सर्वोत्तम आहेत असे मानून, इतर धर्मांना व त्यांच्या रीती परंपरांना तुच्छ लेखण्याची मानसिकता आपल्या समाजात आढळते. अशा मानसिकतेतून लोकांना बाहेर काढण्यासाठी व जगातील अन्य धर्मियांमध्येही अनेक चांगल्या गोष्टी असू शकतात. त्यांचा आदर करण्यात गैर काही नाही. तसेच आपल्या स्वधर्मातील कालबाह्य पुराणकल्पनांना चिकटून राहण्याचा अट्टाहास करणे शहाणपणाचे नाही. हे त्यांनी अभिमानाचे काही अयोग्य प्रकार या

लेखांमधून अतिशय उत्तमपणे पटवून दिले आहे. ते म्हणतात, 'प्रत्येक जनसमूहाला वाटत असते की, ज्या चालीरीती आपल्यामध्ये अस्मार्त काळापासून प्रचलित आहेत त्या निर्दोष असून हितप्रद असल्याच पाहिजेत, एरवी त्या इतका काळ टिकल्या ना. ही समजूत सर्वथा सत्य नव्हे. विविक्षित चालीरीती आपल्या लक्षात एकदम येत नाही. उदाहरणार्थ, कोणत्याही व्यसनाची गोष्ट घ्या. ते ज्याच्या अंगी जडते त्यास त्याचे अपकारित्व भासत नाही, म्हणून ते कमी घातक समजता उपयोगी नाही. अशीच एक गोष्ट हरएक चालींची व सवईंची आहे. तेव्हां तिच्या परिणामांचा विचार करावयाचा तो केवळ तत्त्वदृष्टीने निरभिमानबुद्धीने व निःपक्षताताने केला पाहिजे. केवळ पुराणप्रितीस्तव किंवा दुरभिमानास्तव सत्यसिद्धांतांचा अव्हेर करून स्वहिताच्या मार्गाचे अवलंबन न करणे म्हणजे मूर्खत्वाची परमावधी होय. आमच्यातील कित्येक लोकांचा समज असा आहे की, यवनादि परस्थानापासून आम्हांस घेण्यासारख्या चालीरीती काहीच नाहीत. उलटे त्यांनाच एतसंबंधाने पुष्कळ शिकण्यासारखे आहे. तेव्हा त्यांचे कोणत्याही बाबतीत अनुकरण करणे उचित नव्हे हा समज सर्वज्ञतेची व पूर्णत्वाची घमेंडी बाळगण्यासारखा अप्रयोजक व हास्यास्पद होय. वस्तुतः पाहता निरनिराळ्या लोकसमुदायातील निरनिराळ्या चालीरीती ह्या समाजशास्त्राचे तेवढे प्रयोग होत. त्यांच्या परिणामांचे यथासांग परीक्षण करून त्यांच्या इष्टानिष्टत्वाचा निर्णय करणे हे समाजशास्त्र प्रणेत्याचे काम आहे. सामान्यजनांनी आपणांस वाटेल तसा त्यावर अभिप्राय देऊन वाक्कलह माजवण्यात मुळीच शहाणपणा नाही. दुसरे असे की, कोणत्याही विविक्षित जनसमूहाने इतर लोकांची केवळ रीतीरिवाजाच्या भिन्नत्वास्तव निंदा किंवा द्वेष करणे अत्यंत गर्हनीय होय. आपणांस जसे इतरांचे कित्येक रीतीरिवाजांचा तिटकारा वाटत असे. तेव्हा एवढ्यावरूनच एकमेकांचा द्वेष किंवा तिरस्कार करण्यात काय हशील?' (अभिमानाचे काही अयोग्य प्रकार)

गुरुवर्य केळूसकरांचा व्यासंग हा बहुआयामी असा होता. आहारशास्त्र, इंद्रियविज्ञान, शरीरशास्त्र, रसायनशास्त्र, जीवनेंद्रियशास्त्र याविषयीचे त्यांचे ज्ञान वाखाणण्यासारखे होते. 'मांसाहार' या लेखातून रा. रा. हरिश्चंद्र नारायण नवलकर यांच्या 'मांसाहार' या पुस्तकातील मुद्यांचे केलेले खंडणमंडणातून याची प्रचिती येते. वनस्पत्याहारी व मांसाहारी यांविषयीच्या नवलकरांच्या मतांचे त्यांनी खंडन करत वनस्पत्याहारी आणि मांसाहारींची केलेली तुलनात्मक मांडणी अतिशय महत्त्वाची आहे. आहारशास्त्राविषयीचा अतिशय सजग दृष्टिकोन त्यांच्या या लेखातून व्यक्त होतो.

सुशिक्षित, कर्तबगार, विद्वान, समाजोपयोगी लोक अल्पायु झाल्याने समाजाबरोबरच देशाचेही फार नुकसान होते. 'हवापाण्याचीं प्रतिकूळतां आणि विद्याव्यासंगांत अगदीं चूर झाल्यामुळें स्वदेहाची पर्वा उरत नाहीं.' अशी अल्पायु होण्याची प्रमुख दोन कारणे गुरुवर्य केळूसकरांनी सांगितली आहेत. देश, काल, परिस्थिती लोकांच्या देहावर, मनावर आणि कार्यावर परिणाम करत असते. निसर्ग हा निर्घृण असून तो सुजन-दुर्जन, उद्योगी, निरुद्योगी भेद जाणत नाही. त्यामुळे अशा सुशिक्षित, कर्तबगार, विद्वान लोकांनी आपल्या भोवतालचे हवापाणी जोखून आपला व्यासंग करावा यातच देशहित असल्याचे गुरुवर्य केळूसकरांनी 'आमचे सुशिक्षित लोक अल्पायु कां होतात व आमचे सुशिक्षित लोक अल्पायु होण्याचें आणखी एक कारण' या दोन लेखांमधून सूचित केले आहे.

गुरुवर्य केळूसकरांचे हे लेखन आजच्या असहिष्णुता, परस्पर विसंवाद व अविश्‍वासाचे वातावरण वाढीस लागल्याच्या काळात अधिकच प्रस्तुत वाटू लागते. जातीय व धार्मिक अस्मितांचे राजकारण, असांस्कृतिक आचारविचार, देवधर्माच्या नावावरून जनसामान्यांचे होणारे शोषण, फसवणूक आज वाढीस लागली आहे. माणसामाणसांत फूट पाडण्यासाठी सांस्कृतिक दूराभिमान चेतवला जात आहे. अशा परिस्थितीत केळूसकरांचे हे विचार बहुजन लोकसंस्कृतीला तिच्या मुळांचा शोध घेऊन शांततामय सहजीवन जगण्यासाठी प्रवृत्त करणारे आहेत. वाचकाला नव्या जगाचे भान आणून देऊन विचारप्रवण करण्याबरोबरच कृतिप्रवण करण्याचे, आधुनिक वैज्ञानिक दृष्टी प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम केळूसकरांच्या या वैचारिक लेखनामुळे साधले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील सामाजिक व सांस्कृतिक स्थिती लक्षात घेता, वैचारिक प्रबोधनाच्या दृष्टीने केळूसकरांचे हे लेखन मौलिक असेच आहे. मुलामुलींच्या विवाहाचे संमतीवय, धार्मिक दृष्टिकोन, शिक्षणपद्धती, मांसाहार, मद्यपान, रोटीबेटी व्यवहार, व्यक्तीचे शील, चारित्र्य, मातृत्व इत्यादीविषयक नैतिक-अनैतिक दृष्टिकोन अशा विषयांवरील तौलनिक स्वरूपाची मते तत्कालीन भारतीय प्रबोधनाच्यादृष्टीने महत्त्वाची आहेत. एकूणच या सर्व लेखांतून ही मांडणी करीत असताना केळूसकरांची दिसून येणारी शैली वैचारिक लेखनाची शिस्त कशी असावी याचा वस्तूपाठ घालून देणारी आहे हे महत्त्वाचे आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, टिळक-आगरकर यांचे समकालीन असलेल्या आणि महात्मा फुलेंसारख्या समाजसुधारकांचा विचारवारसा अनुसरणाऱ्या गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर या विचारवंत, समाजसुधारक लेखकाचे 'विचार-संग्रह'

या लेखसंग्रहातील लेख या काळाचा अभ्यास करणाऱ्यांच्या दृष्टीने जसे अत्यंत उपयुक्त ठरतात, तसेच ते समकालातील सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींचा अन्वयार्थ लावताना काहीएक ऐतिहासिक आधार म्हणूनही मौलिक ठरतात. केळूसकर हे या कालखंडातील विवेकी, विज्ञाननिष्ठ व संवेदनशील बुद्धीजीवींचे प्रतिनिधित्व करणारे लेखक मानले तर त्या दृष्टिकोनातून तत्कालीन समाजव्यवस्था, आर्थिक व राजकीय व्यवहार, नैतिक मूल्ये, भाषाशैली अशा अनेक गोष्टींच्या अभ्यासाकरिता हे लेखन निश्चितच मौलिक ठरते.

वाङ्मयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकरांचे वाङ्मयातील व सामाजिक कार्यातील असामान्य कर्तृत्व जाणून घेऊन महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. बाबा भांड व मंडळातील त्यांचे सहकारी, मंडळाच्या सचिव मिनाक्षी पाटील यांनी ह्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझ्यावर सोपवून माझ्यावर जो विश्वास दाखवला त्या बद्दल त्यांच्या ऋणातच असणे मी पसंत करतो. महाराष्ट्र शासनाच्या उदार व वाङ्मयप्रेमी दृष्टिकोणाचा मी कृतज्ञपूर्वक उल्लेख करतो.

हा प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे सहकार्य लाभले. सतीश बडवे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रवीण बांदेकर, नीतीन रिंढे, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, अरुण शिंदे, नीला जोशी यांनी गरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून दिल्या. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच रफिक सूरज, शोभा नाईक, सुजय पाटील, अनिल गवळी, रमेश साळुंखे, गोमटेश्वर पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार मानने त्यांना आवडणार नाही. कारण हे सर्व अभ्यासक व्रतस्थ वाङ्मय सेवक आहेत. या ग्रंथाचे संकलन करण्यात साकेत बाबा भांड यांनी केलेली मदत मोलाची आहे. याबरोबर हे प्रकल्प काम पूर्ण करण्यास आप्पासाहेब बुडके, तेजस चव्हाण, राजेश पाटील, नवनाथ गोरे, संदीप मुंगारे, प्रदीप पाटील, निहाल शिपुरकर यांची मदत झाली. त्यांचे मनःपूर्वक आभार. त्या बरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयचे ग्रंथपाल, सा.वा.ना. नाशिक, श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी, करवीर नगर वाचन मंदिर कोल्हापूर, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर या बरोबरच महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी विशेष मदत केली. त्यांचे मनःपूर्वक आभार. या शिवाय या प्रकल्पास मदत करणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे अंतकरणपूर्वक आभार मानतो. ह्या प्रकल्पाचे वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे. या प्रकल्पात काही त्रुटी असेल तर ती माझी मात्र चांगल्याचे सर्व श्रेय बाबा भांड आणि त्यांचे सहकारी यांचे आहे. धन्यवाद!

**– राजन गवस**

**प्रस्तावना...**

लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांचे समकालीन असलेल्या गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनी इतिहास, समाजकारण, राजकारण, धर्मव्यवस्था व नीतिशास्त्र अशा अनेकानेक विषयांच्या अनुषंगाने चरित्रात्मक, वैचारिक, संशोधनात्मक, आध्यात्मिक असे विपुल लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांमध्ये प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, गौतम बुद्धाचे चरित्र, तुकाराम महाराजांचे चरित्र, फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास, नीतिबोधमाला, इत्यादी ग्रंथ विशेष लक्षणीय ठरतात. मात्र या लेखनासोबतच विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैज्ञानिक आदी समाजोपयोगी विषयांच्या अनुषंगाने तत्कालीन संदर्भमूल्य असलेले स्फूट लेखनही गुरुवर्य केळूसकरांनी विपुल प्रमाणात केले आहे. विविध नियतकालिकांतून यातील बहुतेक लेखन वेळोवेळी प्रकाशित झालेले दिसते. त्याखेरीज अनेक विषयांवर प्रासंगिक भाषणेही त्यांनी दिली होती. त्यांपैकी काही भाषणे वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रकाशित झाली आहेत. मात्र त्यांच्या या प्रकाशित लेखनाव्यतिरिक्त अप्रकाशित राहिलेले लेखही विपुल प्रमाणावर असल्याचे समोर आले आहे. रा. केळूसकरांनी वेळोवेळी वेगवेगळ्या निमित्ता-प्रसंगांनी लिहिलेल्या स्फूट लेखांपैकी उपलब्ध निवडक लेखांचा दोन भागांतील संग्रह ग्रंथरूपात प्रकाशित करण्याचे 'गुरुवर्य केळूसकर गौरवमंडळ' या संस्थेकडून निश्चित करण्यात आले होते. या लेखांमध्ये केळूसकरांनी त्यांच्या सुमारे पन्नासहून अधिक वर्षांच्या लेखकीय कारकिर्दीत विविध ग्रंथ व वर्तमानपत्रांतून लिहिलेले संपादकीय लेख, अन्य प्रासंगिक लेख, व्याख्यानांच्या निमित्ताने लिहिलेले लेख, वृत्तपत्रीय टिपणे अशा लेखांचा समावेश होता. गुरुवर्य केळूसकर सुमारे चाळीस वर्षे प्रत्यक्ष ज्ञानदानाचे काम करीत शिक्षकी पेशात कार्यरत होते. त्यांच्या लेखन व समाजसुधारणाविषयक तळमळीची जाणीव असलेले शेकडो विद्यार्थी मुंबई व उर्वरित महाराष्ट्रात पसरलेले होते. केळूसकरांचे असे काही विद्यार्थी, त्यांच्या लेखनाचे चाहते, वाचक व अभ्यासक यांनी एकत्रित येऊन, काही निधी संकलन करून 'गुरुवर्य केळूसकर गौरवमंडळ' ही संस्था स्थापन केली होती. या संस्थेमार्फत केळूसकरांचे अप्रकाशित व ग्रंथरूपात संकलित न झालेले लेखन प्रकाशित करण्याचे

ठरविण्यात आले होते. या अंतर्गत नियोजित असलेल्या स्फूट लेखांच्या दोन भागांतील संग्रहांपैकी फक्त पहिला भागच प्रकाशित होऊ शकला. 'विचार-संग्रह अर्थात गुरुवर्य कृ. अ. केळूसकर यांचे निवडक लेख भाग पहिला' या शीर्षकाने हा लेख संग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. काही कारणास्तव दुसऱ्या भागात प्रकाशित करण्यासाठी पहिल्या भागाच्या मलपृष्ठावर जाहिरात करण्यात आलेले लेख असलेले पुस्तक प्रकाशित होऊ शकले नसले, तरी या पहिल्या भागात समाविष्ट असलेल्या लेखांच्या विषयांचे वैविध्य, त्यातील संदर्भमूल्य, विश्लेषण व निष्कर्ष, भाषाशैली अशा अनेक गोष्टीही थक्क करणाऱ्या आहेत. लेखकाच्या चतुरस्त्र व्यासंगाबरोबरच तत्कालीन समाजव्यवस्थेची जाणत्या नजरेतून केली गेलेली परखड चिकित्सा व समाजव्यवस्था पोखरू पाहणाऱ्या गोष्टींवर सुचवलेले उपाय, यांमुळे या लेखांचे ऐतिहासिक महत्त्वही निश्चितच वाढले आहे.

यातील बहुसंख्य लेखांवर सकृतदर्शनी शंभर वर्षांपूर्वीच्या सुशिक्षित मराठी समाजमानसावर प्रभाव असलेल्या आगरकरांच्या सुधारणावादी विचार व शैलीचा असलेला पगडा ठळकपणे जाणवतो. याखेरीज स्वातंत्र्यपूर्व कालखंडात कार्यरत असलेली राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद, राजा राममोहन राय, महात्मा फुले व महात्मा गांधींसारखे नेते यांच्याही विचारांचा पुरस्कार यातील लेखांमधून केला गेला आहे असे दिसून येते. देशाभिमान, शेतकरी व कष्टकऱ्यांविषयीचा कळवळा, स्त्रिया व दलितांच्या दुःसह स्थितीबद्दलची कणव, त्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने सुचवलेली उपाययोजना, तत्कालीन ब्रिटिश सरकारकडून जनतेच्या न्याय्य हक्क व मागण्यांविषयी होत असलेली अवहेलना अशा काही गोष्टींमधून केळूसकरांची समाजनिष्ठा व जीवनदृष्टी आपल्यासमोर प्रकट होत जाते. शेतीचे प्रश्न, संस्कृती, जात व धर्माभिमानामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, शिक्षणपद्धतीतील दोष, व्यसनाधिनतेमुळे होणारे नुकसान, शास्त्रीय ज्ञानाची आवश्यकता यांसारखे यातील प्रतिपाद्य विषय आजही कालबाह्य झालेले दिसत नाहीत. किंबहुना केळूसकरांनी या विषयांच्या अनुषंगाने केलेले चिंतन व मांडणी आजच्या संभ्रमाच्या कालखंडात वाचत असताना काळाच्या पुढे असलेली, द्रष्टेपण जाणवून देणारी वाटत राहते. आयुष्यभर शिक्षकाच्या भूमिकेतूनच वावरलेल्या गुरुवर्य केळूसकर यांची लोकशिक्षणाची तळमळ त्यांच्या या विचारप्रवर्तक प्रबोधनपर लेखांतून त्यांच्या अन्य लेखनापेक्षाही अधिकच तीव्रपणे जाणवून येते. एकूणच, सामाजिक व राजकीय इतिहासामध्ये विशेष रुची असलेल्या केळूसकरांचे या संग्रहात संकलित केलेले हे लेखन काळाच्या एका विशिष्ट टप्प्यावरील भारतीय समाजमानसाच्या अभ्यासाचे विश्वासार्ह साधन म्हणूनही पाहता येईल असे वाटते.

स्वतः विविध विषयांचे व्यासंगी असलेल्या गुरुवर्य केळूसकरांना समाजातील विविध क्षेत्रांत वावरणाऱ्या सुशिक्षितांनाही अभ्यास व व्यासंग करून समाजाचे वैचारिक नेतृत्त्व करावे असे वाटत होते. आपली ही भूमिका त्यांनी या विचारसंग्रहात समाविष्ट करण्यात आलेल्या चरित्रलेखनाविषयीचीं अनास्था या निबंधातून अप्रत्यक्षपणे व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे मुंबई येथे भरलेल्या पहिल्या मुंबई मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलतानाही त्यांनी भाषा, व्याकरण, अलंकारशास्त्र, विविध विषयांचा सखोल अभ्यास याची लेखकाला असलेली आवश्यकता प्रतिपादन केली होती. तत्कालीन महाराष्टातील सुशिक्षित लोकांनी समाजात बदल घडवून आणण्यासाठी कालबाह्य रुढीपरंपरांचा त्याग करून आधुनिक जाणिवांचा स्वीकार केला पाहिजे, त्यासाठी जगात इतरत्र पुढारलेल्या देशांत काय चालले आहे, तिथली माणसे कशा प्रकारे विचार करीत आहेत, याचे त्यांना भान येणे गरजेचे आहे, असे केळूसकरांना वाटते. त्यासाठीच त्यांनी या महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गाला नजरेसमोर ठेवून या लेखांचे लेखन केलेले आहे. वेगवेगळ्या देशीविदेशी ग्रंथ व नियतकालिकांतील संदर्भ देत तौलनिक दृष्ट्या आपण धर्म, जातिपाती, शेती, स्त्रीपुरुषसंबंध अशा अनेक बाबतीत कसे रुढीग्रस्त मानसिकतेचे आहोत, त्यामुळे आपल्या प्रगतीमध्ये कसे अडथळे निर्माण झाले आहेत, हे या वाचकांना दाखवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे, असे सतत जाणवून येते.

## ‘विचार-संग्रह’मधील लेखांचे स्वरूप

प्रकाशित झालेल्या ‘विचार-संग्रह’च्या या पहिल्या भागामध्ये एकूण ३८ लेखांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांचे स्वरूप साधारणतः वृत्तपत्रीय अग्रलेख, ग्रंथांच्या प्रस्तावना, विविध नियतकालिकांमधील मतांचे खंडनमंडन, वादविवाद, टिप्पण्या, भाषणे अशा प्रकारचे असल्याचे जाणवते. आपल्या देशाची राजकीय व सामाजिक स्थिती, विविध प्रकारचे कर, जाचक कायदे यांमुळे सामान्य माणसांचे होणारे शोषण, जात व धर्म यांमुळे समाजात निर्माण होणारी दुहीची भावना, शास्त्रीय ज्ञान व शिक्षणाची आवश्यकता, शेतीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना, शिक्षणपद्धतीतील दोष सुधारून करावयाच्या सुधारणा, पारंपरिक भारतीय समाजमानसिकतेतील नीतिअनीतीविषयक दृष्टिकोन, शीलमहात्म्य, मातृवात्सल्य व पुत्रधर्म इत्यादी विषयक पूर्वापार चालत आलेल्या धारणांची चिकित्सा यांसारखे समाजाला विचारप्रवण करणारे व प्रबोधन घडवून आणणारे विषय या ‘विचार-संग्रह’मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारावांचून गति

नाहीं(आधुनिक समाजनिर्मितीसाठी विज्ञानाची आवश्यकता), आमच्या समाजांतील दुहि (जात, धर्म इत्यादींविषयक अस्मितांमधून निर्माण होणारे सामाजिक अस्वास्थ), मद्यप्रीतिरूप रोगांची चिकित्सा (दारूच्या व्यसनामुळे होणारे शारीरिक व नैतिक नुकसान), अभिमानाचे कांहीं अयोग्य प्रकार (धर्म व जातिविषयक खोट्या अहंकारातून निर्माण होणारे सामाजिक तंटे), अनीति आयुष्य क्षीण करणारी आहे (अनैतिक व स्वैराचारी वर्तनामुळे व्यक्तीचे व समाजाचे होणारे नुकसान), नशीब (दैववादी दृष्टिकोनामुळे होणारी हानी), अन्नोदकव्यवहार-निर्बंध (जातीधर्मातील रोटीबेटी व्यवहारावरील निर्बंधामुळे होणारे सामाजिक नुकसान), समाजास धर्माची आवश्यकता आहे काय?(धर्मचिकित्सा), शीलमहात्म्य (नैतिक अनैतिकतेची चिकित्सा) यांसारखे काही दीर्घ स्वरूपाचे निबंध तत्कालीन रूढीप्रिय समाजाची झाडाझडती घेणारे, प्रबोधन करू पाहणारे आणि आधुनिक विचार देण्याचा प्रयत्न करणारे आहेत. केळूसकरांच्या काळातील या देशाची सामाजिक परिस्थिती व सामाजिक वर्तनव्यवहार समजून घेण्यासाठीही हे लेख उपयुक्त ठरणारे आहेत. या सर्वच लेखांतून केळूसकरांनी आग्रहाने प्रतिपादन केलेल्या मतांचे महत्त्व आजच्या काळातही कमी झालेले आहे असे म्हणता येत नाही.

गुरुवर्य केळूसकर यांची या सर्वच विषयांवरील मते तत्कालीन परंपराप्रिय व रुढीग्रस्त समाजाला सहजासहजी मान्य होण्यासारखी होती असे अजिबातच म्हणता येणार नाही. मात्र तरीही केळूसकरांनी ही मते मांडून समाजातील सुशिक्षित वर्गाला विविध विषयांशी परिचित करून देण्याचे व त्यांच्या मनातील पूर्वापार चालत आलेल्या समज व धारणांना धक्का देण्याचे महत्त्वाचे काम या लेखनाच्या माध्यमातून केलेले आहे, यात शंका नाही. यातील अनेक लेख मुळात शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी प्रथम प्रकाशित झालेले असूनही त्यातील विचार वा लेखकाची मते आजही कालसुसंगत वाटत राहतात. त्यातून हा लेखक किती काळाच्याही पुढे विचार करण्याची क्षमता बाळगून असलेला विचारवंत होता, हे जाणवून येऊन केळूसकरांच्या जीवनदृष्टीचा अचंबा वाटत राहतो. कोकणासारख्या तत्कालीन दरिद्री, रुढीग्रस्त व परंपराप्रिय प्रदेशातून आलेली, परिस्थतीअभावी आवश्यक ते उच्च शिक्षणही घेऊ न शकलेली गुरुवर्य केळूसकरांसारखी बहुजन समाजातील एक व्यक्ती बौद्धिक व्यासंग, समाजसुधारणेविषयीची उत्कट आस, संवेदनशील व विवेकी दृष्टिकोन यामुळे वैचारिकदृष्ट्या किती प्रगत मांडणी करू शकते हे या लेखांमधून सतत अधोरखित होत राहते.

आमच्या देशाची स्थिति या सुबोधपत्रिकेत प्रथम प्रकाशित झालेल्या 'विचार-संग्रह'मधील पहिल्या लेखातून केळूसकरांना असलेले या देशातील तळागाळातील समाजाच्या वास्तविक परिस्थितीचे भान जाणवून येते. उदाहरणार्थ, शेतीशी संबंधित असलेल्या समाजाच्या नेमक्या स्थितीची जाणीव करून देताना, पुस्तकी विचारवंतांची गोंधळात टाकणारी निरीक्षणे कशी वरवरच्या माहितीवर आधारलेली असतात हे केळूसकरांनी या लेखातून सप्रमाण आकडेवारी देऊन व नेमकेपणाने विश्लेषण करून परखडपणे दाखवून दिले आहे. मि. स्ट्रॉ नावाच्या ब्रिटिश सरकारला धार्जिण्या ठरणाऱ्या एका विचारवंताने हिंदुस्थानातील अधिकाधिक जमीन लागवडीखाली येत असल्याने या देशाची सांपत्तिक स्थिती कशी झपाझप सुधारत चालली आहे याविषयी आपल्या लेखातून मांडणी केली होती. त्याची ही वस्तुस्थितीची दिशाभूल करणारी मांडणी खोडून काढताना केळूसकर म्हणतात, जरी गेल्या ४०–५० वर्षांत पुष्कळ नवी जमीन लागवडींत आली आहे, तरी कृषिकर्मांत म्हणण्यासारखी सुधारणा बिलकुल झालेली नसून सरकारमहसुलाच्या ओझ्याचें चढतेंच मान आहे, व इकडे जमीन दिवसेंदिवस खताच्या कमताईमुळें बिनकस होत चालली आहे. दुसरें असें कीं, देशांतील इतर उपयुक्त धंदे बहुतेक बसत चालल्यामुळें त्या धंद्यांतील लोकांस शेतकीवांचून दुसरें उपजीविकेचें साधन बहुतेक नाहींसें झालें आहे. तेणें करून शेतकाम करणारांत विलक्षण चढाओढ चालू होऊन त्या धंद्यांतील मजुरीचें व उत्पन्नाचें मान कमी होत चालले आहे. यावरून पाहतां शेतकीच्या वाढीनें देशांत सुबत्ता झाली असें खास म्हणता येत नाही. (विचार–संग्रह, पृ. २) तर्कशुद्ध विचारमांडणी, पुराव्यानिशी केलेले खंडनमंडन, विश्लेषण यांसारख्या गोष्टींमुळे या लेखातील प्रतिपाद्य विषयाचे महत्त्व वाचणाऱ्यांच्या मनावर आपोआपच ठसू शकते.

भारतातील शेती व शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती हा केळूसकरांच्या जिव्हाळ्याचा विषय होता असे यातील अनेक लेखांवरून दिसते. भारतातील शेती पारंपरिक पद्धतीने केली जाणारी, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असलेली, पावसासारख्या नैसर्गिक गोष्टींवर पूर्णतः अवलंबून असलेली आहे. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना अनेकदा अन्य विकसित देशांच्या तुलनेने आर्थिक तोटा सहन करूनच शेतीचा व्यवसाय करावा लागत आहे. या गोष्टीची नेमकी जाणीव असल्याने केळूसकर सरकारने शेतकऱ्यांना आधुनिक खते व तंत्रज्ञान मोफत किंवा कमीत कमी खर्चात उपलब्ध करून देण्याचा जसा आग्रह धरतात, तसाच त्यांनी भारतीय शेतकऱ्यांनीही वैज्ञानिक पद्धतीचा स्वीकार करून शेतीतील नैसर्गिक अडचणींवर मात करावी असे वाटते.

'आमची शेती' या लेखात केळूसकरांनी जनरल अंगलो नामक एका युरोपियन गृहस्थाने बनवलेल्या आधुनिक पद्धतीच्या नांगराचा परिचय करून दिला आहे व अशा प्रकारच्या नांगरांच्या निर्मितीस संस्थानिक व सरकारने प्रोत्साहन दिले पाहिजे असे म्हटले आहे. तर शेतीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याचे दुर्भिक्ष्य व दुष्काळ यांवर मात करण्यासाठी पाटाचे पाणी खेळवण्यासाठी सरकारने योजना तयार करण्याविषयी प्रतिपादन केले आहे. पारंपरिक पद्धतीची भारतीय शेती मुख्यत्वे पावसावर अवलंबून असल्याने त्यासंबंधी अन्य देशात काय उपाययोजना केली जाते याचा परिचय पाऊस पाडतां येईल काय? या लेखात त्यांनी करून दिला आहे. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी पाश्चिमात्य व अमेरिकेत झालेल्या संशोधनाची माहिती देऊन जनरल मशारनिल्हे यांनी केलेल्या प्रयोगाविषयी त्यांनी या लेखात विस्तृत विवेचन केले आहे. यासारखा लेख लिहिण्यामागे केळूसकरांचा हेतू केवळ शेतीच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या एका नव्या उपयुक्त संशोधनाची माहिती देणे हाच आहे असे म्हणता येत नाही. तर भारतीय समाजमानसामध्ये रुजलेल्या पाऊस पडण्यासारख्या भौगोलिक गोष्टीही दैवी योजनेतूनच घडत असतात, त्यात मनुष्यप्राण्याला ढवळाढवळ करता येणे सर्वस्वी अशक्य आहे, यासारख्या सर्वस्वी अवैज्ञानिक व दैववादी गोष्टींमागील गैरसमज दूर करून चिकित्सक आधुनिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणे हाही यामागील मुख्य हेतू असल्याचे जाणवून येते. गुरुवर्य केळूसकरांमधील समाजाचे शिक्षण घडवणारा समाजशिक्षक सातत्याने छोट्या छोट्या गोष्टींमध्येही कसा जागरुक असतो हे अशा लेखांवरून दिसते.

केळूसकरांच्या बहुसंख्य लेखांमध्ये पाश्चात्त्य, युरोपियन व अमेरिकन देशांतील आधुनिक ज्ञान, संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान यांचे संदर्भ दिलेले दिसतात. यामागे आपला अभ्यास वा व्यासंग दाखवून वाचकांना चकित करणे हा उद्देश नसून वाचकांना पाश्चात्त्यांच्या आधुनिक, चिकित्सक, बुद्धिवादी व वैज्ञानिक दृष्टीचा परिचय करून देणे, वाचकांना त्यांच्या पारंपरिक धारणा व समज यांतून बाहेर काढून विचार व संशोधन करायला प्रवृत्त करणे यांसारखे उद्देश यामागे आहेत हे लक्षात घ्यावे लागते. उपरोल्लेखित पाऊस पाडतां येईल का? या लेखातही भारतीयांच्या पाऊस पडण्यासंबंधीच्या दैववादी दृष्टिकोनामुळे येणारे नैराश्य, नकारात्मकता यांची केळूसकरांना जाणीव आहे. यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी पाश्चात्यांनी केलेले कृत्रिमरित्या पाऊस पाडण्याचे प्रयत्न त्यांच्यासमोर ठेवून वैज्ञानिक दृष्टीच्या स्वीकारामुळे प्रयत्नशील माणसाला दैवावर मात करता येऊ शकते हे ठसवण्याचा त्यांचा प्रयत्न जाणवत राहतो. सर्वसामान्य

कष्टकरी भारतीय समाजाच्या प्रगतीविषयी केळूसकरांना असलेली कळकळ त्यांच्या लेखांतून वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त झालेली दिसते. तत्कालीन ब्रिटिश सरकारने मिठासारख्या जीवनावश्यक गोष्टीवरही कर लादला होता. या कराच्या विरोधात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सबंध देशभर आंदोलने झाली होती. जीवनावश्यक गोष्टीवर लादण्यात आलेल्या अन्यायकारक व अवास्तव करामूळे सर्वसामान्यांची होणारी परवड मिठावरील कराचा बोजा या लेखात केळूसकरांनी नेमकेपणाने मांडली आहे. यासाठी त्यांनी अन्य देशांशी तुलना करून तेथील परिस्थिती व येथील सद्यःस्थिती यांतील फरक आकडेवारीने सिद्ध करीत दाखवून दिला आहे. आपल्या मतांच्या पुष्ट्यर्थ केळूसकरांनी अर्थशास्त्र, आरोग्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र अशा विविध विषयांचे काटेकोर शास्त्रीय आधारभूत संदर्भ देत आणि देशविदेशातील तज्ज्ञ अभ्यासक, विचारवंत, ग्रंथ यांची पुराव्यादाखल साक्ष काढीत तर्कशुद्ध विश्लेषण व शास्त्रीय मांडणीचा उत्तम नमुना सादर केला आहे.

समाजाच्या भौतिक प्रगतीबरोबरच सांस्कृतिक, नैतिक, आध्यात्मिक, चारित्र्यात्मक इत्यादी अंगानेही व्यक्ती व सामाजाची प्रगती होणे गरजेचे असते, त्यातूनच एक चारित्र्यसंपन्न आधुनिक राष्ट्र म्हणून आपली प्रगती होऊ शकते, अशीही एक प्रकारची केळूसकरांची धारणा होती. या संबंधीची त्यांची मते दौलतीचा योग्य उपयोग, चार्लस ब्रॅडलॉ, शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारावांचून गति नाहीं, आमच्या समाजांतील दुहि, मद्यप्रीतिरूप रोगांची चिकित्सा, अभिमानाचे कांहीं अयोग्य प्रकार, अफूचा व्यापार बंद कां करावयाचा?, अनीति आयुष्य क्षीण करणारी आहे, नशीब, अन्नोदकव्यवहार-निर्बंध, सामाजिक सुधारणा, समाजास धर्माची आवश्यकता आहे काय?, शीलमहात्म्य, मातृवात्सल्य आणि पुत्रधर्म यांसारख्या निबंधांमधून विस्ताराने व्यक्त झाली आहेत. निकोप समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने अहितकारक असलेले वर्णाभिमान, धर्माभिमान, जात्याभिमान, चालीरितींचा अभिमान यांसारख्या वृथा अभिमानाविषयी केळूसकर पोटतिडिकीने मांडणी करतात, त्यामागे त्यांची या देशाच्या प्रगतीला मारक ठरणारे आणि आपापसांत कलह निर्माण करणारे हे मानवनिर्मित दांभिक अभिमान आहेत याचे सजग भान आहे. आपल्या देशातील जातिपातींसारख्या आपल्याला नेहमीच खाली पाहायला लावणाऱ्या आणि देशाला मागे ढकलणाऱ्या गोष्टींचा अभिमान बाळगण्याऐवजी परकीय संस्कृतीतील ज्ञानलालसा, विज्ञाननिष्ठा, यंत्रप्रेम, व्यक्तिनिष्ठा यांसारख्या काही मौलिक गोष्टींचा स्वीकार करण्यात काही गैर नाही असे त्यांना वाटते. आपल्या संस्कृतीतील सगळ्याच गोष्टी चांगल्या आहेत हाही दुराभिमानच

आहे हे परखडपणे सांगण्याचे धारिष्ट्यही ते दाखवतात. आपल्या समाजात ठळकपणे जाणवणारी आर्थिक विषमतेची दरी कमी होण्याच्या दृष्टीने काही व्यावहारिक शहाणपणाच्या गोष्टीही त्यांनी दौलतीचा योग्य उपयोग यासारख्या लेखात सुचवल्या आहेत. अर्थात त्याही गोष्टी पारंपरिक भारतीय मानसिकतेच्या विरोधात जाणाऱ्या आहेत याचीही त्यांना जाणीव आहे. निपुत्रिक श्रीमंतांनी दत्तक पुत्र घेऊन त्याला आपली संपत्ती देण्याऐवजी आपल्या संपत्तीचा विनियोग लोकोपयोगी कामांसाठी करावा, त्याद्वारे आपले व आपल्या कुळाचे नाव अजरामर करावे असे ते सुचवतात. आयत्या मिळालेल्या संपत्तीमुळे दत्तक घेतली गेलेली पुढची पिढी कर्तृत्वहीन, दुबळी, उधळी, व्यसनी होते असे निरीक्षण ते नोंदवतात. हे त्यांचे निरीक्षण किती योग्य होते हे आपल्या आजूबाजूला सहज नजर टाकली तरीही जाणवून येईल. परंतु तरीही त्यांनी सुचवलेला लोकोपयोगी कामांसाठी संपत्ती दान करून नाव करण्याचा उपाय फारसा कुणी अंमलात आणल्याचे दिसून येत नाही.

गोरगरीबांच्या हिताचा विचार करताना सरकारचेही नुकसान होऊ नये या दृष्टीने मि. इवँन्स साहेबाच्या एका पत्राच्या आधारे त्यांनी अयोग्य कर कमी करण्याविषयी या लेखात काही करविषयक सुधारणा सुचवल्या आहेत. त्यामधून विविध जीवनावश्यक वस्तूंवरील समाजातील श्रमिक, कष्टकरी गरीबांना जाचक ठरणारे कर कमी करून ते अन्यत्र कसे वळवता येतील याविषयी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. यांसारख्या काही लेखांमधून केळूसकरांचे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तर्कशास्त्र यांसारख्या विषयांचा सखोल अभ्यास दिसून येतो.

याखेरीज गुरुवर्य केळूसकरांचे विशेष आस्थाविषय असलेले नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, अध्यात्म, शिक्षण यांसारखे विषय़ त्यांच्या काही लेखांमधून विस्ताराने आले आहेत. त्यातील अनीति आयुष्य क्षीण करणारी आहे, नशीब, समाजास धर्माची आवश्यकता आहे काय?, शीलमाहात्म्य, मातृवात्सल्य आणि पुत्रधर्म, नेटिव्ह वैद्य आणि संमती वयाचा कायदा, मांसाहार यांसारख्या विशेष महत्त्वाच्या दीर्घ लेखांवर वेगळी चर्चा होऊ शकते. शीलमाहात्म्य किंवा मांसाहारासारख्या विषयांवर केळूसकरांनी मांडलेल्या मतांविषयी मतभेद संभवू शकतात. मात्र ही मते शंभर सव्वाशे वर्षापूर्वीच्या परिस्थितीच्या व उपलब्ध ज्ञानविज्ञानाच्या प्रकाशात आपल्या विवेकाला प्रमाण मानून व्यक्त होणाऱ्या समाजचिंतकाने मांडलेली आहेत हेही लक्षात घेणे गरजेचे ठरते. आजच्या काळात नीतिअनीती, आहारविचार, कुटुंबव्यवस्था,

लैंगिकतेविषयक दृष्टिकोन, अन्य काही मूल्यसंकल्पना यांमध्ये प्रचंड प्रमाणात बदल घडून आले आहेत. त्यामुळे आजच्या मूल्यनिकषांवर केळूसकरांचे सगळेच लेखन तपासता येणार नाही याचे भान राखले पाहिजे. तरीही शंभर वर्षांपूर्वीचा काळ व समाज आजच्या अभ्यासकांसमोर यथामूल उभा करणारा एक समाजशास्त्री म्हणून केळूसकरांचे व त्यांच्या या लेखांचे महत्त्व मान्य करणे भाग आहे. मात्र भारतासारख्या बहुसांस्कृतिक, बहुधार्मिक देशात धर्म व संस्कृतीच्या आधारावर राष्ट्रीयत्वाची भावना नागरिकांवर लादणे राष्ट्राच्या निकोप भविष्याच्या दृष्टीने अत्यंत धोक्याचे असल्याची जाणीव केळूसकर करून देतात, तेव्हा आजची परिस्थिती लक्षात घेता ते किती काळाच्या पुढचा विचार करत होते हे जाणवल्यावाचून राहात नाही. समाजास धर्माची आवश्यकता आहे काय? या लेखात केळूसकर म्हणतात, 'तेव्हा अशा स्थितीमध्यें हिंदूंनीं, मुसलमानांनीं वगैरे आपआपल्या पुरता विचार करून आपआपल्या धर्माचें उज्जीवन करूं लागणें राष्ट्रीय दृष्ट्या मुळींच हिताचे नाहीं. ह्या अशा जागृतीचें महत्त्व त्या त्या धर्मांच्या लोकांस कितीही हिताचे असलें तरी एकंदर समाजाच्या हितास तें कारणीभूत होईल, असें सहसा म्हणवत नाहीं. माझी तर अशी समजूत आहे कीं, अशा धर्मोज्जीवनामुळे परस्पर मतभेद, व मत्सर विशेष वाढून व तो लोकांच्या लक्षांत विशेषरीतीनें येऊन परस्परांत वितुष्ट वाढण्याचा मात्र संभव आहे. तेव्हां एकंदरींत काय कीं, आमच्या समाजाच्या एकराष्ट्रीयत्वाला धर्माचें साहाय्य घेऊन चालावयाचें नाहीं.' (पृ. १८०-१८१, समाजास धर्माची आवश्यकता आहे काय?) देशाच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेमध्ये धार्मिक अस्मितांच्या राजकारणामुळे निर्माण होऊ शकणारा केळूसकरांनी वर्तवलेला हा धोका व राजकारणामध्ये धर्म आणल्याने त्याचे संभवणारे दुष्परिणाम आजच्या काळात आपला देश चांगलाच अनुभवतो आहे. समाजात दुफळी व कलह माजवणारा फाजील धर्माभिमान दूर झाल्यावाचून सामाजिक सुधारणांमधील अडथळे दूर होऊ शकत नाहीत असेही केळूसकरांनी या लेखात म्हटले आहे, त्याचीही प्रचिती पुढील शंभर वर्षांच्या काळाच्या ओघात या देशाला सातत्याने आलेली आहे. सामाजिक सुधारणांसाठी व आधुनिकीकरणासाठी आपल्या चालीरीती व सवयी धर्मसंबंधांपासून वेगळ्या काढणे कसे गरजेचे आहे, आधुनिक समाजाचे घटक होत असताना धर्म, जात यांसारख्या गोष्टी व्यक्तिगतपातळीवरच राखल्यावाचून गत्यंतर नाही, सामाजिक जीवनव्यवहारात आपापल्या धर्माच्या धर्मग्रंथांमध्ये आचरणाविषयी काय सांगितले आहे यापेक्षाही देशाच्या सर्व नागरिकांना सामावून घेणाऱ्या सामाजिक विचारवंतांनी त्यांच्या ग्रंथांत काय सांगितले आहे त्यानुसार वर्तनव्यवहार करणे कसे सामाजिक हिताचे आहे, यांसारखी केळूसकरांनी प्रतिपादन केलेली मते काळाच्या कसोटीवर आजही

तितकीच खरी ठरलेली आहेत. या लेखाप्रमाणेच नीतिविषयक, मूल्यव्यवहारविषयक अन्य लेखही मुळातून वाचून विचार करणे नव्या काळातील अभ्यासकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरणारे आहे. जातीबाहेर शरीरसंबंध ठेवल्यावरून बहिष्कृत करण्यात येण्याच्या प्रथेविरोधात भूमिका घेताना केळूसकर म्हणतात, 'आपल्या जातीचा मनुष्य कितीही दुष्ट, दुराचारी व दुर्व्यसनी असला, तरी तो आपल्या पंक्तीस बसून जेवण्यास हरकत नाही. पण त्याने एखाद्या भलत्याच जातीशीं शरीरसंबंध केला असतां तो एकदम बहिष्कृत होतो, यांत कोणती नीति आहे तें समजत नाही.' (पृ. १५३, अन्नोदकव्वहार–निर्बंध) भारतातील भिन्न भिन्न जातिपातींमध्ये असलेल्या परस्परांशी रोटीबेटीव्यवहार करण्यावरील निर्बंधांची सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, आरोग्यविषयक व शास्त्रीय दृष्टिकोनांतून चिकित्सा यांसारख्या लेखांतून केळूसकरांनी केली आहे. या निर्बंधामागे असलेले सामाजिक भय कसे नष्ट करता येईल व हे निर्बंध मोडून व्यक्तिगत व सामाजिक हितोत्कर्ष कसे साधता येतील याचेही मार्गदर्शन या लेखात केळूसकरांनी केलेले आहे. केळूसकरांनी सुचवलेल्या मार्गांचा अवलंब करून जातिभेद कमी करण्याचा प्रयत्न गेल्या शंभर वर्षांत झाला असता तर भारतीय समाजाला लागलेला हा जातीयतेचा कलंक दूर व्हायला निश्चितच मदत झाली असती असे समजण्यास वाव आहे.

गुरुवर्य केळूसकरांनी समाजाची सुधारणा व्हावी या आंतरिक तळमळीतून सांगितलेल्या कित्येक गोष्टी आजही जशाच्या तशा लागू होण्यासारख्या आहेत. कित्येकदा तर शंभर वर्षांपूर्वी केळूसकरांना दिसत असलेला त्यांच्या आजूबाजूचा समाज, केळूसकर ज्या काळात जगत होते तो काळ, पुढे गेला आहे की नाही असे वाटावे इतपत सामाजिक परिस्थिती जशीच्या तशी स्थितीशील राहिली असल्याचे दिसून येते तेव्हा खेदही वाटत राहतो. उदाहरणार्थ, सामाजिक सुधारणा या लेखामध्ये केळूसकरांनी सामाजिक सुधारणा म्हणजे काय, सामाजिक सुधारणांमागील अडथळे, त्यामुळे उद्भवणारे दुष्परिणाम इत्यादी गोष्टींची चर्चा केली आहे. सामाजिक सुधारणांमध्ये ज्या गोष्टींचा अंतर्भाव करता येतो त्यांपैकी विवाहविषयक चालीरीती, त्यासंबंधीच्या जाचक परंपरा व होणारा भरमसाठ खर्च, जातिभेद, रोटीबेटीव्यवहार, स्त्रियांवरील अन्यायकारक बंधने, शेतकऱ्यांची परिस्थिती, दलित वर्गावरील अन्याय, राजकीय व आर्थिक सुधारणा अशा अनेक गोष्टींमध्ये गेल्या शंभर वर्षांमध्ये काळाच्या ओघात निश्चितच फरक पडू शकला असता. पण तसे का होऊ शकले नाही, दिवसेंदिवस आपण अधिकाधिक काळाच्या मागे ढकलले जाऊन असंस्कृत, असहिष्णु व स्वार्थी का बनत चाललो आहोत, याचे चिंतन या लेखामध्ये मांडलेल्या विचार व निरीक्षणांच्या अनुषंगाने करता येणे शक्य आहे.

## भाषा व शैलीविचार

गुरुवर्य केळूसकर हे संस्कृत, मराठी व इंग्रजी यांसारख्या भाषांचे उत्तम ज्ञान असलेले व्यासंगी विद्वान होते. केळूसकरांनी त्यांच्या काळातील समाजमानसाला विशेष प्रभावित करणाऱ्या लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकरांसारख्या राजकीय व सामाजिक नेत्यांच्या लेखनाशी साधर्म्य सांगणारी आपली भाषाशैली प्रयत्नपूर्वक व सहेतुकपणे घडवली आहे असे दिसते. केळूसकर इस्त्रायली शाळेत शिक्षक म्हणून काम करीत असताना त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांना गंमतीने म्हटले होते की, केळूसकर तुम्ही मराठे (महाराष्ट्रीय) आहात, त्यामुळे तुम्हाला मराठी भाषा ही उत्तमपणे लिहिता यायला हवी. ही गोष्ट मनावर घेऊन केळूसकरांनी मराठी भाषेचा पद्धतशीर व व्याकरणदृष्ट्या शास्त्रशुद्ध अभ्यास करायला सुरुवात केली होती. आपण बहुजन जातिवर्गातून शिक्षकी पेशा व लेखनकार्यात आलो असलो तरी आपल्या लिहिण्याबोलण्याच्या भाषेला कुणीही नावे ठेवता कामा नयेत या ईर्षेने त्यांनी आपली भाषिक शैली विकसित केलेली दिसते. मराठी भाषेप्रमाणेच संस्कृत व इंग्रजी या भाषेतील साहित्य व वैचारिक वाङ्मयाचा त्यांचा दांडगा व्यासंग असल्याने त्यांच्या लेखनशैलीला भारदस्तपणा प्राप्त झालेला दिसून येईल.

'आमच्या समाजातील दुहिं' या लेखात केळूसकर म्हणतात, 'आमच्यातील ज्या पाश्चात्यविद्यासुसंस्कृत जनांच्या ठायीं स्वदेशहितेच्छा जागृत होऊन थोडीबहूत क्रियाद्वारा प्रकट होऊ लागली आहे, त्यांला स्वसामर्थ्यांचें धोरण न राहून मोठमोठी आचाट कृत्यें हाती घ्यावीशी वाटतात. याचें कारण उघडच आहे कीं, स्वदेशबंधूंची सर्वप्रकारची कंगालस्थिती पाहून ती नष्ट करण्याविषयी विलक्षण उतावीळपणा व अधीरता ही त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न होतात. म्हणून कधीं कधीं त्यांच्या हातून उपायोजनेच्या संबंधांने प्रमाद होतात. आतां ही प्रमादप्रवणता मनुष्यास स्वाभाविकच असल्यामुळें तिजबद्दल केवळ सदूहेतूंनी प्रोत्साहित होत्साते जे प्रयत्न करितात, त्यांस वृथा दोष लावून त्यांच्या हातून घडलेल्या अल्प स्वल्प प्रमादांवरून त्यांच्याठायीं असद्धेतूंचा आरोप करणें सहसा इष्ट नव्हे.' (पृ. ६६)

गुरुवर्य केळूसकरांच्या भाषिक शैलीचा नमुना म्हणून हा उतारा अभ्यासता येईल. ही भाषा फारसे उच्चशिक्षण न झालेल्या बहुजन समाजातील एखाद्या व्यक्तीची आहे असे कुठेही जाणवून येत नाही हे केळूसकरांच्या शैलीचे मोठेच वैशिष्ट्य म्हणावे लागेल. एका अर्थी ही तत्कालीन युगशैली म्हणता येईल अशा स्वरूपाची केळूसकरांनी

विकसित केलेली शैली होती. केळूसकरांच्या भाषेवर तत्कालीन व पूर्वसूरी असलेल्या मराठीतील महात्मा फुले, आगरकर यांच्यासारख्या समाजसुधारक विचारवंत लेखकांप्रमाणेच संस्कृत, इंग्रजी यांसारख्या भाषांमधील साहित्याच्या व्यासंगाचाही मोठा प्रभाव पडला होता. आपण प्रतिपादन करीत असलेल्या विषयाच्या स्पष्टिकरणासाठी, पुराव्यांसाठी त्यांनी भारतासह युरोप व अमेरिकेतून प्रकाशित होणाऱ्या तत्कालीन अनेक नियतकालिके व विद्वानांच्या ग्रंथांचा आधार घेतलेला दिसतो. इंडिया, नॅशनल रिफॉर्मर, हिंदू पेट्रियट, स्पेक्टेटर यांसारख्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या विद्वानांच्या लेखांचे खंडनमंडणही त्यांनी आपल्या लेखनातून केलेले दिसते. अशा प्रकारच्या आंग्लभाषिक नियतकालिकांच्या व ग्रंथांच्या वाचनामुळे त्यांच्या लेखनभाषेमध्ये इंग्रजीप्रमाणे दीर्घ पल्ल्याची संमिश्र वाक्यरचना करण्याची शैली विकसित झाली असावी असे वाटते. तर संस्कृतच्या अभ्यासामुळे जोडशब्द, प्राचीन मराठीत रूढ असलेली होत्साता, ऐसे करून, तत्परिणामभूत, तद्विरुद्ध, एकसमयावच्छेदेकरून यांसारखी भाषिक रूपे आढळून येतात. शंभर वर्षांपूर्वीच्या मराठी भाषेत रूढ असलेली काही भाषिक रूपेही उदाहरणार्थ, पाढे या शब्दाऐवजी फादे हे रूप, पर्वा या शब्दाचे परवा असे लिखित रूप इत्यादी काही लेखांतून वापरलेली दिसतात.

वादविवादात पारंगत असलेल्या एखाद्या कुशल वाक्पटूने हिरिरीने आपली बाजू मांडताना विविध विद्वानांचे, ग्रंथांचे पुरावे, तुलनात्मक आकडेवारी इत्यादी देऊन विरोधी मतांचे खंडन करावे, तशा शैलीमध्ये केळूसकर आपल्या विषयाची मांडणी करतात. प्रतिपाद्य विषयाचे सखोल ज्ञान करून घेत, पूर्वसुरींची त्या विषयावरची मते, त्या विषयाबाबतची आपल्या समाजातील प्रचलीत असलेली पारंपरिक धाटणीतील मते, विविध देशांतील तज्ज्ञांची मते, अशा सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करून, त्याबाबतची आपली निरीक्षणे केळूसकर नोंदवतात. त्यामुळे अनेकदा एखाद्या विवाद्य विषयाबातची लेखकाची मांडणी एकांगी ठरण्याचा धोका कमी होतो. वाचकालाही आपापल्या आकलन व विवेकशक्तीनुसार संबंधित विषयाचा वेगवेगळ्या बाजूंनी विचार करण्याची संधी प्राप्त होते. केवळ आपल्या समाजाची अमुक एक अशी धारणा असली तरी जगातील इतर प्रगत समाजातील लोकांची याविषयीची मते आपल्याहून कशी अधिक प्रगत, आधुनिक वा खुला दृष्टिकोन असलेली आहेत, त्यातून मानवाच्या कल्याणाचा व स्वातंत्र्याचा अधिक विचार कसा केला गेला आहे याची जाणीव वाचकांना होऊन तो आपल्या सद्यःस्थितीबाबत व पूर्वापार चालत आलेल्या धारणांबाबत अंतर्मुख होतो. वाचकाला नव्या जगाचे भान आणून देऊन

विचारप्रवण करण्याबरोबरच कृतिप्रवण करण्याचे, आधुनिक वैज्ञानिक दृष्टी प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे काम गुरुवर्य केळूसकरांच्या या वैचारिक लेखनामुळे साधले गेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील सामाजिक व सांस्कृतिक स्थिती लक्षात घेता वैचारिक प्रबोधनाच्या दृष्टीने केळूसकरांचे हे लेखन मौलिक असेच आहे. मुलामुलींच्या विवाहाचे संमतिवय, धार्मिक दृष्टिकोन, शिक्षण पद्धती, मांसाहार, रोटीबेटी व्यवहार, व्यक्तीचे शील, चारित्र्य, मातृत्त्व इत्यादी विषयक नैतिक-अनैतिक दृष्टिकोन अशा विषयांवरील तौलनिक स्वरूपाची मते तत्कालीन भारतीय प्रबोधनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. या सर्व लेखांतून ही मांडणी करीत असताना केळूसकरांची दिसून येणारी शैलीही वैचारिक लेखनाची शिस्त कशी असावी याचा धडा घालून देणारी आहे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

एकूणच, गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर या एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीच्या कालखंडातील विचारवंत समाजसुधारक लेखकाचे 'विचार-संग्रह' या लेखसंग्रहातील लेखन या काळाचा अभ्यास करणाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरते. केळूसकर हे या कालखंडातील विवेकी, विज्ञाननिष्ठ व संवेदनशील बुद्धिजीवींचे प्रतिनिधित्व करणारे लेखक मानले तर त्या दृष्टिकोनातून तत्कालीन समाजव्यवस्था, भाषाशैली, आर्थिक व राजकीय व्यवहार, नैतिक मूल्ये अशा अनेक गोष्टींचा अभ्यास करता येण्यासाठी हे लेखन निश्चितच मौलिक ठरणारे आहे यात शंका नाही. गुरुवर्य केळूसकर गौरव मंडळामार्फत कृ. अ. केळूसकरांच्या असंग्रहित वैचारिक लेख व भाषणांचा हा ग्रंथ विचार संग्रह या नावाने दोन भागांत प्रकाशित करण्याचे ठरले तेव्हा केळूसकरांच्या सुमारे पन्नास वर्षांतील विविध नियतकालिकांतील पूर्वप्रकाशित व अप्रकाशित लेखांचे संकलन, संग्रह व विषयांनुसार वर्गीकरण करण्याची जबाबदारी दत्ताराम पु. वेंगुर्लेकर या त्यांच्या विद्यार्थ्याने घेतली होती. त्यासंबंधी केलेल्या नोंदीत वेंगुर्लेकर यांनी असे म्हटले आहे की, गुरुवर्य केळूसकर हे स्वतःच्या कार्याचा फारसा गाजावाजा करीत नसल्यामुळें त्यांची सामाजिक, आर्थिक, शिक्षण व वाङ्मयविषयक कामगिरी त्यांच्या परिचितांशिवाय इतरांना फारशी माहीत नाही; परंतु सदरहू पुस्तकांतील व पुढें प्रसिद्ध होणाऱ्या दुसऱ्या भागांतील लेखांवरून आधुनिक सुशिक्षितांस त्यांच्या निरनिराळ्या विषयांवरील मतांची ओळख होऊन कित्येकांच्या मनांत जो अकारण गैरसमज वसत आहे तो दूर होईल. (संग्राहकाचे दोन शब्द) या ग्रंथाच्या प्रकाशनामागे संग्राहकांसह संपादक मंडळी, प्रकाशक मंडळी व गौरव समितीचे सर्व सदस्य इत्यादींचा असलेला हा हेतू निश्चितच साध्य झाला आहे, असे आज सुमारे शंभर वर्षांनंतर या काळाकडे

व स्वातंत्र्याच्या आगेमागे भारतीय व विशेषतः महाराष्ट्रात झालेल्या पुरोगामी व आधुनिक विचारांच्या चळवळींकडे मागे वळून पाहताना लक्षात येते, हे गुरुवर्य केळूसकरांच्या वैचारिक लेखनाचे मोठेच यश म्हणावे लागते. सन १९३४ मध्ये प्रकाशित झालेल्या या संकलित लेखसंग्रहाच्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती आज सुमारे ८०-८५ वर्षांनंतर साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने प्रकाशित होत आहे ही या ग्रंथाचे सामाजिक व वाङ्मयीन दृष्टिकोनातून असलेले महत्त्व लक्षात घेता स्वागतार्ह अशीच गोष्ट म्हटली पाहिजे.

**– प्रवीण दशरथ बांदेकर**

# विचार-संग्रह

## अर्थात्

## गुरुवर्य कृ. अ. केळूसकर यांचे निवडक लेख

### भाग १ ला

**प्रकाशक - गुरुवर्य केळूसकर गौरव मंडळ**

खांडके बिल्डिंग नं. ३, दादर मुंबई

*******

सन १९३४ इ.

(सर्व हक्क संपादकांनी स्वाधीन ठेविले आहेत.)

******

**किंमत १.०० रुपया**

# संग्राहकाचे दोन शब्द

गुरुवर्य कृ. अ. केळूसकर यांनी गेल्या अर्ध शतकांत अनेक ग्रंथ आणि वर्तमानपत्रांतील संपादकीय लेखांव्यतिरिक्त वर्तमानपत्रातून व व्याख्यानप्रसंगी लिहिलेल्या विविध उपयुक्त विषयांवरील लेखांच्या संग्रहाचा हा पहिला भाग आज विजयादशमीच्या शुभदिनीं मराठी वाचकांच्या हातीं देतांना संग्राहकास परमानंद होत आहे. गु. केळूसकरांचे बरेच लेख आज उपलब्ध नाहींत, परंतु जे थोडे प्रस्तुत संग्राहकाला मिळाले तेवढे त्यानें जपून ठेविले; ते प्रसिद्ध करण्याची त्याला इच्छा फार दिवसांपासून होती. परंतु लोकाश्रय मिळेल किंवा नाहीं या भीतीनें हें कार्य अजूनपर्यंत तसेंच राहिलें. अखेर गेल्या जुलै महिन्यांत येथे '**गु. केळूसकर गौरवमंडळ**' नांवाची संस्था स्थापन झाली असून तिने सुमारें दहा हजार रुपये फंड जमविण्याचें कार्य आंगावर घेतलें आहे. या मंडळाचे अध्यक्ष मुंबई सरकारचे माजी फडणीस **सर गोविंदराव बळवंतराव प्रधान के. टी.** बी. ए., एल् एल्. बी. हे असून कमिटींत येथील निरनिराळ्या समाजांतील श्रीमंत व कर्तबगार लोक आहेत. या मंडळानें ग्रंथप्रकाशनाचें कार्य करण्याचेही मनावर घेतले आहे, हें अत्यंत अभिनंदनीय होय, आणि त्याच्याच विद्यमानें हा निबंधसंग्रह प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे.

मनुष्याच्या हस्तरेषांवरून उत्तम ज्योतिषी जसें त्याचें भविष्य बऱ्याच अंशी बिनचूक वर्तवितो, तद्वत बुद्धिमान ग्रंथकार आपल्या लेखांद्वारे देशाच्या किंवा समाजाच्या परिस्थितीचें भविष्यकथन त्यावेळच्या एकंदर स्थितीवरून करितात ही गोष्ट बऱ्याच लोकांच्या बाबतींत खरी ठरली आहे; आणि या पुस्तकांतील लेख जे निर्विकार मनानें वाचतील त्यांना वरील सत्य गु. केळूसकरांच्या बाबतींतही आढळून येईल. गु. केळूसकर हें स्वतःच्या कार्याचा फारसा गाजावाजा करीत नसल्यामुळें त्यांचीं सामाजिक, आर्थिक, शिक्षण व वाङ्मयविषयक कामगिरी त्यांच्या परिचितांशिवाय इतरांना फारशी माहित नाहीं; परंतु सदरहू पुस्तकांतील व पुढें प्रसिद्ध होणाऱ्या भागांतील लेखांवरून आधुनिक सुशिक्षितांस त्यांच्या निरनिराळ्या विषयांवरील मतांची ओळख होऊन कित्येकांच्या मनांत जो अकारण गैरसमज वसत आहे तो दूर होईल.

विचारसंग्रहाच्या प्रकाशनाच्या कामीं अनेक मित्रांचें साहाय्य झालें आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. विशेषतः **श्री. द्वा. गो. वैद्य** यांनीं सुबोधपत्रिकेच्या १८९१-९२ सालच्या आयली पहावयास जर दिल्या नसल्या तर प्रथमच्या लेखांत बरेंच वैगुण्य राहिलें असतें. त्याचप्रमाणें जुन्या फायलीवरून नवी हस्तलिखित प्रत तयार करण्याचे आणि प्रुफें तपासण्याचे कामीं **श्रीयुत मुरलीधर गोंदकर** आणि माझ्या पुतण्या **कु. पुतळाबाई** आणि **कु. कमळाबाई** यांनीं बरीच मदत केली. तसेंच छपाईचें काम इंदुप्रकाश छापखान्याचे मालक शेट दामोदर सांवळाराम उर्फ काकासाहेब यंदे, यांनीं आपुलकीच्या भावानें केलें, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होतील.

आधुनिक मराठी वाङ्मयांतले नांवाजलेले लेखक व उत्तम वक्ते **प्रो. माधव राव दामोदर अळतेकर** एम्. ए., यांनीं मार्मिक व विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहून या संग्रहास फारच शोभा आणिली आहे. तसेंच मित्रवर्य परुषोत्तम बाळकृष्ण कुळकर्णी यांच्या अनुभवी लेखणींतून उतरलेल्या गु. केळूसकरांच्या त्रोटक चरित्र लेखावरून त्यांच्याविषयींची वाचकांस साधार मिळेल यांत शंका नाहीं.

हा ग्रंथ छापण्याचें काम घाईनें करावें लागल्यामुळें त्यांत बऱ्याच चुका व अशुद्धें राहिलीं आहेत, त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

शेवटीं ज्यांच्या आश्रयावर पूर्ण विश्वास ठेवून हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें ते धाडस केलें, आहे त्या मराठी वाचकांचे आगाऊच आभार मानून पुढील ग्रंथांसही ते असाच उदार आश्रय देतील अशी आशा व्यक्त करितों.

**विठ्ठलवाडी, दादर** **दत्ताराम पु. वेंगुर्लेकर**

१२-१०-१९३४ संग्राहक,

# गु. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचा अल्पपरिचय

''मराठी वाङ्मयांत लेखकांची संख्या वाढत आहे; तथापि कोणत्याहि विषयाचा अभ्यास करण्याची इच्छा वाढत असलेली दिसत नाहीं. ललितवाङ्मय घेतले तरी त्यासाठीं जो अभ्यास पाहिजे, तसा करणारे लेखक फार थोडे आढळतात. व्याकरण, अलंकारशास्त्र तसेच जुन्या वाङ्मयाचा अभ्यास, हा अशा लेखनाचा पाया होय. तसा पायाशुद्ध व्यासंग फारच थोड्या लेखकांनी केला आहे. मग कथानकाचा व पात्रांचा परिपोष, निरनिराळ्या रसांचा परिपोष वगैरे दाखविण्यास जरूर असलेला अभ्यास तर दूरच.''

पहिल्या मुंबई मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांतून गु. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनीं काढलेल्या वरील उद्गारांत, त्यांनीं आपल्या यशस्वी व अनुकरणीय जीवनक्रमाचें रहस्य कथन केलें आहे. आधीं केलें, मग सांगितलें. कॉलेजमध्ये जाऊन उच्च शिक्षणाचा लाभ करून घ्यावा ही उराशीं बाळगलेली महत्वाकांक्षा गृहपरिस्थितीमुळें त्यांना प्राप्त करून घेता आली नाहीं, म्हणून ते निराश झाले नाहींत. उत्तमोत्तम ग्रंथांचे पद्धतशीर वाचन व मनन यांच्या सहाय्यानें जेवढा म्हणून ज्ञानसंग्रह करतां येणें शक्य होतें तेवढा त्यांनीं केला, व त्याचा आपल्या देशबांधवांस यथाशक्ति उपयोग करून दिला.

ग्रंथाध्ययन व ग्रंथलेखन हे व्यवसाय विशिष्ट जातीतींल लोकांसाठी नसून, मागासलेल्या वर्गांतील लोकांनीं मनांत आणल्यास व तशी त्यांना संधि मिळाल्यास त्यांनाहि दीर्घ व्यासंगाच्या बलावर त्या प्रांतांत प्रवेश करून कोणालाहि थक्क करून सोडण्यासारखें प्राविण्य संपादन करतां येतें, हें श्री. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनी आपल्या उदाहरणानें सर्वांस दाखवून दिलें आहे.

या जगांत प्रत्येक मनुष्यास निरनिराळ्या प्रकारच्या भूमिका स्वीकारून लोकसेवेचे व्रत पार पाडतां येतें. आपल्या आवडीचा एखादा व्यवसाय पत्करून व त्यांत प्राविण्य मिळवून, त्या व्यवसायाद्वारें, लोकसेवेची आपली हौस भागवून घेणारी माणसें वारंवार दृष्टीस पडतात. त्या दृष्टीने पहातां शिक्षक व लेखक यांची भूमिका अत्यंत श्रेष्ठ

प्रकारची आहे. शिक्षक व लेखक हें कोणत्याहि समाजाचे खरेखुरे आधारस्तंभ होत. प्रत्येक शिक्षकानें व लेखकानें समाजांतील आपलें उच्चस्थान ओळखून आपल्या वाणीचा, लेखणीचा व संपादन केलेल्या ज्ञानाचा समाजकार्याकडे उपयोग करण्याचें ठरविलें तर त्याच्याकडून पार पडणाऱ्या कामगिरीचें महत्व इतर कोणत्याहि कामगिरीपेक्षां श्रेष्ठ आहे.

शिक्षक व लेखक यांचें मोल त्यांना होणाऱ्या अत्यंत कनिष्ठ अशा द्रव्यप्राप्तीवरून ठरवावयाचें नसून, त्यांच्याकडून पार पडणाऱ्या श्रेष्ठतर कामगिरीवरून ठरवावयाचें आहे.

आमचे चरित्रनायक श्री. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनी शिक्षक व लेखक या उभय नात्यानें गेल्या अर्ध शतकांत जी अभिनंदनीय समाजसेवा केली तिला सध्यांच्या काळांत क्वचित्‌च तोड सांपडेल. शिक्षक असून पुन्हा आजन्म विद्यार्थी. आज त्यांच्या वयास जवळ जवळ पाऊणशे वर्षे होत आली; 'कृतांत कटकामल ध्वज जरा दिसों लागली' अशा स्थितीप्रत येऊन पोहोंचले आहेत; त्यांची सर्व गात्रें आतां विगलीत झालीं आहेत. दुसऱ्यांच्या सहाय्याशिवाय त्यांना बाहेर पडतां येत नाहीं; परंतु जोपर्यंत त्यांना हातांत पुस्तक घेऊन वाचणें व लिहिणें शक्य होतें, तोपर्यंत त्यांनी आपल्या आत्यंतिक अवडीच्या या दोन्ही गोष्टी पार पाडण्यात केव्हांहि कुचराई केली नाहीं. वाचन, मनन व निदिध्यास या ज्ञानप्राप्तीच्या तिन्ही पायऱ्या झिजविण्याचें भाग्य त्यांच्याप्रमाणें फार थोड्यांच्या वाट्यास येतें. चौपाटीवर किंवा चर्नीरोडच्या बागेंत सकाळच्या शांत वेळी, हातांत एखादा ग्रंथराज घेऊन वाचनानंदांत मग्न झालेली त्यांची ती भव्य, शांत गंभीर मूर्ती पहाण्याचें भाग्य ज्यांच्या वाट्यास आलें असेल त्यांना आमचें म्हणणें पटल्याशिवाय रहाणार नाहीं.

स्वतः आजन्म विद्यार्थी राहून गु. कृष्णराव केळूसकर यांनी शिक्षक व लेखक या नात्यानें स्वीकारलेल्या दोन्ही भूमिका उत्कृष्टपणें शोभवून दाखविल्या आहेत. त्यांचा कोणताहि लेख घ्या, त्यांनीं लिहिलेल्या कोणत्याहि पुस्तकाचें पान उघडून पहा, त्यांत तुम्हांला त्यांचा दांडगा व्यासंग व विवेक दिसून येईल. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे झाल्यास ''पायाशुद्ध व्यासंग'' पदोपदी तुमच्या दृष्टीस पडेल. यामुळेंच त्यांचें लेखन समाजोपयोगी व चिरस्थायी होऊन रहाणारें आहे.

श्री. कृष्णरावांचा जन्म ता. २० आगष्ट, १८६० सालीं श्रीकृष्णाष्टमीच्या दिवशीं वेंगुर्ले तालुक्यांतील केळूस गांवीं झाला. घरची स्थिति फार गरिबीची होती; यामुळें आरंभापासून शिक्षण संपादनाच्या बाबतींत त्यांना कष्ट सोसावे लागले. त्यांचें प्राथमिक

शिक्षण सावंतवाडी येथे झालें. त्यांचे वडील कामधंद्यानिमित्त मुंबईस येऊन राहिले होते. आपल्या मुलानें त्याकाळच्या मानानें थाडेबहुत शिक्षण संपादन करून कुटुंबभार उचलावा अशी त्यांची इच्छा असणें स्वाभाविक होतें. त्या उद्देशाने त्यानीं कृष्णरावांस मुंबईत आणिलें, व त्यांना एका इंग्रजी शाळेत माफी ठेवण्याची व्यवस्था केली; परंतु त्यांतहि व्यत्यय येऊन त्यांना आपल्या वडिलाबरोबर गांवीं जावें लागलें. अशा परिस्थितींत येथेंच त्यांच्या शिक्षणक्रमास खग्रास ग्रहण लागावयाचें; परंतु सुदैवानें त्यांस पुनरपि मुंबईस येण्याची संधि मिळून त्यांचा विल्सन हायस्कूलांत प्रवेश झाला, व तेथून १८८१ सालीं कृष्णराव मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले.

त्या काळच्या मानानें पहातां, अनेक अडचणींचे खंदक ओलांडीत मॅट्रीकची परीक्षा पास होईपर्यंत मजल गाठणे हें कांहीं कमी महत्त्वाचें नव्हतें; परंतु कृष्णरावांची महत्त्वाकांक्षा त्या काळांत व त्या वयांतही फार दांडगी होती; आपण विश्वविद्यालयांत शिक्षण संपादन करून मागासलेल्या वर्गाचें नाव उज्वल करावें असें त्यांना फार वाटत असे. घरची फार गरिबी, यामुळे विश्वविद्यालयांत प्रवेश करण्याची आपली बलवत्तर इच्छा कशी तृप्त होणार, असें वाटून मॅट्रिकच्या वर्गात असतांना त्यानी नाना शंकरशेटची संस्कृत शिष्यवृत्ति मिळविण्याची कसून तयारी चालविली होती; परंतु अवघ्या तीनच मार्कांनी त्यांना त्या शिष्यवृत्तीस मुकावें लागलें व त्याचबरोबर कॉलेजांत प्रवेश करण्याची त्यांची आकांक्षा फलदूप होऊं शकली नाहीं. तरीहि ते निराश झाले नाहींत. अन्य तऱ्हेनें त्यानीं प्रयत्न चालविले होते, व त्यांच्या प्रयत्नांस यश मिळू लागलें होते. डॉ. मॅकीकन यांची त्यांचेवर फार मर्जी होती. केवळ गरिबीमुळें त्यांना कॉलेजांत प्रवेश करतां येत नाहीं, हे समजून त्यांनी कृष्णरावांस दरमहा सहा रुपयांची शिष्यवृत्ती व विल्सन कॉलेजांत फीची माफी देण्याची व्यवस्था केली; परंतु शेवटीं घरचें दारिद्र्यच त्यांच्या आड आलें व त्यांना नोकरी पत्करल्याशिवाय दुसरा मार्ग राहिला नाही. उच्चशिक्षण संपादन करण्यासाठीं हपापलेल्या त्यांच्या मनाची त्यावेळीं केवढी निराशा झाली असेल त्याची कल्पना त्यांच्या स्थितींतील माणसांशिवाय कोणाला होणार आहे?

कॉलेजांत जाऊन उच्चशिक्षण संपादन करण्याचा मार्ग खुंटला व नोकरीपेशा पत्करावा लागला! नोकरीच करावयाची तर जिच्यामुळे ज्ञानसंपादन व ज्ञानदानाचें कार्य अविरत चालू ठेवतां येईल, अशी कमी पगाराची असली तरी शिक्षकाची नोकरी पत्करण्याचें ठरवून दरमहा पंधरा रुपये पगारावर प्रथम साडेचार वर्षे त्यांनी मुंबईत एका इस्रायली शाळेंत व नंतर विल्सन हायस्कूलांत शिक्षकाची नोकरी पत्करली.

शिक्षकाचा आयुष्यक्रम म्हणजे ठरावीक साच्याचा असावयाचा. ठरावीक वेळीं ठरावीक विषय आपल्या मगदुराप्रमाणे शिकविले म्हणजे झालें. त्या पलिकडे पहाण्याची जरूरी असतेच असें नाहीं. कृष्णरावांचे मात्र तसें नव्हतें एक आदर्शशिक्षक या नात्यानें विल्सन हायस्कुलांतील आपली कारकीर्द त्यांनीं संस्मरणीय करून ठेविली आहे. वर्गांत त्यांची शिस्त कडक असे व कोणताहि विषय, विशेषतः व्याकरण शिकवितांना त्या विषयाशीं ते तद्रूप होऊन जात असत. त्यांच्या हाताखाली शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी त्यांच्या शिकविण्याच्या प्रशंसनीय पद्धतीबद्दल त्यांची आठवण अत्यादरपूर्वक काढतात. १९२५ सालीं त्या शाळेंतून कृष्णराव सेवानिवृत्त झाले, त्यावेळीं त्यांस अर्पण करण्यांत आलेल्या मानपत्र समारंभाच्यावेळीं विद्यार्थीवर्गावर त्यांनीं केवढी छाप बसविली आहे हें सर्वांच्या निदर्शनास आलें.

अध्यापन व्यवसाय करणाऱ्यानें फारतर जे विषय शिकवावे लागतात, त्यांचें अध्ययन केलें म्हणजे पुरेसें असतें. कृष्णरावांचे तसें नव्हतें त्यांची अलोट ज्ञानतृष्णा त्यांना तेवढ्यावर स्वस्थ राहूं देत नव्हती. अध्यापनापेक्षाहि त्यांची अध्ययनाची आवड फार दांडगी होती.

उच्चशिक्षणाचा लाभ घडो वा न घडो; ध्येयाला ज्ञानसंपादन करून त्याचा इतरजनांस पद्धतशीर उपयोग करून देण्याची इच्छा आहे त्याला ग्रंथाध्ययनाच्या सहाय्यानें केवढे अपरंपार कार्य पार पाडता येण्यासारखें आहे, याचे आदर्शवत् व स्फूर्तिदायक उदाहरण म्हणजे श्री. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचें होय.

त्यांचें वाचन एकांगीं नव्हतें. ज्ञानमंदिरांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्यानें त्या मंदिराच्या नानाविध दालनापैकीं, एखाद्या दुसऱ्या दालनांत प्रवेश करून कसें चालेल? त्याने सर्व दालनें पादाक्रांत करून त्यावर आपली हुकमत चालविण्यासाठीं बद्धपरिकर होऊन राहिलें पाहिजे. कृष्णरावजीनीं अफाट ज्ञानभांडारांतील सर्व बहुमोल व दैदिप्यमान रत्ने पारखून तीं हस्तगत केली. तेवढ्यावर ते थांबले नाहींत. महत् प्रयासानें हस्तगत केलेल्या रत्नालंकारांची शोभा बंदिस्त पेटींत ठेवल्यानें वाढणार नसून, त्यांची मुक्तहस्तांनीं खैरात करण्यांतच आयुष्यांतील खरी मौज आहे, हें ओळखून त्यांनी नानाविध विषयांवर उपयुक्त व चिरस्थायी स्वरूपाचे ग्रंथ लिहून ते सर्वांच्या आटोक्यात आणून सोडलें.

संस्कृत, मराठी व इंग्रजी या भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांचे परिशीलन चालू असतां, त्या त्या वेळीं सूचित झालेले महत्वाचे मुद्दे टिपून ठेवण्यासाठीं एखादी वही ते आपल्याबरोबर नेहमीं ठेवीत असत. प्रत्येक ग्रंथाचा कसून अभ्यास करावयाचा हा त्यांचा नेहमीचा परिपाठ असल्यामुळें कृष्णराव म्हणजे एक चालते बोलते 'ग्रंथभांडार' होऊन राहिले असल्यास नवल नाहीं.

इस्रायली शाळेत शिक्षकाचें काम करीत असतां मराठी भाषेचें अध्ययन करण्याकडे त्यांचें लक्ष वेधण्यास त्या शाळेचे मुख्याध्यापक कारण झाले कृष्णरावजीस उद्देशून ते सहज विनोदानें म्हणाले कीं, ''हें पहा केळूसकर, तुम्ही मराठे अहांत, तेव्हां तुम्हांला मराठी भाषा फार चांगली आली पाहिजे.''

ते सहज बोलले असले, तरी कृष्णरावजींनीं ही गोष्ट मनास लावून घेतली. व तिचा परिणाम त्यानीं मराठी भाषेचें पद्धतशीर व पायाशुद्ध अध्ययन करण्यांत झाला. मराठी भाषा आपणांस उत्तमप्रकारें लिहिता व बोलतां आली पाहिजे, या दृढनिश्चयानें त्यांनी जरूर असलेली तपश्चर्या केली, व तिचें भरपूर फळ त्यांच्या पदरांत पडलें.

ज्याला समाज जागृति करावयाची आहे, आपल्याकडून कांहीं तरी समाजकार्य पार पडावे अशी ज्यांची आकांक्षा आहे, त्याला सहाय्य करणारीं दोन प्रमुख साधने म्हणजे लेखन व वक्तृत्व हींच होत. कृष्णरावजीनीं ही दोन्हीं साधने दीर्घ अभ्यासाने आपलीशीं केलीं, समाजकार्याकडे त्यांचा भरपूर प्रमाणांत उपयोग केला.

गेल्यात ५०-६० वर्षांत लोकोपयोगी व समाजजागृतीचें कार्य करणाऱ्या असंख्य संस्थांशी त्यांचा  निकट संबंध आला. अशा काहीं संस्थांचा येथे उल्लेख केल्यास अपासंगिक होणार नाहीं.

श्रीमती जनाबाई रोकडे जे. पी. यांनी आपल्या वडिलांच्या नांव स्थापन करून नंतर म्युनिसिपालिटीच्या स्वाधीन केलेली प्राथमिक शाळा, 'धर्माजीराव रोकडे मोफत वाचनालय', 'अहल्याबाई मोफत सूतिकागृह', 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळी, सेवासदन सोसायटी, बुद्ध सोसायटी, 'गोमन्तक मराठा समाज' 'नाईक मराठा मंडळ', 'वाङ्मय सेवा मंडळ', 'आर्यन एक्सलशियर लीग', 'मदर्स डे लीग', 'मराठा ऐक्येच्छु सभा', मराठा प्राविडंट फंड, पिसाळ शेतकी शाळा वगैरे अनेक संस्थांशी कोणत्या ना कोणत्या नात्यानें त्यांचा संबंध आला असून त्यांपैकीं कांहीं संस्थांचे कर्णधार या नात्यानें त्यांनी स्वार्थत्यागपूर्वक बजावलेली कामगिरी त्या त्या संस्थांच्या इतिहासांत प्रामुख्यानें नमूद केली जाईल.

बहुजनसमाजाच्या कल्याणाचें कोणतेहि कार्य असो, त्यांत भाग घेतल्याशिवाय ते सहसा राहत नसत. केवळ आपल्या वाचनाच्या वेडांत मग्न होऊन ते राहिले नाहींत. विद्याव्यासंग जितका जिव्हाळ्याचा, तितकेंच समाजकार्य हे जिव्हाळ्याचे मानून त्यानीं त्यांत यथाशक्ती भाग घेतला.

कृष्णरावजींची वाङ्मयसेवा भरीव, त्याचप्रमाणें विविधप्रकारची आहे बडोद्याचे विद्याभिलाषी महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आरंभींच्या काळांत त्यांना

दिलेले प्रोत्साहन अत्युपयोगी ठरलें. ''दि स्टोरी ऑफ नेशन्स सीरीज'' या नांवाची ग्रंथमाला तयार करण्याचें ठरवून ती कामगिरी महाराजांनी बारा विद्वान लेखकांवर सोपविली. त्यांत 'फ्रान्सचा जुना इतिहास' लिहिण्याची कामगिरी कृष्णरावजींकडे आली व ती त्यांनीं अत्यंत समाधानकारक रीतीनें पार पाडिली. परिक्षक कमिटीनें त्यांचा ग्रंथ सर्वोत्कृष्ट ठरून त्याबद्दल त्यांना भरपूर पारितोषिक मिळालें. हा ग्रंथ सुमारे ६०० पृष्ठांचा असून माहिती पूर्ण आहे. त्यानंतर 'सेनेका व एपिक्टेटस यांचीं बोधवचनें' हा सुमारें ६२५ पृष्टांचा दुसरा ग्रंथ महाराजांनीं त्यांच्याकडून लिहवून घेतला. सेनेका व एपिक्टेटस हे ग्रीस देशांतील स्टोईक पंथाचे दोन महासाधू सुमारें दीड हजार वर्षांपूर्वीं होऊन गेले. या ग्रंथाच्याद्वारे स्टोईक तत्वज्ञानाची व त्या दोन्ही साधूंच्या बोधवचनांची ओळख करून देतांना तत्सम अशीं आर्य साधूवर्यांची बोधवचनें त्यांनी मधून मधून गोविलीं असून त्यांवरून निरनिराळ्या धर्मासंबंधानें त्यांनीं तुलनात्मक दृष्ट्या कसा अभ्यास केला होता हें दिसून येतें.

त्यांचें एक मित्र कै. लक्ष्मण पांडुरंग नागवेकर यांनी १८९४ सालीं 'अध्यात्मिक ज्ञानरत्नावली' या नांवाचे विशेषतः अध्यात्मिक विषयांस वाहिलेले एक मासिक सुरू करून त्याचे संपादकत्व त्यांनीं श्री. कृष्णरावजीकडे सोपविले. या मासिकाच्याद्वारें त्यांचें बरेच अध्यात्मिक वाङ्मय प्रसिद्ध झालें. याच मासिकांतून त्यांनीं भगवद्गीतेवर अनेक ग्रंथांच्या आधारे टीका लिहिण्यास सुरवात केली. गीतेतील प्रत्येक श्लोकाचा अन्वय, अर्थ, त्याखाली वामनपंडितांचा श्लोक, मोरोपंतांची आर्या, तुकारामाचा अभंग, मुक्तेश्वराची ओवी व उद्धवचित्‌घनाचि सवाई ही क्रमशः देण्यास सुरवात केली. अशा रीतीनें गीतेतील श्लोकांचे स्पष्टीकरण करण्याचा उपक्रम त्यांनींच प्रथम केला. पुढें श्री. नागवेकर यांनी ही टीका स्वतंत्र पुस्तकरूपाने छापवून ती प्रसिद्ध केली. त्यानंतर १९३० सालीं मुंबईतील सुप्रसिद्ध प्रकाशक शेट दामोदर सावळाराम यंदे यांनी त्या ग्रंथाची द्वितियावृत्ति प्रसिद्ध केली. याच मासिकांतून त्यांनी गौतमबुद्ध व तुकारामबुवा याची स्वतंत्र व विस्तृत चरित्रे क्रमशः प्रसिद्ध करून पुढे तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली. ही दोन्हीं चरित्रें फार महत्वाचीं आहेत. बुद्ध चरित्रावर अभ्यासपूर्वक लिहिण्यांत आलेला हाच पहिला व महत्वाचा ग्रंथ होय. सुप्रसिद्ध बुद्धभक्त व येथील बुद्धसोसायटीचे संस्थापक प. वा. डॉ. आनंदराव नायर यांच्यासारख्या थोर पुरुषांचे लक्ष सर्वस्व बुद्धतत्वज्ञानाकडे वळविण्यास हेंच चरित्र मुख्यत्वेंकरून कारणीभूत झालें.

१९०७ सालीं मुंबईतील ''Advocate of India'' पत्राच्या मालकांनीं 'जगदवृत्त' या नांवाचें एक मराठी साप्ताहिक सुरू करून त्याचें संपादकत्व कृष्णरावजीकडे

सोपविले होतें. या वृत्तपत्राशी त्यांचा सुमारें सात वर्षे संबंध होता या पत्रातून त्यांनी अभ्यासपूर्वक लिहिलेले विविधविषयांवरील लेख प्रसिद्ध झाले आहेत. मागासलेल्या वर्गातील थोर व कर्तबगार पुरुषांची चरित्रे, (पृ. क्र १२ नाही.)

मालक कै. काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी हे दोन्ही ग्रंथ आपल्या छापखान्यांत छापिले. त्यापायीं कृष्णरावजीस हजारो रुपयांचे कर्ज झाले. धडाडीने पुढे सरसावून, अनेक मित्रांच्या सहाय्याच्या बळावर त्यांनीं हे दोन महत्वाचे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले खरे, परंतु कर्जाचा भार फार वाढलेला होता. तो हलका व्हावा म्हणून त्यांची व त्यांच्या मित्रांची सदैव धडपड चालू होती, इतक्यांत– इंदूरचे उदार अधिपति श्रीमंत सवाई तुकोजीराव होळकर महाराजांच्या कानी कृष्णरावांची करुण कहाणी गेली. खरोखर त्या काळांत कृष्णरावजींची स्थिति अत्यंत करुणाजनक झालेली होती. त्याच सुमारास श्रीशिवाजी महाराजांचें वाङ्मयस्मारक करण्यासाठीं कृष्णरावजीनीं आपल्या कांहीं मित्रांच्या सहाय्यानें एक कमिटी स्थापन केली होती; परंतु त्यांनी जमविलेला रकमेचा आंकडा कांहीं पांच हजारांपलिकडे गेला नव्हता. इतक्यांत इंदुराधिपतींची २४००० रुपयांची उदार देणगी मिळून त्या मोबदला जगांतील प्रमुख इंग्रजी ग्रंथलयांस फुकट वाटण्यासाठी इंग्रजी चरित्राच्या ४००० प्रति त्यांनी घेतल्या व त्या मूळ उद्देशानुरूप जगांतील प्रमुख ग्रंथालयांतून ठेवण्याची व्यवस्था केली. अशा रीतीने कृष्णरावजी हें वृद्धापकाळीं एका मोठ्या काळजींतून मुक्त झालें.

कृष्णरावजीनीं अनेक सुप्रसिद्ध पुरुषांची चरित्रें लिहून प्रसिद्ध केली आहेत. त्यांत कै. रा. ब. खासेराव जाधव, कै. दि. ब. रामचंद्रराव विठोजी धामणस्कर, कै. रा. ब. यल्लाप्पा बाळाराम जे. पी., कै. शेट तुकाराम जावजी जे पी., कै. माधवराव राघोजी रोकडे जे.पी., श्रीमती जनाबाई रोकडे जे. पी., श्री. गोविंद जर्नादन बोरकर उर्फ गजानन स्वामी ज्योतिषी, श्री. गुणाजी धोंडजी घुले जे. पी. वगैरे चरित्रांचा प्रामुख्याने उल्लेख करतां येईल. बायबलच्या जुन्या कराराचें नवें भाषांतर करण्याच्या कामीं बायबल रिव्हिजन कमिटीवर त्यांनीं दहा वर्षे काम केलं आहे.

एवढ्यावरून कृष्णरावजींची वाङ्मयसेवा किती भरीव व चिरस्थायी स्वरूपाची आहे याची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे.

मुंबई, ता. १२–१०–३४ **पुरुषोत्तम बाळकृष्ण कुलकर्णी**

## प्रस्तावना...

रा. रा. कृष्णराव अर्जुन केळूसकर हें जुन्या पिढींतले म्हणजे आगरकर टिळकांच्या पिढीतले मराठी लेखक होऊन गेले. मुंबईत त्यांनीं शिक्षकाचा धंदा चाळीस वर्षे केला, त्यामुळें या शहरांत त्यांचे शिष्य हजारों आहेत. विशेषत: अशा शिष्याच्या प्रयत्नानें केळूसकर–गौरव–मंडळ ही संस्था निर्माण होऊन तिच्या विद्यमाने रा. केळूसकरांचे नियतकालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाले व कांहीं अप्रकाशित असलेले अशा लेखांतून निवडक निबंध घेऊन त्यांना ग्रंथरूपानें प्रसिद्धी देण्याचें ठरलें आहे, व विचारसंग्रह हे त्या इच्छेचे फल होय. रा. केळूसकरांनीं जशी कांहीं चांगलें ग्रंथ लिहून मराठी वाङ्मयांत भर टाकली आहे तरी सध्याच्या पिढीला त्यांची फारशी माहिती नाहीं. ती होण्याला हा विचारसंग्रह फार उपयोगास येईल. मुंबई शहराचा मराठी वाङ्मयाच्या बाबतींत एक विशेष आहे, आणि हा विशेष मराठी वाङ्मयाच्या उदयकालापासून आपल्या दृष्टीस पडतो. मराठी सारस्वताची जोपासना ज्ञानेश्वारांच्या काळी सुरू झाली तेव्हां तिला जातिभेदामुळे उपस्थित झालेल्या किंवा होणाऱ्या कलहांची दृष्ट बिलकूल लागली नाहीं; आणि अठरा पगडजातीच्या मराठी बोलणाऱ्या हिंदूनी व मुसलमानांनी या भाषेचे कौतुक करून तिच्या वाङ्मयांत भर टाकली ही गोष्ट इतिहासज्ञांस अवगत आहे. मराठी वाङ्मयाची ही अगदीं पहिली परंपरा आजकाल जर कोठे उत्कर्षाने नांदत असेल तर ती मुंबई शहरांत होय. जातिकलहाला कधीं कधीं तीव्र स्वरूप आले तरी सुद्धा मराठीची सेवा करण्यांत ते या शहरांत कधींही आडवे आलेले नाहीं, व साहित्यसेवकाचा गौरव व कौतुक करण्यांत मुंबईतील मराठी भाषा बोलणाऱ्यांनीं आजपर्यंत कसलीही भेदभावना दाखविलेली नाही. नुकत्याच मुंबई येथें होऊन गेलेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षस्थान रा. केळूसकर यांना दिले होतें ही गोष्ट वरील विधानाच्या सत्यतेची प्रचीति आणणारी आहे.

रा. केळूसकर आज जवळ जवळ चार तप मराठीत लिहीत होते, व ज्यांच्या लेखनांत विचाराचा फार अभिनंदनीय प्रवाह खेळतो, ही गोष्ट विचार–संग्रह या लहानशा ग्रंथावरूनही लक्ष्यांत येण्यासारखी आहे. त्यांची भाषासरणी ज्या थोर पिढीत ते नांदले

त्या पिढीच्या किर्तीला साजेशी आहे. सरळ, सुबोध आणि व्याकरण शुद्ध मराठी लिहिणारे जे उत्तम लेखक आहेत त्यांत केळूसकरांची गणना हे निबंध वाचल्यानंतर कोणीही रसिक केल्याशिवाय राहणार नाही. या विचारसंग्रहांत आर्थिक, सामाजिक, आणि धार्मिक अशा सर्व विषयांवर लेख आले आहेत, आणि त्या लेखांत गेल्या पिढीतील थोर पुरुषांच्या विचारसरणीचा पुरस्कार आढळतो, ही गोष्ट आजच्या वाचकांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्यावेळीं राष्ट्रीयसभा, सामाजिक परिषद वगैरे संस्था ज्या विचारांचा प्रसार करीत त्या विचारांचा पुरस्कार केळूसकरांनी आपल्या लेखात केलेला आढळतो.

रा. केळूसकरांच्या लेखांतील विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा उत्कृष्ट देशाभिमान, त्यांची दुःखितांविषयीं कळकळ, त्यांची सरकारकडून लोकांच्या योग्य मागण्याविषयीं होणाऱ्या अचलेबद्दल तळमळ या होत, पण त्यांच्याबद्दल फार महत्वाची गोष्ट म्हणजे विचार, विवेक, किंवा जुन्या परंपरेच्या भाषेत बोलावयाचें म्हणजे निःशंक ज्ञान आणि शुद्ध व दयामय आचरण याबद्दल त्यांना वाटणारे अत्यंत प्रेम ही होय. केळूसकर विवेकाला पटेल ती गोष्ट करा म्हणणारे होतें; आंधळ्या जनरूढीच्या पाशांत सांपडून स्वतःला गळेफास लावण्याच्या वृत्तीला देशाभिमान किंवा धर्माभिमान म्हणणाऱ्यांत ते नव्हत. त्यांची विचारणी आगरकरांच्या विचारसरणीसारखी आहे हें आपल्या तत्काल लक्षांत येतें. केळूसकरांची मराठी भाषा आगरकर-टिळकांच्या काळाला शोभण्यासारखी आहे हें वर म्हटलेंच आहे. आपल्या इकडे कांहीं विशिष्ट प्रकृतीच्या मंडळीनी कांहीं काळ ''सुधारकां'' च्या लेखनाचें महत्व कमी करण्याचा यत्न केला होता; पण आगरकरांच्या नितांतसुंदर भाषासरणीपुढे असले प्रयत्न फसले. आतां पूर्वीचा काळ बदलला आहे, व ''सुधारकी'' विचार सर्वांना योग्य विचार म्हणून पटलेले आहेत. तेव्हां या विचारांचा सुबोधपणानें ज्यांतील कित्येकांत प्रचार केला आहे असें केळूसकरांचे निबंध लोक आतां नव्या कौतुकांने वाचतील असा मला भरंवसा आहे.

ही प्रस्तावना लिहीत असतानांच रा. केळुसकरांना पक्ष घाताचा झटका येऊन ते दिवंगत झाल्याची कठोर बातमी आली. त्यामुळें या प्रस्तावनेला अश्रुसिंचनाचे रूप आलें आहे. हा ग्रंथ केळुसकरांनी पाहिला असता व दोन दिवसांनीं दसऱ्याच्या मंगलदिनीं त्यांचा गौरव करण्याचें भाग्य त्यांच्या मित्रांना व शिष्यांना मिळाले असतें तर फार उत्तम झालें असतें. पण तें भाग्य जरी आपणांस लाभले नाही तरी गेल्या

साहित्य संमेलनाच्या प्रसंगानें त्या भाग्याचा काहींसा भाग आपण मिळविला यांतच आतां समाधान मानले पाहिजे.

केळुसकरांचे निबंध स्वदेशाविषयीं कळकळीनें पूर्ण व विचारप्रवर्तक असे आहेत. ते वाचून गाजावजा न करतां मराठी वाङ्मयाची व जनतेची जवळ जवळ अर्धशतक सेवा करणाऱ्या या थोर पुरुषांचे कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं. त्यांचे अद्यापि पुष्कळ निबंध प्रसिद्ध होण्यासारखे आहेत तेही प्रकाशांत येवोत अशी इच्छा प्रदर्शित करून आणि केळुसकरांच्या कीर्तिरूपानें अमर झालेल्या विभूतीला प्रणाम करून ही शोकयुक्त प्रस्तावना पुरी करतों.

व्हिलेपार्ले १४-१०-३४ **माधव दामोदर अळतेकर**

# शोक निवेदन

या पुस्तकाच्या छपाईचे काम पुरें होऊन बांधणीचें काम सुरू होण्यापूर्वी म्हणजे रविवार ता. १४ ऑक्टोबर, १९३४ रोजी पहाटे २।। वाजता गु. केळूसकरांनीं इहलोकची लोकोत्तर कामगिरी संपवून आपला देह ठेविला, ही खेदजनक बातमी येथें लिहितांना अत्यंत खेद होत आहे. त्यांच्या शवास त्यांच्या थोर कीर्तीस व उज्ज्वल चारित्र्यास शोभेल असाच अंत्यविधी देण्यांत आला.

**संग्राहक**

# अनुक्रमणिका


| लेखांक | विषय | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| संपादकीय | | .. | नऊ |
| प्रस्तावना | | .. | सतरा |
| १ | संग्रहकाचे दोन शब्द | .. | तेहतीस |
| २ | गु. केळूसकर यांचा अल्प परिचय | .. | पस्तीस |
| ३ | प्रस्तावना | .. | त्रेचाळीस |
| १ | ते ४ आमच्या देशाची स्थिति | .. | १ |
| ५ | ते ७ आमच्या निकृष्टावस्थेची वास्तविक कारणें | .. | १७ |
| ८ | आमचें करांचें ओझें | .. | २७ |
| ९ | दौलतीचा योग्य उपयोग | .. | ३० |
| १० | राष्ट्ररक्षक मंडळीची आवश्यकता | .. | ३४ |
| ११ | अयोग्य कर कमी करण्याविषयीं आमच्या सरकारची नाराजी कां? | | ३७ |
| १२ | मिठावरील कराचा बोजा | .. | ४० |
| १३ | चार्ल्स ब्रॅडलॉ | .. | ४४ |
| १४ | चार्ल्स ब्रॅडलॉ विषयींची आमची कृतज्ञता | .. | ४९ |
| १५ | शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारावांचून गति नाहीं | .. | ५२ |
| १६ | आमची शेती | .. | ५६ |
| १७ | पाऊस पाडतां येईल काय? | .. | ६० |
| १८ | आमच्या समाजांतील दुहि | .. | ६३ |
| १९ | मद्यप्रीतिरूप रोगांची चिकित्सा .. | .. | ६७ |

| लेखांक | विषय | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २० | स्वदेशाभिमान | .. | ७० |
| २१ | अभिमानाचे कांहीं अयोग्य प्रकार | .. | ७४ |
| २२ | राष्ट्रीय सभेची संस्था चिरस्थाई करण्याबद्दल विनंति | .. | ७८ |
| २३ | राष्ट्रीयसभा चिरस्थाई झाली | .. | ८२ |
| २४ | आफूचा व्यापार बंद कां करावयाचा ? | .. | ८५ |
| २५ | आमचे सुशिक्षित लोक अल्पायु कां होतात ? | .. | ८८ |
| २६ | सध्यांची शिक्षण पद्धति आयुष्य खुंटविणारी आहे | .. | ९१ |
| २७ | आमचे सुशिक्षित लोक अल्पायु होण्याचें आणखी एक कारण | | ९६ |
| २८ | अनीति आयुष्य क्षीण करणारी आहे | .. | १०० |
| २९ | नेटिव्ह वैद्य आणि संमतिवयाचा कायदा | .. | १०३ |
| ३० | मांसाहार | .. | १०६ |
| ३१ | नशीब | .. | ११५ |
| ३२ | अन्नोदकव्यवहार निर्बंध | .. | १३७ |
| ३३ | सामाजिक सुधारणा | .. | १५४ |
| ३४ | समाजास धर्माची आवश्यकता आहे काय ? | .. | १६७ |
| ३५ | चरित्रलेखनाविषयीं अनास्था | .. | १८३ |
| ३६ | शीलमाहात्म्य | .. | १९२ |
| ३७ | मातृवात्सल्य आणि पुत्रधर्म | .. | १९६ |
| ३८ | ज्ञान-विनिमय | .. | २११ |

## गु. कृ. अ. केळूसकर यांचे निवडक लेख

# विचार–संग्रह

# १ आमच्या देशाची स्थिति

(सुबोधपत्रिका, २२ फेब्रुवारी १८९१)

लॉर्ड डफरिन् साहेबांनी सेन्ट ॲन्ड्र्यूच्या बड्या खान्याच्या वेळीं केलेल्या सुप्रसिद्ध भाषणांत आमच्या देशाच्या विपन्न स्थितीचा उल्लेख करून ती कशी सुधारेल याचा विचार लोकांनी व विशेषेंकरून राष्ट्रीयसभेनें करणें अत्यंत अगत्याचें आहे असें सांगितलें. ही त्यांची सूचना आमच्या देशांतील कित्येक पुढारी लोकांस पसंत वाटून तदनुसार वागण्याच्या प्रयत्नास ते लागले. आमच्या इलाख्यांत गतवर्षी रा. ब. रानडे यांनी चालविलेली खटपट बहुतेकांस महशूर असेलच. त्यांच्या मते हा प्रश्न एकदम राष्ट्रीयसभेंत विचारात न घेता त्याची वाटाघाट त्या सभेचे काम आटपल्यावर सामाजिक परिषदेप्रमाणें औद्योगिक परिषद भरवून करावी असें होतें. ह्याच उद्देशास अनुसरून पुणे सार्वजनिक सभेनें गतसालच्या आपल्या प्रथम त्रैमासिकांत आमच्या औद्योगिक स्थितीविषयीं फारच नामी उहापोह केला आहे. हा लेख व ह्या पूर्वीचा त्या सभेचा व्यापारावरील लेख यांचा मुख्यत्वेकरून आधार घेऊन आमच्या तर्फेनें इंग्लंडांत खटपट करणारे प्रसिद्ध साहेब जे मि. डिगबी यांनीं एक उत्कृष्ट पत्र पार्लमेन्ट सभेच्या सभासदांस लिहून प्रसिद्ध केलें आहे. तें आमच्या देशाच्या तर्फेनें इंग्लंडांत निघणाऱ्या इंडिया नामक मासिक पत्रकांत साद्यंत आलें आहे. परंतु हे वर निर्दिष्ट केलेले सार्वजनिक सभेचे लेख किंवा मि. डिगबी साहेबांचें पत्र मिळवून वाचण्याची ऐपत, संधी किंवा योग्यता आमच्या वाचणारापैकीं फारच थोड्यांना असेल हें जाणून आम्हीं यथावकाश त्यांतील ठळक ठळक गोष्टी सांगण्याचें योजिलें आहे. त्या सांगण्याचा हेतु एवढाच कीं, आमच्या देशाच्या राज्यकारभारांत आम्हांस हितप्रद असे फेरफार करण्याचें ज्यांच्या हाती आहे, त्यांस आमची वास्तविक स्थिति कळणें जसे अत्यावश्यक आहे, तसेच

ती ज्यांची आहे त्यांस ती यथाशक्ति सुधारण्याची इच्छा उत्पन्न होण्यास तिचे खरें स्वरूप समजणेंही जरूरीचे आहे.

मि. स्टॉचे प्रभृति कित्येक आंग्लोइन्डियनांच्या मतें आमच्या देशाची संपत्ति झपाझप वाढत चाली आहे. ह्या मताच्या पुष्टीकरणार्थ ते मुख्यत: चार प्रमाणें सांगतात. तीं येणेप्रमाणे:– (१) आमच्या देशांतील जमीन अधिकाधिक लागवडींत येत आहे; (२) आमचा परदेशाशी व्यापार वाढत चालला आहे; (३) आमच्या इकडे सोन्यारुण्याचा खप वाढत चालला आहे आणि (४) कित्येक प्रकारचे धनोत्पादक उद्योग वाढून भरभराट पावताहेत. ही त्यांची प्रमाणें सकृतदर्शनी सत्यशीं वाटतात खरीं, पण जो कोणी त्यांचें सूक्ष्म रीत्या परीक्षण करील त्यास त्याचें सत्यत्व संशयार्ह वाटेल. हें कसें तें आम्ही एथें थोडक्यांत सांगतों. त्यांचें पहिलें प्रमाण जे शेतकांच्या वृद्धीचें त्याजविषयीं विचार करितां असे म्हणावें लागतें कीं, जरी गेल्या ४०–५० वर्षात पुष्कळ नवी जमीन लागवडींत आली आहे; तरी कृषिकर्मात म्हणण्यासारखी सुधारणा बिलकुल झालेली नसून सरकारमहसुलाच्या ओझ्याचे चढतेच मान आहे, व इकडे जमीन दिवसेंदिवस खताच्या कमताईमुळें बिनकस होत चालली आहे. दुसरें असे कीं, देशांतील इतर उपयुक्त धंदे बहुतेक बसत चालल्यामुळें त्या धंद्यांतील लोकांस शेतकीवांचून दुसरे उपजीविकेचें साधन बहुतेक नाहींसे झालें आहे. तेणें करून शेतकाम करणारांत विलक्षण चढाओढ चालू होऊन त्या धंद्यातील मजुरीचे व उत्पन्नाचे मान कमी होत चालले आहे. यावरून पाहतां शेतकीच्या वाढीने देशांत सुबत्ता झाली असें खास म्हणतां येत नाहीं. आतां दुसरे प्रमाण जें व्यापारवृद्धीचें त्याजविषयीं इतकेंच सांगावयाचें कीं, आमचा परदेशाशीं चाललेला व्यापार बहुतेक परस्थांच्या स्वाधीन असून त्याजपासून होणारा फायदा येथील लोकांच्या हातीं अगदीं अल्प प्रमाणानें येत आहे. इतकेंच नव्हे तर, त्याच्या योगानें उलट आमच्या देशाचे पुष्कळ नुकसान होत आहे; आणि तो सध्यां चालला आहे त्याच रीतीनें व त्याच प्रकारचा चालू राहिल्यास आमचें नुकसान उत्तरोत्तर वाढतच राहील. आमच्या देशांतून १८८८–८९ सालीं सरासरी एक अब्ज रुपयांचा माल बाहेरमुलखी गेला असून देशांत सुमारे पंचावन्न कोट रुपयांचा माल आला. हा जवळ जवळ दुपटीचा फरक आयात व निर्गत मालांत असण्याची कारणें अनेक आहेत. पैकी एक मुख्य कारण असें आहे कीं, आम्हांस इकडून पुष्कळ पैसा आंग्लोंइन्डिअनांच्या पेन्शनासाठी, इन्डिआ ऑफिसच्या खर्चासाठी व हिंदुस्थान संबंधी विलायतेंत लागणाऱ्या इतर खर्चासाठी वगैरे पाठवावा लागतो. दुसरें कारण आमचा बहुतेक वहन व्यापार परकीयांच्या हातीं असल्यामुळें नोराच्या

मोबदला पुष्कळ माल परदेशस्थांच्या घरांत जातो. ह्या व दुसऱ्या अशाच कांहीं गोष्टींचा विचार केला असतां हे व्यापारवृद्धीचे प्रमाण लटपटीत आहे असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं. आतां तिसरे प्रमाण जें सोन्यारुप्याच्या खपाचे, त्यांत कितपत तथ्य आहे ते पाहूं. पहिली गोष्ट तर ही उघड आहे कीं, केवळ मोलवान् धातूंचा खप वाढल्यानें देशांत संपत्ति वाढलीच असें म्हणवत नाहीं. ह्या वाढलेल्या खपामुळें देशाच्या व्यापारांत, धनोत्पादक कारखान्यांत किंवा शेतकीत गुंतलेल्या भांडवलांत भर पडल्याचा जोपर्यंत पुरावा होत नाहीं, तोपर्यंत तो देशाच्या उत्कर्षांचे प्रमाण म्हणवत नाहीं. दुसरें असें पहा कीं, सोन्यापेक्षां रुप्याचा खप पुष्कळ जास्त असून तें बहुतेक टांकसाळीत जाऊन त्याचें नाणे बनतें. आतां नाण्याचा खपही देशातील उद्योगवृद्धीचा सूचक होय असे म्हणतां येत नाही. कारण आमचा संबंध इतर धनाढ्य राष्ट्रांशी अपरिहार्यत्वानें आल्यामुळें आमच्या किंमतीचें मान त्यांच्या किंमताशीं मिळतें राहणें प्राप्त झालें, म्हणून आमच्या इकडील वस्तूंचे दर वाढत जाणें स्वाभाविक आहे. हल्लीचें ज्या त्या वस्तूंचे दर महाग असल्याचें कारण हेंच आहे, आणि दर वाढले म्हणजे नाणी वाढलीच पाहिजेत. आणखी एक गोष्ट अशी लक्षात ठेवली पाहिजे कीं; रुप्यापेक्षां सोन्याचा खप अगदीं कमी असून त्यांतल्या बऱ्याच सोन्यास एतद्देशीय संस्थानांत गिऱ्हायकी आहे. तेव्हां उरलेलें सोने आम्हा इंग्रजांच्या आमलांतल्या वीस कोट प्रजेस वाटून दिल्यास एक एकाच्या वांट्यास दोन दोन आण्याचे सुद्धां येणें मुष्कील होईल; ही गोष्ट आमचे लोकप्रिय दादाभाई नौरोजी यांनीं निर्विवाद सिद्ध केली आहे. अशी जर स्थिति आहे, तर त्याचा खप आमच्या संपतेचा द्योतक कसा, तें आम्हांस कळत नाहीं. आतां राहतांपैकीं राहिलें चवथें उद्योगधंद्याच्या वृद्धीचे प्रमाण. पण आम्हांस सांगण्यास दुःख वाटते कीं, हेंहीं त्यांचें प्रमाण म्हणण्यासारखें बळकट नाहीं. कसें तें पहा. आमच्या इकडे आगगाड्या, मोठमोठे कारखाने व इतर धनोत्पादक उद्योग, जे सुरू झाले आहेत ते बहुतेक परस्थांच्या भांडवलानें व यंत्रसाहित्यादिकांनी झाले आहेत. तेव्हां त्यांजपासून होणारा नफा त्यांच्या पदरांत पडून आमच्या वांट्यास थोडीबहुत मजुरी काय ती येते. इतकेंच नव्हे तर, विलायतच्या बड्या बड्या भांडवलवाल्यांपुढें व यंत्रकलेपुढें आमच्या लोकांचें कांहींएक चालेनासें होऊन निवळ त्याच्या तोंडाकडे बघण्याची आम्हांस पाळी आली आहे. त्यांच्या भांडवलास जसा काय ऊत आला आहे; आणि मागेंपुढें आमच्या इकडेच चांगले चालण्याजोगे जे कित्येक धंदे अजून थोडासा तग धरून राहिले आहेत तेही हे भांडवलवाले बळकावून बसतील, असा दृढ संभव आहे. असे झाल्यानें आम्ही

केवळ निकृष्ट प्रतीचे मजुर बनून राहूं. मुंबई प्रांतांत ज्या थोड्या गिरण्या आज दिसताहेत, त्या जरी बहुतेक आमच्या लोकांच्या भांडवलानें चालत आहेत तरी त्या चालविणारे इसम व सर्व यांत्रिकसामान ही बहुतेक विलायतेहूनच आणावीं लागतात; शिवाय एवढ्याशा गिरण्या आमच्या ह्या विस्तीर्ण देशाशीं लावून पाहिल्या असतां कांहींच नाहींत म्हणावयाच्या; आणि त्या तरी पुढें मॉन्चेस्टरवाल्यांच्या स्पर्धेपुढे टिकतील याची वानवाच आहे. येथें आणखी एक गोष्ट अशी लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हे विलायतेचे भांडवलवाले जो नफा मिळवितात, त्याचा उपभोग ते स्वदेशींच राहून घेतात. यांत आमचें बरेच नुकसान आहे. सारांश काय कीं, कोणीकडूनही पाहिले असता आमच्या देशाची भरभराट आहे असें जें म्हणतात, त्यांच्या म्हणण्यांत मुळींच जीव नाहीं.

***

# २ आमच्या देशाची स्थिति

(सुबोधपत्रिका १-३-१८९१)

मागल्या खेपेस कित्येक आत्मराज्यव्यवस्थासमर्थनपटु आंग्लोइन्डियनांनी दाखविलेलीं ह्या देशाच्या अभ्युदयाची प्रमाणें कितपत विश्वसनीय आहेत तें संक्षेपाने सांगितलें. आज आमचा याच्या उल समज होण्याची कारणें कोणती आहते त्यांचा विचार करूं.

कोणत्याही देशाच्या स्थितीचा विचार करतांना, प्रथमत: त्या देशाचे वार्षिक उत्पन्न किती व ते सर्व लोकसंख्येस वाटून दिले असतां प्रत्येकाच्या वांट्यास काय येते, तें पाहणे उचित होय. हे काम आमच्या देशास केवळ भूषणभूत चे प्रसिद्ध अर्थशास्त्रनिपुण ऑ. दादाभाई नौरोजी यांनी सरकारी रिपोर्ट वगैरे कागदपत्रांचें मोठ्या परिश्रमानें व फारच सूक्ष्म रीतीनें अवलोकन करून आमच्या देशाची अन्य देशाशीं तुलना करून ठेविली आहे. त्यांच्या त्या तुलनादर्श कोष्टकाचें अवतरण येथे अंशत: करितों.

| देशाचे नांव | दर माणशीं कच्च्या उत्पन्नाचें मान |
|---|---|
| इंग्लंड | पौ. ४१ |
| आयलंड | ,, १६ |
| फ्रान्स | ,, २५. ७ |
| युनायटेड्स्टेटस् | ,, २७.२ |
| हॉलंड | ,, २६ |
| स्विटझर्लंड | ,, १६ |
| इटलि | ,, १२ |
| रशिआ | ,, ९. ९ |
| इन्डिया | ,, २ ( रु. २८) |

या कोष्टकावरून पाहतां आमचे उत्पन्न सर्वात अगदी कमी आहे. युरोपांतील अत्यंत गरीब देश जो रशिया त्याच्याही उत्पन्नाहून आमचे उत्पन्न एक चतुर्थांशाने कमी आहे. तें आमच्या खुद्द राज्यकर्त्यांच्या देशाच्या उत्पन्नाशीं लावून पाहतां सुमारें विसावा हिस्सा आहे! आणि ऑ. दादाभाईंच्या मते तें क्षीण अमेरिकेतील एकंदर देशांच्या एकवट उत्पन्नाशी तोलून पाहता एक एक तृतीयांकाहून जास्त भरावयाचें नाहीं. वरील कोष्टकांतील आमच्या देशाचे उत्पन्न जें दोन पौंड म्हणून सांगितले आहे, तें सध्यांचा वटावाचा दर वाढण्यापूर्वी जरासें चूक होतें, असें लॉर्ड रिपनच्या वेळचे प्रसिद्ध फडनविस जे सर इ. बेअरिंग साहेब त्यांच्या १८८२ सालच्या बजेटावरील भाषणावरून दिसतें. त्या साहेबांच्या मतें हें वार्षिक उत्पन्न दर माणशीं सरासरी २७ रुपये असावे असें होते. पण हल्ली वटावाचा दर वाढल्यामुळें स्तर सुधारलेल्या देशांशी संपत्तीच्या सबंधानें तुलना करितांना ऑ. दादाभाईंचे दोन पौंडच कायम ठेवण्यास हरकत नाहीं. तेव्हां आमच्या इकडच्या मानानें आमचें दर माणशीं वार्षिक उत्पन्न तूर्त सरासरीनें २८ रुपये धरिल्यास चालेल.

आतां यापुढील विचार करण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे ह्या कच्च्या उत्पन्नांतून खर्चवेच वजा जातां प्रत्येकाच्या संग्रहास सरासरीनें काय पडतें तें पाहण्याची होय. पहिला मोठा खर्च अन्नाचा. ही अन्नखर्चाची सरासरी ह्या विस्तीर्ण देशांतील नानाविध जाती मिळून झालेल्या लोकसंख्येची काढणे जरासे मुष्किलीचेंच आहे. परंतु एतद्देशीय लष्करांतील शिपायास सरासरी साडेतीन रुपये दरमहा खाण्यास पुरतात, असा अंदाज केला आहे. याहून जेथें अधिक खर्च लागतो तेथे त्यास महागाई म्हणून थोडेसें जास्त वेतन मिळत असतें. यावरून पहातां प्रत्येक बळकट मनुष्यास निरोगी स्थितींत राहून काम करितां येण्यास वर्षास ४२ रुपये खाण्यास पाहिजेत. पण आमच्या वरील उत्पन्नाच्या अंदाजाप्रमाणें पाहतां हा एवढा अन्नाचा खर्च सर्वांस सरासरीनें अशक्य होय. कॅम्प फॉलोअर म्हणून लष्करांत झाडलोट, घोड्यांची चाकरी वगैरे करणारे जे मजूर लोक असतात त्यांचा वार्षिक पोटगीचा खर्च सुमारें तीस रुपये होतो. असा कमिसरिअट खात्याचा अजमास आहे. हाही अन्नखर्च सर्वांस सरासरीनें मिळणे कठीण आहे. परंतु हा अंदाज वयांत आलेल्या बळकट पुरुषांविषयीचा आहे; आणि देशांतील लोकसंख्येत स्त्रिया व मुले यांचाही समावेश होत असतो. यास्तव ह्या तीस रुपयांचा पाऊण हिस्सा काढून तो सर्व लोकसंख्येचा सरासरी अन्नखर्च मानण्यास चिंता नाहीं. ह्याप्रमाणे ३० रुपयांचा पाऊण हिस्सा रु. २२ आ. ८ होतो. हा अणखर्च २८ रुपयांतून वजा जातां

शिल्लक रु. ५ आ. ८ राहतात. यांतून दर माणशीं रु. २ आ. ८ सरकार देणें, रु. १ आ. ८.

चिरगुटपांघरूणाबद्दल व आणे ८ वरकड किरकोळ खर्च हे वजा केले असतां दर माणशीं शिल्लक सगळा एक रुपया राहतो. म्हणजे आम्हा इंग्रजी अमलातील वीस कोटी प्रजेच्या शिलकीस अन्नादिकांचा खर्च जाऊन सरासरी वीस कोटी रुपये राहिले. यांतून आणखी गुराढोरांच्या वार्षिक नुकसानीबद्दल सुमारें साडेसात कोटी रुपये व शेतकीची आऊतें वगैरेच्या तोडमोडीबद्दल दुसरे साडेसात कोटी रुपये वजा केले पाहिजेत. ह्याप्रमाणे वजावट करितां आमच्या संग्रही अवघे पांच कोटी रुपये पडतात. म्हणजे दर माणशीं सरासरीनें चार आणे पडले! मि. डिगबी साहेबांनी आपल्या पत्रांत ह्या संग्रहाच्या संबंधानें आमची ब्रिटीश लोकांशीं तुलना केली आहे. या चार आण्यांची किंमत इंग्लंडात सध्यां साडेचार पेन्स असून ब्रिटीश लोकांचा दर माणशीं संग्रह चार पौंड तीन शिलींग व सव्वा दोन पेन्सांचा आहे. म्हणजे प्रत्येक ब्रिटीश मनुष्याची आमच्या प्रत्येक माणसाहून सरासरी २५० पट शिल्लक आहे. ही तूलना विशेष स्पष्टपणें लक्षांत येण्यासाठी आम्ही येथें मल्हालच्या डिक्शनरीतलें जें एतद्विषयक कोष्टक सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात दिले आहे, ते अंशत: येथें उतरून घेतों.

| देशाचे नांव | एकंदर खर्च | दर माणशीं खर्च | देशाचें एकंदर उत्पन्न | देशाची एकंदर शिल्लक |
|---|---|---|---|---|
| हिंदुस्थान | ५५५०००००० | २.७५ | ५६०००००० | ५०००००० |
| ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड | १०९३०००००० | ३१.३ | १२४७०००००० | १५४०००००० |
| फ्रान्स | ८२५०००००० | २१.७ | ९६५०००००० | १४०००००० |
| युनायटेड स्टेटस | १२१००००००० | २२. ५ | १४२००००००० | २१०००००० |
| रशिया | ७५०००००० | ८.८ | ७६०००००० | १०००००० |

या कोष्टकावरून पाहतां आमची शिलक ग्रेटब्रिटन व आयर्लंडच्या शिलकीचा तिसावा हिस्सा आहे. आणि तिकडचा अगदीं गरीब जो रशिया देश त्याच्या निम्यानें आहे. आतां आमच्या उपजीविकेचा खर्च पाहू जातां ग्रेटब्रिटन व आयर्लंडच्या दरमाणसाच्या खर्चाचा पंधरावा हिस्सा व रशियाच्या खर्चाचा चौथा हिस्सा आहे.

याप्रमाणे अगदीं कनिष्ट प्रतीची उपजीवनाची इयत्ता धरूनही आमच्या शिलकीस पांच कोटी रुपये राहणार. या शिलकींतून लग्नकार्यादिकांचा खर्च व इतर अत्यावश्यक सुखाच्या चिजांचा खर्च होऊन जी बाकी उरणार तीवर आमचे धनोत्पादक धंदे कसे चालणार! आणि आम्ही इतर राष्ट्रांशी उद्योगाच्या संबंधाने टक्कर मारणार ती कशी! अशी ज्यापेक्षां आमच्या एकंदर राष्ट्राच्या सरासरीची स्थिति आहे त्यापेक्षा सर दिनशा माणेकजी पिटिटसारख्या कोट्याधीशापासून पराकाष्ठेच्या निकृष्ट स्थितीतल्या मनुष्यापर्यंत आमच्या लोकांच्या किती अवस्था असतील याचा अदमास सहज होण्यासारखा आहे. सारांश काय कीं आमच्या देशांतील बहुतेक लोक अगदीं विपन्न स्थितींत असून पुष्कळ लोकांस धड एकवेळसुद्धा पोटभर खाण्यास मिळण्याची मुष्कील पडत आहे. हें मि. डिगबी साहेबांनी आपल्या पत्रांत व पुणें सार्वजनिक सभेनें आपल्या गतसालच्या त्रैमासिकात निरनिराळ्या प्रातांतील अमलदारांनीं सरकारास पाठविलेल्या लोकस्थितिविषयक खलित्यांतून उतारे घेऊन निर्विवाद स्थापित केलें आहे. म्हणूनच कोठेही अवर्षण झालें कीं दुष्काळ पडून शेंकडों हजारों गरीब लोक अन्नास मोताद होऊन पटापट प्राणास मुकतात. कारण लोकांपाशीं दाण्यागोट्याची किंवा पैशाअडक्याची शिल्लक असली तरच दुष्काळाच्या वेळीं कांहीं वेळपर्यंत त्यांचा टिकाव निघण्यासारखा असतो. पण ज्यांचें पोट नेहमी हातावर असते, आणि तें तरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकसारखे काबाडकष्ट करूनही पुरें भरण्याची पंचाईत असते, त्यांस दुष्काळांत मुळींच त्राण न राहून ते मृत्यूमुखांत सहज पडतात. पण विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, ह्या आमच्या असह्य दुर्दशेचें स्वरूप उत्तरोत्तर अधिकाधिक भयंकर होत चालले आहे. यास एकच दाखला देऊन हा लेख आज पुरा करितों. मि. डिगबी साहेबांनीं आपल्या पत्रांत आगगाड्यांच्या वृद्धीनेही दुकाळाचें निवारण किंवा शमन कसें होत नाही तें दाखविलें आहे. ते म्हणतात कीं, सन १८०२ पासून १८०४ पर्यंत हिंदुस्थानांत रेलवे नसता चोहोंकडे लढाया वगैरेची धामधूम असतां १३ दुष्काळ पडून एकंदर ५०००००० माणसे अन्नाच्या मईगतेमुळें प्राणास मुकली, आणि रेल्वे सुरू झाल्यावर १८६० पासून १८७९ पर्यंत एकंदर १६ दुष्काळ पडून १२०००००० माणसे अन्नान्न करून मरण पावली! हा एवढा प्रचंड मनुष्यांचा नाश चोहींकडे शांतता असतां व रेल्वेच्या साहाय्यानें बंगाल व ब्रम्हदेश यांसारख्या सुपीक प्रान्तातली अन्नसामग्री चोहोंकडे अल्पावकाशांत पसरितां येऊनही झाला. यावरून आमच्या विलक्षण हैराण गतीचें स्वरूप चांगले लक्षांत येऊन ती पुढें एकसारखी वाढतच जाणार असें दिसतें. यास अगदीं ताजे उदाहरण म्हटलें म्हणजे गत सालचा मद्रास इलाख्यातला दुष्काळ होय!

***

# ३ आमच्या देशाची स्थिति

(सुबोधपत्रिका ८-३-१८९१)

मागील अंकांत दिले आंकडे ज्यानें मननपूर्वक पाहिले असतील त्याच्या लक्षांत येऊन चुकलेच असेल कीं, आमचें उत्पन्न, आमची उपजीवनाची इयत्ता व आमचा संग्रह ही जगांतील इतर सर्व सुधारलेल्या राष्ट्रांहून अत्यंत कनिष्ठ प्रतीची असून त्यांचें मान उत्तरोत्तर कमीच होत जाण्याचा दृढ संभव आहे. ह्या मुख्य तीन बाबतींत आमच्या स्थितीचें सरासरी मान जर एवढ्या निकृष्ठ प्रतीचे आहे तर त्याहूनही खालच्या स्थितींत आमच्या देशांतील हजारों लाखों माणसे असतील असें अनुमान सहज होण्यासारखें आहे. पण ही खालची स्थिति म्हटली म्हणजे शुद्ध उपासमारीची होय. नामदार गव्हर्नर जनरल साहेबांचे काउन्सिलर सर. चार्लस. ए. इलियट साहेब लिहितात कीं, ''मी असें बिनदिक्कत म्हणतो कीं, आमच्या अर्ध्या शेतकरी वर्गास वर्षाचे बारा महिनें पोटभर असें कधींच खावयास मिळत नाहीं.'' हा अर्धा शेतकरी वर्ग म्हटला म्हणजे सरासरी सात कोट मनुष्यें झालीं! सर उइलियम् हंटर साहेबांच्या मतें ही अर्धवट उपाशीं मरणारांची संख्या चार कोटींहून जास्त नसावी असें आहे. निरनिराळ्या प्रांतांतील अधिकाऱ्यांनीं सरकारास पाठविलेल्या बहुतेक खलित्यांमध्यें आमच्या विपन्नावस्थेचाच भरपूर उल्लेख आहे. कोणता म्हणजे प्रांत सुखी आहे असें फार करून दिसत नाहीं. ह्या आमच्या बहुतेक सर्वसाधारण विपत्तीविषयीं सरकारचीही पूर्ण खात्री होऊन राहिली आहे. असें असूनही ती कमी करण्यास झटण्याची बुद्धि आमच्या सरकारास फारशीं होत नाहीं, हें पाहून दु:ख व आश्चर्य वाटतें. सरकारच्या ह्या औदासीन्याचें एकच उदाहरण येथें देतों. तें कोणतें म्हणाल तर मिठावरील कराविषयींचें होय. हा कर प्रारंभीं ठेवण्याचें मुख्य कारण मि. डिगबीसाहेब असें सांगतात कीं, इंग्लंडांतून इकडे आलेल्या सरकारी कामदारांनी कांचनवश होऊन अप्रामाणिकपणा व अन्याय करूं नये म्हणून त्यांचे पगार वाढविणें इष्ट दिसल्यावरून हा अधिक होणारा खर्च कोणत्या तरी रीतीनें उभा करणें इंग्रज सरकारास प्राप्त झाले. पुढे दयाळू लॉर्ड रिपन साहेबांनी हा कर

थोडासा कमी केला होता. पण लॉर्ड डफरिन साहेबांच्या अमदानींत तो पुनः वाढला. येणें करून आमच्या गोरगरीबांचें मीठ तुटून त्याची महर्गता त्यांच्या नि:शक्ततेचें एक सबळ कारण होऊन बसली आहे. मद्रासचे माजीं सॅनिटरी कमिशनर डॉ. कॉर्निश यांनी असें सप्रयोग ठरविलें आहे कीं, मनुष्याच्या शरीरांतून दररोज एक औंस क्षाराचा निकाल लागतो. यावरून पाहतां दर वर्षात प्रत्येक मनुष्यास निदान २२.३ रत्तल मिठाचा खर्च आहे. पण आमच्या देशांत जें मीठ प्रतिवर्षी खपत आहे त्यावरून पाहतां एकएकाच्या वांट्यास सुमारें १० रत्तलाहून जास्त येत नाहीं. तेंच आमच्या राज्यकर्त्यांच्या देशांत प्रत्येक माणसामागें ७२ रत्तल खपत आहे. त्यापैकीं ३२ रत्तल कित्येक कारखान्यातील रासायनिक क्रियांत व खतांत वगैरे खर्ची पडून बाकीच्या ४० रत्तलांचा लोकांच्या खाण्यापिण्यांत विनियोग होत आहे. म्हणूनच तिकडच्या काम करणाऱ्या लोकांच्या अंगीं जोम व निरोगीपणा हीं दिसून येतात. तात्पर्य काय कीं, हा मिठाचा एवढा कमी खप आमच्या देशाच्या निकृष्टस्थितीचें प्रमाण असून आणखी आमच्या निःशक्ततेचेंही कारण आहे. असें असतां व चालू सालच्या राष्ट्रीय खर्चाच्या अंदाजावरून पहातां बरीच शिलक राहण्याचा संभव असतां, ह्या मिठावरच्या कराचें ओझें जरासें कमी करण्याचा आमच्या सरकारचा विचार दिसत नाहीं, हीं परम दुखाची गोष्ट आहे.

ह्या अशा विपन्न स्थितीचा परिणाम असा झाला आहे कीं, आमच्या देशांतील बहुतेक लोक जीवनसामग्रीच्या दुर्मिळतेमुळें उत्तरोत्तर रोडावत व अशक्त होत चालले आहेत. शहरवसती सोडून जरासें खेड्यापाड्यांत जे हिंडतील त्यांच्या नजेरस काबाडकष्ट करणारीं शेंकडों पाप्याचीं पितरें पडण्यासारखी आहेत. त्यांच्या अंगांतली जोम व हिम्मत जात चालली आहे. मि. कॉटन साहेबांनीं आपला इकडील गिरण्याविषयींचा अनुभव १८८८ सालीं मुंबईतील गिरणीवाल्यांच्या मंडळीपुढें बोलून दाखवितांना इंग्लंडांतल्या एका गिरणीची मुंबईतील एका गिरणीशी तुलना करून असें सांगितलें कीं, इंग्लंडांतल्या गिरणींत मुंबईतल्या गिरणीपेक्षां ६००० चात्या जास्त असून मुंबईतली गिरणी चालण्यास तिकडच्यापेक्षां ३-४ पट माणसें जास्त लागतात. अशाच प्रकारचा अनुभव पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटचा आहे. ह्या देशांतील सहा गवंड्याना १५२० विटा रचायला दहा तास लागतात! तेवढेंच काम तितक्याच वेळांत इंग्लंडांतील तीन गवंडी उरकूं शकतात! ह्या एवढ्या आमच्या लोकांच्या ठाईच्या कमजोरपणाचें मुख्य कारण, त्यांस मिळावे तितके व योग्य प्रकारचे अन्न खावयास मिळत नाहीं हें होय.

ह्या दुर्वह स्थितीचा आणखी एक असा परिणाम होत आहे कीं, इकडे बहुतेक राष्ट्रांहून मृत्यूची संख्या दर वर्षी जास्त असते. आमच्या देशांत प्रतिवर्षी दरहजारीं सुमारें ३५ माणसें मृत्यु पावतात. तींच ग्रेटब्रिटन व आयर्लंड मिळून २१.२ मृत्यु पावतात. आणि मत्हालच्या डिक्शनरीवरूनपाहतां आमच्या देशाच्या ह्या प्रकरणीं बरोबरीं करणारा एक हंगेरी प्रांत खेरीज करून दुसरा कोणताही सुधारलेला देश नाहीं. आणखी एक महत्वाची गोष्ट प्रकरणीं अशीं सांगण्यासारखी आहे कीं, अन्नाच्या कमताईमुळे व महिन्यांचे महिने उपासमार झाल्यामुळें, बहुशः तापाचा आजार होत असतो. ह्या तापाच्या आजारानें मरणारांची संख्या आमच्या इकडे फारच मोठी आहे. वर सांगितल्याप्रमाणें प्रतिवर्षी जीं सुमारें ७०,००,००० माणसें मरत असतात. त्यापैकी शेंकडा निदान सत्तर माणसें फक्त तापाच्याच आजारानें मरण पावतात. मि. डिगबी साहेबांनी १८८० पासून १८८८ पर्यंतचे तापाच्या आजारानें मरणारांचे आंकडे देऊन असें दाखविलें आहे कीं, १८८० मध्ये २७४८००० माणसें तापानें मेलीं असून १८८७ मध्यें ही संख्या ३५८४७८६ इतकी झाली. म्हणजे दर वर्षास सरासरीनें एक एक लक्ष वाढत जाऊन आठ वर्षांमध्ये वास्तविक मरावी त्यापेक्षां ४३४९९२२ माणसें अधिक मेली. ही जास्त झालेली मृत्यूंची संख्या अर्थात् टाळण्यासारखी होती. १७९३ पासून १८९० पर्यंत सुधारलेल्या जगामध्ये ज्या साऱ्या लढाया झाल्या, त्यांत एकंदर ४५,००,००० माणसें प्राणास मुकलीं असा अजमास आहे. ह्या संख्येशीं आमच्या देशांत सदरील आठ वर्षात तापाच्या आजारानें वाजवीपेक्षा जास्त मरणारांची वरील संख्या लावून पाहतां, ती जवळ जवळ तेवढीच आहे! दुसरी एक अत्यंत शोचनीय गोष्ट ह्या तापाच्या आजारानें होणाऱ्या मृत्यूच्या संबंधाने मि. डिगबी साहेबांनी दाखविली आहे, ती अशी: मागल्या प्रचंड दुष्काळाच्या १८७७, १८७८ व १८७९ या तीन वर्षांत तापाच्या आजारानें एकंदर ९३,३१,८३४ माणसें मेली असून १८८६, १८८७ व १८८८ ह्या तीन साधारणतः वरवरून तरी आबादानीच्या वर्षात एकंदर १०४३०२५५ माणसें ह्या आजारानें मेलीं. म्हणजे सुमारें १०,९८,४२१ माणसें ह्या सुबत्तीच्या तीन वर्षात जास्त मरण पावली! ह्या वाढलेल्या मृत्यूची कारणें सरकारने एकंदर पांच सांगितली आहेत. त्यांत अन्नाची कमताई व चिरगूट पांघरुणाची टंचाई ह्या दोन कारणांची प्रमुखत्वानें गणना केली आहे. ह्या उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या मृत्यूंच्या संख्येवरून हे निर्विवाद सिद्ध होतें कीं, आमची स्थिति हळू हळू खालावतच चालली आहे. ह्या कंगालपणामुळें आमच्या एकंदर राष्ट्राचें आयुर्मानही अगदीं अल्प झालें

आहे. ब्रिटीश लोक आमच्याकडून सरासरीनें साडे सोळा वर्षें जास्त जगतात असा अंदाज आहे! आणि हें सर्व चोहोंकडे आरोग्यवर्धक व्यवस्था व रोगप्रतिकारार्थ दवाखाने वगैरे होऊन, व शांति आणि ज्ञान यांचा प्रसार होऊनही झालें आहे! तेव्हां सारांश काय कीं, आमच्या देशांतील लाखों लोक अन्नादि अत्यावश्यक वस्तूंच्या दुर्मिळतेमुळें नेहमीं अगदीं मरणाच्या दारीं बसलेले आहेत असें म्हणायला हरकत नाहीं; आणि ही सर्व अत्यंत कष्टमय दशा आम्हां हिंदुस्थानसारख्या सुपीक, व नानाविध भौतिक संपत्तीनें परीपूरित अशा देशांतील रहिवाशांना, आमच्या जगांतील अत्यंत सुधारलेल्या राज्यकर्त्यांच्या अमदानीत प्रात व्हावी, ह्या सारखें खेदास्पद, निराशेचें, विस्मयावह किंबहुना लज्जास्पद दुसरें कांहीं एक नाहीं!

***

# ४ आमच्या देशाची स्थिति

(सुबोधपत्रिका १५-३-१८९१)

मागल्या तीन लेखांत आमच्या एकंदर देशाची हालहवाल कशी काय आहे, तें संक्षेपानें सांगितलें. आतां ही अशी अत्यंत दीन स्थिति आम्हांस प्राप्त होण्याचीं कारणें कोणतीं तें पाहूं.

प्रथमतः मोठमोठ्या आंग्लोइन्डिअनांनी जीं कित्येक कारणें सांगितलीं आहेत त्यांत कितपत तथ्य आहे त्याचा थोडासा विचार करूं.

(१) सर उइलियम हन्टर व लॉर्ड डफरिन् या उभय राजकार्यधुरंधरांनीं आमच्या दारिद्र्यातिशयाचें निदान करून असें एक कारण सांगितलें आहे कीं, आमची लोकसंख्या झरझर वाढत चालल्यामुळें देशांतील उपजीविकेची साधने तीस उत्तरोत्तर अधिकाधिक अपुरीं होत चालली आहेत. त्यांच्या मते प्रजोत्पादनाच्या बाबतींत कोणत्याही देशांतले लोक आमच्या इतके अदूरदृष्टि व अविचारी नसावें असें आहे. हंटर साहेब म्हणतात कीं, ह्या अनिष्टाचा प्रतिकार करण्याचें लोकांच्याच हाती आहे. कारण बालविवाह व आपला मगदूर न पाहतां अविचारानें केलेले विवाह हे ह्या अनिष्टाचीं प्रधान कारणें होत. आणखी पुढें तें असें म्हणतात कीं, ही फाजील लोकवृद्धि ब्रिटिश अमदानीमुळें झाली आहे. कारण युद्धे, रोगराई इत्यादि नैसर्गिक प्रतिबंधांचा जो दाब लोकसंख्येवर पूर्वी होता तो तर बहुतेक उडालाच आहे. पण त्यांच्या ऐवजी दूरदृष्टि, स्वाभिमान इत्यादिकें करून उतपन्न होणारा जो मनोनिग्रह त्याचा गंधही आमच्याठायीं अजून नाहीं. हे ह्या साहेबांचें मत कितपत सत्य आहे तें पाहूं. आमच्या बालविवाहाच्या चालीचे अनिष्टोत्पादकत्व आम्हांस कबूल केलें पाहिजे; आणि ह्या चालीचें होईल तेवढें लवकर निर्मूलन करण्यास आम्हांपैकी प्रत्येक विचारी मनुष्यानें झटणें उचित होय. पण ज्या राष्ट्रामध्यें उशिरा लग्ने करण्याची चाल चिरप्रवृत्त आहे, तेथल्या लोकसंख्येच्या वृद्धीचें मान आमच्याहून कोणत्याही प्रकारे कमी नाहीं, ही गोष्ट हंटर साहेबांसारख्या हुषार गृहस्थांच्या लक्षांत कशी आली नाहीं नकळे. आतां दुसरें कारण

जें अविचारमूलक विवाहांचें त्या संबंधानें इतकेंच म्हणण्यासारखे आहे कीं, हे आमच्या विपन्न स्थितीचें जसें कारण आहे, तसें तें तिचें कार्यही आहे. ही गोष्ट सर्व अर्थशास्त्रसंमत आहे कीं, जे लोक विपद्ग्रस्त असतात त्यांच्याठायीं स्वस्थितीविषयीचा पुढला मागला विचार ध्यानांत येण्यास त्यांची प्रापंचिक व मानसिक स्थिति पुष्कळ सुधारावी लागते. हा कार्यकारणसंबंध नित्य ध्यानांत वागविला पाहिजे. पण मुळीं आमच्या लोकवृद्धीचे प्रमाण इतर राष्ट्रांहून विशेष आहे असें जे म्हणतात, त्यांचें तें म्हणणेच बहुतेक निराधार आहे. गेल्या दोन दसकांतल्या खानेसुमारीवरून पाहतां आमच्या लोकवृद्धीचें मान शेकडा सरासरी एक असून इंग्लंड आणि वेल्स मिळून शेकडा ३.३७ आहे; आणि सगळ्या युरोपाचे सरासरी १,०६ आहे. युरोपांतले फक्त फ्रान्स, स्पेन, इटली व आस्त्रिया इतके काय ते देश या बाबतींत आमच्यापेक्षा कांहींसे कमी आहेत. हे तरी असें असण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, या देशांतले पुष्कळ लोक प्रतिवर्षी देशांतरीं जाऊन वसाहती वगैरे करून तिकडेच चिरस्थायी होतात. असा कांहीं प्रकार आमच्या इकडें मुळींच होत नाहीं असे म्हटलें तरी चालेल. वर इग्लंडच्या लोकवृद्धीचे दिलेले प्रमाण इतकें कमी असण्याचेही कारण हेंच आहे, तेथले हजारों लोक दर वर्षी परदेशी जाऊन राहतात. यावरून पाहतां आमची लोकवृद्धि इतर बहुतेक राष्ट्राहून जास्त आहे, असें म्हणण्यास हंटर प्रभृति आंग्लो इंडियनांस काय आधार आहे तो नकळे.

आतां आमच्या इकडे फाजील लोकवृद्धि होते असे क्षणभर कबूल केलें तरी, लोकवृद्धि दारिद्र्यवृद्धीस सर्वच ठिकाणी निश्चयानें कारण होते असें म्हणवत नाहीं. ज्या देशांतील बहुतेक भौतिक संपत्तीचा विनियोग मनुष्याच्या श्रमानें, कौशल्यानें व ज्ञानानें धनोत्पादनाकडे होऊन चुकला आहे, त्या देशांतील लोकसंख्या एकसारखी वाढतच राहिली तर मात्र तो देश अधिकाधिक विपन्न होत जाण्याचा संभव आहे. पण ज्या देशांत उपयोगांत न आणलेली अशी भौतिक संपत्ति विपुल असते, त्या देशाचे लोकवृद्धीनें नुकसान न होतां उलट ती त्याच्या संपन्नतेस कारण होते. हें कसें तें ग्रेटब्रिटन आदिकरून युरोपीय देशांचे गेल्या शंभर वर्षांत झालेलें स्थित्यंतर लक्षांत आणलें म्हणजे नीट समजण्यासारखें आहे. १८०६ मध्ये ग्रेटब्रिटनची व ऐर्लंडची मिळून लोकसंख्या सुमारे एक कोटी पन्नास लक्ष असून, वार्षिक प्राप्ति १७ कोट पौंड होती; आणि १८८२ साली त्यांची लोकसंख्या सुमारे साडेतीन कोटी हाऊन वार्षिक उत्पन्न, एक अब्ज, चोवीस कोटी, सात लक्ष पौंड झालें आहे. येथें मालथसनें जो नियम स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे, कीं लोकसंख्या भूमिति श्रेढीनें वाढत असून धनोत्पादन गणितश्रेढीनें वाढत असते, याचा कांहींएक प्रभाव न चालून त्या

नियमाचा विपर्यय झालेला जगाच्या अनुभवास येत आहे. इंग्लंडादि देशाच्या वस्तुस्थितिवरून असें दिसते कीं, लोकसंख्येच्या वृद्धीने विपत्तीचे वर्धन न होतां उलट तिच्यायोगें संपत्युत्पत्तीच्या वर्धनास सहाय्य झालें. अशी स्थिति जर तिकडल्या देशांची आहे, तर हा आमचा देश धनोत्पादनोपयोगी भौतिक संपत्तीनें परिपूरित असतां त्याच्याच वाट्यांस ही दुर्दशा कां यावी बरें? आमच्या देशात आज अन्नादि अत्यावश्यक वस्तु उत्पन्न करण्यास लायक अशी कमीतकमी ७,८०,००,००० एकर जमीन लागवड केल्यावांचून आहे. शिवाय तंतुमय द्रव्यें रंग, तीळ वगैरे निर्माण होण्यासारखी दुसरी जमीन इतकी आहे कीं तींतील उत्पन्न सगळ्या जगास पुरून उरेल. तूर्त तरी ह्या देशांतून दोन कोटी ऐशी लक्ष हंड्रेडवेट तांदूळ व ऐशी लक्ष हंड्रेडवेट गहू बाहेरमुलखीं जात आहे. त्याप्रमाणें ह्या देशांत कोळशांच्या व लोखंडाच्या मोठमोठ्या खाणी अजून पुष्कळ लागण्यासारख्या आहेत. इतक्याप्रकारची अनुकूलता असून आणखी पाश्चात्यांचे शास्त्रीय ज्ञान, कलाकौशल्य व भांडवल यांचें सहाय्य मिळाल्यास मग आम्हांस आणखी हवें तें काय? पण हें व्हावें कसें? या सर्व उपपादनाचें पर्यवसान म्हणून इतकेंच कीं, आम्हांस लोकवृद्धीची इतकी भीति बाळगावयास नको. तर आमची धनोत्पादक शक्तीच कायती उत्तरोत्तर वाढत गेली पाहिजे. सध्यां आम्हांस जें भीति व खेद मानण्यास कारण आहे, ते आमच्या इकडे धनोत्पादनाची जितकी वृद्धि व्हावी तितकी होत नाही हें होय.

आतां आणखी एक कारण आमच्या दैन्यावस्थेचें असें सांगतात कीं, आमचे लोक उधळे फार. त्यांस हात राखून खर्च कसा करावा ते मुळींच कळत नाहीं. परंतु ह्याही कारणांत कांहीं अर्थ नाहीं, हे सहज दाखविता येण्यासारखें आहे. संपत्युत्पादन व लोकवृद्धि यांमध्ये जसें कांहींतरी विवक्षित प्रमाण रहावें लागते, त्याचप्रमाणें धनार्जन व धनव्यय यामध्येहीं कांहींतरी विवक्षित प्रमाण राहणें इष्ट होय. आमच्या देशाचें मागें जें सरासरी उत्पन्न सांगितलें, तें इतकें निकृष्ट प्रतीचें आहे कीं, त्याचा व्यय करणें यास कोणीही विचारी मनुष्य उधळेपणा म्हणणार नाहीं. कारण ते अत्यावश्यक उपजीविकेच्या चिजांच्या संपादनासच जर मुळीं अपुरें आहे, तर मग ते खर्चिल्यानें उधळेपणाचा दोष तो कसा येतो? तेव्हां आम्ही उधळे आहों, असा दोष आम्हांस न लावितां आमची धनार्जनाची इयत्ताच कनिष्टप्रतीची आहे, असें म्हणणें विशेष संयुक्तिक व सत्य होय. ह्या बाबतीत आमच्या देशाची इंग्लंडादि इतर देशाशीं तुलना करून आमचा मदगूर कितपत आहे तें दाखविल्यास अप्रस्तुत होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. मागें एकवेळ सांगितल्याप्रमाणें सर इ. बेअरींगच्यामतें आमचें दरमाणशीं वार्षिक उत्पन्न २७

रुपये आहे. त्यांनी वीस कोटीस गुणिलें असतां पांच अब्ज चाळीस कोटी रुपये आमच्या एकंदर ब्रिटिश अमलांतील प्रजेचे वार्षिक उत्पन्न होतें. आता वीस कोटी प्रजेपैकीं शेंकडा ऐेशी म्हणजे सोळा कोटी लोक निव्वळ शेतकीचा धंदा करणारे असून त्यांचें वर्षाचे कच्चें उत्पन्न तीन अब्ज एकतीस कोटी आहे. म्हणजे दरएक शेतकऱ्याच्यामागें सरासरी वीस रुपये झाले. या खेरीज उरलेले चार कोटी लोक अर्थात इतर धंदे करणारे असून त्याचें उत्पन्न सुमारे दोन अब्ज दहा कोट रुपये आहे. म्हणजे प्रत्येक माणशीं वर्षास सरासरीं बावन्न रुपये झाले. ह्या आमच्या दोन्हीप्रकारच्या उत्पन्नाची मल्हालच्या डिक्शनरीच्या सहाय्यानें इतर देशांच्या उत्पन्नाशीं तुलना करितां, असें दिसून येते कीं, आमच्या शेतकऱ्यांचें उत्पन्न, इंग्लंड, फ्रान्स व आमेरिकेंतील संयुक्त  संस्थानें या देशातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा जवळ जवळ बारावा हिस्सा आहे! सर्व युरोपाच्या उत्पन्नाशीं तें ताडून पाहतां अवघें–आहे! अशीच गत इतर प्रकारच्या उत्पन्नाचीही आहे. ग्रेटब्रिटन व ऐर्लंड याच्या एकवट उत्पन्नाचा तें एक नवमांश आहे; आणि सर्व युरोपाच्या साधारण उत्पन्नाचा ते १/४ आहे. यावरून पाहता आमच्या उभय प्रकारच्या उत्पन्नांचें मान सुधारलेल्या जगांतील एकंदर देशांहून कनिष्टप्रतीचें आहे. अशीच स्थिति आमच्या खर्चवेचाचीही आहे. ग्रेट ब्रिटनातील प्रत्येक मनुष्यास प्रतिवर्षी अत्यंत अगत्याच्या चिजांसाठी ७२ रुपये ९ खर्च होतो; रशियातील लोकांस ३४ रुपये खर्च होतो; साऱ्या युरोपास सरासरी ५६ रुपये खर्च होतो; आणि आमच्या हिंदुस्थानास अवघा २० रुपये खर्च होतो, असा अंदाज आहे. यावरून पाहतां आमची खर्चाची ही इयत्ता पराकाष्टेची निकृष्ट आहे असें सिद्ध होतें. मग ती उधळेपणाची आहे असें कोण म्हणेल? तेव्हां तात्पर्य काय कीं, आमच्या हीनदीन झालेल्या पोटासाठीं रात्रंदिवस काबाडकष्ट करणाऱ्या लोकांच्या शिरावर भलतेच दोष लादीत बसण्यांत बिलकुल शहाणपणा नाहीं. आमच्या काबाडी लोकांची तर मेहेनतीपणा, काटकसर, व्यवस्थितपणा, सहनशीलता, श्रमसातत्य, समाधानवृत्ति इत्यादि सद्गुणांविषयी सर्व जगांत ख्याती आहे. असे असतांहि ज्यापेक्षा त्यांची ही अशी दुःसह स्थिति आहे, त्यापेक्षा तिचें कारण कांहीं तरी निराळेंच असलें पाहिजे. सारांश काय कीं, आमच्या कित्येक लोकांच्या हातून जरी क्वचित् कोठें थोडाबहुत उधळेपणा, झालेला दृष्टोत्पतीस आला, तरी तो सामान्यत्वेंकरून सर्वच राष्ट्राकडून होतो असे म्हणणें म्हणजे, वस्तुस्थितीच्या आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन करणें होय.

***

# ५ आमच्या निकृष्टावस्थेची वास्तविक कारणें

(सुबोधपत्रिका २२-३-१८९१)

गतांकीं हंटर आदिकरून कित्येक धूर्त इंग्रज मुत्सद्यांनीं आमची अगदी कंगाल स्थिती होण्याचीं जीं कित्येक कारणें सांगितली आहेत, त्यांपैकी त्यांच्या मतें दोन प्रधान कारणांचा विचार करून त्यांचें अप्रयोजकत्व दाखविण्याचा प्रयत्न केला. आतां ह्या स्थितीच्या वास्तविक कारणांचे निरूपण येथें संक्षेपतः करितों.

(१) पहिलें मोठे कारण म्हटलें म्हणजे, गेली पन्नास वर्षे आमच्याशी परस्थांची चालू असलेली चढाओढ होय, ही चढाओढ आंतून व बाहेरून एकसारखी वाढतच चालली आहे. आमच्या इकडे परस्थानीं आमच्याच भौत्तिक वगैरे साधनांच्या योगानें चालविलेले मोठमोठे कारखाने अंतस्थ चढाओढीची चांगली साक्ष देत आहेत. त्याचप्रमाणें आमचा उत्तरोत्तर वाढत जाणारा आयात व्यापार बाह्य चढाओढीचें चांगलें प्रमाण आहे. परस्थांचे उमाप भांडवल सुधारलेलें कलाकौशल्य व संघानें उद्योग करण्याची वर्णनीय शैली यांच्यापुढे आमच्या सर्वतोपरि दुर्बल लोकांचें काय चालणार आहे? त्यांचें जबरदस्त शास्त्रीय ज्ञान, त्यांची यंत्रादि अत्यंत सुधारलेलीं संपत्युत्पादनाची साधनें, त्यांचें धंदेशिक्षण यांच्यायोगेंकरून आमच्या बहुतेक उत्पादक श्रम करणारास त्यांनीं अगदी हतवीर्य करून सोडलें आहे. अशा आमच्या ह्या सर्वप्रकारें बलिष्ठ प्रतिस्पर्धिवर्गास आणखी आमच्या सरकारचेंही पूर्ण साहाय्य आहे. वास्तविक पाहतां आमच्या अशा ह्या निराधारस्थितींत आमच्या सरकारनें आम्हांस होईल तितकें साहाय्य अवश्य केलें पाहिजे, तें कांहींएक न करितां उलट आमच्या आधींच सर्वापरि बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यास अनुकूळ अशी राज्यव्यवस्था तें चालवीत आहे. अप्रतिबद्ध व्यापाराच्या तत्वांचा इकडे प्रयोग, लोखंडी सडकांचा विस्तार व परकीय लोकांनी इकडे चालविलेल्या अनेक खटपटींस नानाप्रकारचें उत्तेजन, इत्यादि गोष्टी सरकारनें आमच्या हिताकडे फारसें लक्ष न देतां कसकशा चालविल्या आहेत, हे ज्याला ठाऊक आहे त्याला हें आमचे म्हणणें अत्युक्तिरूप वाटणार नाहीं. अशा या परस्थांच्या

बहुतेक अप्रतिबद्ध चढाओढीचे परिणाम मुख्यतः तीन आहेतः- (१) आमच्या देशांतील निरनिराळ्या धंद्यांचें जे परस्परांशीं योग्य प्रमाण व संबंध पूर्वी होता त्यांत विलक्षण चलबिचल झाली आहे; (२) परकियांचा आमच्या इकडे अधिकाधिक रिघाव होऊन एकामागून एक धंदा त्यांच्या हातीं जात चालला आहे आणि (३) आमचे एकंदर धंदे अगदीं बसत जाऊन आमच्या लोकांस आपली स्थिति सुधारण्याची आशा बिलकूल उरली नाहीं. आतां ह्या परिणामांविषयी थोडासा जास्त खुलासा करूं. (१) आमचा परदेशी प्रतिस्पर्ध्यापुढें निभाव न निघाल्यामुळें आमच्या पुष्कळ इतर धंद्याच्या लोकांस शेतकीचा आश्रय करावा लागत आहे. आमच्या देशांतील शेंकडा सुमारें ८६ माणसें आज निव्वळ शेतीवर अवलंबून आहेत; शेंकडा बारा माणसें इतर धनोत्पादक धंदे चालवीत आहेत; आणि शेंकडा अवघी २ व्यापारादि इतर उद्योगांत गुंतलेलीं आहेत असा अजमास आहे. तीच ग्रेटब्रिटन व आयर्लंडची कशी काय स्थिती आहे ती पाहा. तिकडे फक्त शेंकडा १४.६ जमिनीची लागवड वगैरे करणारे आहेत; शेंकडा ३०.४ कारखान्यांत वगैरे गुंतलेले आहेत; आणि शेंकडा ५५ इतर व्यवसायांत आहेत. यावरून पाहतां आमच्या बहुतेक देशांत शेतकी शिवाय दुसरा धंदाच बहुतेक उरला नाहीं हें स्पष्ट होतें. ह्याप्रमाणें एकाच धंद्यांत पुष्कळ माणसांची गर्दी झाल्यानें त्या धंद्यांतल्या किफायतीचें मान नियमानें हळू हळू कमीच होत जावयाचें. मागल्या खेपेस जी आमच्या शेतकरी वर्गाची सरासरी प्राप्ती ग्रेटब्रिटन, आयर्लंड, फ्रान्स व अमेरिकेतील संयुक्त संस्थानें या देशांतल्या शेतकऱ्यांच्या सरासरी प्राप्तीचा बारावा हिस्सा आहे म्हणून सांगितली. ती तरी इतकी कमी असण्याचें मुख्य कारण हेंच आहे.

(२) आतां दुसरा परिणाम जो परकीयांचा प्रवेश, त्याजविषयीं विचार करूं. हा प्रवेश दोन प्रकारचा आहे. एक प्रत्यक्ष व दुसरा अप्रत्यक्ष. पहिल्याने प्रत्यक्ष रीतीचा प्रवेश कसा काय झाला आहे तो पाहू. पहिला प्रकार शेतकी संबंधीचा होय. १८३४ सालीं कंपनी सरकारनें आमच्या इकडे चहाची लागवड कशी काय होते तें सप्रयोग पाहून पुढें १८४० साली ही प्रयोगाची सर्व साधनें त्यानें लागवड करणाऱ्या बिटिश कंपन्यास विकली. ह्या कंपन्याच्या उद्योगानें आज तीन लक्ष एकर जमिनींत चहाची लागवड होत असून सुमारें दहा कोट रत्तल चहा अलीकडे प्रतीवर्षी उत्पन्न होत आहे. ह्या एवढ्या चहाची एक शिलिंग चार पेन्स रत्तल प्रमाणें सुमारें ६२,५०,००० पौंड किंमत होते. या धंद्यांत आमचे २,८०,००० लोक लागले आहेत. दुसरा मोठा शेतकीचा धंदा परकीयांच्या हाती गेलेला म्हटला म्हणजे बुंद उत्पन्न करण्याचा होय. सुमारें १,७६,००० एकर जमिनींत ब्रिटीश कंपन्यांकडून बुंद उत्पन्न होत असून सुमारें

४,१०,००,००० रत्तल बुंद प्रतिवर्षी पैदा होत आहे. हा धंदा तूर्त जरासा बसल्यामुळें साडे सात हजार लोक सध्यां त्यांत कामास लागले आहेत. पण वास्तविक हिशोब करितां एकएक एकराच्या मागे एकएक माणूस या मानानें सरासरी १,८०,००० माणसें या धंद्यांत लागावीं असा अजमास आहे. दुसरी मोठी धंद्याची शाखा परकीयांनी आटोपलेली पाहिली असतां खाणी खणण्याची होय. अशा सुमारें ८५ खाणी असून त्यांत १,३१,५०,००० रुपयांचे भांडवल गुंतलें आहे. यांपैकी निव्वळ कोळशाच्याच सुमारे ६८ खाणी असून त्यांतून दर वर्षी १३,८८,००० टन कोळसा निघत आहे. त्याची दर टनी पांच रुपये प्रमाणें ७०,००,००० रुपये किंमत होते. या सर्व खाणींत मिळून सरासरी २७,००० माणसें खपत आहेत. या शिवाय नुकत्याच आसाम रेल्वे कंपनीला आसाममध्यें खाणी खणण्यास दिलेल्या सवलती, निजाम सरकारनें डेक्कन माइनिंग कंपनीला दिलेल्या सवलती आणि ब्रम्हदेशांतील रत्नांच्या खाणी चालविण्यास एका कंपनीस मिळालेला हक्क इत्यादि गोष्टी मनात आणल्या म्हणजे परकीयांचा एकसारखा कसकसा रिघाव होत चालला आहे, हें चांगलें लक्षांत येईल. आतां तिसरी मोठी धंद्याची शाखा परकीयांच्या हाती कोणती आहे म्हणाल, तर नानाप्रकारच्या निर्वाहोपयोगी चिजा उत्पन्न करण्याच्या कारखान्यांची होय. कापसाच्या एकंदर ८९ गिरण्या आमच्या इकडे असून त्यांतल्या एकतृतियांशच कायत्या आमच्या लोकांच्या हातीं आहेत. त्याचप्रमाणें तागाच्या, लोकरीच्या, रेशमाच्या वगैरे बहुतेक गिरण्या परस्थांनीं इकडे चालविल्या आहेत. शिवाय निळीचे, लोकेचे, साखरेचे वगैरे नानाप्रकारचे कारखाने त्यांच्या भांडवलाने इकडे चालले आहेत. ह्या सर्व कारखान्यांत मिळून सुमारें पांच लाख माणसे खपत असून, त्यांत निदान नाहीं तरी सोळा सतरा कोट रुपयांचे भांडवल गुंतलें आहे. त्यांतले अगदीं थोडें, भांडवल आमच्या लोकांचें असेल. आता चौथी शाखा म्हटली म्हणजे व्यापाराची होय. हींत पहिलीं विचार करण्यासारखी बाब, वहनव्यापाराची होय. आमचा आयात निर्गत व्यापार चालविण्यास सरासरी ७१,६०,००० टन माल नेणारी गलबतें तूर्त लागत आहेत. यापैकी शेंकडा ९६.५ परकीयांची असून आमच्या इकडच्या लोकांची फक्त शेंकडा ३.५ आहेत. ह्या समुद्रवाहित व्यापारांत दरसाल एकंदर ७,१०,००,००० रुपयांचा नफा होत आहे. आतां दुसरी बाब आयात व निर्गत व्यापार करणाऱ्या पेढ्यांची होय. ह्या व्यापारापैकीं सुमारें एक दशांशाइतका काय तो आमच्या लोकांच्या हातीं आहे. बाकी सगळा परक्यांनीं चालविलेला आहे. ह्या व्यापारात परस्थांस दरवर्षी सरासरी वीस कोट रुपयांचा फायदा होत आहे. आतां देशांतल्या देशांत जो वहनव्यापार सुरू आहे, तो

बहुतेक आगगाड्यांनी बळकाविला आहे. आज १३,३९० मैलांची लोखंडी सडक तयार असून १,७०,००,००,००० रुपयांचे भांडवल त्यात गुंतले आहे. यापैकी थोडेसें काय तें एतद्देशीय संस्थानिकांचें आहे, बाकी सारे परस्थांचें आहे. या धंद्यात आज कमींतकमीं २,१०,००९ माणसें लागलीं आहेत; आणि प्रतिवर्षी दहा बारा कोट रुपये नफ्यादाखल परदेशीं चालले आहेत. हा वहनव्यापार बराच आमच्या सरकारच्या हिमाहतीनें चालला असल्यामुळें दरसाल एक दीड कोट रुपयांचें नुकसान त्यास सोसावें लागत आहे. हें नुकसान अर्थात् या देशाच्या नांवानें काढलेल्या कर्जातून भरून काढावें लागत आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करितां आमच्या लोकांशीं परस्थांचीं केवढी प्रचंड प्रत्यक्ष रीतीची चढाओढ सुरू आहे हें ध्यानांत येईल. त्यांच्या भांडवलवाल्यांस हा आमचा देश जणूकाय पुराणकल्पित एक मोठी कामधेनुच सांपडली आहे. तिच्या आंचळांतून रक्त येईपर्यंत तिचें दोहन परस्थांनी चालविले असून, तिचें वत्स जे आम्हीं येथील रहिवासी त्यांच्या वाट्यांस पेंढ्यांपलीकडे कांहींएक फारसें येत नाहीं म्हटल्यास चालेल. वर जे परकीयांनी इकडे चालविलेले निरनिराळे उद्योग सांगितले, त्यांत आमची एकंदर सुमारें १२,०४,००० माणसें खपत असून वर्षास सरासरी दरमाणसीं साठ रुपयेप्रमाणें ७,२३,४०,००० रुपये काय ते आमच्या पदरांत मजुरीदाखल पडत आहेत. बाकीचा सारा नफा परक्यांच्या घरांत जात आहे. येथवर फक्त प्रत्यक्ष रीतीच्या चढाओढीचें निरूपण झालें. आतां अप्रत्यक्ष रीतीची चढाओढ कशी काय चालली आहे ते पुढील खेपेस पाहूं.

***

# ६ आमच्या निष्टावस्थेची वास्तविक कारणें

(सुबोधपत्रिका २९-३-१८९१)

गेल्या खेपेस परकीयांनी देशांतल्या देशांत चालविलेल्या जबरदस्त चढाओढीच्या स्वरूपाचें अल्पमात्र दिग्दर्शन केलें. आज त्यांनीं आमचे उद्योग अप्रत्यक्ष रीतीनें बळकाविण्याचा झपाटा कसा काय चालविला आहे ते पाहूं.

आमचा आयात व्यापार एकसारखा वाढतच चालला आहे. हा व्यापार बहुतेक हस्तकौशल्यादिकें करून निर्माण होणाऱ्या मालाचा आहे. हा अशा प्रकारचा माल १८६४ साली चोवीस कोटी रुपयांचा आमच्या देशांत आला, व १८८७ सालीं ४९ कोटी रुपयांचा आला; म्हणजे सुमारें चोवीस वर्षात दुपटीहून जास्त झाला! युरोपस्थांच्या बड्या कारखान्यांत यंत्रादि अत्युत्तम साधनांच्या योगें करून विद्याकलादिकांनी सुसंस्कृत कारागिरांच्या श्रमानें आणि अपरंपार भांडवलाच्या सहाय्यानें उत्पन्न झालेल्या सुबक, सुंदर, सोईच्या स्वस्त चिजांचा खप आमच्या इकडे भराभर वाढून, आमच्या अज्ञान, गरीब व भाबड्या लोकांनी निव्वळ हातांनींच चालविलेल्या लुंग्यासुंग्या कारागिऱ्या बसत जाऊन कित्येकांचा तर आजला मागमूसही उरलेला नाहीं. परदेशीयांच्या मालाचा खप आमच्या देशात कसा वाढत चालला आहे, याची थोडीशी कल्पना यावी म्हणून वर सांगितलेल्या अवधींत त्यांच्या कित्येक चिजांचा खप किती प्रमाणानें वाढला आहे तें सागतों. १८६४ सालीं आमच्या इकडे त्यांच्या कपड्याचा वगैरे जो खप झाला होता, त्याहून १८८७ सालीं शेंकडा १२१ टक्के वाढला; चाकू, काब्या वगैरे जिनसांचा खप ७६ टक्के वाढला; इतर धातूंच्या जिन्नसांचा खप ५३१ टक्के वाढला; नानाप्रकारच्या तेलांचा खप १८८३ टक्के वाढला; रेशमी कापड वगैरेचा खप २१२ टक्के वाढला; मिठाचा खप १२५ टक्के वाढला; साखर, गूळ वगैरेचा खप ५५४ टक्के वाढला. याचप्रमाणें इतरही प्रकारच्या मालाचा खप कमीजास्त प्रमाणानें एकसारखा वाढला आणि गेल्या दोन वर्षातही तो वाढतच गेला आहे.

बरें; ह्या एवढ्या प्रचंड आयातव्यापाराशी आमच्या निर्गत व्यापाराचें प्रमाण तरीं असावें तसें आहे म्हणावें, तर तेंही नाहीं. आमचें लोकप्रिय दादाभाई नौरोजी यांनी सर ग्रॅन्ट डफ यांस उत्तरादाखल १८८७ सालच्या ऑगस्ट व ऑक्टोबरच्या कॉन्टेंपररी

रिव्हयुमध्यें दोन नामी लेख दिले आहेत. त्यांत त्यांनीं आमच्या निर्गत व्यापाराची रक्कम जी इतकी फुगलेली दिसते तिचें चांगलें पृथक्करण करून दाखविलें आहे. त्याचें येथें संक्षेपानें निरूपण केल्यास अप्रस्तुत होणार नाही असें वाटतें.

सध्यांच्या आमच्या निर्गतव्यापाराचे सात प्रकार मानण्यास हरकत नाहीं. ते सात प्रकार हे :- एतद्देशीय संस्थानांतून परदेशी जाणारा माल (१,६६,००,००० पौंड); (२) या देशाच्या जमिनीवरील सीमांच्या पलीकडील मुलखांतला माल (१,३००,००० पौं.); (३) युरोपस्थ वगैरे परकीयांनी इकडे चालविलेल्या शेती व इतर कारखान्यांत उत्पन्न झालेला माल (१,००,००,००० पौं.); (४) इन्डिया कौन्सिलाचा खर्च, लहानमोठ्या कामगारांचीं पेन्शनें व राष्ट्रीय कर्जाचे व्याज, इत्यादिकांच्या मोबदला दिला जाणारा माल (पौं. १,१५,००,०००); (५) परस्थांनी चालविलेल्या आगगाड्यांसाठी व इतर मोठमोठ्या सार्वजनिक कामासाठी काढलेल्या कर्जाच्या व्याजाचे मोबदला जाणारा माल (६०,००००० पौं.); (६) परदेशस्थ आपल्या इकडील मिळकतींतून जो पैसा आपल्या कुटुंबास वगैरे पाठवीत असतात त्याच्या मोबदला जाणारा माल (१,००,००,००० पौं.); (७) बाकीचा निर्गत व्यापार ( २,७८,००,००० पौं.) ब्रिटीश सरकारच्या अमलांतल्या लोकांचा आहे म्हणावयाचा. आपण हा आमचा व्यापार ठोकळ मानानें ३,००,००,००० पौंडाचा आहे असें कल्पूं. आतां ब्रिटीश अमलांतील आमच्या वीसकोट लोकसंख्येस हा वांटून दिला असतां एकएकाच्या वांट्यास अवघा तीन शिलिंगाचा आला! आतां या व्यापाराच्या संबंधानें आमच्या ब्रिटीश सरकारच्या सामराज्यांतील इतर मुलखांशीं आमची तुलना करून पाहूं.

| मुलखाचें नांव | दर माणसीं निव्वळ निर्गत व्यापाराचें मान. | |
|---|---|---|
| | शि. | पै. |
| ग्रेटब्रिटन व आयर्लंड | १४९ | ४ |
| ऑस्ट्रेलिया (सोन्यासह) | २७१ | ० |
| इटली | २८ | ८ |
| केप ऑफ गुडहोप (रत्नाशिवाय) | ३५ | ७ |
| उत्तर अमेरिकेंतल्या वसाहती | ७० | ५ |
| वेस्ट इन्डिया बेटें | ७५ | ४ |
| ब्रिटीश हिंदुस्थान | ३ | ० |

ही वरील कोष्टकांतलीं तुलना १८८५ सालातली आहे. आज म्हणजे हींत फारसा फरक झालेला आहे असें नाहीं. ह्या तुलनेवरून पाहता, आमचा निर्गत व्यापार वरवरून जो एवढा अगडबंब दिसत आहे, व जो पाहून सामान्य लोकांस समाधान वाटतें व धूर्त मुत्सद्यांस फुशारकी मिरविण्यास जागा होते, त्याचें वास्तविक रूप किती भिकार आहे तें कळून येईल. अशी खरीखुरी स्थिति असतां जे कोणी हा आमचा वाढणारा व्यापार आमच्या उत्कर्षाचें द्योतक आहे म्हणतात, त्यांच्या अज्ञानास किंवा धट्टपणास काय म्हणावें तें आह्मांला सुचत नाहीं.

येथवर जी ही परकीयांची आमच्याशीं चाललेली प्रत्यक्षाप्रत्यक्ष चढाओढ सांगितली, तिच्या योगें आमच्या लोकांचे धंदे एकामागूनएक जात जाऊन, पुष्कळ लोक बिनरोजगारी होऊन शेतकीसारखे जे कित्येक धंदे थोडासा तग धरून राहिले आहेत, त्यांत त्यांची गर्दी होत आहे. म्हणून त्याही धंद्यांची अगदीं भिकारस्थिति झाली आहे. असा अंदाज आहे कीं, निदान नाहींतरी दोन सव्वा दोन कोट तरणेताठे लोक कांहीतरी धंदा नाहीं म्हणून केवळ आळशी होऊन देशांत इकडून तिकडे हिंडत आहेत. आमच्या इकडे निरुद्योगी लोकांचा भरणा जितका आहे, तितका इतर कोठेंही नसेल. दर माणसामागें दर वर्षास ४० रुपये देशांत उत्पन्न होतें असें कल्पिलें तर, वरील आळशांच्या संख्येच्या मानानें प्रतिवर्षी ऐशी नव्वद कोट रुपयांचें म्हणजे सरासरी देशाच्या एकंदर वसुलाइतकें नुकसान होत आहे. सारांश, आमची स्थिति अत्यंत भयंकर झाली आहे; आणि विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, ही आमची कष्टदशा उत्तरोत्तर वाढतच चालली आहे. असें असतां तिच्या परिहारार्थ किंवा शमनार्थ प्रयत्न करण्याचें आमच्या लोकांच्या किंवा सरकारच्या मनांत फारसें येऊं नये हें अत्यंत खेदजनक होय.

***

# ७ आमच्या निकृष्टावस्थेचीं वास्तविक कारणें

(सुबोधपत्रिका, ५-४-१८९१)

मागल्या दोन अंकांत वर्णिलेल्या चढाओढीच्या पायीं आमचें भांडवल व पत हीं अगदीं कमी होत चाललीं आहेत. हीं कमी होण्याची आणखीं कांहीं कारणें येथें सांगतों.

(१) पहिलें कारण म्हटलें म्हणजे, इकडून प्रतिवर्षी इंग्लंडांत द्रव्य जातें हे होय. ह्या वर्षी फक्त इन्डिया ऑफिसच्या खर्चाकरितांच जे द्रव्य इंग्लंडास अनेक रूपांनी गेलें, ते हिंदुस्थानच्या एकंदर जमीनमहसुलाइतकें होते. शिवाय पांच कोट तीस लक्ष रुपये इतर बाबींबद्दल गेले. ही तिकडे जाणारी रक्कम एकसारखी वाढतच चालली आहे. गेल्या चौतीस वर्षात ही रक्कम शेंकडा १५०० टक्के वाढली आहे. म्हणजे १८३५ साली ही रक्कम वीस लक्ष पौंड होती. ती वाढता वाढता १८८९ साली तीन कोटी पौंडावर जाऊन पोचली! असा हा धनाचा वर्धमान लोट एकसारख्या परमुलखांत गेल्यानें इंग्लंडासारखा देशसुद्धां लवकरच भिकेस लागेल, मग आमच्या देशाचा काय पाड! तेव्हां ह्या स्थितींमध्ये कांहीं फेरबदल केल्यावांचून आमची धडगत दिसत नाहीं. आणि ही स्थिति अशीच चालूं दिल्यास असह्य दुःखें, अनिवार्य संकटें व घोर यातना यांची चोहोंकडे वृद्धि होईल.

येथें ही एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ही जी एवढी मोठी रक्कम परदेशीं चालली आहे, तिचे देशाच्या एकंदर कच्च्या उत्पन्नाशीं किती प्रमाण आहे ते पाहून उपयोग नाहीं; तर जिचें एकंदर राष्ट्राच्या चरितार्थादिकांचा खर्चवेच वजा जाऊन राहिलेल्या निक्या उत्पन्नाशीं केवढें प्रमाण आहे तें पाहिलें पाहिजे. सध्यां हे प्रमाण एकतृतीयांशाचे आहे. म्हणजे आमच्या एकंदर राष्ट्रांच्या निक्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा परमुलखीं चालला आहे. अशा स्थितींत आमचे भांडवल काढावें तें कसें? आणि भांडवल वाढलें नाहीं, तर धनोत्पादक धंदे वाढण्याचीं आशा कोठून? त्यांतून आणखी आमच्या इकडे सरकारनें मोठमोठालीं लौकिक कामें उठविण्याचा जो फाजील प्रकार सुरू केला आहे, व लष्कराच्या संबंधानें जे फेरफार ते करीत आहे, त्यामुळें व

वटावाच्या दरामुळें ही परदेशी जाणारी रक्कम झपाझप वाढतच चालली आहे. अशा ह्या आधींच कमी भांडवलाच्या देशांत मोठमोठाल्या रकमा परदेशांतून कर्जी काढून आणून तूर्तला बहुतेक अनुत्पादक कामें उभीं करणे हे ह्या देशाचें निव्वळ दिवाळेंच काढणें होय. कारण, अशानें देशांतला बराच संग्रह इकडे खर्ची पडून उत्पादक धंद्यांतलें भांडवल वाढत नाहीं.

(२) दुसरें कारण, आमच्या इकडे दुष्काळ पूर्वीच्यापेक्षां वारंवार पळून मनुष्यांचा नाश होत आहे, हें होय. फक्त १८६० पासून १८७८ पर्यंत १६ दुष्काळ पडून एक कोटी तीन लक्ष माणसें मेली असें सरकारी रिपोर्टावरून कळतें. पण वास्तविक पाहतां ही मृत्यूंची संख्या याहूनही पुष्कळ जास्त असावी. कारण रिपोर्ट तयार करणारांच्या हातीं सर्वच गांवांची माहिती योग्य वेळीं पडत नसते; किंवा ती मिळविण्याची मेहनत करणें त्यांस नको असतें. याला एकच मद्रास इलाख्याचें उदाहरण दिल्यास पुरें होईल. बेलरी प्रांतांत १८८५ मध्ये दुष्काळ पडून सुमारें दहा हजार माणसें शेजारील निजाम सरकारच्या संस्थानांत जाऊन राहिलीं. हें वर्तमान तेव्हांचें गव्हर्नर सर ग्रांट डफ यांस मिळालें, तेव्हां त्यांनीं तो प्रांत मद्रासेहून चोवीस तासांत जाऊन पोंचण्याइतका जवळ असतां, तिकडे जाण्याचे मनावर न घेतां, हिंदुस्थान सरकारास तारा करून, पुढें काय करावें तें विचारून, त्याप्रमाणें हुकूम सोडून खासास्वारीनें चैनीखातर पांदेचरीला समुद्रप्रयाण केलें! त्याचप्रमाणे दीड दोन वर्षापूर्वी गंजम येथें दुष्काळ पडून सुमारें वीस हजार माणसें मेली असतां लॉर्ड क्रॉसला या संबंधानें पुनः पुन : प्रश्न केले तेव्हां कोठें लॉर्ड कॉनिमेरा त्या प्रांतांत जातीनें जाऊन योग्य उपाय योजतात! एकंदरांत काय कीं, आमच्या इकडे किती जरी दुःख व भयंकर स्थिति असली, तरी तिचे इकडे आलेल्या इंग्रज अंमलदारांस फारसे कांहीं वाटतच नाहीं. इतकेंच नव्हे तर, आणखी दुःखावर डाग असा देतात की, इकडें चोहोंकडे आबादानीच आहे असें पुस्तकादिकांच्या द्वारे प्रतिपादितात.

(३) तिसरे कारण, भांडवलाच्या कमताईचें कारण, आमचा संग्रह अगदीं निकृष्टप्रतीचा आहे हें होय. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी व युनाइटेडस्टेटस् या चार देशांत मिळून आमच्या एकट्या देशांतल्या इतकी लोकसंख्या असून त्या चारही देशांचा संग्रह एकत्र केला असतां ५४,४०,००,००० पौंड होतो. तोच आमच्या देशाचा अवघा ३७,५०,००० पौंड आहे. म्हणजे त्या चारही देशांतील लोकसंख्या एकवट करून तीस वरील संग्रह वाटून दिला असतां एकाएकाच्या वाट्यास दोन पौंड, चौदा शिलिंग व चार पेन्स येतात, आणि आमच्या इकडील एका एकाच्या वांट्यास अवघे साडेचार पेन्स येतात.

(४) आतां आम्हावर कराचें ओझें किती जबर आहे तें पाहा. आमचें कच्चें उत्पन्न वर्षास पांच अब्ज चाळीस कोट असून, अगदी अवश्यक खर्च म्हटला म्हणजे चार अब्ज पचास कोट रुपये आहे. हा खर्च वजा जातां आमचे नक्की उत्पन्न नव्वद कोटी रुपये होतें. यांतून पन्नास कोट रुपये सरकारास वसुलादाखल द्यावें लागतात. बाकी उरलेल्या चाळीस कोटींतून निम्मे रक्कम दुष्काळांत झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यास जाते. आणि बाकी उरलेल्या रकमेंतून सरासरी पंधरा कोट रुपये गुराढोरांच्या व शेतकीच्या वगैरे आउतांच्या नुकसानीची भरपाई करण्यास जाऊन, शेवटीं अवघे पांच कोट रुपये राहिले. ह्या रकमेचीं हल्लीच्या वटावाच्या दराप्रमाणें अवघी ३७,५०,००० पौंड किंमत झाली. आतां ह्या संबंधानें आमच्या राज्यकर्त्यांच्या युरोपांतील राज्याची आमच्याशीं तुलना करून पाहूं. त्यांना दरसाल- ८,८०,००००० पौंड सरकार देणें द्यावे लागून त्यांच्या संग्रहास १५,४०,००००० पौंड राहतात; आणि आम्हांस दरसाल ५,००,००,००० पौंड सरकार देणें द्यावें लागून आमच्या संग्रहास अवघें ३७,५०,००० पौंड राहतात. हा उभय देशांचा संग्रह सर्कस सारखा वांटून दिल्यास, ग्रेटब्रिटनांतील प्रत्येक मनुष्याच्या वांट्यास ४ पौं. ३ शि. २।। पे. येतात. आणि आमच्या इकडील प्रत्येकाच्या वांट्यास ४।। पेन्स येतात! या तुलनेवरून पहातां आमचें करांचे ओझें किती जबर आहे, तें नीट लक्षांत येईल. आमच्या इकडील शेंकडो हजारों कुटुंबास संग्रह कसला तो बिलकूल ठाऊक नसतो. मुळीं पोटाची खळगी भरण्याचीच पंचाईत, तेथें संग्रह कसला! आमच्या इकडे थोडा बहुत संग्रह करणारे म्हटले म्हणजे मोठमोठे जमिनदार, मोठमोठे सरकारी नोकर, वकिली, वैद्यगिरी, वगैरे करणारे लोक, मोठमोठे कारखानदार, परदेशाशीं व्यापार करणारे लोक, व्याजबट्टा करणारे पेढीवाले वगैरे लोक आणि मोठमोठे उदमी लोक हे होत.

अशी आमच्या एकंदर देशाची स्थिति असल्यामुळें आमची पत अगदीं कमी झालेली आहे. आम्हांस कोणत्याही धंद्यास भांडवल हवें म्हटल्यास मिळण्याची पंचाइत पडते. या प्रकरणीं सरकारास आम्हांस मदत करतां येण्यारखी आहे. पण ती करण्याचा त्यांचा मानस दिसत नाहीं. सर वुइलियम वेडर्बर्नसाहेबांनी शेतकऱ्यांसाठी पेढ्या घालण्याविषयीं सरकारास सूचना केली होती. पण ती अमलांत आणण्यासाठीं ५०,००० पौंड खर्च करण्याचें आमच्या सरकारच्या जीवावर आलें; आणि ब्रम्हदेश काबीज करण्यास एक कोट पौंडाची राखरांगोळी करण्यास व वायव्यकडील सरहद्दींत चार कोट पौंड गाडून टाकण्यास त्यास कांहींच दिक्कत वाटली नाहीं!

***

# ८ आमचें करांचें ओझें

(सुबोधपत्रिका १९-४-१८९१)

आमच्या वतीनें इंग्लडांत खटपट करणारे प्रसिद्ध मि. डिग्बी साहेब यांनी हिंदु पेट्रिअट व इतर एतद्देशीय वर्तमानपत्रांत नुकतेच एक पत्र लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं हिंदुस्थान सरकारचे सध्याचे फडनवीस सर डेविड् बार्बर यांच्या दहा वर्षां पूर्वीच्या एका न छापलेल्या लेखाचा आधार घेऊन, काहीं आंकडे देऊन आमच्या स्थितीचा पराकाष्ठेचा निकृष्टपणा दाखविला आहे. त्यांतील कांहीं माहिती आमच्या वाचकांना दिली असतां, काही आठवड्यांपूर्वी आमच्या एतद्विषयक लेखातील माहितींत भर पडेल असें वाटतें म्हणून हे पुढील आंकडे स्वदेशस्थितिजनाज्ञसुजन न कंटाळता मनःपूर्वक वाचतील अशी उमेद आहे.

आमचें एकंदर शेतकीचें उत्पन्न सरासरी तीन अब्ज पस्तीस कोटी रुपयांचें असून त्यांत आणखी सर डेविडांच्या मताप्रमाणें त्याच्या निम्या इतकें अवांतर जातीचे उत्पन्न मिळविलें असतां, आमचें एकंदर उत्पन्न पांच अब्ज पंचवीस कोटी रुपयांचें झालें. ते सुमारें वीस कोट प्रजेस वाटून दिलें असतां दर एकाच्या वांट्यास सरासरीनें २७ रुपये आले. आतां वर जें शेतकीचें उत्पन्न सांगितलें, त्यांतून त्या उत्पन्नास लागणारा खर्च वजा केलेला नाहीं. तो खर्च सदर्हू फडनवीसांच्या मतें दूध तूप वगैरे इतर किरकोळ पदार्थाच्या उत्पन्नातून भागण्यासारखा आहे. ह्या सर्वात शेतकीस लागणारे बीं, आउतें, गुरे वगैरेचा समावेश त्यांनीं केला असेलसें वाटत नाहीं. केला असल्यास त्यांची हिशोब करण्याची शिस्त कांहीं तरी चमत्कारिक असावी. ह्या उत्पन्नांतून दर माणशीं सरासरी ३२.८४ आणे सरकार देणें द्यावें लागत आहे. ह्या सरकार देण्याचें निरनिराळ्या प्रांतांतलें शेंकडा प्रमाण पुढील कोष्टकांतल्या प्रमाणें आहे:-

| इलाखा अथवा प्रांत | कच्चे उत्पन्न | सरकार देणें | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| पंजाब | ३४१५००००० | ४७४३३९००० | १३-८ |
| वायव्येकडील प्रांत व अयोध्या | ७१७५००००० | ११२७६०००० | १५-७ |
| बंगाल | १०३५००००० | १४३१३६००० | १३-८ |
| मध्यप्रांत | २१२५००००० | १६१४००० | ७-६ |
| मुंबई | ३९००००००० | ४१४५७००० | १०-६ |
| मद्रास | ५०००००००० | ७६४४६००० | १५-३ |

या कोष्टकावरून पाहतां शेंकडा सरासरी तेरा टक्के सरकारे देणें आहे, असें स्पष्ट होतें. आतां हा कर देण्याचा मगदूर आम्हांमध्यें कितपत आहे तें नीटपणें कळण्यासाठीं निरनिराळ्या प्रांतांतील लोकांचें दर माणशीं कच्चें उत्पन्न किती आहे तें पाहूं:-

| प्रात किंवा इलाखा | दर माणशी उत्पन्न रु. आ. पै |
|---|---|
| मध्यप्रांत | ३०-८-० |
| मुंबई | ३०-५-४ |
| मद्रास | २६-०-० |
| पंजाब | २५-८-० |
| बंगाल | २२-८-० |
| वायव्येकडील प्रांत व अयोध्या | २२-३-४ |

हे उत्पन्नाचें मान वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें शेतकीच्या उत्पन्नाच्या अर्ध्यानें अवांतर उत्पन्न आहे असें गृहीत धरून काढलें आहे. ह्या प्रत्येक प्रांताच्या उत्पन्नाशीं सर्व देशाचें सरासरीं उत्पन्न जें सत्तावीस रुपये, तें ताडून पाहातां मध्यप्रांत व मुंबई खेरीज करून इतर मुलुखांचें उत्पन्न त्याहूनही कमी आहे असें दिसते. हें आंकडे जर खरे असतील तर फक्त मुंबई इलाख्यांतील व मध्यप्रांतांतील मिळून सरासरी काय ती २ कोटी ७० लक्ष लोकसंख्या इतरांच्या मानानें साधारणपणें चांगल्या स्थितींत असून,

बाकीच्या प्रांतांतली एकंदर सोळा कोट दहा लाख प्रजा निकृष्ट स्थितीमध्यें आहे. मागें एकदा आम्हीं सर्व देशाची सरासरी २७ रुपये धरून जो हिशोब केला होता, तो प्रत्येक माणसास लष्करांतल्या हमालगिरी वगैरे करणाऱ्या माणसांस मिळतें तितकें (म्हणजे– रु. २२.५) खावयास पुरे होईल असें कल्पून केला होता. पण वर दिललें निरनिराळ्या प्रांतांतील उत्पन्नाचें मान जर खरें असेल, तर बंगाल इलाखा व वायव्येकडील प्रांत आणि अयोध्या येथील एकंदरीनें सरासरी अकरा कोट लोकांस नुसत्या खाण्यापलीकडे कांहींएक मिळत नाहीं असे सिद्ध होतें. मग जेथें ह्या प्रकारचीं मुळीं कच्च्या उत्पन्नाचीच स्थिति, तेथें आणखी शेंकडा तेरा–चौदा टक्के कर दिल्यावर मग काय विचारतां! तेव्हां तात्पर्य काय कीं, हे आमच्या सध्याच्या फडनविसांनीं दिलेले आंकडे खरे असतील, तर आमच्या देशाची खरोखरीच अत्यंत भयंकर स्थिति आहे. पण आमचें दयाळू सरकार ही स्थिति जाणत नाहीं काय? जाणत असूनही ती सुधारण्याविषयीं कांहीं यत्न करण्याचें त्यांच्या मनांत येत नाहीं याचे कारण काय बरे? एकतर ही माहिती चुकीची असल्यामुळें सरकारास ती विश्वसनीय वाटत नाहीं. पण ही माहिती त्यांच्याच एका मोठ्या अंमलदारानें मिळविली असतांही ती त्यास खोटीच वाटत असेल, तर खरी माहिती मिळविण्याविषयीं सरकारनें कां प्रयत्न करूं नये? आमच्या सध्याच्या फडनविसांस आपली दहा वर्षांपूर्वी मिळविलेली माहिती चुकीची आहे असें वाटत असल्यास आता पुनः एकदा नीट शोध करून काय खरी असेल ती माहिती सर्व लोकांस कळेल अशा रीतीनें प्रसिद्ध करण्याविषयीं त्यांनीं मनावर घेतल्यास लोकांचा विनाकारण गैरसमज होणार नाहीं; किंवा त्यांनी अशा प्रकारची माहिती अगोदरच मिळवून ठेविली असल्यास ती जगजाहीर करावी म्हणजे बरें होईल. आतां माहिती खरी असूनही सरकार तिजकडे जाणून बुजून कानाडोळा करीत असेल, तर अशी बेपरवाई आमच्या दयाळू प्रजाजनहितैषी सरकाराकडून होईलसें वाटत नाहीं. परंतु ह्या देशांतील लोकांची वास्तविक हालहवाल नीटपणें समजावून घेण्याविषयीं सरकारची अनास्था पूर्णपणें व्यक्त होते. कारण दादाभाई सारख्यांनी कांहीं वर्षीपूर्वी आमच्या गरिबीविषयीं लेख लिहून प्रसिद्ध केले असून व गतसाली पुणें सार्वजनिक सभेनें आपल्या त्रैमासिकांत व यंदा मि. डिगबी साहेबांनीं पार्लमेंन्ट सभेच्या सभासदांस एक भलेमोठे अनावृत पत्र लिहून आमच्या दीन स्थितीची पुनः पुनः सुनावणी केली असतां, आमचें सरकार अजून बेदरकार आहे. यांतला काय हेतु असेल तो असो. पण जो जो स्वदेशहितैषी पुरुष ही त्यांची माहिती वाचील त्याचें अंतःकरण सचिंत झाल्यावांचून राहणार नाहीं.

***

# ९ दौलतीचा योग्य उपयोग

(सुबोधपत्रिका २६-४-१८९१.)

सुधारणेचें एक मुख्य लक्षण असें आहे कीं, कोणत्याही निवक्षित लोकसमुहातील बहुतेक व्यक्ति सुखी होऊन तेथील संपत्तीच्या वांटणीची असमता उत्तरोत्तर कमी कमी होत जावी, हे संपत्तीचें वैषम्य सुधारलेल्या जगांतून हळूहळू कमी होत चाललें आहे. युरोपातील बरेच देश व अमेरिकेतली स्वतंत्र संस्थानें यामध्यें हा इष्ट प्रकार पुष्कळ दृष्टीस पडत आहे. परंतु तिकडे अजून लक्षाधीश व कोट्यधीश बरेच आहेत; आणि ते असणें अपरिहार्यही आहे. कारण त्यांच्या इकडे नानाप्रकाचे मोठमोठे धनोत्पादक कारखानें पदार्थविज्ञानादि शास्त्रांच्या बळावर चालून, उत्पन्न झालेल्या मालाचा विक्रय होऊन त्यांत पुष्कळ किफायत होत आहे. पण ज्या देशांत किंवा प्रांतांत त्यांच्या ह्या मालाचा खप होत आहे, तेथले लोक स्वदेशांत होण्यासारखे कारखाने उभे करून शास्त्रीय ज्ञानाची मदत घेऊन धनोत्पादन करूं लागले म्हणजे त्यांची गिऱ्हाइकी खुंटून त्यांच्या धनाढ्यतेस ओहोट लागण्याचा संभव आहे. हा काल केव्हां येईल तो येवो. पण सध्यां तरी पाश्चात्यांची विद्यादिकांप्रमाणें धनोढ्यतेच्याही संबंधानें इतर राष्ट्रांवर सरशी आहे. अमेरिकेतील प्रसिद्ध कोट्याधीश ॲन्ड्र्यू कार्नेगी यानें गेल्या महीन्याच्या ''नाइन्टिन्थ सेंचरी'' नामक विलायतेत निघणाऱ्या मासिक पुस्तकामध्यें जो एक लेख दिला आहे, त्यांत तो असे म्हणतो कीं, सगळ्या आशिआ खंडांत एकही कोट्याधीश नाही; सगळ्या रशियामध्यें एक दोन, जर्मनीमध्यें दोन तीन आणि फ्रान्सांत चार पांच असतील; परंतु सगळ्या युरोपखंडांत जितके आहेत त्यांच्याहून जास्त एकट्या ग्रेटब्रिटनांत आहेत; आणि अमेरिकेतील स्वतंत्र संस्थानांत ब्रिटनांतल्याहून जास्त आहेत. आतां सामान्य लोकांचा असा समज असतो कीं, ज्या मानानें एका विशेष व्यक्तीकडे द्रव्याचा संचय अधिकाधिक होत जातो, त्या मानानें इतर लोक अधिकाधिक गरीब होत जातात. पण ही निव्वळ भ्रांति आहे असें सुधारलेल्या जगाच्या अनुभवावरून दिसून येतें. उदाहरणार्थ, आपण अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानाची सध्यांची स्थिति

पाहूं. वर सांगितल्याप्रमाणें त्या संस्थानांत सर्वात जास्त कोट्याधीश असूनही एकंदर लोकसंख्येची स्थिती इतर बहुतेक देशांतल्यापेक्षा चांगली आहे, ती कशी तीं पहा. गत सालच्या त्या देशांतील कांहीं प्रांताच्या (ह्या प्रांतात सर्वात जास्त कोट्याधीश आहेत) रिपोर्टावरून असें कळतें कीं, त्यांत सुमारें पावणेदोन कोट लोकसंख्या असून सरकारी ब्यांकेंत लोकांनीं एकंदर दोन अब्ज पंचावन्न कोटी रुपये ठेवले. ठेवणारांची संख्या ३५,२०,००० होती. म्हणजे स्त्रिया, पुरुष आणि मुलें मिळून पांच पांच जणांचें एक एक कुटुंब होतें असें घेतले तर, प्रत्येक कुटुंबानें ब्यांकेंत कांहींना कांहींतरी ठेवलें आहे असें होतें. आतां सर्वचजण केवळ सरकारी ब्यांकेतच आपल्या वित्ताचा संग्रह करितात असें नाही; दुसऱ्या अनेक प्रकारे ते त्याचा विनियोग करितात. त्याचप्रमाणें त्या देशात भिकाऱ्यांचीही संख्या अगदी कमी आहे. १८८० सालच्या खानेसुमारीवरून असें कळते कीं, सगळ्या स्वतंत्र संस्थानांच्या पांच कोट लोकसंख्येत अवघे ८८६६५ भिकारी निरनिराळ्या संस्थानांतून प्रसिद्धपणें पोसले जात होते. तेच एकट्या लंडनामध्यें पांच लाख होते. हे बहुतेक लंगडे, पांगळे, आंधळे, व वार्धक्यादि कारणांनीं दुर्बळ झालेले असून त्यांतले सुमारें तिसरा हिस्सा परदेशस्थ होते. तेथें एकंदर पराश्रीतांचें प्रमाण हजारांत पांच आहे. पण तेंच ग्रेटब्रिटनांत हजारांत तेहतीस आहे. ह्यावरून पाहातां मोठमोठे धनाढ्य लोक देशांत फार असलें म्हणजे तेथें संपत्तीचें वैषम्य फार असावयाचें असा जो कित्येकांचा समज आहे, तो चुकीचा आहे. परंतु बहुतेक लोकांनीं कमीजास्त गरिबींत असतां दहापांच लोकानी मोठ्या ऐश्वर्याचा उपभोग घ्यावा, हें कांहीं रास्त नव्हे. त्यांच्याजवळ जो संग्रह होतो, तो ज्या देशांत ते वास करितात त्या देशाच्या एकंदर स्थितिमानाची अनुकूलता असते म्हणून होतो. ह्यास्तव त्यांच्याजवळच्या पैक्यावर त्या देशांतल्या लोकांचा हक्क आहे. त्यांनीं त्याचा हवा तसा उपयोग करून चालावयाचें नाही. असें आहे तरी, सरकारास त्यांच्या स्वातंत्र्याचा व स्वधनव्ययाच्या मुक्त्यारीचा अपहार करितां येत नाहीं. तर हा विचार धनाढ्य पुरुषांच्या मनावर चांगला बिंबेल असें इतर योग्य उपायांनी करणें अगत्याचें आहे. वर सांगितलेल्या ॲन्ड्रयू कार्नेगी नामक अमेरिकेंतल्या एका कोट्यधीशानें तिकडील मासिक पुस्तकांतून लेख लिहून असें प्रतिपादिले आहे कीं, प्रत्येक धनाढ्य पुरुषानें आपल्या संपत्तीचा जरूर असेल तेवढा अंश पुत्रपौत्रादि स्वकीय जनांच्या निर्वाहास राखून ठेवून बाकीचा सगळा आपल्या हयातीतच लोकोपयोगी कामात खर्चून टाकावा; हल्लीं जी श्रीमंत मनुष्यांची सर्व संपत्ति आपल्या वारसांस वगैरे राखून ठेवण्याची चाल आहे, ती बहुतप्रकारें अनिष्टकारक आहे. तिच्या योगानें त्याच्या ह्या कष्टप्राप्त संपत्तीचा

लाभ ज्याला होतो, त्याला स्वतःचा योगक्षेम चालविण्याची यातायात न पडून त्याच्या निरनिराळ्या मानसिक व शारीरिक शक्ति मुळींच विकास पावत नाहींत. इतकेंच नव्हे तर, अनायासें प्राप्त झालेल्या दौलतीची अविचाराने दुर्वासनादिकांच्या नादी लागून उधळपट्टी करून अल्पावकाशांत ते कफल्लक होऊन जातात. येणें करून देशांतील संपत्तीचा ऱ्हास होऊन लोक बेवकूब होतात. तेव्हां ह्या अनिष्ट प्रकाराचें निवारण अवश्य झालें पाहिजे, आणि तें करणें श्रीमंत मनुष्यांच्या हातीं आहे. आपण जसे जिवापाड कष्ट करून व नाना दुःखें व संकटे यांस न जुमानतां धनार्जन करून नावलौकिक मिळविला, तसेंच आपल्या संततीनें करावें असे ज्यांस वाटत असेल, त्यांनी तिच्या हातीं आयती दौलत सहसा देतां कामा नये. तर तिचें उपजीवन व योग्य प्रकारचें शिक्षण हीं होण्यापुरता धनांश राखून ठेवून बाकीच्याची विल्हेवाट आपच्या डोळ्यांदेखत करून टाकावी. इतकेंच नव्हे तर, आपला स्वतःचा व आपच्या आप्तजनांचा उदरनिर्वाहाचा वगैरे खर्च फारच बेताचा असावा. अनावश्यक ऐष आरामांत वगैरे आपल्या दौलतीचा नाश सहसा करूं नये. असा एकंदर वर सांगितलेल्या अमेरिकावासी कोट्याधीशाच्या म्हणण्याचा सारांश आहे; आणि त्याप्रमाणें वागण्यास तो उदारात्मा तयार आहे. पण त्याच्यासारखा स्वधनाचा विनियोग करण्यास तयार होणारे विरळा. यास्तव मि. ग्लॅडस्टन यांनी त्यास असा उपाय सुचविला आहे कीं, ह्या प्रकारें वर्तन करण्यास कोण कोण महात्मे राजी आहेत ते पाहून त्यांची एक मंडळी करावी; म्हणजे इतर कांहीं श्रीमंत लोकांच्या तरी मनांत ह्या अत्यंत औदार्याच्या व लोकहितवर्धक धनव्ययाच्या पद्धतीचे अवलंबन करण्याचें येईल; आणि अशानें संपत्तीचें वैषम्य हळू हळू नाहीसें होऊन खरी सुधारणा लोकांत नांदूं लागेल.

हा एवढा मजकूर आम्ही आज लिहिण्याचे कारण इतकेंच कीं, तिकडे एक एक जगदुपकारी महात्मे कसे निर्माण होत आहेत तें ऐकिलें म्हणजे आमच्या इकडील बहुतेक कमी जास्त श्रीमंत मनुष्यांचें एकसारखें स्वधनवर्धनाकडेच व असें वाढलेलें धन आपल्या संततीत राखून ठेवण्याकडेच कसें सर्वस्वी लक्ष्य असतें तें मनांत आणून आमच्या लोकांस आत्मपरतेनें किती घेरलें आहे तें आमच्या वाचकांच्या लक्षांत यावें. आमच्या इकडे दत्तक घेण्याची चाल किती लाजीरवाणी आहे हे ही वरील निरूपणावरून चांगले ध्यानांत येईल. कारण पाहा कीं त्यांच्या तिकडे स्वसंततीसही निर्वाहास वगैरे आवश्यक तेवढ्या संपत्तीखेरीज जास्त मागें ठेवणे वाजवी नव्हे असे विचार चालले असतां आमचे कित्येक श्रीमंत लोक स्वतःस मुलबाळ कांहीं नसलें तर

दुसऱ्या कोणाचे तरी मूल दत्तक घेऊन त्याच्या गळ्यांत आपल्या सर्व वित्ताचें लोढणें अडकवून देतात. मग त्या पोरानें आपल्या दत्तकबापाच्या मागून लवकरच सर्व संपत्तीचा सप्पा उडवून धुळीचे दिवे लावावे. यांत काय अर्थ आहे तें कळत नाहीं. हा असा स्वसंपादित वित्ताचा नाश न करितां आमचे निसंतान श्रीमंत गृहस्थ त्याचा विनियोग लोकोपयोगी कामांत करतील तर त्याची अक्षय कीर्ति होऊन ज्या जनसमूहात राहून त्यांनीं ते वित्तार्जन केलें त्यांच्या ऋणांतून ते मुक्त होतील. ही शिफारस आमची तूर्त निपुत्रिक श्रीमंतांस आहे, आमच्या इतर श्रीमंत गृहस्थांच्या मनांत हे वरील कार्नेगी साहेबांचे उदात्त विचार ठसण्यास म्हणून पुष्कळ काळ लोटला पाहिजे.

***

# १० राष्ट्ररक्षक मंडळीची आवश्यकता

(सुबोधपत्रिका ३-५-१८९१)

आम्ही आमच्या मागल्या कित्येक अंकांत आमची औद्योगिक स्थिति कशी काय आहे तें संक्षेपेंकरून सांगितलें आहे. तिचे भयंकर स्वरूप ज्यांच्या लक्षांत आलें असेल, त्यांच्या मनांत ह्या दुःस्थितीचें निवारण करण्याविषयीं अनेक विचार आले असतील. '**इन्डिया**' नामक मासिकाच्या एप्रिलच्या अंकांत आमच्या देशाच्या एका कनवाळू गृहस्थाचें पत्र छापले आहे. त्यांत आमच्या औद्योगिक दुर्दशेशिवाय इतर जीं कांहीं दुःखें सरकारी वगैरे अंमलदारांच्या स्वकर्तव्यपराङ्मुखतेमुळें किंवा अन्यायाचरणामुळें दीन भाबड्या रयतेस निरुपाय होऊन नेहमीं निमुटपणें सोसावी लागत आहेत, त्यांचा थोडक्यांत पण अत्यंत हृदयद्रावक रीतीनें उल्लेख करून त्यांच्या परिहाराचा एक उपाय त्यानें सुचविला आहे. तो उपाय हाच कीं, आमच्या देशास सुस्थिति प्राप्त व्हावी असें ज्यांच्या मनांत फार अवगत असेल, त्या सर्वांची एक जूट होऊन तिला (National Defence League) ''राष्ट्ररक्षक मंडळी'' हें नांव द्यावे. ह्या मंडळीचीं कर्तव्यें पुढीलप्रमाणें असावीं :-

(१) हिंदुस्थानवासी लोकांच्या हिताचे जे अनेक प्रकार आहेत त्यांचें जपून रक्षण करावें; आणि त्यांला लागेल ती मदत द्यावी.

(२) शांति व स्वातंत्र्य यांची ज्याला आवड आहे, अशा प्रत्येक हिंदुस्थान देशहितचिंतकाचा ह्या मंडळींत समावेश व्हावा. परंतु विशेषतः जे वकील लोक सरकारी वगैरे कामदारांकडून दुःख पावलेल्या प्रजेस फुकट मसलत देण्यास तयार असतील अशांचा अंतर्भाव ह्या मंडळींत अवश्य झाला पाहिजे.

(३) अशा प्रकारें मंडळीस सामील झालेल्या वकिलांच्या नांवांची यादी ह्या देशांत चालणाऱ्या एकंदर भाषांत छापून सर्वांस मिळेशी करावी. म्हणजे प्रत्येक शहरामध्यें त्यांची सल्लामसलत रयतेला मिळण्याचा मार्ग होतां होईल तो सुगम व्हावा.

(४) ह्या मंडळीनें आपल्यातर्फे सर्वत्र मुकत्यार नेमावे. या मुक्त्यारांनी लोककल्याणास जपावें, लोकांस निरनिराळ्या उद्योगांत अवश्य लागणारें सहाय्य करावें; आणि त्यांच्या योग्य तक्रारीस देववेल तेवढी प्रसिद्धि देऊन, त्या योग्य अधिकाऱ्यांच्या कानी पडतील असें करावें.

(५) हिंदुस्थानवासी जनांच्या हक्कांचें रक्षण होण्यासाठीं व त्यांचे जे धनोत्पादक धंदे परस्थ उत्तरोत्तर बळकावीत चालले आहेत ते एतद्देशीयांच्या हाती राहतील असें करण्यासाठीं राष्ट्रीय फंडाची स्थापना करावी.

(६) ह्या देशांतील एकंदर उपलभ्य भौतीक संपत्तीचा धनोत्पादनाकडे उपयोग हरप्रयत्नानें करून दुर्भिक्षादिक अनिष्टांचा प्रतिकार करावा.

(७) मंडळीच्या पूर्वोक्त मुक्त्यारांनीं शेतकऱ्याचे व्याजबट्टा करणाऱ्या निर्घृण सावकारापासून रक्षण करून त्यास शेतकीच्या उत्कृष्ट साधनांचे वगैरे ज्ञान करून द्यावें; आणि धनोत्यादक धंद्यांचा जम जुळता करून प्रत्येक कुणबावा करणाऱ्या हरएकाच्या ऐहिकसुखास साधारणपणें जपावें.

ही ह्या गृहस्थाची सूचना फार चांगली आहे. पण ती अमलांत यावी कशी, हा एक मोठा प्रश्न आहे. एकतर आधी आमच्या देशाचा विस्तार प्रचंड आहे. त्यांतून टपाल, वर्तमानपत्रे, सार्वत्रिक प्रसार पावत चाललेली इंग्रजी भाषा, राष्ट्रीय सभा इत्यादि ऐक्यवर्धक संस्थांच्या साहाय्यानें अशा प्रकारची मंडळी आम्हांस स्थापितां येणें सोपें आहे; तरी आमच्या बऱ्याच सुशिक्षित लोकांच्या ठायीं निस्सीम स्वदेशभक्ति, स्वदेशबांधवप्रीति, आत्मनिरपेक्षता, स्वहितत्यागक्षमता इत्यादि समाज-सुखवर्धक उदार वृत्तींचा विकास अद्यापि फारसा झालेला नाहीं. तेव्हां आपल्या पदरास खार लाऊन घेऊन स्वकष्टार्जित ज्ञानाचा व काळाचा परहितार्थ विनियोग करण्यास तयार होणारे वकील केवळ स्वदेशहितबुद्धीनें प्रेरित होत्साते दक्षतेनें व निरालस्यपणें सतत परिश्रम करणारे मुक्त्यार, व अशा राष्ट्रीन्नतीच्या उदार हेतूस द्रव्यद्वारा मदत करणारे महामनस्क धनिक, आमच्या ह्या सर्वप्रकारे हतभाग्य देशांत आज पैदा होण्याची आशा बहुतेक स्वप्नवत् आहे. परंतु असें आहे तरी, ह्या सुचनेचा विचार प्रत्येक प्रांतांतील सुशिक्षित गृहस्थांनीं अवश्य करून तूर्त आपापल्या प्रांतांत, जिल्ह्यांत किंवा तालुक्यांत ही सुचना कितपत अमलांत आणता येण्यासारखीं आहे तें पहावें. असा स्वदेश कल्याणहेतूच्या सिद्धीस स्वशक्त्यनुसार हातभार लावण्यास जे कोणीं उदारप्रकृति जन उद्युक्त होतील, त्यांच्या लहान लहान मंडळ्या आजमितीला झाल्यानें बराच कार्यभाग

होणार आहे. अशाप्रकारे प्रयत्न केल्याच्या पोटी एकंदर जन सुखवर्धनाशिवाय आणखी दोन इष्ट परिणाम होतील. एक असा कीं, अशा मंडळीच्या अस्तित्वानें लोकांत स्वदेशविषयक उपयुक्त ज्ञानाचा प्रसार व अभ्यास विशेष होऊन देशसेवा करण्याचें ज्या कोणाच्या मनांत येईल, त्याला येणेंकरून ती करण्यास मार्ग खुला होईल; आणि दुसरा परिणाम अर्थात हा कीं, आज जी आमच्या बहुतेक लोकांच्या हृदयांत अपरिमित आत्मपरता वास करीत आहे तिला थोडासा आळा पडून परहितपरतारूप अत्यंत इष्ट मनोवृत्तीचा थोडथोडा प्रादुर्भाव होऊं लागेल; आणि ह्याप्रमाणें अनभिज्ञत्वसूचक संकुचितपणाचा व अत्यंत गर्ह्य कार्पण्याचा कालेंकरून बराच ऱ्हास होऊन राष्ट्रोन्नतीसारख्या व्यापक व महत्वाच्या विषयाचा विचार करण्याची बुद्धि व तत्संपादक कार्यप्रवणता आमच्या लोकांच्या ठायीं येईल असें आम्हास वाटतें. आजला ह्या अत्यंत स्पृहणीय गुणांचा विकास आमच्या बड्या बड्या लोकाग्रणी म्हटलेल्या माणसांच्या हृदयांतही फारसा झालेला दिसत नाहीं. आमच्या कित्येक शिकलेल्या गृहस्थांच्या ठायीं ज्याप्रमाणानें वाक्पाटव आलें आहे त्याहून अत्यल्प प्रमाणाने तरी स्वप्रतिपादित उदार मतानुसार वर्ज्य करण्याची बुद्धि व प्रसंग आल्यास आपल्या अत्यंत मोठ्या हिताचीही परवा न करण्याचें धैर्य उत्पन्न झाल्यानें पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे; आणि हे देशोन्नतीस अत्यावश्यक गुण ज्या ज्या उपायांनी आम्हा हिंदुस्थानवासि जनांच्या हृदयात अंकुरित होण्याचा अल्पत्रात्र तरी संभव आहे, त्यांचें अभिनंदन करून त्यांचा अवलंब होईल तेवढा करण्यास झटण्याविषयीं स्वदेशबांधवास अत्याग्रहानें सांगण्यास आम्ही कसूर करणार नाहीं. अशाप्रकारे कर्तव्यवश होऊन आम्हीं जी वर आमच्या देशाच्या एका कनवाळू गृहस्थाची सूचना नमूद केली आहे, तिचा आमचे प्रिय महाराष्ट्रजन अवश्य विचार करतील अशी उमेद आहे.

ही सूचना त्यानें ह्या देशांतील विवेचनशील व व्यवहारकुशल पुरुषांच्या विचारासाठीं पुढे आणली आहे, तरी तिच्या योग्यायोग्यतेविषयीं चांगला उहापोह करण्यास आमचे स्वदेशहितैषीजन आळस करणार नाहींत असे आम्हास वाटतें.

***

# ११ अयोग्य कर कमी करण्याविषयीं आमच्या सरकारची नाराजी कां?

(सुबोधपत्रिका १०-५-१८९१)

ह्या प्रश्नाचे उत्तर उघडच आहे कीं, आमच्या सरकाराला योग्य प्रकारची काटकसर करण्याला नको असून, उलट एक एक खर्चाची बाब रयतेच्या डोकींवर लादण्यांस त्यांस कांहीं एक वाटत नाहीं. तेव्हां खर्चाची व उत्पन्नाची तोंडमिळवणी करण्याची नियंता त्यांस नेहमीं असल्यामुळें रयतेनें केवढीही हाकाटी केली व दूरदर्शी व निःपक्षपाती मुत्सद्यानीं कितीही कान उघाडणी केली, तरी तिकडे लक्ष देऊन जे कर रयतेच्या सुखास आड येणारे आहेत ते कमी करण्याची बुद्धि त्यांस होत नाहीं. यंदाच्या खर्चाच्या अंदाजात भागून थोडीशी शिल्लक दाखविली आहे. पण तिचा उपयोग मिठावरील कर जरा तरी कमी करण्याकडे करण्याचा सरकारचा तूर्त मानस नाहीं. याचे तरी कारण हेच दिसते कीं, न जाणो कोणत्या वेळी काय खर्चाचें कलम उपस्थित होईल, आणि पैशाची गरज लागेल. हीच गोष्ट प्राप्तीवरच्या कराची मर्यादा ५०० पासून १००० वर नेण्यांची आहे. ही सुचना राष्ट्रीय सभेनें वेळोवेळी केली असून ती तिच्या इतर सुचनाप्रमाणें सरकारनें अजून काना मागेंच टाकिली आहे. ह्याचप्रमाणें जमिनीचा सारा सर्वत्र कायम करून टाकण्याची त्या सभेची सुचनाही सरकाराला ह्याच कारणामुळें अमलांत आणता येत नाहीं. अशीच गोष्ट जकातीचीही आहे. देशांतल्या देशांत चालणारा व्यापार होईल तेवढा कमी खर्चानें झाल्यानें लोकांस निर्वाहाच्या चिजा स्वस्त मिळून विशेष सुखानुभव होतो. आमच्या देशासारख्या पराकाष्टेच्या कंगाल देशांत निर्वाहाच्या वस्तु जितक्या सवंग होतील तितके लोकांचे हाल कमी होणार आहेत. तर हा जकातीचा कर जितका कमी करवेल तितका कमी केला पाहिजे. लॉर्ड रिपन साहेबांच्या अमदानीत म्यानचेस्तरवाल्यांनी जबरदस्त उचल करून इकडे येणाऱ्या कापड वगैरे मालावरची डयुटी कमी केली ती न करितां जर देशांतील जकात काढून टाकली असती, तर ह्या देशाचें केवढें हित झाले असतें? पण हा थोरपणाचा विचार आमच्या राज्यकर्त्यांच्या मनांत यावा कसा? अशा स्थितीमध्ये

कांहींतरी दुसरा मार्ग आमच्या सरकारास सुचविण्यासारखा आहे किंवा कसें याचा विचार करूं.

आमच्या सरकारास हल्लीं जे उत्पन्न मिळत आहे. तितकें किंवा त्याहून अधिकही मिळून अहितकर करांचें ओझें रयतेच्या शिरावरचे कमी करण्याचा एक उपाय असा आहे कीं, ज्या कित्येक बाबींवर कर बसविला असतां फारसे नुकसान होणार नाही त्या बाबी सरकारच्या नजरेस आणून द्यावा. हें काम आमच्या देशाच्या हितचिंतकांनी वेळोवेळी केलें आहे. त्यांतून मि. इवँन्स साहेबाने गेल्यासाली वायव्येकडील प्रांताच्या एका कमिशनराला एक अनावृत पत्र पाठविलें होतें. त्यांत त्यानें ज्या कित्येक कर लागू करण्यासारख्या बाबी दाखवून दिल्या आहेत. त्यांचा अनुवाद येथें आमच्या वाचकांसाठीं करितो.

(१) त्या देशामध्यें तंबाकूचें व्यसन बहुतेक सार्वत्रिक होऊन त्याचा खप पुष्कळ होत आहे. ह्या तंबाकूबाज लोकांचें नफ्यापेक्षा नुकसान फार होत आहे. हा पदार्थ निर्वाहास अवश्य लागणाऱ्या चिजांपैकीं एक नसल्यामुळें त्याच्यावर थोडासा कर ठेवल्यास कांहीं हरकत नाही. मिठासारख्या अत्यावश्यक पदार्थावर जो सरकार कर लादून सुमारें आठ कोट रुपये उत्पन्न करीत आहे, तो उठवून ह्या तंबाखूवर तो बसविल्यास सरासरी तितकाच वसूल मिळून लोकांला त्रास थोडा पोचेल. इंग्लंडांत नुसत्या कस्टमांत तंबाकूवरील जकातीचे उत्पन्न नऊ कोट रुपयांचें आहे. आतां हे खरें कीं, तिकडच्या इतकी मोठी जकात आमच्या लोकांस देण्याचें सामर्थ्य नाहीं. परंतु आमच्या देशाचा विस्तार मोठा असून त्या मानानें तंबाखूचा खपही अधिक आहे. त्याकरिता अगदीं माफक जरी कर ठेवला, तरी पुष्कळ उत्पन्न होण्यासारखें आहे. गांजा, दारू, व अफू यांवर कर बसविण्यास जर सरकाराला कांहीं दिक्कत नाहीं, तर जवळ जवळ त्यांच्याच दरजाचा जो हा तंबाखू त्यावर कर बसविण्याविषयीं सरकारानें कां मागे पुढे करावे तें आम्हांस समजत नाही.

(२) इंग्लंडांत एकादा श्रीमंत गृहस्थ मरून त्याची मालमिळकत त्याच्या वारसास किंवा त्याच्या दुसऱ्या एकाद्या आप्तमित्रास जाऊं लागली म्हणजे सरकार त्याच्याकडून थोडासा कर घेतें. अशाप्रकारें घेतलेल्या कराचा वसूल १८८९ सालीं ७९६८४०५० रुपये झाला. हाच नियम इकडे येऊन राहिलेल्या युरोपियन लोकांच्या संबंधानें लागू करतात, तर हा नियम इकडच्या लोकांलाही का लावू नयें? इकडे कित्येक श्रीमंत लोक मरून आपल्या मागें आपल्या ज्या वारसाला मोठी संपत्ति ठेवितात त्याला तिचा ताबा कायदेशीर रीतीनें मिळण्यास सरकारी स्टॅम्प वगैरेच्या योगानें रजिस्टर कडून

दाखला मिळविण्यास भाग पाडावें. कोणी म्हणतील कीं, हा कर लोकांला फार जाचक होईल. पण असें पहा कीं, ज्या सरकारच्या आश्रयाखालीं त्यानें आपली संपत्ति मिळविली तींतला थोडासा अंश त्याच्या मरणसमयीं सरकारास मिळाल्यानें नुकसान कोणाचे होणार? ज्या वारसाला ती मिळणार त्याला ती वारस म्हणून आयती मिळणार. तेव्हां त्याचें तर त्यांत कांहीं अयोग्य रीतीचें नुकसान नाहीं. शेकडा दीडदोन टक्के कांहीं कष्ट केल्या वांचून मिळणाऱ्या वित्तांतून कमी झाल्यानें त्या वारसास फारसें कांहीं वाटणारही नाहीं. आणि सरकारास एक वसुलाची बाब मिळून ज्या कित्येक बाबींवर प्रजेस जाचक होणारा जबर कर आहे, तो कमी करण्यास सांपडेल.

(३) सोनें, रत्ने वगैरेच्या रूपाने जो पैका आज डागिन्यांत व कृपणांच्या पेठ्यांत अडकून पडला असून त्याचा विनियोग भांडवलाच्या रूपानें होत नाहीं त्याच्यावर थोडासा कर बसविल्यास चालेल. या देशांतील लोकांला डागिन्यांचा व निव्वळ पैसा सांचवून ठेवण्याचा सोस फार असल्यामुळें देशांत भांडवलाची वृद्धि होण्यास बरीच हरकत येते. तेव्हां अशा रीतीनें पैका अडकवून टाकण्याचें ज्याच्या मनांत येईल त्याच्याकडून थोडासा कर घेतल्यास वावगें होणार नाहीं.

(४) बहुतेक सुशिक्षित लोकांच्या मतें लग्न कार्यास वगैरे आमचे लोक जो विनाकारण पैसा उघड्यात तें बरोबर नाहीं. तरी पण आपल्या नाकलौकिकाप्रमाणें आपल्या मुलामुलींच्या लग्नांत वगैरे खर्च न झाल्यास लोकांत आपलें हंसे होऊन मान कमी होईल, ह्या वेड्या समजुतीने बहुतेक लोक पुष्कळ वेळां आपल्या ऐपतांच्या बाहेरही पैसा खर्च करून आपली इजत राखतात. अशा खोडसाळ समजुतीला कांहींसा आळा घालण्याचा एक उपाय सरकारापाशीं आहे. तो हाच कीं, लोक लग्नकार्यांस वगैरे जितका पैका उडविण्यास तयार असतील, त्यांतला थोडासा कर म्हणून सरकारनें घ्यावा. अशानें हळू हळू लोकांचा उधळेपणा कमी होऊन सरकारचेही बरेंच काम होईल. यांत देणाराचें नुकसान म्हणण्यासारखें कांहींएक न होतां उलटें तो आपल्या अनावश्यक खर्चाचें मान कमी करून सरकार देणें चुकवेल तितकें चुकविण्याचा यत्न करील.

ह्या चार बाबी सदर्हू साहेबानें सुचविलेल्या असून त्या बऱ्याच योग्य आहेत. आतां त्यांच्या विरुद्ध मुळींच म्हणण्यासारखें कांहीं नाहीं. तरीपण ज्या कित्येक बाबींवर सरकारानें आज कर बसविल्यामुळें लोकांचे अनेक प्रकारें नुकसान होत आहे. त्यापेक्षां ह्या बाबींवर कर बसविला असतां एकंदरींत कमी नुकसान होईल असें आम्हांस वाटतें.

***

# १२ मिठावरील कराचा बोजा

(सुबोधपत्रिका २४-५-१८९१)

सर्व निःपक्षपाती मुत्सद्यांच्या व अर्थशास्त्रज्ञांच्या मतें मिठावरील करासारखा जाचक व जुलमी कर दुसरा कोणताही नाहीं. कोणत्याही स्थितितल्या पुरुषाचें स्त्रीचें व मुलाचे मिठावांचून अगदीं चालावयाचें नाहीं. तेव्हां वास्तविक पाहता हरएक लहान मोठ्या माणसास थोडाबहुत कर दिल्यावांचून सुटका नाहीं. भेद इतकाच कीं, हा कर अप्रत्यक्षरीतीचा असल्यामुळें तो आपणास द्यावा लागत आहे असें फार करून सामान्य लोकांच्या लक्षांत चांगलेसें येत नाहीं. इतर जिनसा जशा कमीजास्त महाग होतात तसें मीठही होतें, असा विचार करून त्याच्याविषयीं विशेष खुलासा करून घेण्याची कोणाला कधी इच्छाही फारशी होत नाहीं. पण जे वस्तुस्थितीचा विचार करून आपली व आपल्या देशाची हालहवाल कशी काय आहे, व ती तशी असण्याचीं कारणें कोणतीं आहेत इत्यादि गोष्टींचा उहापोह करितात त्यांच्या, ह्याचा व दुसऱ्या अशाच जाचक करांचा जुलमीपणा लक्षांत येतो.

आतां हा मिठावरील कर इतका जुलमी व जाचक कां झाला आहे हें फारच थोड्यांना चांगलेपणीं ठाऊक असेल असें जाणून आज आम्ही त्याच्या स्वरूपाचें थोडसें विवरण करितों. हा कर परकी लोकाचा अंमल इकडे चालू झाल्यापासून आम्हांस द्यावा लागत आहे. इंग्रजी रियासतींत तो पूर्वीपेक्षा बराच वाढून सार्वत्रिक झाला आहे. तूर्त एक मण मीठ उत्पन्न करण्यास सरासरी दोन आणे खर्च लागत असून, विकत घेणारास करामुळें सरासरी पंचवीस पट जास्त किंमत द्यावी लागते. दयाळू लॉर्ड रिपन साहेबांच्या कारकीर्दीत हा प्रजेच्या शिरावरील बोजा जरासा कमी व्हावा म्हणून त्या सत्पुरुषानें मणामागें आठ आणे कर कमी केला होता. पण पुढें डफरीन साहेबाच्या अमदानींत सरकारी तिजोरीला अनेक योग्यायोग्य कारणांमुळे पडलेली खांच भरून काढण्याच्या मिषानें हा कर पूर्वीच्या इतकाच पुनः झाला. ही

गोष्ट १८८८ सालीं घडली. वास्तविक पाहतां ह्या सालापूर्वीच्या दोनं वर्षांत प्राप्तीवरच्या करानें वगैरे सरकाराला सुमारें नऊ कोटी रुपये वसूल जास्त मिळाला असून त्या बहुतेक सगळ्यांचा ब्रम्हदेश काबीज करण्यांत लष्करी खर्च वाढविण्यांत, सीमाप्रकरणात व पेन्डेड प्रकरणांत बेसुमारपणें फन्ना उडाला होता. आणि असाच कांहींना कांहीं खर्च पुढें अभिमानास्तव किंवा व्यर्थ भीतीस्तव करावा लागणार हें जाणून सरकारनें आपल्यामतें निरूपाय होऊन हा मिठावरील कर वाढविला. पण हा वाढविल्यानें प्रजेला काय त्रास होईल याचा विचार आमच्या सरकारनें केला नाहीं किंवा केला असल्यास याप्रमाणें वागण्याची बुद्धि त्यास झाली नाहीं हें आमचे मोठेंच दुर्भाग्य समजावयाचें. हा कर वाढविला त्या वेळीं असा एक मुद्दा प्रतिपक्षाकडून पुढें आला होता कीं, अशानें मिठाचा खप कमी होऊन सरकाराचें उत्पन्न कमी होईल. हें भाकीत अर्थात् खरें झालें. सर डेविड बारबरसाहेबांचे मत असें आहे कीं, ही खपाची मर्यादा हळूहळू वाढत आहे; आणि तो लवकरच पूर्वस्थितीस येऊन पोंचेल. पण ह्या फडनविसानेंच दिलेल्या आंकड्यावरून असें समजते कीं, १८९०-९१ सालीं ३१९३०००० मण मिठाचा खप झाला. हा खप १८८६-८७ सालच्या खपाहून ९००००० मणांनीं कमी आहे. आतां हा खप सर डेविडच्या म्हणण्याप्रमाणें जो एकसारखा वाढत आहे, त्याचें मुख्य कारण दर वर्षांस शेंकडा एक प्रमाणें देशांतील लोकसंख्या वाढत चालली आहे, हें होय. येथें आणखी अशी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, १८८७ सालपर्यंतचा मिठाचा खप पाहिला असतां त्याचें मान एकसारखें चढतेच होतें. तें तसेंच कायम राहतें तर १८९०-९१ सालीं ते बरेंच वाढलें असतें. यावरून पाहतां मीठ महाग झालें तरी तें अगदी जरूरीचें असल्यामुळें लोक निकत घेण्याचें कमी करणार नाहींत, असा जो कित्येक सरकारी अमलदारांचा समज होता तो अगदी चुकीचा होता असें सिद्ध होते.

आतां ह्या मिठाच्या खपाच्या व कराच्या संबंधानें आमच्या देशाची स्थिति दुसऱ्या कांहीं देशांशी ताडून पाहतां कशी काय आहे ती पाहूं. प्रथमतः आमच्या राज्यकर्त्यांचा युरोपातला मुलूख घेऊं. ग्रेटब्रिटनांत व ऐर्लंडांत मिठाचा कर मुळींच नाही. फार काय, पण जो कोणी दारू, तंबाखू व चहा साधारणपणें ऐषआरामीच्या चिजावांचून राहण्यास राजी असेल त्याला निर्वाहास लागणाऱ्या दुसऱ्या कसल्याच मालावर कर द्यावा लागत नाही. त्यांच्या मुलखात दर माणसीं दर सालास ८० रतल मिठाचा खप आहे. आतां हे एवढें सगळें मीठ त्याला खाण्याच्या पदार्थासच लागतें असें नाहीं, तर त्यांतले बरेंच कारखान्यांतून वगैरे खपतें. हा मिठाचा खप फान्सांत ५०

रत्तल जर्मनींत २५, रशिआंत १९, आस्त्रियात १४, इटलींत १८, स्पेनांत आणि पोर्तुगालांत मिळून १७, अमेरिकेंतल्या संयुक्त संस्थानांत ३९, आणि सगळ्या युरोपांत सरासरी २६ रतल आहे; आणि आमच्या ह्या देशांत हा खप जेमतेम १० रतल आहे! आतां कराचें मान कसें काय आहे तें पहा. सगळ्या युरोपाचें दरमाणसीं सरासरी उत्पन्न १५ पौं. ४ शि. ७१/२ पे. असून मिठाचा कर सरासरी ११ पेन्स आहे; आणि आमच्या देशाचें उत्पन्न सरासरी दोन पौंड असून दरमाणसीं मिठाचा कर ५३/८ पे. होतो. ह्यावरून पहातां युरोपांतील लोकांच्या सरासरी प्राप्तीवर मिठाचा कर शेंकडा ०.३ असून हिंदुस्थानांतील लोकांच्या सरासरी प्राप्तीवर शेकडा १.१ आहे म्हणजे युरोपांतल्यापेशां हिंदुस्थानांतल्या लोकांस चौपट मिठाचा कर द्यावा लागत असून आमची प्राप्ति युरोपांतल्या लोकांच्या प्राप्तीहून सुमारे आठव्या हिश्शानें कमी आहे!

आतां हीच गोष्ट एक उदाहरण घेऊन अधिक उघड करून सांगू. अशी कल्पना करूं कीं, पांच माणसांचें एक गरिब कुटुंब आहे. त्या कुटुंबांतील दोन जाणती माणसें कमविणारीं असून त्या दोघांस मिळून वर्षास सरासरी चोपन्न रुपयांची कमाई आहे, असें मानूं. ह्या कुटुंबास दर माणसीं १० रत्तल प्रमाणें ५० रत्तल मीठ लागेल. ह्या मिठाची किंमत दरमणीं ३१/४ रु. प्रमाणें धरली तर फक्त मिठासाठींच ह्या कुटुंबाला आपल्या उत्पन्नांतून शेंकडा चार टक्के खर्च करावा लागेल. त्यांतला एक षष्ठमांस कर दरमणीं आठ आणे वाढविल्यामुळेंच फक्त द्यावा लागत आहे. यावरून हें सिद्ध होते कीं, मिठावरील कर अगदीं थोड्या प्रमाणानें वाढविला. तरी तो गोरगरीबांस नियमानें जाचक व्हावयाचा. वर जो हिशोब सांगितला आहे, तो केवळ देशाच्या उत्पन्नाचें सरासरी मान घेऊन सांगितला आहे. पण ह्या देशांत सर चार्लस इलिअटच्या मतें जे सात कोट लोक वर्षाचे तिनशें पासष्ट दिवस बहुतेक उपासमार काढताहेत त्यांच्या खाण्यांत कितीसें मीठ येत असेल बरें? आम्हाला ठाऊक आहे कीं, गांवढ्या गांवांत नुसती तांदुळांची पेज व भाजीपाला खाऊन दिवस काढणारे गरिब लोक फार आहेत. ह्या पदार्थांत मिठाची गरज फारच असून ते त्यांना कधींही मिळावें तितकें मिळत नाहीं. त्यांना ते पदार्थ फार करून अळणीच खावे लागतात! अशा प्रकारें मिठाचा अगदीं थोडा अंश पोटांत गेल्यामुळें ते निःसत्व व दुबळे होऊन नाना रोगांचे ते माहेरघर होतात. वैद्य लोकांच्या मताप्रमाणें पाहतां प्रत्येक माणसाच्या पोटांत दर वर्षांत निदान १७ रत्तल तरी मीठ गेलें पाहिजे. पण आमच्या इकडे मुळीं सरासरीच १० रतलांवर जात नाहीं. मग जे लक्षावधि पराकाष्टेचे गरिब लोक ह्या देशांत आहेत

त्यांना तें पुरेसे कोठून मिळणार! ही स्थिति लक्षांत आणली म्हणजे आमच्या इकडे रोगराई व दुबळेपणा विशेष कां यांचें एक मुख्य कारण समजतें. सर जॉर्ज बर्डउड यांनी मागें रक्तपित्तीच्या कारणांचा विचार करतांना डॉ. भाऊ दाजीनीं सांगितलेल्या एका कारणाचा उल्लेख केला होता. तें कारण हे कीं, समुद्रकिनारीं किंवा नद्यांच्या वगैरे खांड्याच्या बाजूंनी राहणारे गोरगरीब जे वाळलेले व ताजे मासे खातात त्यांत मीठ कमी असतें म्हणून त्यांना हा रोग होतो. मुंबई इलाख्यांतील बरेच महारोगी असल्या ठिकाणाहून आलेले असतात.

शेवटीं आणखी एकच गोष्ट सांगून हा लेख आटपतों. आमच्या इकडील मिठाच्या खपाची सरासरी जा दहा रतल आहे म्हणून सांगितली ती मुळीं लोकांच्या निर्वाहासच जर पुरेशी नाहीं, तर त्यांत आणखी गुरांस व कारखान्यांत लागणाऱ्या मिठाचा अंतर्भाव करूं लागल्यास काय हिशोब होईल बरें? आतां हे खरें कीं, आमच्या इकडे आधी मुळीं मिठाचा खप होईल असें कारखानेच फार कमी आहेत. गुरांस लागणाऱ्या मिठाच्या सबंधानें पाहतां आमच्या शेतकऱ्यांलाच जर मिठाची पंचाईत तर मग त्यांनीं आपल्या गुरांस तें आणखी कोठून पुरवावे. याचा परिणाम उघडच आहे कीं, जसे ते रोड व रोगी असतात, तशींच त्यांची गुरेहीं हडहडीत व डबघाईस आलेलीं असून सांथ आली कीं पटकन डोळे झांकणारीं असतात. अशानें प्रतिवर्षी शेतकऱ्यास गुराच्या नुकसानीमुळें किती हाल व गैरसोई सोसाव्या लागतात ते त्यांच्यांत जे पुष्कळ वागलेले आहेत त्यांस चांगले ठाऊक आहे.

तात्पर्य काय कीं हा मिठाचा कर सरकारानें होईल तेवढा कमी करण्यास बिलकुल दिरंगाई करतां कामा नये. नाहींतर आधींच मेटाकुटीस आलेल्या बहुतेक प्रजेची दशा उत्तरोत्तर अधिकच भयंकर होत जाईल, यांत काडीचा संशय नाहीं.

***

# १३ चार्ल्स ब्रॅडलॉ

(सुबोधपत्रिका ८-२-१८९१)

अयं निजः परोवेति गणना लघु चेतसाम् ।।
उदारचरितानांतु वसुधैव कुटुंबकम् ।।

मागल्या खेपेस ह्या सत्पुरुषाचें देहावसान झाल्याचें अत्यंत शोचनीय वृत्त कळविण्याचे आमच्या कपाळीं आलें. त्यावेळीं चित्त शोकाकुळ झाल्यामुळें व अवकाशाचीही टंचाई असल्यामुळें आम्हांला त्यांच्याविषयीं विशेष कांहीं सांगतां आलें नाहीं. ह्या खेपेस त्यांच्याठायींच्या कित्येक सद्गुणाचें थोडेसें वर्णन करण्याचें योजिलें आहे. अशा अद्वितीय पुरुषाच्या गुणांचा अनुवाद कितीही केला तरी तो थोडाच. त्यांच्या आयुष्यांतील मुख्य मुख्य गोष्टी सांगण्याचा पहिल्यानें आमचा इरादा होता. पण गतवर्षी व गेल्या आठवड्यात त्यांच्या चरित्राचें कथन पुष्कळ वर्तमानपत्रांनी आपापल्यापरी केल्यामुळें त्याचेंच पुनः चवितचर्णन न करितां त्यांच्या चरित्रापासून आम्हांस काय बोध घेण्यासारखा आहे त्याचें संक्षेपाने निरूपण केलें असतां पुरे होईल असें वाटतें.

मि. ब्रॅडलॉसाहेबाच्या चरित्रावरून पहिली गोष्ट अशी घेण्यासारखी आहे कीं, मनुष्य कितीही अप्रसिद्ध व गरीब कुळांत जन्मला असला तरी तो सतत उद्योगाच्या, अढळ नीतिमत्तेच्या व अविरत ज्ञानसंपादनाच्या योगानें स्वोत्कर्ष व प्ररोत्कर्ष करण्यास लायक होऊन सर्व जगास पूज्य व उदाहरणीय होतो. यःकश्चित कारकुनाच्या उदरीं जन्म पावलेला, तीन चार वर्षेच काय तें शाळेंतलें शिक्षण मिळविलेला, आपल्या वयाच्या बाराव्या वर्षापासूनच स्वोपजीविकेची काळजी वाहणें भाग पडलेला मनुष्य जेथें जेथें इंग्रजी भाषेचा प्रसार व राजकीय संबंध आहे तेथल्या सर्व प्रकारच्या लोकांस वंदनीय व वर्णनीय व्हावा, आणि बलिष्ठ लोकांच्या अन्यायानें, अधिकारमदानें, व आत्मपरतेनें त्रस्त झालेल्या जनांला आपला कैवारी वाटावा, हा कांहीं लहानसहान पराक्रम नव्हे. त्यांतूनही त्यांचीं धर्मसंबंधीं व समाजसंबंधीं बहुतेकमतें पुष्कळ लोकांस बिलकुल मान्य नसतां अशा प्रकारच्या लोकमान्यतेस पोंचणें म्हणजे पराकाष्टेचें दुर्घट

काम होय. आणि ते आणखी कांहीं वर्षे जगते तर अत्यंत स्पृहणीय पदाप्रत जाऊन खास पोंचतें. मि. ब्रॅडला हे निःसीम सत्यभक्त होते. ही त्यांच्या ठायीची सत्यभक्ति ते केवळ सोळा वर्षाचे असतांच दिसून आली. त्यांनीं ख्रिस्ती शुभवर्तमानवरचे आपले संशय आपल्या धर्माधिकाऱ्यास कळविले असतां त्यांस त्याने नास्तिक म्हणून शिक्षकाच्या कामावरून काढून टाकून आईबापांच्या आश्रयासही मुकविलें. ह्यावेळीं ते न डगमगतां व आपले खोटे न ठरलेले संशय मागें न घेता आईबापांस सोडून निघाले, व पुढे आमरणांत अनेक प्रकारें हाल व दुःख हीं त्यांनीं सोसलीं, पण दांभिकपणाचा स्वीकार केला नाहीं. धर्मशील म्हणविणाऱ्यां लोकांनी त्याच्या संबंधाच्या नानाप्रकारच्या खोट्या कंड्या वेळोवेळीं उडविल्या असतां त्यांचा खोटसाळपणा पुराव्यानिशीं दाखविण्याचा ते प्रयत्न करीत असत पण आपल्या शत्रूंच्या संबंधानें कधीं एकही खोटा शब्द लिहिल्याचा किंवा बोलल्याचा दोष त्यांस कोणीही लावलेला नाहीं. एकाद्या गोष्टीचें असत्यत्व व अनर्थमूलकत्व ही त्यांस कितीही वाटलीं तरी तिचें यथार्थ स्वरूप लोकांच्या नजरेस आणून देण्यापलीकडे ते कधींही जात नसत. आपणास न पटणाऱ्या गोष्टींचें स्वरूप विनाकारण फुगवून दाखवून लोकांच्या ठायीं तिजविषयीं फाजील तिरस्कार उत्पन्न करणें म्हणजे एकप्रकारे सत्यापलाप करणे होय असें त्यांचें मत असे, व तदनुसार त्यांचे वर्तन मरेपर्यंत राहिलें. इंग्लंडांतील मोठमोठ्या ईश्वरविद्यापरायण धर्माधिकार्यांशीं त्यांचे जे खिस्ती धर्माच्या संबंधानें वाद झालेले उपलब्ध आहेत त्यांत त्यांनीं त्या व्रताचे कडकडीत अवलंबन केलेलें जागोजाग आढळतें; आणि ह्याच त्यांच्या गुणास्तव मोठमोठे धर्मशील पाद्रीही त्यांच्याशीं वाद करण्यास उद्युक्त होत. त्याचप्रमाणें जीं जीं लौकिक संबंधाचीं कामें ते हातीं घेत त्यांचें सत्यस्वरूप नीट समजल्यावांचून तीं ते बिलकुल घेत नसत. यामुळें त्यांच्या शत्रूंलाही त्यांचा मोठा धाक वाटून त्यांचें म्हणणें खोडून काढणें मुष्किलीचें वाटत असे. पार्लमेंट सभेत ते बोलूं लागले म्हणजे त्यांचें म्हणणें सभासद सावधान चित्ते ऐकून घेत असत. आमच्या ह्या देशाच्या कैवारानें त्यांनीं त्या सभेत जीं भाषणे व प्रश्न केले आहेत त्यांच्यामुळें अधिकारी मंडळास बराच विचार करावा लागला आहे. ज्यांनीं त्यांचें १८८९ सालच्या राष्ट्रीयसभेच्या शेवटल्या दिवशींचें अत्यंत प्रोत्साहनपर भाषण ऐकिलें किंवा वाचिलें आहे त्यांच्या स्मृतींतून आपल्या कडकडीत व्रताचा त्यांनी केलेला उल्लेख सहसा गेला नसेल, आणि जो कोणीं त्यांचे राजकीय किंवा सामाजिक विषयावरील निरनिराळे लेख वाचील त्यांस त्यांनीं आपल्या मताचें सत्यत्व स्थापित करण्यासाठीं दिलेलीं प्रमाणें किती चोख व निर्दोष आहेत हें कळून येईल अशी आमची खात्री आहे.

मि. ब्रॅडलॉ साहेबांचा दुसरा तारीफ करण्यासारखा गूण म्हटला म्हणजे विलक्षण अन्यायद्वेष होय. हाही त्यांचा गूण लहानपणापासूनच दिसून आला. आपल्या वयाच्या सतराव्या वर्षी ते लष्करांत असतां एका तारवाच्या कप्तानानें केलेली लबाडी त्यांस सहन न होऊन त्याच्याशीं भांडून त्यांस त्यांनीं कसें शुद्धीवर आणले ते सर्वांस ठाऊकच आहे. द्रव्य, अधिकार किंवा कुलीनता यांच्या जोरावर मनुष्य आत्महितैक बुद्धीनें आपल्या स्वज्ञातीयांचा नाहक छळ किंवा तिरस्कार करूं लागला असतां त्याच्या त्या दुर्वर्तनास करवेल तितका प्रतिकार करण्यास कायावाचामनेंकरून जो झटतो तोच खरा जगन्मित्र होय. मि. ब्रॅडलॉ साहेबांच्या चरित्रांतील प्रत्येक गोष्ट ह्याच प्रकारची आहे. त्यांची एकूणएक लौकिक कृति पहाल तर जगांत माजलेल्या ह्या अन्यायाचे निर्मूलन करण्यासाठीं होती. कोणास कोठेंही व कोणाकडूनही अन्यायानें इजा झाली असतां तिजबद्दल त्यांस अत्यंत वाईट वाटत असे; आणि तिचा प्रतिकार आपल्या हातून होईल तितका करण्यास केवळ निरपेक्ष बुद्धीनें ते सतत तयार असत. मग ज्यास ती इजा झाली असेल त्यानें त्यास आपणांस सहाय्य करण्यास सांगितलें असो किंवा नसो. ह्या त्यांच्या अप्रतिम गुणाचा अनुभव आम्हां हिंदुस्थानवासी जनांस तर चांगलाच आला आहे. ग्रेटब्रिटनांतील सर्व गरीबगुरिबांचा ते मोठे कैवारी होते. तिकडे भांडवलवाले व मजूर यांचे नित्य कलह चालू असून मजुरांस फार दु:ख व त्रास सोसावा लागत असे. त्यांच्या तर्फेनें बोलणारा किंवा लिहिणारा फारसा कोणी नसे. ह्यामुळें त्यांची स्थिति अत्यंत दु:सह झाली होती. ही त्यांची अन्यायमूलक हैराणगत पाहून बॉडलासाहेबांस मुळींच चैन पडत नसे. त्यांनीं त्यांची स्थिति सुधारण्याविषयीं आपल्या सुखाकडे किंवा उत्कर्षाकडे बिलकुल लक्ष न देता अश्रांत श्रम केले. देशांतील एकूणएक कारखान्यांची हालहवाल त्यांस माहित असे. त्यांनीं कारखान्यात खपणाऱ्या मजुरांना नानाप्रकारें बोध करून त्यांच्या मंडळ्या करविल्या. त्यांस इंग्रजींत ट्रेडसयुनियन्स म्हणतात. ह्या मंडळ्यांच्या योगानें कारखान्यांत खपणाऱ्या लोकांची एकजूट होऊन भांडवलवाल्या लोकांस त्यांचे म्हणणें कबूल करणें भाग पडूं लागलें. पहिल्या पहिल्यानें ह्या मंडळ्या कायदेशीर मानल्या जात नसत. पण पुढें ब्रॅडलॉसाहेबांच्या खटपटीनें व चतुराईनें त्यांस कायदेशीरपणा आला. ग्रेटब्रिटनांतील बहुतेक मजुरदार लोकांस ब्रॅडलॉसाहेब जितके प्रिय झाले आहेत तितका दुसरा कोणीही यापूर्वी झाला नव्हता. सर्व गरीब लोक त्यांस आपला कैवारी, पुढारी व संकटसमयी खरी मसलत सागणारा मानीत. त्यांचें कायद्याचें ज्ञान फार सूक्ष्म असल्यामुळे त्यांची मसलत सहसा चुकीची नसे. ते गरीबगुरिबांसही मसलत नित्य नेमलेल्या वेळा फुकट देत असत.

अलीकडे मात्र सोशिआलिस्ट लोकांच्या वेड्या खटपटीमुळें कित्येक भोळ्या मजुरांचा ब्रॅडलॉसाहेबावरचा विश्वास जरासा कमीं झाला होता. गेल्या एक दोन वर्षांत तिकडे हाईन्डमन वगैरे सोशियालिस्ट लोकांच्या खटपटीमुळें सर्व कारखान्यांतील लोकांनी फत्त आठ तास काम करावे असा कायदा करण्याचें पार्लमेंट सभेत घाटत आहे यासंबंधानें ब्रॅडलॉसाहेबांचे मत अगदीं विपरीत असल्यामुळें त्यांनीं तोंडी व लेखी या खटपटीचें अन्यायत्व व अनर्थमूलकत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. यामुळे कित्येक मजुरांस ते किंचित् आवडतनासें झालें होते. पण त्यांची ती चुकी आहे असें त्यांस परिणामीं कळल्यावांचून राहणार नाहीं. ह्या प्रसंगींचे ब्रॅडलॉसाहेबांचें जागोजागचे उद्गार मोठे गंभीर असून ऐहिक सुख व लौकिक यांसाठी अन्याय किंवा असत्य यांचें प्रतिपादन करण्यास आपण कधींही उद्युक्त होणार नाहीं, यामुळे आपणाला पार्लमेंट सभेत बसतां न आलें तरी चिंता नाहीं. असें त्यांनीं साफ सांगितलें. ह्या अन्यायद्वेषास्तव त्यांस पुष्कळवेळा सरकारदरबार करावे लागलें. ह्यामुळें कित्येक लोक त्यांस कज्जेदलाल म्हणतात. परंतु निव्वळ कलहप्रीतीनें असा त्यांनी कधींही कोणाविरुद्ध खटला केलेला नसून स्वतःवरही जे दोन तीन प्रसंगीं खटले करून घेतले त्यांतला मुख्य हेतु केवळ कायद्याच्या अज्ञानामुळें किंवा अन्यायाच्या व अहितप्रद कायद्यांनीं लोकांवर होणारा जुलूम कमी होऊन कायद्यांत फेरफार करण्याची जरी कायदे करणारांस वाटवावी हा होता. वर्तमानपत्रकर्ते, ग्रंथकार व व्याख्यानकार यांची स्वतंत्रता जी आज इंग्रज सरकारच्या राज्यांत बहुतेक पूर्णपणें स्थापित झाली आहे, ती बऱ्याच अंशीं ब्रॅडलॉसाहेबांच्या खटपटीमुळें झाली आहे.

निरपेक्ष परहितबुद्धि हा ब्रॅडलॉसाहेबांच्या अंगी आणखी एक अत्यंत स्तुत्य गुण होता. स्वहित किंवा लौकिक यांची फारशी परवा न धरितां मनुष्यजातीचें हित करण्यास अहर्निश झटण्याचा त्यांचा दृढ संकल्प होता. त्याला सर्वजातींची सारखी कळकळ असे. ह्या लेखाच्या आरंभीच्या श्लोकांत उदारचरितांचे लक्षण ह्या जगन्मित्रास पूर्णपणें लागू पडते. ह्यांनी परोपकासर्ग आपल्या सुखाचीही परवा न करितां शेवटपर्यंत जिवापाड श्रम केले; आणि शेवटीं केवळ ह्या भ्रमातिशयानें आपले जीवितहीं वेचलें. अशा सत्पुरुषास कोण धन्य म्हणणार नाही? ह्या त्यांच्या श्रमातिशयास आमचा देश पुष्कळ अंशी कारण झाला आहे. तेव्हां त्यांचे आम्हांवर अपरिमीत उपकार झाले आहेत.

त्या सत्पुरुषाच्या ठायींच्या आणखी एक दोन गुणांचें निरूपण करून हा लांबलेला लेख आम्ही आतां पुरा करितो. कोणतेही योग्य काम हाती घेतले म्हणजे कितीही, कोणांकडूनही व कसलींहीं संकटें आली तरी तें ते दृनिश्चयानें शेवटास नेत. ते ज्या

गोष्टींत मन घालींत ती गोष्ट सिद्ध केल्यावांचून मनःपूर्वक झटण्यास ते कधींही कसूर करीत नसत. त्यांच्या आंगचा नियमितपणा, कम उरकण्याची, विलक्षण हातोटी, युक्तिमत्ता, चलाखी, धोरण, कुशाग्रबुद्धि, विलक्षण माहिती व श्रमसातत्य यांच्या योगानें त्यांनां हातीं घेतलेल्या बहुतेक कामांत यशच येत गेलें होते. आणि आम्हा हिंदुस्थानवासी लोकांच्या हृदयांत त्यांचा पाठिंबा मिळाल्यावर थोडासा आशेचा अंकुर उद्भवला होता. त्याचें तरी कारण हेच होतें. पण तो उगवला न उगवला तोच त्यावर हा अकस्मात झालेला वज्राघात कोणा स्वदेशहितैषीचें हृदय विदारित करणार नाही?

शेवटी प्रत्येक लोकाग्रणीच्या व थोर पुरुषाच्या अंगीं जो एक गुण अवश्य असला पाहिजे, त्यांचें वास्तव्य ब्रॅडलॉ साहेबांच्या ठायीं कितपत होते याचा विचार करूं. हा गुण नीतिमत्तेचा होय. मोठमोठ्या पुरुषांच्या आचरणांतही कांहींना कांहीं दोष दिसून येतात. अगदीं निर्दोष आचरण कसें थोड्यांचेंच असतें. परवांपर्यंत अतिपूज्य मानलेल्या मि. पार्नेल साहेबांचे आचरण कितपत शुद्ध होतें हें नुकतेंच निदर्शनास आले आहे. तेव्हां हा गुण अंगी पूर्णत्वानें असणें फारच दुर्घट आहे. परंतु हा नीतिमत्तारूप गुण ब्रॅडलासाहेबांच्या ठायीं पूर्णत्वानें वसत होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांची धर्मसंबंधीं व समाजसंबंधीं मतें जराशीं जनरीतिबाह्य असल्यामुळें त्यांचें प्रत्येक लौकिक किंवा खासगी कृत्य लोक नित्य डोळ्यांत तेल घालून पहात असत. त्यांच्या वर्तनांत जर कां यत्किंचत् दोष आढळला असता, तर तो त्यांनीं जगजाहीर करून त्यांस जन्मांतून उठविलें असतें पण तसा कांहींएक प्रकार झालेला नाहीं, येवढेंच प्रमाण त्यांच्या आचरणाची निर्मलता स्थापण्यास पुरें आहे. असो, तर अशा ह्या जगदुद्वारक व जगदुपकारी महात्म्याचें यशःकथन करावें तितकें थोडेंच आहे. आमच्या लोकाग्रणी व सामान्य जनांनी ब्रॉडलॉसाहेबांचें चरित्र आपल्या डोळ्यापुढें सतत ठेवून आपलें वर्तन तदनुरूप ठेवण्यास मनोभावें झटावें येवढेंच आमचें मागणें आहे.

***

# १४ चार्ल्स ब्रॅडलॉ विषयींची आमची कृतज्ञता

(सुबोधपत्रिका ३१-५-१८९१)

ज्यानें आमच्या लोकांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नसतां इल्बर्ट बिलाच्या वेळीं आम्हां भारतवर्षीयांच्या हक्कांची पायमल्ली झालेली न साहून तिकडील लोकांची त्या प्रकरणीं यथार्थ समजून करून देण्याचा जाहीर व्याख्यानें देऊन प्रयत्न केला, ज्यानें केवळ एका प्रसिद्ध सभेत मि. नार्टन प्रभृति या देशाच्या संबंधे खटपट करणाऱ्या लोकांच्या विद्यमानें ह्या अनाथ देशाचा कैवार घेण्याविषयीं केलेल्या विनंतीस मान देऊन पुढें मरेपर्यंत ह्या देशांत घडणाऱ्या प्रत्येक अव्यायाची आपला अमूल्यकाळ, बुद्धि व सामर्थ्य यांच्या व्ययाची बिलकुल परवा न करितां बित्तम माहिती मिळवून पार्लमेन्ट सभेत सेक्रेटरी आव् स्टेटला प्रश्नांवर प्रश्न विचारून पुरे पुरे करून सोडलें; ज्याच्या ह्या अविश्रांत परिश्रमामुळें व आपलें काम चालविण्याच्या अलौकिक कुशलतेमुळें इकडील राज्यकारमार चालविणारांस जबरदस्त दहशत पोंचून आपलें काम फार संभाळून करावें लागे; जो आणखी कांहीं वर्षे जगता तर आमची राज्यपद्धति बरीच सुधारण्यास कारणीभूत झाला असता, आणि ज्याचें देहावसान झाल्याची बातमी इकडे येऊन पोंचली तेव्हां सर्व लोकांस अतिशयित दुःख वाटलें, आणि असा हिंदुस्थानाला दुसरा कैवारी पुनः कधींहीं मिळण्याची फारशी आशा नाही असें ज्याच्या त्याच्या तोंडून व लेखांतून उद्गार निघाले त्यांच्यानिषयी केवळ तोंडानें, व वर्तमान पत्रातील लेखांनीं दुःख प्रदर्शित केल्यानें किंवा त्यांच्या मुलीस दुखवण्याची पत्रे किंवा तारा पाठविल्याने त्यांच्या ऋणांतून आम्हीं मुक्त  झालों असें जे मानीत असतील त्यांची कृतज्ञत्वबुद्धि अगदीं हलक्या प्रतीची आहे अशी समजावयाची. ज्या सत्पुरुषानें आमच्या लोकांच्या एका कवडीसही न शिवतां किंवा कांहींएक वेतनाची आशा न धरितां आमच्यासाठी पार्लमेन्टमध्यें आपल्या जीवाकडेही न पाहतां एकसारखी खटपट केली, त्याचे उपकार फक्त शब्दांनी बोलून दाखविल्यानें आपलें कर्तव्य संपले असें कोणाही समंजस मनुष्यास वाटणार नाहीं, अशी आमची समजूत आहे. असें आहे

तरी, त्यांच्या संबंधानें काहींहीं जास्त म्हणण्यासारखी खटपट चाललेली कोठें ऐकूं येत नाहीं, हें मोठें नवल होय. अशा पुरुषाचे जर आम्ही कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें उतराई झाली नाहीं तर आम्हीं सर्व जगांत पहिल्या प्रतीचे कृतघ्न ठरूं. तेव्हां हे सगळ्या राष्ट्रावर येऊ पाहणारे लांच्छन टाळण्याचा प्रयत्न आमच्या लोकांनीं केला पाहिजे. आणि अलाहाबादच्या मॉर्निंगपोष्टनामक एका इंग्रजी पत्रांत जो आमच्यावर दोषारोप केला आहे कीं, आमच्या लोकांची कृतज्ञता बोलण्यापलीकडे जातच नाहीं, तो खोटा करून दाखविला पाहिजे.

ब्रॅडलॉ साहेबांच्या ऋणांतून मुक्त होण्याचें मार्ग दोनच आहेत. एक, इकडे त्यांचें कांहीं तरी निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारची स्मारकें करणे व दुसरें त्यांचें थोडेसे कर्ज आहे तें फेडणें. आतां स्मारकाचें काम मोठें असून तें मोठमोठ्या जाहीर सभा भरवून व बड्या बड्या श्रीमंत गृहस्थांचें साहाय्य घेऊन केलें पाहिजे. कर्ज फेडण्याचें इतकें भारी नाहीं. हे प्रत्येक माणसानें मनावर घेतल्यास 'दसकी लकडी एकका बोजा' या न्यायानें थोडेबहुत होण्यासारखें आहे. जशी ज्यांची ऐपत असेल, त्याप्रमाणें त्यानें रुपया, दोन रुपये, पांच रुपये इकडून मनिआर्डरीनें ब्रॅडलॉ साहेबांच्या मुलीस पाठविल्यानें काम होणार आहे. कित्येक लहान मोठ्या मंडळींनी किंवा मित्रांनीं आपआपसांत वर्गण्या काढून पैसा जमा करून पाठविण्याचें मनावर घेतलें पाहिजे. अशा लहान लहान वर्गण्या तिकडे बहुतेक प्रत्येक दिवशीं हिप्पाशिया बाईला लोक पाठवीत आहेत. त्यांची पोंच नॅशनल रिफार्मरमध्यें नेहमीं येत असतें.

ब्रॅडलॉ साहेबांत खासगीचें असें कर्ज मुळींच नाहीं. त्यांना जें कहीं कर्ज आहे. तें फ्रिथॉट पब्लिशींग कंपनीच्या संबंधाचें. त्या कंपनीचे शेअर ज्यांनी घेतले आहेत, त्यांची गेल्या महिन्याच्या १७ व्या तारखेस सभा भरून असें ठरलें आहे कीं, पौंडामागें दहाशिलींग घेऊन आपला हक्क सोडण्यास ते कबुल असल्यास सहा महीन्यांच्या अवधीत त्यांच्या मागण्याची भरपाई केली जाईल. ह्या ठरावास बहुतेक शेअर घेणारे कबुल होतील असा रंग आहे. ह्याप्रमाणें तोंड झाल्यास जवळ जवळ तीन हजार पौंड हिपाशिया बाईला आपल्या बापाच्या कर्जाबद्दल द्यावे लागतील. ही एवढी रक्कम उभी होण्याची तिला मोठी पंचाईत दिसत आहे. आजपर्यंत सगळेच चारशे पौंड जमा झाले आहेत. आणि तेहि शिलिंग अर्धा शिलिंग अशा लहान लहान वर्गण्या मिळून झाले आहेत. याचे कारण उघडच आहे कीं, चार्ल्स ब्रॅडलॉनें ज्या प्रकारच्या लोकांचा कैवार घेतला होता ते बहुतेक अत्यंत गरीब आहेत. याशिवाय आणखी कांहीं तिकडील

मंडळ्यांकडून तिला थोडेसे पैसे मिळण्याची आशा आहे. त्याचप्रमाणें ब्रॅडलॉसाहेबांचा पुस्तकसंग्रह विकूनही कांहीं पैसे जमा होतील. नॅशनल रिफॉर्मरच्या गेल्या अंकात हिंदुस्थानातूनहीं कांही मदत मिळेल अशी हिपाशियाबाईनें आशा प्रगट केली आहे. तर ही त्या बाईची आशा व्यर्थ न होऊं देण्याचें आमच्या लोकांनीं मनावर घेतलें पाहिजे. बड्या बड्या सभांच्या किंवा लोकांच्या तोंडाकडे पाहात न बसतां, आपल्या सामर्थ्यानुसार मित्रांमित्रांमध्यें कांहीं पैसे जमवून पाठविल्यास ज्याच्या आम्ही सर्व प्रकारे ऋणांत आहों त्यांस ऋणमुक्त करून त्याच्या प्रिय मुलीस त्याच्या मागें सुखानें राहण्यास सहाय्य केलें असें होईल. अशा प्रसंगीं जर आम्ही थोडीशी कृतज्ञतारूप सुवृत्ति व एकराष्ट्रियत्वाची बुद्धि कृतीनें प्रगट करणार नाही तर आमच्यावर पाश्चात्याच्या विद्येचा व संस्थाचा इष्ट परिणाम फारसा कांहीं झाला नाहीं, असें म्हणावें लागेल. लॉर्डरिपनच्या वेळीं एकंदर लोकांनीं जी कृतज्ञता प्रगट केली तिचें कारण फारसे महत्वाचें नव्हतें. पण त्याचा परिणाम सर्वास अनुभवावयास सांपडून, त्याजविषयीं अज्ञान-सज्ञान सर्व मनुष्यांची खात्री होऊन त्या दयाळू पुरुषाविषयीं पूज्यबुद्धि व कृतज्ञताबुद्धि ह्या त्यांच्या हृदयांत उत्पन्न होण्यास हरकत पडली नाहीं. पण येथें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, लॉर्डरिपन यांस मोठा अधिकार असून सगळ्या जगांतल्या कोणत्याही हुद्देदारांपेक्षां मोठे वेतन मिळत होते; तेव्हां त्यांच्या हातून सर्वास हितप्रद अशा कांहीं गोष्ट घडल्या. आतां चार्ल्स ब्रॅडलॉच्या हातून सर्वास समजेल असें व साक्षात् हिताचे असें कांही काम घडलें नसल्यामुळें त्यांनी केलेल्या कामाची योग्यता सगळ्यांच्या लक्षांत पुरतेपणी येण्यासारखी नाहीं. तेंव्हा ज्या कित्येक ऐपतदारांस त्या प्रकरणीं साहाय्य करण्याचें सामर्थ्य आहे त्याला बॅडलॉसाहेबांच्या आमच्यावर झालेल्या उपकृतींचे महत्व चांगलेसें समजण्याचा संभव नसल्यामुळें त्यांच्याकडून मदत मिळण्याची आशा नाहीं. बर हें मदत करण्याचें काम सुशिक्षित गृहस्थानींच केले पाहिजे; आणि तें करण्यास कसर करणार नाहींत अशी आमची उमेद आहे.

***

# १५ शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारावांचून गति नाहीं

(सुबोधपत्रिका १४-६-१८९१)

यंदाच्या खानेसुमारीवरून असें कळतें कीं, गेल्या दहा वर्षाच्या अवकाशांत सगळ्या हिंदुस्थानमध्यें एकंदर दोन कोट वीस लक्ष लोक जास्त वाढले-म्हणजे वीस वर्षांपूर्वी सगळ्या इंग्लंडामध्यें जितके लोक होते तितके, किंवा सगळ्या ग्रेटब्रिटनामध्यें ४० वर्षापूर्वी जितके लोक होते तितके! कित्येक लोकांना ही लोकवृद्धि आनंददायक झाली असेल. परंतु ज्यांला सर्व देशाची आजला काय स्थिति आहे हे चांगले ठाऊक आहे, त्यांला ह्या वृद्धींत संतोष मानण्यासारखें कांहींएक झाले नसून उलट ती विशेष काळजी व अस्वस्थतेचें कारण झाली आहे. कारण उघडच आहे कीं, पूर्वी असलेल्या सर्व लोकांपैकीच जर पांच सहा कोट लोकांना उभ्या वर्षांत पुरते खायाला मिळण्याची पंचाईत होती, तर त्यांत आणखी लोकवृद्धीनें भर पाडून उपाशी मरणारांची संख्या वाढल्यानें काय हित झालें? ह्या लोकवृद्धीच्या मानानें शेतकीची सुधारणा किंवा उद्योगवृद्धी होऊन जर देशांतील निर्वाहास अवश्य लागणाऱ्या जिनसांची उत्पत्ति वाढली असती, तर ठीक होतें. पण तसा प्रकार मुळींच फारसा झालेला आढळत नाहीं. तेव्हां तूर्त आमच्या देशांतील लोकवृद्धि म्हणजे हाल भोगणारांची वृद्धि होय, असें म्हणायाला कांहींएक हरकत नाहीं.

आतां शेतकीची सुधारणा व उद्योगवृद्धि झाल्यावांचून आमच्या देशाची धडगत नाहीं हें सरकारास व विचारी लोकांस पूर्णपणें कळत आहे. पण त्याप्रमाणें वागण्याकडे उभयतांचीही प्रवृत्ति अजून होत नाहीं, ही मोठी दिलगिरीचा गोष्ट आहे. आमच्या ह्या देशांतले शेंकडा जवळ जवळ नव्वद लोक निव्वळ शेतीवर उपजीविका करीत आहेत. तेव्हां तिचें महत्व आमच्या इकडे किती आहे तें पहा. पण तींत सुधारणा करण्याचा प्रयत्न कोणाच्याच हातून म्हणण्यासारखा होत नाहीं. आमचे सरकार तर या संबंधानें बहुतेक उदास आहे म्हणावयाचे. त्यानें कित्येक प्रांतांमध्यें शेतकीची खाती ठेविली आहेत खरीं. पण त्यांचा शेतकीच्या सुधारणेच्या संबंधानें फारसा कांहीं उपयोग होत

नाहीं. ह्या खात्यांचा आजपर्यंत बहुतेक उंटावरून शेळ्या हांकण्यासारखाच प्रकार चालला आहे. निरनिराळ्या प्रांतांत शेतकीचे खतांचे वगैरे जे निरनिराळे प्रकार चालू आहेत त्यांत शास्त्ररीत्या थोड्या खर्चात व सहज होण्यासारखें काय फेरफार करण्यासारखें आहेत, त्यांचा नीट सप्रयोग शोध करून ठाम ठरलेला आपला अनुभव लोकांस अगदीं सुलभपणें जाहीर करण्याचा प्रयत्न ह्या खात्यांकडून वास्तविक पाहतां झाला पाहिजे. युरोपांतील बहुतेक देशांत रसायनादिक शास्त्रांच्या साहाय्यानें शेतकीमध्यें इतकी सुधारणा झाली आहे कीं, त्यांच्या तिकडच्या अगदीं साधारण जमिनींतून ते आज जितके उत्पन्न काढताहेत त्याच्या अर्ध्यानेंसुद्धां पुरातन काळापासून सुपीकपणाविषयी अत्यंत नावाजलेल्या अशा आमच्या जमिनींत उत्पन्न होत नाहीं! ह्या एवढ्या त्यांच्या सुधारणेचें एक मुख्य कारण असें आहे कीं, तिकडें सरकाराकडून शेतीची मोठमोठीं खाती चालत असून शेतकीच्या हरएक सुधारणेस पूर्ण उत्तेजन मिळत आहे. खुद्द इंग्लंडांतील शेतकीच्या सुधारणेची आमचे ब्रिटिश सरकार किती काळजी वाहत आहे, तें तिकडील वर्तमानपत्रादिकांवरून समजतें. असें असतां आमच्या ह्या हतभाग्य देशाच्याच संबंधानें तेवढी ब्रिटिश सरकारची उदासीनता कां असावी तें कळत नाहीं. वास्तविक पाहतां शेतकीच्या सुधारणेचीं आम्हाला जितकी आवश्यकता आहे, तितकी जगांतील दुसऱ्या कोणत्याही देशाला नाहीं म्हटल्यास चालेल.

आमच्या इकडे सरकारानें कोठें कोठें शेतकीचे वर्ग म्हणून जे काढले आहेत, त्यांतलें बहुतेक शिक्षण अगदीं अपुरे व पुस्तकी असल्यामुळें व तें फारच थोड्यांना पुष्कळ गैरसोई सोसून मिळत असल्यामुळें, त्याचा व्हावा तसा कांहींएक उपयोग झालेला दिसत नाहीं. शेतकीच्या सुधारणेस अवश्य लागणारी जी रसायनादि शास्त्रें त्यांचा अभ्यास होईल तेवढा पुरा आमच्या लोकांकडून झाल्याशिवाय त्यांचा खरा उपयोग होणें नाहीं. केवळ चारपाच शास्त्रांवरील लहान लहान पुस्तके घोकून जेमतेम परीक्षेंत उतरून सर्टिफिकिटें मिळवण्याकडेच ज्यांचे लक्ष असतें, त्यांच्या हातून पुढें त्या शास्त्रावरील मोठमोठे ग्रंथ वाचून आपलें ज्ञान एकसारखें वाढविण्याचा प्रयत्न होण्याची फारशी मुळींच आशा नसतें. कारण ते हें शास्त्राध्ययनाचें काम केवळ टाकभाड्यासारखें करितात. त्यांच्या ठायीं ज्ञानप्राप्तीचा खरा हव्यास उत्पन्न झालेला नसतो. हा हव्यास त्यांच्यात कसातरी उत्पन्न तर झालाच पाहिजे. एरवी हा सर्व अटाट व्यर्थ होय. जर हा हव्यास स्वभावत: उत्पन्न होत नाहीं, तर तो कांहींतरी कृत्रिम उपायांनी उत्पन्न केला पाहिजे. ह्या उपायापैकीं कांहीं उपाय सरकारलाच योजता

येण्यासारखें आहेत, व दुसरे कांहीं आहेत तें लोकांनी योजल्यास बरें होईल. कोठून तरी उपयुक्त शास्त्रांचा अभ्यास वाढविणारांस योग्य प्रकारचें उत्तेजन व साधनें सरकारकडून व लोकांकडून अवश्य मिळालीं पाहिजेत; आणि अशाप्रकारे वाढलेल्या ज्ञानाच्या साहाय्यानें शेतकीसारख्या धनोत्पादक कलांत आमच्या इकडच्या स्थितिरीत्यनुरूप चांगल्या प्रकारच्या सुधारणा होऊन त्यांची माहिती सर्वास सुलभ झाली पाहिजे.

सध्या आमच्या देशास जी एवढी दैना आली आहे, तिचें एक मुख्य कारण असें आहे कीं, आमच्या लोकांस शेतकीवांचून दुसरा उदरनिर्वाहाचा धंदा फारसा उरलाच नाहीं. परदेशांतून हरएक उपयोगाचा किंवा चैनीच पदार्थ इकडे येऊन सवंग मिळू लागल्यामुळें आमचे पूर्वीचे धंदे बहुतेक बसले. तेव्हां अर्थात् हे धंदे करणारे शेतकीचा आश्रय करून त्या धंद्यांतली मजुरी कमी करण्यास कारण झाले. त्यामुळें एकंदर शेतकरीवर्गाची स्थिति कंगाल झाली. तेव्हां ही स्थिति सुधारण्याचा मुख्य उपाय म्हटला म्हणजे इकडे दुसरे उपयुक्त  धंदे वाढविणें हा होय.

तूर्त इकडे जे कित्येक उपयुक्त धंदे चालू आहेत ते बहुतेक परस्थांच्या भांडवलानें, परिश्रमानें व ज्ञानाच्या साहाय्यानें चालू आहेत. उदाहरणार्थ, एकट्या बंगाल इलाख्यांत कोळशाच्या साठ पांसष्ट खाणी चालू असून त्यांत सुमारें २५ हजार लहान मोठी माणसें खपत आहेत. पण त्या सगळ्या युरोपस्थानीं चालविलेल्या आहेत. बंगाल्यांतल्या ह्या खाणीशिवाय आणखी पलमो, रेवा, वऱ्हाड, दार्जिलिंग जवळील हिमालयाचा पायथा इत्यादि ठिकाणींही कोळसा लागला आहे, आणखीही शोध केल्यास तो पुष्कळ ठिकाणी लागण्याच्या संभव आहे. ह्या सर्व ठिकाणीं जर योग्य मेहनत करून कोळसा काढण्याचें काम जारीनें चालविले, तर इंग्लंडांतून इकडे कोळसा आणण्याची गरज न पडून आणखीं इकडच्या पुष्कळ लोकांना काम मिळेल. अशीच गोष्ट पेट्रोलियमची आहे. रावळपिंडी, आसाम, ब्रम्हदेश इत्यादि ठिकाणीं पेट्रोलियमच्या खाणीं आहेत. पण त्या तूर्त चालाच्या तशा चालत नाहींत; सध्यां कायत्या दोनच खाणीं चार लाखांच्या भांडवलांवर चालू आहेत. असें सांगतात कीं, योग्य शोध केल्यास पेट्रोलियमच्या आणखीं पुष्कळ खाणीं सांपडून, हिंदुस्थानांत त्याची उत्पत्ति अतोनात होईल; आणि रशिया, कॅनडा इत्यादि ठिकाणांहून केरोसीन आणण्याची आह्माला गरज न उरतां उलट आम्हीच ते इतर देशांना पुरवूं. हें सगळें खरें. पण ते होतें कसें? आमच्या ह्या भौतिक संपत्तीचा आह्माला लाभ करून घेण्याचें ज्ञान किंवा हिंमत असेल तर ना? आमच्या घरांतली दौलत आह्माला दुसऱ्यांनी दाखवून द्यावी, तेव्हां

उमगणार; आणि तीही खणून काढण्याचीं बुद्धि किंवा दगदग आम्हाला होत नाहीं. तीं त्यांनी खणून काढावी, आणि आम्ही त्यांच्या गुलामाप्रमाणें खपून काय थोडीशी भाकर मिळेल त्यावर समाधान मानावें. या पलीकडे आमची धाव जातच नाहीं. पण ही स्थिति आतां बदलली पाहिजे. ज्यांस थोडे बहुत कळतें आहे, त्यांनीं योग्यप्रकारचें प्रयत्न केलें पाहिजेत. प्रथमत: आमची भौतिक संपत्ति जी जमिनीच्या पोटांत आहे ती हुडकून काढण्यास आम्हाला डोळे आले पाहिजेत. ते भूगर्भादि शास्त्रांच्या अध्ययनानें व शोधानें येणार. तेव्हां ह्या उपयुक्त शास्त्रांचा अभ्यास आमच्या इकडे वाढेल तेवढा थोडा आहे. केवळ इंग्रजी, संस्कृत किंवा देशभाषा यांतील काव्यादि भाषाविषयक ग्रंथांत प्राविण्य संपादिल्यानें इतिकर्तव्यता झाली असे जे आमचे उपपदधारी मानीत असतील त्यांची सुशिक्षणाची इयत्ता अत्यंत संकुचित समजावयाची. आतां ज्या कित्येक उपपदधाऱ्यांकडून थोडासा शास्त्राभ्यास होत असतो, ते परीक्षा आटपतांच ज्ञानसंपादन आटपलें असें समस्त पुस्तकांना वाळवेच्या स्वाधीन करून पैसा मिळविण्याच्या खटपटींत चूर होणें, हेंच आपलें कर्तव्य असें समजतील, तर ती त्यांची चूक आहे. वास्तविक पाहतां परीक्षा आटोपली म्हणजे त्यांच्या खऱ्या ज्ञानार्जनास प्रारंभ होतो, कॉलेजांत जे जे शिकतात, त्याचा उपयोग फक्त त्यांस ज्ञानसंपादनास समर्थ करण्यापुरताच होय, हें त्यांनीं पक्के ध्यानांत बाळगावें. आमच्या पाठशाळांतून जो शास्त्राभ्यास चालू आहे तो अगदीं प्राथमिक आहे. त्यांत कित्येक शास्त्रांच्या मुख्य मुख्य तत्त्वाचेंच ज्ञान होण्याची काय ती सोय आहे. दुसऱ्या कित्येक उपयुक्त शास्त्रांचे त्यांत नांवही नाहीं. असें आहे, त्यापेक्षां एकर हा शास्त्राभ्यास कॉलेजांतून वगैरे वाढवून त्यांत आणखी महत्त्वाचीं शास्त्रें सामील केली पाहिजेत. दुसरें, ज्यांस हा शास्त्राभ्यास कमी जास्त मानानें सध्या होत आहे त्यांनीं तो पुढें तसाच चालू ठेवण्याविषयीं झटावें. शिवाय इतर उपयुक्त शास्त्रांचा अभ्यास करण्याचीही त्याला योग्यता आलेली असतें. तेव्हां त्यांचेही ज्ञान यथावकास संपादण्याविषयीं त्यांनी तत्पर असावें. आणि ह्या प्रकारें जे शास्त्राध्ययन करून उपयुक्त कलांस अल्पमात्र तरी साहाय्य करतील, त्यांस सरकारकडून व लोकांकडून मदत व उत्तेजन मिळावें. असें झालें तरच आमचा उत्कर्ष होण्याची थोडी बहुत आशा आहे.

***

# १६ आमची शेती

(ता. ८- ११-१८९१)

मे. एच. एस. जिनवाला ह्या प्रसिद्ध पारसी गृहस्थानें चालू महिन्याच्या पहिल्या तारखेच्या 'स्पेक्टेटरच्या' अंकांत शेतीवर एक लेख लिहिला आहे. त्याचा सारांश आमच्या मराठी वाचकांसाठी येथें देतों.

हे गृहस्थ प्रारंभीच अशी सूचना करितात कीं, ज्या एतद्देशीय लोकांच्या हातीं राज्यकारभार चालविण्याचें काम आहे त्यांनीं लोकांकडून शेतीवर निबंध मागवावे. आणि ज्यांचे उत्तम ठरतील त्यांस चांगली मोठी बक्षिसे द्यावी. आमच्या या देशाची शेती सुधारेल कशी; सध्यां युरोपखंडांत कृषिकर्मात जे उपयुक्त फेरफार झाले आहेत, त्यांचा इकडे कितपत उपयोग करून घेता येईल; इकडच्या जमिनी ज्या उत्तरोत्तर बेकस व नापिक होत चालल्या आहेत त्यांची रसायन शास्त्राच्या सहाय्यानें कसकशी सुधारणा करतां येईल! शेतकीच्या विरवणांत वगैरें कोणकोणतें उपयुक्त अल्पखर्चाचें असें फेरबदल करतां येतील; त्याचप्रमाणें शेतकरी लोकांच्या स्थितीची सुधारणा कोणकोणत्या प्रकारे व्हावी; त्यांच्या मनांचा विकास कोणत्या उपायांनी करतां येईल; त्यांनीं पैसा मिळवून खर्चावा कसा व काटकसर करून आपत्कालासाठीं थोडासा राखून ठेवण्याचा प्रयत्न कसा करावा; व दुष्काळासारख्या घोर प्रसंगास टक्कर देण्याची तयारी आधींपासून त्यांनी कशी काय करावी, इत्यादि गोष्टींचा विचार साध्या सरळभाषेत असल्या निबंधांतून होण्याची तजवीज ठेवावी; आणि जे निबंध पसंत ठरतील तें निरनिराळ्या जिल्ह्यांतील भाषांत छापून सर्वास अगदीं थोड्या किंमतीत मिळतील असें करावें.

मुंबई इलाख्यांत शेतीच्या शिक्षणाविषयींचा विचार प्रथमतः सर रिचर्ड टेंपल यांनी करून त्यावर एक नामी खलिता हिंदुस्थान सरकारला लिहिला. त्याच्यामुळें महाराष्ट्रांत एक दोन शेतकी शिक्षणाच्या पाठशाळा स्थापित झाल्या. ह्या शाळांत तूर्त थोडे बहुत उपयुक्त शिक्षण कित्येकांना मिळू लागले आहे. पण चमत्कार असा झाला कीं, जे

मोठमोठे श्रीमंत लोक आहेत त्याला असल्या उपयुक्त संस्थांचा फायदा घ्यावयास किंवा त्यास साहाय्य करावयास मुळींच नको आहे. आणि जे गोरगरीब शेतकरी आहेत त्याला तर ह्या उपयुक्त संस्थेचा उपयोग करून घेण्याची ताकद नाहीं. तरीपण कालेंकरून ह्या संस्थेचा लोकांस विशेष उपयोग होत जाण्याचा रंग आहे. आतां अशा प्रकारची उपयुक्त संस्था गुजराथप्रांतांत एकही कां नसावी हे कळत नाहीं. सरकारनें असा पक्षपात न करितां अमदाबादेस किंवा भडोच येथें एकाद दुसरी शेतकीची पाठशाळा अवश्य स्थापण्याची तजवीज करावी.

आमच्या इकडच्या अस्मार्त कालापासून चालू असलेल्या नांगरांत अवश्य फेरफार झाला पाहिजे. अजून रयतेस होईल तितक्या हलक्या किमतींत नवीन प्रकारचा नांगर मिळत नाहीं. या इलाख्यांतील शेतकीखात्याचे डायरेक्टर सरकारी शेतांत, व गुजराथेंतील मिशनरी लोकांनीं बसविलेल्या खेड्यांतून सुधारलेल्या तऱ्हेचे नांगर योजीत आहेत. पण ते गरीब शेतकऱ्यास विकत घेण्याचें मुळींच त्राण नाहीं. मद्रास इलाख्यांत अलीकडे स्विडिश कंपनीचा सोळा शिलिंग म्हणजे सरासरी नऊ रुपये किमतीचा नांगर उपयोगांत येत असून उत्तरोत्तर ह्याचा खप साधारण शेतकऱ्यांतही अधिकाधिक होत चालला आहे.

परंतु, ह्या प्रकरणीं केवळ निराश होण्याची गरज नाहीं. जनरल अंगलोनामक एक युरोपियन गृहस्थ हिसार शेताची लागवड करीत आहे. त्यानें ह्या देशाच्या पुरातन नांगरांतच कांही चांगल्या प्रकारच्या सुधारणा केल्या आहेत. अशा ह्या सुधारलेल्या नांगरास फक्त चार पांच रुपये पडतात. जुन्या नांगरानें जेथें चार पांच इंच खोल जमीन नांगरली जात असे, तेथें आतां ह्या अंग्लोसाहेबांनीं सुधारलेल्या नांगराच्या योगानें जवळ जवळ बारा इंच खोल नांगरतां येते; आणि बैल तरी जास्त लावावें लागतात म्हणावें तर तेंही नाहीं. अशा प्रकारें जमीन चांगली खोल नांगरल्यामुळें शेतास पीक चांगलें येतें असें साहेब मजकुरांनी सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. त्यावरून तिकडे पुष्कळ शेतकऱ्यांच्या उपयोगांत त्यांचा नांगर येत चालला आहे. रयतेची अशीच सप्रमाण खात्री करण्याची तजवीज, जर सरकार किंवा दुसरे स्वदेशहितेच्छु जन करितील, तर ह्या नांगराचा बहुतेक सार्वत्रिक प्रसार होण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. आमचे शेतकरी लोक कितीही पुराणप्रिय असले, तरी त्यांस स्वहित होण्याचा एकादा संयुक्तिक व निश्चयात्मक मार्ग दाखवून दिल्यास त्याचा ते स्विकार करणार नाहींत असें सहसा व्हावयाचें नाहीं. मात्र तो दाखवून देण्याचीं खटपट योग्य प्रकारें, आस्थेनें व निरपेक्ष बुद्धीनें केली पाहिजे. कारण बहुतेकांची स्थिति इतकी विपन्न आहे

कीं, त्यांला एखाद्या गोष्टींत पैशाचा किंवा मेहनतीचा व्यर्थ व्यय करणें फारच जड जातें. एतद्देशीय संस्थानिकांनीं असल्या गोष्टी मनावर घेतल्यास पुष्कळ हित होण्याचा संभव आहे.

पाण्याची दुर्मिळता हें एक आमची शेतकी निकृष्ट स्थितींत असण्याचें मुख्य कारण आहे. हे कारण नाहीसें करून टाकण्यासाठीं मोठमोठीं पाटानें पाणी नेण्याचीं कामें जिकडे सोय असेल तिकडे चालू केलीं पाहिजेत. अशा रीतीनें पाण्याची कमताई नाहींशी झाल्यानें दुष्काळादिकांपासून रयतेचें व सरकारचें फारसें नुकसान होण्याची भाति नाहीं. या पाटाच्या पाण्याच्या उपयोगाचें एक उदाहरण देऊं. तें अर्थात वायव्येकडील प्रांताचें होय. ह्या प्रांतांत १८३७ सालीं दुष्काळ पडून सुमारें दहालाख माणसें अन्नान्न करून मरण पावलीं. तींच १८६७ सालच्या दुष्काळांत अगदीं कमी मेलीं. कां तर, तितक्या अवधींत सरकारानें तिकडे कालवे खणून चोहोंकडे पाणी खेळविले. शिवाय आगगाडीच्या योगानेंही इतर आबादान प्रांतांतून धान्याचा पुरवठा होऊन लोकांची उपासमार झाली नाहीं.

आमचें इंग्रज सरकार अगदीं निदानीचा प्रसंग येईपर्यंत असल्या उपयुक्त कामास हात घालीत नाहीं. यास एक दाखला देतों. ओरिसा प्रांतांत १८६७ सालीं दुष्काळ पडून सुमारें एक तृतीयांश लोकसंख्या अन्नाच्या महर्गतेमुळे प्राणास मुकल्यानंतर मग सरकाराला तेथें कालवें खणण्याची बुद्धी सुचली, आणि त्या प्रीत्यर्थ कांही पैसा खर्चण्याचें ठरविलें. पण हा पैसा प्रतिवर्षी अगदीं थोडथोडा खर्चण्याचें त्यानें ठरविलें. तेणेंकरून पुढें आणखी दुष्काळ पडतच राहिले. १८३७ पासून १८७८ पर्यंत एक कोट रुपये कालवे खणण्याकडे खर्च केलें असून, एक कोट साठ लक्षांची रक्कम दुष्काळ निवारणार्थ खर्ची घातली. आमच्या सरकारला दुष्काळ पडल्यावर तो निवारण्याच्या खटपटींत पडण्यापेक्षा दुष्काळाचें कारणच साधेल तितके काढून टाकण्यांत केवढें हित, शहाणपण व नीति आहे तें अजूनही चांगले कळूं नये ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

एकंदर सर्व हिंदुस्थानांत १९७२,५०००० एकर जमीन लागवडींत आलेली असून त्यांतली पाटाच्या पाण्यानें २९२२०३०० एकर लागवडींत आली आहे. ह्या पाटाच्या पाण्याच्या संबंधानें आणखी एक गोष्ट निश्चित झाल्यासारखीं आहे. ती ही कीं, कोणी खासगी मंडळ्या वगैरे करून भांडवल उभें करून कालवे खणण्याचें काम सुरू करीन म्हणेल, तर त्यांत त्यांस ह्यां देशांत मुळीच यश येण्यासारखें नाहीं. याकरितां हें काम सरकारनेंच आपल्या आंगावर घेतले पाहिजे. एरवीं निभाव नाहीं.

आमच्या इकडून ग्रेटब्रिटनास जें शेतकीचे उत्पन्न जात असतें त्यांत गहू मुख्य होय. आमचा गहूं अमेरिकन गव्हांपेक्षां चांगला असून तो इकडे उत्पन्न करण्याचा खर्चही कमी असतो. हल्लीं आमच्या इकडे १९३२९२०० एकर जमिनींत गहू उत्पन्न होत असून दर एकरीं ८ पासून तेरा बुशेल उत्पन्न होत आहे. हें उत्पन्न शेतकीच्या सुधारणेचे योग्य उपाय योजल्यास २१ पासून ३२ बुशेलपर्यंत वाढविता येईल. परंतु सध्यां ग्रेटब्रिटनात अमेरिकन गव्हाची सरशी कां बरें आहे? याची कारणें अनेक आहेत. त्यांत देशांत चोहोंकडचा माल एके ठिकाणी जमा होण्याची रेलवे वगैरेचीं साधनें इकडे असावीं तशीं नाहींत. दुसरें इंग्लंडांतील वगैरे बाजारांत तो जसा मांडला जावा तसा जात नाहीं. इत्यादि प्रमुख होत. ह्या गव्हाच्या व्यापाराच्या संबंधानें येथील चेंबर ऑफ कामर्सनें सरकाराकडून प्रतिवर्षी १०००० रुपयांचा खर्च करविण्याची तजवीज केली आहे. ही रक्कम इकडील गव्हांविषयींची माहिती व्यापाऱ्यांना योग्य वेळी छापवून पाठविण्यांत व उत्तम प्रकारचें बी शेतकऱ्यांस अगदीं थोड्या किंमतीत मिळवून देण्यांची सोय करविण्यांत, व चांगल्या प्रकारचा गहूं उत्पन्न करण्याच्या पद्धतीचें ज्ञान शेतकऱ्यांस करून देण्यांत खर्चावयाची असें ठरलें आहे.

ह्या गव्हांच्या व्यापाराच्या संबंधानें एका गृहस्थानें एक लहानसें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यानें खालील सूचना केल्या आहेत.

(१) ज्या खेड्यांतून गव्हांची लागवड होते, त्यांतील प्रमुख शेतकऱ्यांच्या मनावर असें ठसविण्याचा प्रयत्न करावा कीं, त्यांनी भेळ न केलेलें बी योजून येईल तितका चांगला कसदार दाणा पैदा करण्याचा प्रयत्न करावा.

(२) सर्व शेतकऱ्यांस उत्तम बीं मिळवून देण्याची तजवीज व्हावी. ही बियांची निवड करण्यास इंग्लंडांतून ह्या विषयांत वाकबगार असा एकादा गृहस्थ आणावा.

(३) इंग्लंडांत खपणाऱ्या अशा गव्हांचे निरनिराळे मासले प्रत्येक बाजारांत मांडण्याची तजवीज व्हावी.

(४) गव्हांच्या व्यापाराच्या मुख्य ठाण्यांस ठिकठिकाणाहून धान्याच्या भावाच्या वगैरे तारा जाव्या.

(५) धान्याची प्रदर्शनें जागोजाग भरवावीं.

ही जशी गव्हांच्या व्यापाराच्या संबंधानें आमच्या इकडील युरोपियन व्यापाऱ्यांनीं उचल घेतली आहे, तशीच जर इतर शेतकीच्या उत्पन्नासबंधानें घेतली तर देशांत पुष्कळ सुबत्ता होऊन, नेहमीं वाढत्या प्रमाणावर असलेल्या प्रजेंत भुकेकंगालांची संख्या कमी होईल आणि तितक्यामानानें देशांतील विपत्तीचें मान कमी होईल.

***

# १७ पाऊस पाडतां येईल काय?

(सुबोधपत्रिका १५-११-१८९१)

पाश्चिमात्य राष्ट्रांतील शास्त्रज्ञ पुरुषांचे नित्य नवे शोध चालले आहेत. कृपण जसा संपादित द्रव्यानें तृप्त न होऊन अधिकाधिक वित्तार्जनांत अगदीं चूर असतो तित्तध्ये तिकडे निरनिराळ्या ज्ञानाच्या शास्त्ताचे प्रणेते त्यांत नवी भर चालण्या-विषयीं अहर्निश झटत आहेत; आणि तितक्या मानानें निसर्ग मनुष्याच्या कह्यांत उत्तरोत्तर जास्त आणून देऊन मानवजातीचें सुख वृद्धिंगत करीत आहेत.

वारा, पाऊस इत्यादि अंतरिक्षगत व्यापाराचें ज्ञान शास्त्रज्ञांस आजला अत्यल्प प्रमाणानें झालें असून त्या व्यापारांत इष्ट प्रकारचा फेरफार करण्याचें मनुष्याच्या हातीं अगदीं थोडें आहे. त्यांतून पाऊस तर मनुष्याच्या जीवनास अत्यावश्यक असल्यामुळें त्याच्या पडद्याच्या वगैरे नियमांच्या ज्ञानाची जरुरी कोणत्याही स्थितिंतील मनुष्यास वाटण्यासारखीं आहे. परंतु तो हवा तेव्हां पाडता येण्याचें सामर्थ्य मनुष्यास कधींही येण्याचा संभव अत्यंत सूक्ष्मबुद्धि मनुष्यासही न वाटल्यामुळें असल्या शोधांत आपली बुद्धि व काळ यांचा व्यय करण्यांत कांहीं हाशील नाहीं असें कालपरवापर्यंत पुष्कळांस वाटत होतें. परंतु प्राप्त झालेल्या शास्त्रबलानें योग्य प्रयत्न, शोध व अवलोकन केल्यास ह्याही गोष्टीच्या संबंधानें मनुष्यास अगदींच निराश होऊन केवळ दैवावर भरंसा ठेवून राहण्याची गरज उरणार नाहीं, असें नुकतेंच अमेरिकेंमध्यें झालेल्या एतद्विषयक प्रयोगावरून म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. ह्या त्यांच्या प्रयोगांनीं असें सिद्ध होण्याचा दृढ संभव दिसत आहे कीं, कांहीं विशेष कारण्याचा विशेष स्थळी प्रयोग केल्यानें थोड्याच अवकाशांत सभोवतालच्या बऱ्याच प्रदेशांत पाऊस पडतो. आतां हे त्यांचे प्रयोग कोणतें आहेत त्याचें थोडेसें स्वरूप जें आम्हांस कळलें आहे तें येथें सांगतो.

हे प्रयोग मुख्यतः तीन प्रकारचें आजपर्यंत योजण्यांत आले आहेत. पहिला प्रयोग असा आहे कीं, एकाद्या उंचवठ्यावर डिनमाइट व रॅकेरॉक नामक पदार्थ पेटवून मोठाले आवाज काढावयाचे. दुसऱ्या प्रयोगांत विद्युत्मय तारेच्या साहाय्यानें अंतराळांत

पतंग उडवून त्याच्या शेंड्याशीं लटकविलेल्या डिनमाइशलाका पेटवून आवाज काढावयाचे; आणि तिसरा प्रयोग विमानाचा. हीं विमानें ऑक्सिजन व हैड्रोजन या वायूंच्या मिश्रणानें भरलेलीं असून ती आकाशांत ऊंच वर उडवून त्याचा स्फोट करावयाचा. ह्या तीन प्रयोगांपैकी विद्युत्मय तारांचा प्रयोग मात्र वाऱ्याच्या प्रतिकूलतेमुळें फसला. बाकीचे दोन्ही प्रयोग काहीं महिन्यांपूर्वी अमेरिकेंत टेक्सास नांवाच्या स्थळी जनरल डिरेनफार्थ नामक एका गृहस्थानें सुमारें सोळा दिवसपर्यंत चालविले असून, त्यांवरून इष्ट गोष्टींचा निर्णय बहुतेक झाल्यासारखा आहे. पहिल्या पहिल्यानें ह्या प्रयोगानंतर थोड्या बहुत वेळानें पाऊस पडला खरा, परंतु तो ह्याच प्रयोगानीं पडला असें खास म्हणतां आलें नाहीं. कारण त्यावेळीं स्वाभाविक पावसाचींही चिन्हे वरीच विद्यमान होतीं. परंतु पुढें पुढें पावसाचें मुळींच कांहीं चिन्ह नसतां ह्या प्रयोगानंतर लवकरच पाऊस चोहोंकडे पडला. त्यावरून मशारनिल्हे जनरल यांचें असें म्हणणें आहे कीं, ही वृष्टि पूर्वी केलेल्या प्रयोगाचेंच कार्य होय. आतां या कार्यकारणसंबंधाचें निरंतरत्व व अनन्यतत्व इतर शास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या स्थळीं व निरनिराळ्या स्थळीं व निरनिराळ्या सदर्हू प्रयोग करून निश्चित केलें पाहिजे, हें उघड आहे. विवक्षितकाळीं पाऊस पडावयाचा आहे तर कोणती स्थिति अनुकूल असावयास पाहिजे, व कोणत्या कारणांचा प्रयोग केला म्हणजे इष्ट कार्यसिद्धि हटकून होईल याचा खुलासेवार निर्णय आल्यावाचून ह्या अत्यंत उपयुक्त शोधास शास्त्रीय सिद्धांताचें स्वरूप यावयाचें नाहीं.

आतां ह्या वर सांगितलेल्या प्रयोगाचा पाऊस पडण्याशीं कसा काय संबंध आहे तें थोडक्यांत सांगतों. आधीं मुळीं हे प्रयोग करण्याची कल्पनाच कशी निघाली तें सांगितले पाहिजे. इ. स. १८७० सालीं अमेरिकेंतील एका शोधक पुरुषानें असें जगजाहीर केले कीं, गुलामगिरीच्या संबंधानें संयुक्त संस्थानांत जो आपापसांत घोर संग्राम माजून राहिला होता, त्यांत एकंदर १९८ लहान मोठ्या लढाया झाल्या असून ह्यापैकीं बहुतकरून प्रत्येक लढाईनंतर थोड्याशा वेळानें पावसाची सर येत असे. असाच अनुभव इतरही कित्येक युद्धप्रसंगीं आल्याचा पुरावा आहे. आमच्या ह्या देशांत प्लासीच्या वगैरे लढाया चालल्या असतांनाच एकाएकीं पाऊस कोसळून इंग्लिशाच्या शत्रूंचा दारूगोळा भिजून गेल्याचा वृत्तांत पुष्कळांच्या ध्यानांत असेल. ह्या अनुभवाचे सत्यत्व स्थापित करण्याचा एक प्रयत्न १८७४ सालीं अमेरिकेंत झाला होता. पण तो चांगलासा सिद्धीस गेला नाहीं. हा प्रयत्न पुन्हा तिकडील शेतकी खात्याच्या विद्यमाने गेल्या वर्षांपासून चालविला आहे. पदार्थविज्ञानवेत्ते ह्या गोष्टीचें कारण असें सांगतात कीं, सदर्हू प्रयोगांतील जोराच्या आवाजामुळें हवेत मोठ्या

वेगाच्या लहरी उत्पन्न होऊन त्या एकमेकांवर मोठ्या जोरानें आदळतात, तेव्हां त्यांत असलेले बाष्प कण परस्परांवर आपटून त्यांचा संकोच होऊन उदकबिंदु बनतात; आणि ह्या अशा स्थितींत ते इतर हवेहून जड होऊन खालीं पतन पावतात. ह्या गोष्टींची प्रतीति पूर्वोक्त सेनापतीस टेक्सास येथें भरपूर आली आहे. तो म्हणतो कीं, वर सांगितलेले प्रयोग केल्यानंतर दहाबारा सेकंदाच्या अवकाशांत पाण्याचे तुशार पडत असत. दुसरें असे कीं, स्वाभाविक स्थितीमध्ये जो पाऊस पडतो तो निरनिराळ्या उष्णमानाचे दोन अथवा अधिक आर्द्रतायुक्त हवेचे लोट संयोग पावले म्हणजे ही स्थिति वरील कृत्रीम उपायांनीं अस्तित्वांत आणतां येतें हें उघड आहे. सारांश काय कीं, हवेची स्थिति पाण्याची वाफ राखून ठेवण्यास नालायक अशी झाली पाहिजे. ही स्थिति जी वरील कृत्रीम उपायांनी उत्पन्न होण्याचा संभव आहे म्हणून सांगितलें त्यावर कित्येकांची दुसरी अशी कल्पना आहे कीं, हा परिणाम केवळ वाफेच्या धनीभवनानेंच उत्पन्न होतो असें नाहीं तर हवेंत कॉर्बानीक ॲसिड नामक वायूचा जास्त पुरवठा होऊन कोळशाचे वगैरे सूक्ष्म कणांची चोहोंकडे रेलचेल होते, यामुळेंही तो संभवतो. ह्या दोन्ही कल्पना कदाचित् खऱ्या असतील. पुढे आणखी शोधाअंती त्यांच्या सत्यासत्यत्वाचा निकाल होईलच. आमच्या ह्या देशांतही हे प्रयोग करून पाहण्याचे आमच्या सरकारानें मनावर घेतलें पाहिजे. नुकतेच मद्रास इलाख्यांतील कडपा प्रांताच्या कलेक्टरनें आपण होऊन अशा प्रकारचे काही प्रयोग करून पाहिल्याची बातमी आहे. तर असे प्रयोग आमच्या इकडच्या शेतकी खात्यानें जागोजाग करून पहाण्याविषयीं बिलकुल आळस करितां कामा नये. ह्या देशांत प्रतिवर्षी कोठे ना कोठे तरी अवर्षण होऊन लहान मोठा दुष्काळ पडतच असतो. तेव्हां वर सांगितलेल्या प्रकारचा शोध लागून पाऊस पडण्याच्या खऱ्या व निश्चित उपायांची माहिती झाल्यास यथाकाळीं हवातितका पाऊस पाडितां येऊन अवर्षणाचे दुष्परिणाम टळतील; आणि सहस्रावधि मनुष्यांच्या विपत्तीचा व दुःखाचा परिहार होईल. वर सांगितल्यासारख्या कोणत्यातरी कृत्रीम उपायांची पाऊस पाडण्याच्या कामी योजना केल्यास खर्च तरी फारसा येतो म्हणावें तर तेंही नाहीं. वर टेक्सास येथें जे पंधरा सोळा दिवस प्रयोग चालले होते, त्यांच्याप्रीत्यर्थ अवघे ९००० डॉलर म्हणजे सरासरी वीस हजार रुपये खर्चण्याचें ठरविलें होतें. त्यांतली फारच थोडी रक्कम खर्च झाली असा अदमास आहे. आमच्या सरकारानें अवर्षणानें पडणाऱ्या दुष्काळासाठी म्हणून जी रक्कम एकीकडे काढून ठेविली आहे, तिच्यांतली अगदीं थोडी जेथें गरज लागेल तेथें खर्चण्याचा विचार केल्यास पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. परंतु, हा सर्व संभाव्यतेचा प्रकार झाला. प्रथमतः हा पाऊस पडण्याचा कृत्रीम उपाय निश्चित झाला पाहिजे; आणि तो तसा लवकरच सत्य शोधकांच्या परिश्रमानें होवो अशी आमची मनापासून इच्छा आहे.

***

# १८ आमच्या समाजांतील दुहि

(सुबोधपत्रिका २२-११-१८९१)

आमची दुःस्थिति आतां जगद्विश्रुत झाली आहे. सर्व सुधारलेल्या जगांत निकृष्ठावस्थेच्या संबंधानें भारतवर्षीयांचीं आजला पहिली प्रत लागली आहे. ज्यांना निरनिराळ्या देशांच्या स्थितीची तुलना करण्याची साधनें अनुकूल असून, जे सत्यप्रिय आहेत त्यांची ह्या गोष्टीविषयीं आतां दोन मतें होण्याचा संभव नाहीं. ही परम उद्वेगकारक स्थिति आम्हांस प्राप्त झाल्याची कारणें अनेक आहेत. व तिचा परिहार करण्याचे उपायही अनेक आहेत. परंतु जसे कित्येक कारणे उद्भवण्यास आम्हीं कोणत्याहीं प्रकारें कारण झालो नाहीं तर त्यांचा योग यादृच्छेनें घडून आला, त्याचप्रमाणें त्यांचा निरास करण्याचेही बरेच उपाय योजण्याचे आम्हांस सांप्रत सामर्थ्य नाहीं. तेव्हां तूर्त ह्या अपरिहार्य गोष्टीविषयीं खंती होत न बसतां जी प्रस्तुत स्थितिमूलक कारणें आमच्या हलगर्जीपणामुळें, अज्ञानामुळें किंवा परस्पर द्वेषमत्सरादि समाजव्यवस्थाविघातक वृत्तींमुळे अस्तित्वांत आलीं असतील, त्यांचा आपण सद्यःस्थितींत विचार करून त्यांचें निर्मूलन करण्याच्या प्रयत्नास कायावाचामनेंकरून लागणें इष्ट होय. त्याचप्रमाणें जे उपाय आपल्या हातचे आहेत त्यांनीच योजना करण्यास झटल्यास, काल, बुद्धि आणि शक्ती यांचा योग्य विनियोग केलासा होणार आहे. नाहीतर ज्या गोष्टी आपल्यास सध्यांच्या काळी साध्य होण्यासारख्या नाहींत त्यांच्या नादी लागून परिणामीं फसल्यासारखें होणार आहे. आमच्यातील ज्या पाश्चात्यविद्यासुसंस्कृत जनांच्या ठायीं स्वदेशहितेच्छा जागृत होऊन थोडीबहुत क्रियाद्वारा प्रगट होऊं लागलीं आहे, त्याला स्वसामर्थ्याचें धोरण न राहून मोठमोठीं आचाट कृत्यें हातीं घ्यावीशी वाटतात. याचे कारण उघडच आहे कीं, स्वदेशबंधूंची सर्वप्रकारची कंगालस्थिती पाहून ती नष्ट करण्याविषयीं विलक्षण उतावीळपणा व अधीरता ही त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न होतात. म्हणून कधीं कधीं त्यांच्या हातून उपाय योजनेच्या संबंधानें प्रमाद होतात. आतां ही प्रमादप्रवणतां मनुष्यास स्वाभाविकच असल्यामुळें तिजबद्दल केवळ सद्धेतूंनीं प्रोत्साहित होत्साते जे

प्रयत्न करितात, त्यांस वृथा दोष लावून त्यांच्या हातून घडलेल्या अल्प स्वल्प प्रमादावरून त्यांच्याठायी असद्धेतूंचा आरोप करणे सहसा इष्ट नव्हे. असें करणें अत्युत्कट कृतघ्नतेचें द्योतक होय. अशाप्रकारें स्वदेशहितैषी जनांचा निषेध पुराणप्रिय व मिथ्याभिमानी लोकांकडून नेहमीं अप्रतिहितपणे होत गेल्यानें जे कीर्तीच्या किंवा लोकाराधनेच्या अभिलाषानेंच केवळ देशकार्य करण्यास प्रवृत्त होतात, ते स्वकर्तव्यवापासून परावृत्त होऊन देशहितांस अंतराय येतो. लौकिक किंवा दुर्लौकीक, संपत्ति किंवा विपत्ति, सुख किंवा दुःख यांची बिलकुल पर्वा न करितां केवळ निरपेक्ष बुद्धीनें स्वदेशसेवेस तनमनधनेंकरून उद्युक्त होणारे महामनस्क पुरुष आमच्या इकडे अजून म्हणण्यासारखें पैदा होऊं लागलें नाहींत. पाश्चिमात्य राष्ट्रातही अशीं अवघ्या मनुष्यजातीस भूषविणारीं नररत्नें फारच विरळा कधीं काळीं उत्पन्न होतात; आणि तीही त्या त्या काळची स्थिति अनुकूल असली तरच होतात. तेव्हां तात्पर्य काय कीं, ही एवढी अत्युच्च स्थिति आमच्या लोकांची हल्लींच्या काळीं असावी असें जे इच्छित असतील, ते वस्तुस्थितीचें व मनुष्य स्वभावाचें आपलें अज्ञान प्रगट करितात असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वकीर्ति किंवा स्वोत्कर्ष यांच्याच भरी पडून जर कोणी स्वदेशबांधवांचें वास्तविक हित करून देण्याचा प्रयत्न आरंभिला, तर तो तेवढ्याच कारणावरून दूष्य कां व्हावा तें आम्हाला कळत नाहीं. त्या त्याच्या प्रयत्नांत लोकांची प्रतारणा किंवा कोणत्याही प्रकारची हानी होण्याचा रंग असल्यास मात्र त्याचे तें आचरण दूषणीय होऊन तो लोकाधिक्षेपास पात्र व्हावा हें अगदीं रास्त आहे. परंतु असें कांहीं स्पष्टपणें निश्चित झाल्यावांचून केवळ खासगी द्वेषमत्सरादि दुर्वुत्तीस वश होऊन किंवा कुकल्पनामुलक निराधार भीतीनें ग्रस्त होऊन किंवा ज्ञानलवदुर्विदग्ध होऊन, किंवा लोकाराधनामूलक उत्कर्षादिकांस भुलून देशबांधवांच्या खऱ्या हितास झटणारांची अवहेलना व उत्साहभंग करणें यासारखे महत्पाप दुसरें नसेल. वस्तुतः पाहतां ज्याला जो देशहिताचा मार्ग सुचेल व बरासा वाटेल त्याचें त्यानें बेलाशक अनुसरण करावे. इतर जनाला तो केवळ न आवडल्यानेंच अप्रयोजक किंवा अनर्थकारक ठरत नाहीं. तर, तो तसा असल्याचें सप्रमाण सिद्ध करण्याचें त्यांनीं मनावर घेतलें पाहिजे. अशाप्रकारे निषिद्ध ठरलेल्या मार्गाचे अवलंबन कोणीही विचारी मनुष्य करणार नाहीं, हें उघड आहे; परंतु जर कोणी दुराभिमानास गुंतून केलेंच, तर तो मात्र उपहास्यतेस सर्वप्रकारें पात्र होय. कोणत्याही गोष्टीच्या सत्यासत्यत्वाचा किंवा हिताहिताचा निर्णय केवळ मनुष्याच्या रागद्वेषादि मनोवृत्तींनी होत नसतो, तर तो सदसद्विवेक, निःपक्षपातिता इत्यादि सत्यनिश्चयास अत्यावश्यक अशा गुणांच्या योगानें

झाला पाहिजे. ह्या इष्ट गुणांचा प्रादुर्भाव व विकास सुशिक्षण व सत्य जिज्ञासा इहीं करून मनुष्याच्या हृदयांत झाला पाहिजे. परंतु ह्या उभय साधनांचा आमच्या इकडे अजून व्हावा तसा फैलाव झालेला नाहीं. तेव्हां त्याचें अस्तित्व सामान्य जनांच्या ठायीं कल्पिणें व्यर्थ होय. नुसते स्मृत्यादिबुद्धिगुण विकासक शिक्षणानें चांगल्या हृदयवृत्तींचा विकास होऊन मन प्रशस्त होत नसते. ही प्रशस्तता मनांत प्राप्त होण्यास दुसऱ्याच प्रकारचें शिक्षण बाळपणापासून मिळालें पाहिजे. तें कोणतें म्हणाल, तर नीतिशिक्षण होय. सुवृत्तींचा विकास होऊन असद्वृत्तींचा बिंमोड करणारें शिक्षण आमच्या समाजांत मिळावें तसें न मिळाल्यामुळें बहुतेक सुशिक्षित म्हणविणारांची स्थिती सांप्रत पक्षघात झालेल्या माणसासारखी बहुतेक झालेली असते. तेव्हां त्याच्या ह्या व्यंगानुरूप त्यांच्याकडून क्रिया झाल्यास नवल तें कोणतें? ज्या स्वदेशहितचिंतकास असल्या मनुष्यांकडून प्रत्यवाय होत असेल, त्यांनीं त्यांचें हें शिक्षणाचें अपूर्णत्व ध्यानांत ठेवून तं नाहीसें करण्याचें उपाय योजण्यास अहर्निश झटले झटलें पाहिजे; त्यांजवर व्यर्थ संतापून विषाद पावूं नये. ज्यानें देशकार्याचा भार शिरावर घेतला, त्यानें बिलकूल न डगमगता इष्ट मुक्कामापर्यंत मजल झेपण्याचा कृतसंकल्प निश्चयानें शेवटास न्यावा. त्या इष्टकार्यसिद्धीच्याच अनन्य हेतूनें जो यत्न करूं जाईल त्यानें लोकांनीं दाखवून दिलेल्या चुकांचा थोर विचार करून तदनुसार आपलें आचरण सुधारण्यास बिलकूल कसूर करितां कामा नये. प्रमादराहित्याचा बाणा मिरविणें कोणाहीं मनुष्यास शोभत नाहीं. तेव्हां जे आपल्या चुका दाखवितात, ते अगदी सामान्य प्रतींचे लोक असले तरी त्यांच्या टिकेत कांहीं ना कांहीं तरी अर्थ असेल असें ध्यानांत वागवून त्यांच्या म्हणण्याचा शांतपणे विचार करणें प्रत्येक स्वदेशहितैषी पुरुषास उचित होय. कारण जर त्यानें योजलेला मार्ग चुकीचा असला तर केवळ मिथ्याभिमानास वश होऊन दुसऱ्याचें बिलकुल न ऐकतां हटाग्रहानें त्याच मार्गाचें अनुकरण चालविलें तर इष्ट कार्यसिद्धि व्हावी कशी?

तेव्हां तात्पर्य काय कीं, सध्यां आमच्या समाजांत जे दोन पक्ष झाले आहेत, त्यांच्या पुरस्कर्त्यांचा स्वदेशोन्नतिरूप हेतु जर समान असेल, तर त्यांच्यांत एवढा लढा दीर्घकालपर्यंत कां कायम रहावा? असा प्रश्न जो सहजी उत्पन्न होतो, त्याचें समाधान आमच्या वरील निरुपणानें होण्यासारखें आहे; आणि उभयपक्षाकडे दोषाचा अंश किती आहे हें मार्मिक वाचकांच्या ध्यानांत येऊन चुकलेच असेल. त्याची येथें पुनरुक्ति नको. ह्या मतभिन्नत्वास्तव उत्पन्न होणाऱ्या वाक्कलहाची आणखी एक

अशी मिमांसा आहे कीं, समाजव्यवस्थाविषयक गोष्टींचें यथार्थ ज्ञान दीर्घपरिश्रमलभ्य असल्यामुळें ते पुष्कळांच्या ठायीं संभवत नाहीं म्हणून त्यांस होणारी दर्शनें व समज भ्रमात्मक असताही त्यांच्या खऱ्या स्वरूपाचें त्यांस भानही होत नाहीं, आणि आपणांस समजते तेच खरें अशी अल्पज्ञानानें करपटलेल्या जनाची मिथ्या भावना होऊन ते लहान तोंडी मोठा घास घेऊं पाहतात; आणि सामान्य जनात भ्रमजालांत गुरफटविण्यास कारणीभूत होतात. ही दुरभिमानमूलक मनाची स्थिति अत्यंत अनिष्ट होय. समाजाचे नियमन व उत्कर्ष हीं कष्टसाध्य आहेत. तीं सुसाध्य करूं जाणारानीं पाश्चिमात्यतत्वज्ञ परिश्रमानें निश्चित झालेल्या समाजशास्त्रांतर्गत सिद्धांतांचे परिशीलन दीर्घकालपर्यंत केलें पाहिजे; आणि त्यांचा उपयोग आमच्या सध्याच्या समाजस्थितीस कोणत्या प्रकारें होईल याचाही सूक्ष्म बुद्धीनें विचार केला पाहिजे. असा विचार करून जे योग्य उपायांची योजना करतात, त्यांच्या हातून देशहित काहीतरी होण्याची आशा आहे. परंतु आपल्या कर्तृत्वाचा बोज न समजून व त्याच्या सिद्धीस अवश्य लागणारी योग्यता अंगी आणण्याचा प्रयत्न न करितां केवळ लोकस्फीतीस्तव किंवा दुसऱ्या कोणत्याही दुर्वृत्तीस वश होऊन वाटतील तशा वल्गना करण्यांत किंवा दुसऱ्याचा उपहास करण्यांतच ज्याला पुरुषार्थ वाटत असेल त्याला स्वदेश शत्रू म्हणण्यास हरकत नाहीं. अशा दुर्वृत्त लोकांचा सुकाळ ज्या समाजांत असतो, त्या समाजाची उन्नति होण्याची मुळींच आशा नाहीं हें खास समजावें.

***

# १९ मद्यप्रीतिरूप रोगांची चिकित्सा

(सुबोधपत्रिका २९-११-१८९१)

आधुनिक इंद्रियविज्ञानादि शास्त्रवेत्त्यांनीं असें ठरविलें आहे कीं, मद्यप्रीति हा रोग असून त्याचा प्रतिकार मनुष्याच्या केवळ इच्छेनें होण्यासारखा नाहीं. आजपर्यंत नीतिबोध करणाऱ्या उपदेशकांनीं मनुष्याच्या व्यसनासक्तीचा आपल्या हृदयद्रावक वाग्रत्नांनी नानापरी निषेध केला आहे. मद्यपानजन्य नानाविध विपत्तीचें चित्र त्यांनीं श्रोतुजनांच्या किंवा वाचकांच्या हृत्पटावर अनेक प्रसंगीं अगदीं रेखल्यासारखें काढलें आहे. परंतु हा त्यांचा हितप्रद बुद्धिवाद ऐकून मद्यासक्तीपासून परावृत्त झाले असं अगदीं थोडे. ह्याचे कारण उघडच आहे कीं, मनुष्याकडून मद्याचे सेवन कमी ज्यास्त मानानें निरंतर होत गेल्यानें त्याच्याठायीं स्वाभाविक मद्यतृष्णा उद्भवते. ही तृष्णा एकवार उत्तेजित झाली पुरे, म्हणजे मग तिचा निग्रह करण्याचे त्यास सामर्थ्य न राहून पूर्वी घडलेला बोध व अनुताप त्यास होऊन न झाल्यासारखा होतो. आजपर्यंत पुष्कळजण मद्यपान वर्जनाचा मनापासून निर्धार करून कांहीं दिवस मद्यास स्पर्श केल्यावांचून राहिले आहेत. परंतु हा त्यांचा सर्व कट्टा निर्धार लवकरच स्मशानवैराग्यवत् होऊन हे पुनः व्यसननिमग्न झाले आहेत; आणि ह्या त्यांच्या चित्तचांचल्याबद्दल अनभिज्ञजनांच्या उपहासास ते पात्र झाले आहेत. परंतु, प्रारंभी नमूद केलेला शास्त्रज्ञजनांचा सिद्धांत ज्याला कळेल ते असा अविचार न करितां मद्यासक्तांची कीवच करितील. आतां येवढें मात्र खरें कीं, हें व्यसन प्रथमारंभीं लावून घेण्याचा अविचार ज्यांच्याकडून घडतो तें व ज्यांच्याठायी त्यास रोगाचें स्वरूप आलें नसून जे तज्जन्य अनर्थ पूर्णपणें जाणत असतांही मद्यपान करोत असतात ते सर्वपरी निषेधास व निंदेस पात्र होत. कित्येक जातींमध्ये मद्यपान अगदीं निषिद्ध धरलें असून व धर्मग्रंथांतूनही त्याची पंचमहापातकांत गणना केलीं असूनही त्या जातींतलें कित्येक कन्नड लोक कुसंगतीमुळें किंवा ऐषआरामादि इतर कारणांनी मद्यसेवेस लागून, कालेंकरून अगदीं त्याचे दास होऊन जातात. हे अत्यंत गर्ह्य होय. परंतु ज्या जातींमध्यें सुरापानाचा

प्रचार चिरप्रवृत्त असून, ज्यांतल्या लोकांस केवळ बाळपणापासूनच हें विषतुल्य पेय प्राशन करण्याचा सराव असतो त्याची स्थिति मात्र अनुकंपनीय खरी. अशा लोकांच्या अंगीं मद्यव्यसन अगदीं प्रतिस्वभाव बघून निखालसपणे रोगरूप पावतें; तेव्हां त्यापासून त्यांची मुक्तता केवळ बोधानें व्हावयाची नाहीं, हे उघड आहे. अशा लोकांची दुर्दशा अपरिहार्य समजून आजपर्यंत मद्यपाननिषेधक इतर जनांस सुरापाननिवृत्त होण्याचा बोध करतांना त्यांचीही अवस्था अशीच होईल म्हणून उदाहरणें देऊन सांगत आले आहेत. परंतु, ह्यापुढें मद्यतृष्णेनें पूर्णपणें पछाडलेल्या माणसासही स्वविपत्तीच्या अनिवार्यत्वाबद्दल निराशेनें खंती होत बसण्याची पाश्चात्यांच्या परिश्रमानें जरुरी पडणार नाहीं, असें वाटतें. मात्र प्रत्येकानें ह्या नानाविपत्तिमूलक सुराभक्तीचा परित्याग करण्याचा दृढ निश्चय केला पाहिजे.

मद्य हें पाश्चात्यांचें नेहमींचे पेय आहे, हें सर्वांस माहीत आहेच आणि तिकडील कित्येक अभिज्ञ जनांच्या मतें तें समशीतोष्ण कटिबंधांतील हवेंत अत्यावश्यक आहे असेही आहे. परंतु तिकडे गेल्या चाळीस पन्नास वर्षात त्या सर्वसाधारण समजाच्या उलट मताची कांहीं मंडळी उत्पन्न होऊन, पुष्कळ ठिकाणीं मद्यनिषेधक सभा स्थापित झाल्या आहेत. ह्या सभांच्या उद्योगानें आज पुष्कळ जे सुरापानापासून निवृत्त झाले आहेत; आणि यापुढेंही आणखी होतील अशी बळकट आशा आहे. निदान ज्या मातापितरांच्या कानी किंवा नजरेस त्यांचे बोध पडतील, तीं स्वतःस नाहीं तरी आपल्या बालकांस हें अनर्थकारक व्यसन न लागूं देण्याविषयीं खबरदारी ठेवतील; त्याचप्रमाणें जे ह्या व्यसनापासून आजपर्यंत सुटलें आहेत ते तरी यापुढें त्यापासून दूर राहतील. मात्र हा मद्यनिषेधाचा बोध चोहोंकडे होण्याची खटपट जारी चालविली पाहिजे. आमच्या ह्या शहरांत असा थोडासा प्रयत्न येथील मद्यनिषेधक सभेकडून चालला आहे.

आतां आम्ही वर जें म्हटलें आहे कीं, ज्यांच्या ठायीं हें व्यसन रोगरूप पावलें असून अगदीं सुटेनासें झालें आहे, त्यांच्या त्या रोगाचा परिहार करण्याचा उपाय पाश्चात्य परिश्रमानें लवकरच सुसाध्य होईल. तें अशावरून कीं नुकतेंच अमेरिकेंत प्रसिद्ध होणाऱ्या 'नॉर्थ अमेरिकन रिव्हू' नामक मासिकांत ''दारूबाजी बरी करितां येईल'' अशा मथळ्याखाली एका वर्तमानपत्रकर्त्यानें आपला अनुभव दिला आहे. त्याच्या त्या लेखावरून असें कळतें कीं, अमेरिकेंत मद्यरोग बरे करण्याच्या हेतूनें पुष्कळ लोकांनी दवाखानें घातले आहेत. त्यांतील कांहीं दवाखान्यांत अनुभव घेऊन

निराशा होऊन हा गृहस्थ शेवटीं डॉक्टर किली नामक वैद्याच्या दवाखान्यांत गेला. तेथें तो अगदी बरा होऊन निघाल्यास आज सहासात महिने झाले असून त्याला मद्याची तृष्णा जी पूर्वी वेळोवेळी होत असे ती अगदीं नाहींशी झाली आहे; आणि यापुढेही ती त्याच्या ठायीं उद्धवण्याचा मुळींच संभव नाहीं. आतां त्याला मद्याचा पूर्ण तिटकारा वाटत आहे. हा गृहस्थ गेली वीस वर्षे अगदी पहिल्या प्रतीचा मद्यपी असून त्याच्या तोंडास एकदां बाटली लागली म्हणजे तीवाचून आठ आठ दिवस त्याला दुसरें कांहींच सुचत नसे. तो अहोरात्र कैफांत अगदी गुंग होऊन जात असें. त्यामुळें त्याच्या नेहमींच्या कामास वारंवार हरकत येऊन त्याची बरीच नापत व नाचक्की झाली होती. पुढे त्याला त्या व्यसनाचा पुरा किळस घेऊन त्यानें त्याचा त्याग करण्याचा विलक्षण प्रयत्न केला. परंतु कांहींएक फळ झाले नाहीं. शेवटीं वर सांगितलेल्या वैद्याच्या चिकिसेनें तो बरा झाला आहे. ह्या वैद्याचा औषधोपचार अगदीं सोपा आहे. मद्यरोगग्रस्त मनुष्य पहिल्यानें आला म्हणजे तो त्याच्या डाव्या हाताच्या वरल्या बाजूस शिरेमध्ये कांहीं औषध पिचकारीने मारितो. मग त्यास स्वतः तयार केलेले बाय क्लोराइड ऑफ गोल्ड नामक मिश्रण दर दोन तासांनी प्यावयास देतो. रोग्यास कधीं दारू पिण्याची इच्छा झाल्यास तो त्यास हवी तितकी देतो. पण त्यानें दिलेली दारू थोडीशी प्याली कीं पुनः पिववेनाशी होऊन तिचा पुरा तिटकारा उत्पन्न होतो. रोग्याची स्थिति जशी असेल, त्या मानानें त्यास कमी ज्यास्त दिवस त्याचें औषध घ्यावे लागते. या वैद्याचे औषध सध्या मोठमोठे लोक घेत असून शकेंडा पंचाण्णवास गूण येत आहे. हा ह्या वैद्याचा उपाय जर जगजाहीर होऊन इकडे येईल, तर आमच्या इकडची कित्येक चांगली चांगली मंडळी जी आज ह्या व्यसनास केवळ बळी पडल्यासारखीं झाली आहे, ती त्यापासून मुक्त होऊन देशहिताच्या कामास हातभार लावण्यास विशेष समर्थ होईल.

***

# २० स्वदेशाभिमान

(सुबोधपत्रिका १३-१२-१८९१)

मनुष्यास जसा स्वाभिमान, तसा राष्ट्रास स्वदेशाभिमान पुष्कळ प्रकारें हितावह होतो. ज्या देशांत किंवा जनसमूहांत आपलें वाडवडिलांपासून चिरकालिक वास्तव्य असून पुढे आपले वंशजही जेथलें निरंतरचे रहिवासी व्हावयाचें, त्या देशाविषयीं किंवा जनसमूहाविषयीं अभिमान बाळगणे स्वाभाविक असून अनेक प्रकारें हिताचेंहि आहे. ही हृदयवृत्ति ज्या मनुष्यांच्याठायीं उद्भवून विकास पावतें, त्यांच्या हातून देशकल्याण होण्याचा पुष्कळ संभव असतो. परंतु इतर कित्येक हृदयहत्तीप्रमाणें हीही वृत्ति अवस्थाभेदेंकरून कित्येक वेळां सदोष होते; आणि तेव्हां ती मोठ्या नुकसानीस कारण होतें. आपल्या देशाचा नाश किवा स्वातंत्र्यापहार करण्यास कोणी प्रवृत्त झाल्यास, त्याशीं आपल्या सुखाची, वित्ताची आत्पजनांची किंवा जीविताचीही बिलकुल परवां न करितां युद्धादि प्रसंग करून स्वदेशाचें किंवा स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास जो झटतो, तो मनुष्य खरा देशाभिमानी होय. आणि त्याच्याठायींची ती वृत्ति अत्यंत श्लाघ्य होय. परंतु, आपल्या देशाचे वैभव वाढावे, आपल्या राज्याचा विस्तार वाढावा, आपली चोहोंकडे सत्ता न जरब बसावी म्हणून इतर राष्ट्रांचा विनाकारण द्वेष संपादून कलहादिकांनीं स्वदेशांतील वित्त व चांगले हुषार मनुष्य यांची आहुति देण्यास जर ही वृत्ति कोणास प्रवृत्त करील, तर तिला निंद्य व घातक स्वरूप प्राप्त झालें असे समजावयाचे. आज निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्रांमध्ये परस्परांविषयी जो द्वेषभाव दृष्टीस पडत आहे, त्याचं बीज ह्या दोषरूप झालेल्या वृत्तीतच आहे. जोपर्यंत आसमतातचीं राष्ट्रें राज्यतृष्णेस वश होऊन, परकीयांच्या स्वातंत्र्यादिकाचा अपहार करण्यास प्रवृत्त होण्याचा रंग आहे, तोपर्यंत आपलें स्वत्व कायम राखण्यासाठी व परवशतादि दुःखमूलक अनर्थांचें होतां होईल तो निवारण करण्यासाठीं झटणे अवश्य आहे. परंतु असें करण्याची बुद्धि त्यांच्या ठायीं स्वदेशाभिमानावाचून उत्पन्न व्हावयाची नाही. म्हणूनच स्वदेशाभिमान हा गुण प्रत्येक जानपदाच्या ठायीं अवश्य असलाच पाहिजे. तो ज्याच्याठायी नाही

त्याला जानपदाचें कर्तव्य कळत नाहीं म्हणावयाचें; आणि असलीं कर्तव्यशून्य माणसें त्या लोकसमूहांत पुष्कळ होतात, त्याच्या स्वातंत्र्याचा नाश होऊन त्यास नानाविपत्ति भोगाव्या लागतात.

स्वदेशाभिमान मनुष्याच्या अंगीं असल्यानें आणखी एक असा फायदा आहे कीं, त्याचें लक्ष आपल्या देशबांधवांच्या सुधारणेकडे लागतें. निरनिराळ्या विद्या, कला व शास्त्रे यांची वृद्धि व फैलाव होऊन स्वदेशांतील व्यापार व संपत्ति वाढण्यासाठी नाना उपायांची योजना करण्यास तो ह्या वृत्तीच्या योगानें प्रवृत्त होतो. परंतु ह्या इष्ट हेतूच्या सिद्धर्थ त्यास अन्य राष्ट्रांचा किंवा लोकससूहांचा द्वेष करण्याचें मुळींच कारण नसतें. उलट इतर लोकांशी स्नेह व सलोखा राखल्यानेंच पुष्कळ हित होण्यासारखें असतें. कारण, उघडच आहे कीं, सर्व सुखोत्पादक विद्या, कला किंवा शास्त्रे एकाच विवक्षित देशांत उपन्न होऊन वाढणे वस्तुगत्याच अशक्य आहे. म्हणून प्रत्येक राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्रापासून पुष्कळ शिकण्यासारखें असतें. शिवाय व्यापारासारखें इष्ट प्रकारचे दळणवळण राष्ट्राराष्ट्रांमध्ये असल्यावांचून गतिच नाहीं. ह्या गोष्टी ज्याला नीट कळतात, त्याच्या ठायींच्या स्वदेशाभिमानास विकृत स्वरूप प्राप्त होऊन परकीयांचा द्वेष करण्याची बुद्धि निपजण्याचा संभव मुळीच नसतो. एखाद्या देशाचें किंवा लोकसमूहाचें हरएक प्रकारें कल्याण व उत्कर्ष करण्याच्या रास्त उपायांचें अवलंबन जे करूं जातील, त्यांनीं परदेशाच्या अपकर्षाची बुद्धि धरण्याची काय गरज आहे? ते विचार करतील तर त्यांना उलट असेंही दिसून येईल कीं, आसपासच्या राष्ट्रांचा उत्कर्ष झाल्यानें त्यांत आपलाही परंपरेनें उत्कर्ष आहे. परंतु ही गोष्ट सर्वच लोकांच्या मनांत चांगलीशी न वागल्यामुळें ते स्वदेश वैभववृद्धीच्या उत्कट इच्छेनें प्रेरित होऊन परापराष्ट्रांच्या रास्त सुखशांतीची, हक्कांची किंबहुना स्वातंत्र्याची हामि करण्यास मागे पुढें पाहात नाहीत; त्या त्यांच्या अनिवार वैभवतृष्णेमुळें ते निरनिराळ्या लोकांतील द्वेष, कलह इत्यादिकांस कारण होऊन एकंदर मनुष्य जातीच्या सुखास अंतराय आणितात. आणि कालेंकरून स्वसुखास बहुतेक आंचवतात. तेथें हें स्वदेशाभिमानाचे स्वरूपही अत्यंत गर्हणीय होय, असें कोण म्हणणार नाहीं?

येथवर योग्य प्रकारच्या स्वदेशाभिमानापासून होणाऱ्या फायद्यांचे व तोच अभिमान अयोग्य रूप पावला असतां, त्यापासून होणारे तोटे यांचें अगदीं संक्षेपानें निरूपण केले. आतां हा उभय प्रकारचा योग्य देशाभिमान आम्ही कसा काय बाळगावा याविषयीं थोडेसें येथें सांगतो. पहिला प्रकार स्वदेश स्वातंत्र्याचा. त्याची सध्यांच्या

स्थितींत तर आम्हांला मुळींच गरज उरलेली नाहीं; हें कोणालाही कळत आहे. आमच्या स्वातंत्र्याचा अपहार करून आम्हांस ज्यांनीं सर्वस्वी परतंत्र करून सोडलें आहे, त्या लोकांचे सामर्थ्य विलक्षण असून त्यांची राज्यरीतीही अलौकिक आहे. ते आज बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांत अग्रगण्य असून मोठे स्वातंत्र्यभक्त आहेत. तेव्हा त्यांच्या दीर्घकालीन साहचर्यानें व सत्तेनें आमचें पुष्कळ प्रकारें कल्याण होऊन आम्हांस अत्यंत इष्ट जें राष्ट्रैक्य तें प्राप्त होईल; आणि निखालस स्वतंत्र्य न मिळाले, तरी स्वातंत्र्यापासून होणाऱ्या बहुतेक फायद्यांचा अनुभव आम्हांस होण्याचा दृढ संभव आहे. मात्र इंग्रजांचा अंमल आमच्यावर पुष्कळ वर्षे टिकला पाहिजे. इतर कोणत्याही राष्ट्राचा आमच्यावर ताबा असून मुळींच चालणार नाहीं. बरें, इंग्रज लोक आम्हांस आज सोडून गेले आणि दुसरे कोणतेही लोक आमच्यावर राज्य करावयास आले नाहींत, अशी क्षणभर कल्पना केली, तरी आम्ही एकमेकांशी पुनः भांडून चोहोंकडे झोटिंग पाच्छाई माजेल; आणि आपण सुखशांतीस चिरकाल मुकूं त्यासाठीं इंग्रजांची सत्ता आम्हांवर बहुतकालपर्यंत टिकेल असें आपल्याकडून होईल तेवढे केलें पाहिजे.

आतां दुसरा देशाभिमानाचा फायदा जो देशाची संपत्ति, ज्ञान वगैरे वाढविण्याचा, तो आपणास बराच सुसाध्य आहे. येथें मात्र परिश्रमास पुष्कळ जागा आहे. स्वोत्कर्ष किंवा स्वकीर्ति यांची फारशी परवा न करितां देशसेवेच्या हेतूनें स्वशक्त्यनुसार कांहींतरी उद्योग करणें हे आपलें अत्यंत मोठे कर्तव्य आहे, असें निरंतर ध्यानी वागवून तदनुसार साधेल तेवढें वर्तन करण्यास झटणारे आमच्या समाजांत जितके लोक निपजतील तितके थोडेच काहेत. हें स्वदेशकल्यानेच्छेचें बाळकडूं आमच्या लेकरांस लहानपणापासून आम्ही पाजले पाहिजे. स्वत: मोठे हुद्दे किंवा धंदे चालवून गबर झालों म्हणजे आपलें कर्तव्य आटपले असें जे समजत असतील, ते समाजाच्या संबंधानें निमकहराम होत, असें समजलें पाहिजे. ज्या समाजांत राहून त्यांनीं हें ऐश्वर्य संपादिलें त्या समाजाचा त्यांच्या वित्तावर व इतर सामर्थ्यावर हरएक प्रकारचा हक्क आहे. त्या समाजाचे ते ऋणी आहेत. त्यांनीं स्वसंपादित वित्ताचा व सामर्थ्याचा विनयोग त्या समाजाचा उत्कर्ष करण्याकडे केला पाहिजे. तो ते न करतील, तर कृतघ्नत्व दोषास पात्र होतील. ही झाली सामर्थ्याची गोष्ट. परंतु, प्रत्येक सामान्य मनुष्याच्या हातानेंही बरेच हित होण्याचा संभव आहे; आपले कर्तव्य ओळखून त्यानें मनावर मात्र घेतलें पाहिजे. तो म्हणजे समाजाचा कमी ऋणी आहे असें नाही जोंपर्यंत त्याची अशी वृत्ति होत नाही, तोपर्यंत त्याच्या मनाचा विकास इतर बाबतींत कितीही झाला असला तरी तो अपुराच

समजावयाचा. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या सुधारणेच्या इतिहासाचें जे मननपूर्वक परिशीलन करतील, त्यांस असें आढळून येईल कीं, आज ज्या मोठ्योठ्या सुधारणेच्या बाबी तिकडे प्रवृत्त होऊन उत्कर्षास कारण झाल्या आहे, त्यापैकीं बहुतेक अगदीं सामान्य प्रतीच्या माणसानीं उपस्थित केलेल्या आहेत; आणि स्वजनांच्या उपयोगी कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें पडल्यावांचून स्वजीवित साथर्क्यच नाहीं ह्या समजुतीनें प्रोत्साहित होऊन त्यांच्या हातून अविश्रांत परिश्रम झाले आहेत. अशा पुरुषांची चरित्रे आपल्यापुढे चिरकाल ठेवून तदनुसार आपल्या आयुष्याचें नियमन करण्यास आम्हापैकीं जो झडेल तोच खरा स्वदेशाभिमानी. तोच खरा धन्य. मग तो श्रीमंत असो कीं गरीब असो, विद्वान् असो कीं अविद्वान् असो, मोठा अधिकारी असो कीं अगदीं सामान्यप्रतीचा मनुष्य असो. त्याची योग्यता असल्या आगंतुक गोष्टींनीं मुळींच कमी होत नाही.

***

# २१ अभिमानाचे कांहीं अयोग्य प्रकार

(सुबोधपत्रिका २०-१२-१८९१)

गतांकीं दोन प्रकारच्या ओभमानाचा थोडासा विचार केला; आज त्याच्या आणखी कांहीं प्रकारांचे दिग्दर्शन करूं. हे बहुतेक प्रकार पुष्कळ अंशी दोषरूप आहेत असें पुढील विरूपणावरून ध्यानांत येईल. पहिल्यानें वर्णाच्या उच्चत्वाविषयींच्या अभिमानाचें विवेचन करू. हा अभिमान बहुतेक प्राचीन व अर्वाचीन सुधारलेल्या राष्ट्रातील लोकांच्या ठायीं कमी जास्त प्रमाणानें आढळतो प्राचीन यहुदी, ग्रीक, रोमन, आर्य व चिनी लोकांचा इतर लोकांविषयीं तिटकारा व द्वेषबुद्धि, आणि अर्वाचीन काळचे इंग्रज, फेंच, जर्मन वगैरे युरोपस्थ लोकांची इतर सर्व लोकांस रानटी, हलक्या प्रतीचे व क्षुद्र मानण्याची प्रवृत्ति ही जो लक्षांत आणील त्यास असें म्हणावें लागेल कीं, परस्परांमध्ये दुजाभाव उत्पन्न करणारी ही निंद्यवृत्ति मनुष्याचा जणू काय एक प्रतिस्वभावच बनून राहिली आहे. तिचें निर्मूलन अत्यंत विद्याचार संपन्न लोकांतूनही अद्यापि झाले नाहीं. देह, बुद्धि आणि वृत्ति यांच्या संबंधाने मनुष्यामनुष्यामध्यें व राष्ट्राराष्ट्रामध्यें आढळणारें भिन्नत्व केवळ यदृच्छायोगें करून प्राप्त झालेल्या परिस्थितीच्या विसदृशत्वास्तव उद्भवलें असल्या कारणानें तत्संबंधानें हर्ष किंवा विषाद मानणें कोणासही उचित नव्हे मग तीं एकाद्या व्यक्तींत किंवा जनसमूहांत चांगल्या प्रकारची असल्यास तेवढ्यानेंच त्यांस इतरांची अवहेलना करण्याचा किंवा परकीयांस क्लेशप्रद होईल असा गर्व वाहण्याचा अधिकार कोठून आला? पुनः कोणताही मनुष्य किंवा जनसंघ सर्वगुणमंडित किंवा सर्व दोषविवर्जित असा असण्याचा संभव सद्यःस्थितीत मुळींच नाहीं. तेव्हा कांहीं विवक्षित प्रकारचा चांगुलपणा एकाद्याच्या अंगीं असल्यानें तेवढ्यावरच त्यानें शेफारून जाणें अत्यंत अश्लाघ्य होय; आणि त्याच्या अंगीं हा चांगुलपणा नसेल त्याची तेवढ्याच एका कारणावरून अवहेलना किंवा तिरस्कार करून त्याचा द्वेष संपादण्यासारखा मूर्खपणा तर दुसरा कोणताही नाहीं. त्या अनिष्ट वृत्तीचा परिणाम आमच्या इकडे तर फारच शोचनीय झाला आहे. आमच्यांतील जातिप्राचुर्यानें व तन्मूलक वैमनस्यमत्सरादि

ऐक्यविघातक असद्वृत्तींनी परस्परांची मने कलुषित होऊन समाजाची जी सहस्रशः शकलें होऊन गेलीं आहेत, त्याचें प्रधान कारण हा वर्णाच्या उच्चत्वाचा पोकळ अभिमान होय. अमुक एका जातींत किंवा कुळांत निर्माण झाल्याचा तेवढा अभिमान बाळगण्यापलीकडे ज्याच्या हातून फारसें काहीं नांव घेण्यासारखे होत नाही त्याचा तो अभिमान केवळ अप्रयोजक समजावा; तेणेंकरून त्याची मान्यता वाढण्याचें एकीकडे राहून त्याच्या जातीच्या किंवा कुळाच्या कीर्तिच्या उज्वलतेच्या प्रमाणानें त्याची यथार्थदृष्ट्या जनांकडून अवमाननाच व्हावयाची. वडिलांची कीर्ति सांगणाराची रामदास स्वामींनीं मूर्खात गणना केलीं ती रास्तच आहे.

असो; आता आपण दुसऱ्या एका अभिमानप्रकाराविषयीं बोलू. हा रीतीरिवाजांच्या निर्दोषत्वाविषयी होय. प्रत्येक जनसमूहाला वाटत असतें कीं, ज्या चालीरीती आपल्यामध्ये अस्मार्तकाळापासून प्रचलित आहेत त्या निर्दोष असून हितप्रद असल्याच पाहिजेत, एरवीं त्या इतका काळ टिकत्या ना. ही समजूत सर्वथा सत्य नव्हे. विवक्षित चालीरीती आपल्या आंगवळणीं पडल्यामुळें त्यांचें अनिष्टत्व आपल्या लक्षांत एकदम येत नाहीं. उदाहरणार्थ कोणत्याही व्यसनाची घ्या. तें ज्याच्या अंगीं जडते, त्यास त्याचें अपकारित्व भासत नाहीं. म्हणून ते कमी घातक समजतां उपयोगी नाहीं. अशीच गोष्ट हरएक चालीची व सवईची आहे. तेव्हां तिच्या परिणामांचा विचार करावयाचा तो केवळ तत्वदृष्टीनें, निरभिमानबुद्धीनें व निःपक्षपातानें केला पाहिजे. असा विचार करून जो निर्णय ठरेल त्याचें ग्रहण स्वस्थित्यनुरूप करणें हिताचे होय. केवळ पुराणप्रीतीस्तव किंवा दुरभिमानास्तव सत्य सिद्धांतांचा अव्हेर करून स्वहिताच्या मार्गाचें अवलंबन न करणें म्हणजे मूर्खत्वाची परमावधि होय. आमच्यातील कित्येक लोकांचा असा समज आहे कीं, यवनादि परस्थांपासून आम्हांस घेण्यासारख्या चालीरीती कांहींच नाहींत; उलटे त्यांनाच आमच्याकडून एतत्संबंधानें पुष्कळ शिकण्यासारखें आहे. तेव्हां त्यांचें कोणत्याही बावतींत अनुकरण करणें उचित नव्हे. हा समज सर्वज्ञतेची व पूर्णत्वाची घमेंडी बाळगण्यासारखा अप्रयोजक व हास्यास्पद होय. वस्तुतः पाहतां निरनिराळ्या लोकसमूदायांतील निरनिराळ्या चालीरीति ह्या समाजशास्त्राचे तेवढे प्रयोग होत. त्यांच्या परिणामाचें यथासांग परीक्षण करून त्यांच्या इष्टानिष्टत्वाचा निर्णय करणें हें समाजशास्त्रप्रणेत्यांचें काम आहे. सामान्यजनांनी आपणास वाटेल तसा त्यांवर अभिप्राय देऊन वाक्कलह माजविण्यांत मुळींच शहाणपणा नाहीं. दुसरें असें कीं, कोणत्याही विवक्षित जनसमूहानें इतर लोकांची केवळ रीतीरीवाजाच्या

भिन्नत्वास्तव निंदा किंवा द्वेष करणें अत्यंत गर्हणीय होय. आपणास जसे इतरांचे कित्येक रीतीरिवाज दोषरूप वाटतात, तसेच इतरांलाही आपल्या कित्येक रीतीरीवाजांचा तिटकारा वाटत असेल. तेव्हां एवढ्यावरूनच एकमेकांचा द्वेष किंवा तिरस्कार करण्यांत काय हांशील?

ह्या अभिमानाचा आणखी एक प्रकार आहे. तो धर्मविचार, तत्वविचार व शास्त्रीय शोध या संबंधाचा होय. प्राचीनकाळीं जेव्हां निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें दळणवळण होण्याची साधनें आताच्या इतकी मुबलक व सुगम नव्हतीं. तेव्हां बहुतेक जनसमूहाची स्थिति कूपमंडूकवत् असल्या कारणानें आपला धर्म व आपलें ज्ञान याविषयीं गर्व वाहणें साहजिकच होते. आतां हीही गोष्ट खरी कीं, हा अशाप्रकारचा अभिमान बाळगण्याचा हक्क पुष्कळ काळापर्यंत फारच थोड्या राष्ट्रांना होता. आर्य, मिसरी ग्रीक वगैरे प्राचीन राष्ट्रांमध्येच प्रथमत: सुधारणा झाल्याच्या योगानें निरनिराळे धर्मविचार व तत्वविचार यांचा उद्भव व विकास याच राष्ट्रांत पहिल्यानें झाला, आणि तेथूनच ते इतर राष्ट्रांस प्राप्त झाले. परंतु अलीकडे युरोपीय राष्ट्रांत मोठमोठे शोधक व बुद्धिवान् पुरुष निपजून त्यांनी त्या प्राप्त झालेल्या ज्ञानसंग्रहाचें संशोधन करून त्यांत पुष्कळ नवी भर घातली आहे. त्याचप्रमाणें नवीन शोध करून पुष्कळ उपयुक्त शास्त्रें व कला बहुतेक पूर्णत्वास आणल्या आहेत त्या गोष्टी नीट लक्षात आणल्या असतां प्राचीन राष्ट्रांचें जे कोणी वंशज आज हयात असतील; त्यांनीं आपल्या पूर्वजांच्या अभिमानानें अंध होऊन आधुनिक राष्ट्रांतील महापुरुषांच्या कर्तृत्वाचा योग्य विचार व मनन न करणें निव्वळ वेडेपणा आहे असें स्पष्ट दिसून येईल. त्याचप्रमाणें जे कोणी आधुनिक विद्येचा अभिमान बाळगणारे लोक प्राचीन तत्वविचारी जनांची अवमानना करण्यास प्रवृत्त होतील ते वस्तुस्थितीचे व इतिहासाचें आपलें अज्ञान प्रकट करून कृतघ्नत्व दोषास होतात म्हणून समाजावयाचें. असो; आतां ह्या प्रकरणी आणखी एक अशी गोष्ट सांगावयाची कीं, पुष्कळ भोळ्या लोकांचा असा समज आहे कीं आपल्या लोकांत प्रचलीत असलेल्या धर्मविचारांचा व तत्वविचारांचा उगम जगच्चालक परमेश्वरापासून झाला असल्यामुळें ते सत्यच असले पाहिजेत. ह्या सत्यज्ञानाचें वारस कायते आम्हीं. बाकी सारे जनसमूह व राष्ट्रें एतद्विषयीं अज्ञानपंकांत निमग्न आहेत. त्यांचा उद्धार करणें हें आपलें कर्तव्य आहे. आज निरनिराळ्या धर्मप्रचारकांचा जो चोहोंकडे उद्योग चालू आहे त्याचें बीज ह्या मिथ्या अभिमानांतच आहे. परंतु अलिकडे म्यॅक्स्मुलरप्रभृति शोधक व निःपक्षपाती विद्वानांनी निरनिराळ्या धर्माचें व तत्वविचारांचें

ऐतिहासिकदृष्ट्या परिशीलन व तुलना करून आपल्या परिश्रमाचें फल जगापुढें मांडलें आहें. त्यावरून पाहतां ईश्वरप्रणीतत्वाचा प्रमादराहित्याचा किंवा पूर्णत्वाचा अभिमान वाहण्याचा अधिकार कोणत्याची धर्माचें किंवा तत्वज्ञानाचे अनुसरण करणारास बिलकूल नाहीं. प्रत्येकास इतरांपासून शिकण्याजोगें पुष्कळ आहे. सध्यां पृथ्वीवरील सर्व लोकांचे विचार समजण्याची पाश्चात्यांच्या संघटनानें सोय झाली असतां केवळ उंबराच्या फळातल्या किटकांप्रमाणें आपलें तेवढेंच चागलें म्हणून स्वस्थ राहील तो वेडापीर समजावयाचा.

शेवटी अभिमानाच्या आणखी एका प्रकाराचा उल्लेख करून हा लांबलेला लेख पुरा करितों. हा प्रकार राष्ट्रांत चिररूढ असलेल्या दानधर्माच्या, शिक्षणाच्या वगैरे मनुष्यसुखवर्धक संस्थाच्या अभिमानाचा होय. जसे धर्म, चालीरीती वगैरे गोष्टींच्या संबंधानें निरनिराळ्या जनसमूहांत वैचित्र असतें, तद्वत्च ह्याही संबंधानें तें असणें साहजिक आहे. परंतु त्याजबद्दल कोणी अभिमान बाळगून दुसऱ्यांची अवहेलना करणें चांगलें नव्हे. शिवाय आपल्या सर्वच संस्था निर्दोष व सर्वप्रकारें हितकारी आहेत असा अभिमान चांगला शोध केल्यावांचून बाळगणें अनिष्टमूलक आहे. कारण अशा दुरभिमानामुळें त्यांत योग्य सुधारणा न होऊन व्हावे तसें हित होत नाहीं. ह्याकरितां सर्वप्रकारचा ताठा व अभिमान सोडून परकीयांकडून जितके म्हणून नवीन शिकण्यासारखें असेल तितकें शिकण्यास सदा तत्पर असावें. तेव्हां ह्या एकंदर उहापोहाचा सारांश म्हणून इतकाच कीं ह्या पृथ्वीतलावरील निरनिराळ्या प्रदेशांत, निरनिराळ्या लोकांना, निरनिराळ्या काळीं नाना शोध करून जे सत्यसिद्धांत ठरविले आहेत व यापुढें ठरवितील त्यांचे ग्रहण करून तदनुसार वर्तन करण्यांतच मनुष्य जातीचे हित आहे. केवळ दुरभिमानग्रस्त होऊन त्यांचा अव्हेर केल्यास आपल्या घरास आपण होऊन आग लाविल्याचें अपयश माथीं येईल. हें प्रत्येकानें चांगलें ध्यानांत वागविलें पाहिजे. आज अनेक कारणसंघाच्या योगानें मनुष्य जातीचे जरी शतशः खंड झालें आहेत, आणि ते आणखी पुष्कळ काळ तसेच रहावयाचे तरी त्यांचें सत्य ज्ञानाच्या संबंधानें दृढ ऐक्य होणें शक्य आहे; आणि कित्येक बाबतीत त्यांचा मतभेद असला तरी तो चिरकाल टिकणारा नव्हे. परंतु ही संसिद्धि मनुष्याचा दुरभिमान सर्वस्वी विगलित झाल्यावांचून प्राप्त व्हावयाची नाहीं.

***

# २२ राष्ट्रीय सभेची संस्था चिरस्थाई करण्याबद्दल विनंति

(सुबोध पत्रिका २७-१२-१८९१)

जिच्या योगानें ह्या देशांतील रहिवाशांच्या कधी स्वप्नीही न आलेल्या निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या धर्माच्या व निरनिराळ्या जातीच्या लोकांचा अश्रुतपूर्व समागम प्रतिवर्षी घडून येत आहे; जिच्या योगानें पुरातन काळापासून परस्परांत चालत आलेले साधार व निराधार द्वेषमत्सर विसरून एकमेकांस समदुःखत्वमूलक बंधुप्रेमानें दृढालिंगन करण्याचा योग हिंदुस्थानवासी जनांस वर्षातून निदान एकदा तरी येत आहे; जिच्या योगानें बारीकसारीक मतभेद एकीकडे ठेवून सर्वास साधारण अशा गोष्टींची देशहितैक दृष्टीनें वाटाघाट करण्यास हवी असणारी जूट भारतवर्षीयांच्याठायीं उत्तरोत्तर वाढत चालली आहे; जिच्या नित्य वर्धमान होणाऱ्या विविधसामर्थ्ययुक्त जनाश्रयमूलक बलामुळें इकडील सरकारी अंमलदारांच्या मनात दहशत उत्पन्न होऊन विलायतेतील राज्यसूत्रधारि जनांच्या ठायीचें हिंदुस्थानांतील राज्य कारभाराविषयींचे औदासिन्य व बेफिकिरी हळु हळु नाहीशी होण्याचा दृढ संभव आहे; जिच्या प्रतिवार्षिक भव्य परिषदेच्या अवलोकनानें सामान्य जनांच्या हृदयातही देशाभिमान, बंधुप्रेम इत्यादि बहुतेक अननुभूतपूर्व सद्वृत्तींचा उद्भव होऊन देशकार्यास स्वसामर्थ्यानुसार हातभार लावण्याची स्फूर्ति त्यांस होत आहे, आणि जिच्या वार्षिक कामाच्या योगानें राज्यकार्यविषयक विद्येची निदान मुळाक्षरे तरी शिकण्याची संधी पाश्चिमात्य शिक्षणानें लायक झालेल्या जनांस येत आहे, अशा अत्यंत उपयुक्त संस्थेची इतिश्री उदयीक नागपुरास भरणाऱ्या सातव्या वर्षाच्या बैठकीत बहुमतानें करण्याचें ठरविल्यास सर्व देशाचें अत्यंत मोठें नुकसान केल्याचा दोष माथी येणार आहे. ह्या दोषास तेथें जमलेले आर्यभूमीचे कैवारी महाजन सहसा पात्र होणार नाहीत अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. ह्या गोष्टीचा तेथें शेवटी काय निकाल होतो तें ऐकण्याची हिंदुस्थानांतील प्रत्येक विचारी मनुष्यास आज परम उत्कंठा लागून राहिली आहे. मि. ह्यूम साहेबांच्या पुढें सुचनेप्रमाणें दोन किंवा तीन वर्षे सभा भरविण्याचें तहकूब केल्यास तिच्याविषयी

कांहीं लोकांच्या मनांत थोडाबहूत वागत असलेल्या उत्साहावर विरजण पडून तिचें पुनरुच्चालन बहुतेक असंभवीच दिसतें. शिवाय, तिची येथें समूळ इतिश्री करून इंग्लंडांतच काय करावयाची ती खटपट करावी, असें मि. ह्यूम साहेबांचे जें मत त्यांच्या पत्रावरून उन्नीत होत आहे, त्या मतास कदाचित कित्येक पुढारी मंडळी ह्यामध्यें लोटणाऱ्या कालावधींत भाळून तदनुसार व्यवस्था घडाचाही संभव आहे. ह्यासाठी आमच्या पुढारी मंडळीनें दूरवर दृष्टि पोंचवून काय करणें तें केल्यास एकंदर देशाचा बचाव केल्याचें श्रेय त्यांस प्राप्त होईल.

कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, राष्ट्रीय सभेची स्थापना होऊन तिच्या संबंधाचीं चळवळ उत्तरोत्तर वाढत गेल्याच्या योगानें सरकारच्या मनांत आम्हांविषयी विशेष किल्मिष उत्पन्न होऊन स्वातंत्र्य, शिक्षण व धनोत्पादन यांस प्रतिकुळ असें नियम व व्यवस्था तें हळू हळू अमलांत आणीत आहे. तेव्हां अशी संस्था अस्तित्वांत राखून सरकारच्या संशयास व अप्रतिहत सामर्थ्यमूलक, जरबेच्या, जुलमाच्या व पीडाकारक व्यवस्थेस पात्र होऊन विशेष दुःखांत पडण्यांत काय शहाणपणा? ह्या प्रकरणीं राष्ट्रीयसभेच्या कैवाऱ्यांनी आयर्लंडातील लोकांची सध्यांची स्थिति ध्यानांत आणावी. हे ह्या लोकांचे म्हणणें सर्वस्वी खोटे नसलें तरी असल्या भेवडाविण्यानें गर्भगलित होऊन जाण्यांत मर्दपणा नाहीं, व शहाणपणाही नाहीं. राष्ट्रीयसभेचे हेतु आजपर्यंत ज्यांच्या लक्षांत नीटपणे आले आहेत त्यांस तिच्या राजद्रोहित्वाबद्दल किंवा एकदेशीयत्वाबद्दल कधींही संशय यावयाचा नाहीं. आतां ज्या सरकारी अंमलदारांची इच्या संबंधानें थोडीबहुत वक्रदृष्टि आहे, त्यांस एक तर तिचें खरें स्वरूप कळत नाहीं, किंवा तिच्या वार्षिक गाऱ्हाण्यांतल्या निरनिराळ्या बाबींची दाद लागल्यास त्या त्यांस मारक होण्याचा संभव आहे. परंतु जे सरकारी कामदार किंवा राज्य चालविणारे तिजविषयीचें यथार्थ ज्ञान मिळवून निःपक्षपातपणें व निरपेक्ष बुद्धीनें विचार करतील त्यांस तिचें भय न वाटतां उलट ते तिला प्रोत्साहन देऊन साहाय्यच करतील, अशी तिची वास्तविक योग्यता आहे. असें असतां ती अशा कोणत्याना कोणत्या मिशानें कांहीं काळपर्यंत किंवा मुळींच बंद केल्यास मात्र तिच्याविषयी सरकारच्या मनांत हटकून संशय उत्पन्न होईल; आणि यापुढील आमच्या अशाच प्रकारच्या चळवळींविषयीं ते विशेष सावध राहून त्या हाणून पाडण्याचें उपाय योजण्यास प्रवृत्त होईल, दुसरें असे कीं, ही संस्था चिरायु न होतां आजच आटपली तर आमच्या आरंभशूरत्वाची, नामर्दपणाची, कर्तृत्वशुन्यत्वाची वगैरे चांगली प्रचीति येऊन आमच्या संबंधानें त्यांची अनादराची व क्षुद्रत्वाची बुद्धि आधींच आहे ती आणखी वाढेल यांत संशय नाहीं. मग

आमच्या हालांस काय तोटा! हीं अशी आमची फटफजिती करण्याची बुद्धि आमच्या पुढारी लोकांच्या मनांत न येवो अशी आमची अनन्यभावे इच्छा आहे. ती सिद्धीस जाणें नागपुरास जमलेल्या महाजनांच्या दीर्घदर्शित्वावर, मतस्वातंत्र्यावर व देशहितैकनिष्टेवर अवलंबून आहे.

आतां राष्ट्रीयसभा कांहीं काळ किंवा अजी बंद ठेवण्याची कल्पना मि. ह्युम साहेबांस किंवा दुसऱ्या कित्येकास सुचण्याचें मुख्य कारण पैशाची टंचाई हें आहे. इंग्लंडांत मि. डिग्वी प्रभूति ज्या मंडळीची आमच्या तर्फे खटपट चालली आहे, तिच्या खर्चास दरवर्षास लागणारी सरासरी पन्नास हजार रुपयांची रक्कम उभी करण्यास किती प्रयास पडतात; आणि निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांस आपल्या प्रांतांत सभा भरविण्यासाठी लागणारा खर्च लोकांकडून मिळविण्यास किती आटाट करावा लागतो याचा अनुभव ज्यांस आजपर्यंत प्रत्यक्ष आला आहे, त्यांना ही संस्था कायम राखणें मोठे भगीरथप्रयत्नाचें काम असून ते नेहमी साधेलच असें वाटत नाहीं. ही अडचण पुष्कळ अंशी खरी आहे. देशहितासाठी केवळ निरपेक्षबुद्धीनें तनमनधनेंकरून झटावें असा उपदेश करणें फार सोपें आहे, पण ज्याच्यावर असें करण्याची प्रत्यक्ष पाळी येते त्याच्या हातून ''बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले'' ह्या साधुवचनाप्रमाणें वर्तन होण्यास पुष्कळ वेळां अंतर पडतें. त्यांतूनही ज्या बाबतींत आधीच अनेक करांच्या रूपानें रिती होत चाललेल्या थैलीचे कसे ढील करण्याची वेळ येतें, तेव्हां तर लोकांच्या स्वदेशाभिमानाची व औदार्याची खरीच गरज होते. अशी शोचनीय स्थिती आमच्यातील बऱ्याच समजूतदार लोकांची आजला आहे. मग सामान्यजनांची काय कथा? पुनः ज्यांना ह्या अत्यंत हितप्रद संस्थेचें महत्व व योग्यता आज चांगली कळत आहे तें बहुतेक उत्पन्नभक्षी किंवा आपलपोटे आहेत; आणि ज्या कित्येकांना ह्या संस्थेस द्रव्यद्वारा हवी तशी मदत करण्याचें सर्वप्रकारें अनुकूल आहे, त्यांस तिचे एक तर महत्त्व कळत नाहीं किंवा तिच्याविषयीं त्यांच्या मनांत मतलबी अथवा द्वेषी लोकांनी भलतेच निराधार ग्रह भरवून दिले आहेत. अशी स्थिती नसती, तर प्रतिवर्षी आमच्यांतल्या श्रीमंत लोकांकडून ऐषारामादिकांमध्यें जो अतोनात द्रव्य नाश होत आहे त्यांतला थोडासा तरी अंश या संस्थेच्या खर्चास लागून देशाचें निरंतरचें हित झाले असते. परंतु हें व्हावे कसें या लोकांना कांहीं उपजत ज्ञान नाहीं. तें त्यांस शिक्षणाच्या प्रसारानें हळूहळू होत जाईल, हें तर आहेच. पण तूर्त ज्यांना हें ज्ञान आहे, त्यांनी ज्यांना तें नाहीं त्यांस हरउपायानें करून देण्याचे प्रयत्न आमच्या इकडे चालू करणें अवश्य आहे, तें कितीसें चालू आहेत बरें? ज्यांच्या अंगीं विद्येच्या व

इतर गोष्टींच्या योगानें चांगली योग्यता आलेली असून, ज्यांचें वजन इतर लोकांवर बसलेलें असतें अशा लोकांनी या संस्थेच्या संबंधानें लोकांचें यथार्थ व अनुकूल मत करून देण्यासाठी व्याख्यानद्वारा वगैरे कितीसें प्रयत्न आमच्या इकडे गेल्या सात वर्षात चालू झाले आहेत बरें? उदाहरणार्थ, आमच्या इलाख्यांतील कितीसे फेरोजशहा, वाच्छा, खरे किंवा टिळक, ठिकठिकाणीं जाऊन लोकसमाज जमवून व्याख्यानें देत असतात, किंवा मोठमोठ्या लोकांस भेटून त्यांची समजूत घालीत असतात बरें? असें कांहींतरी प्रयत्न करून फलप्राप्ति होते किंवा नाहीं हें नीट पाहिल्यावांचून ह्या पैशाच्या बाबतींत सर्व देशाच्या माथ्यावर असें धडधडीत अपयशाचें खापर फोडणें कांहीं रास्त नव्हे गतगोष्टीस इलाज नाहीं; आतां यापुढें तरी पुढारी मंडळीनें आपलें कर्तव्य बजावण्यास मुळींच कसूर करितां कामां नये. पुढील सगळें वर्ष सर्व देशभर चळवळ करून व्याख्यानें व लेख यांच्याद्वारे होईल तेवढें लोकमत सुधारलें असतां या संस्थेस पुष्कळ लोक अनुकूल होऊन आपल्या पदरास सार्वजनिक हितासाठी थोडाबहुत खार लावून घेण्यास तयार होतील. ह्या पैशाच्या अडचणीला आणखी एक उपाय असा आहे कीं, निरनिराळ्या प्रांतांतील लोकांकडें नेहमी पैसे मागत राहण्यापेक्षा प्रत्येकानें आपल्या ऐपतीप्रमाणें काय द्यावयाचें तें एकदाच द्यावे अशी तजवीज करून निरनिराळ्या इलाख्यांत मिळून पंचवीस तीस लाख रुपये एकदाच जमा करावे; ह्या जमा झालेल्या पैशांची चांगली सुरक्षित व्यवस्था करून त्याच्या व्याजावर येथील वार्षिक सभेचा व इंग्लंडांतील मंडळांचा खर्च चालविण्याची तजवीज झाली पाहिजे; आणि पार्लमेंटच्या सप्तवार्षिक निवडणुकीनंतर इंग्लंडांत ही सभा इकडील निवडक निवडक लोकांची एक वेळ भरावयाची तिचा खर्चसुद्धा या व्याजांतून भागवावा. वीस पंचवीस कोट प्रजेंत एकदांपुरते पंचवीस तीस लाख रुपये जमा होण्याची पंचाईत पडेल असें आम्हाला वाटत नाहीं. आमच्या मुंबईतील गुजर वगैरे संपन्न लोक लग्नकार्यात, देवळें बांधण्यांत, वगैरे लाखों रुपये उधळतांना ज्यानें पाहिलें आहेत, त्याला ही रक्कम योग्य प्रयत्न केल्यास जमा होणार नाहीं असें मुळींच वाटणार नाहीं. असा कायमचा फंड केल्यावर मग सर्वास सोईचें होईल असें एखादें मध्यवर्ती स्थळ निवडून तेथें एक मोठाशी सोईची इमारत बांधावी. म्हणजे पुष्कळ अनावश्यक खर्च वाढून सभेस चिरस्थाईपणा येईल. पण हे सगळे पुढले विचार नागपूरच्या सभेनंतरचे आहेत. तेव्हां तूर्त येथेच थांबू. पुढे काय काय सुधारणा तींत आणखी केल्या म्हणजे तिला शाश्वती येऊन तिचा उपयोग वाढण्यासारखा आहे याचा विचार, प्रयोजन उरल्यास पुढल्या अंकांत करूं.

***

# २३ राष्ट्रीयसभा चिरस्थाई झाली

(सुबोधपत्रिका ३-१-१८९२)

प्रसिद्ध बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी पहिल्या दिवशीं अध्यक्षांचें भाषण झाल्यावर राष्ट्रीयसभा दरवर्षाप्रमाणें भरीत जावी किंवा नव्या पार्लमेंटच्या निवडणुकीनंतर लंडनास ती भरेपर्यंत येथें भरण्याची तहकूब ठेवावी, या विषयींचा विचार करण्याकरितां कमिटी नेमण्याची सूचना करून ती कायम राखण्याचा निश्चय नेमलेल्या कमिटीकडून होवो, अशी आपली उमेद अत्यंत प्रोत्साहनकारक व आवेशयुक्त भाषणानें दर्शविली. ह्या त्यांच्या सुचनेबरहुकूम नेमलेल्या कमिटीनें तिसऱ्या बैठकीस म्हणजे बुधवार ता. ३० रोजी सभा प्रतिवर्षी नियमानें भुरवीत जाणें इष्ट आहे, असा आपला निकाल सभेपुढें मांडला व तो बहुमते मंजूर झाला. हें आनंदाचें वर्तमान ऐकून कोणाही देशकल्याणचिंतकास आनंद झाल्याविना रहाणार नाहीं. मि. ह्युमसाहेबांच्या प्रसिद्ध झालेल्या पत्रावरून आमच्या कित्येक प्रमुख मंडळीचें मन बदलून त्यांच्या म्हणण्यास ते रुकार देतील असें वाटलें होतें. परंतु त्यांना सुविचार सुचून व स्वमत निर्भिडपणें देण्याचे धैर्य होऊन, सर्व देशावरची महापत्ति टळली. कारण एकतर राष्ट्रीयसभा बंद पडल्यानें लोकांचें राज्यव्यवस्थाविषयक विचार शिथिल होऊन त्यांचें उद्घाटन करण्याचा मार्ग बहुतेक सुटला असतां. शिवाय तिच्या योगानें संभवणारी सामाजिकपरिषद बंद पडून सामाजिक सुधारणेस बराच प्रत्यवाय आला असता. त्याचप्रमाणें पुढेंमागें व्यवस्थित स्वस्थ पावणारी धर्मपरिषदही भरण्याचा मार्ग फारसा न उरून धर्मसंबंधी विषयांस राष्ट्रीयस्वरुप येण्याची शक्यता नष्ट झाली असती. अशीच गत औद्योगिक परिषदेचीही झाली असती. सध्यां ह्या उपयुक्त संस्थेस जें थोडेसें निरनिराळ्या प्रांतांत स्वरूप आलें आहे, ते कायम राहून कालांतरानें तीस राष्ट्रीय महत्व येण्याचा जो रंग आहे, त्याची आशा राष्ट्रीयसभा बंद झाल्यानें समूळ खुंटली असती. ह्याप्रमाणें राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक सुधारणा अगदीं अल्पगतीनें कां होईना, परंतु जी चालू आहे ती मुख्यत्वेंकरून ह्या महासंस्थेच्या आश्रयानें होय. तेव्हां तिची तहकुबी

किंवा बंदी म्हणजे ह्या सर्वप्रकारच्या सुधारणेच्या कामाची बंदी समजावयाची. या थरावर गोष्ट गेली नाही हें सर्व देशाचे मोठे भाग्य समजावयाचें; आणि ज्यांनीं एतदर्थ प्रयत्न केला आहे, त्यांचे सर्व देशावर महत् उपकार झाले आहेत. आतां इतउपर ह्या संस्थेचें चिरस्थायित्व निश्चित करण्याच्या उद्योगास प्रत्येक देशहितेच्छनें कायावाचामनेंकरून लागलें पाहिजे. रावबाहादूर आनंदाचार्लूंनी आपल्या अत्यंत उत्तेजनकारक भाषणांत सांगितल्याप्रमाणें आम्ही राजकीय व इतर उपयुक्त विषयासंबंधानें लोकमत जागृत करून त्याला योग्य दिशा लावण्याचा प्रयत्न अनेक उपायांनीं जारी चालविला पाहिजे. आजपर्यंत असा फारसा प्रयत्न राष्ट्रीयसभेच्या प्रवर्तकांकडून न झाल्यामुळें, लोकांकडून तीस म्हणण्यासारखें साहाय्य मिळाले नाहीं. या पुढें लोकांच्या ठायींची उदासीनता व अज्ञान हीं नाहीशीं करण्याचे उपाय सर्वत्र सुरू झाले पाहिजेत. ज्यांना लिहिता येईल त्यांनीं लेखाच्या द्वारे, ज्यांना चांगलें बोलतां येईल त्यांनीं भाषणांच्या द्वारे, ज्यांच्यापाशी पैशाचे वगैरे बल आहे त्यांनी त्याचा देशहितैकदृष्टीनें विनियोग करून लोकांच्याठायीं राष्ट्रीयसभेविषयींची प्रीति व ती चिरस्थायी करण्यासाठीं खटपट करण्याची बुद्धि व उत्साह उत्पन्न करण्यास मनापासून झटले पाहिजे. खासगी द्वेषमत्सर एकीकडे ठेविले पाहिजेत. केवळ आत्मलाभाकडे दृष्टी देऊन हातून होण्यासारखें देशहित करण्यास चुकू नयें. सर्व राष्ट्राच्या हितांतच आपलें व आपल्या संततीचे हीत आहे, हें चांगलें ध्यानांत वागवावें. केवळ आपल्या पुरतें पाहण्याच्या निंद्य स्वभावामुळेच आम्हा भारतवर्षीयांस ही दीन दशा प्राप्त झाली आहे. पाश्चात्यांच्या आधुनिक उत्कर्षाचें बीज जुटीनें उद्योग करण्याच्या सर्वसाधारण वृत्तींत आहे. ही जूट सार्वजनिक हितबुद्धीवांचून दृढ होऊन फलद्रूप होत नसतें. हे महासत्य आमच्या लोकांच्या हृत्पटीकेवर चांगलें ठसल्यावांचून संघानें उद्योग करण्याची बुद्धि आम्हांत स्फुरणार नाहीं. आणि ज्या प्रभूच्या कह्यांत आम्ही आलों आहों, त्यांजकडून आमचें कोणत्याही बाबतींत हीत करून घेणें असेल तर तें संघानें मागितल्यावांचून प्राप्त होणार नाही. राष्ट्रीयसभेला एवढे महत्व येण्याला कारण हेंच आहे. परंतु तिच्या नांवाप्रमाणें तिला स्वरूप यावयाला तिला हिंदुस्थानातील सर्व नांहींतरी बहुतेक जातीच्या, वर्णाच्या व धर्माच्या लोकांची अनुकूलता पाहिजे. हा महासंघ जुळविण्यास तिच्या परिपालकांनीं व हितचितकांनीं अहर्निश झटले पाहिजे. राष्ट्रीयसभेची वेळ आली म्हणजे ज्या प्रांतांत ती भरावयाची त्या प्रांतांत फक्त पैसा गोळा करण्यापुरती खटपट चालवून उपयोगी नाहीं. तर तिच्या संबंधाची हरएक प्रकारचीं चळवळ चोहोंकडे वर्षभर चालू राहिली पाहिजे. तरच

तिला कायमपणा येणार आहे. सारांश काय कीं, आमच्या मानेवरील परकियांचें जूं हलकें करण्याची जर कोणाला इच्छा असेल, जे लाखो गरीब लोक अन्नान करून आज पटापट प्राण सोडताहेत त्यांची संख्या जर कमी करावयाची असेल, जर आमच्यावरच्या करांचा बोजा हलका होऊन उद्योगवास बरकत यावी असें असेल, जर राजकीय, औद्योगिक वगैरे राष्ट्रहिताच्या प्रश्नांचा विचार सर्व देशभर जागृत ठेवून त्यांजविषयीं आमच्या राज्यकर्त्यांची यथार्थ बुद्धि करून देणें असेल, जर पूर्वी कधी स्वप्नांतही न आलेली ह्या महाखंडप्राय देशांतील निरनिराळ्या लोकांची एकी व सलोखा वाढविण्याचा असेल, जर सर्व राष्ट्राची अज्ञानमूलक महानिद्रेंतून उठावणी करून त्याला स्वस्थितीचें सत्य स्वरूप निश्चितपणें दाखवून तिच्या परिहारार्थ झटक्यासाठी उत्तेजन द्यावयाचे असेल, तर त्या संस्थेसाठी बासू सुरेंद्रनाथ बानर्जींनीं आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें प्राण देण्यासही तयार व्हावें, हें सर्व देशहितैषी जनांनी ध्यानांत वागवावें, आणि आम्ही नामर्द, आरंभशूर, आपलपोटे, परस्पर कलहप्रिय, भित्रे, स्वदेशाभिमान शून्य नाहीं असें आपल्या आचरणानें सर्व जगास दाखवावें. ह्या राष्ट्रीयसभेच्या योगानें आम्ही सर्व सुधारलेल्या जगाच्या नजरेपुढें विशेषेंकरून आलों आहों. तेव्हां तिच्या बऱ्यावाईट स्थितीवर किंवा शास्वतीअशास्वतीवर आमचें सर्वप्रकारचें कल्याणच अवलंबून राहिलें आहे. इतकेंच नव्हे तर, आमची बरीवाईट कीर्तिही तिजवर अवलंबून आहे. ही आमच्या पारखेची एक कसोटी आहे, हें प्रत्येकानें ध्यानांत वागवावें.

***

# २४ अफूचा व्यापार बंद कां करावयाचा?

(सुबोधपत्रिका १८९१)

त्या प्रश्नाचें उत्तर उघडच आहे की, अफूच्या कैफामुळें मनुष्याच्या देहास व मनास पराकाष्ठेची क्षीणता येऊन त्याचें जीवित कष्टमय होतें. म्हणून लोककल्याण चिंतणाऱ्या सरकारानें ह्या अशा मादक पदार्थाचा व्यापार आपल्या आश्रयाखाली होऊं देणे बिलकुल रास्त नव्हे. हे उत्तर कितपत यथार्थ आहे त्याचा थोडासा विचार करूं.

ह्यावर पहिली शंका अशी आहे कीं, अफूच्या अल्पमात्र सेवनानेंही मनुष्याच्या देहावर व मनावर दुष्परिणाम घडतात कीं काय? अनुभव तर असा आहे कीं, तिचे माफक सेवन केल्यानें म्हणण्यासारखे हानिकर परिणाम होत नाहींत; तर तंबाखूचे किंवा मद्याचे माफक सेवन करणाऱ्यांच्या स्थितीहून अफूचा कैफ करणाराची स्थिति फारशीं वाईट नसतें. आतां कोणत्याही व्यसनाचा अतिरेक झाल्यानें जसे घोर परिणाम उद्भवतात, तसें तें अफूच्या अतिरिक्त सेवनानें उद्भवतात, यांत कांहीं नवल नाहीं. तेव्हां प्रश्न असा आहे कीं, ज्या चीनी लोकांस अफू विकायाची नाहीं असा ब्रिटिश पार्लमेंन्टाचा बहुमतें निर्धार झाला आहे, तें सगळेच किंवा बहुतेक लोक अफूचे अपरिमित सेवन करणारें आहेत कीं काय? त्या लोकांविषयी ज्यास माहिती आहे, तें तर असें सांगतात कीं, त्या लोकांस अफू व्यसन आमच्या इकडच्या तंबाखूच्या व्यसनाप्रमाणें किंवा युरोपियन लोकांतल्या मद्यपानाप्रमाणें बहुतेक सार्वत्रिक आहे, तरी व्यसनाच्या अतिरेकामुळें बेहोश होऊन लोळत पडणारें असें क्वचित् कोठें आढळतात. बाकीचे सारे लोक आपआपल्या उद्योगधंद्यांत अगदीं चूर झालेले असतात. त्यांच्याइतका सतत न थकतां काम करण्याचा जोम इतर फारच थोड्या राष्ट्रांतल्या लोकांत आढळतो. हें जर खरें असेल, तर मग अफूच्या कैफामुळें चिनी लोक उत्तरोत्तर नीचस्थितिप्रत जात चाललें आहेत असें म्हणण्यांत काय अर्थ आहे! दुसरें असें की, अफूचें ज्याला व्यसन असतें त्यापासून इतरांना कोणत्याही प्रकारची तोशीस पोचण्याचा बिलकुल संभव नसतो. तो फार तर आपल्याच गुंगीमध्ये निश्चल पडून राहील. तेंच मद्यपी

लोकांचें पहा. ते छाकटें झाले म्हणजे त्यांच्या मनावरचा दाब नाहीसा होऊन पाहिजे तीं अनन्वित व घोर कर्में करण्यास ते प्रवृत्त होतात. भांडणें, मारामाऱ्या, खून वगैरे गुन्हे त्यांच्या हातून नेहमीं होतात. येणेंकरून ते समाजांतील शांति न सौख्य यास अंतराय आणणारे होतात. असा कांहींएक प्रकार अफूबाजांकडून होत नाही. तेव्हां जर कोणतें व्यसन त्यांच्या अनिष्टत्वास्तव लोकांतून काढून टाकण्याचे लोकनियंत्यांस मनावर घ्यावेसें वाटत असेल, तर ते मद्याचे होय. ह्या व्यसनानें आज काल युरोपांतल्या बहुतेक देशांत व त्यांच्या अनुकरणानें व संघटनानें आमच्या देशांत अगदी कहर करून सोडला आहे त्या व्यसनांचा प्रचार जितका संकुचित होईल तितका अत्यंत इष्ट आहे. इतर देशांतल्याप्रमाणें ग्रेटब्रिटनामध्येही ह्या व्यसनाच्यापायीं आजला अनर्थ होत आहे. तर बिटिश लोकांनीं आपलें स्वतःचें घरच आधी चांगले सुधारून मग इतर लोकांच्या स्थितीचा विचार केल्यास विशेष सोईचें व शहाणपणाचें होईल असें आम्हांस वाटतें. असे कांहीं तरी त्यांनी करण्याचें आरंभिल्यास लाखो हिंदुस्थानवासी जनांचेही थोडेसें हित होण्याचा संभव आहे. कारण उघडच आहे कीं, कोणत्याही प्रकारच्या मद्याची उत्पत्ति आणि व्यापार हीं बंद करण्याचा कायदा झाल्यानें आमच्या इकडे तिकडील मद्य येण्याचें बंद येईल; आणि हा कायदा आमच्या इकडेही सहज लागू करितां येईल. पण ब्रिटिश सरकारच्या मनांत ही गोष्ट कधीं तरी येईल किंवा नाहीं, याची वानवा आहे. वास्तविक पाहतां लोकांस कैफबाजीपासून निवृत्त करणें हें लोकनियंत्यांचें कर्तव्य आहे, असें तत्व एकवेळ मान्य केल्यास मग तें सर्वत्र सारखें निःपक्षपातपणें लागू करणें उचित होय. त्यातूनही जो कैफ विशेष हानिकर आहे असे दिसून येईल, त्याचा प्रतिकार पहिल्यानें होणें रास्त आहे; आणि अनुभव असा आहे कीं, अफूपेक्षा मद्य विशेष हानिकर आहे. तेव्हां ब्रिटिशसरकारनें पहिल्यानें मद्याचा व्यापार बंद करणें योग्य दिसतें. परंतु असें करूं गेल्यास ग्रेटब्रिटनांतील बहुतेक सगळी प्रजा अगदी बिथरून जाऊन असा स्वातंत्र्याचा अपहार करूं. पाहणाऱ्या पार्लमेंटसभेस तत्काळ उडवून देईल! हें तिकडील धूर्त राजकारणीं पुरुषांस पूर्णपणे ठाऊक आहे. हा जोम व हीं स्वातंत्र्यप्रीति आपल्या लोकांच्या ठायी अजून उत्पन्न झालेली नाहीं. आणि क्वचित् कोठे तिचा प्रादुर्भाव झाला असला तरी तिचा ह्या परतंत्र स्थितीमध्यें काय उपयोग?

पण येथें मुळाशीच चूक आहे. प्रजाजनांची व्यसनांपासून निवृत्ति करणें हें ऐं एक सरकारचे कर्तव्य आहे असें मानणेंच मुळीं भ्रांतीचे आहे. अशाप्रकारे लोकांच्या

आहारविहाराचे नियमन करायाचें काम सरकारच्या हाती असल्यानें जनहित होणें बहुतेक अशक्य आहे, असें आजपर्यंतच्या अनुभवावरून म्हणण्यास हरकत नाहीं. लोकनियंत्यांना ज्या कोणत्या कैफाच्या पदार्थाचा उपयोग लोकांनी केल्यानें त्यांचें अहित होण्याचा संभव आहे असें खास वाटत असेल, त्यावर फार तर कर वगैरे बसवून त्यांच्या उत्पत्तीस किंवा व्यापारास अडथळा येईल असें केल्यास चालेल. दुसरा उपाय म्हटला म्हणजे विवक्षित व्यसनापासून वास्तविक नुकसान काय आहे त्याचें ज्ञान लोकांत प्रसूत करण्याचें उपाय योजावें म्हणजे झाले. आपल्या अमलांतल्या लोकांच्या संबंधानें चिनसारख्या परमुलखांतल्या लोकांस व्यसनमुक्त करण्याचें ज्या उदारधी पुरुषांस वाटत असेल, त्यांनी त्या लोकांस उपदेश करण्याकरितां लोक पाठवावें. जसा ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरितां तें आज लक्षावधी रुपये खर्च करीत आहेत, तसेंच हें चिनी लोकांतले व्यसन नाहींसे करण्याकरितां कांहींतरी केल्यास उपयोग होण्यासारखा आहे. नुसती हिंदुस्थानांतून जाणारी अफू बंद केल्यानें इष्टकार्य होण्यासारखें नाहीं. आपल्याकडून त्यांना अफू मिळाली नाहीं तर ती दुसरीकडून मिळवितील. सारांश काय कीं, 'आयजीच्या जिवावर बायजी उदार' ह्या म्हणींतल्याप्रमाणें जो हा आमच्या ब्रिटिशपार्लमेंन्टानें प्रकार केला आहे, तो त्याला मुळींच शोभत नाही.

***

# २५ आमचे सुशिक्षित लोक अल्पायु कां होतात?

(सुबोधपत्रिका ३१-१-१८९२)

गेल्या पंधरा वीस वर्षात आमच्या इकडे अनेक गुणांस्तव प्रसिद्धीस आलेल्या सुशिक्षित लोकांपैकी बरेच जण अकालीं मृत्यु पावलेले पाहून वरील प्रश्न सहजी मनांत येतो. डॉ. भाऊदाजी, डॉ. सखाराम अर्जुन, रा. रा. कुंठे, रा. सा. मंडलिक, पंडित अयोध्यानाथजी वगैरे मंडळींचा अर्ध्यावकतच अवतार संपला! रा. गोखले, मि. खिस्तोदासपाळ, रा. देशमुख, रा. श्रीपत बाबाजी, रा. वैद्य, रा. किर्लोस्कर, वगैरे मंडळी तर चाळीशीच्या आंतच आटपली! अशीं सुशिक्षित व देशास अनेक प्रकारांनीं उपयोगीं पडण्यासारखीं माणसें अल्पायु झाल्यानें देशाचें फारच नुकसान होतें. तेव्हां ह्या अत्यंत अनिष्ट अल्पायुपणाचीं कारणें कोणतीं, तीं नीट पाहून त्यांचा साधेल तेवढा प्रतिकार करण्याचा प्रयत्न चालविला पाहिजे. भवितव्यता, भोत्कृत्व, ग्रहदशा इत्यादि अदृष्ट, काल्पनिक व सर्वथा असिद्ध गोष्टींवर सर्व अपयश न लादतां, वास्तविक कारणें कोणती ज्यांची शाहानिशा समंजस मनुष्यांकडून झाली पाहिजे. आमच्या देशांतील हवापाणी, खाणेंपिणें, आचारविचार, चालीरीती, उद्योगधंदे वगैरे गोष्टींचा आमच्या लोकांच्या देहावर कसा काय परिणाम होतो याचा सूक्ष्म विचार अभिज्ञ पुरुषांकडून झाला पाहिजे. हे काम अर्थात् जीवनेंद्रियादिशास्त्रांचें परिशीलन ज्यांनी दीर्घकाळ पर्यंत केले आहे, त्यांच्याकडून झालें पाहिजे. असा सावंत विचार कोणातरी योग्य मनुष्याच्या हातून होईपर्यंत आम्हांस जो कांहीं कारणें उघड उघड दिसत आहेत त्यांचें संक्षेपानें दिग्दर्शन करितो.

पहिलें कारण अर्थात हवापाण्याची प्रतिकूळता हें होय. ग्रेटब्रिटनांतील मृत्युसंख्येची इकडील संख्येशीं तुलना करून असा साधारण नियम काढला आहे कीं, ब्रिटनांतल्या लोकांचा साधारण आयुर्दाय इकडच्या लोकांपेक्षां सरासरी सोळा वर्षांनीं जास्त आहे! हा एवढा भेद असण्याचीं कारणें अनेक आहेत. परंतु त्या सर्वांमध्यें हवापाण्याचीं प्रतिकूळता हें मुख्य समजण्यास हरकत नाहीं. आपल्या ह्या देशाचा बराच भाग उष्ण

कटिबंधांत असल्यामुळें हवेचें मान फार उष्ण असून, ताप, पटकी वगैरे घातुक रोगांचा अंमल चोंहोंकडे जारी असतो. तेव्हां ज्यांची प्रकृति अनेक कारणांनीं क्षीण झालेली असते त्यांचा ह्या रोगांपुढें निभाव लागत नाहीं. जे लोक विद्याव्यासंगांत अगदीं गढून जाऊन आपल्या शरीराच्या आरोग्याची फारशी परवा करीत नाहींत, त्यांस कोणतीही विकृति सहजीं जडून तिचा प्रतिकार करण्याची कुव्वत नसते. दुसरें असें कीं, मानसिक श्रमाच्या सातत्यास ही हवा फारच प्रतिकूळ आहे. इंग्लंडांतले, जर्मनींतले वगैरे विद्याव्यासंगी लोक रोज पंधरा पंधरा सोळा सोळा तास एकसारखे न थकता मानसिक श्रम करूं शकतात; हे त्यांचे श्रम प्रकृति बेआराम न होतां वर्षांची वर्षें चालू राहतात ह्या त्यांच्या व्यासंगाच्या गोष्टी इकडील कित्येक विद्याभिलाषी पुरुष ऐकून स्वतःही तसेंच करण्यास प्रवृत्त होतात. परंतु इकडील हवा थोडीशी मेहनत करतांच थकवा आणणारी असल्यामुळें, हा त्यांचा व्यासंग लवकरच आटपून देहास निरंतरची क्षीणता येते. अंगांत थोडाबहुत जोम असेपर्यंत फारसें कांहीं वाटत नाहीं खरें, परंतु परिणामीं शरीर नानाविकृतीचें माहेरघर होतें. येथें कोणी अशी शंका घेतील कीं, पूर्वी ह्या देशांत जे मोठमोठे विद्वान लोक होऊन गेले व सध्यांही कित्येक आहेत, त्यांना ही हवेची प्रतिकूळता कां नाहीं नडली? ह्या शंकेचें एकंदर समाधान असें आहें कीं, पूर्वीची विद्या शिकण्याची पद्धत अगदीं निराळी होती. विद्या शिकून होईपर्यंत कडकडीत ब्रम्हचर्य आचरिलें जात असून शिष्यांचें बहुतेक काळ गरुगृहींच वास्तव्य रहात असे. तेणेंकरून शिष्याच्या आचरणावर गुरुची पैरवी व जरब रहात असे. तसा कांहीं एक प्रकार अलीकडे इकडे चालू झालेल्या शिक्षणपद्धतींत उरलेला नाही. इग्लंडांतून वगैरे बोर्डिंग स्कूलांच्या बऱ्याच व्यवस्था मात्र अजून आमच्या ह्या जुन्या पद्धतीसारख्या चालू आहेत. आमच्या इकडच्या शिकणाराचे लहान वय बहुतेक संसारी मनुष्याच्या सहवासानें जात असल्यामुळें, संसारातील बहुतेक बऱ्यावाईट गोष्टींचा दृढ परिचय त्यांस होतो; पुष्कळ प्रसंगीं तर बालविवाहाच्या अनिष्ट चालीमुळें त्यांस संसारसुखाचा अनुभवही अकालीच घडूं लागतो! अशा स्थितीमध्यें विद्याध्ययनास लागणाऱ्या जोमाचा दुरुपयोग होऊन वित्त किंवा कीर्ति यांच्या अपरिमित अभिलाषास्तव जीवाकडे न पाहतां ज्ञानसंपादनाचा हव्यास धरल्यानें आयुष्याची मर्यादा निःसंशय आकुंचित होते. वरील दुसरें समाधान असें आहे कीं, पूर्वीच्या शास्त्री पंडितांचे विद्याध्ययन एकदा लहान वयांत काय होत असें तें पुढे त्यांस नवे ग्रंथावलोकन करण्याचें फारसें प्रयोजन उरत नसें. अधिक विषयांची उपस्थिति राखण्यासाठी काय थोडासा स्वाध्याय लागत

असें तेवढाच काय तो मानसिक श्रम. परंतु आधुनिक विद्याध्ययनाची गोष्ट तशी नाही. विद्यापीठांतल्या सगळ्या परीक्षा दिल्या तरी विद्यामंदिराच्या एकदोन पायऱ्याच चढल्यासारखें होतें. मुख्य इमारतींतील नुसत्या एकाद्या खोलींत प्रवेश होईपर्यंत कितीतरी स्वाध्याय करावा लागतो; म्हणजे अर्थात् ही ज्ञानाची इयत्ता इतकी वाढली आहे कीं, कोणी तिच्या एका शाखेचें साग्र अध्ययन करूं म्हणेल तर त्याला सगळा जन्म पुरणार नाही. विद्याव्यासंगी लोकांस हा ज्ञानाचा अमर्यादपणा भासून ते कृपणाप्रमाणें आपल्या फुरसतीचा विनियोग ज्ञानसंपादनाकडे करितात. त्या त्यांच्या स्तुत्य अधाशीपणाचा परिणाम मात्र, त्यांस, त्यांच्या संबंधी जनांस व एकंदर समाजास अनिष्टकारक होतो. निसर्ग निर्घृण आहे. तो सुजन, दुर्जन, उद्योगी, निरुद्योगी इत्यादि भेदाभेद जाणत नाहीं. तो आपले नियम अगदीं निःपक्षपातानें अमलांत आणितो. ज्यास त्या नियमांचें शान असतें त्यांच्या हातून त्यांचा भंग मनोनिग्रह अंगीं असल्यास सहसा होत नाहीं. परंतु जे इतर व्यवसायांत निरंतर चूर झाल्यामुळें किंवा शिक्षणक्रमाच्या व्यंगत्वामुळें निसर्गाच्या ह्या अत्यंत महत्त्वाच्या ज्ञानास अंतरतात, त्यांस त्या नियमांच्या भंगाबद्दल शासन होतेंच होतें. तेव्हां तात्पर्य काय कीं, युरोपांतील लोकांचे मोठमोठे उद्योग व व्यासंग पाहून त्यांचें अनुकरण करितांना आपणास त्या हवेंत तें कितपत झेंपण्यासारखें आहे, याचा नीट विचार करण्याचें सामर्थ्य जर आमच्या सुशिक्षित जनांस यथार्थ ज्ञानाच्या योगानें प्राप्त होईल, तर असले अनर्थ टळून त्यांच्या हातून थोडेंबहुत स्वहित व देशहित होण्याचा संभव आहे. येथपर्यंत फक्त  हवापाण्याच्याच संबंधाचा विचार झाला. यापुढें आणखी कांहीं कारणांचे विवेचन करण्याचा आमचा मानस आहे. तें यथावकाश करूं.

***

# २६ सध्यांची शिक्षणपद्धति आयुष्य खुंटविणारी आहे

(सुबोधपत्रिका ७-२-१८९२)

गतांकी सुशिक्षित लोक अल्पायु होण्याचें एक कारण हवा पाणी होय. म्हणून सांगितले. आज आणखी एका कारणाचा विचार करूं. अगदीं मुळाक्षरें शिकण्यापासून तों एम्. ए., एम्. डी वगैरे अगदीं शेवटल्या परीक्षा देईपर्यंत जो शिक्षणप्रभू हल्ली प्रचारांत आहे, त्याची घटना इतकी कांहीं चमत्कारिक व दुर्घट होऊन बसली आहे कीं, तिला इतरत्र जोड मिळणें शक्य नाहीं. त्यांतूनही विशेष चमत्काराची गोष्ट ही कीं, त्याचें दुरवगाहत्व उत्तरोतर नवे फेरबदल करून वाढवितच आहेत. अशा स्थितींत आरोग्य व दीर्घायुष्य यांची परवा न करितां किंवा अज्ञानास्तव त्यांना तीं न वाटता, जे लोक द्रव्यादि प्राप्तीच्या उत्कट आशेनें ह्या शिक्षणक्रमरूप महानदीचें अवगाहन करण्यास उद्युक्त होतात, त्यांच्या गात्रांस श्रमातिशयामुळें निरंतरची क्षीणता प्राप्त होऊन संपादित ज्ञानाचा किंवा चित्ताचा उपभोग घेण्यास फार करून ते वाचत नाहींत; आणि वांचलेच तर शरीरास अनेक व्याधी जडल्यामुळें त्यांचें जीवित अत्यंत कष्टमय होतें. मग त्यांचा स्वजनांस किंवा स्वदेशास कसचा उपयोग होणार! आतां हा शिक्षणक्रम कोणकोणत्या बाबतीत सदोष आहे त्याचे थोडक्यांत विवेचन करूं.

प्रथमतः मूल अगदीं लहान असतां त्याला रुक्ष विषय जो फाड्यांचा तो शिकविण्याची चाल जी आमच्या इकडे चिररूढ झाली आहे ती अत्यंत हानिकारक आहे. मुलाला फाडे पाठ करण्यामध्यें कांहींएक मौज तर वाटत नाहींच, परंतु जो शिक्षक त्यांस ते शिकवितो त्यास ते अगदी राक्षसाप्रमाणें लेखितात; आणि त्याच्या तावडींतून सुटण्यास तें नेहमीं मनापासून इच्छितात. शिवाय, ज्यांत कांहींएक करमणूक तर नाहीं, पण उलटा मार मात्र खरपूस मिळण्याचा धाक एकसारखा मनांत वागत असतो, त्यात तासाचें तास एकसारखें जुलमास्तव गुंतून राहणें प्राप्त झाल्यामुळें कवळ्या मुलांची

शरीर प्रकृत्ति क्षीण होत जाते, यांत कांहीं नवल नाहीं. कारण ज्या वयांत त्यांच्या एकंदर अवयवांची व हाडांची वाढ अतिशय जोरानें भराभर होत जावयाची, अशा काळी अशा भयंकर बंदीखान्यांत त्यांस दिवस काढावें लागल्यामुळें त्यांचा स्वाभाविक उत्साहीपणा, तरतरी व चलाखपणा नष्ट होऊन शरीराचा विकास व्हावा तसा होत नाही. तीं जरत्कारू, खुरटीं व सदा रोगी अशीं होतात; आणि कित्येक तर आपल्या मातापितरांस दुःख समुद्रांत लोटून लवकरच गचावतात. इंग्लंड वगैरे देशांत हें फाड्यांचे बंड मुळींच नसून लहान मुलांस ज्यांत मौज वाटेल अशा प्रकारचें कवितादि विषय शिकविण्याचा परिपाठ आहे. अलीकडे तिकडे बालोद्यानासारख्या नव्या नव्या शिकविण्याचा एकाहून एक चांगल्या पद्धति निघाल्यामुळें लहान मुलांस विद्याध्ययन म्हणजे एक मजेचा खेळच होऊन गेला आहे. शिवाय तिकडच्या देशांत आणखी एक अत्यंत स्पृहणीय अशी सोय आहे कीं, अगदीं लहान मुलांस त्यांच्या परमप्रिय मातेकडूनच प्राथमिक शिक्षण प्राप्त होते. तेणेंकरून त्यांची योग्यप्रकारें जोपासना होऊन आणखी बुद्धिविकासही झपाझप होतो, आणि विद्याव्यासंगाची खरी प्रीति त्यांच्याठायी लहानपणींच अंकुरित होते. ही सोय आमच्या इकडें मुळींच नसल्यामुळें आमच्या अत्यल्पवयीं मुलांस शिक्षणासाठीं दुसऱ्यांच्या स्वाधीन करावीं लागतात; आणि मग वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें त्यांचे जन्माचे मातेरे होतें; व विद्येविषयीं अत्यंत अप्रीति त्यांच्याठायीं उद्भवते. पुढें जो कित्येकांकडून विद्याभ्यास होतो तो वडिलांची, त्यांच्यावर जरब असतें म्हणून, किंवा पुढें पुढें त्यांस विद्येचा उपयोग थोडाबहुत कळू लागतो म्हणून. ह्याप्रमाणें एक दोन वर्षे फाडे शिकून तरबेज झाल्यावर मग अलीकडे ठरलेल्या मराठी इयत्ता मुलांना शिकाव्या लागतात. त्यांतही कित्येक भूगोलासारखे विषय त्यांना कांहींएक अर्थ न समजतां पाठ करावे लागतात; आणि शिक्षकानें ठरलेल्या मुदतींत अमुक विषय शिकविलेच पाहिजेत, नाहीतर त्याला रजा मिळावयाची, असा नियम असल्यामुळें तो शिक्षक मुलांकडून मारून कुटून तेवढी तयारी करवितो. ह्याप्रमाणें मुलांच्या मागें रात्रंदिवस धडे शिकण्याची जरब असल्याकारणानें त्यांना यथेच्छ खेळण्यास बागडण्यास सांपडत नाहीं; आणि इतकेही करून कोणी अल्लडपणास्तव व स्वाभाविक उत्छुंखलपणास्तव धडे तयार न करतां खेळलेंच तर त्याला पंतोजीकडून खरपूस शिक्षा व आईबापांकडून मार खावा लागतो. अशा स्थितींत त्यांच्या मनाची व शरीराची वाढ योग्यप्रकारें कशी व्हावीं? ह्याप्रमाणें तीन चार इयत्ता झाल्या न झाल्या तो इंग्रजी शिकण्यास प्रारंभ होतो. येथून पुढें तर त्यांना फारच मेहनत करावी लागतें.

स्वभाषेचें ज्ञान अगदीं थोडेंसुद्धा झालें नाहीं तोंच स्वभाषेहून अत्यंत विसदृश भाषा जी इंग्रजी ती शिकण्याचा सपाटा सुरू होतो. ही भाषा अर्थात स्वभाषेच्या द्वारे शिकवयाची. परंतु स्वभाषा म्हणण्यासारखीं येत नसल्यामुळें परभाषेचे आकलन व्हावें तसें होत नाही. परंतु शिक्षकास तर शाळाखात्यानें ठरवून दिलेल्या इयत्ता पुऱ्या करावयाच्या असतात. आणि मुलांच्या वडीलांसही असें वाटत असतें कीं, आपल्या मुलांनीं नेमलेल्या मुदतींत इयत्ता संपवाव्या. म्हणून त्यांचा मुलांच्यामागे एकसारखा तगादा सुरू होतो. ज्या कित्येक आईबापांस ऐपत असते तीं तर मुलांस शिकवावयास घरींहीं एकाद दुसरा शिक्षक ठेवून देतात. मग काय विचारतां? मुलाला मृदंगासारखा दोहीकडून मार. ह्याप्रमाणें शाळेत व घरी धडे पाठ करीत बसावयाचा जुलूम त्याच्यावर एकसारखा होत राहिल्यानें त्यांच्या शरीरास तर क्षीणता येतेच येते, पण ज्या मानसिक विकासाची इतकी कडेकोट तजवीज चालली असतें, तों न होतां मनासही क्षीणता प्राप्त होऊन मुलगा निर्बुद्ध व कुचकामी होतो.

अशा स्थितींतूनही जे इंग्रजी सात इयत्तापर्यत निभावतात त्यांच्यापुढे प्रवेशपरीक्षा आपली आ पसरून आहेच. प्रत्येक इंग्रजी इयत्तेंतले निरनिराळे विषय कसेबसे शिकून शेवटल्या प्रवेश परीक्षेपर्यंत मजल पोंचण्यास फारशी अडचण नसतें. परंतु ह्या परीक्षारूप चरकांत मात्र मुलांची खरी पारख होते. हींत पसार होण्यासाठी मुलांस फारच मेहनत करावी लागते. मागल्या इयत्तांतून ज्या कित्येक विषयांकडे दुर्लक्ष मुद्दाम किंवा उपाय नसन्यामुळें झाले असते त्यांचा अभ्यास येथें करावा लागतो. एरवी हा महादुर्ग उल्लंघण्याची शक्यता नसतें. ह्याप्रमाणें जीवापाड मेहनत करून जे ह्या परीक्षेंत पसार होतात, त्यापैकी ज्या कोणांत ऐपत असते तें पुढल्या विद्याभ्यासास लागतात. हा पुढला शिक्षणक्रम हळू हळू बिकटच होत चालला आहे. उदाहरणार्थ बी. ए. ची पदवी मिळविण्यास कांहीं वर्षांपूर्वी दोनच परीक्षा द्याव्या लागत. ह्या दोन परिक्षांच्या पुढें तीन केल्या; आणि यापुढें तर बी. ए. होण्यास चार वर्षे लागणार आहेत! म्हणजे अर्थात जो मुलगा बुद्धिवान असेल त्यानें प्रवेश परिक्षा दिल्यावर चार वर्षे आणखी घोकंपट्टी केली पाहिजे, तेव्हां तो बी. ए. होणार! यानंतर त्याला वकिलीची सनद मिळवायाची असेल त्याने बी. ए. झाल्यावर आणखी दोन परिक्षा दिल्या पाहिजेत. हा एवढा अटाट करण्याचा विचार जे साधारण बुद्धीचे विद्यार्थी मनांत आणतील, त्यांची तर पुरी फजिती. कारण प्रत्येक परिक्षा हटकून पसार होण्याचा संभव त्यांना कमी असल्यामुळें त्यांना वर्षाचींवर्षे घोकंपटी करून बहुतेक आपल्या प्राणांचीही आहुति

द्यावी लागणार आहे. मुलगा बुद्धिवान असून त्याचें शिक्षण सहाव्या वर्षी सुरू झालें अशीं कल्पना केली असतां, व प्रत्येकवर्षी परीक्षेंत खात्रीनें पसार होत जाईल असा जिम्मा घेतला असतां, एल्. एल्. बी. होऊन वकिली चालविण्याचा अधिकार मिळवीपर्यंत तो पंचवीस वर्षाचा होणार! एवढा सगळा काळ त्याचा रात्रंदिवस पुस्तके घोकण्यास जावयाचा; आणि शरीराचे आरोग्य राहण्यास अवश्य जो नानाप्रकारचा व्यायाम तो त्याच्याकडून बहुतकरून होत नाहीं; आणि तो करण्यास त्यास फारशीं फुरसतही नसतें. आतां जिवनेंद्रियशास्त्राचा असा एक सिद्धांत आहे कीं, मनुष्याच्या शरिराचा जो काय विकास व्हावयाचा तो पहिल्या पंचविशींत. हा विकास व्हावयाला शरीराचें पोषण व व्यायाम हीं योग्य प्रकारें झाली पाहिजेत. तीं ह्या विद्याव्यासंगांत चूर झालेल्या मनुष्याची होत नाहींत; आणि म्हणून त्याच्या आंगांत पुढील आयुष्यक्रमास अवश्य लागणारा जोम व सहनशक्ती ही सहसा असत नाहीत. अशी वास्तविक स्थिति असतां हा शिक्षणक्रम विशेष कठीण व लांब करण्याविषयीच्या सूचना आणून त्या पसार करून घेण्याची जे खटपट करीत आहेत, ते आमच्या लोकांचें शत्रु समजलें पाहिजेत.

आमच्या शिक्षणक्रमांतला आणखी एक असा दोष आहे कीं, कोणत्याही प्रकारचा अभियुक्त धंदा किंवा रोजगार चालविण्याचें ज्ञानसंपादन इंग्रेजीच्या द्वारे करावें लागत असल्यामुळें त्या भाषेचें ज्ञान मिळविणे आम्हांस अवश्य झालें आहे. ह्या भाषाज्ञानाच्या संपादनांतच आमची बहुतेक शक्ती व काळ यांचा क्षय होत आहे. अशी ज्ञानसंपादन मार्गाची दुर्घटता इतर कोणत्याही राष्ट्रास आज नाहीं. प्रत्येक उपयुक्त विषयाचे ज्ञान इंग्रजीच्या द्वारे मिळविणे प्राप्त झाल्यामुळें तें प्राप्त करून घेतांना मनास दुहेरी श्रम पडतात. एक भाषाज्ञानाचें व दुसरे विषय लक्षांत ठेवण्याचें. हें विषयज्ञान स्वभाषेच्या द्वारे होण्याची तजवीज होऊन, केवळ इंग्रजी भाषेचाच स्वतंत्र अभ्यास हवा तेवढा सुरू ठेवल्यास कालक्षेप विशेष न होतां मनालाही तितके श्रम पडणार नाहीत. पण हें व्हावें कसे? चवथे इयत्तेपासून गणित, इतिहास, भूगोल वगैरे विषयांचे शिक्षण व परीक्षण इंग्रेजीच्याच द्वारें झालें पाहिजे असा नियम आहे. फार तर काय, पण संस्कृत भाषेसारखी ज्या भाषेचे स्वभाषेशीं बरेच साध्य आहे, त्या भाषेचा अभ्याससुद्धा इंग्रेजीतूनच झाला पाहिजे. अनुभव असा आहे कीं, डॉ. भांडारकरांची पहिली दोन पुस्तकें मराठीच्या द्वारे शिकण्यास जितका वेळ लागतो, त्याच्या दुप्पट किंवा तिप्पट वेळ इंग्रजीच्या द्वारे तीं शिकण्यास लागून पुन: त्या विषयाचें ज्ञान ठसावे तसें विद्यार्थ्यांच्या

मनावर ठसत नाहीं. ह्याप्रमाणें बहुतेक विषयांच्या ज्ञान संपादनांत वाजवीपेक्षा फाजील श्रम मनाला झाल्यामुळें शिकणाराची प्रकृति बिघडण्याचा संभव विशेष असतो. इंग्लंडातील वगैरे विद्यार्थ्यांस सर्व विषयांचें ज्ञान स्वभाषेच्या द्वारे प्राप्त होत असल्यामुळें त्यांचा त्यांत अल्पवयातच प्रवेश होऊन आणखी त्यांस तें विषय समजून घेण्यास दुहेरी श्रम पडत नाहींत. तेणेंकरून एकतर त्यांचा शिक्षणक्रम लवकरच संपतो; व तो चालू असतां त्यांस आमच्या इतकें मानसिक श्रम व सतत उद्योग करण्याची जरूर पडत नसल्यामुळें, नाना प्रकारच्या व्यायामांस व खेळास हवा तितका वेळ सांपडतो. म्हणूनच ते जोमदार, पाणीदार, हुशार, चलाख, निरोगी, व दीर्घायु असतात; आणि आमचे सुशिक्षित लोक वर सांगितलेल्या कारणास्तव कमकुवत, निस्तेज, उदास, मंद, रोगी व अल्पायु असतात तेव्हां हीं स्थिति ज्यांना नकोशी वाटत असेल त्यांनीं हरप्रयत्न करून हा आमचा शिक्षणक्रम होईल तेवढा हलका करण्याचीं व देववेल तेवढ्या विषयांचें देशी भाषेत शिक्षण देण्याची तजवीज करण्याचा निर्धार केला पाहिजे.

***

# २७ आमचे सुशिक्षित लोक अल्पायु होण्याचें आणखी एक कारण

(सुबोधपत्रिका २१-२- १८९२)

आमचे सुशिक्षित लोक अल्पायु होण्याची मुख्य दोन करणें मागें सांगितलीं. तीं आमच्या वाचकांस आठवत असतीलच. आज दुसऱ्या एका कारणाचा थोडासा विचार करण्याचें योजिलें आहे. प्राणिकोटींतील हरएक जाति व व्यक्ति पूर्वजप्राप्त व स्वानुभनसिद्ध निसर्गज्ञानाच्या साहाय्यानें, यदृच्छायोगें करून प्राप्त झालेल्या परिस्थितीमध्यें स्वसंरक्षण व प्राणयात्रा करण्यास अहर्निश प्रयत्नशील असतात. हा जीवित रक्षणाचा नियम मानवेतर प्राण्यांत बहुतेक अबाधित चालतो. मनुष्य प्राण्यास बुद्धिस्वातंत्र्य व बुद्धिवर्धन विशेष अनुकूल असून आणखीं इतर मानसिक वृत्तीच्या अनुरोधानें त्याच्या आचरणास बरें वाईट वळण मिळण्याचा संभव जास्त असल्याकारणानें, ह्या नियमानुसार वर्तन त्याजकडून होण्यास पुष्कळ अंतराय येतात. स्वसंरक्षण कोणास नको आहे? परंतु तें योग्यप्रकारें होण्यास पुष्कळ प्रकारच्या निसर्गज्ञानाची आवश्यकता आहे. हे तीन व्यक्तिमात्राचें किंवा जातिमात्राचें ज्या मानानें वृद्धि पावेल, त्यामानानें त्यांस आत्मरक्षण करितां येणार आहे. ह्या सृष्टीत जो चोहोंकडे एकसारखा जीवनार्थ कलह चालला आहे त्यांत ज्याला वरती डोकें काढून सांवरावयाचें असेल, त्यानें आपल्या जीवितास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें अंतरायभूत होणाऱ्या एकंदर कारणांचें निदान अत्यंत सूक्ष्म बुद्धीनें करून त्यांचा प्रतिकार साधेल त्या उपायानें करण्यास अवश्य झटलें पाहिजे. मग ती कारणें धर्मशास्त्र, लोकमत चिररूढ असलेल्या चालीरीति इत्यादि जबरदस्त बंधनांत गुरफटलें असली तरी त्यांचा उच्छेद करण्यास तिळप्रायही डगमगतां उपयोगीं नाहीं. ज्या ज्या अविचारमूलक व दूष्य वृत्तींच्या फाजील विकासामुळें बुद्धीस व्यामोह होऊन मनुष्य दुर्वृत्त होण्याचा संभव आहे, त्या त्या वृत्तींचे दमन स्वान्नोतिप्रियजनांनी हर उपायानें केलें पाहिजे. हा एवढा उपोद्घात आमच्या पुढील प्रतिपादनास आवश्यक वाटला म्हणून केला. आतां मुख्य विषयाकडे वळूं.

आमचे सुशिक्षित लोक अल्पायु होण्याचें आणखी एक असें कारण आहे कीं, त्यास विद्याव्यासंगांत अगदीं चूर झाल्यामुळें स्वदेहाची पर्वा उरत नाहीं. त्यांस वाटतें कीं, शरीराचें पोषण अन्नानें होतच आहे. तेव्हां त्याची आणखी काळजी ती कशास घ्यावयला पाहिजे? एखादा रोग झाल्यास वैद्यांचा काय तोटा आहे? परंतु हा त्यांचा भ्रम आहे. आतां ज्यांस स्वतःच्या शरिराची परवा थोडीबहुत वाटत असतें, त्यांस स्वतांचे आरोग्य कसें राखावें ते कळत नाहीं. कारण, जीवनेंद्रियशास्त्र व आरोग्यशास्त्र यांचे ज्ञान प्रत्येक मनुष्यास अत्यावश्यक असून तीं शिकविण्याची तरतूद आमच्या शिक्षण पद्धतींत मुळींच केलेलीं नाहीं. हीं क्रम शोचनीय गोष्ट होय. नाहीं म्हणायाला जे कोणी वैद्यकीचा अभ्यास करितात, त्यांस या विषयाचें ज्ञान थोडेबहुत होत असतें. त्याचप्रमाणें बी. ए. च्या परीक्षेंत जीवशास्त्र घेण्याची मोकळीक ठेविली आहे. पण ते पुष्कळांस अनेक प्रकारच्या गैरसोईमुळे घेता येत नाहीं. वास्तविक पाहतां ह्या अत्यंत महत्वाच्या विषयाचें ज्ञान मुलांस होईल तितके लवकर प्राप्त करून देण्याचीं व्यवस्था शिक्षणक्रमांत झाली पाहिजे. सर्व पृथ्वीवरचे देश, नद्या, पर्वत, भूशिरें इत्यादिकांच्या संथा रात्रंदिवस दिल्यानें किंवा जगाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासात घडलेल्या गोष्टींचें शख मुखोद्गत करविल्यानें जितका फायदा विद्यार्थ्यास होण्यासारखा आहे, त्याहून शतगुणित फायदा आपल्या देहातील निरनिराळ्या अवयवांची रचना, व्यवस्था व व्यापार यांचें ज्ञान मनुष्यास झाल्यानें होणार आहे. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता हर्बर्ट स्पेन्सर ह्यानें आपल्या शिक्षणावरील ग्रंथांत कोणतें ज्ञान अत्यावश्यक आहे, ह्या प्रश्नाचा विचार करतांना स्वशरीरज्ञानाची व आरोग्यविषयक ज्ञानाची प्रमुखत्वानें गणना केली आहे. याचें कारण उघडच आहे कीं, मनुष्य आपल्या आयुष्यक्रमांत जे शारीरिक किंवा मानसिक व्यापार करितो त्यांचा बरे-वाईटपणा देहाच्या स्थितीवर सर्वस्वी अवलंबून रहातो. तेव्हां अशा ह्या अत्यावश्यक शरीररूप साधनाची सुस्थिति राखण्यास जरूर शिकलें पाहिजे. हे ज्ञान चांगलें होण्याचा मार्ग म्हटला म्हणजे जीवनेंद्रियशास्त्र व आरोग्यशास्त्र यांचे अध्ययन हा होय. हे अध्ययन प्रत्येक इसमाकडून होईल तितके लवकर झाले पाहिजे. आमच्या शिक्षणक्रमांतील आवश्यक विषयांत या विषयाची गणना प्रधान करून झालीं पाहिजें. जसे गणित विषयाचें ज्ञान प्रत्येक मनुष्यास अत्यावश्यक आहे असें वाटतें, त्याचप्रमाणें किंबहुना त्याहूनही विशेष आवश्यक या विषयाचें ज्ञान वाटलें पाहिजे, व इकडें आमच्या पुढारी मंडळीचें जरूर लक्ष गेलें पाहिजे. असलेला शिक्षणक्रम विशेष लांब व कठीण करून सध्यांच्यापेक्षा अधिक

योग्य सुशिक्षित लोक निपजविण्याची आपल्या बुद्धीच्या पोंचाप्रमाणें व्यवस्था करण्याचा प्रयत्न ज्यांच्याकडून चालला आहे, त्यांना मनुष्याची खरी योग्यता व उपयुक्तता कशात आहे, व त्याच्या ठायींच्या हरएक उपयुक्त शक्तीचा विकास होण्यास काय काय गोष्टींची विशेष प्रकारें तजवीज करणें अगत्याचें आहे, हें नीट समजते तर त्यांच्याकडून असे प्रमाद न होतां शिक्षणक्रमांतील कित्येक ठळक ठळक व्यंगे नाहीशी होऊन अनावश्यक विषयांचा बोजा विद्यार्थ्यांच्या डोकीवर अधिकाअधिक चढला नसतां. येथें कोणी असें म्हणेल कीं, शिक्षण आटपल्यावर किंवा तें चालले असतांच ह्या वर निर्दिष्ट केलेल्या विषयांचें ज्ञान ज्याचें त्यानें करून घ्यावें. तें शिकविण्याची व्यवस्था शिक्षणक्रमांत कशाला केली पाहिजे? हे म्हणणें अगदीं व्यर्थ आहे. शिक्षण आटोपेपर्यंतचाच काळ फार महत्त्वाचा आहे. ह्या काळांत जशी बरी वाईट शरीराची जोपासना होणार, त्याप्रमाणें मनुष्याचें पुढलें आयुष्य सुखांत किंवा विपत्तीत जाणार. तेव्हां ह्या काळांतच आरोग्याचें ज्ञान अत्यावश्यक आहे. पुढें तें प्राप्त झाल्यानें फारसा उपयोग होणार नाहीं. शिवाय तें चांगल्या प्रकारें शिकण्याचीं कित्येक साधनें आहेत तीं प्रत्येक माणसास अनुकूळ होण्यासारखीं नसतात. आतां ह्या ज्ञानाचें महत्व प्रत्येक मनुष्यांस वाटून त्याच्याकडून तत्संपादनार्थ खासगी रीतीनें प्रयत्न होण्याची अपेक्षा करणें म्हणजे निव्वळ वेडेपण आहे. हाच कोटिक्रम इतरही महत्वाच्या मानलेल्या विषयास लागू करितां येण्यासारखा आहे. मग ते शिकविण्याची येवढी कडेकोट तरतूद शिक्षण क्रमांत करण्याची काय गरज? आम्हांला तर असें वाटतें कीं, हा जो आरोग्यशास्त्रादि अत्यंत आवश्यक विषयांविषयी अनादर शिक्षणक्रमांत अगदी उघड उघड झाला आहे, त्याचें वीज म्हणून इतकेंच कीं, त्या विषयाचें महत्व त्या क्रमांत फेरफार करण्याचें ज्यांच्या हाती आहे त्यांस वाटत नाहीं. ह्या त्यांच्या अज्ञानास किंवा औदासिन्यास आमचे पुष्कळ होतकरू सुशिक्षित लोक आज नाहक बळी पडत आहे. ही अनर्थकारकस्थिति अवश्य पालटली पाहिजे. ज्यांना समजते आहे, त्यांनी ती नाहींशीं करण्यास कायावाचामनेंकरून झटले पाहिजे. त्याचप्रमाणें आरोग्यसंबंधीं विषयांचें ज्ञान स्वतः मिळवून तें आपल्या इष्टमित्रांस व इतर लोकांस सुलभ करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हल्लीं कित्येक सुशिक्षित लोकांपुढं इंद्रियविज्ञानासारखा एकादा विषय काढला म्हणजे तें नाकें मुरडून त्याजकडें लक्ष पुरवीत नाहींत. ही त्यांच्या मनाची स्थिति त्यांस प्राप्त झालेल्या अपुऱ्या शिक्षणास अनुरूपच आहे, परंतु ती अत्यंत शोच्य होय. ह्या विषयांचें कामापुरते ज्ञान मिळविण्यास फारसें प्रयास पडतात

असें नाहीं. पाश्चात्त्य परिश्रमानें ह्या विषयांवर शेंकडो सोपे ग्रंथ झाले आहेत; व ते समजण्याची साधनेही त्यांनीं मुबलक काढली आहेत. त्यांचा आम्ही उपयोग करून घेतला पाहिजे, ''पुढें शरीर भूषणापिपुष्टा'' हें जें एक वचन आहे, तें आमच्या विद्यार्थी वर्गानें मुखत्वेकरून ध्यानांत ठेवून स्वदेहाची होईल तितकी चांगली काळजी घेण्यास आळस करूं नये. शरीराची रचना, त्याचें व्यापार व त्याजवर निरनिराळ्या कारणांनीं घडणारें बरेवाईट परिणाम, यांचें यथार्थ व सोपपत्तिक ज्ञान थोडथोडें अगदीं बाळपणापासून मनुष्यास मिळण्याची सोय झाल्यानें त्याचे पुष्कळ गैरसमज व भोळेपणाचें विचार जाऊन निव्वळ वेडेपणाच्या व अनर्थमूलक अशा कित्येक चालीरीतीवरची त्याची प्रीति उडेल. आमच्या समाजांत बालविवाहासारख्या कित्येक चाली आज कैक काळापासून रूढ झालेल्या असल्यामुळें त्यांचें बंधन कित्येक चांगल्या शिकलेल्या लोकांसहीं तोडण्याचें सामर्थ्य नाहीं, ह्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांमध्यें आरोग्यशास्त्र व जीवनेंद्रियशास्त्र यांचें निखालस अज्ञान हें एक प्रमुख होय. अमुक एका प्रकारच्या वर्तनापासून अमुक एक अनर्थ निश्चयें प्राप्त व्हावयाचा, या गोष्टींची प्रतीति झाल्यावांचून मनुष्य त्यापासून सहसा परावृत्त होत नाहीं. परप्रत्ययानें प्राप्त झालें ज्ञान मनुष्याच्या मनावर चांगलें ठसत नसल्यामुळें आज पुष्कळ गोष्टींच्या संबंधानें मनुष्यास ऐकीव माहिती असली तरी त्याच्या हातून तदनुसार कृति घडत नाही. उदाहरणार्थ, व्यायामाच्या आवश्यकतेची गोष्ट घ्या. पूज्य सुशिक्षित लोकांस तो घ्यावासा वाटतो, पण लोकलज्जेस्तव तो पुष्कळ जन घेत नाहींत. अशीच गोष्ट व्यसनासक्ततेची आहे. व्यसनांचें अनर्थावहकत्व कोणास भासत नाही? परंतु ती सोडण्याचा प्रयत्न किती जणांकडून होतो बरें? कारण उघडच आहे कीं, ह्या गोष्टीचें सोपपत्तिक ज्ञान त्यांस स्वप्रयत्नानें प्राप्त झाले नसतें. तेव्हां हें ज्ञान प्रात करून देण्याची व्यवस्था लौकिक शिक्षण पद्धतींत अवश्य झाली पाहिजें. सारांश, सर्व विचारी लोकांनीं ही गोष्ट नेहमी लक्षांत वागविली पाहिजे कीं, संसारांतील बहुतेक आचरणप्रकारांचा व नीतिनियमांचा संबंध मनुष्य शरीराशीं अत्यंत निकट असल्या कारणानें त्याच्या रचनादिकाचें ज्ञान त्यास असणे अत्यावश्यक आहे. त्याजविषयीं उदासीन राहून कधींही चालावयाचें नाहीं.

***

# २८ अनीति आयुष्य क्षीण करणारी आहे

(सुबोधपत्रिका १३-३-१८९२)

आमचे सुशिक्षित लोक अल्पायु कां होतात याची कांहीं कारणें मागे सांगितली. आज तसेंच एक कारण सांगतों. तें कारण आचरण चांगले नसणें हे होय. एखाद्याच्या अंगीं कितीही बुद्धिमत्ता असली, तरी त्याच मानानें त्याच्या अंगी नीतिमत्तेचाही विकास झाला आहे असें कल्पिणें भ्रांतिमूलक होय. मोठमोठे बुद्धिमान पुरुष दुराचारी व दुशील होऊन गेल्याचे दाखले या भूतलाच्या इतिहासांत चोहोंकडे आढळतात. याचे कारण उघडच आहे कीं, बुद्धि आणि वृत्ती हे मनाच्या व्यापारांचें दोन स्वतंत्र वर्ग आहेत. या उभय वर्गांचा परस्परांवर पुष्कळ परिणाम घडतो खरा. परंतु एकाच्या उन्नतीबरोबर दुसऱ्याचीही उन्नति झालीच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. कारण बुद्धिविकासाची व सद्वृत्ति विकासाची साधनें व नियम निरनिराळें आहेत. आमच्या आधुनिक शिक्षण पद्धतींत बुद्धिविकासक साधनांचाच मुख्यत्वे करून विचार केलेला दिसतो. नीतिविषयक शिक्षण मुलांस घरीं दारीं व शाळेंत काय यदृच्छेनें मिळेल तेवढेंच. तें चांगल्या प्रकारचें मिळण्याची सोय फार करून मुळींच नाहीं. आमची समाजस्थिति आजला अशी कांहीं चमत्कारिक व हीन आहे कीं, ती सुनीतिवर्धक मुळीच नाहीं. अशा स्थितींत अनीतीचें नानाप्रकार बाळपणापासून डोळ्यापुढें घडत असतां त्याविषयी तिटकारा व अप्रेम मनुष्याच्या मनांत उत्पन्न होण्याची आशा नको. बुद्धीच्या सहाय्यानें व अनेक ग्रंथादिकांच्या अवलोकनानें विवक्षित दुराचरण प्रकारांचे अनर्थावहत्व निदर्शनास आलें असूनही त्यांत निर्लज्जपणें मग्न होऊन आपल्या जीविताचें सर्वस्वीं मातेरे करून घेतांना चांगल्या शिकलेल्या माणसास जेव्हां आपण पाहतो, तेव्हां आपणांस सहजी असा अचंबा वाटतो कीं, एवढ्या ज्ञानीं मनुष्याकडून असें अनन्वित कर्म घडते तरी कसें? परंतु सूक्ष्म विचार केला असतां यात नवल मानण्यासारखें फारसे कांहीं नाहीं असें दिसून येईल. मनुष्यास बुद्धिमत्तेचे सुखलाभास्तव जसें महत्व वाटते, तसें नीतिमत्तेचें वाटत नाहीं; आणि ज्या कोणास तें वाटत असतें त्यास ती

आपली सहजी प्राप्त होईल असा भ्रम असतो. पण ह्या भ्रमाचा निरास जितका लवकर होईल तितका इष्ट आहे; आणि आमची नीतिमत्ता जेणेकरून दृष्टि पावेल तें हरउपायाने करणें अवश्य होय. आमच्या लोकांतलें नीतीचें मान कमी असण्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांपैकीं कीहीकांचें येथें दिग्दर्शन करितो. आमचे शिमग्यासारखें कित्येक अत्यंत लज्जास्पद प्रकारांनी भरलेलें सण विशेषेंकरून लहान मुलांच्या हृदयातील नित्यांकुराचा उच्छेद करणारे आहेत. आणखी असें कीं, आमच्या गरीबीमुळें किंवा बहुतेक सार्वत्रिक अज्ञानामुळें, पुष्कळ अप्रयोजक, निंद्य व हानिकारक समजुती व चाली अगदीं पुरातन कालापासून आम्हामध्यें रूढ होऊन गेल्या आहेत. त्यांच्यापायीं आमची दुराचाराकडेच विशेष प्रवृत्ति होते. याशिवाय आणखी एक मुख्यत्वेकरून शिकलेल्यासच नडणारे कारण आहे. ते कोणतें म्हणाल तर, बिभत्स व अश्लील प्रकारांनी भरलेल्या पुस्तकांचे वाचन हे होय. येथे विशेष खेदाची गोष्ट अशी सांगावयाची कीं, आमच्या शिक्षणपद्धतींत फेरबदल करण्याचें काम ज्यांच्याकडें असतें, त्यांच्याचकडून अशा वाचनास उत्तेजन मिळते. हें कसें ते शाळांतून व विशेषतः कॉलेजांतून जो भाषाविषयक पुस्तके वेळोवेळीं लावण्यात येतात त्याची नांवनिशी वाचली असतां कळून येईल. हीं पुस्तकें बहुतकरून नाटके किंवा कादंबऱ्या असतात. आतां हें सुप्रसिद्धच आहे कीं, या कादंबऱ्यांत किंवा नाटकांत विषयवासनादिक इंद्रियवृत्तीचें उत्तेजन करणाऱ्या गोष्टीचें प्राचुर्य हमेशा असतें. तेव्हां अशा ग्रंथांचे परिशीलन ज्या तरुण जनांकडून होते, त्यांच्याठायीं ह्या वृत्तींचा उद्भव व विकास अकालींच झाल्यास नवल ते कोणते? शेक्सपियर, स्कॉट, आस्टिन इत्यादि इंग्रेजी ग्रंथकार व कालीदास, भवभूति, वगैरे संस्कृत ग्रंथकार, यांचे ग्रंथ भाषाज्ञानासाठी वाचणें अगत्य पडतें, हें एक आमच्या शिकणारांचे दुर्दैवच समजलें पाहिजे. हे त्यांचे ग्रंथ दुसऱ्या बाबतींत कितीही उत्तम असले तरी त्यांच्यामुळें तरुण वाचकांच्या नीतिमत्तेवर तेणेंकरून जो ठसा उमटतो तो सहसा इष्ट नव्हे. याकरिता अशा ग्रंथांचे आमच्या शिक्षण क्रमांतून होईल तेवढें विवर्जन झाले पाहिजे. नुसती भाषा उत्तम प्रकारची शिकण्याच्या नादीं लागून आपल्या नितिमत्तेस धक्का लावून घेणे आम्हास मुळींच उचित नाहीं. दुसरी एक गोष्ट येथें आणखी अशी सांगण्यासारखीं आहे कीं, आमच्या आजपर्यंतच्या सुशिक्षित वर्गात गरीब लोकांचीच संख्या पुष्कळ असल्या कारणानें त्यांचा विद्यासंपादनाचा मुख्य हेतु आपली सांसारिक स्थिति सुधारण्याचाच असतो. हा हेतु सिद्ध झाला म्हणजे त्यांस इतिकर्तव्यता फारशी उरली नाहीं असे कमीजास्त

प्रमाणानें वाटतें. मग प्राप्त झालेल्या संपत्तीचा यथेच्छ उपभोग घेऊन पूर्ववयांत झालेल्या दगदगींचा वचपा काढण्यांत ते दंग होऊन जातात. याप्रमाणें इंद्रियतृप्तीचाच सदैव विचार मनांत वागल्यानें त्यांच्या मनांस क्षीणता प्राप्त होऊन ग्राम्य सुखापलीकडें कांहींएक अभिष्ट गोष्ट उरली नाहीं असें त्यांस होऊन जातें. परंतु त्यांचें शरीर ह्या ऐषआरामांस पाहिजे तसें सुदृढ किंवा परिचित नसल्यामुळें तें हळू हळू क्षीण होऊन त्यांच्या सर्व सुखाशांचा भंग होऊन एकाद्या असाध्य रोगास ते बळी पडून जीवास मुकतात. वास्तविक पाहतां सुशिक्षित लोकांनीं आहारविहारादि शारीरिक सुखांच्या पाठीस फारसें न लागतां जेणेंकरून उच्चप्रतीचीं जीं नानाविध मानसिक सुखें, त्यांचें संपादन करण्याचा हव्यास धरिला पाहिजे. विद्यानंद व स्वजनांच्या हितासाठीं आपल्या कष्टप्राप्त ज्ञानाचा व बुद्धीचा विनियोग करण्यापासून होणारे समाधान हीं कांहीं लहानसान सुखसाधनें नव्हत. यांपासून प्राप्त होणारें सुख अत्यंत शुद्ध असून स्वतःस व इतरांस उन्नतिप्रदच होते. पण अशा सुखाचा आस्वाद घडण्यास इंद्रियांच्या विषयांविषयी चित्तांत अनासक्ति उद्भवली पाहिजे. सर्व नीतिमत्तेचे बीज येथेंच आहे, हें ज्याचें त्यानें ओलखून आपलें वर्तन सुधारले पाहिजे; आणि निरनिराळ्या मानवोन्नतिसंपादक संस्थांचीं व्यवस्था ज्यांच्या हातीं आहे त्यांनीं, ह्या परम महत्वाच्या उद्देशाची सिद्धी जेणेंकरून होईल तें करण्यास आळस करितां कामा नये.

***

# २१ नेटिव वैद्य आणि संमतिवयाचा कायदा

(इंदुप्रकाश २-३-१८९१)

काल संध्याकाळीं जव्हेर बागेत भरलेंल्या बड्या सभेतून बाहेर पडत असतां एक हस्तपत्रक माझ्या हाती पडलें. त्याचा शिरोलेख ''संमतिवयाचा कायदा वैद्यशास्त्राला विरुद्ध आहे.'' असा होता. तो वाचताच मी अगदीं चकित होऊन, असा सिद्धांत तरी कोणत्या भिषग्मूर्तींनी ठरविला हे जाणण्याच्या उत्कंठेनें त्या पत्रकाच्या तळीच्या सह्या आधीं वाचून पाहिल्या. तेव्हां त्या नामदशकांत ऐकून ठाऊक असे एक दोघेच दिसले. पुढे सारे पत्रक वाचून पाहतां असें कळले कीं, ह्या नेटिव वैद्यांची एक सभा डॉ. कुंटे यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन त्या पत्रकांत दिलेले ठळक ठळक सिद्धांत ठरविण्यांत आले! ह्या स्वतःस आर्य वैद्यकाचे प्रतिनिधि म्हणविणाऱ्या वैद्यांचें असें विचार पाहून आम्हांस इतकें नवल वाटत नाहीं; पण त्यांच्या ह्या अपसिद्धांतांस स्वसंमतीनें पुष्टीकरण देण्यास डॉ. कुंट्यांसारख्या आर्याग्लवैद्यकपरायण विद्वानानें प्रवृत्त व्हावें ह्यासारखे विस्मयावह दुसरें कांहीं नाहीं. आतां ह्या भिषग्वरांस असें आपल्या आधुनिक बहुतेक व्यवसायबंधूच्या उलट मत प्रतिपादण्यास काय कारणें असतील तीं स्पष्टपणें लोकांस कळल्यास सत्यनिर्णयास साह्य होऊन लोकहित केल्याचें श्रेय त्यांस मिळेल.

आतां ह्या वैद्यांनी ह्या पत्रकांत लोक विज्ञानार्थ जें सिद्धांत नमूद केलें आहेत, त्यांच्यावर सुचण्यासारख्या कांहीं शंका येथें सांगतों. त्यांचें समाधान हे वैद्य किंवा यांचा पक्ष घेतलेलें आमचे प्रसिद्ध डॉ. कुंठे हे करितील तर बरें होईल.

त्या वैद्यांच्या मतें मुलीस ऋतु प्राप्ति झाली म्हणजे ती संभोगार्ह होऊन, तिच्या ठायीं पुरुषसंगाची प्रबल इच्छा उत्पन्न होते असें आहे. यावर पहिली शंका अशी आहे कीं, ज्या कित्येक मुलीस १० व्या वर्षीसुद्धां ऋतु प्राप्त होतो त्याही संभोगार्ह होऊन त्यांच्याठायीं कामेच्छाप्रदीप्त होते काय? कारण ऋतुप्राप्तीचें बाह्य लक्षण जें आर्तवव्यापाराचें तें वर सांगितलेल्या वर्षी मुलींस झाल्याचें दाखले पुष्कळ आहेत.

त्या गोष्टीचा विचार आमच्या ह्या वैद्यांच्या कधीं स्वप्नीं तरी आला असेल काय? आतां ही अकालिक ऋतुप्राप्ति रोगमूलक समजण्यास फारसें कारण नाहीं. कारण हीं अवस्था प्राप्त झालेल्या मुलांच्या ठायीं रेतप्रवेशानें गर्भसंभव झाल्याचें दाखलें आहेत. दुसरी गोष्ट अशी कीं, अकरापासून चवदा वर्षेपर्यंत ज्या मुलींस ऋतुप्राप्त होतो, त्या सर्वांच्याच ठायीं प्रबल इच्छा जागृत होतेच, असें आमचे हें वैद्य निश्चयानें सांगण्यास तयार आहेत काय? बरें ज्या कित्येक मुलींच्या ठायीं कामेच्छा उद्भवते, त्यांच्याठायीं ती स्वाभाविकपणें उद्भवते कीं कांहीं विशेष कृत्रीम व अस्वाभाविक कारणांनीं उद्भवते, याचा कधीतरी विचार ह्या वैद्यांनी केला आहे काय? ही कृत्रीम कारणें नाहींतशीं करण्याचा प्रयत्न केल्यास ह्या कामेच्छेचा उद्भव अकालिक न होईसां बिलकुल करितां येणार नाहीं, असा यांचा निर्धार होऊन चुकला आहे काय? आतां ही कामेच्छा मुलगी बारा वर्षाची होण्यापूर्वीच अतिशयेंकरून जागृत होते, असें क्षणभर कबूल केलें तरी, तीं तृप्त नच झाली तर जे भयंकर रोग होतात, त्यांचा हे वैद्यराज खुलासा करतील काय?

अशी अकाली झालेली इच्छा तृप्त करणें म्हणजे ज्वरितास तक्रपानाची इच्छा तृप्त करूं देण्याइतकीच अनर्थावह आहे, असें वाटते; कारण असें पहा कीं, मनुष्याच्या बहुतेक अवयवांची पूर्ण वाढ होण्यास सुमारे बावीस पंचवीस वर्षे लागतात. इतक्या काळांत त्याच्या कोणत्याही शारीरिक शक्तीचा अपव्यय होता कामां नये. म्हणून आमच्या प्राचीन आर्यभिषग्वरांनीं व आधुनिक पाश्चिमात्य वैद्यकविद्यापारंगतानीं ब्रम्हचर्य विहित केले आहे. आमच्या इकडे स्त्रियांना ज्ञानार्जनादि पौरुष कर्मे फारशी करावयाचीं नसत, म्हणून त्यांच्या संभोगार्हतेची मर्यादा आमच्या प्राचीन आर्यभिषग्वरांनीं जराशी कमी केली आहे. पण ती सोळा वर्षाहून कमी कोणीच सांगितलेली नाहीं. आणखी असें पहा कीं, जर मुलीस रजोदर्शन होताच तीं परिपक्व होऊन संभोगक्षम होते असें मानावे, तर मुलांच्या ठायीही रेतोद्भव होतांच तो परिपक्क होऊन स्त्रीसंभोगालायक झाला असें मानणें प्राप्त होतें. पण असें केल्यानें त्यांच्या सर्वप्रकारच्या शारीरिक व मानसिक विकासास अंतराय येऊन तो निरुपयोगी, रोगी व अल्पायु होतो, असें अगदी प्राचीन काळापासून विचारीं मनुष्यांच्या प्रत्ययास आले आहे. अशी स्थिति जर पुरुषांची आहे तर ती स्त्रियांचीच कां निराळी असावी तें समजत नाहीं. माझा तर असा समज आहे कीं, रजोदर्शन आणि रेतोद्भव ही परिपक्वतेच्या सुरवातींची सूचक होत. हे व्यापार मनुष्याच्या ठायींच्या निरनिराळ्या धातूंत व इंद्रियांत जोम उत्पन्न करणारे आहेत. तेव्हां त्यांचा विनियोग कांहीं काळपर्यंत अत्यावश्यक कार्याकडेच होणें हिताचे आहे.

आतां आणखीं एक गोष्ट ह्या वैद्यांस अशी पुसावयाची कीं, मुलगी बारा वर्षांची होण्यापूर्वी संभोगार्ह होते असें जें ते म्हणतात त्याचा अर्थ काय? संभोगाचा हेतु प्रजोत्पत्तिरूप समजावयाचा कीं स्त्रीपुरुष कामेच्छातृप्तिरूप समजावयाचा पण हा कोणताही असला तरी ह्या तृप्तीचा अपरिहार्य परिणाम प्रजोत्पत्तिरूपच नव्हे काय? यावरून पाहतां संभोगार्हतेचा काळ प्रजोत्पत्तिक्षमतेच्या काळाहून भिन्न असणें संभवत नाहीं, असें नाहीं का ठरत? असें जरं आहे, तर बारा वर्षांपूर्वी मुलगी गर्भधारणासही लायक होते असें ह्या वैद्यांचें म्हणणें नाहीं का होत? पण आर्यवैद्यक प्रवीण म्हणविणारांनीं सुश्रुतावागभट्टाचार्य या प्रकरणीं काय म्हणतात इकडे कधीं लक्ष दिले आहे काय?

ऊन षोडश वर्षायामप्राप्त पंचविंशतिम् ।
यद्याधत्ते पुमान गर्भ कुक्षिस्थः सविपद्यते।।
जातो वा न चिरंजीवेत् जीवेद्वादुर्बलेन्द्रियः।। सुश्रुत.
पूर्ण षोडशवर्षा स्त्रीपूर्णविंशेन संगता।।
शुद्धे गर्भाशये मार्गे रक्ते शुकेऽनिले त्दृद्दि।।
वीर्यवंतं सुतं सुते ततो न्यूनाब्दयोः पुनः।।
रोगल्ययुरधन्यो वा गर्भोभवति नैववा ।। वाग्भट.

ही त्या प्राचीन आचार्यांची वचनें त्यांनीं कधीहीं पाहिले नाहींसे दिसतें. आणि पाहिली असल्यास त्यांच्या असत्यत्वाची खात्रीलायक प्रमाणें त्यांच्यापाशीं असतीलच. तीं तें जगजाहीर करतील तर खूब बहार होईल. तूर्त पाश्चात्य वैद्यकाचें ह्या अल्पकालिक गर्भधारणेपासून होणाऱ्या परिणामांविषयी काळ म्हणणें आहे, तें संक्षेपानें सांगतों. स्त्रियांच्या कटिरास्थि चांगल्या विकास पावल्याखेरीज गर्भधारण झाल्यास संभवलेला गर्भ पूर्ण विकास पावत नाहीं; तेणेंकरून होणारें मूल खुरटें, रोगट किंवा अल्पायु होतें, आणि मुलींसही असा अकालिक गर्भधारणेचा भार व तन्मूलक वेदना कोंवळ्या वयांत सहन न होऊन त्यांना वांझपणा, कटिरास्थीची विरूपता व तन्मूलक वांकडें चालणें, बाळंतरोग, क्षय इत्यादि रोगांच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागतें. याप्रमाणें त्याचे जीवित कष्टमय होऊन, पुनः त्यांना अपत्यसुखहीं व्हावे तसें होत नाहीं. कारण बालकांच्या गर्भाशयांतील अपुऱ्या वाढीमुळें व जन्मल्यावर पुष्कळ प्रसंगीं मातृस्तन्याभावास्तव मातापितरांस दुःखसमुद्रांत लोटून तीं अल्पकाळांतच पंचत्वास जातात. अशी दुर्बह स्थिति आमच्या ह्या वैद्यदशकाच्या अनुभवास कधींच आली नाही काय? असो. आतां हें पाश्चिमात्य वैद्यकाचें म्हणणें हें वैद्य कसें काय सप्रमाण खोडून काढतात, तें पाहून प्रसंग पडल्यास आणखी एक वेळ आपणांस तसदी देण्याचें अभिवचन देऊन आज येथेंच पुरें करितों.

***

# *३० मांसाहार

(इंदुप्रकाश १-६-१८९१)

मांसाहार हा विषय अद्यापि बराच वादग्रस्त आहे. आधुनिक शास्त्राचा एतद्विषयक सिद्धांत अजून निश्चयात झालेला नाहीं. ज्या अभिन्न पुरुषांस या विषयावर मत देण्यापुरतां थोडाबहुत अनुभव आहें, त्यांपैकीं बऱ्याच जणांस दुरभिमानादि सत्यपराङ्मुख करणाऱ्या दुर्वृत्तींनी अजून फारसें न सोडल्यामुळें व या विषयाच्या वादांत ज्या इतर कित्येक व्यावहारिक गोष्टींचा विचार प्रसक्त होतो त्यांचें यथावत ज्ञान त्यांस नसल्यामुळें त्यांचे अभिप्राय सर्वथैव विश्वसनीय मानता येत नाहींत. खुद्द इंग्लंडामध्यें, म्हणजे जेथें इंद्रियविज्ञानादि शास्त्रांत प्राविण्य संपादिलेलें विद्वान गृहस्थ पुष्कळ आहेत, तेथें या विषयाच्या सबंधानें सध्यां दोन पक्ष झालेलें आहेत. या दोन्हीं पक्षांकडे नावाजण्यासारखें विद्वान लोक आहेत. त्यांनीं आपआपल्या मतांच्या समर्थनार्थ अनेक लहान मोठे निबंध लिहून प्रसिद्ध केलें आहेत. तेव्हां ज्या कोणास या विषयाचें सध्याच्या स्थितींत यथार्थ ज्ञान करून घ्यावयाचें असेल, त्यानें हे त्यांचे लेख अवश्य पाहिले पाहिजेत. केवळ अमुक एक मत आपणांस आवडतें किंवा हिताचें वाटतें, म्हणून त्याचें अवलंबन करून त्याच्या पुष्ट्यर्थ अनुकूल ग्रंथांचे आधार घेऊन जगजाहीर केल्यानें सत्यनिर्णय होत नसतो. पण असा थोडासा प्रकार रा. नवलकरांनी प्रस्तुत पुस्तकांत केलेला दिसतो. आतां. हा करताना तरी त्यांनीं स्वमतास अनुकूल अशा कित्येक चांगल्या चांगल्या ग्रंथाचा आधार घेऊन व्यवस्थित रीतीने स्वमतप्रतिपादन केले असतें, तर ठीक झालें असतें. त्यानी ज्या इंग्रजी ग्रंथांचा आधार प्रस्तुत पुस्तक लिहितांना घेतला आहे, त्यांची नावे त्यानीं पुस्तकाच्या प्रारंभी दिली आहेत. त्यांवरून पाहता त्यांनीं या विषय- चांगल्ये ज्ञान मिळविण्याची फारशी खटपट केलेली दिसत नाही. शिवाय स्वमतप्रतिपादन करतांना विरुद्ध पक्षाच्या मुख्य मुख्य मुद्यांचे खंडन करण्याची आवश्यकत्या विशेष अष्ट तसा फारसा कांहीं प्रकार- प्रस्तुत निबंधांत केलेला नाहीं.

---

* रा. रा. हरिश्चंद्र नारायण नवलकर यांनी लिहिलेल्या ''मांसाहार'' या पुस्तकांतील मुद्यांचा विचार

त्यानीं जें आक्षेपनिरसनाचें प्रकरण लिहिले' आहे, त्यावरून हे उघड होते की, प्रतिपक्षाचें या विषयाविषयी काय म्हणणे आहे ते त्यांनी मुळीच पाहिले नाहीं. प्रकृत निबंधाच्या प्रस्तावनेत या विषयाविषयीची अनभिज्ञता जी त्यांनीं प्रकट केली आहे, तीही आमच्या मते वास्तविक आहे. असो. आता त्यांचें प्रतिपादन कसे काय वठलें आहे ते संक्षेपानें पाहू.

रा. नवलकर आम्हांस असें सांगतात कीं, इंद्रियविज्ञान, शरीर, रसायन इत्यादि शास्त्रांवरून पाहातां मांसाहार मनुष्यास सर्व स्थितींमध्यें हिताचा व आवश्यक आहे. ह्या शास्त्रीय प्रतिपादनानें प्रस्तुत पुस्तकाचीं पहिली तीस पानें व्यापिलीं आहेत. यात ज्या मुद्यांचे विवरण केलें आहे, त्यांतील मुख्य मुख्य मुद्याचाच येथें क्रमशः विचार करणें आम्हांस उचित दिसतें. आतां हे मुद्दे म्हणजे सुसंगत स्पष्ट रीतीनें सांगितले आहेत असें नाहीं. तर जो पुष्कळ आवश्यक अनावश्यक मजकूर ह्या तीस पानांत लिहिला आहे, त्यात लेखकाचें मुद्दे केवळ संकीर्ण स्थितीमध्यें आहेत. तरी पण त्याचें एकंदर प्रतिपादन वाचले म्हणजे ते काय म्हणतात, हें बरेंच स्पष्टपणें कळतें. त्यांचा पहिला मुख्य मुद्दा असा आहे कीं, मनुष्याच्या अन्नांत नेहमी पौष्टिक अंश असला पाहिजे. हा पौष्टिक अंश नत्रविशिष्ट (रा. नवलकर यांना निर्गुणवायुविशिष्ट म्हणतात) तत्वांत असतो; आणि हीं नत्रविशिष्ट तत्वें पशुपक्ष्यादिकांच्या मांसांत जितकीं असतात, तितकीं दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या खाद्य किंवा पेय वस्तूंत नसतात. म्हणून पशुपक्ष्यादिकांचे मांस मनुष्यानें अवश्य खाल्लें पाहिजे. यावर पहिला प्रश्न असा आहे कीं, वनस्पतीजन्य सर्वच पदार्थ नत्रविशिष्ट तत्वांच्या संबंधानें मांसाहून कमी प्रतीचे आहेत काय? त्यांनी स्वमताच्या पुष्टीकरणार्थ जें एक तुलनादर्शक कोष्टक प्रकृत निबंधांत दिलें आहे, त्यावरून काहीएक स्पष्ट होत नाहीं. त्यांच्या त्या कोष्टकांतल्या प्रत्येक पदार्थापुढें दिलेलें पौष्टिक अंशाचें प्रमाण जर नत्रविशिष्ट तत्वांचेंच असेल, तर तें कोष्टक अगदीं चुकीचे आहे, असें आम्ही त्यांस खात्रीनें सांगतो. आम्हीं जी एतद्विषयक कित्येक कोष्टके पाहिलीं आहेत त्यांवरून असें समजतें कीं, बकऱ्याच्या वगैरे मांसातल्यापेक्षां वाटाणे, मठ, तूर, मूग, चणे, चवळ्या, पावटे, वगैरे. धान्यांत नत्रविशिष्ट तत्वे मुळींच कमी नसून कित्येकांत तर तीं अधिकही आहेत. त्याचप्रमाणें गहू, बाजरी वगैरे धान्यांतही त्यांचा अंश फारसा कमी आहे असे नाहीं. आतां नत्रविरहित इतर कर्बप्रधान तत्वांच्या संबंधानें पाहतां वर निर्दिष्ट केलेल्या धान्यांमध्यें तर तीं पुष्कळ असतात. मांसामध्यें थोड्याशा स्निग्ध तत्वांखेरीज दुसरी कर्बप्रधान तत्वे बिलकूल नसतात. तेव्हां वास्तविक पाहतां नत्रविशिष्ट तत्वांखेरीज मांसामध्यें

पोषक अंश फारसा मुळींच नसतो. त्यांत सरासरी शेंकडा ७८ भाग तर नुसतें पाणीच असतें. हें जर खरें असेल तर, रा. नवलकरांच्या कोष्टकांत दाखविलेले मांसांतील पौष्टिक अंशाचे प्रमाण चुकीचें आहे.

येथवर जें आम्हीं प्रतिपादन केलें, तें जर सत्य असेल, तर यापुढचा प्रश्न असा आहे कीं, ज्या वनस्पतीजन्य पदार्थात नत्रविशिष्ट तत्वे कमी जास्त प्रमाणानें आहेत, त्यांचें योग्य प्रकारचें मिश्रण अन्नरूपानें सेवन केल्यास शरीरपोषणाचें इष्ट कार्य होणार नाहीं काय? आमची तर अशी समजूत आहे कीं, अशा रीतीनें तें कार्य उत्तम प्रकारें होईल. कारण असें पहा कीं, मनुष्याच्या अन्नांत नत्रविरहित तत्वें नत्रविशिष्ट तत्वांहून साधारणतः पंधरापट जास्त पाहिजेत. हीं येवढी जास्त लागणारी तत्वे मांसात बहुतकरून मुळींच नसतात. तेव्हां मांसाहार करणारास त्यांच्या प्राप्त्यर्थ वनस्पतिजन्य पदार्थांचें सेवन करणें भाग येतें, पण धान्याहारी मनुष्यास हीं तत्वें मुबलक मिळून आणखी नत्रविशिष्ट तत्वांचाही लाभ त्यास मांस सेवन करण्याचें अगत्य न पडून होतो. आणखी असें कीं, ही नत्रविशिष्टतत्वें मांसांतल्यापेक्षां धान्यांत वगैरे विशेष शुद्ध प्रकारचीं मिळण्याचा संभव असतो. तेव्हां आमचा नहेमींचा वरण–भात, गव्हाचीं किंवा बाजरीची भाकर, थोडेसें तूप व दूध, आणि वाल, वाटाणे घालून केलेल्या शाक भाज्या इत्यादिकाचें भक्षण केल्यानें इष्ट प्रकारचें अन्न सेवन केल्यासारखें होत नाही का मग मांसच खाण्याचा आग्रह कां म्हणून? येथे असें म्हणण्यांत येईल कीं, तृणाहारी पशु तृणादिकांचें भक्षण करून तो पचवून जें मांस आपल्या शरीरांत तयार करितात, तें आम्हीं आयतेंच खाल्ल्यानें फायदा आहे. असें जर खरोखरच म्हणणें असेल, तर त्यावरून ते असें भासवू पाहताहेत कीं, मांसान्न शरीरांत इतर अन्नापेक्षां लवकर मिळून जातें. परंतु ही निवळ भ्रांति आहे. त्यानींच प्रकृत पुस्तकाच्या बाविसाव्या पानावर जें दुसरें कोष्टक दिलें आहे, त्यावरून पाहतां कोणत्याही प्रकारचें मांस पचायास इतर पदार्थांहून विशेष काळ लागतो. आणि अन्नावर पचनक्रियेचें कार्य झाल्यावांचून त्यास पोषक रसाचें स्वरूप प्राप्त होत नाहीं, हें निर्विवाद आहे. तेव्हां आयतें मांस खाण्यांत फायदा आहे म्हणतात तो कसा?

रा. नवलकरांचा दुसरा मुद्दा असा आहे कीं, मांसाहारी प्राणी तृणाहारी प्राण्यापेक्षां जास्त बळकट व चपळ असतात; हा भेद मनुष्यामध्येंही दिसून येतो. तेव्हां मनुष्यानें बल व चपलता हे इष्ट गुण हवे असल्यास मांसभक्षण अवश्य करावें. ह्या त्यांच्या मुद्याला एक उत्तर तर आमच्या वरील प्रतिपादनांत आलेंच आहे. कारण, शरीरपुष्टीसच

जर मुळीं मांससेवनाची जरूरी नाहीं तर मग त्या पुष्टीवर अवलंबून असणारे जें बल आणि चपलता त्यांचें संपादन करण्यास अन्य साधनांची आवश्यकता आली कोठून? आतां ह्या मुद्यांत कथन केलेला सिद्धांत त्यांनी ज्या वस्तुस्थितीच्या अवलोकनानें केला आहे, तिचें वास्तविक स्वरूप काय आहे, व अशा सिद्धांतानें प्रणयन त्यांना करितां येतें किंवा कसें, तें पाहूं. त्यांनी तृणाहारी व मांसाहारी प्राण्यांमध्यें जी बल व चपलता या संबंधानें तुलना केली आहे, ती बहुतेक चुकीची आहे. हत्ती, गेंडे, गवे व वन्य स्थितींतले बैल, रेडे, व घोडे यांच्या अंगांत जितकें बळ व टणकपणा असतो, तितका कोणत्या मांसाहारी प्राण्यांत असतो बरें? आतां चपलतेच्या संबंधानें पाहतां घोडे, हरणें, ससे, वानर इत्यादि वनस्पत्याहारी जनावरांच्या ठायीं जी चपलता असते, ती हिंस्रपशूंच्याहून कमी असते, असें कोण म्हणेल? सिंह, वाघ वगैरे मांसभक्षक पशु स्वभक्ष्याच्यापाठीस कितीही आवेशानें कांहीं वेळपर्यंत लागले, तरी घोड्यांप्रमाणें किंवा हरणाप्रमाणें त्यांना पुष्कळ वेळपर्यंत भरधाव पळण्यापुरतां जोम नसतो. शेंपन्नास उड्या मारून भक्ष्य मिळाले नाहीं तर ते त्याचा पाठलाग सोडून देतात. म्हणूनच हे हिंसक प्राणी पाण्याच्या ठिकाणीं लपून दबा धरून स्वभक्षाची मार्गप्रतिक्षा करीत बसलेले असतात. रेडा वगैरे जनावरांस ते कधीं कधीं जे जेरीस आणतात आपल्या नखदंतादिक स्वाभाविक साधनांच्या योगानें, बलविशेषाच्या योगानें नव्हे. आतां, कित्येक वेळां सिंव्हव्याघ्रादि हिंस्त्रपशु स्वभक्षास दातांत धरून, पळून जातात त्याचें कारण उघडच आहे कीं, ते आपल्या भक्ष्याहून शरीरानें मोठे असतात. दुसरे असें कीं, बैल, रेडे, घोडे वगैरे तृणाहारी पशूंच्याठायीं सतत श्रम करण्याचा जो जोम असतो, त्यांतला लवलेशही हिंस्त्रपशूंत नसतो. एवढा नित्याचा अनुभव रा. नवलकरांच्यापुढे असतां त्यांनीं वरनिर्दिष्ट केलेल्या प्रकारचा सिद्धांत कसा केला कोण जाणें. ही त्यांची तुलना मनुष्यांच्या संबंधानें तरी कितपत यथार्थ आहे हे पाहूं. ह्या विचारांत ही एक गोष्ट पहिल्यांदा लक्षांत ठेवली पाहिजे कीं, जसे पशु निव्वळ मांसाहारी किंवा निव्वळ तृणाहारी असतात, तसें मनुष्याचें बहुतकरून आढळत नाही. आमच्या या देशांतच काय ते निव्वळ वनस्पत्याहार करणारे असे थोडेसे लोक कांहीं शतकापासून आहेत; व अलीकडे कोठे तीस चाळीस वर्षात इंग्लंडादि कित्येक पाश्चिमात्य देशांत कांहीं लोकांनीं मांसाहार सोडलेला आहे. वरकड सारे उभय प्रकारचें अन्न खाणारे आहेत. निव्वळ मांसावर उपजीविका करणारी अशी क्वचित कोठें अत्यंत रानवट स्थितींतलीं एखादी दुसरी मनुष्यजाति असेल. तेव्हां रा. नवलकरांनीं मनुष्यामनुष्यांमध्ये अन्नभेदानें बल व चपलता यांच्या संबंधानें उत्पन्न होणाऱ्या भिन्नत्वाची तुलना, मांस मुळींच न

खाणारे व मांस थोडेबहुत खाणारे यांची वास्तविक स्थिति पाहून केली पाहिजे, हें उघड आहे. आमच्या इकडे अशी तुलना करावयाची म्हटलीं म्हणजे ब्राम्हण वगैरे ज्या जातींत मांसाहार करीत नाहींत, त्यांची मांस खाणाऱ्या लोकांशी होय. आतां हीं तुलना करताना आणखीहीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, ज्या दोन व्यक्तींमध्यें किंवा जातींमध्यें तुलना करावयाचीं, त्यांचें हवा, व्यवसाय, शिक्षण इत्यादिक फक्त उद्भवलेले जें स्थितिवैचित्र्य त्याचाही विचार अवश्य केला पाहिजे. स्थिति समान असून केवळ आहाराच्या भिन्नत्वानें व्यक्तीव्यक्तींमध्ये कसा काय फरक पडतो, याचें सूक्ष्मरीतीनें अवलोकन केलें पाहिजे. हे अशा प्रकारे केलेले अवलोकन बऱ्याच ठिकाणीं एकसारखें अनुभवास आल्यावर मग काय निर्णय करणें तो करावा. वस्तुस्थिति पहातां साधारणपणें समान स्थितींतलें मांसाहारी व वनस्पत्याहारी यांच्यामध्यें बल व चपलता यांच्या संबंधानें फारसा फरक दिसत नाहीं. पुष्कळ ठिकाणी तर त्याच्या उच्चच प्रकार दिसून येतो. मांस न खाणारे बरेच लोक मांसखाणारांपेक्षा तेजःपुंज, बळकट व चपळ असतात, असें नेहमीं आढळून येतें. असें असतां रा. नवलकरांनीं आपल्या पुस्तकाच्या २३ व्या पानावर जी जराशीं उपहासास्पद तुलना केलीं आहे, तीं अगदीं गैर होय. आतां युरोपियन, मुसलमान वगैरे लोक आमच्या लोकांहून साधारणत: बळकट असतात याचें कारण रा. नवलकरांच्या मतें अन्नाचे भिन्नत्त्व हे होय. पण त्यांना येथें असा प्रश्न करावयाचा कीं, सशक्त पणा केवळ अन्नाच्याच भिन्नत्वावर अवलंबून असतो काय? त्याच्यामध्यें न्यूनाधिक्य इतर कोणत्याहीं कारणांनीं उत्पन्न होत नाहीं असे रा. नवलकरांना खात्रीपूर्वक वाटतें काय? जर वाटत नसेंल तर ज्या इतर कारणांनीं मनुष्याच्या शक्तीत फरक पडतो, त्यांचाही विचार करणें अगत्याचें नाहीं काय?

ह्या वादांत आणखी एक महत्वाची गोष्ट अशी लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आपल्या ह्या देशांत व युरोपांतील व अमेरिकेतील देशांत खेड्यापाड्यांतून जे मांसाहार करणारे गरीब लोक रहातात, त्यांस वर्षातून दहावीस वेळांदेखील मांस खावयाला मिळत नाही. मोठमोठ्या शहरांतून राहणाऱ्या गरीब लोकांस मात्र पैसा असल्यास आठपंधरा दिवशी किंवा निदान एकदोन महिन्यांनीं तरी थोडसं मांस खायाला मिळतें. युरोपांतील बहुतेक देशांतून मांस उत्तरोत्तर महाग होत चालल्यामुळें तें गरीब लोकांच्या खाण्यांत कमी कमी येऊं लागलें आहे. तिकडे मांसाचा नेहमीचा खप पाहिल्यास ऐपतवाल्या लोकांत काय तो होतो. आमच्या इकडच्या ज्या कित्येक गृहस्थांस दररोज मांस खाण्याची ऐपत आहे, त्यांपैकीं फारच थाडे नेहमीं मांसभक्षण करितात; आणि जे

करितात तें देखील तोंडी लावण्यासारखें करितात. युरोपियन लोकांप्रमाणें मुख्य अन्नासारखे नव्हे. अशी जर वास्तविक स्थिति आहे, तर रा. नवलकरांचा वादविषयक मुद्दा मुळींच उडून जातो. कारण युरोपांतलें व इकडचे बहुतेक धनोत्पादक् धंदे करणारे लोक गरीब असतात. त्यांच्या अन्नांत मांसाचा उपयोग नेहमीं होत नसताही त्यांच्या अंगांत साधारणतः जो टणकपणा, सतत श्रम करण्याचा जोम, व चपळता ही असतात, तशीं नेहमीं मांसाहार करणाऱ्या श्रीमंत गृहस्थांच्या अंगीं नसतात. आमच्या इकडच्या घाटी, कुणबी, नवघणे, चोबे, रजपूत, पुरभय्ये वगैरे मेहनतीं लोकांस नेहमी काम मिळून त्यांचे खाण्यापिण्याचें हाल न झाल्यास, तें नेहमीं मांस खाणाऱ्या पण बैठें काम करणाऱ्या पाहिजे त्या मनुष्याचें मनगट धरितील. तेव्हां रा. नवलकरांची मांस खाणाऱ्या व मांस न खाणाऱ्या लोकांची तुलना अगदीं अयथार्थ होय.

रा. नवलकरांचा मांसाहारास अनुकूळ असा आणखीं एक मुद्दा आहेसा दिसतो कीं, मांसभक्षक व तृणभक्षक ह्या प्राण्यांच्या शरीररचनेंत बरेंच भिन्नत्व दिसून येतें. मनुष्यांचीही शरीररचना मांसाहार करण्यास स्वभावतः योग्य अशीच आहे. म्हणून सृष्टिकर्त्या देवाचाही उद्देश त्यानें मांस खावें असा आहे. ह्या मुद्याचें त्यांनी करावें तसें खुलासेवार विवरण केलेले नाही. जनावरांचे साधे व संयुक्त कोठे, दांत व इतर शरीररचना ह्यांचे वर्णन करून त्यांनीं काय सिद्ध केले आहे ते आम्हाला चांगलेसें कळत नाही. आम्हाला तर पक्के ठाऊक आहे कीं, मनुष्याचे दात, कोठे किंवा, इतर शरीररचना ही हिंसक पशूंच्या सारखीं बिलकूल नाहींत. तीं तृणाहारी पशूंच्या सारखीच बहुतेक असून वनस्पतिजन्य अन्नाचे भक्षण करून पचविण्यास लायक अशींच आहेत. त्याचप्रमाणें, मांसाहार करणाऱ्या मनुष्याची इंद्रिये मांसाहार न करणाऱ्या मनुष्याच्याहून सर्वथा भिन्न नसतात. तेव्हां मनुष्याचें हिंस्त्र पशूशीं साम्य कल्पणें केवळ असमंजसपणाचें होय. वस्तुत: पाहतां मनुष्यप्राण्याचें तृणाहारी पशूंशींच पुष्कळ गोष्टींत साम्य असतें. त्यांतल्या कांहीं गोष्टी येथें सांगितल्यास अप्रासंगिक होणार नाहींत असें वाटतें. त्या गोष्टी ह्या:- (१) तृणोपजीवी प्राण्यांस घाम येतो तसा मनुष्यासही येतो, पण निव्वळ मांसाहारी प्राण्यास तो येत नाहीं. (२) तृणाहारी प्राण्यांस आपलें अन्न चघळत-चावून खाण्यास योग्य अशा दाढा असतात, तशाच मनुष्यासही आहेत; पण हिंसक पशूंस त्या मुळींच नाहींत. (३) तृणभक्षक प्राणी व मनुष्यें तोंड लावून पाणी पितात, परंतु हिंस्त्र पशु तें जिभेनें चाटून पितात. (४) वनस्पत्याहारी पशूंच्या व मनुष्यांच्या मुखांत लाळ फार असते; तशी तीं मांसभक्षक पशूंच्या मुखांत नसतें. (५) तृणाहारी पशु व मनुष्यें आपलें अन्न बहुतकरून दिवसास मिळवून रात्रीस विश्रांति घेतात; हिंस्त्रपशूंचा क्रम याच्या उलट आहे. ते दिवसास कोठें तरी झाडींत, दरीत किंवा कपारीत दडी मारून राहतात, आणि रात्रीस भक्ष्याच्या शोधार्थ इकडे तिकडे भ्रमण करितात.

येथवर रा. नवलकरांच्या मांसाहारास अनुकूल अशा मुख्य तीन मुद्यांचा विचार झाला. आतां मांसाहारास प्रतिकूळ अशा ज्या गोष्टी आहेत, त्यांतल्या कित्येकांचें अगदीं संक्षेपानें निरूपण करितों.

पहिली गोष्ट अशी कीं, मांसाहारी लोकांस चांगच्या प्रकारचें मांस नेहमीं खावयास मिळण्याचा संभव फारच कमी असतो. कारण, बाजारांत आणून विकावयाचे पशु बहुतकरून संघांनी पाळल्यामुळें व तें पुष्ट दिसावें म्हणून त्यांस कृत्रिम रीतीनें वाढविल्यामुळें त्यांच्या मांसांत रोगजनक बीजांचा उद्भव फार करून होत असतो. शिवाय, अशा प्रकारें विकावयास आणलेले प्राणी बहुशः मुळचेच रोगी असतात. अशा प्रकारच्या पशूंची रुग्णावस्था पुष्कळ वेळां बाहेरून बिलकूल दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. म्हणून त्यांची परिक्षा करण्यासाठीं माणसें नेमण्याचीं सरकारनें खबरदारी घेतली तरी अपाय फारसा टळत नाहीं. शिवाय लांचलुचपतीचा प्रकार, सर्व माणसें प्रामाणिक होतपर्यंत एकसारखा चालावयाचाच. अशाप्रकारें खराब मांस नकळत खाण्यांत येतें व तें खाणाराच्या रक्तांत अशुद्धपणा उत्पन्न होतो. आणखी असें आहे कीं, कित्येक वेळां ह्या नेहमी मांस खाणारांच्या अन्नांत नत्रविशिष्ट तत्वांचा व स्निग्ध तत्वांचा फाजील पुरवठा होऊन अपाय होत असतो. युरोपातील व अमेरिकेतील पुष्कळ वैद्यांचें असें म्हणणें आहे कीं, ज्यांच्या अन्नांत मांसाचा अगदीं थोडा अंश असतो, किंवा मुळींच नसतो, तें दुसऱ्या समान स्थितींतल्या नेहमीं मांस खाणाऱ्या मनुष्यांपेक्षा निरोगी असून पटकी वगैरे रोगराईंचा त्यांच्यावर फारकरून लवकर प्रभाव चालत नाहीं; आणि त्यांस झालेला एखादा रोग मांसाहारी मनुष्यास झालेल्या तसल्याच रोगाहून लवकर बरा होतो. त्याचप्रमाणें इंग्लंडातील, अमेरिकेतील नगरे मांसाहाराचा त्याग केलेल्या बहुतेक लोकांचा असा अनुभव आहे कीं, ते मांसाहार सोडल्या दिवसापासून पूर्वीच्यापेक्षां विशेष निरोगी, बळकट व उत्साही झाले आहेत. येथें कोणी असा आक्षेप घेतील कीं, हर्बर्ट स्पेन्सर नामक प्रसिद्ध तत्त्ववेत्याला याच्या उलट अनुभव कसा आला? यावर असें उत्तर आहे कीं, त्या तत्ववेत्यानें योग्य प्रकारच्या धान्यादिकांचें वाजवी प्रमाणानें सेवन केलें असते तर त्याला अशक्त पणा न वाटून त्याच्या दिलाची पूर्वी जी खात्री झाली होती कीं, मांसाहार मनुष्याचा स्वाभाविक व हितकारी आहार नव्हे, तिच्या उलट त्यास अनुभव आला असता. इंग्लंडादि देशांतल्या वरच्या वर्गातल्या लोकांत मांसाहार नित्य होत असल्यामुळें त्यांस कोणत्या धान्यांचा किती प्रमाणानें अर्थात उपयोग केला असतां शरीराचें योग्य प्रकारें पोषण होईल हें चांगलेंसें कळण्याचा मार्ग नसतो. हें ठरविण्याचें काम चांगल्या हुशार वैद्यांनीच केलें पाहिजे. पण बहुतेक वैद्य स्वत: मांसाहारी असल्यामुळें त्यांच्याकडून

हा शोध कालपरवापर्यंत तिकडे झाला नव्हता. अलीकडे दहा पंधरा वर्षांत तिकडे कित्येक वैद्य मांसाहाराचा त्याग करणारे होऊन त्यांनीं हा शोध केला आहे. ह्या शोधाचें ज्ञान स्पेन्सरसाहेबांस झालें असतें, तर त्यांच्याकडून वरील चुकी झाली नसती.

२ दुसरी गोष्ट काटसरीची होय. सध्यां जगाच्या बहुतेक भागांमध्यें मांसान्नास वनस्पतिजन्य अन्नाहून पुष्कळ जास्त खर्च लागतो. कित्येक ठिकाणीं तर ह्या उभय प्रकारच्या अन्नांच्या खर्चात दहा दहा, पंधरा पंधरा, पटींचे अंतर असतें. आणि मनुष्यवस्ति वाढत जाऊन जसजसा मांसाचा खप वाढत जाईल, तसतसे मांस महाग होत जाईल हें उघड आहे. ज्या प्रकारच्या अन्नास खर्च पुष्कळ लागून सतत खाल्ल्यानें रोगराईहीं होण्याचीं भीति फार, तें अन्न खाण्याविषयीं आग्रह करण्यांत काय शहाणपणा आहे, ते नकळे.

३ मांसाहारास प्रतिकूळ अशी आणखी एक गोष्ट सांगून हें प्रकरण आटपूं. ती गोष्ट ही कीं, मांसान्नसेवनानें मनुष्याच्याठायीं अनेक अनिष्ट वृत्तींचा उद्भव होतो. स्वोदरपूर्तीसाठी इतर गरीब व अन्यप्रकारें उपयोगीं पडणाऱ्या प्राण्यांच्या दुःखशोकादिकांविषयी व जीवितापहाराविषयीं बेपरवाई दाखविण्याचा नित्याचा सराव झाल्यानें, चित्तास कठोरपणा येऊन अनेक कोमल वृत्तीचा ऱ्हास होतो. शिवाय मांसाहार व मद्यपान ह्याचें सहचर्य बहुतकरून असल्यामुळेंही ती सेवन करणारांच्या देहावर व मनावर पुष्कळ वाईट परिणाम झालेले नित्य अनुभवास येतात. प्राणघात व रक्त स्त्राव यांविषयीचीं बेपरवाई, क्रूरपणा, आवेश, आत्मपरता इत्यादि समाजव्यवस्थाविघातक दुर्वृत्ति मनुष्याच्या रानवट अवस्थेंत जेव्हां पदोपदीं परस्पराशीं कलह करावें लागत, तेव्हां त्यांस फारशा नडणाऱ्या नसत. पण हल्लींच्या बहुतेक सुधारलेल्या जनसमूहांमध्यें त्यांच्या योगानें पुष्कळ प्रकारें अहित होत आहे. तेव्हां त्यांचा बीमोड करण्यास झटण्यांत मनुष्यजातीचें हित आहे. मांसाहारामुळें जर ह्या असद्‌वृत्ति प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें उद्भवत असतील, तर मांसाहाराचा परित्याग अखिल मनुष्यजातींकडून होणें अत्यंत हिताचें आहे.

त्यांच्या पुस्तकाच्या पुढल्या प्रकरणावर फारसें लिहिण्याची गरज नाहीं. ह्या प्रकरणांत पूर्वीचे ब्राम्हण मांसाहार करीत असून वेदादि धर्मग्रंथांत मांसाहार निषिद्ध धरलेला नाहीं, असें पुरावे देऊन सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. हा एवढा प्रयत्न करण्याची त्यांना फारशी गरज होती, असें आम्हांस वाटत नाहीं. कारण कोणींहीं समंजस मनुष्य ह्या गोष्टी नाकबूल करणार नाहीं. परंतु अमुक एक आचार पुरातनकली

प्रवृत्तींत असून धर्मसंमत असला तरी, तो अहितकर व अस्वाभाविक आहे असें सप्रामाण सिद्ध झाल्यावरहीं तो विहित मान, हें ह्या विचारयुगांत सर्वथा युक्त नाहीं. विचारी मनुष्याचें वर्तन नेहमीं देशकालवर्तमानानुसार जें खरोखरीच कल्याणप्रद वाटेल तद्नुरूप असावयाचे. रा. नवलकरांचे तिसरे प्रकरण आक्षेप निरसनाचें होय. यांत त्यांनीं एकंदर यांच आक्षेपांचा निरास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांतले दोन आक्षेप क्रूरपणाच्या संबंधाचें आहेत. ह्या दोन्ही आक्षेपांचा त्यांनीं म्हणण्यासारख्या कांहींएक ऊहापोह केलेला नाहीं. त्यांनी एकाद्या पशूस मारतांना कधीहीं पाहिलें नाहीं असें वाटते. बांदऱ्यांतला कसाईखाना जर त्यांनीं पाहिला असतां, तर फादर लिव्हिंगस्टनला सिंहानें पकडल्याचा दाखला देऊन पशूंला मारतांना वेदना होत नाहींत असें प्रतिपादण्याचें धाडस त्यांना झालें नसतें. पशूंचा प्राण घेतांना तें जी तडफड व दुःखाक्रोश करितात, तो ज्याच्या नजरेस पडेल त्याच्या मनाला खचितच पाझर फुटेल. तिसरा आक्षेप बुद्धिमांद्याचा होय. ज्या गोष्टीनें मनुष्याच्या शरीरावर व मनावर वाईट परिणाम होण्याचा दृढसंभव असतो, ती गोष्ट त्याच्या बुद्धिमांद्यास कारण होते, असें मानल्यास काय वावगें झालें बरें? आम्हांला असें सांगण्यांत येतें कीं, युरोपातलें लोक मांसाहारी असतां त्यांच्या बुद्धिचा विकास आमच्याहून पुष्कळ झाला आहे, हें त्यांच्या शास्त्रीय ज्ञानाच्या व कलाकौशल्याच्या उत्कर्षावरून सिद्ध होतें. रा. नवलकरांनीं ज्या बकलच्या ग्रंथांचा आपल्या पुस्तकाच्या आरंभी उल्लेख केला आहे, त्यांतच युरोपस्थ लोकांच्या ज्ञानोत्कर्षाचीं जीं कारणें सांगितलीं आहेत, त्यांचें पर्यालोचन केलें असतें तर असें विधान त्यांनीं सहसा केलें नसतें. चवथा आक्षेप मांसाहाराचा परित्याग करणाऱ्या पाश्चिमात्य लोकांस गौणत्व आणण्यासाठीं त्यांनीं एक गोष्टीचा उलेख केला आहे, तेवढीं सांगून हा लांबलेला लेख संपवितो तें म्हणतात कीं, पाश्चिमात्य वनस्पत्याहारी अंडी खातात म्हणून तें खरें वनस्पत्याहारी नव्हत. परंतु ह्या आक्षेपावर त्या लोकांचें असें म्हणणें आहे कीं, गाईचे दूध पिण्यास जशी हरकत नाहीं, त्याचप्रमाणें कोंबडीच्या अंड्याचें भक्षण करण्यास हरकत नाहीं. कारण तीं उबत तोपर्यंत त्यांत जीवितसंभव होत नसतो. त्यांचा मांसाहारपरित्यागाचा जो एक प्रमुख हेतु, प्राण्यांचा जीव न घेण्याचा असतो, त्यांत येणेंकरून कांहींएक प्रत्यवाय येत नाहीं. या त्यांच्या म्हणण्यावर रा. नवलकरांचे काय म्हणणें आहे बरें?

***

# ३१ नशीब

(अप्रकाशित १-७-१८९१)

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।
दैवं प्रधानमिति का पुरुषा वदन्ति ।।
दैवं विहाय कुरु पौरुपमात्मशक्त्या ।
यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्रदोषः ।। १ ।।

१. ह्या जगामध्यें एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यापेक्षां कमी जास्त मानानें सशक्त - अशक्त , निरोगी-रोगी, कुलीन-कुलहीन, धनाढ्य-धनहीन, बुद्धिमान्-बुद्धिहीन, नीतिमान्-नीतिहीन, सुखी-सुखहीन कां आहे? हा प्रश्न थोडाबहुत विचार करणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मनांत उत्पन्न होतो. ह्या प्रश्नाचें उत्तर जो तो आपआपल्या बुद्धि-सामर्थ्यानुसार देऊन आपली किंवा आपल्या ओळखीच्यांची जिज्ञासा तृप्त करण्याचा प्रयत्न करितो. निरनिराळ्या काळच्या व निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांची बुद्धि अनेक कारणांस्तव सारखी नसल्यामुळें, ह्या प्रश्नाचीं आजपर्यंत भिन्न भिन्न उत्तरे लोकांनीं दिली आहेत. तेव्हां अर्थातच् ही सगळी उत्तरें खरीच असतील असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं. विचारी माणसानें साधल्यास ह्या सर्व उत्तरांची माहिती करून घ्यावी; आणि त्यांत जे आपल्या बुद्धीला खरें व संयुक्तिक वाटेल, तें प्रांजलपणें मान्य करून तदनुसार आपल्या वर्तनाचें नियमन करण्याचा प्रयत्न करावा. पण अशा प्रकारें एक वेळ मान्य केलेलें उत्तर पुढें विशेष ज्ञान प्राप्त होऊन कदाचित् खोटे ठरल्यास त्याचा त्याग करून सत्याचा अंगिकार करण्यास सदा तत्पर असावें. कारण, ह्या प्रश्नाचा आपल्या जीविताशीं हरएक प्रकारें अगदीं निकट संबंध असल्या कारणानें त्याचें उत्तर जितपत खरें मिळेल, तितपत आपल्या आचरणांस चांगलें वळण लागून अधिकाधिक सुख प्राप्त होण्याचा संभव आहे. नशीब हें तरी एक ह्याच प्रश्नाचे उत्तर आहे.

२. नशीब हा शब्द अरबी भाषेतला असून महंमदी धर्मानुयायी जनांच्या मतें त्याचा अर्थ, देवानें प्रत्येक मनुष्यास निर्माण करतांनाच त्याच्यामागें लावून दिलेला

सुखदुःखाचा वाटा, असा आहे. ह्या अर्थी तो आमच्या भाषेतील दैव शब्दांशी समानार्थक आहे. पूर्व-संचित, भवितव्यता, प्राक्त न इत्यादि शब्दांनीं जरी निरनिराळ्या कल्पना सूचित होतात, तरी त्या सर्वांचे पर्यवसान एकच आहे. ही नशिबाची कल्पना निरनिराळ्या धर्मविचारांत व तत्त्वविचारांत निरनिराळें रूप पावली आहे. तेव्हां तिच्या यथार्थ स्वरूपाचा किंवा सत्यत्याचा निर्णय जो करूं जाईल त्यानें ह्या सर्व धर्म-विचारांचें व तत्वविचाराचें परिशीलन अवश्य केले पाहिजे. हें परिशीलन मजकडून अत्यल्प अंशानेही झालेलें नाहीं. तरी पण दुसरें कोणी विशेष योग्य पुरुष ह्या प्रयत्नास लागेपर्यंत या विषयासंबंधें स्वतःस सुचले दोन शब्द लोकांपुढें मांडण्यास फारशी हरकत दिसत नाहीं.

असो; आतां प्रारंभी निर्दिष्ट केलेल्या असमतेची उपपत्ति सध्यां चालू असलेल्या मुख्य मुख्य धर्माच्या प्रवर्तकांनी कसकशी केलीं आहे तें संक्षेपानें सांगतों.

## पुनर्जन्माप्रमाणें असमतेची उपपत्ति

३. पहिल्यानें आमच्या हिंदुधर्मात मनुष्यस्थितींतील वैषम्याचें जें कारण सांगितलें आहे, त्याचा थोडक्यांत विचार करूं. ह्या धर्माचें प्रतिपादक असें सांगतात कीं, मनुष्यास पूर्वजन्म आणि पुनर्जन्म असल्यामुळें तो मागल्या जन्मांत जशीं बरीं वाईट कर्म करितो, तशीं त्याला ह्या जन्मीं स्थिति प्राप्त होते. आणि ह्या जन्मीं जीं बरीं वाईट कर्मे तो करील त्यांचें फळ त्याला पुढल्या जन्मीं मिळणार आहे. हें असें रहाट-गाडगें मनुष्याच्या आत्म्याची उन्नति होऊन त्यास मोक्षप्राप्ति होईपर्यंत चालावयाचें. संचित, प्राक्तन आणि क्रियमाण असें तीन विभाग मनुष्याच्या कर्म-समुच्चयाचें तें करितात. संचित जें आहे तें आपण या जन्ममरणाच्या पेचांत आलों तेव्हांपासूनच आहे. त्यांत आपल्या प्रत्येक जन्मातील अहंकारपूर्वक केलेल्या कर्माची नवी भर पडत असतें. आतां प्राक्तन म्हटलें म्हणजे जन्मांतरीय पापपुण्यांचा संग्रह होय. आणि ह्या प्राक्त नाप्रमाणें फलानुभव होत असतां, जीं बरी वाईट कर्मे मनुष्य स्वबुद्धीनें करितो त्यांस क्रियमाण म्हणावयाचें. ह्या मताप्रमाणें पाहतां जगांत जीं असमता नजरेस येत आहे तीं मनुष्याच्या संचितादिकास अनुसरून असतें असें सिद्ध होतें. हें मत कितपत संयुक्तिक आहे तें पाहूं.

४. ह्या मतावर पहिला आक्षेप असा आहे कीं, मनुष्यानें केलेल्या कर्माची फळें त्यांस ह्या जगामध्यें जेव्हांची तेव्हां भोगावीं लागतात, हा नित्याचा अनुभव आहे;

आणि अशा प्रकारें परिणाम–विशिष्ट जें शरीर त्याचें येथें अवसान होऊन तें पंचत्वास जाते. तेव्हा त्या कर्माचे परिणाम राहिले कोणावर? आत्म्यावर म्हणावे तर तो त्यांच्या मतें अमेय, अभेद्य, अज्ञेय, निर्विकार असा आहे. आणखीं असा नियम आहे कीं, एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूवर व्यापार होणें म्हटलें म्हणजे त्या दोन्ही वस्तू सजातीय असाव्या लागतात. म्हणून आत्म्याचे शरीरावर किंवा शरीराचे आत्म्यावर परिणाम होतात, असें म्हणणें रास्त होणार नाहीं. कारण देह व आत्मा हें परस्परांपासून सर्वस्वी विसदृश आहेत, असें हेच मतवादी सांगतात. ही अडचण जाणून ते ह्या स्थूल देहांत एक लिंगदेह असतो असें म्हणतात. हा लिंगदेह अर्थात एक तर जड तत्वांचा बनलेला असला पाहिजे, किंवा आत्म्याच्या स्वरूपाचा तरी असला पाहिजे. जर तो जड तत्वांचा बनला असेल, तर तो देहावसांनीं इतरत्र प्रयाण करितांना सांपडल्या वांचून कदापि राहता ना. पण तो तसा आजपर्यंत कोणासही सांपडलेला नाहीं. आणखी असें की, ह्या लिंग–देहाच्या घटक–तत्वांचे प्रधान धर्म स्थूल देहाच्या घटक–तत्वांच्या धर्माशीं समान असल्यावांचून त्यांचें परस्परांवर कार्य होणार नाहीं. पण लिंगदेह असा जड–धर्मी कल्पिल्यास त्याचे आत्म्यावर परिणाम कसे व्हावे? आतां हा लिंगदेह आत्मस्वरुपी आहे असे कल्पिले, तरी वर निर्दिष्ट केलेल्या नियमाप्रमाणें त्याच्यावर स्थूल देहाचें कांहीं एक कार्य होणार नाही. तेव्हां ही लिंगदेहाची कल्पनाही सर्व प्रकारें अयुक्तिक होय. परंतु येथें कोणी असें म्हणेल कीं, हा लिंगदेह मनुष्यास आजपर्यंत ठाऊक असलेल्या कोणत्याही जडतत्वांचा बनलेला नाहीं, तर ज्यांचे मनुष्यास कधींही ज्ञान व्हावयाचें नाहीं, अशा कोणत्या तरी जड तत्वांचा तो बनलेला असावा. ह्यावर असा आक्षेप आहे कीं, लिंगदेहाचींहीं घटक तत्त्वे जर मनुष्याच्या ज्ञानेंद्रियांस विषय होण्याचा संभव नाहीं, तर त्यांजवर स्थूल देहाचे तरी व्यापार व्हावे कसे?

५. ही जन्ममरणाची कल्पना ज्यांना संमत आहे, त्यांना दुसरा असा प्रश्न आहे कीं, संचित म्हणून जें कांहीं आहे म्हणतात तें आलें कोठून? ते प्रारंभापासून आहे म्हणजे काय? तें मनुष्यास कोणी लावून दिलें आहे कीं काय? तें कोणा शक्तीनें लावून दिलें असेल, तर मग असा प्रश्न सहजी उत्पन्न होतो कीं, तें त्या शक्तीनें भिन्न भिन्न मनुष्यांस भिन्न भिन्न प्रकारचें काय म्हणून लावून दिले? असा पक्षपात करण्यांत त्या शक्तीचा हेतु तरी काय असावा? ज्या वेळीं प्रत्येक व्यक्तीच्या मागें हें संचित लावून दिलें असेल, त्यावेळीं तिच्या हातून बरें वाईट कोणतेंच कर्म झालेले नसतें. यावर कित्येकांचें असें म्हणणें पडते कीं, ही त्या शक्तीची केवळ लीला आहे. पण ही लीला तरी सहेतुक आहे कीं अहेतुक आहे? जर सहेतुक म्हणावीं तर आज ह्या

विश्वातील अनंत जीवास जें सतत दुःख प्राप्त होत आहे, त्याचें त्या शक्तीस कांहींच का वाटत नाहीं? ही बेपरवाई त्या शक्तीच्या अत्युत्कट निर्दयत्वाची दर्शक नव्हे काय? पण, ही शक्ती तर सर्व धर्मशील पुरुषांच्या मतें दयामय आहे. तेव्हां हा जबरदस्त विसंगतपणा नाहीं काय? बरें, हीं त्या शक्तीची लीला अहेतुक म्हणावी तर इकडूनही पंचाईत. कारण असें पाहा कीं, व्यवहारामध्ये अशीं अहेतुक कर्मे एकाद्या मनुष्याच्या हातून घडल्यास आपण त्यास भ्रमिष्ट, लहरी किंवा वेडा म्हणतो. परंतु विश्वातील ह्या प्रचंड व्यापाररूप अहेतुक लीलेच्या कर्तृत्वाचा आरोप ज्या शक्तीच्या ठायीं करावयाचा ती तर पूर्णस्वरूप व सर्वज्ञ आहे, असें धर्मज्ञपुरुष आपणांस आजपर्यंत सांगत आले आहेत. तेव्हां एकतर ही लीलेची कल्पना खोटी म्हटली पाहिजे, किंवा धर्मज्ञपुरुषकृत ईश्वरस्वरूपवर्णन मिथ्या मानलें पाहिजे.

६. पुनर्जन्ममतवादी म्हणतात कीं, आत्म्यास जें देहांतर प्राप्त होते तें त्याची उन्नति होण्यासाठी होय. येथें पहिल्यानें आत्मोन्नति म्हणजे काय, तें समजले पाहिजे. वेदांत्यांच्या मतें आत्मोन्नति म्हणजे जन्ममरणाच्या यातायातीपासून मुक्ति होय. ह्या कल्पनेवर पहिली शंका अशी आहे कीं, आपल्यास प्रथमतः देहबंधन प्राप्त होण्याचें कारण काय? यावर त्यांचे असें समाधान आहे कीं, आत्मा मायोपाधीनें बद्ध होऊन देही झाला. परंतु जो सदासर्वकाळ निर्विकार व निर्लेप आहे असें ते म्हणतात, त्यास उपाधी कोठून आली? दुसरें असें कीं, त्यांच्या मताप्रमाणें आत्मा अविनाशी व देहाच्या व्यापारांपासून सर्वप्रकारें अलिप्त आहे. म्हणजे अर्थात पापपुण्यापासून व सुखदुःखापासून त्याच्यावर कांहीं एक बरें वाईट संस्कार घडत नाहींत. असें जर त्याचें खरोखरच स्वरूप आहे, तर त्यास देहबंधन होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांत तो सांपडला म्हणणें कसें संभवतें? बरें एक वेळ तो बंधनांत सांपडला असें गृहीत धरले, तरी तो पुनः पुनः एका बंधनांतून दुसऱ्या बंधनांत कां जावा? येथें कोणी असें म्हणेल कीं, त्यानें एका देहांत केलेल्या कर्माचीं फलें त्यास भोगावयाची असतात, म्हणून त्यास दुसऱ्या देहांत जावे लागतें. पण हा भोग आत्म्यास तर मुळींच संभवत नाहीं. कारण तो निर्विकार व निर्विकल्प असा आहे. तेव्हां कोणीकडूनहीं पहातां ही वेदांत्यांनीं कल्पिलेली आत्मोन्नति अगदी अप्रमाण दिसतें.

७. आतां द्वैतमतवाद्यांची एतद्विषयक काय कल्पना आहे, ती पाहूं. त्यांच्या मतें आत्मा जो आहे तो नेहमी स्वकर्मीच्या परिणामांनीं युक्त असतो. त्याच्यापाशीं पापपुण्याचा जसा लहान मोठा संग्रह असेल, तशी त्याला बरी वाईट स्थिति प्राप्त होते.

जेव्हा एकंदर पापाच्या भोगानें नाश होऊन तो केवळ पुण्यमय होतो, तेव्हांच तो उन्नतीची परमावधि पावून निरंतरच्या सुखाचा वाटेकरी होतो. जन्ममरण जें त्यास प्राप्त होतें, तें त्याच्याठायीं पापाचा अंश असेपर्यंत; पाप संपलें का जन्ममरण संपलें. ह्या त्यांच्या मताप्रमाणें पाहातां आत्म्याला जीं उच्च निच दशा प्राप्त होते ती त्याच्याठायीं सद्वृत्तींचा पूर्ण विकास होऊन असद्वृत्तींचा निखालसपणें ऱ्हास व्हावा म्हणून जगात जेवढें दुःख आहे तेवढें सगळें पापमूलक आहे; व हे शासन सर्व विश्वाचा नियंता जो परमेश्वर तो करीत आहे. या मतावर एक आक्षेप असा आहे कीं, आत्म्यास कर्मानुसार गति प्राप्त झाली असतां, त्या स्थितीमध्यें त्याला पूर्वजन्मकृत कर्माची आठवण असून कोणत्या कर्माबद्दल कोणतें फल आपण भोगीत आहो याचें स्पष्ट ज्ञान त्यांस असल्यावांचून त्याची वाईट कर्मापासून निवृत्ति व सत्कर्माकडे प्रवृत्ति कदापि होणें शक्य नाहीं. पण अशी आठवण असलेला एकतरी मनुष्य आढळतो काय? कित्येक मतलबी लोकांनी मात्र केवळ कल्पनेच्या सहाय्यानें अमुक कर्माचें अमुक फल होतें, अशा मजकुराचे ग्रंथ लिहिले आहेत, पण तें सर्वथा अविश्वसनीय होत. येथें कोणी असें म्हणेल कीं, अमुक एका कर्माचे फल अमुक आहे असें न कळले तरी आपण जें आज दुःख भोगीत आहो तें पूर्वजन्मी केलेल्या कुकर्मांचे फल आहे, अशी मनुष्याची मोघमपणें पक्की समजूत झाल्यास पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. पण अशी समजूत पूर्णपणे होऊन तदनुसार आचरण किती मनुष्याचें होत असतें बरें? शिवाय पश्वादि मनुष्योतर योनींत तर ही समजूत असण्याचा मुळींच संभव नाहीं. तेव्हां हा फायदा झाल्यास अगदीं थोड्या मनुष्यांचा मात्र होईल. मग इतर सर्व मनुष्ये व मनुष्येतर जीनकोटि यांची काय वाट? सारांश काय कीं, पूर्वकर्माच्या स्मृतीवांचून तन्मूलक सुखदुःखांचा भोग इशनिष्टस्थितिद्वारा देवानें लावून दिला आहे असें जे प्रतिपादितात, त्याची आपल्या देवाची कल्पना अगदीं चमत्कारिक आहे म्हणावयाची. कारण, असें पाहां कीं, व्यवहारात बापानें मुलाच्या हातून घडलेल्या अपराधांचीं आठवण दहा पंधरा दिवस ठेवून एके दिवशी जर त्याच्या झिंज्या धरून तो त्याला हवा तसा चोपूं लागला, आणि मला कां मारता म्हणून अगदीं दीनवाणा होऊन मोठमोठ्यानें ओरडून तो मुलगा विचारू लागला असतां, त्याला कांहीं एक उत्तर तो बाप करीत नाहीं, तर त्याला लोक काय म्हणतील बरें? पण त्या द्वैतवाद्यांच्या मताप्रमाणें देव तर असंख्य जीवांचा त्यांच्या हातून कैक वर्षापूर्वी घडलेल्या कर्मांबद्दल अत्यंत निष्ठुरपणें नित्य खरपूस समाचार घेत आहे! यांत देवाकडे लघुपणा नाहीं का येत?

८. बरें हे द्वैतवादी आत्म्याची उन्नति होते म्हणतात ती कशी काय? जे जे गुण

आत्म्याचे म्हणून ते समजतात, ते सर्व आधुनिकमानसशास्त्रवेत्त्यांच्या मतें मनाचें धर्म होत. तेव्हां आत्म्याची उन्नति म्हणजे मनाची उन्नति समजावयाची कीं काय? अशी जर तीं खरोखरीच समजावयाची तर ज्या मानवी व्यापारसमुच्चयाला मन ही संज्ञा आहे, त्यांच्याविषयीं जे नियम आज शास्त्रज्ञांस अवगत झाले आहेत, त्यांचा विचार त्या आत्मोन्नतीच्या विचारांत अवश्य प्रसक्त  होतो. त्यांवरून पाहतां असें कळतें कीं, मनाची उन्नति बहुतेक अंशी देहाच्या स्थितीवर अवलंबून आहे. त्यांतूनही प्राण्यांच्या शरीरामध्यें जे मज्जातंतू असतात, त्यांच्या कमीजास्त उन्नतीप्रमाणें मनोव्यापारांची उन्नति होत असते. ही मज्जातंतूंची उन्नति निरनिराळ्या प्राणिजातींमध्यें निरनिराळ्या प्रमाणानें झालेलीं असते; आणि त्याच मानानें त्यांच्या मनाचीं हीं स्थिति असते. प्राणिकोटीमध्यें सर्वात श्रेष्ठ जो मनुष्यप्राणी, त्याच्यामध्यें ही उन्नति इतर प्राण्याहून जास्त झालेली आहे. आणि मनुष्य जातीमध्येही ह्या उन्नतीचें मान पुष्कळ कमीजास्त आहे. अगदी रानटी स्थितीपासून अगदीं सुधारलेल्या स्थितींपर्यंत मनुष्याच्या मानसिक उन्नतीच्या संबंधानें पुष्कळ अवस्था दृष्टीस पडतात. दुसरें असें कीं, प्रत्येक प्राण्याच्या व त्यांतूनही विशेषतः प्रत्येक मनुष्याच्या आयुर्दायामध्ये त्याच्या मनाची स्थिति अवस्थाभेदेंकरून निरनिराळी असते. बाळपण, तारुण्य व वार्धक्य, ह्या तिन्ही स्थितींमध्यें मनुष्याच्या मनाची स्थिति सारखी असते असें कोण म्हणेल? त्याचप्रमाणें निरोगी स्थितींत जो मनाचा जोम व उल्हास असतो, तसाच रोगटस्थितीमध्येही असतो काय? अत्यंत बाल्यावस्था, अत्यंत जरठावस्था व अत्यंत रुग्णावस्था ह्या तिन्हीं स्थितींमध्ये मनाची शक्ति पराकाष्ठेची क्षीण असते. असा स्पष्ट अनुभव आपणास नित्य येत आहे. ह्या गोष्टी जर खऱ्या आहेत, तर आत्म्यास जें देहांतर प्राप्त होतें तें त्याच्या उन्नतीसाठीं होय, असें म्हणणें अगदीं अयुक्तिक दिसतें. कारण असें पाहां कीं, मनुष्ययोनींत जन्म पावलेला आत्मा पुनः पश्वादियोनीमध्यें जातो असें कल्पिल्यास मनुष्य देहांत जी त्याची मानसिक उन्नति झाली, तिची त्या नीचतर योनींमध्यें काय वाट होईल बरें? त्या स्थितीमध्यें त्याच्या कित्येक उन्नत मानसिक शक्तींस व्यायाम न मिळून त्या नष्टप्राय होणार नाहींत काय? अशा स्थितींत त्याची उलटी अवनति मात्र होत जाईल. आतां, मनुष्य देहांतला आत्मा पुनः नीच योनींत कधींच न जातां, पुढे त्यास प्रत्येक वेळी मनुष्याचेच जन्म प्राप्त होतील असें कल्पिल्यानेंही त्याची उन्नति होतें असें सिद्ध होत नाही. कारण मनुष्याचें देहावसान बहुत करून रुग्णावस्थेमुळें किंवा जरठावस्थेमुळें मनास अत्यंत क्षीणता येऊन होत असतें. यास अपवाद कायतो

आकस्मिक मृत्यूंचा होय. बाकी बहुतेक मनुष्यांच्या संबंधानें हा नियम सर्वदा दिसून येतो. तेव्हां जर आत्म्याची उत्तरोत्तर उन्नति होत आहे म्हणावें, तर हीं क्षीणता बहुतकरून सर्वांच्याच संबंधानें सारखी कां दृष्टोपत्तीस येते?

ह्या मुद्याचा संबंधानें आणखी एक अशी महत्वाची गोष्ट सांगावयाची कीं, आधुनिकमानसशास्त्रप्रणेत्यांचा असा एक सिद्धांत आहे कीं, मनुष्य जन्मते तेव्हां त्याच्या ठायीं कोणत्याही प्रकारचा मानसिक शक्तींचा अत्यंताभाव असतो. पुढे त्यास ज्या प्रकारचा स्थितिविशेष प्राप्त होतो, त्यासारखा त्यांच्याठायी मनोविकास होत जातो. आतां येवढें मात्र खरें कीं, त्याच्या ह्या नित्य होणाऱ्या मनोविकासास पूर्वजप्राप्त संस्कारानुसार थोडे बहुत वळण मिळते. परंतु त्याच्या पूर्वजन्मींच्या मानसिक गुणधर्मांचा अंश असें ज्याला म्हणतां येईल, असें कांही त्याच्या ह्या मनोविकासांत बिलकुल अनुभवास येत नाहीं. हा जर त्यांचा सिद्धांत खरा असेल तर आत्म्यास देहांतर प्राप्त होऊन त्याची हळूहळू उन्नति होत आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

द्वैतमतवादीकल्पित आत्मोन्नतीवर आणखी असा एक आक्षेप आहे कीं, आत्म्यास उन्नती अवनति आहे म्हणणें म्हणजे तो विकारवश होण्यास पात्र आहे असें होतें. पण जेवढें कांहीं विकारवश तेवढें सगळे नाश पावणारें असतें असा नियम आहे. तेव्हां आत्माही नाशवंत आहे असें म्हणावें लागतें. पण आत्मा तर अमर आहे, असें द्वैतमतवादी म्हणतात. तर मग ह्या परस्पर विरुद्ध गोष्टी कशा संभवतात?

आतांपर्यंत द्वैतद्वैतमतवादी जनांस संमत असलेली पुनर्जन्माची कल्पना कितपत यथार्थ आहे, त्याचें संक्षेपतः निरूपण केलें. त्यावरून शोधक वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल कीं, ही कल्पना मुळींच संयुक्तिक नव्हे शरीरावांचून मनोव्यापारांची प्रतीति मनुष्यास कधींही होण्याचा संभव नसतां, जे ह्या मनोव्यापारांची स्वतंत्र स्थिति कल्पून आत्म्याशी त्यांची सांगड घालतात, आणि अशा मनोव्यापारांसह आत्मा देहांतर करितों असें मानतात, तें अतींद्रिय गोष्टींचे विधान करून आपल्या धाष्ट्यांचें किंवा दांभिकपणाचे द्योतन करितात, असें म्हणावे लागतें. हें अप्रमाण मत आम्हां हिंदुलोकांमध्यें सर्वत्र प्रचलित असल्या कारणानें लौकिक समज अगदीं खोटे होऊन गेलें आहेत. कोणतीही अनिष्ट गोष्ट अनुभवास आली असतां ती आपल्या पुर्वूजन्मीच्या कर्माचें फळ म्हणून लोक कपाळावर हात मारीत असतात. यावरून त्याचा वरवरून तरी असा समज झाला आहे असें दिसतें कीं, त्या गोष्टीस त्यांचा कांहींएक इलाज नाहीं. परंतु तें ती गोष्ट टाळण्याकरितां प्रयत्न करितात; त्यावरून ते आपल्या समजाच्या

उलट वागतात असें होतें. हा विसंगतपणा सामान्य जनांच्या एकाएकीं नजरेस येणारा नसतो. नशीब शब्दाचा उपयोग अशाच प्रसंगीं होत असतो. कारण ह्या शब्दाचा मुळचा अर्थ काय व तो पूर्व कर्मानुसार फलप्राप्तीच्या मताचा यथार्थ वाचक होईल किंवा काय, याचा विचार सामान्य लोक करीत बसत नाहींत. ह्यासाठींच हा एवढा ऊहापोह करणें प्राप्त झालें. त्या सगळ्याचा मथितार्थ म्हणून येवढाच कीं, पुनर्जन्म मताच्या साहाय्यानें जगांतील असमतेची खरी उपपत्ति न होतां उलटें मन अधिकच संशयमग्न होतें.

## पुनर्जन्म न मानणाऱ्या एकेश्वरमतवादिकृत असमतेची उपपत्ति

९. आतां पुनर्जन्ममत न मानणाऱ्या एकेश्वरमतवादिजनांकडून त्या असमतेची उपास कशी काय होत असते, तें पाहूं. ते असें म्हणतात कीं, परमेश्वर मनुष्यास वाटेल त्या स्थितींत निर्माण करितो. तो त्यांस तसें कां निर्माण करितो हें विचारण्यास मनुष्याला मुळींच अधिकार नाहीं. तशी त्याची इच्छा आहे असें समजून स्वस्थ राहावें. आणि प्राप्तस्थित्यनुरूप आपलें कर्तव्य करावें, यांतच सुख आहे. हे मत बहुतेक ख्रिस्ती, मुसलमान व इतर एकेश्वरोपासक लोकांचे आहे. मुसलमान लोकांचा नशीब शब्दाचा उपयोग ह्याच मताच्या संबंधानें होत असतो. हें मत कितपत यथार्थ आहे, तें पाहूं.

१०. ह्या मतावर पहिला आक्षेप असा आहे कीं, देव दयाळू व न्यायी असतां त्यानें असा पक्षपात आपल्या लेकरांच्या संबंधानें का केला असावा बरें? ज्या मताप्रमाणें केवळ ईश्वरानें, मनुष्यास कळण्यासारखें कांहीं एक योग्य कारण नसतां दिल्यामुळें प्राप्त झालेल्या साधनांच्या व सामर्थ्याच्या योगानें सशक्त व हिंसक प्राणी अशक्त व गरीब प्राण्यांला ठार मारून त्यांच्या मांसावर आपली उपजीविका करितात; मनुष्यें इतर प्राण्यांचे पाहिजे तसे हाल करितात, बळकट मनुष्य अशक्त मनुष्यास मनास वाटेल तसा जाच व त्रास करितो; श्रीमंत मनुष्य गरीब मनुष्यास हवा तसा ताबलतो; कुलीन मनुष्य नीच कुळांतल्या मनुष्यास अगदीं हीन व अस्पृश्य समजून त्याचा तिटकारा करतो; अधिकारी मनुष्य आपल्या ताब्यांतल्या मनुष्यावर विनाकारण कडक अंमल चालवून दुःख देतो; बलाढ्य राष्ट्र निर्बल राष्ट्रास पादाक्रांत करून अगदीं हतवीर्य करून सोडते. पण हें व असेच दुसरे असमतेचें प्रकार, जें नेहमीं अनुभवास येतात, त्यांच्या कर्तृत्वाचा आरोप न्यायी देवाच्याठायीं करणें अगदीं उचित नव्हे. कारण ह्या असमतेच्या पायीं आज असंख्य प्राण्यांचें व मनुष्यांचें जीवित अत्यंत

कष्टमय झालें आहे. ही अत्यंत अनिष्ट दशा देवानें प्राण्यास निरनिराळ्या अवस्थेमध्यें उत्पन्न केल्यामुळें ज्यापेक्षा उद्भवली आहे, त्यांपेक्षा येथे सहजी असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, हे असें दुःखमूलक स्थितिवैचित्र देवानें कां निर्माण करावें? प्राण्यांच्या उत्पत्तीपूर्वी कोणतीही स्थितीं नसल्यामुळें त्यांच्यांत तर कसल्याही प्रकारची योग्यता आलेली नसते. बरें, त्यामुळें प्राण्यास जें दुःख होत आहे त्याचें देवाला कांहींच वाटत नाहीं म्हणावें, तर तेही संभवत नाहीं. कारण देव दयाळू आहे असें हेच मतवादी मानतात. तर मग ही देवाची सगळी लीलाच समजावयाची कीं काय? पण ह्या लीलेच्या कल्पनेच्या संबंधानें आम्ही मागें जें म्हटलें आहे, त्यावरून तर ही कल्पना धर्मज्ञपुरुषांनी केलेल्या ईश्वरस्वरूपवर्णनाशीं मुळींच जुळत नाहीं. ह्यावर कित्येक जण असें समाधान करितात कीं, देवाच्या कृत्यांचें वास्तवज्ञान आम्हां मानवांस होण्याचीं आशा बिलकूल नाहीं. म्हणून त्याविषयीं पृच्छा करून आपलें चित्त उगीच अस्वस्थ करून घेऊं नयें. हा उपदेश ज्याचा तेच घेतील तर असल्या निराधार उपपत्ति काढून लोकांस भ्रमांत पाडण्यास तें कारणीभूत होणार नाहीत.

११. असो; आतां ह्या मतावर दुसरा एक आक्षेप घेण्यासारखा आहे, त्याचें निवेदन करितों. मनुष्यास जीं निरनिराळी स्थिति प्राप्त झाली आहे, ती जर ईश्वरी संकेतानें प्राप्त झाली आहे तर त्यानें केलेल्या कृत्याबद्दल तो मरणोत्तर कसा जबाबदार होईल बरें? कारण अनुभव असा आहे कीं, मनुष्याची बुद्धि व वृत्ति ह्या स्थितिभेदेंकरून निरनिराळे रूप व विकास पावतात; आणि जशी ज्याची बुद्धि अथवा वृत्ति असतें, तदनुसार त्याच्या हातून वर्तन होते. तेव्हां सर्व बऱ्या बाईट आचरणाचें मूळ स्थितिविशेष होय, हें स्पष्ट होतें. हा स्थितिविशेष मनुष्यास स्वच्छेनें प्राप्त करून घेता तर येत नाहीं. वादविषयक कल्पनेंप्रमाणें तो त्याला ईश्वराच्या इच्छेनुरूप प्राप्त झाला आहे. ही कल्पना खरी असेल तर मग मनुष्यांस अपरिहार्यत्वास्तव करावीं लागलेली जीं कर्मे, त्यांचा झाडा देवापाशीं द्यावा लागून त्याचें फळ त्याला कोणत्या तरी आमुष्किक स्थितीमध्यें भोगावें लागतें असें जें मत आहे, त्याला थारा कोठें राहिला? असें असूनही जर कोणीं म्हणेल कीं, तें त्याला भोगावें लागेल, तर देव अन्यायी आहे असें कबूल करावें लागेल. पण हें कबूल करणें तर त्याच्याकडून सहसा होणार नाही. एकंदरींत काय कीं, ह्या कल्पनेच्यापायीं इकडे आड आणि इकडे विहीर अशी ती खरी मानणाराची स्थिति होऊन जाते.

ह्या आक्षेपांत सांगितलेल्या गोष्टीचें सत्यत्व कित्येकांस पटून ते असें म्हणतात

कीं, सर्व विश्वांतले व्यापार देवाच्या इच्छामात्रें करून चालले आहेत. तेव्हां अर्थात मनुष्यकृत व्यापारही त्याच्या इच्छेबाहेर होणें नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या हातून जन्मल्या पासून मरेपर्यंत अमुक कर्मे व्हावयाची असून, त्यांची त्याला अमुकच फळें भोगावी लागणार; आणि तो अमुक एका स्थितींमध्यें उत्पन्न होऊन अमुक एका स्थितीप्रत पोंचून मरण पावणार; इत्यादि सर्व गोष्टी देवानें पूर्वीच नेमलेल्या असतात; तदनुसार मनुष्यास बुद्ध्यादि साधनांची अनुकूलता होऊन त्याच्या हातून बरी वाईट कर्मे होणार. लौकिक भाषेत ''लल्लाट रेषा खरी;'' ''नशिबांत लिहिलें आहे तसें होणार, तें कोणाच्यानेहीं फिरवणार नाही;'' ''विनाश काले विपरीत बुद्धी.'' इत्यादि उद्गार निघत असतात ते ह्याच समजुतीमुळें होत. ह्या मताप्रमाणें जगांतील एकंदर स्थितीवैचित्र्याचाच नव्हे तर व्यापारवैचित्र्योचाहीं कर्ता परमेश्वर आहे असें होतें. हें मत खरें मानल्यास मनुष्याच्या बऱ्यावाईट कर्माची जबाबदारी अजी उडून जाऊन परलोकाची किंबहुना मरणोत्तर कोणत्याही स्थितीची व मोक्षाची कल्पना अनावश्यक व अप्रयोजक ठरते, आणि देवाच्या ठायीं पराकाष्ठेचा लहरीपणा, निर्दस्थणा, व अन्यायीपणा याचा आरोप केल्याचा दोष माथी येतो. सारांश कायकीं, पुनर्जन्म न मानणाऱ्या एकेश्वरमतवादिजनानीं केली ह्या जगांतील असमतेची उपपत्ति खरी मानिल्यास धर्माच्या प्रधान तत्वास अगदीं फाटा द्यावा लागतो. परंतु ही गोष्ट धर्मशील गृहस्थांस मुळींच आवडण्यासारखीं नाहीं. म्हणून त्यांस असलीं उपपत्ति सहसा सत्य वाटूं नये.

येथवर मुख मुख्य धर्मविचारांत नशिबाची कल्पना कसकसें रूप पावली आहे तें सांगून तिचे अयथार्थत्व त्याच धर्मातील इतर प्रधान तत्वांच्या अनुरोधानें पाहतां व युक्तिदृष्ट्या कसें काय आहे तें अगदीं संक्षेपानें दाखविलें. आतां नशीब म्हणून कोणीतरी अदृष्ट भावरूप व्यक्ति आहे असें जे कांहीं लोक मानतात, त्यांच्या त्या मानण्यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं.

१२. ज्या गोष्टी मनुष्यास हटकून घडवून आणतां येत नाहींत त्या कोणा तरी अदृष्ट शक्तीच्या योगानें होतात असें मानण्याकडें मनुष्याचीं स्वभावत: प्रवृत्ति असते. कुलदेवता, ग्रामदेवता, जलदेवता, वनदेवता, हडळी, जखणी, देवचार, वेताळ, मुंजे, ब्रम्हराक्षस इत्यादि ज्या बऱ्यावाईट अदृष्टशक्ति अडाणी लोक कल्पितात, त्यांचें मूळ ह्याच प्रवृत्तींत आहे. फलज्योतिष, शकुन, मंत्रतंत्र इत्यादि प्रकार ह्याच मुळें उत्पन्न झाले असून, कित्येकांस ते अजूनही सत्य वाटत आहेत. पुढें जगांतील व्यापारांचा एकसारखेपणा व नियमितपणा यांचा मनुष्यास पुष्कळ अनुभव येऊन त्यांचे कर्तृत्व

एका शक्तीच्या ठायीं आरोपिणें अनेक कारणांमुळें विशेष विचाराचें व सयुक्तिक वाटल्यामुळे हीं इतर शक्तींची कल्पना उत्तरोत्तर जात चालली आहे. पण तिचें नि:शेष निर्मूलन होण्यास अजून पुष्कळ अडचणी आहेत. त्यांपैकीं मुख्य ही कीं, जगांत जें दु:खाचे व दैनेचें निष्कारण अस्तित्व आहे तें कां म्हणून? असा प्रश्न मनुष्याच्या मनांत नेहमीं उत्पन्न होतो. त्यांच्या कर्तृत्वाचा आरोप देवाच्या ठायीं करणे तर सहसा युक्त नव्हे. मग ती आली कोठून? ह्या प्रश्नाचे उत्तर ख्रिस्ती व मुसलमान धर्माप्रमाणें असें आहे कीं, त्यांचे उत्पादकत्व सैतानाकडें आहे. आतां, त्या सैतानाच्या संबंधानें तद्धर्मी निरनिराळ्या मतवाद्यांच्या निरनिराळ्या कल्पना आहेत. तत्वविचारानें ज्यांचीं बुद्धी जराशीं उज्जवल झाली आहे, परंतु ज्यांचा त्या धर्मावरचा विश्वास अजून उडालेला नाहीं, त्यांना सैतान म्हणून कोणीं भावरूप व्यक्ति आहे असें म्हणणें अगदीं अप्रमाण वाटते. त्याचें ह्या कल्पनेविषयीं असें म्हणणें पडतें कीं, सैतान म्हणून कोणीं व्यक्ति अस्तित्वांत नाहीं, तर मनुष्याच्या नैसर्गिक पापप्रवणतेवरचे ते रूपक आहे. पण नैसर्गिक पापप्रवणता तरी उत्पन्न झाली कशी? या प्रश्नाचें सयुक्तिक उत्तर त्यांना देता येत नाहीं. ह्या ख्रिस्ती व मुसलमान लोकांप्रमाणेंच पुष्कळ अंशी पारशी लोकांचेहीं मत आहे. त्यांच्या मताप्रमाणें जगांत जितक्या बऱ्या गोष्टी घडत आहेत, तितक्या सगळ्या एका बऱ्या देवाच्या (हॉर्मज्च्या) हातून होत आहेत; आणि सगळ्या वाईट गोष्टी एका वाईट देवाच्या (अऱ्हिमनच्या) हातून घडत आहेत. त्यांच्या मतें ह्या दोन्हीं शक्तींचा नित्य झगडा चाललेला असून शेवटीं चांगलीचा जय होणार आहे. हीं कल्पना मात्र जगांतील स्थिति पाहून जराशा अडाणी मनुष्याच्या मनांत स्वाभाविकपणें उत्पन्न होण्यासारखीं आहे खरी. मुसलमान व ख्रिस्ती लोकांची सैतानाची कल्पना सर्वशक्तिमान् व दयामय देवाच्या कल्पनेशी सर्वथा विसंगत दिसते. कारण त्यांच्या मताप्रमाणें सैतानाची ही उत्पत्ति देवापासून आहे. तेव्हां त्यांना सहजीच असें विचारणें येते कीं, त्रिकालज्ञ देवास हा सैतान पहिल्या प्रतीचा शिरजोर व अखिल मनुष्य जातीस नाहक त्रास देणारा होईल हें ठाऊक नव्हतें काय? जर ठाऊक होतें म्हणावें, तर स्वतःच्या योजनेस त्याच्याकडून होणारा जबरदस्त अडथळा व मनुष्याचीं त्याच्या मोहिनीच्यापायीं होणारी विलक्षण पापमग्नता यांचे त्यास कांहींचका वाटलें नाहीं?

नशिबाची ही कल्पना बहुतेक ह्याच जातीची आहे. कारण ज्या अनिष्ट गोष्टी स्वतःच्या किंवा इतर मनुष्यादिकांच्या आचरणामुळें अथवा वर सांगितलेल्या धर्मनतानुसार घडल्याचा स्पष्ट अनुभव येत नसतों किंवा खात्री होत नसतें, त्या कोणीतरी अदृष्ट

शक्तीनें घडवून आणल्या असें मानण्याकडें मनुष्याचा कल विशेष असतो. ह्या अदृष्ट शक्तीस निरनिराळ्या भाषांतून निरनिराळी नांवे आहेत. आमच्या भाषेत ती नशीब, दैव, भवितव्यता इत्यादि शब्दांनीं बोधित होतें. येथे कोणी अशी शंका घेईल कीं, मागें वादविषयक गोष्टीसंबंधी निरनिराळ्या धर्मकल्पनांचा विचार करतांना नशीब, दैव वगैरे शब्दांनीं त्या कल्पनांची वाच्यता होत असल्याचें सांगून आतां त्या शब्दांनीं स्वतंत्र भावरूप शक्तीचा बोध होतो असें म्हटल्यानें विसंगतपणा नाहीं का होत? यावर असें समाधान आहे कीं, धर्मग्रंथ व धर्मोपदेशक यांच्या द्वारें कळलेल्या सर्वच धर्मकल्पनांचें यथार्थ स्वरूप सामान्य जनांत अप्रत्यक्षत्वास्तव चांगलेंसें समजण्याचा संभव अगदीं कमी असल्याकारणानें, त्या निरनिराळ्या कल्पनांतला सूक्ष्म भेद त्यांच्या ध्यानांत एकाएकी येत नसतों. म्हणून त्यांच्या मनामध्यें ह्या कल्पनांविषयीं गोंधळ उत्पन्न होऊन भाषेतही बराच संदिग्धपणा माजून राहिला आहे. तो इतका कीं, ज्या गोष्टींचा उलगडा एका प्रकारें केला असतां लोकांस मान्य होतो, त्याच गोष्टींचा अन्य प्रकारें केलेला उलगडाही त्यांस संमत होतो. हा भ्रम प्रस्तुत वादांत चांगला दृष्टोपत्तीस येतो. मनुष्यजातीमध्ये असलेल्या असमतेचीं मीमांसा निरनिराळ्या धर्मात निरनिराळीं केलेलीं असून आणखी फलज्योतिषासारखें थोतांडही लोकांस कां बरें खरें वाटावें? अशीच गत नशिबाच्या स्वतंत्र कल्पनेचीहीं आहे असें समजावें. सामान्य लोक जेव्हां जेव्हां नशिबाचा उल्लेख करितात, तेव्हां तेव्हां बहुतकरून अशी कोणीतरीं व्यक्ति कोठें तरी अस्तित्वांत आहे असा त्यांचा भाव दिसतो. भूत प्रेत–पिशाचादिक अदृष्टव्यक्तींवर प्रत्यक्ष अनुभव नसतांही, जसा कांहीं मनुष्यांचा अजून विश्वास आहे, त्याचप्रमाणें पुष्कळ ख्रिस्ती–मुसलमानादिकांची सैतानाच्या अस्तित्वाविषयींही जशीं अद्यापि खात्री आहे, तशीच नशिबाच्या अस्तित्वाविषयीं त्यांची दृढ भावना झालेली असतें. पण ही भावना अगदीं भ्रममूलक आहे, असें सहज दाखविता येईल.

१३. कारण उघडच आहे कीं, सर्व चराचराचा उत्पन्नकर्ता व नियंता एक देव आहे असा ज्यांचा बळकट विश्वास बनला आहे, त्यांनीं आणखीं नशीब म्हणून कोणीं मनुष्याचें बरेवाईट करणारी शक्ति आहे, असें कल्पिणें विसंगत होय. दुसरें असे कीं, तिचें प्रत्यक्ष ज्ञान कोणालाही झालेलें ऐकिवात नाही. बरें, तिचें अस्तित्व क्षणभर कबूल केलें, तरी मनुष्यास असें नाडण्यात तिचा हेतु काय असावा, हें कोणाच्यानें तरी सांगवेल काय? ह्या नशिबाचा मनुष्यांनी काय अपराध केलेला असतो बरें? आणखी असें पहां कीं, नशीब म्हणून कोणीं खरीखुरीच व्यक्ति आहे असा जर लोकांचा पूर्ण भरंवसा असता, तर त्याचा त्रास चुकविण्याकरितां त्यास संतुष्ट राखण्याचे

उपाय त्यांनीं योजलें असते. आमच्या हिंदुलोकांतल्या वरच्या मानलेल्या वर्गांतून चालू असलेले यज्ञयाग, लघुरुद्र, महारुद्र, एकादष्ण्या, ग्रहादिकांची शांति; व कुणबी वगैरे लोकांकडून म्हसोबा, यतोबा वगैरे भूत-पिशाचादिकांस होत असलेली कोंबडी, बकरी, नारळ, दारू वगैरे पारितोषकांची अर्पणें, हीं ज्या केवळ कल्पित देवतादिकांकहून पीडा पोंचण्याचा संभव आहे असें अज्ञान लोकांस भ्रमानें वाटतें त्यांचा अकारण मानीव क्षोभ शमविण्यासाठी योजण्यांत येत असतात. असाच कांहींतरी प्रकार नशिबाच्या संबंधानें होणें स्वाभाविक होते. पण तो फारकरून कोठेंही आढळत नाहीं. त्यावरूनही हें उघड होतें कीं, नशिबाच्या स्वतंत्र अस्तित्वाची कल्पना कोणत्याही प्रकारच्या लोकांच्या मनावर कधींहीं पूर्णपणे ठसलेली नाहीं; आणि ती प्रमाणसिद्धहीं नाहीं. म्हणून ती सर्वथा अविश्वसनीय होय.

१४. येथवर जें नशिबाचें स्वरूप सांगितलें, त्यावर कोणीं अशी शंका घेतील कीं, लोकांत जी नशिबाची कल्पना आहे ती अनिष्ट गोष्टींच्या उत्पादकत्वापुरतीच नाहीं, तर चांगल्या गोष्टीही त्याच्या प्रभावानें घडतात असें पुष्कळ लोक मानितात. तेव्हां त्याचा विचार करितांना त्याची दोन्हीं स्वरूपें लक्षांत ठेवलीं पाहिजेत. यावर असें समाधान आहे कीं, एकाच व्यक्तीकडून चांगलीं व वाईट कामें, मनुष्यास कळण्यासारखे मुळीच कांहींएक कारण किंवा हेतु नसता घडतात म्हणणें अयुक्तिक व अनुभवास सर्वथा विरुद्ध होय. शिवाय बहुतेक लोकांत मनुष्याचें सर्वदा कल्याण करणारी अशी स्वतंत्र दयामय करित असल्याविषयी दृढभावना किंवा श्रद्धा आहे. ह्या श्रद्धेसही ही नशीबाची द्विविध कल्पना सर्वस्वीं विसंगत होय. आणखी असें पहां कीं, मनुष्यास ज्या चांगल्या गोष्टी घडतात, त्या तो आपल्या पराक्रमाच्या व कर्तबगारीच्या योगानें घडल्या असें म्हणतो, आणि वाईट गोष्टी तेवढ्या मात्र स्वतःच्या दोषानें घडल्या नाहींत; तर त्या दुसऱ्या माणसांच्या किंवा नशिबाच्या प्रतिकूळतेनें घडल्या असें भासविण्यास तो सदा तत्पर असतो. लोक त्याला जे सुदैवी म्हणतात त्यांतला तरी अर्थ इतकाच कीं, त्याला दैव प्रतिकूळ झालें नाहीं. ह्या विचारा वरून पाहतां वरील नशिबाचें एकदेशीय स्वरूपच विशेष लोकसमजुतीस धरून आहे असें ठरतें. त्यांतूनही ज्या कित्येक लोकांस हें नशिबाचें दुबार स्वरूप संमत असेल त्यांस तें एक व्यक्तीच्या ठायीं आरोपितां तर येणार नाहींत. बरें, पारशी वगैरे लोकांच्या समजुतीप्रमाणें एक बरी व एक वाईट अशा दोन स्वतंत्रशक्ति आहेत असें म्हणणेंही जमत नाहीं. कारण, असें पाहा कीं, समग्र जीवकोटीचा अकारण द्वेष किंवा प्रीति एकाद्या व्यक्तीच्या ठायीं

कल्पिणें मनुष्याच्या अनुभवास अगदीं विरुद्ध आहे. तेव्हां कोणीकडूनही पाहतां ही नशिबाच्या स्वतंत्र अस्तित्वाची कल्पना अप्रमाण होय; आणि निरनिराळ्या धर्मातील नशिबाच्या कल्पनेचेंही अयथार्थत्व मागें दाखविण्यांत आले आहे. तेव्हां जगांतील असमतेची खरी उपपत्ति ह्या कल्पनेच्या साहाय्यानें होत नाहीं हें उघड आहे.

१५. परंतु येथें कोणी असें विचारितील कीं, ही नशिबाची कल्पना निरनिराळ्या रूपांनी बहुतेक सर्व देशातील लोकांत आढळून येत असतां ती खोटी कशी म्हणता? तिचा सार्वत्रिकपणा तिच्या सत्यत्वाचा योग्य पुरावा नव्हे काय? यावर असें उत्तर आहे कीं, आजपर्यंत सार्वत्रिक प्रसार पावलेल्या अशा पुष्कळ कल्पनांचा निखालस खोटेपणा यथार्थ ज्ञानाच्या योगानें सिद्ध झाला आहे. उदाहरणार्थ पृथ्वीच्या आकाराची किंवा निश्चलत्वाची कल्पना घ्या. ग्यालिलिओ सारख्या शोधक पुरुषांनी लोकांकडून होणाऱ्या त्रासाची परवा न करितां सत्य कथन करून लोकभ्रम घालविला नसता, तर सामान्यजनांचा अज्ञानपंकांतून कधींही उद्धार झाला नसता. जगाचा आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं, ज्या गोष्टी असंख्य सामान्य मनुष्यांस अनभिज्ञत्वास्तव सत्यशा वाटतात, त्यांचा असत्यपणा एकदोनच अभिज्ञ पुरुषांस वाटून मनुष्यसामान्यास जडलेल्या भ्रमाचा निरास होण्यास त्यांजकडून साहाय्य होतें. अशीच गोष्ट नशिबाच्या कल्पनेची आहे. तेव्हां जर तिचे अयथार्थत्व वरील ऊहापोहानें स्थापित होत असेल तर केवळ तिच्या सार्वत्रिकपणावरूनच ती सत्य आहे असें मानणें चुकीचे होईल.

आतां ही कल्पना अशी सार्वत्रिकपणें कशी उद्भवली तें थोडक्यांत सांगितल्यास प्रस्तुत विवेचनास बरीच मदत होईल असें वाटतें. त्या गोष्टीचा त्रोटक उल्लेख ह्यापूर्वी इतर गोष्टींच्या अनुषंगानें झाला आहे. पण तिचे येथें स्वतंत्र निरूपण होणें इष्ट आहे.

१६. ह्या जगामध्ये मनुष्यास ज्या बऱ्यावाईट गोष्टी घडतात, त्यांतल्या कांही त्याच्या स्वाधीन असतात आणि कांहींस त्याचा इलाज नसतो. ज्या गोष्टी त्यास निरुपायशा वाटतात, त्या कोणीतरी अदृष्टशक्ति घडवून आणतात असें त्यास अनभिज्ञत्वास्तव वाटतें. हा असा मिथ्या समज होण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, ह्या विश्वामध्ये प्राण्यावांचून इतर वस्तुजातीस ऐच्छिक गति उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं, असा त्याला नेहमींच्या व्यवहारांत पुष्कळ अनुभव आलेला असतो. म्हणूनच मनुष्याच्या आद्यस्थितीमध्यें चंद्रसूर्यादिकांचे उदयास्त विद्युत, उल्का इत्यादिकांचे पात, नद्यादिकांचे प्रचंड प्रवाह, वारा, पाऊस इत्यादिकांचा अनिवार वेग, हे व असेच दुसरे निसर्गातील अद्भुत व्यापार कोणातरीं अदृष्ट व्यक्तिभूत शक्तींची कामें आहेत

असें मानण्याकडें तत्कालीन लोकांचीं स्वाभाविक प्रवृत्ति झाली; आणि त्या व्यापारांचें अनिष्ठ परिणाम टाळण्यासाठीं व अनुकूलता संपादण्कसाठीं ह्या कल्पित देवतांची आराधना, पूजा वगैरे प्रकार सुरू झाले. पुढें जसजसा मनुष्याचा विश्वातील व्यापारांविषयींचा अनुभव व कल्पना हीं वाढत गेली, तसतशी ही अनेक देवतांवरची श्रद्धा उडत जाऊन शेवटीं ही सर्व विश्वाची रहाटी कोणीतरी एका देवानें चालविली आहे असा समज कित्येकांचा झाला; आणि तो ज्यांचा झाला, त्यांनी तो इतर जनांच्या मनांत ठसविण्याचें भगीरथ प्रयत्न एकसारखें चालविले. ह्या समजुतीप्रमाणें विश्वातील सर्व व्यापारांचें कर्तृत्व एका देवाकडे आले. तेव्हां अर्थातच दुःखोत्पादक गोष्टींचा नाश व सुखावह गोष्टींची प्राप्ति होण्यासाठी सर्वस्वी ह्या देवाच्या इच्छेवर अवलंबून राहणें आले. आणि पूर्वी अनेक देवतांचा संतोष राखण्यासाठी त्यांची जीं आराधनादिक करावी लागत असत तीं आतां एका देवाचीच केली म्हणजे पुरे, असा समज सहज उत्पन्न झाला. ह्याप्रमाणें आज निरनिराळ्या लोकामध्यें ईश्वरी प्रसाद संपादण्याचें निरनिराळें प्रकार जारीनें सुरू आहेत. पण चमत्कार असा आहे कीं, ऐहिक सुख प्राप्त्यर्थ ईश्वरी प्रसाद जोडण्यासाठीं मनुष्यानें केलेल्या प्रयत्नांस बहुतकरून कधींच यश आल्याची स्पष्ट प्रतीति नाहीं. बहुतकरून पद घालण्याचें कारण तरी येवढेंच कीं, कधीमधी काकतालीय न्यायानें एकाद्याची आराधना किंवा प्रार्थना देवानें ऐकिल्याचा दाखला इष्टहेतुसिद्धीवरून येतो. पण ही सिद्धि देवाच्या प्रसन्नतेचेंच फल होय, असें खास म्हणतां येणार नाही. कारण असें पाहा कीं, आजपर्यंत अनंत देवभक्तांनी व पुण्यशील पुरुषांनी संकटसमयीं पूर्ण सद्भावानें व पराकाष्ठेच्या कळवळ्यानें आपल्या देवाचा केलेला धावा अगदीं निष्फळ झाला आहे. त्याच प्रमाणें कधी कधी असें घडतें कीं, एखादा मनुष्य कितीही दुष्ट व धर्महीन असला तरी, त्याच्यावर फारशी संकटे न येतां त्याचा ह्या जगांत चांगला उत्कर्ष होऊन सुखशांतीचा त्यास चिरकाल अनुभव घडतो. दुसरें असें कीं, कित्येक अनिष्टापातांत तर बऱ्याबुऱ्या सर्वच लोकांचा सरसकट नाश होतो; अशा प्रसंगीं देवभक्त ांच्या प्रार्थनेचा कांहींएक उपयोग होत नसतो. हा मनुष्याचा नित्याचा अनुभव आहे. तेव्हां त्याच्याठायीं ईश्वरप्रार्थनेंच्या फलद्रूपतेविषयीं अश्रद्धा कमीजास्त प्रमाणानें उत्पन्न होणें साहजिक आहे. पण ही अश्रद्धा नाहीशीं करण्यासाठीं आपमतलबी लोकांनी आजपर्यंत पुष्कळ उपाय योजले आहेत. हे लोक ह्या जगांतील वर निर्दिष्ट केलेल्या आंधळ्या व्यवस्थेची मीमांसा निरनिराळ्या प्रकारे करितात. पुष्कळजण असें म्हणतात कीं, ह्या जगांत जरीं चांगल्या लोकांस दुःख किंवा वाईट लोकांस सुख प्राप्त होते, तरी परलोकीं त्यांच्या बऱ्यावाईट

कर्माप्रमाणेंच त्यांस गति प्राप्त होईल. कित्येक म्हणतात कीं, दुःखें आणि संकटें जीं मनुष्यावर ओढवतात तीं एकतर त्याची पारख व्हावी म्हणून, किंवा त्यांच्या अनुभवानें तो शुद्धींवर येऊन त्याचें चित्त ईश्वराकडें लागावें म्हणून. दुसऱ्या कित्येकांचें असें मत आहे कीं, मनुष्यास त्याच्या जन्मांतरीय कर्मांप्रमाणे ह्या जन्मी स्थिति प्राप्त झाली आहे, तेव्हां त्यांत देवाकडे काय दोष? कित्येकजण तर असे देखील म्हणतात कीं, सुख आणि दुःख हीं वस्तुतः कांहीच नव्हेत. तीं तशीं मनुष्य भ्रमानें मानतो मात्र. हा सर्व मायेचा खेळ आहे. हे सारे जगच जर आभासवत् आहे, तर त्यांतल्या वैषम्यानें कां कष्टी व्हावें? आतां, ह्या सर्व कल्पना खऱ्या मानल्यानें ईश्वराकडे गौणत्व येतें, असें ज्या कित्येकांस विचाराअंती वाटतें तें म्हणतात कीं, जणांत जेवढें म्हणून वाईट आहे तेवढ्या सगळ्यांस एक स्वतंत्र व्यक्ति कारण आहे. ह्या कल्पित स्वतंत्र व्यक्तीस निरनिराळ्या लोकांनी निरनिराळी नांवे दिली आहेत. पारशी लोकांची अह्रिमनाची कल्पना, ख्रिस्ती-मुसलमानांची सैतानाची कल्पना, आणि बहुतेक अप्रबुद्ध लोकांची नाशिबाची कल्पना ह्याच विचाराचें फळ होय. पण या कल्पनाहीं देवाच्या सर्वशक्तिमत्वास व दयामयत्वास सर्वथैव विसंगत आहेत, असें थोडासा विचार केला असतां कोणालाही दिसून येईल. एकंदरींत काय कीं निसर्गातील एकंदर व्यापारांच्या कर्तृत्वाचा एका सर्व शक्तिमान व दयामय देवाच्याठायीं आरोप केला असतां मनुष्यास कमीजास्त प्रमाणानें होणाऱ्या अकारण दुःखाचा परिहार प्रार्थनादिके करून होईना, तेव्हां त्या दुःखाची मीमांसा अन्य प्रकारे करणें प्राप्त झाले; आणि नशिबाची कल्पनाही ह्यामुळेच उत्पन्न झाली. ह्या नशिबाच्या कल्पनेचा थोडासा विचार तर वर झालाच आहे. त्यावरून तिचे अयथार्थत्व कितपत आहे तें वाचकांच्या ध्यानांत आले असेल.

आतपर्यंत नशिबाच्या कल्पनेचा निराधारपणा, इतर धर्मविषयक कल्पनांशी तिचा जबरदस्त विसंवाद आणि तिची उत्पत्ति यांचे संक्षिप्त निरूपण झालें. आतां ह्या लौकिक भ्रमाचें एक मुख्य कारण सांगून जगांतील असमतेची वास्तविक उपपत्ति कशी काय करावयाची ते पाहूं.

१७. ह्या विश्वामध्यें जे अगणित व्यापार चालले आहेत, ते सर्व सहेतुक असून मनुष्यजातीच्या सुखाचें वर्धन करणारे आहेत, असा समज बहुतेक धर्मातील लोकांचा आहे. कारण उघडच आहे कीं, सर्व विश्वाचें उत्पादकत्व व नियंतृत्व एका शक्तीच्याठायीं आरोपून आणखी ती सर्वज्ञ, न्यायी व दयामय आहे असें मनिल्यावर मग तिच्यापासून उद्भवलेले सृष्टिव्यापार मनुष्यास विनाकारण दुःखप्रद कसे होतील? पण मनुष्यास ह्या

कल्पनेच्या अगदी उलट नित्य पुष्कळ अनुभव येत असतात. तेव्हां ही कल्पना आणि प्रत्यक्ष अनुभव यां मधल्या ह्या विसंवादाची कांहींतरी उपपत्ति करणें प्राप्त झाल्यामुळें येवढावेळ सांगितलेल्या निरनिराळ्या कल्पना उत्पन्न झाल्या आहेत. वास्तविक पाहातां हा समजच मुळीं निराधार आहे. ही आपली पृथ्वीच काय ती सर्व विश्वाची मध्यवर्तिनी असून तिच्या सभोवती सूर्य, चंद्र व इतर तारांगण केवळ परिचारकांप्रमाणें तिला प्रकाशादि देण्याकरितां परिभ्रमण करीत आहेत, अशीं लोकांची समजूत होती त्यावेळीं ही वरील कल्पना साहजिक होतो. परंतु आधुनिक ज्योतिषशास्त्रवेत्यांनी नभोमंडळातील ज्योतिर्गणांविषयीं ज्या उपपत्ति निर्विवादपणें स्थापित केल्या आहेत, त्यांवरून पाहातां आमचा हा भूगोल आकाशांतील कोट्यावधि ताऱ्यांपैकीं एका लहानसा ताऱ्याचा अगदीं छोटेखानी परिचारक असून तो त्याच्या भोंवती नियत कालिक परिभ्रमण करीत आहे. तो त्या प्रचंड विश्वप्रसारापुढे कांहींच नाहीं. आफ्रिकेतल्या साहारा नामक वाळूच्या विस्तीर्ण मैदानातला एक कण उचालिला असतां जितकी जागा रिती होईल, तितक्याच प्रमाणानें आमचा हा भूगोल नष्ट झाल्यानें समग्र विश्वातील होईल असें मानल्यास बिलकूल अत्युक्ति होणार नाहीं. इतकी जेथें सुळी आपल्या त्या सगळ्या भूगोलाची मातब्बरी, तेथें त्याच्या कोठें कोनाकोपऱ्यांत अत्यंत सूक्ष्म कीटवत् इतस्ततः संचार करणाऱ्या मानवजातीचा काय पाड? अशी जर वास्तविक स्थिति आहे, तर निसर्गगत प्रचंड व्यापार मनुष्यसुखहेतुक आहेत म्हणणें अप्रयोजकपणाचें होय. मोठी भयंकर वादळे, लहान मोठे जलप्रलय, अगणित जांबांचा निमिशमात्रांत संहार करणारे भूमिकंप, संपर्कमात्रेंकरून जीवसृष्टीचें भस्म करून टाकणाऱ्या धूमकेतूची आपल्या ह्या सूर्यमालेंतून वेळोवेळीं होणारी गमणें; हा पृथ्वीगोल कालेंकरून प्राण्यांच्या वसतीस अगदीं अयोग्य होईसारखा त्याच्याठायींच्या उष्णतेचा सतत होत असलेला ऱ्हास, इतर ग्रहगोलांबरोबर आपल्या ह्या पृथ्वीग्रहाची सूर्यरूपी प्रचंड होमकुंडांत कालांतरानें होणारी आहुति इत्यादि गोष्टींच्या विचार केला म्हणजे ही वरील समजूत अगदींच व्यर्थ दिसतें. शिवाय, ह्या कल्पित मनुष्यसुखवर्धक योजनेच्या स्वरूपाचा निर्णय जगांतील तिच्या वास्तविक परिणामांवरून जर करावयाचा तर इकडूनही बरीच पंचाईत आहे. कारण, ह्या जगांतील अकारण दु:खप्रदस्थितिवैचित्र्य व प्राणिमात्राचा परस्परांत चाललेला जबरदस्त जीवनार्थ कलह हीं जें विशेष बारकाईनें पाहतील, त्यांना ही योजनेची कल्पना अगदीं निराधार वाटेल. सारांश काय कीं, ह्या जगामध्यें मनुष्यास घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी कोणी तरी अदृष्टशक्ती मुद्दाम घडवून आणीत आहे असें

मानून चित्तास उगीच घोटाळ्यांत पाडण्यांत कांहींएक शहाणपणा नाहीं. तर मग त्या जगांतील असमतेची उपपत्ति कोणत्या प्रकारें करावयाची? ह्या प्रश्नाचें उत्तर आतां दिले पाहिजे. हे उत्तर वरील विवेचनांत पर्यायानें येऊन चुकलेंच आहे. पण त्याचा स्पष्ट स्वतंत्र उल्लेख होणें येथें अगत्याचे आहे.

## असमतेची यथार्थ उपपत्ति

१८. शास्त्रज्ञ पुरुष आम्हांस असे सांगतात कीं, ह्या विश्वातील वस्तुजाताच्या ठायीं जे गुणधर्म स्वभावत: असतात, त्यांच्या संयोगवियोगादिकेंकरून जे व्यापार होत आहेत त्यांचे परिणाम केवळ यदृच्छेनें सद्य स्थितिमूलक झाले आहेत. ते व्यापार किंवा त्यांचे परिणाम अमुक एकच प्रकारचें व्हावे किंवा अमुक, एक प्रकारचें होऊ नयेत, अशी योजना कोणीतरी निर्सगबाह्य शक्ति कोणत्यातरी हेतूस वश होऊन करीत आहे, असें मानण्यास मुळींच आधार नाही. कारण निसर्गातील ज्या पदार्थाच्या ठायींच्या गुणधर्माचें थोडेंबहुत ज्ञान आम्हांस झालें आहे, त्यांचें व्यापार अमुक एका स्थितींत अमुकच होतील, असें खात्रीनें सांगण्यास आम्हीं आज बरेच समर्थ झालों आहों. हें भविष्यकथन आम्हांस इतकें निश्चयानें करितां येतें कीं, त्यांत कोणत्याही निसर्गबाह्य शक्तीच्या अंतर्गमनामुळें अंतराय येईल अशीं शंका क्षणभरसुद्धा आमच्या मनांत येत नाहीं. उदाहरणार्थ, असें पाहां कीं, तांदूळ व पाणी यांचे योग्य मिश्रण करून तें चुलीवर ठेवले आणि खालीं हवा तितका सर्पणाचा जाळ केला म्हणजे कांहीं वेळान तांदूळ शिजून भात तयार होतो. त्यास कोणा देवतेची आराधना किंवा प्रार्थना करण्याची मुळींच गरज नसतें. अशीच गोष्ट मनुष्याच्या हातून घडणाऱ्या हरएक लहानमोठ्या घडामोडीची आहे. असें ज्याचें पदार्थज्ञान असतें, तदनुसार त्यास निरनिराळें पदार्थ वागवितां येऊन इष्ट कार्यसिद्धी होते. पाश्चात्यांनीं पदार्थविज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांचे अध्ययन व वृद्धि हीं जारीनें चालविल्यामुळें त्याला नानाविध धनोत्पादक कला व कारखाने उत्पन्न करितां येऊन सध्यां पुष्कळ सुखानुभव होत आहे. ह्या सुखाच्या प्राप्त्यर्थ ते आतां ईश्वराची प्रार्थना मुळींच करीत नाहींत, आणि त्यांच्या ह्या ऐहिक उत्कर्षाची कारणें ज्यांना पुरतेपणीं कळलीं आहेत ते त्यांजवर ईश्वरी प्रसाद झाला आहे असें न म्हणतां, त्या कारणांची कार्ये आपल्याकडें घडवून आणतां आल्यानें समान फलप्राप्ति होईल, असें तें निश्चयानें म्हणतात; आणि ज्या कित्येक गोष्टी परस्थांच्या अनुकरणानें इकडें सुरू झाल्या आहेत, त्यापासून योग्य कार्यसिद्धि नच झाल्यास तीं न होण्याचीं स्वाभाविक कारणें कोणतीं आहेत, त्यांचा तें सूक्ष्मपणें

विचार करितात. ईश्वरी प्रसाद संपादण्याच्या किंवा ईश्वरी क्षोभ निवारण्याच्या खटपटींत तें मुळींच पडत नाहींत, किंवा हीं असिद्धि दुसऱ्या कोणातरी कल्पित अदृष्टशक्तिच्या प्रतिकूलतेमुळें झाली असें तें म्हणत नाहींत. शास्त्रज्ञांला अजून न समजलेल्या अशा पुष्कळ गोष्टीं आहेत. निसर्गातील कित्येक व्यापारांचें परिज्ञान त्यांस अद्यापि न झाल्यामुळें त्यांचें भविष्यकथन वगैरे त्यांस निश्चयात्मकपणें करितां येत नाही; तरीपण त्या गोष्टी किंवा ते व्यापार ईश्वराच्या विशेष योजनेनें होतात असें म्हणणें त्यांस रास्त वाटत नाहीं; तर त्यांच्या स्वाभाविक कारणांचें ज्ञान मिळविण्याविषयीं मनुष्यानें प्रयत्नशील असावें, असेंच ते म्हणतील. इतकेही करून ज्या गोष्टीं मनुष्यास सर्व प्रकारे अज्ञेय राहतील त्यांचें कर्तृत्व कोणातरी निसर्गबाह्य शक्तीच्या ठायीं आरोपिण्याचें अज्ञानमूलक धाडस न करितां मनुष्यास अगम्य अशा स्वाभाविक कारणांचींच त्या कार्ये होत, असें म्हणणें विशेष युक्त व अनुभवास धरून आहे. ज्या गोष्टींचा यथार्थ कार्यकारण संबंध समजला आहे, त्यांच्या सिद्ध्यर्थ विचारी मनुष्य कोणाही अदृष्टशक्तीचा प्रसाद मिळविण्याकरितां पूजा, नवस, बलिदान, होमहवन, जपजाप्य, व्रतं-उद्यापनें, आराधना-तपश्चर्या, प्रार्थना इत्यादि करण्याच्या भरीस पडणार नाहीं हे उघड आहे; आणि म्हणून तीं निष्फळ झाली असतां नशीब वगैरे इतर कल्पित अकारण-प्रतिकूळ अदृष्टशक्तींवर अपयशाच्या कारणत्वाचा आरोप करण्याचाही वेडेपणा त्याजकडून होणार नाहीं. हे वेडेपणाचें प्रकार घडण्याचें मुख्य कारण येवढेच दिसते कीं, मनुष्यास ज्या गोष्टींचा वास्तविक कार्य-कारण-संबंध न समजल्यामुळें इष्ट कार्यसिद्धीस प्रत्यवाय येतो-त्या कोणी तरी निसर्ग-बाह्य शक्ती घडवून आणतें, असें मानण्याकडे त्याची सहजी प्रवृत्ति होते; आणि त्या शक्तीची अनुकूलता संपादण्याचे उपाय व्यर्थ झालें म्हणजे मग इतर अनिष्ट शक्तींची कल्पना करून तो आपल्या मनाचें कसेतरी समाधान करून घेतो. परंतु हें समाधान अत्यंत दूष्य होय. येणेंकरून आलस्यादि उत्कर्षविघातक वृत्तींचा विकास मनुष्यहृदयांत होऊन तो नाना विपत्तींस पात्र होतो. तेव्हां ह्या एकंदर ऊहापोहाचा मथितार्थ म्हणून इतकाच कीं, प्रकृत निबंधाच्या प्रारंभी उपक्षेप केल्याप्रमाणें जी असमता आज जगामध्ये सर्वत्र कमी जास्त प्रमाणाने दृग्गोचर होत आहे, ती सारी निसर्गगत व्यापारांचे स्वाभाविक फल होय. यांत मनुष्याचे जें थोडेबहुत अंग आहे, तें देखील त्याच्यावर निसर्गाच्या घडणाऱ्या बऱ्या वाईट परिणामाचेच फल आहे; आणि हे निसर्गाचे व्यापार निखालसपणें निर्घृण असून अबाधित व नियमित आहेत. त्यांत कोणत्याही प्रकारची चलबिचल किंवा फेरफार कोणाही निसर्गबाह्य शक्तींच्या योगानें

होण्यासारखा नाही. नशीब वगैरे निसर्गबाह्य अदृष्टशक्तींची कल्पना कार्यकारणसंबंधाच्या अज्ञानामुळें उत्पन्न झाली आहे. हें कार्यकारण–संबंधाचें ज्ञान जसजसें वृद्धिंगत होत आहे, तसतशीं ही कल्पना निर्बल होत चालली आहे; आणि कित्येक अभिज्ञ पुरुषांच्या हृदयांतून तर ती मुळींच नाहीशी झाली आहे.

## आक्षेपनिरसन

१९. ह्यावर कित्येक लोकांचा असा आक्षेप आहे कीं, नैसर्गिक व्यापार अबाधित असून आजपर्यंत जगास प्राप्त झालेली स्थिति जर अपरिहार्य होती, तर यापुढेंही मनुष्यास किंवा दुसऱ्या कोणास तींत पालट करण्याचें बिलकूल सामर्थ्य होणार नाहीं. तेव्हां ह्याच स्थितीस नशीब हें नांव देण्यास काय हरकत आहे? ह्यावर असें समाधान आहे कीं, जरी मनुष्यास पदार्थगत सांसिद्धिक धर्मात बिलकूल फेरबदल करतां न आल्यामुळें तन्मूलक व्यापारांतही पलट करितां येत नाही, तरी हे व्यापार पदार्थाचे संयोगवियोगादि करून अनुकूळ होतील असें करण्याची ताकद यथार्थ ज्ञानाच्या साहाय्यानें त्यास आज पुष्कळ आली आहे. त्याचप्रमाणें ज्या कित्येक व्यापाराचें परिणाम त्यास जाचक होण्यासारखे आहेत, ते टाळण्याचे किंवा त्यांचे अनिष्टत इतर उपायांनी कमी करण्याचें सामर्थ्यही त्यास बरेंच आले आहे. आतां एवढें मात्र खरें कीं, कित्येक व्यापारांच्या इष्टानिष्टत्वासंबंधे मनुष्यास कांहींएक करितां येण्यासारखें नाही. उदाहरणार्थ, भूमिकंप, ज्वालामुखींचें कोट, जल, अतिवृष्टि, अनावृष्टि इत्यादि होत. परंतु, अशा निरुपाय गोष्टीस नशीब म्हणण्यांत मुळींच अर्थ नाहीं. कारण एकतर सामान्यजनांच्या मनांत हा सूक्ष्मभेद चांगलासा न उतरून त्यांची मुळची भ्रममूलक कल्पना कायम राहील; दुसरे असें कीं, ह्या कल्पनेमुळें सगळ्या अप्रिय गोष्टींचे अपयश दुसऱ्या कोणावर तरी ढकलून चित्त अस्वस्थ करून घेण्याची संवय न जाऊन मनुष्य उद्योगशील होणार नाही. त्याचा निसर्गावर जो आजकाल एवढा जबरदस्त अंमल चालत आहे, तो पदार्थविज्ञानादि कष्टप्राप्त शास्त्रांच्या बळावर होय. हे त्याचें शास्त्रबल योग्य परिश्रमानें जसजसें बुद्धि पावत जाईल, तसतसा निसर्ग त्याच्या अधिकाधिक कह्यांत येत जाईल, हें निर्विवाद आहे. आतां, मनुष्यकृत व्यापारही इतर चराचराच्या व्यापारांप्रमाणें नैसर्गिक नियमांनुसार होत आहेत. कारण, मनुष्यजाति ही निसर्गाचा एक अंश आहे. शिवाय, असें पाहा कीं, सर्व क्रियांचे मूळ जी इच्छा तिचें उद्‌बोधन निरनिराळ्या हेतूंनी होत असतें. हे हेतु सामान्यत: सुखसंपादक किंवा दुःखनिवारक असतात; आणि सुख किंवा दुःख बाह्य निसर्गाच्या अनुकूल किंवा

प्रतिकूल आघातांवर अवलंबून असतें. हे निसर्गाचे आघात नियमित व अबाधित व्यापाररूप होत. अतएव एकंदर जगाच्या स्थितीबरोबर मनुष्याचीं ही स्थिति अपरिहार्यत्वानें सध्यांचे रूप पावली आहे, असें म्हणण्यांत प्रमाद नाही. असें आहे तरी, आज पर्यंत मनुष्यानें आपल्या ज्ञानबळानें एरवीं न होणारीं बरीच सुधारणा आपल्या स्थितींत केली आहे; आणि ह्यापुढेहीं त्याला ती इष्टप्रकारें पालटता येईल. कारण, खजीवितरक्षणार्थ मनुष्य बहुतकरून नेहमी होईल तेवढे सुख संपादण्यात व दुःख निवारण्यात चूर झालेला असतो. हें काम त्यास स्वतःच्या मगदुराप्रमाणें बरेवाईट करितां येते. ज्या मानानें बाह्यनिसर्गाचें व स्वतःच्या देहाचें व मनाचें ज्ञान त्यास अधिकाअधिक प्राप्त होत जाईल, त्यामानानें हें काम त्यास विशेष चांगलें करितां येईल, हें उघड आहे. सांप्रत काळी ह्या ज्ञानाची बरीच वृद्धि झाली आहे, तरी त्याचा प्रसार अगदीं अल्पप्रमाणानें झाला असल्यामुळें फारच थोड्या लोकांच्या वर्तनाचें नियमन ह्या ज्ञानानुसारें होण्याचा संभव आहे. दुसरी एक गोष्ट त्याप्रकरणीं अशी अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे कीं, प्राप्त झालेल्या ज्ञानाप्रमाणें आचरण होण्यास अजून पुष्कळ अडथळे आहेत, तें नाहीतसे केले पाहिजेत. उदाहरणार्थ, आळसामुळें होणारा अडथळा घ्या. मनुष्यास अमुक एका प्रकारे वर्तन केलें असतां अमुक हित होईल, हें स्पष्टपणें कळत असतां त्याच्या हातून आळसामुळें तें वर्तन न होऊन त्या हितास तो मुकतो. हा आळस कित्येकांत इतका वाढतो कीं, त्यास एकाप्रकारें असाध्य रोगाचें स्वरूप प्राप्त होते. अशीच गोष्ट कित्येक अत्यंत अहितकर दुर्व्यसनांची आहे. ह्या दुर्व्यसनांच्यापायीं शारीरिक व मानसिक शक्तींस क्षीणता येऊन मनुष्याच्याठायीं उद्योग-पराङ्मुखता वाढते. हीं दुर्व्यसनें चिरकालिक अभ्यासानें मनुष्याचा प्रति स्वभाव बनून राहतात; आणि त्यांचा बीमोड करण्याविषयीं केलेल्या प्रयत्नांस पुष्कळवेळा मुळींच यश येत नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्याच्या ठायींच्या आत्मपरतादि स्वपरदुःखमूलक दुर्वृत्तींच्या योगानें आजपर्यंत मनुष्य जातीच्या सुखाची पुष्कळ हानि झाली आहे. ह्या वृत्ति कांहीं जणांच्याठायीं इतक्या उद्दाम व प्रबल झालेल्या असतात कीं, त्यांचें दमन अत्यंत कष्टसाध्य होय. त्यातूनही विशेष दुःखाची गोष्ट अशी कीं, हा आळस, ही दुर्व्यसनासक्ति व ह्या दुर्वृत्ति पितृपुत्र परंपरेनें निरनिराळ्या जनसमूहांत कमी जास्त मानानें बहुतेक निरंतरचें बिऱ्हाड करून राहिल्या आहेत. बहुतेक पद घालण्याचें कारण इतकेच कीं, ह्या विकृतीचें यथार्थस्वरूप समजण्याचा अलीकडे कोठें आधुनिक मानसशास्त्रप्रणेत्यांच्या उपपत्तींवरून थोडथोडा मार्ग होत आहे. पूर्वी जेव्हां मन व शरीर हीं परस्परांपासून अत्यंत विसदृश असून त्यांची एकमेकांच्या आधारावाचून

उन्नति होण्याची शक्यता आहे अशी भ्रांतिमूलक समजूत सर्व प्रकारच्या लोकांत होती, तेव्हां ह्या वर निर्दिष्ट केलेल्या विकृतींचीं वास्तविक कारणें व त्यांचा नाश करण्याचे योग्य उपाय कळणें अशक्य होतें. परंतु आधुनिक मानसशास्त्रप्रणेत्यांस हा लोकांचा भ्रम दिसून येऊन त्यांनी आपल्या शास्त्राचा पाया शरीर व मन यांच्या परस्पर संबंधावर रचला आहे. त्यामुळें पूर्वी असाध्य मानलेल्या पुष्कळ शारीरिक व मानसिक विकृतींस साध्यस्वरूप आले आहे. तेव्हां, सारांश काय कीं, सद्यःस्थिति ज्या कारणसंघाचें कार्य आहे, त्याचें यथार्थज्ञान वृद्धिपावून प्रसृत झाल्यानें त्या स्थितींतल्या अनिष्ट बाबींचे निर्मूलन करण्याचें उपाय योजण्याचें सामर्थ्य मनुष्यास येऊन तदनुसार कृति होण्यास जे अडथळे येतात त्यांचाही परिहार कालांतरानें होईल अशी अशा करण्यास फारशी हरकत नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या अर्वाचीन इतिहासांत ह्याप्रमाणें पुष्कळ गोष्टी घडून आल्या आहेत, आणि ह्यापुढें तर अशा गोष्टींची संख्या झपाट्यानें वाढत जाईल हें त्यांच्या आजच्या स्थितिरीतीवरून स्पष्ट दिसत आहे. पण ह्या इष्टतेच्या प्रकाराचें मोघम विधान केल्यानें व तिच्या यथार्थत्याविषयी युरोपीय इतिहासाचा हवाला दिल्यानें सामान्य वाचकांची ह्याप्रकरणीं चांगलीशीं समजूत पडण्याचा संभव अगदी कमी आहे. म्हणून कांहीं गोष्टींचें विवेचन येथे तपशीलवार करणें जरूर आहे. असें केल्यानें सध्याची असमता कितपत सुसाध्य, कष्टसाध्य किंवा असाध्य आहे तें कळून येईल; आणि तूर्तकाळी लोकांची नशिबासारख्या कोणत्यातरी प्रकारच्या निसर्गबाह्य अदृष्टशक्तीवर बऱ्यावाइटासाठीं अनन्यभावे अवलंबून राहण्याकडे जी दृढप्रवृत्ति आहे, ती किती दूष्य व हितविघातक आहे, तें त्यांच्या चांगलें ध्यानांत येऊन ते स्वपराक्रमावर अवलंबून रहाण्यास शिकतील.

***

# ३२ अन्नोदकव्यवहार-निर्बंध

(१८९४ सालच्या ठाणें येथील वक्तृत्व समारंभांत वाचलेला निबंध.)

## उपोद्घात

पाश्चिमात्य राष्ट्रांशीं आमचें अनेक प्रकारीं संघटण होऊन त्यांचे विचार व त्यांचे आचार आमच्या अवलोकनांत येऊ लागल्यापासून आमच्या चालीरीतींत दोष कोणते व गुण कोणते तें आम्हांस कळूं लागलें. युरोपीय राष्ट्रांत सुरू झालेल्या विचारयुगांचा अंमल आमच्या ह्या विस्तीर्ण देशावरही हळू हळू होऊं लागला आहे. अशा समयास जर आपण आपल्या ठायींचे दोष काढून टाकण्याचा प्रयत्न करण्यास कंबर बांधणार नाही, तर सांप्रत चालू असलेल्या जीवनार्थ-कलहामध्यें आमची धडगत लागेलसें मला वाटत नाहीं. आमच्या ज्या कित्येक संस्था पुरातन काळापासून चालू झाल्या आहेत, त्यांच्याविषयीं आमच्याठायीं एक प्रकारचें वेडे प्रेम नांदत आहे. तें कांहीं चांगलें नव्हे. अशा वृत्तीस्तव आम्हांस पाश्चात्यजन पुरातनप्रिय म्हणतात. आतां पुरातन गोष्टीविषयीं आपल्या चित्तांत प्रेम वागूं नयें असें कोण म्हणेल? पण ते प्रेम आंधळे नसावें. प्रेमविषयक गोष्टींच्या ठायी जर काही सदोषता असली तर ती प्रांजलपणें कबूल करून, ती सदोषता होईल तेवढीं कमीं करण्याविषयीं झटणे हें विचारीं पुरुषास उचित होय. कारण, ह्या सदोषतेमुळें आपल्या समाजाचें अनेक प्रकारीं अहित होण्याचा संभव असतो; आणि अहिताची हरएक गोष्ट टाळणें हें दूरदर्शी जनाचें परम कर्तव्य होय. आपल्या आजच्या विषयाचा प्रश्न ज्या एका संस्थेमुळे उपस्थित झाला आहे, तो अत्यंत सदोष व अहितकर आहे हें प्रत्येक विचारी पुरुष कबूल करील. हल्ली प्रचलित असलेल्या जातिभेदाचे मंडन करणारे लोक आमच्या इकडें हळू हळू कमीच होत चालले आहेत. ज्यांच्या मनावर विद्येचा मुळीं कोणत्याही प्रकारचा संस्कारच कधी झाला नाहीं, असेच लोक कायते ह्या संस्थचें मंडन करीत असतील. पण अशांपैकींही जे कित्येक जरासे समंजस असून दुरभिमानी नसतात, अशांस शांतपणें

नीट समजावून सांगितल्यास त्यांना लागलीच ह्या संस्थेचा घातकपणा कळून येतो, असो. प्रस्तुत समारंभ घडवून आणणारांनां ह्या संस्थेविषयीं अशा प्रसिद्धपणें ऊहापोह करण्याचें धैर्य होऊन आज हा विषय त्यांनीं भाषणास ठेविला याबद्दल त्यांचें मी अभिनंदन करून मनापासून आभार मानितो.

## विषयस्वरूपनिरूपण

जातिभेदामुळे मुख्यतः तीन गोष्टींविषयी निर्बंध अस्तित्वांत आले आहेत. (१) अन्नोदकव्यवहारसंबंध; (२) विवाहसंबंध; आणि (३) स्पर्शास्पर्श, ह्यापैकीं आज आपणास पहिल्या गोष्टांचाच तेवढा विचार करावयाचा आहे; आणि मला वाटतें ह्या एका गोष्टीचा विचार केल्यावर दुसऱ्या दोन गोष्टींचा लागलाच निकाल लागेल. अन्नोदकव्यवहारसंबंधी निर्बंध हे जातिभेदाचें केवळ जीवनरूप होत. त्यांचें अप्रयोजकत्व सिद्ध होऊन तें मोडण्याचें कांहीं सोपे उपाय सुचविल्यानें ह्या जातिभेदरूप प्रचंड व जरठ-विषवृक्षाच्या मुळाशीच कुठारप्रयोग केलासें होईल.

तेव्हां, आपणास प्रथमतः अन्नोदकव्यवहारसंबंधी नियमांचें इष्टानिष्टत्व सिद्ध करावयाचें आहे. म्हणजे अर्थात् त्यापासून जे कांहीं बरेवाईट परिणाम आमच्या समाजावर झालें आहेत व सांप्रत होत आहेत, त्यांचा विचार करून हे इष्टानिष्टत्व ठरवावयाचें. हा एक विचार झाल्यावर, मग ही संस्था कायम राखून तिच्या सर्व निर्बधांचें परिपालन केल्यावाचून गति नाहीं किंवा कसें तें पाहिलें पाहिजे. दिपक देणारांनी योजलेल्या 'अवश्य' या शब्दचा अर्थ मी येथें असा करितों कीं, जरी वादविषयकनिर्बंध अप्रयोजक व अनिष्ट ठरले तरी कोणत्याना कोणत्या इतर कारणामुळें ते आम्हांस पाळावेच लागणार. म्हणजे अर्थात् धर्म, राजा किंवा लोक यांच्या भीतीमुळें त्यांचे अनुसरण करणें आम्हांस अवश्य झालें आहें किंवा कसें याचें विवेचन करावयाचें. एवढें करून मग वादविषयक निर्बंध अनिष्ट व अनावश्यक आहेत असें सिद्ध झाल्यास ते मोडण्याचें कांहीं उपाय सांगावयाचे. परंतु ते इष्ट व आवश्यक आहेत असें ठरल्यास विषय येथेंच आटपला. असो. तर ह्याप्रमाणें विषयोपन्यास करून आतां पुढील विवेचनास लागूं.

## निर्बंधांचें इष्टानिष्टत्व

**कारण मींमासा–** कोणत्याही गोष्टीचें इष्टानिष्टत्व ठरवितांना ती गोष्ट अस्तित्वांत यावयास कारणें काय झाली तें प्रथमतः पाहावे लागते. ज्या कारणांमुळें ती गोष्ट उत्पन्न झालेली असते, तीं कारणे जर सांप्रत चालू असतील तर तत्परिणामभूत गोष्टही

कायम राहिली पाहिजे, म्हणजे ती इष्ट समजली पाहिजे. अन्नोदकव्यवहारसंबंधी निर्बधांसही हाच नियम लागू आहे. यास्तव हे निर्बंध कोणकोणत्या कारणांनी उपस्थित झाले ते प्रथमतः पाहूं.

**१. मूळ जातीची भिन्नता :**–आर्य लोकांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला तेव्हां येथें अगोदर येऊन राहिलेला व कांहीं मूळच्याच अशा जाती होत्या. त्यांशीं त्यांचें वेळोवळां युद्धप्रसंग झालें. ह्या निरनिराळ्या जाती परस्परांचा अत्यंत द्वेष करूं लागल्यामुळें व आर्य जाती आपणांस इतरांहून श्रेष्ठ गणीत असल्या कारणानें त्या इतरांस सर्वप्रकारें अव्यवहार्यं समजू लागल्या. आर्य लोक येथल्या मूळच्या लोकांस दस्यू म्हणत. ह्या दस्यूंविरुद्ध आपल्या उपास्य देवतांपाशीं आर्यानी केलेल्या पुष्कळ प्रार्थना ऋग्वेदांत आढळतात. पुढे ह्या दस्यूंपैकी ज्या कित्येक जाती आर्यांचा ताबा स्वीकारून त्यांचे केवळ अंकित झाले त्यांच्यांशी आर्यांचें कित्येक व्यवहार सुरू झालें. ह्या अंकितवर्गास पुढें दास किंवा शूद्र ही संज्ञा प्राप्त झाली. पुढें पुढे तर मन्वादि धर्मशास्त्रकारांनीं शूद्रवर्णाशीं रोटीबेटी व्यवहाराविषयी मोकळीक दिल्याचीही वचने आढळतात. यावरून उघड होतें कीं, आर्यांच्या तीन वर्णाचा आपल्या दासवर्गाशीं म्हणजे शूद्रवर्णाशीं पुष्कळ सलोखा झाल्यावर तें आपआपले पूर्वीचें वैमनस्य व दुजाभावहीं विसरून गेले. हा असा इष्टप्रकार एकवेळ घडला असून, हल्ली तद्विरुद्ध स्थिति असण्याचें प्रयोजन काय? आजला निरनिराळ्या जातींमध्ये येथील जमिनीच्या मालकीसाठी किंवा राजसत्तेसाठी संग्राम होत आहेत काय? जर नाहींत, तर तन्मूलक जो दुजाभाव व द्वेष तो अजूनही कां कायम राहावा? आणि जर तो अप्रयोजक आहे तर मग त्यापासून उद्भवलेले अन्नोदकव्यवहारसंबंधी निर्बंध तरी कां कायम राहावे? तेव्हां ह्या एका कारणाच्या दृष्टीनें पाहतां हे निर्बंध इष्ट नव्हत हें स्पष्ट झालें.

**२. भाषाभेद :**–निरनिराळ्या जाती निरनिराळ्या भाषा बोलत असल्याकारणानें परस्परांचे आचारविचार व समजुती परस्परांस समजण्याची पंचाईत असते. ह्यासाठी एक जात दुसऱ्या जातीला अव्यवहार्य व नीच समजते. आपल्या ह्या देशात ब्राम्हणांच्या जाती जवळ जवळ दोन हजार आहेत. त्यांपैकीं पुष्कळ केवळ ह्या भाषाभेदामुळेंच प्रारंभी उत्पन्न झाल्या आहेत. परंतु पुढें यवनीअंमल बहुतेक सर्व ठिकाणीं होऊन हिंदुस्थानी भाषेचा प्रचार चोहोंकडे झाला. तेव्हां भाषाभेदामुळें परस्परांपासून अलग राहिलेल्या कित्येक जातींस परस्परांविषयीचें थोडेबहुत ज्ञान होण्याचा मार्ग खुला झाला. यामुळें कित्येक जाती दुसऱ्या जातींशी अन्नोदकव्यवहार करण्यास फारसा

संकोच बाळगीतनातशा झाल्या. परंतु त्यांच्यामध्यें बेटीव्यवहार मात्र अजून सुरू झाला नाही. तरीपण, कित्येक जाती अशा हेकट आहेत कीं, त्यांना आपल्या नांवाच्या दुसऱ्या जाती आपल्या सारख्याच आचाराविचारांच्या आहेत, असें पक्के कळले असतां देखील त्यांच्याशी अन्नोदकव्यवहार ठेवण्यास त्या काकू करतात. याचें कारण येवढेंच कीं, त्यांच्यावर पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या समजुतींचा संस्कार फारच दृढ झाला आहे. हल्ली हा संस्कार नाहीसा करणारें शिक्षण परस्थांच्या साहाय्यानें मिळत आहे. शिवाय त्यांची जी इंग्रजी भाषा तिचा प्रसार हळूहळू सार्वत्रिक होत चालला आहे. यामुळें कालेंकरून परस्परांमधील गैरसमज व खोटे ग्रह निघून जातील असा दृढ संभव आहे. हा इष्ट परिणाम इल्लींही आपल्या देशांत पुष्कळ दिसूं लागला आहे, हें सुचिन्ह होय. तेव्हां तात्पर्य काय कीं, केवळ भाषाभेदामुळें उत्पन्न झालेले अन्नोदकव्यवहारसंबंधाचे निर्बंध अप्रयोजक असून फार काळ टिकणारे नव्हत.

**३. स्थलभेद** :–एकच जात निरनिराळ्या ठिकाणीं राहिल्या कारणानें तिच्यामध्यें पोटविभाग झालेले पुष्कळ आढळतात. उदाहरणार्थ, आपल्या इलाख्यांतील ब्राम्हणांचें निरनिराळें भेद घ्या. देशावर राहणारें म्हणून देशस्थ व कोकणांत रहाणारे म्हणून कोकणस्थ. गुजराथेंतल्या नागर ब्राम्हणांतील पाटभेदही असेच उत्पन्न झाले आहेत. केवळ स्थलभेदानें परस्परांस अव्यवहार्य समजणें म्हणजे किती वेडगळपणाचें काम आहे? पूर्वी जेव्हां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याच्या सोई चांगल्याशा नसत, तेव्हां ही समजूत कांहींशी क्षम्य होती. पण हल्लीं हिंदुस्थानांतील कोणत्याही ठिकाणीं अगदीं थोड्या अवकाशांत येण्याजाण्याचीं सोय झाली असतांही मूळची समजूत कायम राहावी हें कोणास तरी समंजसपणाचें वाटेल काय? कधींही वाटणार नाहीं.

**४. आचारभेद :**–निरनिराळ्या जातींचें आचार निरनिराळ्या प्रकारचें असल्या कारणानें त्या परस्परांस अव्यवहार्य समजतात. कांहीं जातींच्या चालीरीती फारच हेंद्र्या व घाणेरड्या असल्यामुळें त्यांच्याकडे खाण्यापिण्यास दुसऱ्या जातींस किळस वाटतो, हें खरें आहे. पण ज्या जातींचें आचार बहुतेक सारखेच आहेत, त्यांनीं एकमेकांस अव्यवहार्य कां समजावें बरें? उदाहरणार्थ, ब्राम्हणांच्या बहुतेक जातींचे आचार शुद्ध असतां त्यांनीं एकमेकांकडे खाण्यापिण्याविषयीं संकोच कां बरे धरावा? त्याचप्रमाणें इतर पांडरपेशांच्या जातीविषयीं पाहतां त्यांचे आचार बहुतेक सारखेच असतात. मग त्यांस एकमेकांकडे खाण्यापिण्यास कां म्हणून हरकत वाटावी बरें? निदान एकाच जातीच्या पोटविभागांनीं तरी हा परस्परांमधला भेद काढून टाकणें इष्ट नव्हें काय?

जेव्हां परस्परांचें आचार नीट समजण्याचीं अडचण होती तेव्हां हा भेदभाव ठीक होता. पण हल्लीं परस्परांविषयीं पुष्कळ ज्ञान होऊन अनेक प्रकारें एकमेकांचें संघटन होत असतां मूळची अढी कां म्हणून कायम रहावीं बरें? आतां ज्यांचें आचार आपणांस घाणेरडे वाटतात, तें तसे खरोखरीच आहेत काय याविषयीं तरी बारीक शोध कितीसा लोक करतात बरें? शिवाय त्यांच्यासारख्याच दुसऱ्या कांहींतरी अशा चाली आपल्यांत असतील कीं, त्या इतरांच्या दृष्टीनें हेंद्र्या व तिरस्काराई असतील, असा कांहीं विचार ज्या त्या जातीनें करणे उचित होय. कोणत्याही जातीचे सर्वच आचार परमशुद्ध असतील असें विधान करण्याचें धाडस कोणाच्यानें तरी करवेल काय? मग हा वृथा बोल व खोडसाळपणाचा सोवळेपणा मिरविण्यांत काय शहाणपणा आहे? आणखी असें कीं, ज्यास आपण आचारांच्या अमंगलतेस्तव अव्यवहार्य समजतो, त्यांची तीं अमंगलता गेली असतां त्यांच्याशीं अन्नोदकव्यवहार करण्यास संकोच कां बरे असावा? शिवाय अशा आचारांच्या अशुद्धतेमुळें नीच मानलेल्या जातीस अव्यवहार्य समजून त्यांचा तिटकारा करण्यापेक्षां त्यांची त्या आचाराच्या संबंधानें सुधारणा करण्यास झटण्यांत माणूसपणा अधिक आहे. पण असा प्रयत्न आपणांस उच्च समजणाऱ्या जातींनीं कधीतरी केला आहे काय? असो. तर एकंदरींत काय कीं, केवळ आचारभिन्नतेस्तव परस्परांनीं परस्परांस अमंगळ समजणें केवळ अन्याय आहे.

**५. धर्मविषयक मतभेद :**–एकाच नांवाच्या जाती धर्मसंबंधी निरनिराळ्या मतांचा अंगीकार करून परस्परांपासून अलग झाल्याच्या योगानें हे अन्नोदकव्यवहारसंबंधांचें निर्बंध कित्येक ठिकाणीं उपस्थित झाले आहेत. आपल्या ह्या हिंदुसमाजांत अनेक धर्ममतें निःनिराळ्या काळीं प्रचलित होऊन त्यांचे अनुसरण करणारें लोक एकमेकांचा तिरस्कार व द्वेष करू लागले. त्यामुळे तें परस्परांस सर्वप्रकारें अव्यवहार्य समजू लागलें. पण बहुतेक धर्ममतांचा आधार वेदांवर असून त्यांचा स्वीकार करणाऱ्या लोकांच्या चालीरीतीत म्हणण्यासारखा कोणताही फरक पडला नाहीं. असें असतां केवळ मतीभिन्नत्वास्तव परस्परांमधील अन्नोदकव्यवहार बंद व्हावे, हें कोणास हीं समंजसपणाचें वाटत नाहीं. मतभेदास्तव परस्परांत कलह उत्पन्न होऊन तें अशा विकोपास जाणें म्हणजे परमतासहिष्णुतेची कमाल झाली समजावयाची. सर्वच जेथे अज्ञेयत्वाचा प्रकार व मोठमोठें तत्वज्ञांसही 'नेति नेति' या वचनावरच निर्वाह करावा लागतो, त्या–अदृष्टाविषयीं निरनिराळ्या लोकांनीं वाटतील तसें तर्क करावें, आणि त्यांच्या सत्यत्वाच्या अभिमानानें एकमेकांशीं भांडत बसावें व एकमेकांस नीच किंवा

तिरस्कार्ह समजावें, हें कोणाही समंजस मनुष्यास योग्य वाटणार नाही. तेव्हां अशा ह्या मानीव भेदास्तव परस्परांशीं अन्नोदकव्यवहार बंद पाडावे हें मुळींच इष्ट नव्हे.

६. **उद्योगभेद** :–निरनिराळ्या जाती निरनिराळें उद्योग करीत असल्याकारणानें त्यांच्यामध्यें एकमेकांविषयीं उच्चनीचत्वाचा भाव उत्पन्न होऊन वादविषयक निर्बंध उत्पन्न झाले आहेत. कित्येक धंदे जरासे मलीनपणाचे व ओंगळ असल्यामुळें त्यांचें अवलंबन करणारांकडे खाण्यापिण्यास दुसऱ्या जातीस संकोच वाटणें साहजिक आहे. पण हा संकोच केवळ अज्ञानमूलक आहे. कारण, अशा लोकांनीं शिजविलेले अन्न किंवा आणलेले पाणी रोगकारक किंवा विषमय असतें असें कोण म्हणेल? असा जर कांहीं खरोखरीच प्रकार असतां तर तें धंदे चालविणारें लोक कधींच ह्या जगातून नाहींसे झालें असतें; आणि असें घातक धंदे कोणीही केले नसतें. दुसरें असें कीं, जे धंदे मनुष्याच्या वास्तविक सुखास कारणीभूत होणारे असतात, व ज्यांच्या अभावीं मनुष्याचें पुष्कळ अडण्यासारखें असते, असें धंदे चालविणारांस नीच, अव्यवहार्य समजून त्यांचा तिटकारा करणें हें केवढें वाईट आहे. जो केवळ प्रामाणिकपणानें खपून मनुष्यसुखांत भर घालीत आहे, त्यांस हीन व अमंगळ मानणाऱ्या मनुष्यांस मी कधींही समंजस म्हणणार नाही. आमच्या हिंदूसमाजाचें जातीभेदामुळें जें अनेक प्रकारचें नुकसान झाले आहे, त्यांत ह्या वेडगळपणाच्या व घातक समजुतीनें जेवढी भर पडली आहे, तितका दुसऱ्या कशानेही नसेल. तेव्हां ही अनिष्ट समजूत आमच्या लोकांच्या मनातून समूळ नाहीशीं झाली पाहिजे; आणि ती जसजशी कमी होत जाईल तसतसा आमचा समाज सुधारत जाईल. हल्लीं ह्या समजुतीच्या उलट पुष्कळ लोकांचें आचरण होत आहे; पण तें केवळ एकपक्षीय आहे. पुष्कळ नीच मानलेले धंदे आपणांस उच समजणाऱ्या जातींतील इसम निरुपायास्तव किंवा पूर्वीपासून चालत आलेल्या निषेधाच्या अप्रयोजकपणाविषयीं खात्री झाली म्हणून चालवीत आहेत. पण येवढेंच करून त्यांनीं राहू नयें, तर असें तें धंदे त्यांनी बिनदिक्कत स्वीकारले आहेत, तसेंच त्यांनीं अन्नोदकादिव्यवहारही त्या धंद्याहून हीन मानलेल्या जातींशी सुरू करावें. तेव्हां एकंदरींत काय कीं, हल्लीचा काळ असा झाला आहे कीं, पूर्वीसारखा सोंवळेपणा करून आतां कांहीं चालावयाचें नाहीं. उदरनिर्वाहासाठीं जो सांपडेल तो धंदा आमच्या लोकांनीं करण्यास तयार असलें पाहिजे; आणि दारिद्र्यामुळें ते आज ह्याप्रमाणें तयारहीं होत आहेत. मग निरनिराळ्या धंद्यांमुळे उपस्थित झालेला भेदभाव कायम ठेवण्यांत स्वारस्य तें कोणतें?

**७. भक्ष्यभेद :–**आपल्या देशांत बौद्धधर्माचा प्रसार झाल्यापासून 'अहिंसा परमोधर्मः' या तत्वाचा कित्येक ब्राम्हण वगैरे जातींवर प्रभाव होऊन त्यांनीं मांसाहाराचा त्याग केला. तेव्हां अर्थात् मांसभक्षक जातींशी त्यांचें अन्नोदकादि व्यवहार बंद पडले. हल्लीं हीं स्थिति पुष्कळ ठिकाणीं कायमचीं होऊन गेली आहे. मांसमत्स्यादि प्राणिजअन्नाविषयीं ब्राम्हणादि कित्येक जातींच्या ठायीं अत्यंत अप्रीति व किळस ही उत्पन्न झाली आहेत. त्यांना मांसाहारी जातींच्या हातचें पाणीसुद्धा घेणें ओंगळवाणें वाटतें. मग अन्नादिकांचें सेवन कोठचें! ही जी त्यांची वृत्ति झाली आहे तीं सहसा पालटणें नाहीं. हल्ली कित्येक ब्राम्हण मांसमद्यादिकांचे सेवन करूं लागल्याचा बोभाटा आहे खरा, तथापि अशा व्यक्ति फारच थोड्या आहेत. आणि त्यांच्याकडून जरी असें त्यांच्या जातीनं निषिद्ध मानलेले कर्म घडत आहे, तरी तें तें उघडपणें करण्यास कधींही तयार व्हावयाचें नाहीत; आणि असें त्यांच्याकडून घडत असले तरी, तें इतर जातींशी अन्नोदकव्यवहार उघडपणें करण्यास कधींही तयार व्हावयाचें नाहीत. आतां, येथें एक गोष्ट अशी सांगण्यासारखी आहे कीं, मांसाहारी जातींकडचें अन्न सेवन करण्यास मांसाहारनिवृत्तजन जरी आज तयार नाहींत, तरीं कालेंकरून त्यांच्या मनातला हा तिटकारा व किळस जाण्याचा संभव आहे. तूर्त पाहिलें तरी अशा किती वस्तु आहेत कीं, ज्या मांसाहारी व अगदीं अमंगळ मानलेल्या जातींनीं तयार केलेल्या असून आमचीं ब्राम्हणमंडळी बिनदिक्कत खात आहे? उदाहरणार्थ साखर घ्या. ही तयार करण्यास तर गुरांडोरांचीं हाडे लागतात. पण ती आमच्या सोवळ्या जातीस उपासाचें दिवशींसुद्धा चालते. युरोपातून आलेल्या औषधांच्या अर्काविषयी, चूर्णांविषयीं तर बोलावयासच नको. त्याचप्रमाणें खजूर, खारका, बेदाणा, द्राक्षे वगैरे पदार्थांचेही सेवन आमच्या बाम्हणांस निषिद्ध वाट नाहीं. परंतु ते पदार्थ कोठें, कसें व कोणाच्या हातून तयार होऊन दुकानांत विकावयाला येतात, याचा कधीं त्यांच्याकडून विचार होतो काय? पण विचार करून करितील काय? त्या पदार्थावाचून चालेल तर ना? तुपांत चर्बी मिसळतात अशा विषयींचा बोभाटा तर सरकारापर्यंत होऊन चुकला आहे. तरीपण आमच्या मांसाहार न करणाऱ्या जातींनीं तें वर्ज केलें आहे काय? अशी जर वास्तविक स्थिति आहे, तर मग मांसाहार करणाऱ्यांच्या हातचें अन्न खाण्यासंबंधानेंच तेवढें सोवळें करण्यात काय अर्थ आहे?

**८. नीतिभ्रष्टता** :–एकाद्या मनुष्याकडून कोणतेही अनन्वित कर्म घडलें असतां त्यास जातिबहिष्कृत करण्याचा परिपाठ आमच्या लोकांमध्ये अगदीं पुरातन काळापासून

चालत आला आहे. अशा बहिष्कृत लोकांचीं मग स्वतंत्र जात होऊन रहात असे. जारकर्म, अमेध्याहार वगैरे कित्येक कर्मे लोक अत्यंत निंद्य मानीत असल्याकारणानें तो करणारांस जातीबाहेर काढल्यावर मग त्यांस प्रायश्चित देऊन शुद्ध करून घेण्याचीं सवड मुळींच ठेविलेली नसें. त्याचप्रमाणें अनुलोम व प्रतिलोम या नांवानीं प्रसिद्ध असलेला वर्णसंकर व जातिसंकरही सर्व प्रसिद्धच आहे. हा भेद उत्पन्न होण्यास मुख्य कारण पाहू जातां परजातीशीं विवाहसंबंध किंवा इतर प्रकारचा अनन्वित शरीरसंबंध झाला असतां तो धर्माभिमानी व जात्यभिमानीं जनांस मुळीच खपत नसें. असा अनन्वित व्यवहार करणारास तें आपल्या जातींतून बाहेर काढीत; व त्यांनीं कितीही प्रखर प्रायश्चितें केली तरी तें त्यांचा पुनः अंगीकार करीत नसत. हा निर्बंध प्राचीनकाळीं कदाचित् हितकर झाला असेल, परंतु हल्लीं त्याचें प्रयोजन मुळींच दिसत नाहीं. जारकर्मादि जें गुन्हे समाजसुखविघातक आहेत, त्यांचा प्रतिकार सरकाराकडून चांगल्याप्रकारें होत आहे. दुसरें असें कीं, एका विशेष अनीतिप्रकारासबंधें एवढा कडकपणा दाखवून इतर अनीतीच्या गोष्टींविषयीं उदासीन रहाण्यांत अर्थ काय? बहिष्काराचें भय जर घालावयाचें तर तें सर्व दुराचारांबद्दल घालणें रास्त आहे. पण असा प्रकार तर मुळींच नाहीं. आणखी येथें ही एक गोष्ट लक्षांत आणण्यासारखी आहे कीं, आपल्या जातीचा मनुष्य कितीही दुष्ट, दुराचारी व दुर्व्यसनी असला, तरी तो आपल्या पंक्तीस बसून जेवण्यास हरकत नाही. पण त्यानें एकाद्या भलत्याच जातीशीं शरीरसंबंध केला असतां तो एकदम बहिष्कृत होतो, यांत कोणती नीति आहे तें समजत नाही. शिवाय, असें पाहां कीं, कोणीं काहीं निषिद्ध मानलेलें कर्म केल्यामुळें बहिष्कृत झाला समजा. पण त्याच्या एकंदर वंशजांनाही तो डाग लावण्यांत काय अर्थ आहे? एकाद्या खुनी माणसास सुळावर चढविल्यावर आणखीं त्याच्या साऱ्या निरपराध वंशजांसही सुळावर चढविण्याचें कोणीं राजानें धाडस केल्यास त्याला आपण अन्यायीं नाहीं का म्हणणार? आणि सदरील बहिष्कार पद्धति तरी ह्याच मासल्याची आहे असें आपणांस नाही का वाटत? असो; तर एकंदरीत काय कीं, हे नीति भ्रष्टतेचें कारणहीं केवळ पंगूच होय. यांत मूळ जातिमत्सर व जातिद्वेष यांचाच अंमल विशेष दिसतो. अनीति प्रतिकार मुळींच दिसत नाहीं.

आतापर्यंत अन्नोदकव्यवहारसंबंधीं नियम ज्या कारणांनीं उडवलें आहेत त्यांपैकी कांहीकांचे विवेचन अगदीं संक्षेपानें केलें. त्यावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल कीं, त्या कारणांमध्ये म्हणण्यासारखा जीव तूर्तकाळी मुळींच उरला नाहीं; व हल्ली तरी ती बहुतेक कारणें अप्रयोजक व अगदीं निर्बल झालीं आहेत. तेव्हां त्यांचे कार्यरूप जे

हे अन्नोदकव्यवहारसंबंधीं निर्बंध त्यांचें प्राबल्य तरी हल्ली कां असावें? आणि तें इष्ट आहेत असें कोण म्हणेल?

## आरोग्यदृष्ट्या इष्टानिष्टत्व

आतां हे निर्बंध आरोग्याच्या दृष्टीनें इष्ट आहेत किंवा कसें तें पाहूं. प्रथमतः आपण असें पाहा कीं, निरनिराळ्या जाती निरनिराळ्या प्रकारें आपआपले अन्न शिजवितात, असें क्षणभर गृहित धरिलें तरी त्यापासून कोणाएका जातीचें आरोग्य कमी होऊन ती जात लवकर मरते, असें कोणाच्यानें तरी म्हणवेल काय? जर नाहीं, तर मग परस्परांकडे अन्नादेक सेवन करण्यास काय हरकत आहे? पण वास्तविक पाहतां आमच्या हिंदुलोकांच्या निरनिराळीं पक्वानें करण्याच्या पद्धति बहुतकरून एकच आहेत. पुनः निर्मळपणाच्या संबंधानें पाहताहीं असें शिजविण्याच्या चाली एका जातीच्या दुसऱ्या जातीहून म्हणण्यासारख्या कमीजास्त हेंद्र्या असतात असें फारसें आढळत नाहीं. कित्येक खालच्या प्रतीच्या मानलेल्या जातींत भाड्याकुंड्याच्या वगैरें संबंधानें म्हणण्यासारखीं स्वच्छता नसतें हे खरें. पण अशा जाती सोडल्या, तरी बाकीच्या जातींनी तरी आपआपसांत अन्नोदकव्यवहार चालविण्यास काय हरकत आहे, तें आरोग्याच्या दृष्टीनें तरी कांहीं कळत नाहीं. असें समजा कीं एका मराठ्यानें चांगलें स्वच्छ स्नान करून चांगलें स्वच्छ वस्त्र परिधान केलें आणि भांडे घासून, धुऊन, स्वच्छ करून तें चुलीवर ठेवलें, आणि त्यांत स्वच्छ पाणी व चांगले निवडून धुतलेलें तांदूळ घातले; आणि मग खालीं जाळ करून भात शिजविला; व तो त्या मराठ्यानें आपल्या स्वच्छ हातांनीं एका स्वच्छ पानावर वाढला, तर तो एकाद्या ब्राम्हणास खाण्यास आरोग्याच्या दृष्टीनें कोणतीं हरकत आहे तें कळत नाहीं. तेव्हां निरनिराळ्या जातींनीं परस्परांकडे जेवल्यानें त्यांच्या आरोग्यास मुळींच अपाय होणार नाहीं हें कोणासही सांगण्याची आवश्यकता नाहीं. आणि अन्नाचा जर आपलें आरोग्य कायम ठेवण्याशींच कायतो संबंध आहे, तर त्याच्यासंबंधानें व्यवहारांत असलेले निर्बंध केवळ अप्रयोजक आहेत असें कोणास बरें वाटणार नाहीं?

## नितिदृष्ट्या इष्टानिष्टत्व

आतां नीतीच्या दृष्टीनें ह्या निर्बंधांचीं कितपत इष्टता आहे, याचा थोडासा विचार नितिभ्रष्टत्तेचें कारण सांगतांना आपण केलाच आहे. पण या मुद्याचें दुसरें एक अंग आहे, त्याचाही विचार होणें इष्ट आहे. असें पाहा कीं, आपण एकाद्या मनुष्यास नीच,

हीन किंवा अव्यवहार्य असें जें समजतों त्यांस कांहींतरी सबळ कारण असलें पाहिजे. एरवी त्यांस तसें मानण्यास कोणासही अधिकार नाहीं. अमुक एक मनुष्य अमुक एका कुळांत जन्मला म्हणून तो श्रेष्ठ व दुसरा कोणी दुसऱ्या एकाद्या कुळांत जन्मला म्हणून तो नीच, अशी जी आमच्या लोकांची समजूत होऊन गेली आहे, तीं अगदीं वाईट आहे. येणेंकरून मनुष्याचा आपण विनाकारण तिटकारा करितो असें होते. कोणत्याही मनुष्याचीं बरीवाईट योग्यता त्याच्या स्वतःच्या वर्तनावरून धरिली पाहिजे. त्याचा बाप किंवा आई अशी होतीं, किंवा त्याच्या खापरपंज्यानें असें असें कर्म केलें होतें, म्हणून तो नीच व हलकट समजणें मोठा अन्याय आहे. पण हा अन्याय आमच्या समाजांतील मोठे शहाणे म्हणविणारे सुद्धां बिनदिक्कत करताहेत. हा प्रकार खरोखरीच मोठा लाजिरवाणा आहे. अहो, जें गटारांत किंवा उकिरड्यावर फिरून किंवा लोळून आले असतें, व ज्यानें नुकताच एकादा उंदीर किंवा पाल खालेली असतें, अशा मांजरास जेवतांना आपल्या मांडीवर बसविण्यास किंवा त्यांस अगदीं आपल्या ताटाजवळ भात खाऊ घालण्यास ब्राम्हणास कांहीं वाटत नाहीं. पण, त्याच जेवणाच्या ब्राम्हणास एकादा परजातीचा गृहस्थ शिवला असतां तें अन्न विटाळावें आणि त्यानें जेवण टाकून उठावे, ह्यांत कांहींतरी माणूसपणा आहे काय? तो परजातीचा मनुष्य त्या हेंद्र्या ओंगळ मांजरापेक्षाही नीच झाला काय? ह्यांत एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याचीं विनाकारण बेअदबी केल्यासारखें नाही का होत? दुसरें असें पाहा कीं, ज्यास व्यवहारांत नीचेतर मानतात असा अनाचार करण्यास कधीं मागें न घेणारा असा इसम केवळ आपल्या जातीचा आहे येवढ्याच कारणावरून आपल्या पंक्तीस बसून जेवण्यास हरकत नाहीं, किंवा त्यानें रांधलेलें अन्न व आणलेलें पाणी घेण्यास मुळींच दिक्कत वाटूं नये. पण तोच एकादा परजातीचा ग्रहस्थ चांगला पापभीरू व सदाचारी असला तरी त्याच्या हातचे पाणी घेण्याससुद्धा संकोच वाटावा, यासारखा वेडगळपणा व अप्रयोजकपणा दुसरा कोणता तरी असेल काय? असो; तर एकंदरींत कायकीं, अन्नोदकव्यवहारासंबंधीं निर्बंधांनीं नीतीचें रक्षण म्हणण्यासारखें मुळींच होत नसून तिचा भंगच पुष्कळप्रकारीं होत आहे.

## ऐक्यदृष्टया इष्टानिष्टत्व

ऐक्याच्या दृष्टीनें पाहतां तर वादविषयक निर्बंधांचा अनिष्टपणा तेव्हांच स्पष्ट दिसणारा आहे. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याहून कोणत्याही बाबतीत स्वतांस निराळा मानूं लागल्यानें, त्या उभयतांमध्ये एक प्रकारचा दुजाभाव उत्पन्न होणें साहजिक आहे. मग त्या दोघांमध्ये

कलह व बखेडे माजून तें एकमेकांस पाण्यांत पाहूं लागतात. आमच्या समाजांत रोटीबेटीव्यवहार संबंधाचें सांप्रत चालू असलेलें निर्बंध जेव्हांपासून प्रचारांत आले, तेव्हांपासून आमच्यामध्यें दुफळी होऊन आम्ही एकमेकांचा द्वेष मत्सर वगैरे करूं लागलो. जातीजातींमध्यें तंटे लागून आजपर्यंत आमच्या देशाचे केवढे नुकसान झाले आहे याची साक्ष आमचा मागील इतिहास भरपूर देत आहे. आमची हल्ली जी परतंत्रता आहे, तिचें कारण केवळ हे जातिकलह होत, असें स्पष्टपणें दिसत आहे. असें असतां आमच्या लोकांचें अजून डोळे उघडूं नयेत, हें मोठें नवल होय. आजपर्यंत मिळालेल्या बोधाचा आम्ही काहींच उपयोग करूं नये, यासारखा हेकटपणा व अविचारीपणा दुसरा कोणताही नसेल. पण आम्ही करावें काय? पिढ्यानपिढ्यांचें संस्कार आमच्या मनावर इतकें दृढ झाले आहेत कीं, तें जातां जात नाहीत. असो; तर सांगावयाचें काय कीं, आमच्यातला जातिभेद व तन्मूलक परस्परद्वेष व मत्सर हे कायम राहण्यास कारण केवळ वादविषयक निर्बंध होत. तेव्हां हे निर्बंध मोडवतील तितके लौकर मोडण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे. हल्लींच्या काळीं तर आमच्यांत सर्वप्रकारें जूट होणें अत्यावश्यक झालें आहे. ती जर लवकर न होईल. तर सांप्रत चालू असलेल्या प्रचंड जीवनार्थकलहांत आमचा निभाव लागण्याची मुष्कील पडेल. येथे कोणी अशी शंका घेतील कीं, सध्यांचा जातिभेद ऐक्यवृद्धि करण्यास आड येईल म्हणावें, तर आमच्या पेशव्यांनीं अटकेपर्यंत नेऊन झेंडे रोंविले तेव्हां त्यांच्यामध्यें जूट नव्हती काय? ही शंका घेणारास त्या पेशव्यांचा इतिहास शांतपणें, व निःपक्षपातपणें वाचण्याची मी शिफारस करितों, असें त्यानें केलें असतां मराठेशाहीचा अंत होण्यास जातिभेद कितीप्रकार कारणीभूत झाला हें त्यांच्या तेव्हांच ध्यानांत येईल. दुसरें कोणी पुराणप्रियजन अशीं शंका घेतील कीं, एकमेकांनी एकमेकांकडें जेवल्यावांचून त्यांच्यामध्यें ऐक्यभाव वाढणार नाहीं काय? यास उत्तर येवढेंच आहे कीं, अशा लोकांमध्यें ऐक्य उत्पन्न झाले तरी तें अल्पकाळ टिकणारें असून एकादी आपमतलबाची बाब उत्पन्न झाली असतां तें तत्काळ भंग पावून पुनरपि परस्परांमध्यें कलहाग्नि पेटून राहील. ह्यासाठी परस्परांमधला सर्वप्रकारचा भेदभाव मोडून जाऊन त्यांचा एकजीवच होणें इष्ट आहे. आणि हा होण्यास अन्नोदकादिसंबंधाचे ऐक्यविघातकनिर्बंध सर्वस्वी मोडले पाहिजेत. असो, तर तात्पर्य काय कीं, जर आपल्या समाजांत जरा ऐक्यभाव वाढून परस्परांमध्यें खरा स्नेह व प्रीति ही उत्पन्न झालीं पाहिजेत, जर आमच्या ठायीं नि:स्सीम स्वदेशभक्ती व खरी स्वदेशबांधवप्रीति ह्यांचा विकास होऊन तत्प्रेरित होत्साते आम्ही स्वातंत्र्यादि अभीष्ट

गोष्टी संपादण्यास समर्थ व्हावें असें असेल, तर वादविषयक अप्रयोजकपणाचें, वेडगळपणाचें व अन्यायाचें निर्बंध अवश्य मोडले पाहिजेत.

## उत्कर्षदृष्ट्या इष्टानिष्टत्व

आतां ह्या निर्बंधापासून व्यक्तीचें किंवा राष्ट्र कांहीं हित आहे किंवा कसें, तें पाहू गेल्यास प्रतिकूळच अनुभव आपणास मिळतो जातिभेदामुळें मनुष्यास खाण्यापिण्याच्या संबंधानें किती व कसें अडथळे वारंवार येतात हें सांगू लागल्यास पुष्कळच आहे. आणि त्याचा अनुभव निरनिराळ्या धंद्यारोजगारांत मनुष्याला हवा तितका येत आहे. तेव्हां त्याची येथें वाच्यता करण्याची गरज नाहीं. त्याचप्रमाणें आमच्या लोकांस प्रवास करतांना ह्या निर्बंधामुळें ज्या अडचणी येतात. व सर्वप्रकारचीं गैरसोय सोसावी लागतें, तिचाही अनुभव थोडाबहुत प्रवास केलेल्या प्रत्येक इसमास आला असेल. परदेशगमनाविषयीं आमच्या लोकांत जे कांहीं वेडगळपणाचें निर्बंध आहेत, त्यामुळें तर आमचें अनेक प्रकारीं नुकसान झाले आहे. या गोष्टी म्हणजे मी आज आपणांस सांगितल्या पाहिजेत असें नाहीं. ह्या एका अडचणीमुळें आमचा परदेशाशी होणारा व्यापार आमच्या हातांतून अगदीं गेल्यासारखाच आहे; आणि जो कांहीं आहे तो गुमास्तेगिरीचा येथल्या येथें काय होण्यासारखा असेल तेवढा. त्याचप्रमाणें परदेशावलोकन व परदेशातील कला व हुन्नर यांचे ज्ञान आम्हांस या मूर्खपणाच्या निर्बंधामुळे आजपर्यंत केवळ अंतरल्यासारखेच आहे. तेंच जपानकडे पहा. त्यांच्यांत असले अप्रयोजक निषेध नसल्याकारणानें त्यांस परदेशगमन करण्याची सवड मिळताच त्यांनीं आपल्या राष्ट्राचा हरएक प्रकारें उत्कर्ष करण्याचा सपाटा चालविला आहे. हाही आमच्या इकडून कांहीं लोक परदेशी जात आहेत खरें, पण तें कोण? तर ज्यास परत आल्यावर जातीची पर्वा न करितां स्वतंत्रपणें वागतां येईल असें. तेव्हां हा अनिष्ट प्रकार आतां यापुढें चालू राहतां उपयोगीं नाहीं, हें उघड आहे.

### निर्बंध आवश्यक आहेत काय?

आतापर्यंत वादविषयक निर्बंधाची अनिष्टता सिद्ध केली. आतां त्यांची आवश्यकता कितपत आहे याचा विचार करूं. 'आवश्यक' या पदाचा विषयविवेचनाच्या पूर्ततेसाठी मी काय अर्थ केला आहे तें विषयारंभीं सांगितलेंच आहे. तेव्हां त्याची येथें पुनरुक्ति नको. असो. ही आवश्यकता कोणकोणत्या प्रकारीं शक्य आहे त्याचा आतां विचार करूं.

## धर्मभीति

सांप्रत चालू असलेले निर्बंध मोडले असतां धर्माज्ञेचा भंग केल्याचें पातक शिरीं येईल असा कित्येकांचा समज आहे. त्यांना त्या निर्बंधांची अनिष्टता पूर्णपणें कळलीं असलीं तरी तें मोडणे हें धर्मास संमत नाहीं, असें त्यांस वाटत असतें. परंतु आमच्या धर्मांचा पाया ज्या वेदादि पुरातन ग्रंथांवर मुख्यतः आहे, त्यांमध्यें अशा प्रकारचें निर्बंध मुळींच सांगितलेलें नाहींत. फार तर काय, पण त्याकाळीं हल्लींच्या सारखा जातिभेदच मुळीं नव्हता. आजला कमींत कमी एक लाख जाती हिंदुस्थानात आहेत. वेदकाळीं किंवा स्मृतिकाळीं जातीचें येवढें प्राचुर्य मुळींच नव्हतें. मनूनें आपल्या स्मृतीमध्यें केवळ अठरा वर्णांचेंच परिगणन केलें आहे. वेदकाळीं तीनच वर्ण प्रथमत: होते. पुढें शूद्रवर्ण मिळून पुरुषसूक्त ांत केवळ चातुर्वर्णाचीं उत्पत्ति सांगितली आहे. आणि ह्या चार वर्णात अन्नोदकादि व्यवहारसंबंधें आताच्या सारखें निर्बंध मुळींच नव्हतें, असें तत्कालीन ग्रंथांतरीं पाहतों स्पष्ट सिद्ध होतें. मनुस्मृतीतून तर, नापीक इत्यादिकांशी अन्नोदकादि व्यवहार करण्यास पूर्ण मोकळीक असल्याची वचनें आढळतात. अशी स्थिति जर पुरातनकाळी होती व ती धर्मशास्त्रसंमत होती, तर ती आतां सुरू करण्यास प्रत्यवाय तरी कां असावा? असें करण्यास धर्मांची संमति नाहीं म्हणणारांस स्वधर्मज्ञान नाहीं असेंच नाहीं कां म्हणावयाचें?

## राजभीति

धर्मभय नसलें ती राजभय असल्यामुळें रूढ असलेली चाल आमच्यानें मोडवत नाहीं, असें म्हणण्याचें आतां कारणच उरलें नाहीं. आमच्यावर राज्य करणारें परस्थ एतत्संबंधानें अगदीं उदासीन आहेत. येवढेंच नाहीं तर हें आमच्याठायींचें भेदाभेद आपोआप मोडतील तर तें त्यांना इष्टच आहे. पुरातन काळी स्वधर्मी राजे असतांना जशी रूढ असलेली चाल मोडण्याची भीति होती, तसा प्रकार हल्लीच्याकाळीं मुळींच उरला नाहीं. तेव्हां ही सबब कोणीही पुढें करणार नाहीं

## लोकभीति

आती राहतां राहिली लोकभीति. ही मात्र अजून कायम आहे. रूढ असलेल्या चाली विरुद्ध वागण्याचें कोणी धाडस केल्यास लोक त्याचा अनेकप्रकारी छळ करितात. मग ती चाल अगदीं निंद्य व अनर्थावह का असेना! पण जे विचारी असतात, तें अशा भोळ्या लोकांची मुळींच परवा करीत नाहीत. तर जीं गोष्ट आपणांस सत्य, हितकर वाटतें, ती करण्यास तें धैर्यानें पुढें सरसावतात, व त्यांच्या जातिबांधवांनी किंवा

देशबांधवांनी त्यांचा किती छळ केला तरी त्यास जुमानीत नाहींत. पण असें धैर्याचें विचारी पुरुष आमच्या इकडे विरळा त्यांची संख्या जसजशी वाढत जाईल, तसतशी आम्हास उत्कर्षाची कळा येईल. एरवी आम्हांस हल्लीच्या अपकर्ष स्थितींतच रखडत राहिलें पाहिजे. अन्नोदकव्यवहारसंबंधीं निर्बंध मोडण्यास लोकांकडून विलक्षण हरकती येतील, हें खचित आहे. पण ज्यांच्या चित्तांत आमच्या समाजाचा उत्कर्ष व्हावा असे पूर्ण वागत असेल, त्यांनीं हे निर्बंध मोडण्यासाठीं मोठ्या धैर्यानें रात्रंदिवस झटले पाहिजे.

## निर्बंध कसकसे मोडावे

ह्याप्रमाणें अन्नोदकव्यवहारसंबंधाचें निर्बंध अनिष्ट व अनावश्यक आहेत असें सिद्ध करण्याचा आतापर्यंत प्रयत्न केला. आतां हे निर्बंध कसकसे मोडावे तें थोडक्यांत सांगून हा विषय आटोपतो. हे निर्बंध मोडण्याचें उपाय सांगतांना अर्थात् सध्यां जी आमच्या समाजाचीं एतत्संबंधानें स्थिति आहे तीं ध्यानांत चालविली पाहिजे. आमच्या समाजांतील जातींचें मुख्य चार वर्ग करितां येतील. एक वर्ग मांसाहार त्याग करणारांचा, दुसरा मांसाहार करणाऱ्या इतर पांढरपेशे लोकांचा, तिसरा वर्ग मागासलेल्या मांसाहार करणाऱ्या जातींचा व चवथा महारमांग वगैरे मृताहांरी व गोमांसादी निषिद्ध मानलेले पदार्थ खाणारांचा. आतां या चार वर्गाचा विचार करण्यापूर्वी सर्वांस साधारण असा एक उपाय सांगण्यासारखा आहे, तो हाच कीं, त्या निरनिराळ्यां वर्गातील प्रत्येक जातीनें प्रथमतः आपआपसांतले पोटविभाग नाहीस करून एकमेकांकडे अन्नोदक व्यवहार करण्यास सुरुवात करावी. असें करण्यास त्यांस फारसें कठीण पडणार नाहीं. कारण हें पोटभेद केवळ क्षुल्लक कारणांमुळें उत्पन्न झाले असून त्यांच्या आचारादिकांमध्येंही म्हणण्यासारखीं मुळीच मित्रता नसतें. कित्येक पोटभेद तर निव्वळ भाषाभेदास्तव किंवा स्थलभेदास्तव झालेले असतात. अशांनीं आपला निष्कारण भेदभाव एकीकडे ठेवून पुन: एक व्हावें व परस्परांमध्यें हरएक व्यवहार निःशंकपणें चालवावे. अशानें विनाकारण उत्पन्न झालेली फाटाफूट कमी होईल.

यानंतरचा उपाय म्हटला म्हणजे, ज्या जाती मांसाहार करीत नाहींत त्यांनीं परस्पराशीं अन्नोदकव्यवहार करण्यास सुरवात करावी. असाच प्रकार मांसाहार करणाऱ्या पांढरपेशा जातींतही झाला पाहिजे. केवळ धंद्याच्या भिन्नतेस्तव उत्पन्न झालेला भेदभाव त्यानीं आतां विसरावा. आणि परस्परांशीं अन्नोदकव्यवहार, तरी तूर्त सुरू करावा. कारण असें पाहा कीं, त्यांच्या आचाराविचारांत भक्ष्यादिकांमध्यें मुळींच फरक नसतो. असें असतां त्यांनी परस्परांस अव्यवहार्य समजण्यांस काय अर्थ आहे?

मागासलेल्या मांसाहार करणाऱ्या जातीस हीच सूचना करावयाची आणि महार मांगादि अतिशूद्र मानलेल्या जातींनीं वरिष्ठ वर्णाच्या लोकांनी पाडलेला क्रम चालवावा पण हें सारें सुरू झालें पाहिजे ब्राम्हणादि श्रेष्ठ मानलेल्या जातींकडून आजकाल श्रेष्ट मानलेले जन आचरतील तसें नीच मानलेले जन आचरण्यास प्रवृत्त होण्याचा संभव विशेष आहे; आणि ब्राम्हणादि उच्च मानलेल्या वर्गास विद्यादिकांच्या; सहाय्यानें वादविषयक निर्बंधाचं अनिष्टत्व व अनावश्यकत्व स्पष्टपणें कळत आहे. वास्तव, त्यांनींच प्रथमतः इतर वर्णास कित्ता घालून देण्याचें मनावर घेतलें पाहिजे. हा इष्ट फेरफार घडवून आणण्याचें काम प्रत्येक जातीच्या पुढाऱ्यांनी केलें पहिजे. आतां हें पुढारीं नेहमी सुशिक्षित असतात असें नाहीं. तरी ही जुनी पिढी जाऊन तिच्या जागी जी नवी पिढी कालेंकरून येणार आहे, तीं थोडीबहुत सुशिक्षित असून सद्यःस्थितीचा विचार करणारी अशी असणार. ह्या नव्या पिढीच्या लोकांनी मात्र दुरभिमान, पक्षपात, व पुरातन गोष्टींविषयींचें आंधळें प्रेम, ही टाकून देऊन खरें स्वदेशहित कशात आहे तें शुद्ध मनानें पाहून तदनुसार वर्तण्यास धैयानें झटले पाहिजे.

असो, तर ह्याप्रमाणें प्रत्येक जातीच्या पोटभेदांचा निकाल लागून भक्ष्यभेदांमुळें व आचारभेदांमुळे झालेल्या मुख्य चार वर्गातील लोक परस्परांशीं अन्नोदकादिव्यवहार करूं लागलें म्हणजें बराच ऐक्यभाव वाढलासा होईल. आतां यानंतरचा क्रम म्हटला म्हणजें मांसाहारीं जातींत एकोपा होणें हा होय. मागासलेल्या जाती व मांसाहार करणाऱ्या पांढरपेशा जाती, यांच्यांमध्ये भक्ष्यभेद तर म्हणण्यासारखां मुळींच नाहीं. जो भेद आहे तो फत्त आचारांच्या संबंधानें. यांच्यासंबंधानें मुख्यतः असें झालें पाहिजे कीं, जें पांढरपेशांचे आचार शुद्ध व खरोखर कल्याणकारक असतील, त्यांचा अंगीकार मागासलेल्या जातींनीं केला पाहिजे; आणि हें होण्यास हल्लींच्या काळीं फारशी अडचण आहे असें नाहीं. असें झाल्यानें मागासलेल्या जाती व मांसाहार करणाऱ्या पांढरपेशा जातां, एकजीव होऊन परस्परांमध्यें अन्नोदकादिव्यवहार करण्यास त्यांच संकोच वाटणार नाहीं. आतां राहतां राहिले माहार मांग वगैरे यांचे आचार व भक्ष्य. ही अगदींच ओंगळवाणी असतात खरी. पण त्यास जर अशी लालूच दाखविली कीं, त्यांनी आपले अमंगळ आचार व आहार टाकलें असतां त्यांशीं वरच्या जातीचे लोक अन्नोदकादि व्यवहार करण्यास तयार होतील, तर मला वाटतें तें हळू हळू आपली सुधारणा करण्यास झटतील. वास्तविक पाहतां अशा लोकांस अगदीं अव्यवहार्य व अमंगळ मानून त्यांचा तिटकारा केल्यानें त्यांची सुधारणा व्हावयाचीं नाही. तर, ज्या

गोष्टीं त्यांच्यांत वाईट असतील, त्या त्यांच्याकडून टाकवून त्यांस आपल्यासारखें करण्याचें वरच्या जातींनी मनावर घेतलें पाहिजे. असें करण्यांतच खरा माणूसपणा आहे. केवल शुद्धतेचा मोठा तोरा मिरविण्यांत तो मुळींच नाहीं.

असो, आतां मांसाहारी जाती आणि मांसाहार न करणाऱ्या जाती! यांच्यातील हा भक्ष्यभेद जाऊन परस्परांचा एकजीव व्हावा कसा हा मात्र मोठा प्रश्न आहे खरा. परंतु याचाही निकाल सहज लावण्यासारखा आहे. आतापर्यंत सुचविलेला क्रम सुशिक्षणप्रसारानें व सुविचारप्रसारानें सहज होण्यासारखा आहे. परंतु हा होण्यास बराच कालावधि लागणार आहे, हे उघड आहे. आपणांस यासंबंधानें उतावीळ होतां कामा नयें जी संस्था आज शेंकडो वर्षे रूढ झाली आहे, तिच्या पाळ्यामुळ्या म्हणून तिचें अगदी निर्मूलन करण्याचें कामही बराच काळ लोटल्यावर सिद्ध होणारें आहे. मात्र तें करण्याचा निर्धार करून आमच्या प्रत्येक पिढीनें झटले पाहिजे. आतापर्यंत सुचविलेला क्रम अव्याहत चालू राहिल्यास कालेंकरून दोन मोठे वर्ग आमच्या समाजांत उरतील; एक मांसाहारी जनांचा आणि दुसरा मांसाहार सोडलेल्यांचा. पण हाही भेद कालांतरानें नष्ट होण्यासारखा आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांत मांसाहार निषेधक मंडळ्या उपस्थित होऊन आज तीस चाळीस वर्षे त्यांचे अव्याहत परिश्रम चाललें आहेत. आजला त्यांच्यांत पुष्कळ मांसाहारी युरोपीयन लोक सामील होऊन त्यांनीं मांसाहाराचा त्याग केला आहे; आणि ही मांसनिवृत्ति तिकडे उत्तरोत्तर वाढत चालली आहे. यावरून असा सुमार दिसतो कीं, तिकडे कांही शतकांच्या अवकाशांत बहुतेक जन मांसनिवृत्त होतील. हा असा पालट समशीतोष्ण कटिबंधात, कीं जेथे मांसाहार करणें आरोग्यास हितकर आहे असें पुष्कळांचें म्हणणें आहे, तेथें जर होऊं लागला आहे व तो उत्तरोत्तर बळावतच चालला आहे; तर त्याची लाट आमच्या ह्या देशावर येण्यास फारसा उशीर लागेल असें मला वाटत नाहीं. आमच्या देशांतील लोकांचें तर मांस हें कांहीं नित्याचे अन्न नव्हे. असें असतां मांस निवृत्तीची सबळ कारणें आमच्या लोकांस चांगल्याप्रकारें कळूं लागलीं म्हणजें तें खचित त्यापासून परावृत्त होतील. आधींच आमच्या हवेला मांसभक्षण आरोग्यकारक नव्हे. जे कोणी खातात ते केवळ जिव्हालौल्यास्तव कधींमधीं तें खातात. अशा लोकांस मांसाहार त्याग करण्यास मुळींच उशीर लागणार नाहीं. त्यांत आणखी आमच्या देशींत नानाप्रकारचीं धान्यें व फळें हवी तितकी पैदा होत असल्याकारणानें मांसाहारावांचून आमचें मुळींच अडणार नाहीं. तेव्हां या सर्व उहापोहाचा इत्यर्थ मिळून इतकांच कीं, मांसाहारी जनांचीं

मांसाहारापासून निवृति होऊन तें मांस निवृत्तजनांशी एकरूप होतील; आणि मग त्यांच्यामध्यें सर्व व्यवहार सुरळीतपणें चालू होतील. पण ही संसिद्धि फार लांबची आहे. असें होण्यास किती काळ लागेल याचा कांहीं नेम सांगतां येत नाहीं. परंतु आमच्या पैकी जें सुशिक्षित व समंजस आहेत, व ज्यांच्या ठायीं स्वदेशप्रीति, स्वदेशबांधवप्रीति इत्यादि उदात्त मनोवृत्ति वसत असतील त्यांनीं ही अभिष्ट संसिद्धि घडवून आणण्यासाठी तनमनधनें करून यत्न करावा हें उचित होय.

निदन्तुनीतिनिपुणाः यदिवास्तुवन्तु
लक्ष्मीः सभाविशतु गच्छतु वा यथेष्टं
अघैव वा मरणमस्तु युगांतरेवा
न्यायात्वथः प्रविचलीन्स पदं धीराः

अशा अटीचें यांचें वर्तन असलें तरच कांहींतरी उत्कर्षांची कळा आमच्या देशास लागून जातीभेदासारखे सर्वथा अनिष्ट व अहितकर प्रकार हळू हळू नाश पावतील.

***

# ३३ सामाजिक सुधारणा

(ठाणे-वक्तृत्वोत्तेजक सभेच्या १५ व्या समारंभांत केलेलें भाषण ७-१०-१८९५)

## उपोद्‌घात

कोणत्याही राष्ट्राची सुधारणा व्हावयाची ती सर्व अंगांनीं होणें इष्ट होय. राजकीय, सामाजिक, नैतिक, धार्मिक, औद्योगिक वगैरे जी सुधारणेची मुख्य अंगे, त्यापैकीं कांहीं अंगांचीं सुधारणां करण्याविषयीं आमच्या ह्या विस्तीर्ण देशामध्यें जोराची चळवळ चालली आहे. आतां ही चळवळ योग्यमार्गानें चाललेली असो, किंवा अयोग्य मार्गानें चाललेली असो; पण अगदीं स्वस्त बसण्यापेक्षा कांहींतरी उचल होत असणें हिताचे होय. अयोग्य मार्गानें चाललेल्या चळवळींस लवकरच अनुभवाच्या योगानें योग्य वळण मिळून योग्य मार्गाचें अवलंबन होणें सुकर होईल. अशा चळवळींपैकीं सामाजिक सुधारणेसंबंधाची चळवळ ही एक होय. ह्या चळवळीचें सध्याचें धोरण कित्येकांस मुळींच आवडत नाहीं. कित्येक तर असें आहेत कीं, त्यांना असलीं चळवळ बिलकूल पसंत नाहीं. कांहींकांस ती पसंत आहे, परंतु तीत आपलें अंग असणें त्यांस आवडत नाहीं; किंबहुना बाह्यात्कारी तिच्यासंबंधानें आपण उदासीन आहो, असें दर्शविण्याचा त्यांचा परिपाठ असतो. सुधारकांच्या वर्गात आपली गणना होणें त्यांस इष्ट नसतें. कित्येकांस तर असें वाटत असतें कीं, सामाजिक सुधारणेचा अजून काळच आला नाहीं. तर तो योग्य काळ आला म्हणजे या खटपटीस आपण लागावें. तूर्त लोकशिक्षण वाढवून लोकांचे समज सुधारीत असावें, हेंच हिताचे होय. अशा अनेकांच्या अनेक कल्पना आहेत. तरी याविषयाच्या संबंधानें आमच्या लोकांमध्ये जागृति होऊन थोडीबहुत कायिक, वाचिक व मानसिक चळवळ जिकडे तिकडे सुरू होऊन, लोकांस या प्रकरणीं थोडाबहुत विचार करणें प्राप्त होत आहे. या सार्वत्रिक ओघास अनुसरून ठाणेकरांनी या समारंभाच्या प्रसंगीं या विषयावर वाटाघाट करण्याची योजना करून लोकांच्या मनांत या विषयासंबंधानें जागृति करण्याचें श्रेय घेतलें आहे, हें पाहून मला मोठा आनंद होत आहे. या त्यांच्या स्तुत्य क्रमाबद्दल मी त्यांचें अभिनंदन करितो. आमच्या हितशत्रूंचा आमच्यावर नेहमीं असा आरोप असतो कीं, आम्हीं फक्त

राजकीयसंबंधाच्या सुधारणेंविषयीं अट्टाहास करितो. परंतु आमची सामाजिकसंबंधाचीं स्थिती अत्यंत निकृष्ट असतां तीं सुधारण्याविषयीं आम्हीं मुळींच खटपट करीत नाहीं; आम्ही तिच्यासंबंधानें अगदीं उदासीन आहो. तें आणखी असेहीं म्हणतात कीं, आम्ही आपली सामाजिक सुधारणां केल्याशिवाय राजकीय सुधारणेचीं हाव मुळींच धरू नयें. अशा आक्षेपक लोकांस असें सांगावयाचें कीं, प्रकृतसारख्या समारंभात सामाजिक सुधारणेचा नेहमीं ऊहापोह होत असून त्यांच्याविषयीं आमच्यापैकीं कोणीं म्हणण्यासारखें उदासीन नाहींत. जे कित्येक आहेत तें तसें केवळ वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळें आहेत. आतां या उपोद्धातांत फार वेळ न घालवितां मी माझ्या विषयास आरंभ करितों.

## सामाजिक सुधारणा म्हणजे काय?

सामाजिक सुधारणेंत कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो तें सागितल्यानें त्याची व्याख्या केल्यासारखें होईल. सामाजिक सुधारणेंत पहिला विषय विवाहसंबंधीं निरनिराळ्या चालीसंबंधाचा येतो. यांत बालविवाह, पुनर्विवाह, लग्नांत हुंडा घेण्याची चाल, कन्याविक्रय, लग्नांत होणारा बेसुमार खर्च व विवाहसमयीं अमलांत येणारें वेडेवाकडें व अप्रयोजक विधी व प्रकार इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होतो. दुसरा विषय, जातिभेदमूलक रोटीबेटीव्यवहार, स्पर्शास्पर्श, व इतर आचार एतद्रुप होय. तिसरा विषय कित्येक अनीतिप्रवर्तक चालीसंबंधाचा होय. यांत विवाहादि गंभीर व धार्मिकप्रसंगी वेश्यांचें नाच व गाणीं करणें, गर्भाधान, शिमग्याच्या सणांतील प्रकार निरनिरळ्या सुखाच्या किंवा दुःखाच्या प्रसंगीं मद्यपानादि प्रकार, इत्यादिकांचा समावेश होतो. चवथा विषय कित्येक अन्याय्य व अपयोजक प्रकारासंबंधाचा होय यांत विधवावपन, स्त्रियांची पडदपोशी, स्त्रीशिक्षण, इत्यादि गोष्टी येतात. यावरून सामाजिक सुधारणा म्हणजे काय तें आपल्या लक्षांत येईलच. या सुधारणेंत राजकीय, धार्मिक, औद्योगिक वगैरे सुधारणांचा मुळींच अंतर्भाव करावयाचा नाही. आतां, या सुधारणेंत कोणकोणतें अडथळें लोकांकडून येतांत याचा विचार करावयाचा. येथें लोक हें मोघमपद योजण्याचे स्वारस्य अर्थात् असें कीं, हें अडथळें केवळ जुन्या समजुतीच्या लोकांकडूनच येतात असें कोणीं समजूं नयें. तर ते नव्या समजुतीच्या लोकांकडूनही येण्यासारखें आहेत.

## जुन्या लोकांकडून येणारे अडथळे

**पहिला अडथळा–** पुराणप्रीति. आमचें हें भरतखंड एके काळीं चांगल्या अपूर्वाच्या स्थितीमध्यें असून नानाप्रकारची सुधारणा येथें रूढ झाली होती. या गोष्टीचीं प्रमाणें

आमच्या जुन्या इतिहासांत विपूल असून ह्या प्रकरणीं आमची आठवण मुळींच बुजलेली नाहीं. आम्हांस आमच्या पूर्वस्थितीचा व पूर्वकालीन महापुरुषांचा अभिमान अजून वाटत आहे. सुवर्णयुग किंवा सत्ययुग मागें होऊन गेलें असून हल्ली आमची दुर्दशा झाली आहे. याचें एक कारण जुने लोक असें वागतात कीं, आमच्या समाजांतून मागच्या आचारविचारांचा लोप झाल्यामुळें आमची नीति व आमचा पराक्रम नष्ट झाला. तेव्हां आपणास जर पुन्हा पूर्वस्थिति प्राप्त व्हावयाची असेल, तर तें पूर्वकालीन आचारविचार आमच्यामध्ये पुन: रूढ झाले पाहिजेत; आणि त्या जुन्या आचारविचारांचे जें कांहीं अवशेष आजला क्वचित कोठें आहेत तें मुळींच काढून टाकतां उपयोगीं नाहीं. तर ते पूर्ववत् जोमानें चालू राहिलें पाहिजेत, त्यांत यत्किंचित्ही फेरफार होता कामां नये. आजपर्यंत जें आमचें अतिप्राचीन राष्ट्रपृथ्वीतलावर अवशिष्ट राहिलें आहे, तें केवळ या पूर्वकालीन चालीरीतींच्या अवशेषांमुळेच होय. इतर राष्ट्रें जीं आज नामशेष झालीं आहेत, त्याचें कारण तीं आपल्या जुन्या चालीरीतींस विसरून गेली किंवा आमच्या आर्यावर्तातल्यासारख्या चालीरीती त्या राष्ट्रांत रूढ झाल्या नव्हत्या हें होय. तेव्हां, तात्पर्य काय कीं, अशा ज्या आपल्या अस्तित्वास आवश्यक अशा चालीरीति आमच्यांत सांप्रत रूढ आहेत, त्यांचा आपणांस पूर्ण अभिमान वाटला पाहिजे. इतकेंच नव्हे तर, त्यांचें रक्षण करण्यास आपण कायावाचामनेकरून झटले पाहिजे. सांप्रत त्यांत सुधारणा करण्याच्या उद्देशानें सुधारक लोक पाश्चात्त्यांच्या अनुकरणानें खटपट करीत आहेत तीं अगदीं अनर्थकारक आहे. यास्तव, तिला प्रतिरोध करून आपलें जुने आचारविचार कायम ठेवण्यास आपण कायावाचामनेकरून झटले पाहिजे, हे आपले कर्तव्य आहे. हा असा जुन्या समजुतीच्या लोकांचा समज दृढ झाला असल्याकारणानें त्यांना सुधारकांची खटपट मुळींच पसंत वाटत नाही. इतकेंच नव्हे तर तें त्यांस देशशत्रू समजून त्यांची साधेल तेवढी अवहेलना करितात.

**दुसरा अडथळा–** एकंदर अचारविचार धर्मशास्त्रांत सांगितले आहेत. तसेच तें पाळले पाहिजेत, कारण तीं शास्त्रे ईश्वरप्रणीत आहेत. त्यांत फेरफार करण्याचें सामर्थ्य आम्हां अल्पज्ञ मानवांस मुळींच नाहीं. अशी समजूत जुन्या लोकांची असल्यामुळें हल्ली जे उपयुक्त फेरफार सुधारक करू पाहत आहेत, तें त्यांना मुळीच पसंत वाटत नाहींत. आमची बहुतेक धर्मपुस्तकें ईश्वरप्रणीत असून तीं त्रिकालज्ञ अशा कषिजनांनीं प्रणीत केली आहेत. त्यांत सांगितलेलें एकंदर विधी व अनुज्ञा आमच्या परम कल्याणाच्या असून तीं केवळ आप्तवचनें होत. असे त्रिकालज्ञ व सर्वज्ञ महापुरुष सांप्रत आपल्या

भरतभूमींत मुळींच निर्माण होत नाहींत. सुधारक मंडळामध्यें तर असें पुरुष सांपडावयाचेच नाहींत. तेव्हां त्यांचे सर्व उद्देश केवळ धर्मशास्त्रसंमत नसून आपमतलबाचे आहेत. अशा लोकांस पाश्चात्यांच्या दिखाऊ सुधारणेमुळें भुरळ पडून तें हे देशनाशाचें काम करण्यास प्रवृत्त झाले आहेत. यांच्या या कृतीमुळें आमच्या धर्माचें मातेरे होऊन आम्ही धर्मभ्रष्ट व क्रियाभ्रष्ट होऊं न शेवटीं इहपरलोकसुखास मुकून अनंतकालिक विपत्तीचे अधिकारी होऊं. तेव्हां ही स्वधर्मनाशबुद्धि ज्यांच्याठायीं उपजली असेल, त्यांचा अधिकेत करण्यांतच पुण्य आहे. असा जुन्या समजुतींच्या लोकांचा समज झाला आहे. हा एक जबरदस्त अडथळा सुधारकांच्या खटपटीस आहे.

**तिसरा अडथळा–** आपल्यासारखेंच आपल्या आसपासच्या लोकांचे आचारविचार असलें अशीं समजूत सामान्य लोकांचीं असल्यामुळें साधारण मनुष्यास त्याच्या मताविरुद्ध वागण्याचें धाडस होत नाहीं. कारण, त्यांना अशा लोकांकडून होणारी विटंबना व बहिष्कारादि प्रकार सहन करण्याचें सामर्थ्य किंवा सवड नसतें. यास्तव, ते साधारणतः समाजांत ज्या चालीरीती रूढ असतात त्यांचे दास बनून राहातात. वस्तुतः पाहतां ही समजूत एकंदर राष्ट्रांमध्यें कमीजास्त प्रमाणानें रूढ आहे. परंतु ज्या राष्ट्रांत खऱ्या ज्ञानाचा प्रसार जास्त झालेला असतो, त्या राष्ट्रांतील लोकांस आचारस्वातंत्र अधिक मिळण्याच्या संभव असतो. आमच्या देशाचीं यासंबंधानें स्थिती पाहातां अगदीं वाईट आहे. आम्हांमध्यें विद्येचा प्रसार जरी होत आहे, तरी खरें ज्ञान मिळत नसल्यामुळें हे आचारस्वातंत्र्य आमच्यांत अगदीं बेताचेंच आहे; आणि ज्यांस हें आचारस्वातंत्र्य हवेसें वाटतें त्यांना इतर समाजास सोडून जाण्यांत किंवा त्याची विटंबना सहन करण्यांत आपलें मोठे नुकसान आहे, असें वाटत असतें. यामुळें ते मुकाट्यानें लोकांच्या समजुतीस मान देऊन त्यांच्यासारखेंच आपलें वर्तन ठेवितात तरी त्यांच्या मनांतून सुधारणाप्रातीचें बीज रुजलेलें असतें. त्यांच्या चित्ताची एकसारखीं तळमळ चाललेली असते. परंतु करितात काय बापडे, त्यांना आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यांत जें सुख लाभण्यासारखें असतें, त्यापेक्षां समाजांतील लोकांत मिळूनमिसळून राहाण्यानें प्राप्त होणारे सुख अधिक आहे असें वाटून ते आपल्या सुधारणेच्या सर्व इच्छा दाबून ठेवतात. अशी स्थिती सर्वत्र असल्यामुळें लोकांत ढोंगीपणा माजून सुधारणेचा इष्टप्रसार व्हावा तसा होत नाहीं.

**चवथा अडथळा–**परकीय आचारविचारांविषयीं जुन्या समजुतीच्या लोकांत विनाकारण तिटकारा वागत असतो. आमच्या देशांत एकेकाळीं इतर सर्व राष्ट्रांपेक्षां

जास्त सुधारणा झाली असून, आमच्यांत पुष्कळ चांगले चांगले आचार रूढ झाले होते. हल्लींही आमचें कित्येक आचार व विचार असें उत्तम आहेत कीं, तें पाहून पाश्चिमात्यराष्ट्रांतील अत्यंत सुधारलेल्या लोकांनीही खालींच मान घातली पाहिजे असें आहे. त्यापेक्षां आमच्या जुन्या मंडळीस आपल्या आचारांचा फाजील अभिमान वाटून परकीयलोकांच्या आचारांविषयी त्यांस तिटकारा वाटणें साहजिक आहे. पुन्हा परकीलोकांविषयीं त्यांच्या मनांत पूर्वीपासूनच तेढ वागत असल्याकारणानें त्यांना त्यांच्या सर्वच गोष्टी वाईट वाटणें साहजिकच आहे. हा असा एका राष्ट्राच्या मनांत इतर राष्ट्राविषयींचा तिरस्कार व द्वेष वागणे साहाजिकच आहे. आणि राष्ट्राराष्ट्रांमधलें वैर जोपर्यंत कायम राहील, तोपर्यंत ही परस्पराविषयींची वृत्ति कायम रहावयाची दुसरें असें कीं, आमचें हें आर्यराष्ट्र अत्यंत प्राचीन असून त्याच्या उत्कर्षकाळीं इतर आसपासचीं राष्ट्रें केवळ रानवट अवस्थेंत असल्यामुळें आर्यलोकांना इतरांविषयी तिरस्कार वाटणे साहजिक आहे. तेव्हां या कालपरवांच्या, थोडीशी भौतिक सुधारणा मिरवणाऱ्या लोकांच्या आचारविचारांत अनुकरण करण्यासारखे तें काय असणार? त्यांची सर्व सुधारणा केवळ ऐहिक ग्राम्यसुखसंवर्धक आहे. तींत घेण्यासारखें कांहींच नाहीं. आमची सुधारणा अशी ऐहिकसंबंधापुरतीच केवळ नव्हे, तिचा हेतु ऐहिक व पारलौकिक अशा उभयप्रकारच्या सुखाचा संपादक आहे. तेव्हां केवळ ऐहिक दृष्टि घरणाऱ्या परस्थांच्या आचारविचारांत अनुकरण करण्यासारखें तें काय असणार? असा ग्रह आमच्या जुन्या मंडळीचा असल्यामुळें ते परस्थांच्या आचाराविचारांचा मनापासून द्वेष करितात. आणि सुधारक जे आचारविचार समाजांत रूढ करूं पाहात आहेत ते बहुतेक परस्थांच्या अनुकरणानेंच त्यानीं उचलले आहेत अशी त्यांची समजूत झाल्यामुळें त्याला सुधारकाच्या खटपटीचा त्रास येतो, व ते त्यांना अटकाव करण्यास उद्युक्त होतात.

## नव्या लोकांकडून येणारे अडथळे

**पहिला अडथळा–** गेल्या शंभर वर्षात इंग्रजी भाषेचा इकडे अभ्यास सुरू होऊन त्या भाषेतील ग्रंथांचे अध्ययन आमचे लोक करूं लागले. तेव्हां त्यांच्या मनांत नवीन कल्पना व नवीन विचार उत्पन्न होऊन त्यांची मनें बरीच विकसित झालीं. आधीचे ब्रिटिश लोकांचा पराक्रम, त्यांची सर्वतोपरी दिपवून टाकणारी सुधारणा, व त्यांच्या मोठमोठ्या संस्था पाहून आमचें लोक अगदीं थक्क होऊन गेलें होते. त्यांत आणखी त्यांच्या ग्रंथांचा परिचय त्यांस झाल्यामुळें त्यांच्या बुद्धीस उत्तम प्रकारचें खाद्य मिळून ती चांगली पोसली, आणि ब्रिटिश लोकांच्या एकंदर गोष्टींविषयीं त्यांस मोठे कौतुक

वाटून त्यांच्या मनांत ब्रिटिशांविषयी पराकाष्ठेची पूज्यबुद्धि वसूं लागली. तीं इतकी कीं, त्यांस ब्रिटिश लोक केवळ देवमाणसें आहेत असें वाटूं लागले. त्यांच्या आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रे वगैरे पाहून तर त्यांचा असा ग्रह झाला कीं, ही कोणी अमानुष सृष्टीतील माणसें असावीं. तेव्हां, तात्पर्य काय कीं, अशा विलक्षण पराक्रमी लोकांचें सर्व कांहीं अनुकरण करण्यासारखें आहे आपला जर त्यांच्यासारखा उत्कर्ष व्हावयास पाहिजे असेल, तर तो त्यांच्या सर्वतोपरी अनुकरणानें होईल. यासाठीं आमचें सारे वेडेवाकडे जुने आचारविचार सोडून देऊन, आपण त्यांच्या एकंदर गोष्टींचे अनुकरण केलें असतां आपलें हित होईल, असें इंग्रजी भाषारूप वारुणीचा झुरका घेताक्षणीच लोकांस वाटूं लागलें. तेव्हां अर्थात् ते परकीय आचारविचारांची फाजील स्तुति करून स्वतःच्या जुन्या पद्धतींचा मनापासून द्वेष व अवहेलना करूं लागले. ही त्यांची वृत्ति पाहून जुन्या धर्माभिमानी लोकांस त्यांचा कंटाळा येऊ लागला. नवें लोक तर असें समजू लागलें कीं, हें अगदीं देवभोळे लोक असल्यामुळें व यांस आमच्यासारखीं दिव्य विद्या येत नसल्यामुळें यांची अशी कोती समजूत राहिली आहे. तेव्हां यांचे म्हणणें कांहीं एक जमेस धरण्यांत अर्थ नाहीं, असें समजून ते त्यांची साधेल तेव्हां मनमुराद विटंबना करूं लागले. याप्रमाणें या सुधारणेच्छु मंडळीनें साध्या लोकांच्या मनांत एकदंर सुधारणेविषयीं तिटकारा उत्पन्न केला. तो इतका कीं, त्यांची कोणतीच गोष्ट त्यांस रुचेनाशी झाली. त्यांनीं एकाद्या सुधारणेच्या बाबीचें कितीही समर्पक रितीनें मंडन केलें, तरी तें त्याला वावगें व असत्य वाटूं लागले. त्यांचें बोलणें किंवा लिहिणें मुळी ऐकूंच नयें असा त्यांनीं निर्धार केला. सुधारकांनी समाजांत रूढ असलेली एकादी चाल मोडण्याविषयीं किंवा तींत कांहीं फेरफार करण्याविषयीं जुन्या शास्त्रग्रंथांतून जरी आधार दाखविण्याची खटपट केली तरी तीं त्यांची खटपट व्यर्थ होते. ही खटपट जुनें लोक लबाडीची आहे असें मानतात. तेव्हां, तात्पर्य काय कीं, कित्येक सुधारकांनी असा अविचार प्रारंभी केल्यामुळें त्यांच्याविषयीं व त्यांच्या खटपटीविषयीं सामान्य लोकांच्या मनांत द्वेष वागत आहे.

**दुसरा अडथळा–** सांप्रत चालू असलेल्या चालीरीति वाईट आहेत, असा ग्रह–अशी खात्री–सुधारकांची होतांच, त्या समाजांतून नाहींतशा व्हाव्या अशीं इच्छा त्यांच्याठायीं उत्पन्न होते; व ती पुरी होण्यासाठी कांहींतरी उपाय योजण्यास तें तत्काळ प्रवृत्त होतात, हें साहजिक आहे. परंतु हे त्यांचे उपाय नेहमीं योग्य असतात असा कांहीं नियम नाहीं. सुधारणा लवकर व्हावी म्हणून कित्येक उतावळे सुधारक भलभलते उपाय योजण्यास तयार होतात; त्यांचे कित्येक उपाय चांगले असले तरी, त्यांस

सामान्य लोक तयार नसल्यामुळें त्यांच्याकडून त्यांस जबरदस्त अडथळा येतो. वास्तविक पाहतां आमच्या समाजांतल्या बहुतेक चालीरीति फारच पुरातन काळापासून चालत असल्यामुळें त्यांची पाळेमुळें फारच खोल गेली आहेत. त्या आमच्या लोकांच्या अगदीं अंगी खिळून गेल्यामुळें आम्हांस त्या सोडण्याचें मुळींच आवडत नाहीं. पूर्वात्त्यांचा हा एक गुणच आहे, कीं, कोणत्याहीं गोष्टीचा रिवाज कांही काळपर्यंत पडला कीं, ती त्यांस पराकाष्टेचीं आवडूं लागते. त्याचप्रमाणें कित्येक चालीरीति आमच्या ह्या विस्तीर्ण देशांत केवळ परिस्थितीस अनुरूप अशा उत्पन्न झाल्या आहेत. तेव्हां त्यांचे निर्मूलन किंवा रुपांतर करणें म्हणजे त्या परिस्थितींत फरक करणें होय. या व अशाच दुसऱ्या गोष्टींचा नीट बारकाईनें व निःपक्षपात बुद्धीनें विचार करून व प्रत्येक चालीरीतीचा समग्र इतिहास अवलोकन करून, मग तिच्याविषयीचा काय निर्णय ठरविणें तो ठरविण्याचा प्रयत्न आमचे सुधारक फारकरून करीत नाहींत. यामुळें विवक्षित चालीरीतींत जो फेरफार ते करूं इच्छित आहेत, तो त्यांस योग्यमार्गानें करितां येत नाही. समाजांत शेकडों हजारो वर्षे रूढ असलेल्या चालींत रूपांतर किंवा तिचें निर्मूलन करावयाचें काम फार कठीण आहे. तें बेताबेतानें केलें पाहिजे. एखादे जुने घर पाडणें झाल्यास किंवा एखादा प्रचंड विस्तार पावलेला वृक्ष तोडणें झाल्यास, जसा हुशार कारागिर आपला शस्त्रप्रयोग त्यावर बेताबेतानें करतों व क्रमाक्रमानें इष्ट उद्देश कोणासही त्रास किंवा दुःख दिल्यावांचून शेवटास नेतो, त्याप्रमाणें समाजांत चिरकाल रूढ असलेल्या चालीसंबंधानें सुधारकानें प्रयत्न केला पाहिजे. ज्या गोष्टीची सुधारणा लोकांस वाईट वाटणार नाहीं, तिला पहिल्यानें आरंभ करून हळूहळू योद्धा थोडा फेरफार करीत राहिल्यानें लोकांस तो फेरफार फारसा जाचक न वाटतां सुधारकांचा कार्यभाग सहजीं होण्यासारखा आहे. परंतु, उतावळे व आवेशी सुधारक या गोष्टीकडे मुळींचे लक्ष न देता सर्व कांहीं गोष्टी आपल्या हयातींत घडवून आणण्याची हाव धरून भलभलत्या उपायांची योजना करतात. परंतु या त्यांच्या अविचाराचा परिणाम विपरीत होऊन त्यांच्या उद्दिष्ट हेतूस पुष्कळांशी प्रत्यवाय घडतो.

**तिसरा अडथळा–** सुधारक लोकांचें आणखी एक वैगुण्य असें सांगण्यासारखे आहे कीं, त्यांना ज्या कोणत्या बाबतींत सुधारणा करावयाची असतें तिचा वाईटपणा व अप्रयोजकपणा सामान्य लोकांच्या नजरेस स्पष्टपणें व निःपक्षपातपणें आणून देण्याचा प्रयत्न आजपर्यंत त्यांच्याकडून फारसा झालेला दिसत नाही. याप्रकरणीं कोणताही उद्दिष्ट हेतु सिद्धीस न्यावयाच्या म्हणजे त्यास लोकमत अनुकूळ पाहिजे. परंतु हें लोकमत तयार करणाच्या योग्यमार्गाचें अवलंबन सुधारणेच्छु लोकांकडून म्हणण्यासारखें

होत नाहीं. सुधारणेच्या प्रत्येक बाबतीसंबंधानें आपलें व जुन्या लोकांचें काय म्हणणें आहे, तें नीट बारकाईनें केवळ सत्यप्रीतीनें व स्वदेशहितबुद्धीनें पाहून खऱ्याखोट्याचा शहानिशा करण्याचें काम सुधारकांकडून व्हावें तसें अजून झालेलें नाही. यामुळें लोकमतास योग्यप्रकारचें वळण मिळण्यास पुष्कळ हरकत येत आहे. सुधारणापक्षाच्या लोकांनीं वेळीं अवेळी पाहिजे तसा जुन्या चालीरीतीचा निषेध करावा, आणि जुन्या लोकांनी त्या चालीरीतीच्या समर्थनार्थ पाहिजे तें बकावें, असा सध्यां प्रकार चालला आहे. एका पक्षाचे काय म्हणणें आहे तें दुसऱ्यास चांगलेसें न कळतां, दोघेही परस्परांवर मनास वाटेल तसा वाक्प्रहार करीत आहेत. यामुळें या अत्यंत महत्वाच्या विषयासंबंधानें आज चोहीकडे वितंडवाद माजून राहिला आहे. असा जिकडे तिकडे घोटाळा उत्पन्न झाल्याकारणानें सत्यज्ञानप्रसारास प्रत्यवाय घडून सुधारणेचा प्रसार खुटला आहे. आणखी एक गोष्ट सुधारणापक्षांच्या लोकांकडून केव्हां केव्हां घडत असते. ती अर्थात, हीच कीं, आपणास अभिष्ट अशी सुधारणा जुन्या शास्त्रग्रंथांतूनसुद्धा विहित केलेली होती असें प्रतिपादन करण्याच्या भरांत कित्येक वचनांचा ओढूनताणून आपणास अनुकूळ असा अर्थ करण्याचा कित्येक सुधारक प्रयत्न करितात. यावरून जुन्या लोकांस असें वाटते कीं ह्यांचा पक्ष दुर्बल असून हे सत्याचा अपलाप करून साध्या लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. यास्तव त्यांचें कोणतेंच म्हणणें जमेस धरू नयें. याप्रमाणें आपल्या अविचाराच्या वर्तनामुळें सुधारकांनी जुन्या लोकांच्या मनांत आपणांविषयी अविश्वास उत्पन्न केला आहे.

**चवथा अडथळा–** बोलण्याप्रमाणे चाल, हा एक कोणतीही गोष्ट प्रचारांत आणण्याचा उत्तम उपाय होय. सभाप्रसंगी, वर्तमानपत्रांत, मासिक पुस्तकांत किंवा ग्रंथरूपानें आपल्या मतांचे समर्थन करितांना मोठा आवेश दाखवावयाचा परंतु त्याप्रमाणें वर्तन करण्याचा प्रसंग आला म्हणजे माघार घ्यावयाची असा वाईट क्रम आमच्या बहुतेक सुधारकांचा असल्यामुळें सामान्य लोकांस वाटते कीं, यांची सुधारणा फक्त बोलण्यापुरती आहे; त्याप्रमाणें आचरण करण्याचें धाडस किंवा तयारी याची जर नाहीं, तर इतरांची कशी असावी? दुसरें असें कीं, बोलण्यांतच आचरण्यांत विपर्यास दृष्टीस पडला म्हणजे साधारण लोकांस असें वाटते कीं, सुधारणाप्रिय लोकांस निरनिराळ्या बाबतीतील सुधारणा कितीही प्रिय असली तरी ती अमलांत आणणें महादुर्घट काम आहे; व कित्येक बाबी तर अशा आहेत कीं, त्यांच्यासंबंधानें व्यवहारांत कांहींच फेरफार करितां येण्यासारखा नाहीं. आणखी असें कीं, नुतनप्रिय सुधारकलोकांस कोणतीही सुधारणा आवडत असली, तरी तिच्या हिताहिताविषयीं त्यांची खात्री झालेली नसते.

कारण अशी खात्री झाली असती तर त्यांचें आचरण तदनुसार झालें असतें. याप्रमाणें सुधारकांच्या अंगीं नीतिधैर्याचा अभाव असल्याकारणानें सुधारणेचा प्रसार व्हावा तसा जारीनें होत नाहीं.

**पाचवा अडथळा–** कित्येक सुधारकांस जुन्या चालीरीतीची बंधनें अगदी असह्य होऊन, त्यांतून सुटून मनास वाटेल तसें वर्तन करण्याचा त्यांचा निर्धार होतो. मग ते जुन्या लोकांस अगदीं किळस व तिटकारा वाटेल अशा प्रकारचे प्रकार निःसंगपणें करण्यास प्रवृत्त होतात. यामुळे त्यांचा जुने लोक मनापासून द्वेष करितात. मग त्यांना त्यांचें कोणतेंच बोलणे किंवा प्रतिपादन रुचेनासें होतें. मद्यमांसादिकांचे सेवन किंवा पोषाखादिकांचे वेडगळ प्रकार आमच्या जुन्या लोकांस मुळींच आवडत नसतात. अशा गोष्टीसंबंधानें सुधारकांनीं फार जपलें पाहिजे. खाणेपिणें, पोषाक वगैरे संबंधाचें जे निर्बंध आमच्यांत चिरकाल रूढ झाले आहेत, तें केवळ क्षुल्लक असून त्यांच्यासंबंधानें आमच्या लोकांची मतें बरीच नाजूक आहेत. यास्तव त्यावर शस्त्र धरून आपलें आचरण या निर्बधांस न जुमानतां केल्यानें जुन्या लोकांस आपलें अल्लड लोक आवडतनासे होतात.

## ह्या अडथळ्यांपासून उद्भवणारे परिणाम

**पहिला परिणाम–** अर्थात् असा कीं, आपल्या समाजाची सर्व अंगांनीं सुधारणा होणें इष्ट असता हें त्यांचे एक अंग बहुतेक लुलें झाल्यासारखे तूर्त दिसत आहे. त्यामुळें एकंदर सुधारणेस पुष्कळच हरकत होत आहे. सामाजिक संबंधाचीं योग्यप्रकारचीं सुधारणा झाल्यावांचून इतर कोणत्याही सुधारणेस शाश्वती यावयाची नाहीं. इतर सुधारणांच्यापूर्वी ही सुधारणा व्हावयास पाहिजे असेंच जरी केवळ म्हणता येत नाहीं, तरी इतर सर्व सुधारणांस या सुधारणेचा पुष्कळ आधार आहे. हिच्या अभावीं इतर सुधारणांस म्हणण्यासारखी फलद्रुपता व चिरस्थाइर्पणा येणार नाहीं. इतर सर्व राष्ट्रें हरएक सुधारणेच्या बाबतीमध्यें मोठ्या वेगानें पुढे चाललीं असतां, आम्हीच तेवढें जागच्या जागीं राहिल्यानें हीच्यातून जास्त विपत्ती आम्हांस भोगावी लागून, या सुधारणेच्या युगांत आम्ही अगदीं नामशेष होऊन जाण्याची भीति आहे. तर आम्ही वेळींच जागे होऊन उभयपक्षांनी आपआपले वर्तन सुधारलें पाहिजे.

**दुसरा परिणाम–** असा कीं, जुन्या व नव्या लोकांमध्ये विनाकारण वितुष्ट येऊन तें परस्परांस पाण्यांत पाहू लागले आहेत. अशी दुफळी समाजांत एकसारखी चालू राहिल्यानें आमच्या हातून कोणतेंच देशहिताचें काम एकजुटीनें होण्यासारखें नाही.

सांप्रत पुण्यातील कित्येक समाजसुधारणाद्वेष्ट्यांनी जें काहूर राष्ट्रीयसभेच्या संबंधानें उपस्थित केलें आहे, त्याचा जो कोणी निःपक्षपातपणें विचार करील त्याच्या लक्षांत माझें म्हणणे येईल. तर असा हा परस्परांविषयींचा दुजाभाव फारच वाईट आहे. हीच्या काळी आमची जितक्या बाबतींत एकी होईल तितकी हवी आहे. तिला कोणत्याही गोष्टीनें हरकत येतां कामा नयें, असा वर्तनक्रम उभयपक्षांनीं धरला पाहिजे.

**तिसरा परिणाम–** असा होत आहे कीं, कित्येक अज्ञान किंवा हट्टी लोकांचा असा समज होत चालला आहे कीं, आपली सांप्रत जी स्थिति आहे तीच चांगली आहे. तिच्यांत मुळीं फेरफार करण्याचें प्रयोजनच नाहीं. असा एकदा माणसाचा ग्रह झाला म्हणजे तो कोणत्याही प्रकारच्या सुधारणेस अनुकूल व्हावयाचा नाहीं. ज्या राष्ट्रांत अशा लोकांचा भरणा फार असतो, त्या राष्ट्राची दुर्दशा खात्रीनें व्हावयाची. आमचीही सांप्रत हीच अवस्था आहे.

**चवथा परिणाम–** असा कीं, बहुजनसमाज सुधारणेस प्रतिकूळ असला म्हणजे तिच्यासंबंधाने खटपट करण्याचें धैर्य फारच थोड्यांना होत असतें. यामुळें सुधारणाप्रिय लोकांची संघशक्ति मुळींच वाढत नाही. समाजांत स्वतंत्र रीतीनें विचार करून मनास योग्य वाटलेल्या विचारांचें प्रकाशन करण्याचें धैर्य फारच थोड्यांना होते; आणि ज्या थोड्यांकडून हें मतप्रकाशनाचें धैर्य होते, त्यांस आपल्या मताप्रमाणें वागण्यास सहस्रशः अडथळे येत असतात. अशी स्थिती झाल्यामुळें बहुतेक लोक 'पिच्छेसे आयी' या न्यायानें गतानुगतिक होऊन, चालू आहे तीच स्थिती बरी असें मानून मुकाट्यानें मुंडी खुपसून असतात.

कित्येक तर पक्के ढोंगी बनून सत्याचा अपलाप व उपमर्द आपल्या सोईसाठीं निःसंगपणें करतात. याप्रमाणें त्यांचे विचार, उच्चार व आचार यांमध्ये पूरा विसंगतपणा उत्पन्न होऊन ते कोणत्याच मोठ्या कृत्यास नालायक होतात. अशा माणसांची मानसिक शक्ति मुळींच न वाढून तें चालींचे व लोकमताचे गुलाम होऊन राहतात.

## उपसंहार

आतापर्यंत जुन्या व नव्या लोकांकडून येणाऱ्या अडथळ्यांचें संक्षेप्रतः निरूपण केले; व त्यापासून उद्भवणाऱ्या परिणामांचेंही दिग्दर्शन केलें. शेवटीं या उभयप्रकारच्या लोकांस एवढीच विनंति आहे कीं, जें जुन्या मताचें आहेत, त्यांनी या सुधारणेच्या युगांत जुन्या चालीरीति व समजुती यांविषयी फाजील प्रीति न दाखवितां जें आपणा स्वतःस व एकंदर जनसमाजास शाश्वत सुख प्राप्त देणारें आहे, त्याचा अंगीकार करून

त्याचा पुरस्कार कोणी करूं लागल्यास. त्याला कधींही अडथळा आणूं नये. आपणास एकादी गोष्ट आवडत नाही म्हणून ती मुळींच कधी आपल्यापुढें येऊ नयें, असा आग्रह न धरितां तिच्याविषयीं विवेक करून तिची हितप्रदता किंवा अहितकारित्व कितपत आहे, त्याचा निःपक्षपात बुद्धीनें विचार करावा. जुन्या गोष्टीं पुष्कळ बऱ्या असल्या, तरी त्या सगळ्याच चांगल्या नव्हत, असें शोधक बुद्धीनें पाहतां प्रत्येक विचारी मनुष्याच्या लक्षात येईल. त्याचप्रमाणें नव्या तेवढ्या सर्वच गोष्टीं टाकाऊ असेही सहसा म्हणतां येत नाहीं. त्यांत अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं, त्याची बीजे आमच्या प्राचीन सुधारणेंत अंशतः आढळतात. शिवाय त्यांच्या अपरिचयामुळें आपणास नव्या गोष्टीं अप्रिय वाटतात, परंतु त्यांचा एकवेळ परिचय होऊं लागला म्हणजे त्या अंगवळणी पडून त्यापासून हितच होईल. दुसरें असें कीं, ज्या चालीरीती आज समाजांत रूढ आहेत. त्या साऱ्याच शास्त्रविहित आहेत अशातला कांही अर्थ नाहीं. शिवाय कित्येक शास्त्राच्या आज्ञा तर आम्हीं मुळींच पाळीत नाही. इतकेंच नव्हे तर, कित्येक शास्त्राज्ञांत आमच्या सोई वाटतील तसें फेरफार करून आम्ही जगांत वागत असतों. आणखी असे कीं, शास्त्रकार सुद्धा आपआपल्या शास्त्रांत सगळ्या रूढ असलेल्या चाली ग्रंथित करून त्यांस आपल्या वचनांनी विहितत्व आणीत असत. सांप्रत असे शास्त्रग्रंथ पुष्कळ उपलब्ध असून त्यांत देशकालवर्तमानाप्रमाणें त्या त्या ग्रंथाच्या कर्त्यांनीं इष्ट वाटतील तसें फेरफार केलें आहेत. यावरून असें सिद्ध होतें कीं, आमच्या त्रिकाळ ऋषींससुद्धा देशकालमानाप्रमाणें शास्त्रवचनांत फेरफार होणें इष्ट होतें. असा जर त्यांच्या बुद्धीचा निश्चय असून तदनुसार त्यांनी स्वग्रंथांत फेरफार केलेलें आज उपलब्ध आहेत, तर मग आपल्या जुन्या शास्त्रांच्या आज्ञेबाहेर आपणास जावयाचेंच नाहीं, असा हटाग्रह धरून बसण्यांत काय शहाणपणा आहे? आणखी असें कीं, सामाजिक संबंधाच्या हरएक बाबींचें इष्टानिष्टत्व मनुष्यास स्वानुभवाच्या साहाय्यानें, व त्याचें जें अनुभवगम्य ज्ञान वाढत चाललें आहे, त्याच्या साहाय्यानें स्थापित करण्याचें सामर्थ्य अधिकाधिक येत चालले आहे. या सामर्थ्याचा योग्य उपयोग करून त्यानें स्वाचरणाचें नियमन करावें हें योग्य होय. यावरून पाहतां या व्यावहारिक प्रकरणीं आमच्या पूर्वजांनीं जे नियम घालून दिले आहेत, तें कितपत यथार्थ व सध्याच्या स्थितींत अनुकूल आहेत तें पाहण्याचा अधिकार प्रत्येक समंजस मनुष्यास आहे. या प्रकरणीं देवाच्या किंवा देवर्षींच्या स्मृतीवर किंवा आदेशावर अवलंबून रहाण्याची कांहींएक जरूर नाहीं. सारांश काय कीं, धर्मविषयक व समाजविषयक हे दोन निराळे विषय असून दुसऱ्या विषयांत मनुष्याची गति होण्याचा

पुष्कळ संभव आहे. त्याचप्रमाणें जुन्या लोकांनी हेंही लक्षांत ठेवावें कीं, समाजांतील एकंदर लोकांचें वर्तन एकसारखेंच असल्यानें कोणता वर्तनक्रम विशेष हिताचा हे समजण्यास मार्ग न उरून ऐहिकसुखाची वृद्धि होतनाशी होते. यास्तव पर्यंत कोणाही मनुष्याकडून आपल्या सुखास प्रत्यवाय घडत नसतो, तोपर्यंत त्यास मनास वाटेल तसें वर्तू द्यावे. याबद्दल त्याचा द्वेष किंवा तिटकारा करूं नये. वाटल्यास त्याला सामोपचाराच्या मार्गानें बोध करून वाटेवर आणण्याचा प्रयत्न करावा. परंतु त्याची अवहेलना मुळीच करूंनये. आणखी असें कीं, परकी लोकांचें जेवढें म्हणून कांहीं आहे तेवढें सारे द्वेष्य व त्याज्य आहे अशी समजूत धरणें हे कोतेपणाचें लक्षण आहे. जी कोणती गोष्ट परस्थांचीशी आपल्यास वाटत असते, ती आपल्यांत कोणत्याना कोणत्या रूपानें एकवेळ रूढ होती किंवा नाहीं, किंबहुना ती सांप्रतही आपल्या समाजांत चालू आहे किंवा कसें, याचा शोध करण्याची खबरदारी घ्यावी. व त्याचप्रमाणें त्या वरस्थांच्या गोष्टीपासून अनर्थ तरी कोणते होण्यासारखे आहेत याचा नीट विचार करावा आणि मग तिचा तिरस्कार करावा, हें शहाणपणास व सुजनतेस अनुसरून आहे.

आतां नव्या समजुतीच्या सुधारकवर्गास एवढीच विनंति आहे कीं, आमच्या समाजांत चालू असलेल्या एकंदर चाली वाईट आहेत असें बेधडक विधान ठोकून देण्याचें धाडस न करितां नीट सूक्ष्मबुद्धीनें विचार करून आपलें वर्तन फाजीलपणाचें आहे असे सहसा वाटू देऊं नये. सुधारणेच्या बाबतींत उतावळेपणा तर मुळींच करतां कामा नये. आमचा हा समाज अतिप्राचीन असल्याकारणानें त्यात कोणती सुधारणा करणें झालें, तर ती बेताबाताने व हळूहळू करीत राहिलें पाहिजे. सुधारक मंडळीनें आणखीही एक गोष्ट लक्षांत वागविली पाहिजे कीं, सामाजिक सुधारणेच्या संबंधानें लोकमत जागृत करून त्यास योग्यप्रकारचे वळण देणे हें आपलें कर्तव्य आहे. हें कर्तव्य तें ज्या मानानें बजावतील त्या मानानें त्यांस त्यांत यश येणार आहे. त्याचप्रमाणें कोणतीही गोष्ट लोकांस पटली पाहिजे असें ज्यास वाटत असेल, त्यानें स्वतःचें आचरण तीप्रमाणें ठेवण्यास मनापासून झटले पाहिजे. याप्रकरणीं नातिधैर्याची अत्यंत आवश्यकता आहे. तरी सुधारकांनी आपल्या मुख्य उद्देशास जेणेंकरून अडथळा येईल, अशा क्षुल्लक गोष्टींच्यासंबंधानें फाजील दुराग्रह धरून जुन्या लोकांच्या मनात किळस उत्पन्न होईल असें आपले वर्तन ठेवूं नये. ज्या स्वतःच्याच केवळ सोईच्या गोष्टी असतील त्या समाजाच्या हितासाठी सोडणें फारच अगत्याचें आहे, इकडे सुधारकांनी अवश्य लक्ष पुरविले पाहिजे. पुनः या उभय प्रकारच्या लोकांस माझें इतकेंच सांगणें आहे कीं, तुमचे परस्परांविषयीचें वैमनस्य व्यर्थ आहे. नव्यांना ज्याप्रमाणें

स्वदेशाची उन्नति हवी आहे तशीच ती जुन्यांसही हवीच आहे. मतभेद काय तो उपायांच्या संबंधानें आहे. जुन्यांस वाटतें कीं, आहे तीच स्थिति चांगली आहे, व कांहीं फेरफार करणें असेल तर स्मृतिकाळाच्या वेळीं जी स्थिति होती, ती स्थिति पुनः प्राप्त झाली पाहिजे. सुधारकांचें म्हणणें असें आहे कीं, देशकाळवर्तमान पाहून व आपणास स्वदेशाच्या व इतर देशाच्या इतिहासाकडे पाहून जें योग्य व हितकर दिसेल त्याचप्रमाणें आधुनिक शास्त्रीय ज्ञानाच्यावृद्धीनें मनुष्याची दृष्टी फांकून ज्या नव्या हिताच्या गोष्टी त्यांस कळून येत आहेत, त्यांचें अवलंबन आपण अवश्य केलें पाहिजे. तेव्हां या दोन्ही पक्षांचा हेतु एकच आहे. उपाय मात्र निराळे आहेत. तरी या परस्परांच्या उपायांचे परस्परांनीं हटाग्रह सोडून केवळ सत्यप्राप्तीनें व स्वदेशहितबुद्धीनें परिक्षण करावे, आणि जें हिताचे वाटेल त्याचें ग्रहण करण्यास मुळींच मागें पुढे पाहूं नये. यांतच आमचें शाश्वत हित आहे.

***

# ३४ समाजास धर्माची आवश्यकता आहे काय?

(अप्रकाशित १८९६)

## उपोद्धात

सांप्रतकाळी या विषयाचा उहापोह होणें फारच जरूरीचे आहे. कारण आमच्या महाराष्ट्रांत व बंगाल्यांत हिंदुधर्माविषयीं सुशिक्षित लोकांच्या मनांत जागृति होण्यास कांहीं कारणें उपस्थित झाली आहेत. त्यांपैकीं एक असें कीं, म्याक्स्मुलर, बेबर आदिकरून पौर्वात्यभाषापंडितांनीं आपलें बहुतेक वय आणि बुद्धिमत्ता यांचा विनियोग आमच्या अतिपुरातन गीर्वाणभाषेंतील ग्रंथांचें परिशीलन करण्यात घालवून प्राचीन विद्योत्कर्षाविषयीं यथार्थ ज्ञान आंग्लभाषा जाणणारांस स्वलिखित ग्रंथद्वारें सुगम केलें. हे त्यांचे ग्रंथ वाचून आमच्या इंग्रजी भाषा शिकलेल्या गृहस्थांस आमच्या आर्यग्रंथांत कांहीं तरी जीव आहे असें वाटूं लागलें आहे. आणि त्यांपैकीं, कित्येकांची प्रवृत्ति आर्यधर्म व आर्य तत्वज्ञान यांचें अध्ययन करण्याकडें झाली आहे. आमच्या धर्माची महती परदेशीयांनी वाखाणल्यावरून आमच्यापैकी पुष्कळांच्या मनांत स्वधर्माविषयीचा अभिमान जागृत झाला आहे; आणि त्याचे उजौवन करण्याकडे कित्येकांचें लक्ष लागलें आहे. असें केल्यानें एकंदर हिंदुसमाजांत ऐक्यबुद्धि होऊन त्यांस पूर्वीचा उत्कर्ष पुनरपि प्राप्त होईल असें पुष्कळांच्या मनानें घेतलें आहे. दुसरें असें कीं, आनिबेझन्ट, कर्नल आल्कॉट प्रभृति थिऑसॉफिस्ट मंडळांनें असें जगजाहीर केलें आहे कीं, धर्माचे व जीवितसाफल्याचें खरे रहस्य आर्यधर्मातच उत्तम प्रकारचे आहे. यास्तव, आधुनिक हिंदुजातींनीं आपल्या धर्माचें पूर्वस्वरूप पुनरपि स्थापित करून तदनुसार आपलें आचरण सुधारावें म्हणजे त्यांस खरें सुख व खरी शांति प्राप्त होऊन, त्यांची वास्तविक उन्नति होईल. मिसेस आनिबेझन्टबाईंचें तर असें म्हणणें आहे कीं, हिंदूंनी पाश्चात्यांच्या प्रवृत्तिमार्गाचें अनुकरण करून त्यांच्यासारखें ग्राम्यसुखाच्या प्राप्तीसाठी अहर्निश प्रयत्नांत चूर होण्यांत मुळींच अर्थ नाहीं. खरें कैवल्य प्रवृत्तिमार्गानें

कदापि प्राप्त होणारे नव्हे. पाश्चिमात्यराष्ट्रांत सांप्रतकाळी जीवनार्थ कलहमूलक जी भयंकर विपत्ति व जो घोर अनाचार दृष्टीस पडत आहे, त्यावरून पाहतां या प्रवृत्तिमार्गानें मनुष्यास खरें सुख कधींही लाभावयाचें नाहीं, असा त्या बाईचा मोठ्या कळवळ्याचा बोध पुष्कळ जनांच्या चित्तांत पूर्णपणें ठसून गेला आहे. यास्तव, स्वधर्मोजीवनाकडे आमच्या लोकांचें लक्ष जाणें साहजिक आहे. यासंबंधानें दुसरें असें एक कारण सांगतां येण्यासारखें आहे कीं, आज आठशे वर्षे ज्या मुसलमान बांधवांनीं आमच्या शेजारी नांदून आपापला संसार कोणासही उपसर्ग न करितां चालविला होता, त्यांच्या मनांत या सुधारलेल्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं आमच्याविषयीं विक्षेप येऊन तें आमच्याशी तुटून वागविण्याविषयीं प्रयत्न करताहेतसे दिसतात. त्यांची आमची धर्मसंबंधानें भिन्नता असली तरी ती इतर ऐहिक व्यवहारांत कधीही अंतरायभूत झाली नव्हती. परंतु अलिकडे दहा वर्षात त्यांच्या मनांत आमच्याविषयीं थोडेसें वितुष्ट येऊन साधेल तेथें आमच्याशी कलह करण्यास तें प्रवृत्त होत आहेत. आतां हा असा त्यांच्या वृत्तींत प्रतिकूळ फेरफार कां झाला आहे याचें कारण सांगत बसण्याचा हा अवसर नव्हे. तथापि ही त्यांच्या आमच्यामधलीं दुफळी उत्तरोत्तर वाढतच जाण्याचा रंग आहे. ह्या अशा स्थितीमध्यें कित्येकांस असें वाटत आहे कीं, मुसलमानांत जशी धर्मसंबंधानें एकी आहे तशी आमच्या लोकांतही असणें इष्ट आहे. यास्तव ही उत्पन्न होऊन वृद्धि पावण्यासाठीं कोठें कोठें थोडीशी खटपट चालली आहे. गणपतीच्या उत्सवाच्या वेळचें मेळे अशाच धोरणानें निघाले आहेत, असा माझा समज आहे. तेव्हां त्या अशा समयास या शहरांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीनें हा विषय योजल्याबद्दल आपण सर्वांनी त्या मंडळीचें आभार मानलें पाहिजेत. आतां या विषयावर माझे स्वतःचें काय विचार झाले आहेत तें मी आपल्याला प्रांजलपणें सांगणार आहे. ते आपण शांत चित्ताने ऐकून घ्याल अशी मला उमेद आहे.

## व्याख्या

आपल्यापुढें विचारांस असलेल्या विषयांतील मुख्य शब्दाची प्रथमतः व्याख्या करणं इष्ट आहे. यांपैकी, पहिला शब्द समाज हा आहे. प्रकृत विषयांत या शब्दाचा उपयोग फारच व्यापकरीतीनें केला आहे. तरी आपण आपल्या इष्ट विवेचनाच्या सोईसाठी त्याचा अंमळ संकुचित अर्थ करूं. तो इतकाच कीं, समाज म्हणजे आपल्या या हिंदुस्थानांतील एकंदर जनसमूह, आणि तोही ब्रिटिश लोकांच्या अमलांत प्रत्यक्ष किंवा पर्यायानें असलेला तेवढाच समजावयाचा. या अशा समाजांत अर्थांत हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी वगैरे सर्व जातींच्या व सर्व धर्माच्या लोकांचा समावेश

होतो. इंग्लिशमध्यें बॉडिपॉलिटिक या शब्दांनी जो अर्थबोध होतो, तोच प्रकृत विषयांतील 'समाज' या शब्दाचा करावा असें मला वाटतें. समाज म्हणजे केवळ हिंदुसमाज असा या शब्दाचा अगदींच संकुचित अर्थ घेणें इष्ट दिसत नाहीं. मागें पुढे जे आमचें एकराष्ट्रीयत्व दृढ व्हावयाचें आहे, तें केवळ हिंदूपुरतेंच सहसा नव्हे, तर हल्ली हिंदुस्थानांत जें नाना धर्माचें व वर्णाचें लोक आहेत त्या सर्वांचें मिळून तें सिद्ध व्हावयाचें आहे. आणि ही अत्यंत अभीष्ट संसिद्धि सांप्रत राष्ट्रीय सभेसारख्या सार्वलौकिक संस्थांच्या योगानें साध्य होण्याच्या मार्गास लागली आहे. तेव्हां समाज या शब्दाची व्याख्या सध्याच्या आमच्या मिश्रसमाजास साजेल अशीच व्यापक करणें मला इष्ट दिसते. असो; आतां प्रकृत विषयांतला दुसरा मुख्य शब्द धर्म हा होय. याची येथें विशेष तात्विक व्याख्या करण्याची जरूरी नाहीं, असें मला वाटतें. कारण आधुनिककाळीं या शब्दाला एकच विवक्षित अर्थ प्राप्त झाला आहे. यास्तव त्याच्यासंबंधानें प्रस्तुत वादांत मुळीच भानगड उत्पन्न होणार नाहीं. तरी एकंदर लोकांच्या लक्षांत माझें पुढील विवेचन चांगल्यारीतीनें यावें म्हणून याही पदाची मी थोडक्यांत फोड करितों. तो अर्थात इतकीच कीं, **धर्म म्हणजें मनुष्य व अदृष्ट यांच्या परस्पर संबंधाची व्यवस्था.** यांत सामाजिक, राजकीय, नैतिक किंवा इतर कोणत्याही बाबीचा समावेश करावयाचा नाहीं. प्रकृत विषयांत आणखी एकच शब्द राहिला. तो 'आवश्यकता' हा होय. या शब्दाची प्रकृत विषयांत फारच व्यापकरीतीनें योजना केली आहे. यास्तव त्याचा संकोच त्याचा संकोच करावा हें ठरविणें मोठे मुष्किलीचें काम आहे. म्हणून धर्माची जितक्या प्रकारची आवश्यकता संभवण्यासारखी आहे, तितके सारे प्रकार घेऊन त्यांचें सक्षेपतः निरूपण करावें हाच मार्ग मला सोईचा व इष्ट दिसतो; आणि विषययोजकांचें धोरणही असेंच दिसते. आतां या आवश्यकतांचे वर्गीकरण तात्विकदृष्ट्या करण्यापेक्षा लोकव्यवहारदृष्ट्या तें केलें असतां विशेष सोईचें होऊन लोकांच्याही मनांत तें पूर्णपणें येण्यास अडचण पडणार नाहीं. यासाठीं आपण आवश्यकतेच्या एकाएका प्रकाराचा निर्देश करून त्यास धर्माचें सहाय्य कितपत होण्यासारखें आहे हें थोडक्यांत पाहू. धर्माची आवश्यकता दोन प्रकारची- एक व्यक्तीच्या दृष्टीनें व दुसरी समाजाच्या दृष्टीनें. या दोन प्रकारांपैकी आज दुसऱ्या म्हणजे समाजसंबंधाच्या आवश्यकतेचें विवेचन करावयाचें आहे.

## आवश्यकता

(१) पहिली आवश्यकता राजकीय संबंधाची. आमच्या देशावर सांप्रत परकीयांची सत्ता असून आमच्या धर्मांत कधींही हात घालावयाचा नाहीं, असा त्यांचा निर्धार

झाला असल्याकारणानें राजाला मान्य जो धर्म तो प्रजाजनांनींही पाळला असतां राजकृपा होते, अशी लालूच आम्हांला मुळींच नाही. आणि या बाबतीतील लोकांच्या मतस्वातंत्र्यास जो राजाकडून वेळोवेळां व्याघात होण्यासारखा असतो, ज्यामुळें युरोपांतल्या ख्रिस्ती समाजांत आज कैक शतकें मोठे संग्राम माजून राहिलें आहेत, त्यांपासून आम्ही सर्वप्रकारें मुक्त आहें. याप्रकरणीं आमच्या ब्रिटिशसरकारनें १८५० सालच्या जाहिरनाम्यांत निर्णय करून ठेविला आहे. तो अर्थात् हाच कीं, धर्माच्या बाबतींत ब्रिटिशसरकार निदान हिंदुस्थानात तरी उदास रहाणार आहे. यावरून त्यावेळच्या मुत्सद्यांच्या लक्षांत येवढीं गोष्ट स्पष्टपणें येऊन चुकली होती कीं, आमच्या देशांतील लोकांच्या धर्मात हात घालण्याचें धाडस करणें चांगलें नव्हे. कारण येथें अनेक धर्माचें व अनेक पंथांचे लोक असून त्यांस आपआपला धर्म परममान्य व पूज्य वाटत आहे. आतां कित्येक पाश्चात्य ग्रंथकाराचें असें म्हणणें आहे कीं कोणत्याही, जनसमूहास एक राष्ट्रीयत्व येण्यास त्यात एकच धर्माचें बंधारण हवें आहे. हिंदुस्थानांतील लोकवस्तीत हें बंधारण मुळींच शक्य नसल्यामुळें येथील लोकांचे एक राष्ट्रीयत्व कधींही सिद्ध व्हावयाचें नाहीं. आतां आमच्या देशातील एकंदर लोकांची राजकीय संबंधांची एकी होऊन त्यांस एकराष्ट्रीयत्व आल्यावांचून आमचा उत्कर्ष व्हावयाचा नाही, असें ज्यांस मनापासून वाटत आहे, त्यांपैकी कित्येकांचे असें म्हणणें आहे कीं, पाश्चात्यांनीं आमच्या देशास एकराष्ट्रीयत्व प्राप्त होण्याच्या संबंधानें जो धर्मविषयक प्रत्यवाय पुढें आणला आहे, तो खरा आहे. तेव्हां तो नाहींसा करण्याकरिता आम्हांस आमच्या धर्माचें मित्रत्व नाहीसें केलें पाहिजे. परंतु हे त्यांचे म्हणणें मुळींच जमेस धरण्यासारखें नाही. एकराष्ट्रीयत्वास एकच धर्माचें बंधारण पाहिजे अशी अट जे पुढें आणितात, त्यांनीं युनाइटेड स्टेटसारख्या मिश्र समाजाची स्थिति ध्यानांत आणिली असतां त्यांस आपल्या अटीत कांहींएक जीव नाहीं असें कळून येईल. या भूतलावर सध्याच्या स्थितींत कोणत्याच देशांत धर्मसंबंधाचें ऐक्य आढळून येणार नाही. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादि देशांत धर्मसंबंधीं पुष्कळ मतभेद माजून राहिला आहे तरी त्यांचें राष्ट्रत्व नष्ट झाले आहे असें कोण म्हणेल? या देशांतील लोकांच्या ठायीं स्वदेशाभिमान व स्वराष्ट्राभिमान जो दृष्टीस पडत आहे, तो धर्मसंबंधी ऐक्यामुळें आहे असें सहसा म्हणवत नाहीं. आतां एवढे बरीक खरें कीं, कांहीं शतकांपूर्वी धर्मसंबंधीं ऐक्यामुळें कित्येक जनसमूहांकडून मोठमोठे पराक्रम झालें असून अलीकडील कित्येक बलाढ्य राष्ट्रांचा पाया पडला आहे, आणि तो धर्मामुळें उत्पन्न झालेला आवेश व उत्साह यांच्याच योगानें मुख्यतः पडला आहे. हा इतिहास लक्षांत आणून कित्येक असें

म्हणतात कीं, आमच्या धर्माचें पुनरुज्जीवन झाले तर आमच्यांत नवा आवेश व नवा उत्साह उत्पन्न होईल आणि आम्ही आपले गेलेले स्वातंत्र्य पुनरपि मिळविण्यास समर्थ होऊं. परंतु ही आशा आमच्या या देशाच्यासंबंधानें सर्वथा विफळ आहे. कारण येथे हिंदुमुसलमान वगैरे निरनिराळ्या धर्मातील लोकांचा परस्परांशीं असा कांहीं निकट व दृढसंबंध घडून आला आहे कीं, तो कदापि तुटणें नाहीं. तो अक्षयी रहावयाचा. तेव्हां अशा स्थितीमध्यें हिंदूनीं, मुसलमानांनी वगैरे आपआपल्या पुरता विचार करून आपआपल्या धर्माचें उज्जीवन करूं लागणें राष्ट्रीय दृष्ट्या मुळींच हिताचे नाही. ह्या अशा जागृतीचें महत्व त्या त्या धर्माच्या लोकांस कितीही हिताचे असलें तरी एकंदर समाजाच्या हितास तें कारणीभूत होईल, असें सहसा म्हणवत नाही. माझी तर अशी समजूत आहे कीं, अशा धर्मोज्जीवनामुळें परस्पर मतभेद, व मत्सर विशेष वाढून व तो लोकांच्या लक्षांत विशेषरीतीनें येऊन परस्परांत वितुष्ट वाढण्याचा मात्र संभव आहे; आणि ह्या वितुष्टाचा काय परिणाम होतो हे हल्लीं आमच्याकडे होत असलेल्या हिंदुमुसलमानांच्या दंग्यावरून सर्वांच्या लक्षांत आलेंच आहे. तेव्हां एकंदरींत काय कीं, आमच्या समाजाच्या एकराष्ट्रीयत्वाला धर्माचें साहाय्य घेऊन चालावयाचें नाहीं. आमच्या देशांत धर्मभेद फारच विलक्षण तऱ्हेचा आहे. तो कदापि मिटावयाचा नाहीं. आणखी असें कीं, धर्मामध्यें ज्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्या गोष्टीं अशा आहेत कीं, त्यांचें यथार्थ ज्ञान मनुष्यास कदापि होणें नाहीं. शिवाय या प्रकरणीं पिढ्यानपिढ्या चालत आलेली कांहीं विशेष मते व प्रमाणग्रंथ असतात, त्यांच्यावर सामान्य जनांची पूर्ण श्रद्धा असते. यामुळें हा मतभेद कदापि दूर व्हावयाचा नाहीं; आणि ज्या गोष्टीच्या संबंधानें मनुष्यमनुष्यांमध्यें चिरकाळ मतभेद कायम राहावयाचा, त्या गोष्टींचें साहाय्य एकंदर समाजाच्या उत्कर्षासाठीं घेईन म्हणणारा निव्वळ वेडा होय. धर्म ही अशी गोष्ट आहे हें सर्वांस कळतच आहे. तेव्हां राजकीय उत्कर्षात त्याचें साहाय्य घेणें हिताचें होणार नाही, हे सिद्ध झाले. आतां हें असें धर्माचें ऐक्य नसलें तरी आमची राजकीय उन्नति होईल, असा दृढ संभव दिसतो. आमचा भिन्न समाज सध्यां एकाच सार्वभौम प्रभूच्या ताब्यांत आला असून आम्हांस कायद्यांचेंही बंधन सारखेच आहे. आमच्या धनोत्पादक कलांच्या संबंधानें आमचा परकीयांशी व खुद्द सरकाराशीं सारखाच संबंध आहे. एकास जो कायदा, कानू किंवा सरकारी व्यवस्था नडण्यासारखी असते, तशीच ती इतरांस नडण्यासारखी असते. अशाप्रकारें राजकीयसंबंधाच्या एकंदर बाबतीत आमच्या जनसमाजाचें सुखदुःख व हिताहित सारखेच गुंतून राहिलें आहे; आणि या प्रकरणीं उन्नति किंवा अवनति व्हावयाची ती ब्रिटिश लोकांच्या साहाय्यानेच व्हावयाची.

हीं इतकीं ऐक्यबुद्धीचीं कारणें उपस्थित असून पुनः इंग्रेजी भाषेचा सर्वत्र प्रसार होऊन आम्हांस परस्परांचे हृद्गत परस्परांस पाहिजे तेव्हां कळविण्याचीं सोय अनेक प्रकारें झाली आहे शिवाय राजकीयसंबंधाचें शिक्षण व ज्ञान ज्या पाश्चिमात्य ग्रंथांच्या व संस्थांच्या परिचयानें प्राप्त होण्यासारखें आहे, त्या सर्वांस सारख्याच सुगम होत चालल्या आहेत. सारांश काय कीं, आमच्या राजकीय उत्कर्षास साधनीभूत अशा पुष्कळ गोष्टी आम्हांस हळूहळू अधिकाधिक अनुकूल होत चालल्या आहेत; आणि त्यांचें सुफळ आम्हांस नाहीं तरी आपल्या पुढील संततीस खास प्राप्त होईल. परंतु या एका गोष्टीमुळें मात्र वारंवार व्याधात होत राहील. ती गोष्ट अर्थात आमच्या धर्माचा फाजील अभिमान. आमच्या समाजांत दुफळी व कलह होण्यास हा धर्मसंबंधच पुष्कळअंशीं कारण होणार आहे; आणि याचा दाखला आम्हांस राष्ट्रीयसभा स्थापन झाल्यापासून बराच आला आहे. आणखीं असें कीं, राजकीय संबंधाची कर्तव्यकर्मे जीं पुरातन धर्मग्रंथांतून विहित केली आहेत, त्यांत अलीकडे बरेंच रूपांतर झालें आहे; आणि राजनीतिशास्त्राला पुष्कळ अंशी निराळें स्वरूप प्राप्त झालें आहे. यास्तव आधुनिक राजकार्य धुरंधर पुरुषांस राज्यव्यवस्था, लोकनियमन वगैरे करितांना पुरातन धर्मग्रंथांचा आधार मुळींच घ्यावा लागत नाहीं. मनुष्य स्वतःच्या अनुभवाच्या आधारावर याप्रकरणीं नियम बांधून त्याप्रमाणें वर्तन करीत आहे, आणि या नियमांत जो वेळोंवेळां बदल होत आहे, तो पुरातन धर्मग्रंथ पाहून नव्हे तर आधुनिक राजकीय संस्थांचा अनुभव घेऊन होय. तर एकंदरींत काय कीं, राजकीय प्रकरणीं धर्माची सध्याच्या स्थितींत मुळींच आवश्यकता नाहीं, हें जें आतपर्यंत प्रतिपादन केलें त्यावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल.

**२. सामाजिक सुधारणेची आवश्यकता :–**सामाजिक सुधारणा या पदाने कोणता अर्थ वाच्य होतो हें येथें कोणालाही नव्यानें सांगावयाला नकोच त्याचप्रमाणें सामाजिक सुधारणेंत कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होत असतो हेंही सर्वांस माहीत आहेच. येथे प्रश्न एवढाच आहे कीं, या सुधारणेस धर्माची कांहीं जरूरी आहे कीं काय? माझ्या मते याही प्रश्नाचें उत्तर, नाहीं असेंच आहे. आमच्या चालीरीति व सवई यांचें मूळ जरी सर्वस्वी धर्मसंबंधांत आहे, तथापि आधुनिककाळी त्या धर्मसंबंधापासून अगदीं अलग मानण्याचा परिपाठ पडला आहे; आणि ही समजूत जितकी लोकांची जास्त दृढ होईल, तितकी त्या गोष्टींत सुधारणा लवकर होण्याचा संभव आहे. आणि आजपर्यंत आम्हीं सामाजिक सुधारणेच्या बाबतींत जे इतके मागासलो आहों याचे कारण केवळ आमची वर दर्शविल्यासारखी समजूत झाली नाहीं हेंच होय.

आधुनिककाळी निरनिराळ्या शास्त्रांच्या व इतिहासज्ञानाच्या सहाय्यानें समाजशास्त्र म्हणून एक मोठे व्यापकशास्त्र निर्माण झालें आहे. त्याच्या धोरेणानें आमच्या चालीरीतींत व सवईंत आम्ही फेर करीत रहाणें अत्यंत इष्ट आहे. सामाजिक संबंधाच्या उत्कर्षास कोणत्या गोष्टी कसकशा कारणीभूत होत असतात, व त्या गोष्टींचा प्रचार विवक्षित जनसमाजांत करणें झाल्यास कोणत्या प्रकारें केला असतां त्या समाजाचें हित होण्यासारखें आहे, इत्यादि गोष्टींचे ज्ञान या समाजशास्त्राच्या अध्ययनानें जसे प्राप्त होण्यासारखं आहे, तसें ते इतर कोणत्याही रीतीनें चांगलेंसें प्राप्त होणे नाही. केवळ धर्मग्रंथावरच आधार ठेवून त्यांत कोणत्या गोष्टी विहित केल्या आहेत, हें नीट समजावून घेतल्या म्हणजे आपलें कर्तव्य आटोपले असें कोणीच समजतां कामां नयें. पुरातनकाळच्या दूरदृष्टि व अभिज्ञ लोकनियंत्यांनी त्या त्या वेळच्या लोकस्थितीस अनुरूप असें नियम केलें होते. ते सारेच आधुनिकाळी योग्य, सोयीचे व हिताचे होतील असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचे निबिड अज्ञान प्रगट करणें होय. ज्या काळीं आमच्या धर्मग्रंथांचें प्रणवन झाले, त्या काळी हल्लींच्यासारखें शास्त्रज्ञान वाढले नव्हतें. यामुळें आमच्या ऋषीमुनींना नुसत्या अनुभवावरच व तेव्हांच्या लोकस्थितीचें सूक्ष्मबुद्धीनें अवलोकन करण्यावरच अवलंबून रहावें लागलें. यामुळे त्यांचे नियम त्या काळी कितीही मान्य व पूज्य वाटले तरी त्यांचें हितावहत्व अद्यापि कायम आहे असें मानणें इष्ट नव्हे. सध्यां जें शास्त्रीयज्ञान वाढलें आहे, त्याचें साहाय्य घेऊन आपल्या चालीरीति व सवई सुधारणें इष्ट होय. या प्रकरणीं केवळ धर्मग्रंथांवरच अवलंबून रहाणें मुळीच फायद्याचें होणार नाहीं. धर्मग्रंथाचा एवढा मात्र उपयोग होण्यासारखा आहे कीं, सध्यांच्या चालीरीतींत जे फेरफार करावयाचें किंवा नवीन चालींचा प्रचार करावयाचा त्यांस परिपोषक अशीं वचने त्यांतून दाखविल्यानें लोकांच्या मनांत त्या गोष्टींविषयीं अनुकूल ग्रह होईल. वस्तुत: पाहतां धर्म व सामाजिक चालीरीती यांचा निराळेपणा जितका स्पष्टपणें स्थापित होईल तितके हिताचे आहे. कारण धर्माचा प्रांत व सामाजिक गोष्टींचा प्रांत अगदीं पृथक आहे. धर्मानें केवळ ईश्वरसंतोष व मोक्ष प्राप्त करून द्यावयाचा, आणि सामाजिक गोष्टींनी प्रपंच सुखाचा व नेटका करावयाचा. धर्माचा उपयोग परमार्थसिद्धीकडे आहे; आणि सामाजिक चालीरीतींचा उपयोग प्रपंचसाधनासाठी आहे. धर्माचें सत्यज्ञान परमेश्वराच्या कृपेवांचून व्हावयाचें नाहीं; परंतु सामाजिक गोष्टींचे ज्ञान मनुष्यप्रयत्नानें सर्वतोपरी साध्य होण्यासारखें आहे. जीवनेंद्रियशास्त्र, आरोग्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र यांच्या अत्यंत विवेकशुद्ध पायावर सामाजिक गोष्टींची इमारत रचली असतां जशी ती बळकट व हितावह व्हावयाची, तशी ती

धर्मरूप पायावर रचल्यानें कदापि व्हावयाची नाहीं. आणखी असें कीं, कित्येक सामाजिक गोष्टी अशा आहेत कीं, त्यांच्यासंबंधानें आमच्या देशांत प्रवृत्त असलेल्या निरनिराळ्या धर्मात परस्पर विरुद्ध आज्ञा केल्या आहेत, अशा विरोधाचा निर्णय आमच्या या मिश्रसमाजांत सर्वांस सोईचा व सुखाचा होईल असाच होणें इष्ट आहे. यास्तव अशा गोष्टींत आधुनिक शास्त्रांचेच साहाय्य घेणें इष्ट होय. या एकंदर उहापोहाचें तात्पर्य म्हणून इतकेंच कीं, सामाजिक सुधारणेंत धर्माचें जितके कमी साहाय्य घ्यावें तितके हितच होणार आहे.

**३. सांपत्तिकसंबंधाच्या उत्कर्षाची आवश्यकता :–**आपल्या देशांतील धनोत्पादक धंदे उत्कर्षस्थितीस पावून नवे उपयुक्त धंदे उपस्थित होणें अत्यंत इष्ट आहे. सध्यां आमची या प्रकरणी जितकीं स्थिति खालावली आहे, तितकीं दुसऱ्या कशाच्याही संबंधानें नाही. परंतु त्याप्रकरणीं धर्माचें काहीएक साहाय्य व्हावयाचें नाहीं, उलट त्याच्यामुळें आमच्या समाजाचे अनेक प्रकारे नुकसान होत आहे. धनोत्पत्तीसाठीं झटणें म्हणजे प्रवृत्तिमार्ग आणि धर्माप्रमाणें आचरण करणें म्हणजे निवृत्तिमार्ग, यांचा परस्परसंबंध मुळींच नाहीं; तर उलट त्यांचा सर्वतोपरी विरोधच आहे. ऐहिकसुखविषयांच्या प्राप्तीसाठी धनाचें संपादन करण्यात गढल्यानें धर्माकडे दुर्लक्ष होतें, आणि धर्माचरणाकडेच सर्वस्वी लक्ष पुरविल्यानें ऐहिक सुखाविषयीं उदासीनता उत्पन्न होऊन कोणताच उद्योग झटून करावासें वाटत नाहीं. आमच्या समाजांतील ज्या लोकांत ही धर्मपरायणता, ही निवृत्ति विशेष आढळते, त्यांच्या आंगीं धनार्जनास लागणाऱ्या बहुतेक गुणांचें ज्ञान बेताचेच असते. तेव्हां अर्थात धर्माचें सांपत्तिक उत्कर्षास मुळींच साहाय्य व्हावयाचें नाही. धर्माच्या नांवाखाली मोडणारा जातिभेद, सोवळेंओवळे, परदेशगमनासंबंधी प्रतिबंध, इत्यादि गोष्टींचा विचार केला असतां हाच निर्णय होईल.

**४. ज्ञानोन्नतीची आवश्यकता :–**ज्ञानाचे विभाग दोन. एक विभाग प्रपंचविषयक ज्ञानाचा आणि दुसरा परमार्थविषयक ज्ञानाचा. यांपैकीं परमार्थ ज्ञान म्हणजे अर्थात् धर्मज्ञान होय. तेव्हां तें प्राप्त होण्यास धर्माचें सहाय्य अवश्य हवें हे सिद्धच आहे. पुनः असें कीं, परमार्थविषयकज्ञान बहुतेक अतींद्रिय असल्याकारणानें तें मनुष्यप्रयत्नानें फारसें प्राप्त होणारे नव्हे. ते पुरातन आर्यधर्मग्रंथांच्या साहाय्यानें किंवा ईश्वराकडून प्रेरणा पावलेल्या धर्मसंस्थापकांच्या साहाय्यानेच प्राप्त व्हावयाचें. परंतु प्रपंचविषयक–ज्ञानाची गोष्ट तशी नाही. ते धर्मग्रंथांच्या किंवा धर्मसंस्थापकांच्या साहाय्यानें फारसे प्राप्त होणारें नाहीं. तें मनुष्यानें स्वप्रयत्नानेच साध्य करून घेतलें पाहिजे. अशाप्रकारें

प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचा धर्मग्रंथांतरी सांगितलेल्या कित्येक गोष्टींशीं विरोध उत्पन्न होतो. याचें कारण उघडच आहे कीं, फार प्राचीनकाळी ज्या पुरुषांनीं त्या ग्रंथांचे प्रणयन केलें त्यांच्या त्यावेळच्या कोत्या प्रापंचिकज्ञानाचें त्यांत प्रदर्शन होणें साहजिक आहे. या वारंवार उत्पन्न होणाऱ्या विरोधास्तव पुरातनधर्मग्रंथ ईश्वरप्रणीत मानणाऱ्या मनुष्यांनी प्रापंचिक ज्ञानाचा उत्कर्ष करणारांचा आजपर्यंत अनेक प्रकारें छळ व तिरस्कार केला आहे. यामुळें जगाच्या ज्ञानोत्कर्षास आजपर्यंत पुष्कळ प्रत्यवाय धडला आहे. आधुनिक शास्त्रशोध ज्यांच्या प्रयत्नानें सिद्ध झाले आहेत, त्यांपैकीं बहुतेकांस धर्मपरायण पुरुषांकडून अनेक प्रकारी प्रतिरोध झाला आहे. या छळाचा इतिहास वाचला असतां अंगावर शहारें येतात. यावरून पाहतां प्रापंचिक ज्ञानास धर्माकडून साहाय्य न होतां उलट प्रतिरोध मात्र अनेक प्रकारीं झाला आहे व पुढें होण्यासारखा आहे. शूद्रांस वगैरे वेदादिकांचें अध्ययन धर्माच्या नांवाखालीं वर्ज केल्यामुळें आमच्या समाजाचीं किती हानि झाली आहे तें सर्वांस कळतच आहे.

**५. नैतिक उन्नतीची आवश्यकता :–**हें प्रकरण मात्र धर्माच्या आटोक्यांतले आहे. किंबहुना त्याचा धर्मावर सर्वस्वी आधार आहे असें मानण्याकडें पुष्कळ लोकांची आजला प्रवृति आहे. धर्माविषयीं मनुष्य उदास झाला किंवा त्यावरील त्याचा विश्वास उडाला असतां, सर्वत्र अनीति माजून समाजाचा सर्व प्रकारें नाश व्हावयाचा, असा अभिप्राय पुष्कळांचा आहे? मनुष्यास बालपणापासून जें नीतिशिक्षण मिळते, त्यामध्ये ही समजूत त्याच्याठायीं दृढ करण्याविषयीं नेहेमीं प्रयत्न चालू असतो. त्याचप्रमाणें मोठमोठ्या धर्मग्रंथांत व इतर पूज्य व मान्य पुरुषांच्या बोधांत हाच विचार नेहेमी जनमनावर बिंबविण्याचा प्रयत्न असतो. यामुळें धर्मावांचून नीति नाहीं आणि नीतिवांचून धर्म नाहीं, असा बहुतेकांचा सिद्धांत झाला आहे. धर्मसंबंधीं कित्येक सिद्धांतावर अश्रद्धा झाली असली तरी नीतिसाठी धर्मावरील श्रद्धा लोकांची सहसा कमीं होऊं नये, असें कित्येकांस वाटत असतें. याप्रकारें धर्माची नीतीस सर्वतोपरी आवश्यकता आहे असें मानण्याचा परिपाठ आहे. परंतु आमच्या या देशात प्राचीनकाळी बौद्धधर्माच्या लोकांनीं व पाश्चिमात्य राष्ट्रांत आधुनिककाळीं कित्येक शास्त्रज्ञ पुरुषांनीं, नीतीस धर्माचीं मुळींच आवश्यकता नाहीं असें प्रतिपादन केलें आहे. आज जगांतील एकतृतियांश लोकसंख्या बुद्धधर्माची असून त्यांचा आत्मा, ईश्वर, परलोक वगैरे धर्मसंबंधीं मुख्य मुख्य सिद्धांतावर मुळींच विश्वास नाहीं. देव आहे व तो आपल्या पातकांबद्दल आपणांस शासन करील असें ते मुळींच मानींत नाहीं. त्यांच्या बुद्धीचा निश्चय असा

दिसतो कीं, नित्याचरण करून असद्‌वृत्तींचा नाश व सदवृत्तींचा विकास करणें, हाच मानवाचा परमधर्म होय. या सिद्धांताप्रमाणें त्यांचे वर्तन अहर्निश चालत असून, ते नित्याचरणाच्या बाबतींत धर्म मानणाऱ्या इतर जनसमाजाहून कोणत्याही प्रकारें कमी नसून उलट कित्येक बाबतींत इतरांहून श्रेष्ठही आहेत. त्याचप्रमाणें पाश्चिमात्य राष्ट्रांत शास्त्रीयज्ञानाचा प्रसार होऊन पुष्कळ लोक संशयवादी किंवा नास्तिक बनले आहेत. तरी त्यांची नीतिमत्ता कोणत्याहीं प्रकारे कमी नसते. उलट त्यांच्यांत गुन्हेगारांची संख्या फारच थोडी आढळते, असें पुष्कळ धर्मशीलपुरुषांच्या शोधावरून सिद्ध झालें आहे. कांहीं वर्षापूर्वी लंडनमधील कांहीं धर्मगुरूंनीं लंडनांतल्या तुरुंगांतील एकंदर कैद्यांच्या धर्माविषयीं चौकशी केली. तीवरून त्यांस असें कळून आले कीं, लंडनांतील तीस लाख वस्तीपैकीं तीस हजार लोक कैदखान्यामध्यें असून त्यांपैकीं अवघे दहा असामी नास्तिक होते. खानेसुमारीवरून पाहतां लंडन शहरांत तीस हजार लोकांनीं आपला कोणत्याच धर्मावर विश्वास नाहीं असें लिहून दिले होतें. तेव्हां एवढीच नास्तिकांची संख्या त्या शहरांत त्या चौकशीच्या वेळीं होती असें घेऊन चालले तरी, कायद्याविरुद्ध गुन्हे करणाऱ्या नास्तिकांचें प्रमाण तीन हजारांस एक असें बसतें, आणि लंडन येथील एकंदर लोकवस्तीतील गुन्हेगारांचें प्रमाण पाहतां शंभरास एक असें बसते. पुनः जे दहा असामी नास्तिक गुन्हेगार धर्मगुरुमंडळास आढळले, त्यापैकीं पांच असामी अगदीं तरुण असून त्यांना धर्माची मुळीं कल्पनाच नव्हती. ते पहिल्या प्रतीचे उनाड व अडाणी होते. यावरून पाहतां नास्तिक लोकांच्या हातून अगदी कमी; गुन्हे होतात असें सिद्ध होते. असेंच आणखी एक उदाहरण अमेरिकेंतले आहे, संयुक्त संस्थानांत एका नास्तिक गृहस्थाचा दरवर्षी असा क्रम असतो कीं, तो उत्तरेकडील संस्थानातील वर्तमानपत्रांतल्या माहितीच्या आधारावरून जे जे धर्मोपदेशक कांहींनाकांहीं गुन्हे केल्यामुळें कोर्टापुढें येऊन त्यांस शिक्षा होते, त्यांच्या नांवाची यादी तो छापीत असतो; आणि त्या भागांतील एकंदर गुन्हेगारांचें लोकसंख्येशी काय प्रमाण आहे तें सांगून या धर्मोपदेशक वर्गातील गुन्हेगारांचे प्रमाण दाखवित असतो. त्यावरून असें दिसून येतें कीं, धर्मोपदेशक गुन्हेगारांचे प्रमाण नेहमीं फार मोठे असतें. याप्रमाणें माहिती दिल्यावर हा नास्तिक असें जगजाहिर करीत असतो कीं, धर्मगुरूंनी किंवा इतर कोणी धर्माभिमानीं पुरुषांनीं माझ्यासारख्या प्रयत्न व शोध करून नास्तिक गुन्हेगारांचीं यादी करावी, अशाप्रकारें जो कोणी नास्तिक गुन्हेगारांची नांवें सांगेल त्याला मी प्रत्येकीं दहा दहा डॉलर द्यावयास तयार आहे. परंतु ह्या त्याच्या सांगण्याप्रमाणें

कोणीच, प्रयत्न करीत नाहीं; म्हणून तो प्रतिवर्षी दिलगिरी प्रदर्शित करीत असतो. हें दाखले देण्याचें कारण इतकेंच कीं, धर्मावांचून नीति रहावयाचीच नाहीं, असा ज्यांचा आग्रह असतो, त्यांनीं अंमळ संभाळून बोलावें इतकेंच त्यांस सुचवावें.

आतां या मुद्याचा आपण तात्त्विकदृष्ट्या विचार करूं. नीत्याचरणाचा हेतु इतकाच आहे कीं, तेणेंकरून स्वतःचें व पराचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, तात्कालिक किंवा भावी सुख साध्य व्हावें. जेणेंकरून जनांस सुख होते ती नीति आणि जेणेंकरून दुःख होते ती अनीति, हा सुखसंबंध केवळ ऐहिक होय. सर्व सदुणांचें स्वरूप पाहतां त्यांचा मनुष्यामनुष्यांमधील संघावरच सर्वस्वी आधार असतो. परंतु धर्माची गोष्ट तशी नाहीं, त्याचा संबंध स्वत: पुरताच असतो. ईश्वरास प्रसन्न करून घेऊन पापापासून मुक्त होऊन अक्षयलोकीं गमन व्हावे, एवढाच धर्माचा हेतु आहे. याप्रमाणें धर्म व नीति यांचे प्रांत सर्वथा भिन्न भिन्न आहेत. नीतीचा फक्त इहलोकीच्या व्यवहारापुरता संबंध असतो. परंतु धर्माचे परमार्थप्राप्तीकडेच धोरण असतें. धर्मात नीतीचा अंतर्भाव करण्याचें कारण एवढेच कीं, ती समाजसुखसाधनास अत्यावश्यक असल्यामुळें तिचे अनुसरण मनुष्याकडून योग्यप्रकारें व्हावें, यासाठीं ती देवानें आज्ञापिली आहे; व तिचा भंग केला असतां देवाचा क्षोभ होऊन नरकप्राप्ती होईल अशी दहशत लोकांना घालावी. या योजनेपासून मानवीसमाजाच्या बाल्यावस्थेमध्यें न अजाण स्थितीमध्यें फारच फायदा झाला, हें इतिहासावरून सिद्ध होते. परंतु नीतीच्या मुख्य मुख्य नियमांची उपयुक्त ता लोकांच्या लक्षांत दीर्घकाळच्या अनुभवावरून आल्यानंतर ही ईश्वरीक्षोभाची भीति लोकांच्या लक्षांत फारशी वागेनाशीं होणें साहजिक आहे. पुनः आधुनिककाळीं शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार वाहून धर्माच्या कित्येक सिद्धांतावर अश्रद्धा उत्पन्न झाल्याकारणानें नीतीचा हा धर्मरूप पाया बराच डळमळू लागला आहे. ही स्थिति लक्षांत आणून पाश्चिमात्य राष्ट्रांतील कित्येक तत्वज्ञपुरुषांनी विवेकशुद्ध अढळ पायावर नीतिशास्त्र रचण्याचा प्रयत्न चालविला आहे. अशा परोपकारी प्रयत्नशील पुरुषांमध्ये हर्बर्टस्पेन्सर हे अग्रणी होत. यांचें नीतिशास्त्रावरील एकंदर ग्रंथ हल्ली मराठी वाचकांस दाभोलकर आणि मंडळीच्या परिश्रमानें साध्य झालें आहेत. त्या ग्रंथांचे परिशीलन ज्यांनीं केलें असेल, त्यांना या तत्वज्ञचूडामणीस आपल्या प्रयत्नांत किती यश आले आहे तें चांगलें कळले असेल. वस्तुतः पाहतां नीतीचा संबंध ऐहिक प्रापंचिक गोष्टीशीच असल्याकारणानें, तिचे विवेचन व तिच्यासंबंधाचे नियम करावयाचें तें आधुनिककाळीं उत्कर्ष पावलेल्या निरनिराळ्या शास्त्रांच्या साहाय्यानें केलें असता त्यांचा पाया विवेकशुद्ध व दृढ झाला असें होईल. ही शास्त्रे मनुष्यप्रयत्नसाध्य असून त्यांचा आधार नीतिशास्त्रास

सर्वप्रकारें आहे. यास्तव, हें नीतिशास्त्र मनुष्यास स्वप्रयत्नानें प्राप्त होण्यासारखे आहे. प्राचीन धर्मग्रंथांत जे कांहीं नीतिनियम आढळतात, त्यापैकी आधुनिक काळी कोणते हितावह किंवा अप्रयोजक आहेत, याचा निर्णय करणें तो आधुनिक शास्त्रांच्या साहाय्यानेंच केला पाहिजे. केवळ धर्मग्रंथांत हें नियम सांगितलें आहेत म्हणून तें आपणांस सर्वतोपरी मान्य असले पाहिजेत, त्यांपासून अनिष्ट परिणाम झाले तरी चिंता नाहीं, असें जे कोणी आग्रह धरीत असतील, ते समाजाच्या उत्कर्षास अंतराय आणितात असे होईल. नीतीनें वागले असतां ईश्वरीप्रसाद होऊन पारलौलिक सुखप्राप्ति होते, आणि अनीतीनें वागले असतां ईश्वरी कोप होऊन नरकप्राप्ति होते, असा जोपर्यंत जनांचा समज असतो, तोपर्यंत खऱ्या कार्यकारणभावाचा उमज लोकांला होत नसतो. अमुक एका वर्तनप्रकाराचा परिणाम अमुक होतो असा सृष्टिनियम आहे. तो सर्वस्वी अबाधित असून कदापि टाळतां येण्यासारखा नाहीं, असें मनुष्यास स्पष्टपणें कळल्यानें व त्याचा व्यवहारांत प्रतिपदी अनुभव आल्यानें त्याच्या मनाची विवक्षित वर्तनप्रकाराविषयीं यथार्थ बुद्धि होते; आणि जर तो वर्तनक्रम सुखपरिणामी असला तर त्याचें अवलंबन करण्याकडे त्याची प्रवत्ति होते, आणि जर त्यापासून दुःखप्राप्ति होण्याचा संभव असला तर तो त्या वर्तनप्रकारापासून परावृत्त होण्याचा प्रयत्न करितो. या प्रयत्नांत त्याला यश येणें ते अर्थात् त्याच्या मनोनिग्रहावर अवलंबून असतें. अशाप्रकारें सदाचार कोणता व दुराचार कोणता, याविषयीं जनांची स्पष्टपणें खात्री झाल्यानें त्यांच्याकडून नीत्याचरण होण्याचा जितका संभव असतो, तितका केवळ परलोकीं ईश्वराकडून शासन होईल असें सांगितल्यानें नसतो. कारण हे शासन मरणोत्तर प्राप्त होणारें असल्यामुळें त्याचे स्पष्टज्ञान मानवास होण्यासारखें नाहीं. शिवाय तें फार लांबणीवर पडल्यामुळें त्याच्याविषयीं मनुष्यास फारशी परवा वाटत नाही. याप्रमाणें ज्या आचरणप्रकारांचा परिणाम येथल्यायेथें कसा काय घडतो ते स्पष्टपणें समजावून देण्यासारखें असतें, त्याविषयी केवळ मरणोत्तर ईश्वराकडून शासन होईल असें सांगणें मुळींच चांगलें नव्हे. पुन: हा नीतीचा धर्मरूप पाया सर्वदा सर्व लोकांच्या संबंधानें सारखाच हितकर होईल असें सहसां म्हणवत नाहीं; कारण सर्वच सारखें ईश्वरीधर्मपरायण असतात असें कांहीं नाहीं; आणि अलीकडे तर शास्त्रीयज्ञानाच्या प्रसारानें धर्मसंबंधी कित्येक सिद्धांतावर लोकांची अश्रद्धा वाढत चालली आहे. यास्तव हा नीतीचा धर्मरूप पाया दुर्बल व ढांसळणारा आहे. आणखीं असें कीं, नीतिशास्त्राची नेहमीं उन्नती होत राहिली पाहिजे. कारण जसजसे मनुष्याचें व्यवहार अधिकाधिक बिकट व विविध होत चालले आहेत, तसतसे नीतिनियमांत योग्यप्रकारचें फेरफार होणें इष्ट

आहे. हा फेरफार अर्थात् नेहमी वाढत असणाऱ्या शास्त्रीय ज्ञानाच्या साहाय्यानें व्हावयाचा. धर्माच्या साहाय्यानें ही सुधारणा होण्याची मुळींच आशा नाहीं. कारण धर्मसंबंधीं ज्ञान यापुढें आणखीं वाढण्यासारखें नसून कित्येक सनातन धर्मवाद्यांचें तर असे म्हणणें आहे कीं, धर्माचें पूर्वीचें शुद्धरूपच पुनरपि कायम झालं पाहिजे. त्यामध्यें मनुष्यप्रयत्नानें फेरफार होणें सहसा इष्ट नव्हे. इतकी ज्याची मर्यादा आकुंचित, त्याचें साहाय्य नीतिशास्त्रवृद्धीस कसें घेतां येईल बरें? धर्माचा इतिहास पाहिला असतां, व निरनिराळ्या धर्माची तुलना केली असतां असें दिसून येतें कीं, बहुतेक धर्मसिद्धांत कायम झाल्यासारखें असून, त्यांत सांगितलेलें नीतिनियम ज्याकाळीं निरनिराळें धर्म अस्तित्वांत आले, त्या काळच्या स्थितीस अनुरूप असें होते. खरोखर पाहावे तर त्यावेळच्या नीतिशास्त्रांत आणि हल्ली सर्वत्र संमत होत चाललेल्या नीतिशास्त्रांत पुष्कळ अंतर आहे; आणि जसजसा अनुभववेद्यज्ञानाचा संग्रह वाढत जाईल, तसतसा नीतिशास्त्राचा उत्कर्ष वाढत जाणार आहे. यासाठीं त्याची इमारत धर्माच्या पायावर रचण्याचा आग्रह धरून चालावयाचें नाहीं. नीतिशास्त्राचा बहुतेक भाग हल्ली राजकृत कायद्यांनीं निर्बद्ध झाला आहे. कायदे करणारे लोक या लोकनियमरूप नीतिविभागांत जे फेरफार वारंवार करीत असतात, ते कोणत्याही धर्माचें साहाय घेऊन कदापि करीत नाहींत; तर व्यवहारांत पदोपदी जो अनुभव येत चालला आहे, त्याच्या धोरणानें केवळ जनसुखवृद्धीवरच दृष्टी ठेऊन तो करीत आहेत. याप्रमाणें नीतिशास्त्राच्या या एका मोठ्या अंगाच्या संबंधानें धर्माचा आधार कोणीच घेतनासे झाले आहेत. आतां नीतीचे दुसरें अंग जें चालीरीतींच्या संबंधाचे, त्याविषयीं पाहूं जातां तें मुख्यतः पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटींवरच अवलंबून असतें. आमच्या धर्मशास्त्रांत जे या चालीरीतीचें विहितत्व स्थापित केलें आहे, तें तरी त्या त्या काळची वस्तुस्थिति पाहूनच केलें आहे. या पूर्वापार चालत आलेल्या आचारांस आमच्या मनुस्मृतीसारख्या ग्रंथांतून जो धर्माचार प्राप्त झाला आहे, तो केवळ लोकनियमानासाठीं आहे. कारण धर्मभय व धर्मविहित शासन यांचा अंमल मनुष्याच्या मनावर जितका चांगला होतो, तितका दुसऱ्या कशाचाही समाजाच्या आद्यस्थितींत होत नसतो. या दृष्टीनें पाहतां आमच्या धर्भग्रंथकारांनी आपल्या काळीं धर्मांत व्यवहाराचा अंतर्भाव केला होता, तो ठीकच होता. परंतु हल्लीच्या विचारयुगांतही हाच क्रम चालू ठेवणें मुळींच चांगले नाहीं. यापासून समाजाच्या उत्कर्षास अनेक प्रकारें प्रत्यवाय येतो. आमचा समाज मिश्र असल्याकारणानें पूर्वीसारखें आता अप्रयोजक व निरर्थक आचारांचें बंड कायम ठेवणें हिताचें नाहीं, असें विचारी लोकांस हल्ली वाटत आहे. परंतु त्यांस धर्माधार

असल्याकारणानें ते बंद पाडणें मुष्किलीचें झालें आहे. या नीतीच्या अंगाचे सामाजिक उत्कर्षाच्या विभागात थोडेसे निरूपण केलें आहे. तेव्हां त्याची येथें पुनरुक्ति नको. येथें आणखी इतकेंच सांगण्यासारखें आहे कीं, आमच्या मनुस्मृत्यादि धर्मशास्त्रग्रंथात सांगितलेलें कायदे जसें आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यास फारसे मान्य नसून, त्यांनीं ते युरोपियराष्ट्रांत उन्नति पावलेल्या या नीतिविभागाच्या धोरणावर रचले आहेत, आणि ते बहुतेक आमच्या खऱ्या हिताचे परिपोषक व वर्धक आहेत अशी आपली खात्री झाली आहे. त्याचप्रमाणें त्या धर्मशास्त्रांतील दुसरें अंग जें सामाजिक चालीरीतीचें तेही धर्मापासून अलग होऊन त्याचे नियमन आधुनिककाळच्या शास्त्रीय शोधांच्या साहाय्यानें सर्वस्वी करणें उचित होय. आतां या मुद्याच्या संबंधानें फक्त एका गोष्टीविषयीं सांगणें राहिले. ती अर्थात् अशी कीं, नीतिनियमांचें अनुसरण केलें नाहीं तर त्याबद्दल योग्य शासन होण्याची भीति असावी. पुष्कळांच्या मतें हे शासन धर्माच्या साहाय्यानें जसें होण्यासारखें असते, तसें ते इतर कशानेही व्हावयाचें नाहीं. म्हणून धर्मावांचून नीति रहावयाची नाहीं. आतां या धर्मशिक्षेच्या संबंधानें पूर्वी थोडेसें सांगितलेंच आहे. येथें या प्रकरणी इतकेंच सांगण्यासारखें आहे कीं, या धर्मसंबंधीं शासनाची दुर्बलता समाजनियंत्यांच्या लक्षांत अगदी प्राचीन काळापासून येऊन त्यांनीं राजाचे कायदे म्हणून लोकांच्या आचरणासाठी नियम केले, आपण जो कोणी त्या कायद्यांचें उल्लंघन करील त्याला राजशासन होईल असें विहित केले. आतां या कायद्यांत समाजव्यवस्था-विघातक अशा सर्व दुर्वर्तनाचा व समाजव्यवस्थेस साहाय्यभूत होणाऱ्या अशा एकंदर सद्वर्तनाचा समावेश केला आहे. याप्रमाणें या अत्यंत महत्वाच्या नीतिशास्त्राच्या अंगाविषयीं मनुष्यजातीची फार पुरातन काळापासून यथार्थ बुद्धि होऊन धर्मांवर मुळींच आधार नाहीसा झाला आहे. आता समाजव्यवस्थेस ज्या गोष्टींनी प्रत्यक्षरीत्या अपाय किंवा हित होण्यासारखें नाही. त्यांचा अंतर्भाव नीतीच्या दुसऱ्या अंगांत होत असतो. या अंगांत बहुतेक चालीरीतींचा व सवईंचा अंतर्भाव होतो. कायद्यानें निर्बद्धित जी नीति ती शाश्वत होय; व इतर सामाजिकसंबंधाच्या नीतीचे स्वरूप अशाश्वत असून निरनिराळ्या जनसमूहांत ती निरनिराळ्या रूपांनीं आढळतें; आणि तिच्यासंबंधाचें शासन केवळ लोकमतावरच अवलंबून असतें. लोकांत छी: थूः होऊं नये, लोकांनीं आपणास चांगलें म्हणावें, याच उदेशानें या सामाजिक नीतीचें अवलंबन होत असतें; लोकभीति हेंच या नीतीस योग्य शासन होय. धर्माचें शासन केवळ उपरी असून तें अज्ञान काळांत मानले होतें. धर्माचरण व इतर आचारविचार यांचा अर्थाअर्थी कांहींएक संबंध नाहीं व असावा. असाच अभिप्राय शोधक पुरुषांचा आहे. याप्रमाणें नीतीच्या

दोन अंगांची व्यवस्था झाली. आतां तिचें तिसरे एक अंग आहे. त्याविषयीं थोडेसें सांगतों.

समाजांतील मनुष्यांनीं परस्परांस कोणत्याही बाबतींत उपद्रव न होईल असें वागावें, ही जशी नीति आहे, त्याप्रमाणें त्यांनी परस्परांच्या हितासाठीं साधेल तेवढें झटावें, हीही नीति आहे. परंतु या नीत्यांगाचा कोणाकडून भंग झाला असतां त्यास राजशासन होत नाही, व लोकांकडूनही त्यांना शासन होत नाही. परंतु समाजामध्यें या नीतीचा उत्कर्ष तर अवश्य झाला पाहिजे; एरवी समाजाची सुधारणा होणें नाहीं. यास्तव, तिचा पाया धर्मावरच असला पाहिजे असें पुष्कळांचे म्हणणें आहे. स्वतःच्या हिताची परवा न करितां आपल्या बांधवांस आपल्याकडून होईल तेवढीं मदत करण्यास मनुष्य चार प्रकारांनीं प्रवृत्त होतो. एक, त्याला लोकांकडून पुढें कधीतरी लाभ होण्याची आशा असते; दुसरा, असें केल्यानें आपणाला लौकिक प्राप्त होऊन लोकांत आपली मान्यता वाढण्याची आशा असते; तिसरा, असें केल्याने पुण्यप्राप्ति होऊन मरणोत्तर स्वर्गप्राप्ति होईल अशी आशा असते. चवथा, या तिन्ही आशा त्यास नसून लोकांची विपत्ती किंवा संकट पाहून केवळ नैसर्गिक कळवळ्यामुळें मनुष्य लोकांच्या हितासाठी झटतो. यापैकीं पहिले तीन प्रकार केवळ आपलपोटेपणाचे होत. तरी कित्येक उन्नत धर्मपंथांत मनुष्याच्या मनास उन्नति प्राप्त होऊन वसुधैव-कुटुंब अशी त्याची वृत्ति होते. जातिभेद, राष्ट्रभेद वगैरे, कोणतीच कृत्रिम गोष्ट मनांत न आणितां, केवळ मनुष्य तेवढां आपला बाधक होय, अशी त्याची वृत्ति होते. त्याचे हित तें आपलें हित, त्याच्या हितासाठी झटणें हेंच आपलें कर्तव्य आहे, अशी त्याची समजूत होते. हीं अशी ज्याच्या मनाची स्थिति होते त्याच्या हातून केवळ निरपेक्षबुद्धीनें जनहित होतें. अशा प्रकारचे परोपकारी जन उत्पन्न करण्याचें सर्वच धर्मास साधत नसतें. बुद्धधर्म, स्टोईक लोकांचे धर्मरूप तत्वज्ञान, आमच्या गीतेंत प्रतिपादन केलेला वेदांतधर्म यासारख्या फारच थोड्या धर्मपंथांच्या योगानें ही वृत्ति प्राप्त होते. आमच्या गीतेतील वेदांतमताचे अनुकरण करणारे ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम वगैरे संतमंडळीच्या चरित्र महिम्याचें ज्यांना अल्पमात्र तरी ज्ञान असेल, त्यांस माझ्या म्हणण्याचा प्रत्यय येईल. निरपेक्षपणें परोपकार करण्याची बुद्धी मानवास प्राप्त होण्यास त्याच्या अंगीं उदात्त अशा धर्माचीं तत्वें बिंबलीं पाहिजेत. या शतकाच्या आरंभीं फ्रान्सांत काम्टि नामक एका तत्वज्ञानें चालू ख्रिस्ती धर्मात अशी वृत्ति मनुष्याच्याठायीं उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं असें पाहून त्यानें 'Religion of Humanity' असा नावाच धर्म स्थापिला, त्याचा हेतु इतकाच, मनुष्यानें अदृष्ट, अज्ञेय अशा कोणातरी काल्पनिकशक्तीस

प्रसन्न करून घेण्याच्या हेतूनें जगांत खटपट करण्यापेक्षां या जगातील मनुष्यजातीच्या हितासाठी झटणें हाच आपला धर्म आहे, असें मानून चालल्यानें मनुष्याकडून उत्तमप्रकारचें नित्याचरण घडते. या मताचें अनुयायी पाश्चिमात्य देशांत आज पुष्कळ आहेत. या मताच्या अनुरोधानें चालले असतां आपल्याठायींचा नैसर्गिक कळवळा विकसित होऊन आपल्या ठायींच्या आत्मपरतेस पुष्कळप्रकारे आळा पडतो आणि तितक्यामानानें परार्थपरता व परोपकारबुद्धि वाढून समाजसौख्याची वृद्धि होते. धर्माच्या योगानें ही आत्मपरता सहसा नष्ट होत नाहीं. ईश्वरीप्रसाद, पुण्यप्राप्ति, स्वर्गप्राप्ति इत्यादि उद्देशांनी जो परोपकार करतो, त्यापेक्षा इतर मानव आपले बांधव असून त्यांच्या हितासाठीं झटणे हे आपलें परमकर्तव्य आहे; त्यांत मला स्वताला कांहीं लाभ असो वा नसो, त्याची मला परवा नाहीं, अशी ज्याच्या मनाची समजूत होतें तोच मनुष्य अधिक मान्य व पूज्य समजावयाचा. असें आहे तरी, याप्रकरणी धर्माच्या साहाय्यानें समाजाचें पुष्कळ हित होणारे आहे. आमच्या या समाजांत काम्टीच्या मताचे किंवा आधुनिक शास्त्रज्ञांच्या मताचे लोक फारच थोडे आहेत बहुतेक समाज धर्मभोळाच आहे. तेव्हां परोपकाराच्या कृत्यासाठी आम्हांस धर्मावरच अवलंबून राहिलें पाहिजे.

**उपसंहार :–**धर्माची व इतर बहुतेक ऐहिक व्यवहाराची हळूहळू फारकत होत आहे ती हिताचीच आहे, असें आतापर्यंतच्या विवेचनावरून चांगले लक्षांत आलेंच असेल. आजपर्यंत धर्माच्या योगानें समाजांतील निरनिराळ्या धर्मसमजुतींच्या लोकांत कलह माजून मनुष्यसुखास व राष्ट्रीय उत्कर्षास अनेक प्रकारी व्याघात झाला आहे. त्याचप्रमाणें राष्ट्राराष्ट्रांमध्यें घनघोर संग्राम माजून आजपर्यंत कैक राष्ट्रांच्या उन्नतीस अपाय घडला आहे व कैक राष्ट्रें नाश पावून हल्लीं केवळ नामशेष झाली आहेत. याचा जो कोणी शांतपणें विचार करील त्याला हा धर्माभिमान नकोसा वाटेल.

***

# ३५ चरित्रलेखनाविषयीं अनास्था

(१९०९ खालीं बडोदें येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनासाठीं लिहिलेला निबंध.)

वाङ्मयाचे मुख्य उद्देश तीन आहेत– करमणूक, उपयुक्त ज्ञानप्रसार व सदाचारप्रवृति. ज्या भाषेतील ग्रंथसमुच्चयाच्या योगानें हे तीन्हीं उद्देशसिद्ध होण्याची योग्य सोय असते, तींतील वाङ्मय उत्कर्ष पावत आहे असें समजावयाचे. आमच्या भाषेतील ग्रंथसमुच्चयाला ही कसोटी लाविली तर असें कष्टानें म्हणावें लागेल का, आमच्या आधुनिक ग्रंथकारांचें पहिल्या उद्देशाकडे जितके लक्ष आहे, तितके दुसऱ्या दोन उद्देशांकडे नाही.

प्राचीनकाळच्या ग्रंथकारांनीं काव्यरचना करून पहिला व तिसरा हें उद्देश बरेच सिद्धीस नेले. आमच्या भाषेतील बहुतेक जुने कवि साधुवृत्ति असल्याकारणानें दैवीविभूतीचा व साधु पुरुषांचा चरित्रमहिमा गाण्यांतच त्यांस स्वजीवितसार्थक्य आहे असें वाटलें. म्हणूनच त्यांच्या हातून प्राचीन पुराणग्रंथांतील कथांचें सार महाराष्ट्रजनांस उत्तम प्रकारचें लाभले आहे. ह्या धर्मशील पुरुषांनीं आपल्या कालाचा व शक्तींचा सद्व्यय करून ज्या पुराणकथा सुरसवाणीनें लिहून ठेविल्या, त्यांच्या योगानें आज कैक वर्षे महाराष्ट्रातील प्राकृत जनांच्या मनाला करमणूक होऊन, त्यांच्या ठायीं भक्ति व सदाचार हीं थोडीबहुत बिंबविण्याचीं सोय झाली आहे. ह्या ग्रंथसमृद्धीचें सारे यश प्राचीन संस्कृत वाङ्मय लिहून ठेवणारांसच दिलें पाहिजे. त्याचा नमुना आमच्या पूर्वकाळच्या कविवरांनी उत्तम प्रकारें उतरला, याबद्दल तें स्तुतीस पात्र आहेत. करमणूक, धर्मशीलता व सदाचारवृत्ति ह्या तिहेरी उद्देशानें हे त्यांचे ग्रंथ लिहिले दिसतात.

प्राचीन पुराणकथांचा जसा त्यांनीं अनुवाद केला आहे, तसाच प्राचीन आध्यात्मिकज्ञानाचा थोडासा अनुभव महाराष्ट्रजनास करून देण्याचें श्रेय ह्या साधु कविवरांनीं संपादिलें आहे. त्यामुळें जनांच्याठायीं सद्भाव, धर्मतत्वजिज्ञासा व सदाचारप्रवृत्ति यांचा विकास होण्याची सोय झाली आहे.

सदाचाराचा बोध सत्पुरुषाच्या सुचरित्रांच्या द्वारे उत्तम होतो, हें तत्त्व संस्कृत व प्राकृत ग्रंथकारांना चांगलें संमत होतें, असें त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट होते. त्या तत्वास

अनुसरूनच महीपतीनें मागल्या काळीं महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या साधुपुरुषांचीं ओवीबद्ध चरित्रें लिहून ठेविली आहेत. ह्या चरित्ररूप ग्रंथांच्यायोगानें महाराष्ट्रांतील बऱ्याच साधुजनांचें स्मरण महाराष्ट्रीयांस चिरकाल राहण्याची सोय झाली आहे. स्वतंत्र चरित्रलेखनाचा आमच्या भाषेंत हा पहिलाच उद्योग होय. पण त्याचें अनुकरण पुढल्या काळीं कोणी फारसें केलें नाही.

ह्या जुन्या काळच्या साधुवृत्ति कविवरांनी स्वग्रंथद्वारे जें हें सद्बोधामृत सामान्य जनांस सुलभ व सुगम करून ठेविलें आहे, त्यांचें धोरण केवळ निवृत्तिपरतेचें पोषण करण्याकडे आहे. जनांनीं आध्यात्मिकज्ञानाची प्राप्ति करून घेऊन सद्भाव, सद्भक्ति व सदवृत्ति यांच्या योगानें संसृतिजालांतून मुक्त होऊन, ब्रम्हानंदाचें अधिकारी व्हावें, असा त्यांच्या वाङ्मयाचा उद्देश दिसतो. हा संसार दुःखमय असून केवळ लटका आहे, ह्यांत गुंतून राहून शाश्वत सुखास अंतरणें विचारशील मानवांस सर्वथा उचित नव्हे; असा त्यांच्या एकंदर बोधाचा इत्यर्थ आहे. ह्याच कारणास्तव, त्यांनीं ऐहिक प्रपंचाची फारशी परवा केली नाहीं. गृहस्थाश्रमाचें अवलंबन मनुष्यानें मुळींच करूं नयें, असें त्यांचें म्हणजे नाहीं. ह्या आश्रमांत राहून आमुष्मिक कल्याणसिद्धि जेणेंकरून होईल तेंच करण्यांत जीवितव्यय करावा; असा त्यांचा बोध आहे. प्रवृत्तिमार्ग, एवढ्याचपूरता त्यांना संमत आहे. प्रवृत्तिमार्गाचा निवृत्तिमार्गाला जेवढा म्हणून वास्तविक आवार आहे, तेवढ्यापुरतेंच त्यांचें अनुसरण जनांनीं करावें, त्यांत सर्वदा रत होऊ रहाणें म्हणजे शाश्वत सुखास अंतरणें होय, असें त्यांचे म्हणणें आहे. ह्याप्रमाणें निवृत्तिपरताच खरी कैवल्यप्रद वाटल्यामुळें त्यांचें प्रपंचाकडें फारसें लक्ष न जाणें साहजिक आहे; आणि म्हणूनच निव्वळ प्रपंचसुखास साधनीभूत होईल, असा बोध करण्याचें त्यांनीं फारसें मनावर घेतलें नाहीं, व प्रपंचांत: राहून ज्यांनीं कांहीं बऱ्यावाईट गोष्टी केल्या, त्यांचे वर्णन करून त्यांपासून इतर जनांनीं कोणता बोध घ्यावा, तें दाखवून देण्याचा श्रम त्यांनीं स्वग्रंथात केला नाही. ही त्यांची प्रवृत्तिपर जनांचीं चरित्रे लिहिण्याविषयीचीं अनास्था केवळ क्षम्य होय. तीबद्दल त्यांस नांवे ठेवण्याचा आपणांस अधिकार नाही. हीं त्यांची वृत्ति त्या काळाला अनुरूप अशी होती.

आतां येथे असा प्रश्न आहे कीं, ही अशी निवृत्तिपरता सांप्रतकाळीं आमच्या अभ्युदयाला सहाय्यभूत होणारी आहे काय? निवृत्तिपरतेमुळें आमच्या राष्ट्रांतील पुष्कळ बुद्धिमान् व कर्तृत्ववान पुरुषांच्या हातून आजपर्यंत प्रपंचपरिषोक अशा कांहींच गोष्टी घडल्या नाहींत; त्यामुळें आमच्या ऐहिक उन्नतीचा मार्ग बहुतेक खुंटल्यासारखा झाला आहे. संसारनिवृत्त व्हावें, असा बोध जनांस कितीही केला, तरी तें प्रपंचाला अजीबात

फाटा देण्यास तयार होतील असें सहसा घडणें नाहीं, असा अनुभव सगळ्या जगाचा आहे. यास्तव, निवृत्ति व प्रवृत्ति यांची तडजोड करून 'सुखे संसार करावा, माजी विठ्ठल आठवावा' ह्या साधूक्तीप्रमाणें धर्मशील पुरुष आजपर्यंत वागत आले आहेत. परंतु ही तडजोड, जशी कांहीं राष्ट्रांत व जनसमाजांत चांगल्या प्रकारें झाली आहे, तशी तीं आमच्या समाजांत अद्यापि म्हणण्यासारखी झालेली नाहीं.

पारलौकिक कल्याणाच्या सिद्धीसाठी असें मानवांनीं झटलें पाहिजे, तसें ऐहिक कल्याणासाठीहीं अवश्य झटलें पाहिजे; असा बुद्धीचा निश्चय करून ही जीवितयात्रा जे आक्रमितात त्यांनाच ती सुखकर होते. असा अनुभव आम्हांस सांप्रत काळीं जसा आला आहे, तसा तो पूर्वकाळीं आमच्या पूर्वजांस आला नव्हता. परकीयांच्या संघटनानें ह्या बाबतींत आमचें डोळें चांगलेच उघडले आहेत. आम्हांला इतःपर प्रापंचिक उत्कर्षाविषयीं उदासीन राहून कदापि चालावयाचें नाहीं. तसेंच, स्वतांच्या पारलौकिक किंवा ऐहिकसुखाचाच तेवढा विचार मनात वागवून तत्‌सिद्ध्यर्थ प्रयत्नशील रहाण्यांतहीं फारसा पुरुषार्थ आहे, असें समजता कामां नयें.

सदरील निरूपणावरून हे सिद्ध झालें कीं, इहपरलोकाची सिद्धि व स्वपरहित वृद्धि करण्याविषयीं विचारी पुरुषांनीं सर्वदा तत्पर असलें पाहिजे; आणि जे सत्पुरुष अशी तत्परता स्वचरित्रांत दर्शवितील त्यांचीं उदाहरणें तरुण जनांच्या पुढें सर्वकाळ ठेवण्याविषयीं आधुनिक ग्रंथकारांनीं मनःपूर्वक झटले पाहिजे. गतकालच्या सत्पुरुषांची कीर्ति कायम राखणें हें ग्रंथकारांचें पवित्र कर्तव्य होय. पूर्वकालच्या कविवरांनी तें आपल्या समजुतीप्रमाणें उत्तम प्रकारें बजाविलें आहे. त्या त्यांच्या परिश्रमाबद्दल त्यांना द्रव्यरूप मोबदला मुळींच मिळाला नाहीं; व त्याची अपेक्षाही त्यांनीं कधीं केली नाही. एवढी निःसीम निरपेक्षता दर्शवून पुढील पिढ्यांस अक्षयींचे ऋणी करण्याचा आधुनिक ग्रंथकारांनीं सत्संकल्प केलाच पाहिजे असें नाहीं. त्यांच्या श्रमाचा मोबदला द्रव्य रूपानें मिळण्यांचा योग सांप्रत काळी बराच आहे. पण जो आपल्या पवित्र व्यवसायाचें माहात्म्य योग्य प्रकारें मनांत आणितो, तो अशा द्रव्यलाभाकडे फारशी दृष्टि न ठेवितां आपल्या लेखनसामर्थ्याचा सद्‌व्यय स्वजनांस सन्मार्गवर्ती करण्याकडे करितो. ही कर्तव्यबुद्धि सरस्वतीचें निःसीम भक्त जे साधुग्रंथकार त्यांच्याच ठायीं विकास पावत असते. अशा साधुग्रंथकारमालिकेंत आपली गणना व्हावी असें कोणाला वाटणार नाहीं?

केवल द्रव्यदृष्टीनें आपला लेखनव्यवसाय चालविणारांना बाजारांत खपण्यासारखा माल पैदा करण्यासाठींच खपावेसें वाटणें साहजिक आहे. छापण्याची कला ह्या देशांत प्रवृत्त झाल्यापासून वाङ्मयाचा क्रयविक्रय होऊं लागला, व नफ्या-तोट्याचा विचार

ग्रंथकारांच्या मनांत घोळूं लागला. त्यामुळें स्वभाषेतील वाङ्मयाचीं सेवा निरपेक्षपणें करण्याची बुद्धि बहुतेक नष्ट झाल्यासारखी आहे. ह्या कारणास्तव ग्रंथकारांला व्यापारदृष्टी धरावी लागली आहे; आणि लोकाश्रयाची अपेक्षा करावीसें वाटत आहे. ह्याप्रमाणें ग्रंथरचनाप्रवृत्ति ग्रंथकारांच्या नैसर्गिक कलाप्रमाणें न होतां, सामान्य जनप्रवृत्यनुरूप होऊं लागली आहे. आतां सामान्य जनांला कल्पित-कथामय ग्रंथ जितके आवडतात, तितके दुसऱ्या प्रकारचें ग्रंथ मुळींच आवडत नाहींत. याचें कारण उघडच आहे कीं, अल्प समजुतीच्या माणसांला अडत व आश्चर्यमय अशा गोष्टी वाचण्यांत आनंद व मौज वाटतें, व त्या वाचतांना मनाला श्रमही फारसें होत नाहींत. सामान्य जनांच्या ह्या अभिरुचीस अनुसरून आमच्या मोठमोठ्या ग्रंथकारांला कल्पित कथाच लिहित बसावेसें वाटतें. परंतु ह्या कादंबऱ्यांच्या योगानें आमचे पोषण होण्याचे एकीकडेच राहून उलट त्यास अनेक प्रकारें दुर्बलता प्राप्त होते. कल्पनातरंगांत वाहवत जाण्याचा सारखा नाद लागल्यानें कोणत्याही उपयुक्त व गंभीर विषयाचें अध्ययन किंवा मनन करण्याचें सामर्थ्य नाहींसें होते. हे सामर्थ्य अभ्यासानें वाढतें. पण कादंबऱ्यांच्या नादापुढें गंभीर विषयावरील ग्रंथ वाचावेसें वाटत नाहींत, व त्यामुळें हे सामर्थ्य वाढण्याचा मुळीं मार्गच सुटतो.

तरुण जनांस तर हा कादंबरी-वाचनाचा नाद फारच हानिकारक आहे. त्यांतून बीभत्स कादंबऱ्या त्यांच्या हातीं पडल्या, तर त्यांच्या सदाचारप्रवृत्तीचेंही साफ मातेरे होते. यौवनकाळ बुद्धि व वृत्ति यांच्या विकासाचा आहे. मन तरतरीत असून कोंवळें असतें व प्रपंचाचा भार शिरी आला नसतो, तोपर्यंत बुद्धि व्यासंगाच्या योगानें उपयुक्त ज्ञानसंग्रह करण्यांत व सुवृत्तिविकास करण्यांत काल व शक्ति यांचा सद्व्यय झाला पाहिजे. ह्या अप्रौढ काळीं तरुण जनांच्या आचरणास ज्या प्रकारचें वळण लागेल, तदनुसार त्यांच्या हातून पुढील वयांत बरी वाईट कामें होणारी असतात. ह्यासाठी, त्यांच्या हातीं सन्मार्गदर्शक अशीं पुस्तकें आली पाहिजेत. कल्पित कथा त्यांस कितीही आवडत असल्या, तरी त्यांच्या वाचनापासून त्यांस साधेल तेवढें निवृत्त केलें पाहिजे.

अप्रौढ तरुण जनांस प्रपंचांत कसें वागलें पाहिजे, याचा बोध होणें अत्यावश्यक आहे. हा उद्देश कादंबऱ्यांच्या सहाय्यानें कदापि सिद्ध व्हावयाचा नाही. कल्पित प्रसंगीं कल्पित स्त्रीपुरुषांनी कसें वर्तन केलें, याविषयीं त्यांनीं कितीही वाचलें तरी त्याचा त्यांच्या मनावर दीर्घकाळ टिकणारा असा सुपरिणाम होणे शक्य नाहीं, हें अनुभवसिद्ध आहे. तेच खऱ्याखुऱ्या प्रसंगीं खऱ्याखुऱ्या माणसांनीं कोणत्या रीतीनें वर्तन केलें व त्यापासून त्यांना कोणता वाईट बरा परिणाम भोगावा लागला, याची साधार माहिती त्यांना अगाऊ मिळाली असतां 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' ह्या

म्हणीप्रमाणें त्यांचें पाऊल सन्मार्गच्युत होण्याचा संभव बराच कमी असतो. सदाचारप्रवृत्तिरूप जो वाङ्मयाचा एक मुख्य उद्देश आहे, तो ह्या उपायानें बराच सिद्ध होतो. नुसता रूक्ष नीतिबोध करून किंवा नीत्याचरणाची सूक्ष्म मीमांसा करून इष्टकार्यसिद्धि होण्याचा संभव फारसा नसतो. हा नीतिबोध उदाहरणद्वाराच जनचित्तांत ठसविणें आवश्यक होय. तो खेटींनाटीं किंवा कल्पित उदाहरणें देऊन बिंवविण्यापेक्षां प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींच्या अनुवादानें बिंबविण्याचा उद्योग केल्यास विशेष यशस्वी होईल असा अनुभव आहे.

यास्तव, ह्या प्रपंचांत जे कोणी थोर पुरुष होऊन गेले असतील, त्यांच्या चरित्रांची माहिती तरुण जनांस होणें अत्यंत इष्ट होय; आणि स्वकीयजनांस सन्मार्गवर्ती करावे असा ज्या ग्रंथकारांचा स्तुत्य निर्धार झाला असेल, त्यांनीं चरित्रात्मक ग्रंथ लिहिण्याचें अवश्य मनावर घेतलें पाहिजे. आमच्या देशांतील थोर पुरुषांची चरित्रे तरुण जनांस वाचावयास मिळाल्यानें त्यांची कल्पित कथा वाचण्याकडे जी सांप्रत प्रवृत्ति आहे, ती बरीच कमी होऊन ह्या संसारांत निरनिराळ्या प्रसंगीं कसें वागलें पाहिजे, तें त्यास थोडेबहुत कळू लागेल. सदाचाराचें, प्रपंचपटुतारूप जें मुख्य अंग, ते सर्व संसारी जनांस आपल्याठायीं विकास पावा असें मनापासून वाटत असतें. तें प्रपंचांत यशस्वी झालेल्या स्त्रीपुरुषांच्या चरित्रांच्या अवलोकनानें आयतेच प्राप्त होण्याजोगें असतें. दुसरें असें कीं, आमच्या देशांत होऊन गेलेल्या थोर व यशस्वी स्त्रीपुरुषांचीं चरित्रे लिहून ठेविल्यानें त्यांचें स्मरण चिरकाल रहाते व पूर्वतिहास जागृत रहातो. ज्या राष्ट्राला आपल्या मागील इतिहासाचें व थोर पुरुषांचे स्मरण राहत नाहीं, त्याचा उत्कर्ष सहसा व्हावयाचा नाहीं, असें अनुभवी पुरुषांचे म्हणणें आहे त्यांत पुष्कळ तथ्य आहे.

वर स्वदेशांतील थोर पुरुषांचीं चरित्रे लिहून ठेवण्याची आवश्यकता दाखविली. यावरून कोणी असें समजू नयें कीं, परदेशांतील थोर पुरुषांच्या चरित्रांशीं आपणांला कांहीं कर्तव्य नाहीं. मनुष्यस्वभाव येथून तेथून सारखाच आहे व सदाचाराची जी शाश्वत तत्वें त्याला स्थल, काल व परिस्थिति यांच्या भिन्नत्वास्तव कदापि बाध येत नसतो. यास्तव, त्यांविषयींचीं उदाहरणें कोठूनही मिळाली, तरी तीं ग्राह्यच आहेत. तीं आपल्या देशांतली असली तर लोकांस तो विशेष मान्य होणें साहजिक आहे. परंतु तो अन्य देशांतली असली, तरी सर्वथा अमान्य नव्हत. आधुनिक काळीं आमच्या प्रपंचाला परकीयांच्या संघटनानें अंमळ निराळें वळण लागत चाललें आहे. यास्तव, ज्या लोकांचें अनुकरण आम्ही करीत आहो, त्यांच्यामध्यें जे सत्पुरुष होऊन गेले, त्यांची चरित्रे आम्हांस अवश्य वाचावयास मिळालीं पाहिजेत. आणखी असें की,

परकी राष्ट्रांत प्रवृत्तिमार्गास उचित अशीं कांहीं सदाचाराचीं अंग विशेषरीतीनें विकास पावलो आहेत. यास्तव, त्यांचा कित्ता आमच्यापुढें अवश्य असला पाहिजे. तो अर्थात तिकडील यशस्वी पुरुषांच्या चरित्रावरूनच घेतला पाहिजे. त्यावरून पाहतां परदेशांतील थोर व योग्य पुरुषांची चरित्रे लिहिण्याविषयीं आमच्या ग्रंथकारांनीं बिलकूल अनस्था करितां कामां नयें. कांहीं बाबतींत तर परकीयांच्या चरित्राध्ययनावांचून मुळींच चालण्यासारखें नाहीं, हें थोडासा विचार केला असतां कोणाच्याही ध्यानांत येण्यासारखें आहे. यास्तव, आपरपरभाव व स्थलकालभेद यांचा कांहींच विचार मनांत न आणितां चरित्रलेखनाचें काम हातीं घेतलें पाहिजे.

येथें आणखी एक गोष्ट नीट लक्षांत वागविली पाहिजे. ती अर्थात् चरित्र विषयांच्या निवडी संबंधाची होय. थोर पुरुषांविषयीं आमची कल्पना अंमळ निराळी आहे, असें आजपर्यंत आपल्या भाषेत झालेल्या चरित्रग्रंथांवरून दिसून येते. थोर पुरुषच चरित्र–लेखनाचे विषय होण्यास योग्य आहेत, या विषयीं कोणाचा वादच नाहीं. परंतु हे थोर पुरुष कोणते, याविषयी मात्र पुष्कळ मतभेद आहे. कित्येकांचें असें मत दिसतें कीं, कोणी मोठा पराक्रमी राजा, मुत्सद्दी सेनापति किंवा साधु पुरुष झाला, तरच त्याचे चरित्र लिहावे; इतर जनांची चरित्रे लिहिण्यांत कांहींच अर्थ नाहीं. ही त्यांची समजूत अगदीं कोती आहे. त्या प्रपंचांतले फारच थोडे पुरुष राजे, मुत्सद्दी, सेनापति किंवा साधु पुरुष निपजण्याजोगे असतात; इतर साऱ्या जनांस सामान्य व्यवसायांतच सुयश संपादावयाचें असतें, व अशा लोकांचाच सगळा जनसमाज बनलेला असतो. यास्तव, अशा सामान्य जनांला ज्यांच्या चरित्रबोधापासून फायदा होण्याचा संभव असतो, अशांची जीवनवृत्ते लिहिण्याचा विशेष परिपाठ पडला पाहिजे. त्यांतूनही आधुनिक परिस्थितीनुरूप प्रपंचाला जें स्वरूप प्राप्त झाले आहे, ईर्यात ज्यांनी आपल्या अंगच्या सगुणांच्या व पराक्रमाच्या योगानें सरशी व मान्यता मिळविली असेल, त्यांची जेवढी चरित्रें आमच्या तरुण पिढीला वाचायाला मिळतील तेवढीं थोडींच आहेत. परंतु अशा पुरुषांची चरित्रें लिहिण्यासंबंधानें तर आमच्या ग्रंथकारांची पूर्ण अनास्था दिसते. अर्वाचिनकाळीं आमच्या देशांत केवढे तरी योग्य पुरुष होऊन गेले आहेत, परंतु त्यापैकीं एक दोन खेरीज करून बाकीच्यांची चरित्रे मुळींच लिहिलेली नाहीत. युरोपांतल्या वाङ्मयाकडे पहाल तर, तिकडें अगदीं गरीब स्थितींतून वर आलेल्या कारागिरांची देखील चरित्रे मोठमोठे ग्रंथकार मोठ्या आवडीनें लिहितात. अशा प्रकारच्या चरित्रांच्या विपुलतेमुळें तिकडे थोर व पराक्रमी पुरुषांची जशी काय अखंड परंपरा लागून राहिली आहे. राष्ट्रांतील सद्गुण, सत्पराक्रम व सदाचार हीं उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावीं, असें

मनःपूर्वक वाटत असेल, तर योग्य व यशस्वी माणसें कोणत्याही दर्जाची किंवा कोणत्याही जातीचीं किंवा धर्माचीं असलीं, तरी त्याचीं चरित्रें लिहिण्याचें गुणग्राहक ग्रंथकारांनीं मनावर घेतलें पाहिजे. अशी थोर बुद्धि व भेदविरहित वृत्ति धारण करावयास आपणाला महिपतीनें दोन शतकांच्या पूर्वी शिकवून ठेविलें आहे. तसेच पाश्चात्य ग्रंथकार हा असला भेदाभेद कांहींएक मनास न आणितां योग्य पुरुष कोणत्याही राष्ट्रांतला, कोणत्याही पंथाचा व कोणत्याही जातीचा किंवा दर्जाचा असला, तरी त्याचें चरित्र लिहून स्ववाङ्मयांत यथोचित भर घालून तरुण जनांस योग्य वळण लावण्यास झटतात. हा त्यांचा निःपक्षपातपणा व गुणग्राहकता अत्यंत स्तुत्य होय. या बाबतींत आमच्या ग्रंथकारांनी त्यांचें निरभिमानपणें अनुकरण करणें इष्ट आहे.

आतां येथें कोणी असें म्हणतील कीं, अशा प्रकारचीं चरित्रें लिहिण्याला सामुग्री हवी आहे, ती मिळण्याची पंचाईत आहे; व तीं लिहिलीं तर ती वाचणारें फार थोडें मिळून तीं छापणारास नुकसान सोसावें लागेल. ह्यांपैकी पहिली हरकत कांहीं अशीं खरी आहे. आमच्या देशांतल्या लोकांत निवृत्तिपरतेस्तव स्वाभिमान अंमळ कमीं असल्याकारणानें, स्वतःच्या कर्तृत्वाची नोंद करून ठेवण्याकडें व आपल्या संबंधाचें कागदपत्र जुळवून ठेवण्याकडे मुळींच प्रवृत्ति नाहीं, असें म्हटलें असतां चालेल. ह्या प्रपंचांत आपणांस पदोपदीं घडलेलें अनुभव व स्वाचरणपरीक्षण ही रोजनिशींत नमूद करून ठेवण्याचीं मुळींच वहिवाट नाही. त्यामुळें चांगल्या पुरुषांची साद्यंत चरित्रें लिहिणें आज कठीण झालें आहे. तरी रा. राजवाडे व रा. पारसनीस त्यांनी आपल्या देशाचा मागील इतिहास शोधून काढण्याचा जसा स्तुत्य प्रयत्य चालविला आहे, तसा थोडासा उद्योग केल्यास गेल्या शतकांत होऊन गेलेल्या कांहीं गृहस्थांची थोडीशी तरी माहिती मिळण्यासारखी आहे. बहुतेकांची संतति आज हयात आहे, त्यांना, आपल्या वडिलांचीं कांहीना कांहीं माहिती असण्याचा संभव असतो. त्यांच्या वेळचे कांहीं लोक अद्यपि हयात असण्याचाही संभव आहे. त्यांना कांहीं माहिती असल्यास ती मिळविली पाहिजे. त्या अशा खटपटीनें जी कांहीं माहिती मिळेल तेवढीच्याच आधारानें सध्याच्या काळी चरित्रें लिहिणें भाग पडेल. पण त्यास कांहीं इलाज नाही. अशा रीतीनें सामान्य स्थितीतल्या थोर पुरुषांचीं चरित्रे लिहीण्याचा परिपाठ एकदां पडलां, म्हणजे कांहीं जणाला आपल्या संबंधाचीं माहिती जमवून जुळवून पुढील पिढीसाठी ठेवावीशीं वाटेल, व जे थोर पुरुष आज हयात आहेत, त्यांच्या संबंधाचीं माहिती हळूहळू जमवून ठेवण्याचीं इच्छा त्यांच्या कोणातरी मित्रांस किंवा ग्रंथकारांस होण्याचा संभव आहे. सध्या अशा माहितांच्या संबंधानें लोकांची उदासीनता असल्याकारणानें

कोणाला तिची पर्वाच वाटेनाशीं झाली आहे. परंतु आमचें बाळशास्त्री जांभेकर, डॉ. भाऊ दाजी, दादोबा पाडरंग, भास्कर दामोदर पाळंदे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, नाना शंकरशेट, नाना मोरोजी, केरो लक्ष्मण छत्रे, कुंठे, मंडलीक, परमानंद, पंडित, आगरकर, देशमूख, नूलकर बद्रुद्दीन, शापूरजी, बंगाली, तेलंग, रानडे, डॉ. काणे इत्यादि जे थोर पुरुष नुकते होऊन गेले, त्यांची थोडीबहुत माहिती असून मिळण्याजोगी आहे. तसेच डॉ. भांडारकर, ना. दादाभाई नवरोजी, डॉ. कीर्तिकर, न्या. मू. चंदावरकर, सर फेरोजशहा, डॉ. भालचंद्र, ना. गोखले, मि. वाच्छा, रा. सा. ओक इत्यादि थोर गृहस्थ जे हयात आहेत, त्यांच्या जीवनवृत्ताची माहिती हळूहळू गोळा करण्याचा उद्योग चालू ठेविल्यास त्यांची साद्यंत चरित्रें तयार होण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं. ह्या इलाख्यांतल्या आधुनिक काळच्या ह्या थोर गृहस्थाप्रमाणें इतर इलाख्यांतले राममोहन राय, केशवचंद्र सेन, मुझुमदार, बानर्जी, दत्त, अय्यर, लाला लजपतराय इत्यादि पुष्कळ थोर व योग्य गृहस्थ आहेत; त्यांची चरित्रें लिहिण्याचा उद्योग केला पाहिजे. ह्या पुरुषांची चरित्रें लिहिण्याचें मनावर घेतलें असतां, त्यांच्या संबंधाचीं थोडीबहुत माहिती मिळण्यास फारशी अडचण पडणार नाहीं. हे ''बालबोध'' मासिकाचें सन्मान्य कर्ते रा. सा. विनायक कोंडदेव ओक यांनीं उत्तम प्रकारें दाखवून दिलें आहे. त्यांनी गेलीं २७ वर्षे प्रतिमासीं एकएका थोर माणसाचें त्रोटक चरित्र व छबी आपल्या मासिक पुस्तकांत प्रसिद्ध करण्याचा स्तुत्यक्रम अव्याहत चालू ठेविला आहे. ह्या चरित्रांची निवड करताना त्यांनीं राष्ट्रभेद, धर्मभेद व जातिभेद असें कांहींच मनास आणलें नाहींत. ह्या त्यांच्या उदार बुद्धीचें अनुकरण करून त्यांच्या निवडीपैकीं कांहीं पुरुषांची साद्यंत चरित्रें लिहिण्याचा निर्धार आमच्या ग्रंथकारांनीं अवश्य केला पाहिजे. आतां सदरी नमूद केलेली दुसरी हरकत जीं चरित्रात्मक ग्रंथ खपण्यासंबंधाचीं, तीही विचार करण्यासारखीं आहे खरी. सध्यां आमच्या लोकांना चरित्रें वाचण्याचा फारसा नाद नाहीं; त्यांना कादंबऱ्याच विशेष आवडतात, हें अनुभवसिद्ध आहे. तरी त्यांच्या ह्या रुचीला वळण लावण्याचें काम आमच्या ग्रंथकारांनीं मनावर घेतलें पाहिजे. कांहीं तरी चमत्कारिक व अद्भूत गोष्टी असल्या म्हणजे त्या लोकांना विशेष आवडतात. ह्या गोष्टी नवीन कल्पून लिहिण्याऐवजी जगांतील ज्या खऱ्या खुऱ्या माणसांच्या आयुष्यक्रमांत त्या घडल्या असतात, त्यांची चरित्रें आमच्या करमणूककारानीं व मनोरंजनकारांनीं आपल्या सुरसवाणीनें लिहिण्याचें मनावर घेतल्यास अद्भूत रसाची व कुतुहलोद्दीपनाची फारशी वाण पडणार नाहीं. ह्याप्रमाणें सुरस व चांगल्या चरित्रांचा भरणा स्वभाषेत होत गेला, म्हणजे तीं वाचण्याकडे लोकांची प्रवृत्त साहजिकपणें, होणार आहे. सत्यनिष्ठा, सत्वशीलता, अढळ निश्चय, श्रमसातत्य, सचोटी, मनोधैर्य,

आत्मनिग्रह, कल्पकता, विद्याव्यासंग, साहस, श्रमसहिष्णुता, औदार्य, विवेकसंपन्नता, आत्मयज्ञ, परोपकारबुद्धि, सदाचारप्रीति, धर्मशीलता, सार्वजनिक हितबुद्धि, निःपक्षपातीपणा, जगत्कुटुंबिता, देशभक्ति, उदारबुद्धि, शोधकता, सत्यान्वेषणपरता, स्वातंत्र्यप्रीति इत्यादि उज्वल गुण ज्यांच्या जीवितक्रमांत, निरनिराळ्या रीतीनें प्रकट झाले आहेत, त्यांची चरित्रें लिहितांना खऱ्या गुणग्राहक व योग्य अशा ग्रंथकारांच्या वाणीचा ओघ जनांस चकित करून टाकण्यासारखा निघण्यास मुळींच हरकत नाहीं. कल्पित कथा लिहिण्यांत जर त्यांची एवढी करामत दिसून येते, तर ती खऱ्याखुऱ्या माणसांच्या कथा लिहिण्यांत कां प्रकट होऊं नये? ह्या अशा रीतीनें लिहिलेल्या चरित्रात्मक ग्रंथांचा खप होण्यास फारशी अडचण पडेल असें वाटत नाहीं; आणि एकदा सुरस चरित्रें वाचण्याचा नाद लागला, म्हणजे साधारण प्रतीचींही चरित्रें वाचण्याकडे जनांची प्रवृत्ति साहजिकपणें होणार आहे. आमच्या तरुण जनांला तर जेवढे चरित्रात्मक ग्रंथ वाचायाला मिळतील, तेवढे थोडेच आहेत. त्यांच्या बुद्धीचा विकास होणें जसें इष्ट आहे, तसेच त्यांच्या सद्वृत्तीचाही विकास होणें अत्यावश्यक आहे. बुद्धी अंमळ कमी विकास पावली तरी चालेल, परंतु त्यांच्याठायीं सद्वृत्तिविकास अवश्य झाला पाहिजे. ह्या गोष्टीचें माहात्म्य लोकांच्या लक्षांत अद्यापि यावें तसें येत नाहीं. सदाचारांचें वळण आमच्या शाळांतून देण्याची व्यवस्था अद्यापि झालेली नाहीं, व आमच्या वडील माणसांला त्याच्यासंबंधानें घरींतरी काहीं तरतूद करावी असें वाटत नाहीं. असें वाटूं लागेल तर तें आपल्या मुलांस चरित्रात्मक ग्रंथ मिळतील तितके वाचावयास देण्यास चुकणार नाहींत. काही झालें तरी माल बाजारांत पुष्कळसा व चांगलासा मांडून ठेविला असला, म्हणजे त्याची खरेदी करण्याकडे लोकांची साहजिक प्रवृत्ति होण्याचा दृढ संभव असतो; ह्या सामान्य तत्वास अनुसरून आमच्या ग्रंथकारांनीं चरित्र लेखनाविषयींची अनास्था सोडून देऊन सुंदर व सुरस चरित्रें लिहून तीं लोकांपुढे ठेवण्याचें अवश्य मनावर घ्यावें. असे ते करतील तर ज्या वाङ्मयाची सेवा त्यांनीं पतकरिली आहे, त्याचें तिन्ही उद्देश एकसमयावच्छेदेंकरून सिद्ध होतील. कारण सच्चरित्रांच्या योगानें सदाचारविषयींचा बोध जनांस प्राप्त होऊन आणखी चरित्रनायकांच्या आयुर्दायांत घडलेल्या अनेक चमत्कारावह प्रसंगांच्या चटकदार वर्णनानें त्यांचें मनोरंजन होईल, व चरित्रकथाप्रसगानें पुष्कळ उपयुक्त ज्ञानही त्यांस आल्पायासानें साध्य होईल. ह्यासाठीं वाङ्मयाच्या तिन्ही उद्देशांची थोडीबहुत सिद्धि ज्या ग्रंथांच्या आधारानें होण्यासारखी आहे, त्यांची स्ववाङ्मयांत भर घालण्यास आमच्या ग्रंथकारांनीं अवश्य झटावें.

***

# ३६ शीलमाहात्म्य

('सुधा' १९१४)

ह्या प्रपंचांत मानवाच्या आवडीच्या अशा अनेक वस्तु आहेत. त्या प्राप्त करून घेण्यासाठीं त्याची सारखी धडपड चालू असते. त्यांच्या प्राप्तीसाठीं अनेक उपायांची योजना तो करीत असतो. आवडीचा विषय ज्या मानानें त्याला महत्त्वाचा वाटतो, त्या मानानें त्याचे तत्प्राप्त्यर्थ प्रयत्न चालू असतात. एक उपाय निष्फळ झाला तर दुसरा योजावा, तो यशस्वी झाला नाहीं तर तिसरा योजावा, असा त्याचा प्रयत्न सारखा चालू असतो. श्रमसातत्य, व निग्रह हे गुण त्याच्याठायीं ज्या मानानें विकास पावलेले असतात, त्या मानानें तो आपली चिकाटी सोडीत नाहीं. विवक्षितविषयाची आवड अनावर असली, तर तत्प्राप्त्यर्थ योजावयाच्या उपायांच्या स्वरूपाची तो परवा करीत नाहीं; न्यायअन्याय तो पहात नाहीं; सदाचार दुराचार यांजकडे तो डोळे झाक करितो. त्याचें सगळें लक्ष त्या वांच्छित विषयाकडे असते. ह्या विषयाच्या उत्कट प्रीतीस्तव तो केवळ अंध झालेला असतो. अशा मनुष्याला साधुसंत विषयांध म्हणतात. पण त्या अधिक्षेपाची तो परवा करीत नाहीं. विषयप्राप्तीचीं आतुरता प्रबल होऊन विवेकादि सात्विक गुण त्याच्या ठायीं दुर्बल होतात. पापभय, लोकापवाद गहना, चित्तक्षोभ इत्यादिकांचें त्याला कांहीं वाटत नाहीं; आणि ह्याप्रमाणें तो सुजनांच्या अवहेलनेस व तिरस्कारास पात्र होतो; किंबहुना सामान्य जनही त्याची निंदा व तिरस्कार करितात.

मनुष्य असा विषयांध होऊन दुर्मार्गवर्ती होतो म्हणूनच साधुसंतांनी विषयवासनेचा निखालस निषेध केला आहे. वासनाक्षय होऊन चित्त निर्लेप व शुद्ध करून शांतिसुख संपादावें असा त्यांनीं प्रपंची जनांस कंठरवाने बोध केला आहे. परंतु हा त्यांचा बोध नैसर्गिक प्रवृत्तीस सर्वथा विरुद्ध असल्याकारणानें त्याचें अनुसरण लाखांत एकाच्याही हातून होणें दुर्घट असतें. वासनाजय, इंद्रियभोग व निवृत्ति ह्या गोष्टी मानवास सामन्यत: असाध्य आहेत, असा सार्वत्रिक अनुभव आहे. याचें कारण उघडच आहे कीं, मनुष्याच्या ठायीं आढळणाऱ्या वासनांची तृप्ति जीवितधारणास व जीवितरक्षणास

अत्यावश्यक आहे. ह्या वासना त्याच्या ठायीं लक्षावधि वर्षांच्या आनुवंशिक संस्कारास्तव दृढ झालेल्या असतात, आणि मानवेतर प्राण्यांपासून मनुष्य उत्क्रांति पावला आहे हा जो नवीन शोध पाश्चात्य भौतिकशास्त्रज्ञानी लाविला आहे, त्याच्या अनुरोधानें पाहतां मानवी वासनांचें उत्क्रमण अत्यंत सूक्ष्म जीवनसृष्टीपासून होत आले आहे; व त्यांचें मूळ कोट्यवधि वर्षांपूर्वी वाढीस लागलेले आहे. तेव्हां अशा सनातन वासनावृक्षाचे निर्मूलन करूं पाहणें म्हणजे मानवप्राणघात किंवा मानवजातिविनाश करण्यास उद्युक्त झाल्यासारखें होणार आहे. ह्याच कारणास्तव प्रपंची जनांस व प्रपंचाचा संन्यास करून निवृत्ति मार्गाचा अवलंब करणाऱ्या जनांस, वासनाजय अत्यंत दुर्घट झाला आहे. विशेषतः निवृत्तिमार्गावलंबी जनांची ह्या बाबतींत किती व कशी पदोपदी फजिती होते. याचें दाखले पुराणांतरी भरपूर आहेत, व नित्याच्या व्यवहारांत तर ते प्रत्येकाच्या अनुभवांतले व पाहण्यांतले आहेत.

हा असा वासनांच्या दुर्जयत्वाचा अनुभव असूनही साधुसंतांनी त्यांचे निर्मूलन करण्याविषयीं जनांस पुनः पुन : बोध करावा हे सकृद्दर्शनी अस्वाभाविक व अप्रयोजक दिसते. पण ह्या त्यांच्या बोधाची मीमांसा शांतपणें केली असतां, त्यांत पुष्कळ तथ्य आहे असें प्रत्ययास येते. मनुष्य वासनावश होऊन एकाद्या विषयाच्या नादी लागला व त्याविषयीचें त्याचे प्रेम उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेले म्हणजे त्याला त्या विषयावांचून कांहींच सुचेनासें होते. तर कधीसाठी तो हवें ते करण्यास उद्युक्त होतो. सूक्त ासूक्त ाचा विचार त्याच्या चितांतून विनष्ट होतो. तो केवळ विषयांध होऊन अनन्वित कर्म करण्यास प्रवृत्त होतो. ही अनाचारप्रवृत्ति अन्य जनांस अनेक प्रकारीं घातक व अनिष्ट होते. आपल्या हातून परपीडा होत आहे, दुसऱ्यांचा घातपात होत आहे, दुसऱ्यांच्या विपत्तीला व क्लेशाला आपण नाहक कारणीभूत होत आहो, व त्यामुळें लोकांचे वैर आपण संपादीत आहों, असा कांहींच विचार विषयांध मनुष्याच्या मनांत येईनासा झाला म्हणजे समाजसुखविघातक असें आचरण त्याच्या हातून होऊन अनाचार व दुःख यांची चोहोंकडे वृद्धि होते, ती अर्थात् अत्यंत अनिष्ट होय; आणि ही अशी अनाचारप्रवृत्ति सार्वत्रिक झाली असतां मानवी समाजाचा विध्वंस होण्यास विलंब लागणार नाहीं. ह्याच कारणास्तव व्यवस्थित स्वरूप पावलेल्या प्रत्येक समाजांत लोकनियमनासाठीं कांहीं निर्बंध ठरविण्यांत येत असतात. ह्यापैकी जे विशेष महत्वाचे असतात व ज्यांचा संबंध मनुष्याचें जीवित, वित्त व कीर्ति यांशीं असतो, त्यांस अनुसरून मनुष्याला वागण्यास भाग पाडावें व तदनुसार वागण्यास तयार नसला किंवा चुकला तर त्याला गुन्हेगार ठरवून शिक्षा देण्याचें काम लोकनायक आपल्या हातीं

घेतो. ह्या लोकनायकाच्या हातीं असलेल्या सत्तेच्या मानानें त्याच्या शासनाचा दरारा असतो. ह्याला राजशासन म्हणतात. दुसरे जे कांहीं निर्बंध असतात ते लोकनियंत्याच्या शासनास उचित नसतात. त्यांचें अनुसरण लोकाभिप्रायावर अवलंबून असते. लोकांकडून होणारी निंदा, फजिती न बहिष्कार, यांची भीति दुर्मार्गवर्ती मनुष्याला थोडीबहुत असतेच. शिवाय ज्यांची आगळीक करावी ते तीबद्दल सूड उगविण्यात नेहमी तयार असतात. त्या प्रकाराला लोकशासन म्हणतात. तिसरें आणखी धर्मशासन म्हणून असतें. लोकनियंत्याच्या किंवा लोकसमाजाच्या निर्बंधांस न जुमानणारें माणूस प्रत्येक समाजांत असतात. अशा निरर्गल लोकांला इहलोकीं पापाचरण केले असतां परलोकीं शासन होईल, अशी दहशत बहुतेक धर्माकडून घालण्यांत येत असते. नरकस्वर्गादिकाच्या कल्पना ह्याच कारणास्तव रूढ झाल्या आहेत. परंतु ह्या धर्मशासनाला न जुमानणारी दुर्मार्गवर्ती मनुष्यें प्रत्येक समाजांत आढळतात.

ह्या अशा त्रिविध शासनांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं, व सगळ्या जनांची सन्मार्गाकडे प्रवृत्ति होत नाहीं, ती तशी होण्याला आणखी कोणते उपाय योजण्याजोगे आहेत याचा शोध तत्वज्ञांनीं व विशेषतः पाश्चात्य तत्वज्ञांनीं आजपर्यंत पुष्कळ केला आहे. हे शोध त्यांनीं आपआपल्यापरी ग्रंथरूपानें प्रणीत केले आहेत. त्या सर्वांचा निष्कर्ष असा आहे कीं, मनुष्याच्या ठायीं सुशीलता म्हणजे सन्मार्गप्रवृत्ति उत्पन्न करण्यास झटलें पाहिजे. त्याचें शील सुधारल्यावांचून कोणत्याही कृत्रिम भीतीचा किंवा पारितोषिकाचा उपयोग जनांला सन्मार्गास लावण्याच्या कामी चंगलासा होणें शक्य नाहीं. राजनियमांचें व लोकनिर्बधांचें उल्लंघन करून हवेतसें वर्तन करण्यास पुष्कळ माणसें नेहमी प्रवृत्त होत असलेली आपण पाहतों. त्याप्रमाणेंच धर्मनियमांची परवा न करणारेही पुष्कळ आढळतात. अशा अनाचारी लोकांला पहिल्या दोन शासनांच्या कचाटींत न सांपडतां कुकर्म करण्याची सवड पुष्कळ असते; आणि धर्मनियमभंगाबद्दल प्रत्यक्ष शासन होण्याची तर मुळींच भीति नसून आणखी परलोकादिकांच्या केवळ कल्पना असून त्या खऱ्या असतीलच अशी खात्रीं होण्याला त्याला धर्मग्रंथाहून अन्य कोणताही पुरावा नसतो. ही अशी लोकांची साशंक वृत्ति असली म्हणजे धर्मशासनाची भीति कोठून वाटणार? यास्तव नीतिशास्त्रज्ञांचें असें म्हणणे आहे कीं, मनुष्याला सन्मार्गवती करावयाचा असल्यास त्याला कृत्रिम दहशत घालूनच केवळ कार्य होणार नाहीं; आणि ते होत आहेसें वाटलें

तरी त्याचा कांहींएक भरंवसा नसतो. असून मनुष्याची मनःप्रवृत्ति सन्मार्गाकडे होईल असें करण्यास झटले पाहिजे; म्हणजे अर्थात् असें कीं, त्यांचे शील सुधारले

पाहिजे. अगदी लहानश्यापासून अंगीं सुशीलता वाढेल असें शिक्षण देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. आतां आनुवंशिक संस्कारास्तव मनुष्याच्या अंगीं कित्येक प्रवृत्ति प्रबळ असतात. त्यांचे यथोचित्त दमन करण्याचें काम मोठे बिकट असतें, तरी पूर्वसंस्काराच्या उलट योग्य संस्काराची योजना एकसारखी कित्येक पिढ्यांपर्यंत चालू राहिल्यास कुशीलतेचें निर्मूलन होऊन, सुशीलता अंगीं हळूहळू बाणत जाते. ही अशी शीलसंपन्नता कित्येक लोकांत बरीच विकास पावलेली दृग्गोचर होते; आणि ज्यांना आपण सर्वस्वी कुशील समजतो, त्यांच्या ठायीं ही सन्मार्ग महात्म्याची जाणीव असतें. सन्मार्गाचें अवलंबन करण्यास लागणारें इंद्रियदमनसामर्थ्य व वासनाजयास आवश्यक असा मनोनिग्रह त्यांच्या ठायीं हवा तितका विकास पावलेला नसातो. तो विकास पावेल असें करण्यास योग्य उपायांचा अवलंब बहुत काळपर्यंत एकसारखा करीत राहिलें पाहिजे. आतां हे खरें कीं, सदरीं सांगितलेली त्रिविध शासनें अशा इष्ट संस्काराला बरींच साहाय्यभूत होतात; तरी तेवढ्यांवरच भिस्त ठेवून समाजाची नैतिक सुधारणा होण्याची आशा करणे बरोबर नाहीं. कारण सगळ्या बऱ्यावाईट आचारांच्या मुळाशीं नैसर्गिक मनःप्रवृत्ति म्हणजे शील आहे. हे शील यथायोग्यरीतीनें विकास पावून दृढ झाल्यावाचून मनुष्य सदाचारसंपन्न होणें शक्य नाही; आणि मानवजातीचें वास्तविक कल्याण व इहपरलोकीं शांतिसुखाचा अनुभव, ही सदाचारावांचून प्राप्त होणारी नव्हत. वित्त, विद्वत्ता, सत्ता व कीर्ति ही सुखसिद्धीचीं साधनें आहेत, पण तीं केवळ गौण होत व तीं सर्वास साध्य होणारी तरी मुळींच नव्हत. सर्वांला साध्य होणारी अशी एक शीलसंपन्नता होय. शीलसंपन्नतेच्या योगानें मनुष्य सन्मार्गवर्ती होतो, आणि इतर सुखसाधनें त्याला अनुकूल नसलीं, तरी खऱ्या शांतिसुखाच्या अनुभवास तो पात्र होतो. असें हें शीलमाहात्म्य आहे. साधुसंतांनी व तत्वज्ञांनीं त्याचा माहिमा अनेकश: गाइला आहे.

***

# ३७ मातृवात्सल्य आणि पुत्रधर्म

मुंबईंतील मातृदिन-मंडळासाठीं लिहिलेला निबंध

(इंदुप्रकाश २४-१२-१९२०)

निसर्गाचें क्षणमात्र सुक्ष्मतः अवलोकन केलें असतां आपणांस असें दिसून येईल कीं, प्राणिमात्रांचे जन आणि परिपालन मातृवात्सल्यरूप महाशक्तीच्या योगानें होत असतें. प्राणी जातीचा प्रादूर्भाव ह्या पृथ्वीतलावर झाल्यापासून मातृशक्ती क्रमाक्रमानें उत्क्रमण पावत आली आहे. जनक आणि जननी हें द्वय उत्क्रमण झाल्यापासून ही दिव्य शक्ती जननीच्या ठायीं स्थित होऊन तिचें उत्क्रमण इतर हृदयवृत्तींबरोबर होत आले आहे. हें उत्क्रमण मानवेतर प्राणी जातींच्या मानसिक उन्नत्यनुरूप न्युनाधिक प्रमाणानें असतें. स्वदेहापासून निर्माण झालेल्या स्वरुपधारी प्राण्यांविषयीचें ममत्व पशूपक्षादि प्राणि जातींतील जनीच्या ठायीं केवळ निसर्गतः प्रादुर्भूत होऊन, आनुवंशिक संस्कारास्तव ते उत्तरोत्तर विकास पावणें हा एक निसर्गसिद्ध नियम असून, प्राणि जातींचें रक्षण आणि शाश्वति यांस त्यांची अत्यंत आवश्यकता आहे. ह्या नियमानुसार जननींच्या ठायीं वात्सल्य विकसित झालें नसतें तर या जगांत सर्वत्र माजून राहिलेल्या जिवनार्थ कलहामध्यें स्वसंरक्षणास सर्वथा असमर्थ अशा नूतन प्राण्यांचा अनेक प्रकारे संहार होऊन, प्राणि जातीचा विस्तार ह्या भूतलावर झाला नसता म्हाच एका कारणास्तव ह्या मातृवात्सल्यरूप हृदयवृतीस वर महाशक्ती म्हटलें आहे कित्येक तत्त्ववेत्ते व धर्मशील कवि यांनी असें प्रतिपादन केलें आहे कीं, हें विश्वप्रेम पाशांत सर्वतो बद्ध आहे. किंबहुना, सर्व विश्वास ह्या प्रेमाचाच मूळ आधार आहे. ह्या त्यांच्या प्रतिपादनाचा गूढार्थ काहींही असला तरी एवढें मात्र निर्विवाद सिद्ध आहे कीं, जननीचें स्ववत्सावर प्रेम असतें तें या विश्वांतर्गत प्रेमाचें अत्युत्कृष्ट असून विश्वातील प्राणिकोटीच्या उत्पत्तीस व संरक्षणास अत्यंत आवश्यक आहे.

आतां हें वात्सल्य किंवा ममत्व मानवेतर प्राण्याच्या ठायीं केवळ अल्पकाळ टिकतें. वत्स स्वतःचें रक्षण व पोषण करण्यास समर्थ झालें म्हणजे त्याच्या जननीच्या

ठायींचें हें वात्सल्य नाहीसें होतें. हा वात्सल्याचा काळ प्राणिजातींच्या उन्नत्यनुरूप न्युनाधिक असतो. कारण हे स्वरक्षणाचें सामर्थ्य वत्सांच्या अंगीं यावयास प्राणिजातींच्या उन्नतीच्या मानानें न्युनाधिक काळ लागतो. परंतु मानवी जननीची गोष्ट अशी नाहीं. तिची मानसिक उन्नति इतर प्राणिजातींहून विशेष झाली असल्याकारणानें, तिच्या ठायींची वात्सल्यरूप हृदयवृत्ति कदापि विनष्ट होत नाहीं. स्मृत्यादि उन्नत मानसिक शक्तींच्या विकासास्तव ही ममत्वबुद्धि तिच्या ठायीं आमरण जागृत राहते, किंबहुना प्रबळ राहते, आणि ही हृदयवृत्ती कित्येक मानवी जननीच्या ठायीं दुर्बल झालीच तर ती तिच्या अपत्यांच्या दुर्वर्तनामुळें हा एवढा मानवेतर जननींत व मानव जननींत वात्सल्यवृत्तिसंबंधानें भेद आहे, असें आहे तरी मानवेतर जननीच्या ठायीं वात्सल्य असते तें अतिशयित असते. पशुपक्ष्यादिकांच्या माता स्ववत्सांच्या रक्षणासाठीं प्रंसगी स्वप्राणाची परवां करीत नाहींत हें सर्व विश्रुतच आहे. या संबंधाची उदाहरणें देऊन प्रस्तुत त्रोटक निबंधाचें स्थळ व्यापण्यांत अर्थ नाहीं,

सदरील संक्षिप्त विवेचनाचा हेतु एवढाच कीं, प्रकृत निबंधाचा विषय जो मातृवात्सल्य त्याचा उगम केवळ प्राणीसृष्टीच्या आरंभापासून असून त्याचें महत्व व आवश्यकता हीं ध्यानांत यावी. दुसरें असें कीं, ही मातृवात्सल्यरूप हृदयवृत्ति मानवजातीच्या प्रादुर्भावापूर्वी कोट्यवधी वर्षें प्राणि जातींच्या ठायीं उत्तरोत्तर विकास पावत आली असून, मानवजातीच्या ठायीं ती केवळ अत्यन्त उन्नत व उज्वल स्वरूपानें स्थित आहे, आणि तिचा असा प्रचंड आनुवंशिक संस्कार वर्धमान प्रमाणानें मानव जातीच्या ठायीं स्थित असल्यामुळें तिचे प्राबल्य व निसर्गसिद्धत्व केवढें आहे, त्याची थोडीशी कल्पना मनांत यावी.

ह्या अशा परम उज्ज्वल हृदयवृत्तीचें वर्णन करण्यास प्रवृत्त होणाराला ग्रंथांतरीचीं प्रमाणें पाहावयाची किंवा नवीन अनुभव घेण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. ह्या वृतीचें प्रदर्शन नित्याच्या व्यवहारांत अगणितप्रसंगीं होत असतें, आणि तिच्या प्रत्यक्ष अनुभवाची अत्यंत हृदयंगम स्मृति यत्किंचित्‌ही लोप पावलेली नसते. परंतु तिचें यथोचित वर्णन करण्याची शक्ति मात्र सर्वंच्या ठायीं सारखी असण्याचा संभव नाही. हें वर्णन अत्यंत सहृदय कवींच्या प्रसादपरिपूर्ण व श्रुतिमनोहर वाणीनें जेवढें मनोहर होईल तेवढें इतरांच्या हातून वठावयाचें नाहीं. अनेक रसपरिपूरीत काव्याच्या वाचनानें सहृदय मनुष्याचे चित्त रंजन पावते हे ठिकच आहे. परंतु मातृवात्सल्यवर्णनपर काव्याच्या वाचनानें सामान्य जनांसही आल्हाद वाटून त्यांचें चित्त तल्लीन व प्रेमपूरित झाल्यावांचून राहाणार नाहीं. त्यास काव्यहृदय किंवा रसज्ञान याची मुळींच आवश्यकता नाहीं.

एवढी ह्या विषयांची सार्वत्रिक व्याप्ति आहे. हें जाणूनच प्रकृत लेखकानें ह्या दिव्यवृत्तीचे स्वसामर्थ्यानुरूप वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. तो केवळ स्वानुभवोतक असून ज्या मातेच्या वात्सल्यामुळें तो ह्या भूतलावर अद्यापि जिंवत राहिला आहे, तिच्या अत्यंत प्रेमळ स्मरणाचें केवळ अत्यल्प प्रतीक आहे.

मातृवात्सल्य हें सदरी दिग्दर्शन केल्याप्रमाणें केवळ निसर्गसिद्ध असून अनुवंशिक संस्कारास्तव अत्यंत प्रबळ असतें. म्हणूनच गर्भधारणेचे कष्ट सोसून व प्रसववेदना सहन करून जन्म दिलेल्या अर्भकावर मातेचे प्रेम एकसारखे अढळ असतें. त्याच्या संगोपनाप्रीत्यर्थ कितीही त्रास किंवा गैरसोय सोसावी लागली, तरी ती केवळ परम आवडीनें सोसण्यात माता सर्वदा तयार असते. अहोरात्र जागरूक राहून तान्ह्या बाळाची कोणत्याही प्रकारची आबाळ न व्हावी याविषयीं ती एकसारखी जपत असते. स्वनिद्राभंग, स्वस्वास्थ्यनाश इत्यादिकांनीं तिची प्रकृती बिघडून ती अगदीं क्षीण झाली तरी, त्याची तिला यत्किंचित्‌ही परवा वाटत नाहीं. आपल्या बाळांहून तिला सर्व विश्वांत कांहीं एक थोर वाटत नाहीं. आपल्या मुलावर जो कोणीं प्रेम करील त्याजवर तिचा लोभ जडतो. आणि जें कोणी त्याला त्रास देईल किंवा म्हणेल त्याजपाशी तिचा विरोध असतो. संसारांत तिजवर कोणत्याही प्रकारची संकटे आली तरी त्यांस ती आपल्या बाळास्तव मुळींच जुमानीत नाही. तिच्या चित्ताचा कितीही क्षोभ झाला असला तरी आपल्या तान्ह्या बाळास तिनें मांडीवर घेऊन त्याचें चुंबन घेतलें कीं, तिच्या चित्ताचा क्षोभ नष्ट होऊन ती समाधान पावतें. आपल्या परमप्रिय बाळाचें खेळणें बागडणें पाहून व बोबडे बोल ऐकून मातेला जसें कौतुक व आल्हाद हीं वाटतात, तशी दुसऱ्या कोणासही वाटत नाहींत. एखादेसमयीं तिच्या बाळास कांहीं दूखणें बाणें झालें असतां तिच्या चिंतेस व विवंचनेस पारावार नसतो. तिला कोठेच चैन पडेनासें होते. सर्व कामाकाजाकडे दुर्लक्ष करून, स्वतःच्या खाण्यापिण्याची परवा न करून, व आहोरात्र जाग्रणें करून मुलाच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून कोणी जे कांहीं सांगतील ते औषधोपचार करण्यास ती तत्परतेनें झटते. त्याच्यावर प्रकृतींत अंमळ चलबिचल झाली कीं तिचा जीव कासावीत होतो, आणि तीं कावरीबावरी होऊन एकाद्या पिशाप्रमाणें इकडून तिकडे धावपळ करीत सुटते; मुलाच्या प्रकृतीत जसा बरावाईट फरक होत जातो, तशी तिची स्वतःची प्रकृति बदलत जाते. मूल फार दिवस आजारी होऊन तें लवकर सुधारण्याचा संभव दिसत नाहींसा झाला म्हणजे तीं एकसारखी झुरणीस लागते. तीं अगदीं रोड होऊन तिच्या मुखचयर्वेर प्रेतकळा येते; आणि औषधोपचार करून व कोणी कांहीं सांगतील तें उपाय करूनही निर्घृण काळानें तिच्या

बाळास हिरावून नेलें, म्हणजे तिचा शोक अगदीं अनावर होतो. तो इतका कीं, कांहीं माता त्या शोकातिशयानें झुरून जाऊन मरण पावल्याचीं उदाहरणें आपल्या नित्याच्या व्यवहारांत नेहमीं दृष्टोत्पत्तीस येतात. ज्या मातेस हा दुर्वह स्वबालक वियोग घडतो, तिला हें सर्व जग शून्यवत् वाटतें. तिचें चित्त कोणत्याही गोष्टींत रमेनासें होते. तिला रात्रंदिवस आपल्या परमप्रिय बाळाची आठवण होऊन ती ढळढळां रडते. इतर कोणत्याही कारणास्तव तिला शोक झाला तरी तिचे समाधान केव्हांना केव्हा तरी होतें. परंतु तिच्या बालक वियोगजन्य शोकाचें शमन कदापि होत नाहीं. हें येथवर वर्णिलेले मातृवात्सल्य केवळ निरपेक्ष असते. आपले मूल पुढें मोठे होऊन आपणांस नानाप्रकारें साहाय्य करील, असा विचार करून माता त्याच्यावर प्रेम करीत नसते. वर निर्देश केल्याप्रमाणें हें मातृवात्सल्य पशुपक्ष्यांमध्येंही आढळते; आणि त्यांच्या मनांत हा विचार मुळींच येत नाहीं, हे उघड आहे. अशा रीतीनें जी ही हृदयवृत्ति उद्भूत होऊन डोळ्यानें विकास पावत आली आहे, तिला मानवजातीच्या ठायींच तेवढें निराळें स्वरूप प्राप्त व्हावें हें शक्य नव्हे; आणि असा अनुभव व्यवहारांतही मुळींच येत नाहीं खरें म्हटलें असतां, मातृवात्सल्य अगदीं निरपेक्ष नसेल तर स्वबालकरक्षणार्थ मातेकडून जो आत्मयज्ञ होत असतो तो कदापि होताना. हें मातृवात्सल्याचें निरपेक्षत्व मूल लहान असतें तोपर्यंतच दिसून येतें असें नाहीं; तर तें आमरण निरपेक्ष असतें. स्वबालकाकडून प्राप्त होणाऱ्या सुखदुःखानें त्यांत अणुमात्रही कमीपणा येत नाहीं. एकादें मूल मोठें झाल्यावर कृतघ्न ठरून मातेला अनेक प्रकारीं त्रास व दुःख देण्यास प्रवृत्त झालें तरी मातेच्या ठायीचे हें वात्सल्य यत्किंचित्‌ही कमी होत नाहीं. अशा कृतघ्न मुलाला कांहीं आपाय झाला असतां मातेचें हृदय जसें कळवळून जाईल, तसें इतर कोणाचें कळवळणार नाहीं. मूल संकटांत किंवा दुःखांत पाहिल्याबरोबर त्यानें केलेला अपकार सर्व विसरून त्या संकटांतून किंवा दुःखांतून त्याला मुक्त करण्यास ती मनापासून पूर्ण कळवळ्यानें झटते. आपल्या लेंकराकडून कसलाही ऐहिक लाभ होईल हा विचार जसा मातेच्या प्रेमास कारण नसतो, त्याप्रमाणेंच तिचें मूल कुरुप, दुराचारी आणि निर्बुद्ध निघाले तरी तिच्या ठायींच्या वात्सल्यांत लवमात्रही फरक पडत नाहीं. इतर लोकांस तें मूल अगदीं आवडलें नाहीं, किंवा अत्यंत द्वेष्य वाटलें तरी मातेला तें परमप्रिय असतें. इतकेंच नव्हे तर, इतर जन त्याचा ज्या मानानें तिटकारा करतात त्या मानानें तिचें त्याच्यावरचें प्रेम विशेषच दृढ होतें, आणि लोकांनी दिलेला दोष तिला सहन न होऊन ती त्याचा पक्ष घेऊन त्यांच्याशी विरोध करिते. स्त्रैणवास्तव किंवा इतर कोणत्याही कारणास्तव मुलगा मातेला सोडून गेला व तिला

त्यानें वृद्धापकाळीं कांहीं एक साहाय्य केलें नाहीं तरी तिच्या ठायींचें वात्सल्य फारसें कमी होत नाहीं. त्याचा उत्कर्ष झालेला ऐकून ती संतोष पावते. आणि त्याला विपत्ती प्राप्त झाल्याचें तिला कळलें म्हणजे ती दुःखविव्हळ होते. मानसशास्त्रवेत्ते कृपणाच्या ठायीं धनलोभ कसा प्रकर्ष पावतो याची मिमांसा अशी करितात कीं, सुखविषयाची प्राप्ती सुलभ व्हावी म्हणून आरंभीं कृपण धनाचे संपादन व संचय ही करूं लागतात, आणि ह्या गोष्टींचा त्याला निदिध्यास एकसारखा लागला म्हणजे कालेंकरून धनप्रीति त्यांच्या ठायीं अशी कांहीं अनावर होते कीं, धनाविषयीं त्यांच्या ठायीं निरपेक्ष प्रेम उद्भवतें. तें इतकें कीं, धनक्षय होईल या भीतीनें तें स्वतः त्याचा उपयोग मुळींच घेईनासे होतात, अहर्निश धनप्राप्त्यर्थ जिवापाड श्रम करितात व बऱ्यावाईट मार्गानें धनसंचय एकसारखा करीत रहातात. मातृवात्सल्य कृपणाच्या वृत्तिशीं बहुतांशी सदृश आहे. भेद इतकाच कीं, धनप्राप्तीस कृपण जो आरंभी उद्युत्त होतो तो केवळ सुखविषयीच्या प्राप्तीसाठी; परंतु माता स्वपुत्रावर जें प्रेम करिते तें कांहीं अशा कोणत्यातरी बाह्य उद्देशानें नव्हे. तिच्या ठायीं तें निसर्गसिद्ध असतें, आणि म्हणूनच तें निरपेक्ष असतें.

## मातृवात्सल्याची अढळता

मातृवात्सल्य निरपेक्ष असतें, त्याप्रमाणेंच अढळही असतें. पशुपक्ष्यादिकांच्या ठायींचें वात्सल्य जसें कालेंकरून नष्टप्राय होतें तसें तें मनुष्याचे होत नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्यास प्रतिकूळ अशा कोणत्याही गोष्टी घडून आल्या तरी तें ढळत नाहीं. एकाद्या कृतघ्न मुलानें मातेला कितीही त्रास दिला, किंवा तिची विटंबना केली तरी, ती सर्व सहन करून आपल्या त्या मुलाचें अहित किंवा अप्रिय ती मनापासून कदापि चिंतीत नाहीं, किंवा करण्यास प्रवृत्त होत नाहीं. दुसरें कोणी त्याला अपाय करण्यास प्रवृत्त झालें असतां तिला तें सहन होत नाहीं. हे अप्रतिम वात्सल्य मातेच्या ठायीं आमरण वास करीत असतें. तिचीं मुलें केवढींही मोठी झाली व जगाच्या कोणत्याही भागावर संचार करीत असलो, तरी तिचे त्याजवरचें प्रेम अढळ रहाते. आपला मुलगा आतां प्रौढवयात आला असून स्वतःचें रक्षण करण्यास समर्थ झाला आहे असें जरी मातेस पूर्णपणें कळत असतें तरी ती असें समजत असतें कीं, तो मुलगा आपल्या मांडीवर खेळणाऱ्या मुलासारखा असून त्याची सर्वप्रकारची काळजी आपण जातीनें वाहिली पाहिजे. मुलाचा विवाह झाला असून त्याच्या प्रकृतीस जपणारी स्त्री त्याला प्राप्त झाली असली किंवा त्याला चाकरमाणसांची वगैरे पूर्ण अनुकूलता असली तरी त्याच्या खाण्यापिण्याची वगैर नीट तरतूद ठेवून त्याच्या प्रकृतीस हरएक प्रकारीं

जपण्याच्या कामी माता कशी अगदीं मनापासून झटत असते, याचा अनुभव प्रत्येकास आहेच त्याला एकादे जड दुखणें लागून व परस्वाधीन होऊन बिछान्यास खिळला असतां त्याच्याजवळ अहोरात्र जागत बसून त्याची शुश्रुषा पूर्ण कळवळ्यानें व तत्परतेनें करण्यास माता कितीप्रकारें झटते हें कोणालाही सांगावयास नको. अशा समयीं तिच्या इतकी काळजी व चित्ताची अस्वस्थता अन्य कोणासही वाटत नाहीं. पिता, पुत्र, कलत्र व मित्र हीं सारी कितीही सार्द्रप्रेमानें आपल्या शुश्रूषेस प्रवृत्त झालीं तरी त्यांची ती प्रेमवृत्ति केवळ स्वार्थमूलक असते. आपल्याकडून कांहीं स्वार्थ साधण्यासारखा असला तरच त्यांच्या त्या प्रेमास ऊत येतो. परंतु मातेची गोष्ट तशी नाहीं. तिची ही हृदयवृत्ति अढळ व निरपेक्ष असते. हा जगला तर लौकिक वाढवून कुळाचा उद्धार करील, आपली सुस्थिति राहून आपणांस वैभवादि वस्तूंचा लाभ मुबलक होऊन आपले तेज जनांत वृद्धिंगत होईल, आपणांस याचें साहचर्य दीर्घकाळ घडून सुखासमाधानाची व सुखविषयांची प्राप्ती होईल, असा कांहींच विचार मातेच्या चित्तांत बसत नाही. परंतु त्या तिच्या मुलाकडून प्राप्त होण्याचा संभव मुळींच नसला तरी तिच्या निसर्गसिद्ध प्रेमवृत्तींत अल्पांशानेंहि फरक पडत नाहीं. म्हणूनच मुलाच्या कठीण प्रसंगीं तिच्या कडून जसें पूर्ण कळवळ्याचें व निरपेक्षतेचें सहाय्य मिळतें, तसें दुसऱ्या कोणाकडूनही मिळत नाहीं, तिचा मुलगा मोठा होऊन तिच्याजवळ रहात असो किंवा रोजगार धंद्यानिमित्त कोठेतरी दूरदेशी गेलेला असो, त्याच्या कुशलपणाविषयीं काळजी तिला अहर्निश लागलेली असते. मुलगा वेळेवर घरीं आला नाही, किंवा परागंदा असलेल्या मुलाचें कुशलवृत फार दिवस कळलें नाहीं, म्हणजे तिचें चित्त अगदीं अस्वस्थ होऊन जाते. तिला कोठेच चैन पडेनासें होतें. क्षुधातृषादि नैसर्गिक गोष्टीचाही तिला विसर पडतो. तिचें डोळें त्याच्या वाटेकडे किंवा टपालवाल्याकडे सारखे लागलेलें असतात. एवढी काळजी तिला आपल्या मोठ्या पोक्त , किंबहुना वयातींत झालेल्या मुलाविषयी कां बरें असावी! आपल्यावांचून त्यांचें नीट चालावयाचें नाहीं, आपल्या सहाय्याची त्याला अजून आवश्यकता आहे, असें तिला वाटतें म्हणून काय? अर्थात् नाहीं. तर आपल्या मुलावर आपण असें सार्द्र व अढळ प्रेम केल्यानें त्याची आपणावरील प्रीति अढळ राहून तो आपणांस काहीएक उणे पडूं देणार नाहीं या अपेक्षेनें काय? मुळींच नाहीं. या संबंधानें वर उल्लेख केलाच आहे कीं, मातृवात्सल्य नैसर्गिक, यास्तव तें केवळ निरपेक्ष असतें. या प्रश्नाचें उत्तर एवढेंच कीं ह्या विश्वातील प्राणिमात्राच्या जननास व परिपालनास अत्यंत आवश्यक अशी जी मातृवात्सल्यरूप महाशक्ति, तिचा प्रादुर्भाव व विकास हीं अशा बाह्य कारणांनीं होत नसून तिचीं पाळेंमुळें अत्यंत खोल गेलेली असतात. तेव्हां आशा ह्या परमसनातन हृदयवृत्तीचा

लोप मातेच्या चित्तांतून कसा व्हावा बरें? तिची मानसिक उन्नति मानवेतर प्राण्यांहून विशेष झाली असल्याकारणानें स्मृत्यादि इतर मानसिक शक्तीचें ह्या वृत्तीत विशेष साह्य मिळून ती चिरकाल टिकते.

## मातृवात्सल्याच्या योगानें मनुष्याची सदाचाराकडे प्रवृत्ति होते

मनुष्याचें हृदय कठोर व कोमल अशा उभय प्रकारच्या वृत्तीचें बनलें आहे. त्यापैकीं कोमल वृत्ति ज्या आहेत त्यांचें प्रारंभी उब्दोधन व विकसत मातृसाहचर्य व मातृबोध यांच्या योगानेच केवळ होतें. आणि ज्या सद्वृत्तींच्या समुदायास आपण सद्गुण अशीं संज्ञा देतों, त्यापैकीं बहुतेक साऱ्या वृत्ति कोमल असतात. तेव्हां आमच्या ठायींच्या न्यूनाधिक सद्गुणांचा अर्थात् सदाचाराचा उगम मातृशिक्षेनेंच मुख्यतः होतो. आतां हा अत्यंत इष्ट व आमच्या ठायीं खरें मनुष्यत्व आणणारा सदाचार आम्हांस मुख्यतः मातृवात्सल्यानेंच प्राप्त होतो, यांत किमपि संदेह नाहीं. आपला मुलगा सदाचारी निपजावा असें ज्या सन्मातेस वाटतें, ती आपल्या प्रेमपुरःसर कोमल वाणीनें व प्रेमळ आचरणानें त्याच्याठायीं सद्वृत्तीचा विकास करिते. तिचे अत्यंत कळवळ्याचे व प्रेमाचे शब्द कानीं पडल्यानें मुलाचे चित्त पालटण्यास विलंब लागत नाहीं. बोधप्रचुर अशीं दशसहस्त्र पुस्तकें किंवा रसभरित व्याख्यानें ऐकून जो परिणाम मनावर होणार नाहीं तो मातेच्या एका कोमल व प्रेमाच्या शब्दानें होतो. असा मातृवात्सल्याचा अप्रतिम प्रभाव आहे. तिचें आपल्या लेकरांशी पूर्ण वात्सल्याचें वर्तन होत असल्यामुळें त्याच्या अंगच्या कोणत्याही वृत्तीस तिला हवें तसें वळण देता येतें. आतां हें खरें कीं, मातृवात्सल्याच्या ह्या सुपरिणामाचा लाभ सर्वांस सारखाच घडतो, असें म्हणतां येत नाही. मातेच्या अंगीं जशी योग्यता असेल त्या मानानें हा परिणाम व्हावयाचा. परंतु एवढे मात्र विसरता कामा नयें कीं, माता स्वसामर्थ्यानुसार आपल्या मुलास जी शिक्षा लाविते ती केवळ त्याच्या हिताची आहे असा तिचा पूर्ण विश्वास असतो. म्हणून आपल्या लेकरांचे कल्याण व्हावें या अनन्य हेतूस वश होऊन ती त्यांचें वर्तन सुधारण्यास झटते; आणि त्या कामीं तिला वात्सल्यास्तव चांगले यश येते, या गोष्टीचें वर दिग्दर्शन केलेंच आहे. ह्या भूतलावर जे सत्पुरुष आजपर्यंत निर्माण झाले आहेत, त्यापैकीं बहुतेकांच्या सदाचरणास त्यांच्या वत्सल मातांकडूनच वळण मिळालें आहे, आणि मातेचा हा परमश्रेष्ठ उपकार साधुपुरुषांपैकीं पुष्कळांनी प्रसंगोपात कबुलहि केला आहे. तेव्हां तात्पर्य काय कीं, मातृवात्सल्य मनुष्यांचे जन व परिपालन ह्या दोन गोष्टींतच अत्यावश्यक आहे असें समजतां कामा नये, तर ते नित्याचरणासही अत्यंत अगत्याचे आहे असे सिद्ध होतें.

आतां त्या वृत्तीचे विषय, जे आम्हीं मानव त्यांचा ह्या संबंधानें काय धर्म असावा हें संक्षेपतः लिहूं.

## पुत्रधर्म

ज्या मातेच्या अपरिमित वात्सल्यामुळे आम्ही निर्माण होऊन ह्या लोकी नांदत आहो, जिने केवळ निसर्गसिद्ध प्रेमास गुंतून आपल्या सुखाकडे किंवा सोईकडे न पाहतां आमचे लालनपालन केलें, जिने कसल्याही मोबदल्याची अपेक्षा न करितां आमच्यावर सर्वदा सारखी ममता केली व आमच्या सुखाची व उत्कर्षाची नित्य काळजी वाहिली, जिने न त्रासतां व न थकतां सर्वदा आमच्या गोपनार्थ परिश्रम घेतले म्हणून आम्ही आज निरोगी, सुदृढ, बुद्धिमान व नीतिमान् झालों आहों, त्या मातेच्या ऋणांतून आपण कांहीं केले तरी कदापि उतराई होणार नाही. तिचे उपकार केवळ अपरिमित व अप्रतीम होत तेव्हां अशा प्रेमळ व वत्सलपूर्ण मातेच्यासंबंधाचीं आपली कर्तव्यें करण्यांत आपण सर्वदा किती तत्पर असलें पाहिजे हें काय सांगा?

## मानवी संसारांत कांहीं परमपवित्र कर्तव्यपरंपरा असेल तर ती मातेसंबंधाची होय

इतर कर्तव्ये जी करावयाची तीं कोणत्याना कोणत्या ऐहिक किंवा पारलौकीक हिताच्या प्राप्तीसाठी करण्यास आपण प्रवृत्त होतों. परंतु माते सबंधाचीं जी कर्तव्ये करावयाची तीं तिनें केलेल्या महदुपकाराचें ऋण आपल्या शिरीं असतें, म्हणूनच आपल्या ठायीं अमर्याद प्रेम सांठविलेलें असतें म्हणून होय. तिनें वात्सल्याच्या योगानें जो प्रेमरज्जु उत्पन्न केलेला असतो त्यानें आपण सर्वथा बद्ध होऊन गेलेलों असतो. हा प्रेमरज्जु असा कांहीं प्रबल असतो कीं, त्याचे बंधन सत्पुत्राच्या ठायीं अलौलीक असतें. तिच्यासाठी तो पाहिजे ते करण्यास प्रवृत्त होतो, पडतील ते श्रम घेण्यास उद्युक्त होतो, कोणत्याही प्रकारचीं गैरसोय सोसण्यात तयार होतो, आणि यश, किर्ती, अधिकार, सुखोपभोग इत्यादिकांचा मोह कितीही प्रबल असला तरी मातेपित्यर्थ तो समयीं त्याचा अव्हेर करण्यास सिद्ध होतो. मोठमोठी शौर्यांची पराक्रमाची किंवा बुद्धिवैभवाचा महत्कृत्ये करून लोकांत मोठा मान व किर्ती ही प्राप्त झाल्यानें त्याच्या चित्तास कितीही आल्हाद वाटला तरी तो घरीं येऊन मातेच्या चरणीं नमन करून तिच्यापुढें बसल्यावर तिनें सुरकुत्या पडलेल्या हातानीं त्याचें मुक्त कुरवाळून त्याचें निस्मीम प्रेमानें एकवार चुंबन घेतलें म्हणजे, त्याला जो आनंद होतो व जें प्रेमाचे भरते येतें, त्याला ह्या जगांत दुसऱ्या कशाचीही साम्यता येत नाहीं. आपला जगांत लौकीक

व मान वाहून आपणास धनादिकांची प्राप्ती झाल्यामुळें अगदीं दिलापासून आनंद पावणारी अशी ह्या भूतलावर एक माताच होय. कारण उघड आहे कीं, तिला जो आनंद होतो तो केवळ निरपेक्ष असून पूर्ण अकृत्रिम असतो. आपल्या सत्पुत्राबद्दल तिला जसा पूर्ण अभिमान असतो व जसे तिचे हृदय प्रेमरसानें उचंबळत असतें तसें दुसरें कोणाचे उचंबळण्यासारखे आहे बरें? तेव्हां अशा प्रेमळ व स्नेहाळ मातेला परमपूज्य व परमप्रिय मानून तिच्याशीं केवळ पुत्रधर्मानें वर्तन ठेवण्यास सर्वदा तत्पर असावें हें सध्याचे परमकर्तव्य होय. हे कर्तव्य तो ज्या मानानें करील त्या मानानें तो जगांत आदरणीय होणार आहे, व त्या मानानें त्याच्या चित्तासही समाधान प्राप्त होणार आहे. अशा ह्या अत्यावश्यक व परमपूज्य पुत्रधर्माचे येथें थोडक्यांत दिग्दर्शन करूं.

## आज्ञांकितपणा

सत्पुत्राचें हें आद्य लक्षण आहे. आपल्या मातापितरांच्या आज्ञेंत सर्वदा राहून त्यांचे प्रिय करण्यास जो पुत्र तयार असतो तो केवळ धन्य आहे. त्यातूनही मातृभक्ति ही अत्यंत स्पृहणीय व आदरणीय होय. मातेच्या इच्छेप्रमाणें सर्वदा वागून तिला सुख प्राप्त होईल असें करण्यास तनमनधनें करून झटण्यांत सत्पुत्रास जें समाधान प्राप्त होतें, तें दुसऱ्या कशानेही लाभत नाहीं. आज्ञाभंगासारखें दुःख देणारें मातेस दुसरें काहीही नाहीं, हें आपण सर्वदा लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. कारण तिला वाटत असतें कीं, आपण आज्ञा करावी आणि आपल्या पुत्रानें ती ऐकावी, हा आपला निसर्गसिद्ध हक्कच आहे. ह्या हक्काची परवां न करणारा एकादा कुपुत्र निपजला असतां, तिला दुःख होणें साहाजिक आहे. आणि तिच्या उपकाराचे ऋण आपल्या शिरी एवढे मोठे असतां तिची उद्दामपणानें किंवा, अनर्गलपणानें अवज्ञा करून तिला दुःख द्यावें हें अत्यत अनुचित होय. तिला ज्या गोष्टींनीं दुःख होण्याजोगें असतें, त्या करण्यास पुत्रानें कदापि प्रवृत्त होऊं नये. आतां हे खरे कीं, कित्येक गोष्टीचे वास्तविक महत्व एकाद्या मातेला तिच्या अज्ञानास्तव एकादे समयीं चांगलेसे कळत नसतें. म्हणून त्या गोष्टी आपल्या पुत्रानें करूं नयेत असें तिला वाटणे साहजिक आहे. परंतु सत्पुत्र असतात, ते तिच्या अज्ञानाबद्दल तिची अवमानना न करितां त्या गोष्टीबद्दल तिची साधेल तेवढीं आधीं समजूत घालण्याचा प्रयत्न करितात, आणि तिची मनोवृत्ति आपल्या उद्दिष्ट कार्यास अनुकूल करून घेतात. कारण मातेला स्वपुत्रहित इष्ट असल्याकारणानें ती स्वज्ञानमुलक हट्टाग्रह धरून त्याच्या कर्तुत्वास आड येत नसतें. आपल्या अभिप्रायास त्यांनीं मान दिला व आपल्याशीं त्यांनीं बुद्धिवाद केला एवढीच गोष्ट तिला पुरे असते.

परंतु इतकेही करून तिची मनोवृत्ती बदलेनाच तर निरुपाय होऊन ते त्या कार्यापासून परावृत्त होतात आणि तिची हयात आहे तोपर्यंत तिला अप्रिय वाटणाऱ्या गोष्टीमध्ये सहसां मन घालीत नाहींत. हे त्याचे वर्तन पुत्रधर्मास पूर्ण साजेसे असून परम प्रशंसनीय होय. दुसरें असें कीं, एकादी अनीतीची गोष्ट आपल्या पुत्रानें करावीं असें मातेच्या मनांत कित्येक प्रसंगीं येतें, आणि पुत्र सदाचारसंपन्न असल्यास ती करूं नये असें त्याला वाटतें; अशासमयीं मातेचे मन फिरविण्याचा प्रयत्न तो सदाचार प्रिय पुत्र करितो. परंतु तिचे मन नच वळले तर तिची अवज्ञा तो मोठ्या दुःखानें करितो. यांत त्याच्या मातेस दुःख होण्याचा संभव असतो हें खरें. परंतु सदाचाराविषयीचें तिचे अज्ञान किंवा अप्रेम याचे ते फळ होय. तेथें सद्गुणीं पुत्राचा इलाज नाहीं. परंतु अशा थरास गोष्ट फार करून जात नाहीं. बहुशः पुत्रानें प्रेमपुरसर व सन्मान्य बुद्धीपूर्वक केलेल्या बुद्धीवादाचा सुपरिणाम मातृहृदयावर होऊन मात्राज्ञाभंगाचा प्रसंग सुपुत्रास येतच नाहीं. कित्येकवेळा असें घडलें आहे कीं, सत्पुत्र असतो, तो अशा प्रसंगीं मातेच्या मनास खेद न वाटेल अशी कांहींतरी युक्ति योजितो. यासंबंधाचें एक इतिहास प्रसिद्ध उदाहरण आहे तें येथे देतों.

## महापराक्रमी अलेक्झॅण्डर

अलेक्झॅण्डर बादशाहानें त्याच्याकाळीं ज्ञात असलेल्या बहुतेक भूभागावर आपल्या अंगच्या अलौकिक शौर्यानें व युक्तित्वानें सत्ता स्थापित करून, आपल्या नांवाचा दरारा सर्वास वाटेल असें केले होते, हें सर्व विश्रुतच आहे. हा प्रतापी बादशहा स्वारींत असतां त्याच्यासाठीं राज्याची व्यवस्था पहाणाच्या एक अधिकाऱ्यानें, त्याच्या मातेनें राज्यकारभारांत घोटाळा माजविल्याबद्दल कागळ्यांची पत्रे त्याला वेळोवेळां पाठविली. त्याचे त्या मातृभक्त ानें एकच उत्तर पाठविलें, तें हें कीं, माझ्या प्रिय मातेसंबंधाच्या कागाळ्यांचीं तुजकडून शंभर पत्रे आली तरी तीं माझ्या मातेच्या एका आसवानें साफ धुऊन जातील. अहाहा! केवढी हीं त्या बादशहाची मातृभक्ति! सर्वथा युद्धकर्मात गुंतून सहस्त्रावधि मनुष्यांच्या प्राणांचा व वित्ताचा ध्येयानें अपहार केला, त्या सकृत्दर्शनीं निर्घुण दिसणाऱ्या शौर्यशाली पुरुषाच्या हृदयातील मातृविषयक प्रेम कधीं यत्किंचितही नष्ट झालें नाहीं. परंतु हे असें कडेलोटाचे प्रसंग फार करून येतच नाहींत. मात्राज्ञा म्हटलीं म्हणजे ती प्रायः पुत्रहिताची असते. तिच्या अर्ध्या वचनांत राहाणे यांतच सत्पुत्रास खरें सौख्य आहे. मातेला अप्रिय असें कांहींएक करावयाचें नाहीं; कोणत्याही गोष्टीविषयीं आपला केवढाहीं निर्धार झाला असला तरी

तो मातेच्या आज्ञेस्तव एकीकडे ठेवून, तिचें प्रिय करण्यास झटावें, हा पुत्राचा परमपवित्र धर्म होय. आपणास लोकांत मोठा मान, लौकिक, अधिकार किंवा पदवी प्राप्त झाली असली तरी मातेनें एकेरी नांवानें हाक मारून कोणतीही गोष्ट करण्यास सांगितली असतां ती करण्यास तो सर्वदा तयार होतो, ह्या म्हातारीचें मी काय ऐकू असें ध्येयाच्या मनांत क्षणभरही येत नाहीं, तोच खरा मातृभक्त . ह्या अशा मातृभक्तीचे आणखी एक उकृष्ट उदाहरण द्यावें असें वाटतें. स्वजनास स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केवळ आत्मनिरपेक्ष बुद्धीनें ज्यानें सप्तवार्षिक घनघोर संग्राम करून आपल्या अंगच्या शौर्यबलादिकांचा, निःसीम स्वातंत्र्यप्रीतीचा व अद्वितीय निरपेक्षत्वाचा झेंडा सर्व दुनियात अक्षयीं रोवून ठेविला आहे, त्या जॉर्ज वॉशिंग्टनच्या ठायीं मातृभक्ति किती उज्वल होती यांचे एक उद्दाहरण त्याच्या परम आदरणीय चरित्रांत आढळते. तें असेंः- ब्रिटिश लोकांकडून स्वातंत्र्य मिळविल्यावर अमेरिकन लोकांनीं वॉशिंग्टनास आपल्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष नेमिले. हा अप्रतिम अधिकार त्याला प्राप्त झाल्यावर स्वतंत्र झालेल्या संस्थानातील सर्व प्रमुख जनांनीं त्याच्या बहुमानार्थ एक जंगी मजलस केली. ही मजलस अर्थात रात्रीची झाली. ह्या मजलशीला वॉशिंग्टन, प्रिय मातेसहवर्तमान आला. जिकडे तिकडे आनंदोस्तव व गायन वादनादि मनोहर प्रकार चालेले असतां दहा वाजले, त्याबरोबर वॉशिंग्टनची आई म्हणाली, जॉर्ज, आपली घरीं जाण्याचीं वेळ झाली. हे मातेचें शब्द कानीं पडताच वॉशिंग्टन आपली टोपी घेऊन सर्वास नमून तिच्या मागून चालता झाला. मजलस आणखी पुष्कळ वेळ चालावयाची असून ती केवळ त्याच्या प्रीत्यर्थ होती. असें असतां त्यानें तिची परवां केली नाहीं. आपण असा मध्येंच निघून गेल्यानें आपल्या पुष्कळ मित्रांच्या आनंदोस्तवाचा विरस होऊन त्यांस वाईट वाटेल, हा विचार मनांत येऊन मात्राज्ञेचा भंग करण्यास तो प्रवृत्त झाला नाहीं. एकाद्या लहान मुलाप्रमाणें नाहीं होय म्हणतां तिच्याबरोबर मुकाट्यानें घरीं गेला. ह्या एका गोष्टीनें किती बोध घेण्यासारखा आहे बरें? एवढ्या मोठ्या राष्ट्राच्या अधिपतित्कचा मान ज्याला केवळ स्वकर्तृत्व बळानें प्राप्त झाला होता, तो जर असा आपल्या मातेच्या अर्ध्या वचनांत असें तर आमच्यासारख्या सामान्य जनांचा काय पाड! तेव्हां तात्पर्य काय कीं, केवळ लहान वयांतच मातेची आज्ञा मुलांनी पाळावीं, मोठ्या वयांत पाळली नाहीं तरी चालेल असें कोणीही समजतां कामा नयें. आज्ञाभंगानं मातेला दुःख होतें हे जर खरें आहे, तर तिची अवज्ञा करून तिला दुखविणाऱ्या पुत्रास कोण सुपुत्र म्हणेल! खरे पाहतां ज्या गोष्टी मातेला प्रिय असतात किंवा ज्या आम्ही कराव्या असा तिचा मनोदय भासतो. त्या करण्याविषयीं तिनें आज्ञा किंवा इच्छा प्रगट करण्याची वाट पाहू नये, तर त्या आपण होऊन कराव्या हाच खरा पुत्रधर्म होय.

## योग्य मान ठेवणें

पुत्रधर्माचे दुसरें अगं म्हटले म्हणजे माता पितरांचा योग्य मान ठेवणे हें होय. जिनें आपणांस जन्म देऊन हा काळपर्यंत सुरक्षित ठेविले, त्यांच्या विषयीं परम पुत्रत्वाची बुद्धी सत्पुत्राच्या चित्तांत वास करिते, आणि तिला अनुरुप असे त्याच्या हातून सर्वदा वर्तन होत असतें. माता व पिता यांस देवासारखा मान द्यावा असें प्राचीन वैदिक धर्मांत सांगितलें आहे.

## 'मातृ देवो भव! पित्र देवो भव!'

वरील वचनांतला अर्थ एवढाच कीं, त्यांच्या अनुग्रहावाचून आपली ह्या जगांत सुस्थिती असणें संभवत नाहीं. मातापितरांच्या आश्रयानें व साहाय्यानें बहुतेक पूर्ववय जाणें, आणि संसारांत चोहोकडें चालू असलेल्या जीवनार्थकलहामध्यें झगडण्याचें सामर्थ्य व योग्यता हीं त्यांच्या प्रसादानें प्राप्त होतात, आणि ही जीवितयात्रा सुखानें पार पडण्यास आवश्यक अशा सद्गुणांचे बाळकडू त्यांच्या वात्सल्यानें प्राप्त होतें. असा मातापितरांचा महिमा आहे. त्यांच्याविषयीं परम आदराची बुद्धि आमच्या चित्तांत बसावी व त्यांस आम्ही देवासमान मान द्यावा हें साहाजिक आहे. त्यांतूनही मातेच्या संबंधानें ही पुज्यत्व बुद्धि पुत्रचित्तांत विशेषच बसली पाहिजे. कारण, तिचे उपकार व निरपेक्ष प्रेम ही केवळ अमूल्य होत. मातेला संसारांत योग्य मान देऊन तिची सेवा करण्यास सर्वदा तत्पर असावें, यांतच सत्पुत्रास परमभूषण आहे. संसारातील प्रत्येक कर्तव्यांत तिची सल्लामसलत घेतल्यावांचून कोणत्याहि उद्योगास लागू नयें. ती आतां जरठ झाली, तिची सल्ला ती काय घ्यावयाचीं, असा तिजविषयीं तिरस्कार कदापि दाखवू नयें. व्यवहारांत ज्या ज्या घडामोडी आपल्या हातून होत असतील, त्याजविषयीं तिच्याकडे नेहमीं बोलत असून तिचा अभिप्राय घेत जावे. एकाद्या गोष्टींत आपणास यश किंवा अपयश आले तर त्याविषयीं आपल्या मातेस कळविल्यानें आपल्या आनंदाची किंवा विषादाचीं ती वाटेकरी होऊन आपलें अभिनंदन किंवा समाधान करण्यास मनापासून झटतें. अशा खऱ्या कळवळ्याचें माणूस संसारांत आपणास कोणीही लाभणें नाहीं. कित्येक कुपुत्र असतात, ते स्त्रैणत्वास्तव किंवा दुसऱ्या एकाद्या कारणास्तव स्वमातेचा उपमर्द व अवमानना करण्यास उयुक्त होतात, हे त्यांस अत्यंत अनुचित होय. मातेनें समयीं कठोर शब्दांनीं ताडण करून आपणांस नसता दोष लाविला तरी तीस अपशब्दांनीं दुखवूं नये; तिचें बोलणें मुकाट्यानें ऐकून घ्यावें आणि तिचा कोणत्याही गोष्टीसंबंधानें गैरसमज झाला असल्यास तिची समजूत

मोठ्या अदबीच्या शब्दांनीं करण्यास झटावें, तिनें आपणास शिवीगाळी का केली तरी संताप पावू नये. कारण तो तिचा पूर्ण अधिकार आहे. लौकिकांत एकाद्या मनुष्याचा मोठा सन्मान झाला किंवा त्यास अत्युच्च पदवी प्राप्त झाली, तरी त्याची मातेपुढे थोरवी कांहींच नाही. तिने त्याला एकेरी नांवानें हाक मारून एकाद्या गोष्टी संबंधाने कठोर शब्दांनी ताडन करणे हा तिचा अधिकार केवळ निसर्गसिद्ध आहे. हा तिचा त्याजवर जन्मसिद्ध हक्क आहे हे जाणून सुपुत्र मातेस कधीहि उलट जबाब करून दुखवित नाही. ह्या अशा त्याच्या परम आदराच्या वर्तनाने मातेस मोठे समाधान वाटणे साहजिक आहे; आणि सत्पुत्रासही मातेचा आमरण योग्य मान ठेविल्याने मोठे समाधान चाटत असतें. स्वकर्तव्य योग्य प्रकारे बजाविल्याने चित्तास प्रास होणारी शांति अत्यन्त स्पृहणीय होय. आजपर्यंत जे महापुरुष ह्या भूतलावर स्वकीर्ति ठेवून गेले आहेत, त्यांच्या ठायीं ही मातृभक्ति अप्रतिम होती, अशी साक्ष इतिहास देत आहे. तेव्हां तात्पर्य काय कीं, मातापितरांचा मान मुलांनी लहान वयांत तेवढा ठेवावा, तीं प्रौढ वयांत आली म्हणजे त्यांचा मान त्यांनी ठेविला नाही तरी चालेल असे कोणीही समजता कामा नये. तीं मानास व आदरास आमरण पात्र आहेत. आणखी असे कीं, आपण आपल्या आईबापांचा योग्य मान ठेवतो, व त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानितों असें आपल्या लेकरांच्या नजरेस आल्याने तीं आमचे अनुकरण करून आम्हांस आमच्या वृद्धापकाळीं तसाच मान देतील व आम्हीं सांगितले ऐकतील हाही स्वार्थ लक्षांत वागविण्यासारखा आहे.

## मातृसुखास जपणें

पुत्रधर्माचें तिसरे अंग म्हटले म्हणजे पुत्रानें मातापितरांचे उपकार स्मरून आपणांकडून होईल तेवढें त्यांस साहाय्य करावें, आणि कोणत्याही गोष्टीची वाण पडूं देऊं नये. त्यांचे उत्तर वर्षांतले दिवस सुखासमाधानें जाऊन त्यांचा अंत पूर्ण शांतीनें होईल असें वर्तन ठेवण्यास सुपुत्रानें अहर्निश झटावें, हें त्याचें परमपूज्य कर्तव्य होय. कारण असें पाहा कीं, आम्ही अगदीं परस्वाधीनस्थितींत असल्यापासून तों प्रौढ वयाचे होईतोपर्यंत आमचें लालनपालन करून आम्हांस योग्य प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं ज्यांनीं जिवापाड श्रम केले, नानासंकटें, गैरसोई सोसल्या, आपल्या सुखाची पर्वा मुळींच केली नाहीं, त्यांच्या ह्या ऋणांतून अत्यल्प तरी उतराई होण्याची संधि प्राप्त झाली असतां जो स्वकर्तव्यास पराङ्मुख होत नाही तर स्वशक्त्यनुसार ते करण्यास मनापासून झटतो, तोच खरा पुत्र होय. आपली माता जरेनें व्याप्त होऊन किंवा रोगग्रस्त होऊन तिचीं गात्रें विकल झालीं असतां तिची शुश्रुषा करण्यास व तिला प्राप्त झालेली विपत्ति साधेल

तेवढी दूर करण्यास झटणे हें पुत्राचे परमपूज्य कर्तव्य होय. माता अगदीं परस्वाधीन होऊन बिछान्यावर पडली असतां तिच्यापाशीं बसून तिचे हातपाय चेपणे, तिला धरणे, सावरणे, उठविणे, बसविणे, अन्नपाणी आग्रह करकरून चारणें व तिला औषधोपचार वगैरे करणें यांत ज्याला मोठें समाधान वाटतें आणि अंतकाळपर्यंत ह्याप्रमाणें तिची एकंदर तरतूद राखण्याचें काम बायको, चाकर माणसें वगैरे कोणावर न सोपवितां स्वतः तें मोठ्या प्रमाणें व कळवळ्यानें जो करितो, तो सध्या खरा भाग्यशाली होय. हे भाग्य फारच थोड्यांला अनुकूल असतें. जिनें आपणास कडेखांद्यावर वागविलें, मलमूत्रादिकांचा यत्किंचीत्ही वीट न मानितां जिने आपली निगा उत्तम प्रकारे राखिली; रोगराईच्या वेळी जिचा जीव आपणासाठी तीळ तीळ तुटला, तिला तिच्या वृद्धापकाळी अशाच प्रकारची अल्पस्वल्प मदत करण्याची संधि प्राप्त झाली हें आपले मोठेच भाग्य होय असे आपण मानिले पाहिजे. माता हयात आहे तोपर्यंत तिच्या आशेत राहून, तिचा योग्य मान राखून व तिला कोणत्याही प्रकारची वाण पडूं न देऊन तिला सुख देव हा जसा पुत्राचा परमपवित्र धर्म आहे त्याप्रमाणेंच तिच्या अंतसमयीं तिच्या सन्निध राहून तिची परिचर्या स्वहस्तानें करून तिचा शेवट सुखानें होईल असें करणें हाही पुत्राचा धर्म आहे. स्वमाता आजारी होऊन अत्यवस्थ झाल्याची वार्ता कानी पडताच हृदयप्रवृत्ति कळवळून जाऊन, मातृदर्शनाची इच्छा अनावर होऊन भूगोलाच्या अत्यंत दूरच्या प्रदेशावरूनही सर्व व्यवसायास व हितसंबंधांस लाथ मारून जो पुत्र मातेकडे धाव घेतो आणि तिची शुश्रुषा अंतकाळपर्यंत करण्यांत समाधान मानितो, त्याच्याठायीं मातेनें केलेल्या उपकारांची स्मृति दृढ राहिली असून मातृवात्सल्याच्या योगानें पुत्रहृदयात निःसीम व निरपेक्ष मातृविषयक प्रेम उद्भवणे अत्यंत साहजिक आहे असें म्हणावयाचे. सत्पुत्राच्या ठायींचें हे स्वमाताविषयक प्रेम माता हयात असते तोपर्यंतच टिकते काय? नाही; तर तें त्याच्या हृदयांत आमरण वास करीत असतें. मातेच्या देहावसानानें आपणास खरा पोरकेपणा आला असें तो समजतो. ह्या दुनियेतलें अत्यंत मायचें माणूस गमावलें म्हणून त्याचें चित उद्वगयुक्त होतें. तिच्या अनंत उपकारांचें व अप्रतिम वात्सल्याचें स्मरण त्याला पदोपदी होऊन त्याचें हृदय गहिवरून जातें. त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहातात. तिनें ज्या इच्छा अंतसमयी प्रगट केल्या असतील तदनुसार वर्तन करण्यास किंवा त्या पूर्ण करण्यास तो कायावाचामनें करून झटतो. तिची स्मृति चिरकाल राहील असे कांहींतरी लोकोपयोगी सत्कृत्य करून ठेवण्याचे सामर्थ्य अंगीं असल्यास तें करण्यास तो कदापि चुकत नाही. ज्या जनावरांवर व वस्तूंवर स्वमातेचें प्रेम विशेष होतें, त्याजवर त्यांचे प्रेम कायम

होऊन तीं त्यास मातृप्रेमास्तव आदरणीय होतात. ह्या व अशाच दुसऱ्या मातृविषयक प्रेमाच्या सूचक कृति करून तो लोकादरास व स्तुतीस पात्र होतो. येथवर पुत्र धर्माचे जें त्रोटक निरुपण केले आहे. त्यावरून ही गोष्ट ध्यानांत येण्यासारखी आहे कीं, मातृवात्सल्य असें निसर्गसिद्ध, अतएव निरपेक्ष व अखंड असतें, तद्वत्च पुत्रधर्मही निसर्गसिद्ध, व निरपेक्ष असणें योग्य होय. परंतु ह्या पुत्रर्धमामध्ये वयपरत्वें व इतर कारणांनीं थोडेबहुत अस्वाभाविक रूपांतर होऊन पुष्कळ पुत्रांच्या हातून अनन्वित व निंद्य असें वर्तन घडते. कित्येकांच्या ठायींचें तर मातृविषयक प्रेम अगदींच आटतें. असा खेदजनक व लज्जास्पद फेरबदल ज्यांच्या चित्तांत होत असेल, त्याला काय म्हणावें तें समजत नाही. अशा जनांच्या कृतीस अमानुष हेंच विशेषण योग्य होय. मनुष्य स्वभावास अनुरूप असा प्रकार म्हटला म्हणजे माता व पुत्र ह्यांच्या हृदयांत परस्परविषयक प्रेमरज्जु जो निसर्गतः उद्भूत होऊन विकसित होतो, तो उभयतांच्या हृदयांत आमरण अखंड राहून परस्परांच्या सुखास व समाधानास कारण व्हावा व लोकादरास व स्तुतीस पात्र व्हावा. जो सद्पुत्र आहे त्यास यासंबंधानें बोध करण्याचें प्रयोजनच नाहीं. त्याच्या सात्विक वृत्तीचा नैसर्गिक ओढाच असा प्रबल असतों कीं, त्याला कसेंही बिकट प्रसंग प्राप्त झाले किंवा केवढेंही अंतराय आलें, तरी तो पुत्रधर्मापासून कदापि पराङ्मुख होत नाहीं. त्याचें यथोचित स्वशक्त्यनुसार अनुवर्तन करण्यांतच त्याच्या चित्तास समाधान वाटतें.

***

# ३८ ज्ञान-विनिमय

(विल्सन हायस्कूल, मासिक १९२०)

मानवजातीनें आजपावेतों संपादिलेला ज्ञाननिधि अति प्रचंड आहे. प्राचीन काळीं आर्याच्या चौदा विद्या आणि चौसष्ट कला होत्या असें पुराणांतरी उल्लेख आहेत, व त्याची नांवेंहि दिली आहेत. एवढा सगळा ज्ञानविधि संपादन करणारे कुशाग्रबुद्धि पुरुष पूर्व काळी होऊन गेले असा प्रवाद आहे. परंतु तो केवळ अशक्तिरूप आहे असें पूर्वकालीन विद्यादिकांच्या प्रचंड ग्रंथसमुदायावरून म्हणावें लागतें. विशिष्ट विद्येंतच पारंगत होईन असा कोणी संकल्प केला, तर तो त्याच्या साऱ्या आयुर्दायांत सिद्धीस जाईल कीं नाही, याची वानवा आहे. ही झाली आमच्या देशांतील पूर्वकाळच्या ज्ञाननिधीची गोष्ट. पण ह्या भरतखंडाबाहेरील दूरदूरच्या देशांतलें असेच ज्ञाननिधी संग्रहित झाले आहेत; आणि आधुनिक काळी पाश्चिमात्याच्या दीर्घपरिश्रमानें पूर्वकाळच्या ज्ञाननिधीत अगणित नवी भर पडून ज्ञानाच्या बहुतेक शाखांना व्यवस्थित व निश्चित स्वरूप प्राप्त झाले आहे; आणि त्याची वाढ एकसारखी होत राहण्याचा योग आला आहे. त्या बहुतेकांचा मानवी प्रपंचास अनेक प्रकारीं मोठा उपयोग असल्याकारणानें त्यांचें महत्त्व जनांस विशेष वाटत आहे, आणि त्यांत उत्तरोत्तर भर पडत चालली आहे. नेहमी नवे शोध, नव्या कल्पना व नव्या युक्ति प्रवृत्त होत आहेत. एक एका शास्त्रीय विषयावर व एक एका शास्त्रीय कलेवर सहस्त्रावधि ग्रंथ निरनिराळ्या देशांतलें तज्ज्ञ पुरुष लिहून प्रसिद्ध करीत आहेत. ह्यावरून पाहतां पाश्चात्त्यांचा ज्ञाननिधि केवळ अपरिमित झाला आहे; आणि ज्यांना इंग्लिश, फ्रेंच किंवा जर्मन भाषा चांगली येत असेल, त्यांना हा ज्ञाननिधि प्राप्त होण्यासारखा आहे.

पाश्चात्त्यांच्या ह्या निधीचा जनांस ऐहिक प्रपंचामध्यें अतिशयित उपयोग असल्याकारणानें त्याचें संपादन करण्याचें जे कांहीं उपाय आहेत, त्यांचा अवलंब स्वोत्कर्ष इच्छिणाऱ्या प्रत्येक जनसमूहानें अवश्य केला पाहिजे. सगळा निधि एका व्यक्तीच्या आटोक्यातला नसल्याकारणानें विवक्षित जनसमूहातील निरनिराळ्या व्यक्तींनीं

आपआपल्या रुचीप्रमाणें व परिस्थित्यनुरूप ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांचे व उपाशाखांचें आणि निरनिराळ्या कलाचें व उपकलांचें परिशीलन केलें पाहिजे. अशा रीतीनें श्रमविभागाच्या तत्वास अनुसरून संपादिलेल्या ज्ञानाचा विनिमय त्यांनीं परस्परांमध्यें केला पाहिजे. हा विनिमय जितका अधिक होईल, तितका ज्ञानप्रसार विशेष होऊन सगळ्या जनसमूहाचा एकवटीनें उत्कर्ष होण्याचा दृढ संभव असतो. देशांत चालू असलेला प्रत्येक उद्योग व व्यवसाय नीट चालून त्याचा उत्कर्ष व्हावयासाठीं निरनिराळ्या व्यक्तींनीं निरनिराळ्या उद्योगास व निरनिराळ्या व्यवसायास लागणारी माहितीं मिळविलीं पाहिजे; शिवाय एकाच उद्योगांतील निरनिराळ्या अंगांचीं व उपांगांचीं माहिती निरनिराळ्या व्यक्तींनीं मिळवून तेवढीच अंगें व उपांगें त्यांनीं संभाळलीं पाहिजेत. अशा रीतीनें परस्पर सहकारितेच्या व ज्ञानविनिमयाच्या योगानें देशांतील उद्योगधंदे व इतर व्यवसाय व्यवस्थितपणें व यशस्वीं रीतीनें चालून त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जातो.

आतां विवक्षित राष्ट्रातील व्यक्तींनीं जसा हा ज्ञानविनिमय परस्पर साहाय्याच्या तत्वास अनुसरून केला पाहिजे, तसाच निरनिराळ्या राष्ट्रानीं आपआपल्या ज्ञाननिधीचा विनिमय अवश्य केला पाहिजे; आणि तो सांप्रत परस्पर दळणवळणाची साधनें चांगलीं अनुकूल झाल्याकारणानें हा विनिमय जारीने चालू आहे. निरनिराळ्या राष्ट्रांच्या परस्पर ज्ञानविनिमयाला मोठी अडचण जी भाषाभेदाची, ती पाश्चात्य पंडितांच्या परिश्रमानें बहुतेक दूर झाली आहे सांप्रत कोणत्याही प्राचीन किंवा अर्वाचीन राष्ट्रात संग्रहित झालेल्या ज्ञाननिधीचा अनुगम प्राप्त व्हावयास मुळीं अडचण उरली नाहीं. इंग्लिश फ्रेंच किंवा जर्मन भाषा ज्यास येईल त्यांस हा अखिल मानवजातीनें संग्रहित केलेला ज्ञाननिधि प्राप्त होण्याजोगा आहे. हा असा निरनिराळ्या राष्ट्रांतल्या ज्ञाननिधीचा परस्पर विनिमय झाल्याकारणानें, सदरील एकादी भाषा ज्यास अवगत होईल त्याच्या दृष्टीचा व बुद्धांचा संकुचितपणा जाऊन त्याला इहपरलोकसिद्धि सुकर होणार आहे.

आणखी असें कीं, मानवी प्रपंचाची अनेक बाबतीत पुष्कळ वाढ होऊन त्याचा बिकटपणाही फारच वाढला आहे; आणि निरनिराळ्या कमीजास्त विद्याचारसंपन्न राष्ट्रांचें परस्पर संघटन झाल्याकारणानें त्यांचे आचारविचार व व्यवसाय यांत हळूहळू फेरफार होत आहेत. यास्तव प्रत्येक जनसमाजांत नवेनवे प्रश्न व भानगडी उत्पन्न होऊन त्यावर सारखी चर्चा सुरू झाली आहे. ज्या गोष्टीचा निश्चय निश्चित शास्त्रीयज्ञानाच्या साहाय्यानें होणे शक्य नसतें, त्यासंबंधानें मतभेद होऊन वादविवाद उपस्थित होत असतो. अशा विषयांवर प्रत्येकानें आपआपली मते सत्य निर्णयाच्या

अनन्य हेतूनें प्रदर्शित करून ज्ञानविनिमय सुसाध्य करणें उचित होय. आपणांस एकाद्या उपयुक्त विषयासंबंधानें जी; माहिती असेल, ती इतरांस प्रांजल बुद्धीनें कळविणें हा प्रत्येक व्यक्तीचा धर्म होय; आणि जीं माहिती आपणांस नाही, ती दुसऱ्यांनीं सांगितली असतां मनःपूर्वक ऐकून घेणें हाही त्याचा धर्म होय. अशा रीतीनें केलेल्या ज्ञानविनिमयाच्या योगानें पुष्कळ विषयांचें व बिकट प्रश्नांचें ज्ञान फारसा आयास न करितां मनुष्यांस प्राप्त होण्यासारखे असतें. सर्व विद्या, सर्व शास्त्रे व सर्व कला,अशा ज्ञानविनिमयाच्या प्रवृत्तीमुळेंच आजपर्यंत उत्कर्ष पावल्या आहेत.

भाषां ह्या ज्ञानाविनिमयाचीं साधने मुख्यतः दोन आहेत. एक बोलणें व दुसरें लिहिणें. त्या दोन्ही कला मनुष्याला जितक्या चांगल्या साध्य होतील तितक्या त्याच्या संपादित ज्ञानाचा अन्य जनांस विशेष उपयोग होणार आहे. वास्तव, स्पष्ट, शुद्ध व मनावर ठसेल, अशी भाषा बोलण्यास व लिहिण्यास शिकणें हे आपले कर्तव्य आहे. कारण दुसऱ्याकडून जसें आपणांस अनेक विषयांचें आयते ज्ञान प्राप्त होतें, तसें आपणाकडूनही त्यांस एकाद्या दुसऱ्या विषयावर ज्ञान मिळेल असा अधिकार व सामर्थ्य आपल्या ठायीं वाढविण्यास आपण अवश्य झटले पाहिजे. आपल्या आवडीच्या अशा एकदोन विषयांचें किंवा विद्याकलादिकांचें ज्ञान, साधेल तेवढें पुरे मिळवून त्याचा लाभ इतरांस करून देण्याची आपली तयारी ठेवण्यांतच खरा पुरुषार्थ आहे. दुसऱ्यांकडून मिळेल तेवढें ज्ञान मात्र घ्यावयाचें, पण आपल्याकडून दुसऱ्यास कांहीं एक ज्ञान मिळण्याची मुळीं शक्यता नसावीं, हे कांही चांगलें नाहीं. तर ज्ञानविनिमयाचा पुरस्कार आपल्या सामर्थ्यानुरूप होईल तेवढा करण्यास सर्वानी सर्व काळ उद्युक्त असलें पाहिजे. सगळ्या मासिकांची, त्रैमासिकांची व वर्तमानपत्रांची प्रवृत्ती मुख्यतः ह्या ज्ञानविनिमयाच्या पुरस्कारासाठीं आहे; आणि त्यांच्या संख्येच्या व चांगुलपणाच्या मानानें विद्याचारसंपन्नता साध्य होणारी आहे.

***

वाय ६५०-११०५ पु.-५ .२०१९

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर